स. प्र. सं. ठाणें
विभाग इतिहास
स. नं.
३-७३४

# मराठ्यांचा इतिहास.

## भाग तिसरा.

### प्रास्ताविक माहिती.

( दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें. आणि मराठ्यांच्या उत्कर्षाचें पूर्वस्वरूप. )

इतर अनेक उपयुक्त व विविध माहितीसह.

लेखक

दत्तात्रय बाळकृष्ण करकरे
हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य, अस्तनींतील निखारा, पेशवाईचा मध्यकाल, मराठ्यांचा इतिहास भाग १–२ वगैरे पुस्तकांचा कर्ता.
जळगांव; पूर्व खानदेश.

आवृत्ति पहिली.

इ० सन १९२४.

REFBK-0002547

(...थकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत २॥ रुपये.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. २५०८

# मराठ्यांचा इतिहास.

## भाग तिसरा.

### प्रास्ताविक माहिती.

( दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें, आणि मराठ्यांच्या उत्कर्षाचें पूर्वस्वरूप. )

इतर अनेक उपयुक्त व विविध माहितीसह.

लेखक

दत्तात्रय बाळकृष्ण करकरे

हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्य, अस्तनींतील निखारा, पेशवाईचा मध्यकाल, मराठ्यांचा इतिहास भाग १-२ वगैरे पुस्तकांचा कर्ता.

जळगांव; पूर्व खानदेश.

आवृत्ति पहिली.

इ० सन १९२४.

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत अडीच रुपये.

Printed by
*D. G. Sadekar, at the*
**DHANANJAYA P. PRESS**
and
Published by
*D. B. Karkare, at Lokmitra Office,*
House No. 698, at Khanapur, District—Belgaum.

# आभार प्रदर्शन.

या भागास मी ज्या ज्या ग्रंथांचे आधार घेतले आहेत, त्या त्या सर्व ग्रंथकारांचा, ज्या ज्या अनेक स्नेह्यांनीं व वाचनालयांनीं मला आपल्या अमोल्य ग्रंथसंग्रहालयाचा उपयोग करण्याची व आवश्यक तीं पुस्तकें वापरण्यास जवळ ठेवण्याची परवानगी दिली त्यांचा व ज्या इतर अनेक स्नेही व मराठ्यांच्या इतिहासाविषयीं अभिमान असणाऱ्या मंडळींनीं माझ्या अंगीकृत कार्यास उत्तेजन देऊन मला निरनिराळ्या प्रकारें उपयुक्त व उदारपणानें मदत केली, त्या त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

ग्रंथकार.

# अर्पण-पत्रिका.

श्रीमंत, धैर्योदार्यचूडामणि, सरदार,

## गंगाधरराव रघुनाथराव
## गंभीरराव

सरकानगो, देशमूख, देशपांडे;

सावदें, जिल्हा पूर्वखानदेश,

यांच्या सेवेसीं

हा ग्रंथ

श्रीमंतांच्या परवानगीनें अत्यंत आदरानें

अर्पण केला आहे.

द. वा. करकरे.

REFBK-0002547

# श्रीमंतांचें अभिनंदन.

श्रीमंत सरदार गंगाधरराव साहेब यांच्यासंबंधीं याठिकाणीं कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे. श्रीमंतांचा व माझा लहानपणापासूनचा परिचय असल्यानें श्रीमंतांचा, या ग्रंथास आश्रय देण्याबद्दल मी विनंति केली; व ती त्यांनीं मान्य करून, मराठ्यांच्या इतिहासाच्या पहिल्या, दुसऱ्या व ह्या तिसऱ्या व याच्या पुढील सर्व भागांस आपला उदार आश्रय देऊन, मला आपलें ऋणी केलें आहे, इतकेंच नव्हे तर श्रीमंतांच्या कृपेमुळेंच हा सर्व ग्रंथ पूर्ण होणार असल्यामुळें, त्याचें श्रेय **श्रीमंत सरदार गंगाधरराव साहेब** यांनाच देणें इष्ट आहे.

दत्तात्रय.

# Sardar G. R. GAMBHIRRAO,

## Deshmukh, Deshpande, Sirkango, of Savda, East Khandesh.

Shrimant Gangadhar Rao Raghunath Rao Gambhir Rao, Sirkango, Deshmukh, Deshpande, and Second Class Sardar, Savda, East Khandesh and Nimar, is the descendant of a family that wat founded six hundred and fifty (650) years ago by Gurudas, Son of Arjun Naik. He was a prime favorite of the Emperor Mubarik, who conferred on him the Deshmukhi and Deshpandeship of Asirgarh, Savda, Manjrod, Varangaon, and Dangari Parganas, in Khandesh and Nimar. He was succeeded by his son Gangoji, who took a leading part iu establishing peace between the the Bhils and the Pindaris, and supplied provisions to the Imperial troops. For these services, the hereditary Jamedari and Sirkangoship of one hundred and twentythree ( 123 ) villages in Khandesh, and the title of " Gambhir Rao, " were conferred on him by the Emperor Allauddin, together with all the honors of Sardar. KeshavRao Gambhir Rao, the grandfather of the pressent Sardar, gave every assistance in the introduction of Surveys and Settlements into his districts, and otherwise aided the Government in introducing Reforms and Improvements, and in consideration of these services, the Government of India, in 1909, conferred the honour of a Sardarship on the present head of the family. This was the first time that the Indian Government had given the title of Sardar to the Khandesh District.

Sardar Gangadhar Rao Deshmukh, as a member of the District Local Board, and President of the Savda Municipality, for some timel has rendered valuable services in the cause of sanitation and genera, improvements of the town of Savda, and these services have been recognized by Government. He has also been honoured by Governf ment by conferring upon him the powers of a Magistrate of the second class. He also holds the powers of Dharmadhikari for the whole o- Savda pargana and has been recently honoured by His Holiness the Shankaracharya of the Sankeshwar and Karvir Maths by conferring upon him the title of " Dhairyodaya Chudamani. "

# आधारभूत ग्रंथांची यादी.

## इंग्रजी.


1 Brigg's Ferishta.
2 Danver's History of the Portuguese in India.
3 Elphinston's History of India.
4 Elliot's History of India. Vols. 1-8.
5 Grant Duff's History of the Marathas.
6 Heern's Acitic Nations. Vols. 1-2.
7 ,, Historical Researches. Vols. 1-2.
8 Holden's Mogal Emperors.
9 Howorth's History of the Mogals.
10 Hunter's History of British India. Vols. 1-2.
11 Imperial Gazetter of India Vol. II ( Historical ).
12 Keen's History of Hindustan.
13 Khandesh Gazetter.
14 Kincaid and Parasnis's History of the Maratha People. Vol. 1.
15 King'sHistory of the Bahamani Kings.
16 Lane-poole's Aurangzeb ( Ruler's of India. Series. )
17 Lyall's British Dominion in India.
18 Macpherson's History and Management of the East India Company.
19 Mahon's Influence of Sea-Power in History.
20 Meadows Tayler's Students History of India.
21 Mills History of India.
22 Myer's History Ancient and Modern.
23 Peter Auber's Rise and Progress of British Power in India.

24 Ranade's The Rise of the Marhatta Power.
25 Rulers of India Series;-Albuquerque.
26 Sarkar's Aurangzeb. Vols. 1-4.
27 Sydney Owen's India on the eve of the British conquest.
28 Thornton's History of East India Company.
29 Fratter's History of India.
30 Todd's Rajasthan.
31 Vincent Smith's Oxfored History of India.
32 Wheeler's History of India. Vols. 1-5.

---

## मराठी.

१ दळवी कृत मराठा कुळांचे इतिहास; भाग १-२-३.
२ पारसनीस कृत मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार.
३ ,, ,, इतिहास संग्रह.
४ सरदेसाई कृत मराठी रियासत; भाग पहिला.
५ ,, ,, ब्रिटिश रियासत.
६ ,, ,, मुसलमानी रियासत.
७ मोडक कृत दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास; भाग १-२-३
८ लोकहितवादी कृत गुजराथचा इतिहास.
९ ,, ,, राजस्थानचा इतिहास.
१० गायकवाड कृत विजापूर वर्णन.

याशिवाय कारणपरत्वें उपयोगांत आणिलेल्या इंग्रजी मराठी पुस्तकें वगैरेंचा त्या त्या ठिकाणीं उल्लेख केला आहे.

---

## सरदार गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव देशमुख, देशपांडे, सरकानगो, सावदें जिल्हा पूर्व खानदेश.

श्रीमंत गंगाधरराव रघुनाथराव गंभीरराव, सरकानगो, देशमूख, देशपांडे, व सेकंडक्लास सरदार, सावदें, जिल्हा पूर्व खानदेश, आणि नेमाड, हें, जें घराणें सहाशें पन्नास वर्षांपूर्वी, अर्जुन नाईक या नांवाच्या एका मनुष्याचा मुलगा नामें गुरूदास यानें स्थापत केलें, त्या घराण्याचे वंशज आहेत. गुरूदास हा बादशहा मुबारिक यांच्या अतीशय मेहेरबानींतील असून बादशहानें त्यास खानदेश आणि नेमाड प्रांतांतील आशिरगड, सावदें, मांजरोद, वरणगांव, आणि डांगरी परगण्यांची, देशमुखी आणि देशपांडेपणाचें वतन बहाल केलें होतें. त्याच्या मृत्यू नंतर त्याचा मुलगा गंगोजी हा त्या वतनाचा मालक झाला; त्यानें भिल आणि पेंढारी यांच्या मध्यें सलोखा घडवून आणण्यांत प्रमुखत्वानें भाग घेतला, आणि बादशाही सैन्यास सामुग्री वगैरेंचा पुरवठा केला. या त्यांच्या कामगिरीबद्दल बादशहा अल्लाउद्दीन यानें त्यास खानदेशांतील एकशें तेवीस गांवची जमेदारी, सरकानगोपणा, "गंभीराव" हा किताब, व सरदारकीचे सर्व मानमरातब हीं सर्व त्यास वंशपरंपरेनें बहाल केलीं. त्यानंतर हल्लींच्या सरदार साहेबाचे आजे केशवराव गंभीरराव यांनीं आपल्या प्रदेशाच्या हद्दींत "सर्व्हे-सेटलमेंट" ह्मणजे जमीनीची मोजणी व धाराबंदीचा उपक्रम करण्यांत इंग्रज सरकाराला प्रत्येक प्रकाराची मदत केली, आणि नवीन सुधारणा सुरू करण्याच्या, व पूर्वीच्या कांहीं बाबती दुरुस्त करण्याच्या, कामींही साह्य केलें; ह्या गोष्टी लक्षांत घेऊन या घराण्यांतील हल्लींचे मुख्य पुरुष श्रीमंत गंगाधरराव यांस हिंदुस्थान सरकारनें इ० सन १९०९ मध्यें सरदारकीचा मान अर्पण केला. हिंदुस्थान सरकारनें पूर्व खानदेश जिल्ह्यास "सरदार" ही पदवी अर्पण केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

सरदार गंगाधरराव देशमूख, हे कांहीं काळ, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे मेंबर, व सावदें मुनसिपालिटीचे प्रेसिडेंट असून सावदें गांवाची सर्वसाधारण सुधारणा, आणि आरोग्य, या बाबतींत त्यांनीं मौल्यवान कामगिरी बजाविली आहे; व ती सरकारासही मान्य झालेली आहे; त्याप्रमाणेंच त्यांना दुसऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे अधिकार देऊन सरकारानें त्यांचा बहुमान केलेला आहे. शिवाय सर्व सावदें परगण्याच्या धर्माधिकारीपणाचा अधिकारही त्यांच्याचकडे असून संकेश्वर आणि करवीर मठाच्या शंकराचार्यांनी त्यांनां नुकताच "धैर्योदार्य चूडामणी" हा किताब देऊन त्यांचा गौरव केलेला आहे.

त. इ. ३५

मध्यप्रांतांतील प्रमुख वर्तमानपत्र

‘ महाराष्ट्र ’ ता. १-११-२२ मधील अभिप्रायाचा उतारा.

# मराठ्यांचा इतिहास.

( ले० श्री० दत्तात्रय बाळकृष्ण करकरे, जळगांव ) भाग १ ला. हा आमचेकडे अभिप्रायार्थ आल्यास बरेच महिने झाले. या भागांत प्रत्यक्ष महाराष्ट्राचा किंवा मराठ्यांचा इतिहास बिलकूल आलेला नाहीं; परंतु, सुमारें १ हजार वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत मराठा राष्ट्र निर्माण होण्याचीं चिन्हें दिसूं लागेपर्यंत—पूर्वींच्या २।३ हजार किंवा त्यांहून जास्त वर्षांचा हिंदुस्थानाचा पूर्वेतिहास या प्रास्तविक भागांत संक्षेपतःच परंतु व्यापक व मनोरंजक-रीतीनें संकलित केला आहे. वेदकालापासून-आर्य लोक मध्यएशियांत, हिंदुस्थानांत आले असें ह्मणतात, तेव्हांपासूनच—हिंदु समाजाचा व हिंदु संस्कृतींचा इतिहास थेट इ. स. १५६२ सालीं तालीकोटच्या लढाईनें विजयानगरच्या राज्याचा नाश होईपर्यंत विहंगम-दृष्टीनें पाहून यांत मथित केला आहे. इंग्रजींत प्राचीन हिंदुस्थानच्या इतिहासाचीं कांहीं पुस्तकें गेल्या ४०।५० वर्षांत पैदा झालीं आहेत; परंतु त्यांतील माहिती विवेचक-दृष्टीनें व काळजीपूर्वक एकत्र करून ती मराठी वाचकांस सादर करण्याचें काम अद्यापि कोणी केलें नाहीं. तो प्रयत्न श्री० करकरे यांनीं या पहिल्या भागांत केला आहे. तेणेंकरून माहितीच्या दृष्टीनें हें पुस्तक अमूल्य व वाचनीय झालें आहे. प्रथम वैदिक व पौराणिक कालाचा वृत्तांत व दंतकथा वर्णन करून नंतर इतिहासाच्या अंधुक प्रकाशांतून मुसलमानी वर्चस्वापर्यंत ग्रंथकारानें आपला मार्ग काढिला आहे; अनेक शतकांतील राजकीय इतिहासाचा परामर्ष घेतल्यावर शेवटचीं शंभर पानें हिंदुस्थानचें प्राचीन वाङ्मय, तत्त्वज्ञान, राज्यव्यवस्था, गणित, ज्योतिष, युद्धशास्त्र, राजनीतिशास्त्र, शिल्प, गायन, वैद्यक, समुद्रयान, हिंदूंच्या परद्वीपांतील वसाहती, व्यापार इ. गोष्टींचें अत्यंत मनोवेधक वर्णन वाचल्यावर प्राचीन हिंदू संस्कृतीचें महत्व व वर्चस्व वाचकांच्या मनावर ठसल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थात् ही पूर्वेतिहासाची भूमिका रंगविल्यामुळें त्यावर मराठ्यांच्या इतिहासाचें चित्र उठावदार दिसणार आहे. पुढें होणारे ‘ मराठ्यांच्या इतिहासा ’ चे १४।१५ भाग विचारांत न घेतले व हा भाग स्वतंत्र घेतला, तरी तो अत्यंत वाचनीय व संग्रहणीय झाला आहे यांत तिळमात्र शंका नाहीं. यापुढील भागही असेच मनोरंजक व माहितीपूर्ण निपजतील अशी आह्मांस खात्री वाटते. हल्लीं साने, राजवाडे, खरे, पारसनीस, भावे, देव, चांदोरकर,

आपटे, किंकेड व इतिहाससंशोधक मंडळ ( पुणें ) वगैरे अनेक संशोधकांनीं, लेखकांनीं व संस्थांनीं मराठी इतिहासाचें पुष्कळ नवीन साहित्य प्रसिद्ध केलें आहे. त्याची जुळवाजुळव व चिकित्सा करून त्यांतून मराठ्यांच्या इतिहासाचें मंदिर उभारण्याचें काम कल्पक व चतुर इतिहासकाराचें आहे. रा. सरदेसाई यांनीं तें काम उत्तम तऱ्हेनें चालविलें आहेच परंतु श्री. करकरे यांचा हा प्रयत्न त्याहूनही विस्तृत आहे. त्यांच्या इतिहासाचीं ४ ते ५ हजार पृष्ठें होतील, असा अंदाज आहे व या ग्रंथांत 'मराठ्यांच्या इतिहासा' चें यथातथ्य प्रतिबिंब उमटेल असा आमचा अंदाज आहे.

यासाठीं ग्रंथकर्त्यास कांहीं स्नेहभावाच्या सूचना करून 'मराठ्यांच्या इतिहास' काराची आह्मीं रजा घेतों. ( १ ) मराठ्यांच्या कारकीर्दींत स्वराज्यविघातक अशा ज्या ज्या चुका मराठ्यांच्या अथवा पेशव्यांच्या हातून घडल्या असतील, त्यांचें त्यांचें आविष्करण करून पुढें त्याच चुका लोकांच्या हातून न घडाव्यात ह्मणून त्यांस ठिकठिकाणीं इषारा देण्यांत यावा. इतिहासकारानें जशी सद्गुणांची पाठ थोपटली पाहिजे, तशीच राष्ट्रीय दुर्गुणांचे कपाळावर काठी मारण्यासही चुकतां कामा नये. ( २ ) इतिहासकारानें ऐतिहासिक सत्याची छपवाछपव करूं नये हें खरें; परंतु तें सत्य पुढें मांडतांना हल्लींच्या समाजांत कलहाग्नि न भडकेल अशी खबरदारी घेतली पाहिजे, कित्येक सत्यें कडू औषधाच्या गोळीप्रमाणें शर्करावगुंठित केल्यास तीं वाचकांस पचूं शकतात ! इतिहास हें अनेक बऱ्यावाईट सत्य गोष्टींचें भांडार आहे. त्यांत टाकाऊ व निरुपयोगी अशाही सत्य गोष्टींची पुष्कळ अडगळ पडली आहे. त्या अडगळींतून भावी राष्ट्राला उपयुक्त व मार्गदर्शक अशी सामुग्रीच निवडून देऊन व ती नीट जुळवून लोकांच्या हातांत देणें यांतच इतिहासकाराचें कौशल्य आहे. ( ३ ) ऐतिहासिक सिद्धांत व अनुमानें स्वतःच्या शद्बांनीं सांगण्यापेक्षां आपल्या विषयाची मांडणीच अशी करावी कीं, त्या मांडणीवरून वाचकांनीं स्वतःच ते सिद्धांत किंवा तीं अनुमानें सहज काढावींत ! ( ४ ) पहिल्या भागांत ऱ्हस्वदीर्घादिकाचे मुद्रणप्रमाद ठिकठिकाणीं झाले आहेत. अशा महत्वाच्या ग्रंथास ते शोभत नाहींत, ह्मणून पुढील भागांत तिकडे विशेष लक्ष पुरवावें.

श्री० करकरे यांचा 'मराठ्यांचा इतिहास' महाराष्ट्रांत लोकप्रिय होऊन त्यास सर्व सार्वजनिक व खासगी वाचनालयांत जागा मिळेल अशी आह्मांस खात्री वाटते. ( पहिल्या भागाची किंमत २॥ रु० )

"वऱ्हाडांतील प्रसिद्ध वर्तमानपत्र"

## उदय—अमरावती. मंगळवार ता० ११ जुलै सन १९२२.

**मराठ्यांचा इतिहास**—श्री. दत्तात्रेय बाळकृष्ण करकरे हे हल्लीं येथें आले असून येथें इतिहासप्रिय लोकांस त्यांनीं गेल्या बुधवारीं सुमारें दोन अडीच तास फारच श्रमपूर्वक मिळविलेली अशी उत्कृष्ट ऐतिहासिक माहिती सांगितली. ही माहिती ज्यानें ऐकली असेल त्यास श्री. करकरे यांनीं इतिहासाचा किती श्रमपूर्वक अभ्यास केलेला आहे, याविषयीं शंका राहणार नाहीं. या माहितीवरून हिंदुस्थानच्या इतिहासाच्या घडामोडीच्या कारणांविषयींहि त्यांनीं आपले कांहीं सिद्धांत बसविले आहेत व ही माहिती व हे सिद्धान्त एकत्र ग्रथित करून ते "मराठ्यांचा इतिहास" ह्मणून तीन तीनशें पानाच्या चवदा, पंधरा, भागांच्या ग्रंथांत सुसंगतपणें मराठ्यांचा प्राचीन काळापासून अगदीं अर्वाचीन काळापर्यंत साग्र इतिहास लिहून काढणार आहेत. श्री. सरदेसाई यांच्याशिवाय सर्व उपलब्ध तुटक तुटक नवी माहिती श्रमपूर्वक संकलित करून सरळ इतिहास लिहून काढण्याचा प्रयत्न मराठींत दुसऱ्या कोणीहि आजवर केला नव्हता; पण या कामाची अत्यंत गरज आहे, आणि हें संकलित इतिहास–लेखनाचें काम इतिहासाचीं साधनें उपलब्ध करून घेण्याइतकेंच किंबहुना असल्यास त्याहून थोडें अधिकच कठिण आहे व हें काम एकानेंच नव्हे. तर अनेकांनीं आपआपल्या दृष्टीनें व वेळोवेळीं अधिकाधिक साधनें उपलब्ध होतील तसतसें करीत गेले तरच महाराष्ट्रासारख्या प्रदेशाचा खरा उत्कृष्ट इतिहास कांहीं दिवसांनीं तयार होण्याची आशा आहे. या दृष्टीनें श्री. करकरे यांचें काम अत्यंत स्तुत्य आहे यांत शंका नाहीं व इतकें कष्टाचें काम हातीं घेतल्याबद्दल आह्मीं श्री. करकरे यांचें अभिनंदन करितों व सुंदर माहितीनें भरलेल्या श्री. करकरे यांच्या ग्रंथास महाराष्ट्र आश्रय देऊन श्री. करकरे यांस आपलें अंगिकृत दुर्घट कार्य पार पाडण्यास समर्थ करील अशी आशा बाळगतों. श्री. करकरे यांच्या ग्रंथाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला असून दुसरा भाग छापत आहे व त्यास आणखी आश्रयदात्यांची गरज आहे.

## पुणें येथील डे० व्ह० ट्रा० सोसायटीकडून या ग्रंथाच्या पहिल्या भागास पन्नास रुपये बक्षीस मिळाले, त्यासंबंधींच्या पत्राचा उतारा.

॥ श्री ॥

नं २४३ सन १९२२।२३

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीचें ऑफिस,

पुणें शहर ता० २५।८ सन १९२२

रा. रा. दत्तात्रय बाळकृष्ण करकरे, जळगांव पूर्व-खानदेश. यांस.

वि. वि. या संस्थेकडून आश्रय मिळावा ह्या हेतूनें आपले ता. २३।७।१९२१ चें अर्जासोबत पाठविलेलें पुस्तक मराठ्यांचा इतिहास भाग १ याचें परीक्षण होऊन ता. २२ आगष्ट सन १९२२ रोजीं भरलेल्या व्यवस्थापक मंडळीचे सभेनें असें ठरविलें आहे कीं, संस्थेनें आपणास सदर पुस्तकाबद्दल रुपये ५० ( पन्नास रु. ) बक्षीस द्यावे व आपण संस्थेस सदर पुस्तकाच्या आणखी दोन प्रती द्याव्या. सबब ह्या पत्रासोबत पाठविलेल्या बिलाच्या चारी प्रतींवर पेनसलीनें 'सही' असें लिहिलें आहे तेथें सह्या कराव्या व पेनसलीनें फुली केली आहे तेथें तारखा घालाव्या आणि सदर सर्व प्रति॰ इकडे ताबडतोब परत पाठविण्याचें करावें. पुस्तकाच्या प्रती व बिलाच्या प्रती आपणाकडून आल्यानंतर पुढील व्यवस्था होऊन सुमारें एक महिन्यानें बक्षीसाची रकम आपलेकडे मनी-ऑर्डरीनें पाठविण्यांत येईल. कळावें, लोभ करावा हे विनंति.

" सही इंग्रजी "

चिटणीस.

---

## पुणें येथील डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीकडून या ग्रंथाच्या दुसऱ्या भागास चाळीस रुपये बक्षीस मिळाले, त्यासंबंधींच्या पत्राचा उतारा.

॥ श्री ॥

नं. ४७७ सन १९२३।२४

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीचें ऑफिस,
पुणें शहर ता. ५।२ सन १९१४.

रा. रा. दत्तात्रय बाळकृष्ण करकरे यांस—

वि. वि. या संस्थेकडून आश्रय मिळावा ह्या हेतूनें आपलें ता. २७।३।१९२३ चे अर्जासोबत पाठविलेलें पुस्तक मराठ्यांचा इतिहास भाग २ रा याचें परीक्षण होऊन ता. ३१।१ जानेवारी सन १९२४ रोजीं भरलेल्या व्यवस्थापक मंडळीचे सभेनें असें ठरविलें आहे कीं, संस्थेनें आपणास सदर पुस्तकाबद्दल रुपये ४० चाळीस बक्षीस द्यावे व आपण संस्थेस सदर पुस्तकाच्या आणखी दोन प्रती द्याव्या. सबब ह्या पत्रासोबत पाठविलेल्या बिलाच्या चारी प्रतींवर पेनसलीनें ' सही ' असें लिहिलें आहे तेथें सह्या कराव्या व पेनसलीनें फुली केली आहे तेथें तारखा घालाव्या आणि सदर सर्व प्रति इकडे ताबडतोब परत पाठविण्याचें करावें. पुस्तकाच्या प्रती व बिलाच्या प्रती आपणाकडून आल्यानंतर पुढील व्यवस्था होऊन सुमारें एक महिन्यानें बक्षीसाची रक्कम आपलेकडे मनी-ऑर्डरीनें पाठविण्यांत येईल. कळावें, लोभ करावा हे विनंति.

सही इंग्रजी
चिटणीस.

## महाराष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्र " केसरी " ता० २३ माहे आक्टोबर, इ० सन १९२३ मंगळवार मधील अभिप्रायाचा उतारा.

# मराठ्यांचा इतिहास.

**केसरी—मंगळवार ता० २३ माहे १० सन १९२३ इसवी**

### अभिप्राय.

**मराठ्यांचा, इतिहास** भाग दुसरा:—ले. दत्तात्रय बाळकृष्ण करकरे, जळगांव, पूर्व—खानदेश. किं. रु० अडीच. सदर भागांत हिंदुस्थानांतील प्राचीन मुसलमानी राज्यांचा, मोंगल बादशाहीच्या ऱ्हासकाळापर्यंतचा विविध माहितीनें भरलेला असा इतिहास दिला आहे. मराठ्यांचा इतिहास निर्माण होण्यापूर्वीचा सुमारें दोनतीन हजार वर्षांचा इतिहास करकरे यांनीं पहिल्या भागांत दिला असून या भागांत मुसलमानी अमलापासून अवरंगजेबापर्यंतचा वृत्तान्त आला आहे. मराठी रियासतीचें पर्यालोचन करतांना गतकालाचेंही यथातथ्य ज्ञान असणें अत्यंत आवश्यक आहे व त्या दृष्टीनें करकरे यांनीं विस्तारपूर्वक विविध व मनोरंजक अशी माहिती फार परिश्रमपूर्वक सदर भागांत दिली आहे. प्रारंभीं तत्कालीन हिंदुस्थानांतील राज्यें युरोपियन राज्यांच्या तोडीचीं कशीं होतीं, याची अनेक पुराव्यानिशीं प्रस्तावनेंत चर्चा केली आहे. करकरे यांनीं आंखलेल्या इतिहासलेखनाचें क्षेत्र फार व्यापक असून त्यांनीं सुरू केलेला प्रयत्न स्तुत्य आहे.

---

# प्रस्तावना.

मराठ्यांच्या उत्कर्षाचें पूर्वस्वरूप लक्षांत घेण्यास दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांच्या इतिहासाचें मनन केलें पाहिजे. या मुसलमानी राज्यांच्या इतिहासांतच मराठ्यांच्या उत्कर्षाच्या पूर्वस्वरूपाचा इतिहास आहे. दक्षिणेंत छत्रपति **शिवाजीनें** मराठा साम्राज्याची स्थापना करीपर्यंतच्या काळांत मराठ्यांचा मुसलमानी राज्यांत सारखा उत्कर्षच होत चाललेला होता. हा उत्कर्ष दुय्यम दर्जाचा होता; तरी सुद्धां भावी राज्य-संस्थापनेस तो पोषकच होणारा असा होता व त्याबरोबरच मराठ्यांचें वर्चस्वही सारखें वाढत चाललें होतें. गोवळकोंडें, विजापूर, अहंमदनगर व बेदर या चार मुसलमानी राज्यांतील बहुतेक सत्ता प्राय: मराठे मुत्सद्दी व मराठे योद्धे यांच्याच हातांत होती व मुसलमानांतील आपसांतील धार्मिक मतभेद, वैमनस्यें व युद्धकलह हीं सारखीं जोरांत असल्यामुळें, वेळेला मराठ्यांचा उपयोग आपणांस करून घेतां यावा ह्मणून त्यांनींच मराठ्यांना बलिष्ठ बनविलें होतें. दक्षिणप्रांतांतील सर्व शाहा शियापंथी व उत्तरेकडील मोंगल सुनीपंथी त्यामुळें उभयतांमध्यें धार्मिक मतभेद उत्पन्न होऊन मोंगलांनीं दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा उच्छेद करण्याचा पैगाम बांधिला; दक्षिणेंतील मुसलमानी राज्यकर्ते अथवा दिल्ली येथील मोंगल बादशाहा यांना हिंदुधर्मी मराठा लढवय्याला मनसबदारी अथवा सरदारी देऊन प्रबळ करावें अशी केव्हांही इच्छा नव्हती. परंतु हें राजकीय धोरण कायम ठेवून त्याप्रमाणें वागणेंहि त्यांना शक्य नव्हतें; उलट दक्षिणी व परदेशी लोकांच्या भांडणांत निजामशाहाला तर स्वसंरक्षणाकरितां मराठ्यांचा तिसरा पक्ष निर्माण करणें भाग पडलें होतें. हा पक्ष ह्मणजे निजामशहानें छत्रपति शिवाजीचा आजा मालोजी भोंसले यास मनसबदारी देऊन स्वसंरक्षणार्थ विश्वासुक असा, निर्माण केलेला तिसरा पक्ष होय. मूर्तुजा निजामशाहा आपल्या वजिरावर राज्यकारभार सोंपवून आवश्याच्या किल्ल्यावर ईश्वरचिंतन करीत राहिला होता, त्यावेळीं मालोजी भोंसले यास त्याच्या तैनातींत ठेवण्यांत आलें होतें. शहाजीच्या काळांत मराठ्यांच्या ह्या राजकीय महत्वास जोराचें चालन मिळालें; मूर्तुजा निजामशाहा मृत्यु पावला, त्यावेळीं त्यानें दक्षिणी किंवा परदेशी मुसलमानांवर विश्वास न ठेवितां, शहाजी त्यावेळीं निजामशाहींत नसून सुद्धां, त्याच्यावरच आपल्या बायकामुलांना सांभाळण्याचें काम निरोपानें सोंपविलें होतें; सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं वाघोजी जाधवराव नाईक या नांवाचा एक मराठा सरदार वऱ्हाड, विजापूर व विजयानगर या दरबारांचा कांहीं काळ सूत्रचालक बनला होता व कर्नाटकांतील सर्व नाईकवाडी हिंदुफौज त्याच्या ताब्यांत असून त्यानें कितीएकांस पदच्युत केलें होतें व कितीएकांस राज्यपद प्राप्त करून

दिलें होतें; ह्मणजे वाघोजी नाईक हा वस्तुतः त्या काळीं एक बलाढ्य राजाच–जरी त्यानें तें नांव प्रत्यक्ष धारण केलें नाहीं तरी–होता, हें उघड होतें. सतराव्या शतकांतही अनेक मराठे सरदार मोठे योद्धे असून प्रसिद्ध सेनानी होते; त्यांच्या प्रत्येकाच्या हाताखालीं दहा वीस हजार घोडेस्वार असत; सतराव्या शतकाच्या प्रारंभीं भोंसल्यांचें घराणें प्रसिद्धीस आलें, शिवाजीचा आजा मालोजी भोंसले हा उदयास येण्यापूर्वींच, फलटणचे निंबाळकर, मलवडीकर घाटगे, मोरे, शिर्के, महाडीक, गुजर, मोहिते वगैरे मराठा सरदारघराणीं प्रसिद्धीस पावलेलीं होतीं, आणि या सर्वांत शिंदखेडच्या जाधवांचें प्रस्थ तर परमावधीसच गेलेलें होतें. ज्यावेळीं निजामशाहीच्या इतिहासांत मलिकंबर, मालोजी व शहाजी हीं नांवेंही प्रसिद्धीस पावलीं नव्हतीं, त्यावेळीं लुकजी जाधवराव हाच निजामशाही राज्याचा एक प्रमुख आधारस्तंभ होता व त्यानें आपल्या बाहुबलानें तें राज्य कांहीं काळ सांवरून धरिलें होतें. निजामशाहीची किसमत कांहीं काळ लुकजीच्या किसमतींत मिसळलेली होती; मोंगल बादशहा शहाजहान यानें जेव्हां दक्षिणप्रांतावर स्वारी केली तेव्हां लुकजीस लांचाची लालूच देऊन, मदतीची याचना करून त्याला निजामशाहींतून फोडून आपल्या पक्षाला मिळवून घेण्याची अवश्यकता भासली होती; यावरून हें जाधव घराणें त्यावेळीं किती बलिष्ठ होतें, व त्या घराण्याचें महत्त्व किती परमावधीपर्यंत वृद्धिंगत झालेलें होतें, हें सिद्ध होतें.

मराठा मंडळांत प्रमुख व प्रबळ ह्मणून नांवाजलेल्या जाधव घराण्यावर मात करून लुकजीची मुलगी जिजाबाई हिचें लग्न, शहाजीशीं लावून जाधवरावावरील आपल्या अपमानाचा सूड मालोजीनें बरोबर उगवून घेतला. निजामशहा व मलिकंबर यांनीं लुकजीच्या मानेवर तरवार ठेवून जबरदस्तीनें त्याच्याकडून जिजाईचा हात ज्या दिवशीं मालोजीच्या पोराच्या–शहाजीच्या–हातांत देवविला, त्याच दिवसापासून शिंदखेडकर जाधव व वेरूळकर भोंसले यांच्यामधील स्पर्धा, वैमनस्य व युद्धकलह हीं ऐन रंगांत येण्यास प्रारंभ झाला. मराठा-मंडळांत अनेक वर्षांपासून जाधवाकडे चालत आलेला अग्रपूजेचा मान त्यांच्याकडून हिसकावून घेऊन आपल्या हातीं ठेवण्याकरितां सतत पंचवीस वर्षें भोंसल्यांनीं खटपट केली; त्यांत ते यशस्वी झाले. जाधवांचें महत्त्व नष्ट झालें. आणि मराठा-मंडळांतील अग्रपूजेचा मान भोंसल्यांकडे येऊन शिवाजीनें स्वराज्य संस्थापना केल्यानंतर तर तो त्याच घराण्याकडे कायम राहिला.

मराठ्यांना प्राप्त झालेल्या ह्या राजकीय महत्वामुळें, आणि मराठा मंडळांतील अग्रपूजेचा मान भोंसले घराण्याकडे आल्यानंतर, त्याच घराण्यांत शिवाजीसारखी श्रेष्ठ व कर्तबगार विभूति निर्माण झाल्याबरोबर तिनें मराठ्यांची बुद्धि, करामत व पराक्रम एकत्र

करून त्यांचा ओघ स्वराज्याच्या कार्याकडे वळविला. आपल्या असामान्य व अलौकिक अशा अनेक सद्गुणांनीं महाराष्ट्र मंडळींत आत्मविश्वास, साहसाची प्रीति व दृढनिश्चयाची ईर्षा उत्पन्न करून त्यांचा विकास केला. व जगांतील या अत्यंत थोर, उज्वल व श्रेष्ठतर विभूतीनें आंखून दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणें भावी काळांत मराठामंडळानें महाराष्ट्र धर्म व महाराष्ट्र राज्य यांचा संप्रदाय उत्तर हिंदुस्थानांतही वाढवीत नेला, आणि " मराठयांचें राज्य " ही एक मोठी जबरदस्त व जोरदार सत्ता ह्मणून तिचें नांव कांहीं काळपर्यंत हिंदुस्थानच्या इतिहासांत सारखें दुमदुमत राहिलें.

या भागांत मराठ्यांच्या उत्कर्षाचें पूर्वस्वरूप निरनिराळ्या बाबतींचें विवेचन करून माथित केलें आहे, व त्यावरून " महाराष्ट्रांतील हिंदु लोकांचा कधींही जागचेजागीं राहूं न देणारा असा अनावर लुटारू स्वभाव थोडावेळपर्यंत दडपून गेला होता खरा, परंतु त्या झांकलेल्या आगीनें मुसलमान विजयी वीरांच्या कलहामुळें पेट घेतली; आणि त्याचा परिणाम सरतेशेवटीं असा झाला कीं, सह्याद्रि पर्वतांतील अरण्यामध्यें वाळून तावलेला पाचोळा जसा कांहीं पेट घेतो, त्याप्रमाणें हे मराठे हिंदुलोक एकदम उसळले, आणि एकसारखा भडका पसरला तेणेंकरून दूर अंतरावर असणाऱ्या लोकांस ही जगड्व्याळ आग पाहून मोठा आचंबा वाटला. " हें **ग्रांटडफ** याचें ह्मणणें वस्तुस्थितीस सोडून आहे अशी कोणाचीही खात्री होईल असा भरवंसा आहे.

जळगांव;
( पूर्वखानदेश )
ता० २६ एप्रील
इ० सन १९२३
इसवी.

**द० बा० करकरे**

# अनुक्रमणिका.

मुसलमानांतील धार्मिक मतभेद व अवरंगझेबाच्या राजनीतीचा परिणाम, पान १; धार्मिक मतभेदामुळें उपस्थित झालेल्या निरनिराळ्या राजकीय भानगडींचें विवेचन; पान १-२; शिया व सुनी यांच्यामधील धार्मिक मतभेदाचा बाबर यास मिळालेला अनुभव; पान २-३; या बाबतींत हुमायून यास बाबरप्रमाणेंच मिळालेला अनुभव; पान ३-४; अकबरास या बाबतींत हिंदुस्थानांतच आलेला अनुभव व उत्पन्न झालेली परिस्थिति; पान ४-१०; याच काळांतील ख्रिस्ती धर्मकलहांचें विवेचन; पान १०-११; अकबराचें धार्मिक सहिष्णुत्व; पान ११-१२; जहांगीरची धार्मिक वागणूक; पान १२; शहाजहानची धार्मिक वागणूक पान १३; अफगाण व मोंगल यांच्या वैरभावामुळें दक्षिणेंत झालेल्या धोक्याच्या राजकीय परिस्थितीचें विवेचन; पान १३-१६; अवरंगझेबाचा स्वभाव; कर्तृत्व, धार्मिक वागणूक व त्याचे परिणाम; धार्मिक मतभेदामुळें अवरंगझेबास झालेले फायदे व नुकसान; पान १६-२५; अवरंगझेबानें अफगाणलोकांचा केलेला छळ; पान २५-२७; बाबर, अकबर, व अवरंगझेब यांची तुलना; पान २७-२८; शिया पंथाचा कट्टा शत्रू नादीरशाहा याची व सुंनीपंथाच्या, ( औध प्रांतांतील ) रोहिले लोकांची हकीकत; पान २८-२९; दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांतील धार्मिक मतभेदाचें विवेचन; पान ३०-३१; बहामनी राज्यांतील धार्मिक भानगडी; पान ३१-३८; निजामशाही राज्यांतील धार्मिक भानगडी पान ३८-४०, आदीलशाही राज्यांतील धार्मिक भानगडी; पान ४०-४२; कुत्बशाही राज्यांतील धार्मिक भानगडी; पान ४२-४४; महदीपंथाची हकीकत व त्यावरून उपस्थित झालेली धोक्याची राजकीय परिस्थिति; पान ४५-४८; प्रसिद्ध मुसलमानी ग्रंथकार फेरिस्ता याच्यासंबंधीं माहिती; व त्या काळांतील राजकीय भानगडी व तिचे परिणाम, यांसंबंधीं विवेचन; पान ४९-६२; दक्षिण हिंदुस्थानांत मुसलमान लोकांतील आपसांतील धार्मिक मतभेदाचा फायदा ज्याप्रमाणें मोंगल व मराठे यांना मिळाला, त्याप्रमाणेंच पोर्तुगीज व फ्रेंच यांच्या विरुद्ध इंग्रज लोकांस हिंदुस्थानांत मिळाला, त्यासंबंधीं तुलनात्मक विवेचन; पान ६२-६४; दक्षिणेंतील मुसलमानी अमलांत मराठ्यांच्या राष्ट्रघटनेस व तिच्या प्रगतीस कोणकोणतीं नैसर्गिक, राजकीय, धार्मिक आणि सामाजिक कारणें साह्यभूत झालीं, त्याबद्दल विवेचन; पान ६५; बहामनी राज्यांतील सरदार बहिरामखान मझिंदराणी यानें मराठ्यांच्या मदतीनें त्या राज्याविरुद्ध बंड उभारिलें व त्यांत त्याचा पराभव होऊन महंमदशहानें तें बंड साफ मोडून टाकिलें; त्यासंबंधीं हकीकत; पान ६६-६८; महंमूदशाहा बहामनी याची योग्यता; पान ६८-६९; शिराज येथील प्रसिद्ध कवि हाफिज याचें महंमूदशाहास पत्र; पान ६९;

महंमूदशाहाचा मृत्यू पान ६९, अल्लाउद्दीनशाहा बहामनी याची कारकीर्द; प्रसिद्ध मुत्सद्दी व योद्धा खाजेखान महंमदगवान याची त्रोटक हकिगत; पान ६९–७१, महंमद गवान हा विशाळगडकर शंकरराय यास नामशेष करून कोंकणपट्टी बहामनी राज्याच्या अमलाखालीं आणतो; पान ७१–७२; महंमदगवान याच्या पवित्र व विरक्त आचरणाची हकीकत; पान ७२–७३; महंमदगवान यानें राज्यव्यवस्थेच्या, सैन्यविषयक, न्याय व शिक्षणविषयक व जमाबंदीच्या बाबतींत केलेल्या सुधारणांचें विवेचन; पान ७३–७५; महंमदगवान विरुद्ध त्याचे हितशत्रू कारस्थान उभारतात व त्यांत तो मृत्यू पावतो; पान ७५–७६; त्याचा आयुष्यक्रम व योग्यता; पान ७६–७७; बहामनी राज्यांतून पांच स्वतंत्र राज्यें उत्पन्न होतात; बहामनी राज्य नष्ट होतें; पान ७७–७८; तें राज्य नष्ट होण्याचीं कारणें; पान ७८; बहामनी राज्यांत वतनदारवर्गास राजकीय महत्व प्राप्त झालें होतें, त्यासंबंधीं विवेचन; पान ७८–७९; हुसेनगंगो बहामनी याच्या कारकीर्दींत हरनाकपोळ व कामराज घाटगे हे दोन मराठे सरदार उदयास आले, त्यासंबंधीं व घाटगे घराण्याची हकीकत; पान ७९–८०; बहामनी राज्यांत दादू नरसू या नांवाचा एक ब्राह्मण मुत्सद्दी उदयास आला, त्याची हकीकत, पान ८०–८१; शिर्के घराण्याची हकीकत; पान ८१–८२; वऱ्हाडच्या इमादशाहीची हकीकत, पान ८२; बेदरच्या बेरीदशाहीची हकीकत; पान ८२–८३; गोवळकोंडें येथील कुत्बूशाही राज्यस्थापनेची हकीकत; पान ८३; कुली कुत्बूशाहासंबंधीं माहिती; पान ८३–८४, जमशीद कुत्बूशाहाच्या कारकीर्दीची हकीकत; पान ८४–८५; सुभानकुळीची कारकीर्द; पान ८५–८६; वजीर सैफखान याच्या अनियंत्रित राज्यकारभाराचे परिणाम; पान ८६; इब्राहीम कुत्बूशाहा गादीवर येतो; त्याच्या कारकीर्दींत घडलेल्या महत्वाच्या गोष्टींची हकीकत; पान ८६–९०; इब्राहीमशाहाचा मृत्यू; पान ९०; त्याची योग्यता; पान ९१–९२; महंमदकुली कुत्बूशाहा गादीवर येतो; पान ९२; तो विजयानगरकरावर स्वारी करून त्याचा पराभव करतो; पान ९२–९४; महंमद कुली कुत्बूशाहाचा प्रसिद्ध वजीर मीरजुम्ला हा अनेक मोहिमा करून कुत्बूशाही राज्यांत शांतता प्रस्थापित करतो व त्या राज्याची वृद्धी करतो; पान ९४–९६; रेडीवड लोकांचें बंड; कुत्बूशाही सैन्य त्या बंडाचें निर्मूलन करतें; पान ९७; शहाजहानची दक्षिणेवरील स्वारी; पान ९७–९८; इब्राहीम कुत्बूशाहाची योग्यता; पान ९८–९९, त्याचा मृत्यू; त्याचा मुलगा अब्दुल्ला हुसेनकुत्बशा हा गादीवर येतो; पान ९९; शहाजहान निजामशाही राज्याचा शेवट करतो; पान ९९; शहाजहान कुत्बशाही राज्यावर स्वारी करतो; व तह होऊन तें राज्य मोंगल बादशहांचें मांडलीक बनतें; पान १००-१०१; मीरजुम्ला मोंगल बादशहाच्या नोकरींत राहतो; पान १०१; अब्दुल्ला हुसेन कुत्बूशाहा याचा मृत्यू; व त्याचा जांवई अबू हसन

कुत्बूशाहा याचें राज्यारोहण; पान १०१; तो मदनपंत ऊर्फ मादाण्णा यास आपला मुख्य प्रधान नेमितो; पान १०१; त्यामुळें राज्यांतील मुसलमान सरदार मंडळींना राग येतो. अवरंगझेब दक्षिणप्रांतावर स्वारी करतो, मोंगल सैन्य गोवळकोंडें येथील किल्ल्यास वेढा घालतें; शहाचा नाइलाज होऊन तो अवरंगझेबाशीं तह करतो; पान १०२; तहाची निष्फलता; अवरंगझेब पुन्हां कुत्बूशाही राज्यावर स्वारी करून तें राज्य नष्ट करतो; पान १०२–१०५; अहंमदनगर येथील निजामशाही राज्यस्थापनेची हकीकत पान १०५–१०७; अहंमद निजामशहा स्वतंत्र होतो. पान १०७; त्याची कारकीर्द; मृत्यू; बुऱ्हाण निजामशहा गादीवर येतो; पान १०८, कंबरसेन मुख्यप्रधान होतो; पान १०८; निजामशहाची कारकीर्द व मृत्यू; पान १०९; हुसेन निजामशहा गादीवर येतो; विजयानगरकर रामराजाविरुद्ध मुसलमान राज्यकर्त्यांची जूट होऊन युद्ध होतें व त्यांत रामराजाचा नाश होतो; व विजयानगरच्या राज्याचा शेवट होतो; पान १०९; हुसेनशाहाचा मृत्यू; त्याचा अज्ञान मुलगा मुर्तुजा निजामशाहा गादीवर येतो; पान ११०; प्रसिद्ध चांदबिबी हिची हकीकत; ती स्वतः राज्यकारभार चालविते; तिच्या कारकीर्दींत घडलेल्या महत्वाच्या गोष्टी; ती मोंगल सैन्याबरोबर युद्ध करते; मृत्यू; योग्यता; पान १११-१२०; मिआन राजू व मलिकंबर हे उभयतां निजामशाही राज्याचा कारभार चालवितात; पान १२०; मलिकंबर मोंगली सैन्यावर हल्ला करून त्या सैन्याचा पराभव करतो; पान १२०-१२१; मिआन राजू व मलिकंबर यांच्यामध्यें युद्ध होतें; राजूचा पराभव होतो; पान १२१; निजामशाही राज्याची तत्कालीन स्थिति; मलिकंबरचें पूर्ववृत्त; पान १२२; राजा तोडरमल्ल याची नवी जमाबंदी पद्धत; व तिचें अनुकरण करून मलिकंबर यानें दक्षिणेंत नवीन जमाबंदीची व्यवस्था केली, त्यासंबंधीं विवेचन; राजा तोडरमल्ल याचें पूर्ववृत्त; पान १२२—१३०; मलिकंबर गुजराथचा सुभेदार अबदुल्लाखान याचा पराभव करतो; पान १३०; मोंगल बादशाहा जहांगीर याच्या हुकमानें शहाजादा खुर्रम ऊर्फ शहाजहान दक्षिणप्रांतावर स्वारी करतो; मलिकंबर त्यास शरण जाऊन तह करतो; पान १३०—१३१; मलिकंबरचा मृत्यू; त्याची योग्यता; पान १३१—१३२ मलिकंबरचा वडील मुलगा फत्तेखान हा निजामशाही राज्याचा सूत्रचालक होतो; पान १३२; तो मोंगलाशीं सख्य करतो; पान १३२; मूर्तुजा निजामशहा त्यास वजीरीपदावरून दूर करून खीवरच्या किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेवितो; पान १३३; लुकजी जाधवराव याची व त्याच्या घराण्याची पूर्व हकीकत; पान १३३; लुकजी जाधवराव मोंगलांस मिळतो; तो निजामशहाच्या भेटीस येतो; शाहा त्यास दग्यानें ठार मारतो; पान १३५—१३६; जाधव घराणें; मोंगलाच्या नोकरींत राहतें; पान १३६; शहाजी निजामशाहीचा संबंध सोडून स्वतंत्र होतो; आदिलशाहा हा शहाजीवर आपला सरदार

मुरारराव यास पाठवितो व तो शहाजीच्या बंदोबस्ताची तजवीज करतो; पान १३६–१३७, निजामशाहीवर मोंगलांची स्वारी होते; पान १३७; निजामशाहींत भयंकर दुष्काळ पडतो; फत्तेखान पुन्हां वजीरीपदावर येतो; व तो मोंगलास मिळून निजामशाही राज्य नष्ट होण्याच्या पूर्वरंगास प्रारंभ होतो; पान १३८—१३९; शहाजी आदिलशाही दरबाराशीं सख्य करतो; पान १३९; मोंगल निजामशाहीवर स्वारी करतात; निजामशाही राज्याचा शेवट होतो; पान १४०–१४१ शहाजी निजामशाही राज्य पुन्हां जिवंत करण्याचा प्रयत्न सुरू करतो; पान १४१—१४२; शहाजहान दक्षिणप्रांतावर स्वारी करून निजामशाही राज्य कायमचें नष्ट करतो; पान १४२—१४३ शिर्के घराण्याची हकीकत; पान १४३—१४४; विजापूरच्या आदिलशाही राज्याच्या स्थापनेची हकीकत; पान १४४—१४५; यूसफ अदिलशाहा याची कारकीर्द; पान १४५; त्याचा मृत्यु; इस्मईल अदिलशाहा गादीवर येतो; त्याच्या कारकीर्दींत घडलेल्या महत्वाच्या गोष्टी; पान १४५—१४८; इस्मईल आदिलशाचा मृत्यू; इब्राहीम अदिलशाहा गादीवर येतो; पान १४८; त्याचा वजीर आसदखान याच्यासंबंधीं माहिती; पान १४९; आदिलशाहाची शेवटचीं कांहीं वर्षें युद्धांत, त्रासांत व संकटांत जातात; तो विषयी, वेडा व आजारी होऊन मृत्यू पावतो; पान १४९—१५०; त्याचा मुलगा अल्ली अदिलशाहा हा गादीवर येतो; त्याच्या कारकीर्दींत घडलेल्या महत्वाच्या गोष्टी; योग्यता; मृत्यू पान १५०—१५२; महंमद अदिलशाहा गादीवर येतो; त्याच्या कारकीर्दीचें विवेचन; पान १५२—१५३; मोंगल सरदार मोहोबतखान हा निजामशाही राज्य नष्ट करतो; शहाजी तें राज्य पुन्हां जिवंत करण्याची खटपट करतो; मोंगल बादशाहा शहाजहान हा स्वतः दक्षिणेंत येऊन आदिलशाही राज्यावर स्वारी करतो; शहाजहान व आदिलशाहा यांचा तह होऊन उभयतांत निजामशाही राज्याची वांटणी होते; शहाजहानच्या परवानगीनें महंमद अदिलशाहा हा शहाजीस आपल्या नोकरींत ठेवून घेतो; पान १५३–१५४, शहाजी कर्नाटकच्या कामगिरीवर जातो; शिवाजी आदिलशाही राज्यांत धामधुम उडवितो. शिवाजीस शहाजीची फूस आहे, या संशयानें आदिलशाहा शहाजीस कैद करतो; शिवाजी शहाजहानच्या मध्यस्थीनें त्याची सुटका करतो; पान १५५; महंमद आदिलशाहा याचें राज्यकारभार चालविण्यासंबंधींचें नियमपत्रक; पान १५५–१५६; महंमद आदिलशाहा याचा मृत्यू; त्याचा मुलगा अली अदिलशाहा हा गादीवर येतो; पान १५६; शिवाजीची धामधुम; अली अदिलशाहाच्या कारकीर्दीचें त्रोटक विवेचन; त्याचा मृत्यु; त्याचा अज्ञान मुलगा शिकंदर हा गादीवर येतो; पान १५६–१५७; अवरंगझेब आदिलशाही राज्यावर स्वारी करून तें राज्य नष्ट करतो; पान १५८; आदिलशाही राज्याच्या वैभवाचें

विवेचन; पान १५८–१६०; विजापूर येथील बोलगुमज, मुल्क-ई-मैदान, जुम्मामशीद वगैरेसंबंधीं माहिती; पान १६०–१६८; दक्षिणेंतील मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार घराण्यांची हकीकत; पान १६९–१६६; फलटणच्या निंबाळकर घराण्याची हकीकत; पान १६९–१७४; मलवडीकर घाटगे घराण्याची हकीकत; पान १७४–१७७; मोहिते घराण्याची हकीकत; १७७–१७८; डफळे घराण्याची हकीकत; पान १७८; म्हसवडकर माने घराण्याची हकीकत; पान १७८–१८१; सांवतवाडीकर भोंसले घराण्याची हकीकत; पान १८०–१८३; मोरे ऊर्फ धुळप घराण्याची हकीकत; पान १८३–१८४; घोरपडे घराण्याची हकीकत; पान १८४–१८५; महाडीक घराण्याची हकीकत; पान १८५–१८६; शिर्के घराण्याची हकीकत; पान १८६; दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांच्या आजूबाजूच्या गुजराथ, माळवा व खानदेश, या मुसलमानी राज्यांची हकीकत; पान १८७–२२१; गुजराथच्या मुसलमानी राज्याची हकीकत; पान १८७–२०६; गुजराथच्या चतुःसिमा व त्या राज्याची व्याप्ती; तें राज्य मोंगली अमलाखालीं जातें; पान १८७–१९०; तेथील मोंगली सुभेदार मुज्फूरशाहा स्वतंत्र होऊन गुजराथचा पहिला राज्यकर्ता बनतो; त्यास प्रतिबंधांत ठेऊन त्याचा मुलगा तातारखान गादीवर येतो; त्याचा मृत्यू; त्याचा मुलगा अहंमदखान गादीवर येतो; आपला आजा मुज्फूरशाहा यास विष देऊन ठार मारतो; अहंमदखान ऊर्फ अहंमदशाहा याची कारकीर्द सुरू होते; पान १९१; मुज्फूरशाहाची योग्यता; पान १९१–१९२; अहंमदशाहा अहंमदाबाद हें शहर वसवितो; व आपली राजधानी करतो; तो हिंदुधर्माचा उच्छेद करण्याकरितां निरनिराळे उपाय अमलांत आणतो; पान १९३–१९४; त्याच्या न्यायप्रीयतेचें उदाहरण; पान १९४; मृत्यू; त्याचा मुलगा महंमदशाहा गादीवर येतो; त्याच्या कारकीर्दीचें त्रोटक विवेचन; त्याचा विषप्रयोगानें मृत्यू; पान १९४—१९५; त्याचा मुलगा कुत्बूशाहा गादीवर येतो; तो राणा कुंभ याचा पराभव करतो; मृत्यू; पान १९५; राणा संग याची हकीकत; पान १९५—१९६; कुत्बूशाहानंतर त्याचा चुलतभाऊ दाऊदखान हा गादीवर येतो; त्याची नालायकी व पदभ्रष्टता; कुत्बूशाहाचा सावत्र भाऊ महंमूद हा गादीवर येतो; पान १९६; त्याच्या कारकीर्दीचें त्रोटक विवेचन; गुजराथच्या राज्याची गुजराथेंत अहंमदाबाद व काठेवाडांत जुनागड ऊर्फ मुस्तफाबाद, हीं दोन राजधानीचीं शहरें होतात; पान १९७—१९९; मृत्यू; महंमदशाहानंतर त्याचा मुलगा मुज्फरशाहा हा गादीवर येतो; पान १९९; तो इडरवर स्वारी करतो; भारमल इडरच्या गादीवर स्थाईक होतो; मेवाडचा राणा संग हा सिरोहीपर्यंतच्या प्रदेशावर स्वारी करतो; मुज्फरशाहाचा मृत्यू; पान १९९—२००; त्याचा

मुलगा शिकंदरशाहा, नंतर महंमूद व नंतर वडील मुलगा बहादूरशाहा हा गादीवर येतो; पान २००; तो माळव्याचें राज्य नष्ट करतो; पान २०१; मोंगल बादशाहा हूमायून गुजराथ प्रांतावर स्वारी करून तो प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतो; बहादूरशाहा हा पोर्तुगीज लोकांच्या आश्रयाला जातो; व हुमायून परत गेल्यावर तो पुन्हां आपलें गुजराथचें राज्य परत मिळवितो; पान २०२, पोर्तुगीज लोक बहादूरशहास व त्याच्या बरोबरील लोकांस समुद्रांत बुडवून ठार मारतात, पान २०२, महंमूदशाहा दुसरा गादीवर येतो; त्याचा खून होतो; पान २०३; अहंमदशाहा व नंतर मुज्फरशाहा हे गादीवर येतात; पान २०४; गुजराथच्या राज्यकारभारांत अव्यवस्था व घोटाळे माजतात; मोंगलबादशाहा अकबर गुजराथवर स्वारी करून तो प्रांत, माळवा प्रांतासह आपल्या ताब्यांत घेऊन मोंगल साम्राज्यांत सामील करतो; पान २०५—२०६; माळवा प्रांताची पूर्व माहिती; पान २०७—२०८; माळव्याचा सुभेदार दिलावरखान घोरी हा त्या प्रांतांत स्वतंत्र राज्य स्थापन करतो; पान २०८; त्याचा मृत्यू; त्याचा मुलगा हुशंगशाहा हा गादीवर येतो; त्याची कारकीर्द, लोकप्रीयता व योग्यता, यासंबंधीं विवेचन; पान २०८–२०९; माळव्यांतील घोरी राजघण्याचा शेवट; खिलजी घराण्याचा उदय; महंमदखान खिलजी हा माळव्याचा राज्यकर्ता होतो; त्याच्या कारकीर्दीचें त्रोटक विवेचन; पान २०९—२१०; त्याचा मृत्यू; पान २१०, त्यांचा मुलगा ग्यासुद्दीन हा गादीवर येतो; पान २११; त्याची कारकीर्द; मृत्यू; त्याचा मुलगा नासिरुद्दीन हा गादीवर येतो; तो चितोडवर स्वारी करतो; त्याचा मृत्यू; त्याचा मुलगा महंमूदशाहा हा गादीवर येतो पान २११; गुजराथचा राज्यकर्ता मुज्फरशाहा व माळव्याचा सुलतान महंमूदशाहा हे उभयतां मिळून चितोड-वर स्वारी करतात; राणा संग, चितोडकर त्यांचा पराभव करतो; पान २११; महंमूदशाहा हा राणा संग याच्या हातीं जिवंत सांपडतो; राणा संग क्षात्रधर्मास अनुसरून मोठ्या उदारपणानें त्याच्या सर्व जखमा बऱ्या करून त्यास मोठ्या इतमामानें आपल्या राजधानींत परत पाठवितो; पान २११–२१२; बहादूरशाहा माळवा प्रांतावर स्वारी करून तो प्रांत आपल्या ताब्यांत घेतो; व तेथील राज्य नष्ट करून तें गुजराथेंत सामील करतो; पान २१२; खानदेशाचा इतिहास; पान २१२–२२१; खानदेशाच्या चतुःसिमा; त्या देशाचा पूर्व इतिहास; पान २१२–२१३; मलिक राजा फरूकी हा खानदेशांत आपलें राज्य स्थापन करतो; पान २१४; त्याची कारकीर्द; मृत्यू; पान; २१४–२१५; त्याचा वडील मुलगा मलिक नासीर हा गादीवर येतो; अशिरगडचा किल्ला दग्यानें घेतो; बऱ्हाणपूर ही खानदेशाची राजधानी होते; पान २१५–२१६; मलिक नासीर बहामनी राज्यावर स्वारी करतो; पराभव पावतो; त्याचा विपन्नावस्थेंत मृत्यू होतो; पान २१६–२१७; त्याचा मुलगा मिरान

आदिलखान हा गादीवर येतो; तो आपल्या राज्याची वृद्धि व भरभराट करतो; बऱ्हाणपूर शहराची भरभराट करतो; मृत्यु; पान २१७–२१८, दाऊदखान व त्याच्या नंतर गझ्नीखान गादीवर येतो; गझ्नीखानाचा खून होऊन फरूकी घराण्याचा शेवट होतो; व त्या घराण्याच्या मुलीच्या वंशाकडे खानदेशचें राज्य जाऊन आदिलखान दुसरा हा गादीवर येतो; पान २१८–२१९, त्याची कारकीर्द; मृत्यू; पान २१९; त्याचा मुलगा मिरान हा गादीवर येतो; त्याच्या कारकीर्दीची त्रोटक हकीकत; व मृत्यू, पान २१९, त्याचा मुलगा मिरान महंमद हा गादीवर येतो, निजामशाहा बऱ्हाणपूर शहराची धूळधाण उडवितो, मिरानचा मृत्यू, पान २२०, त्याचा धाकटा भाऊ राजा अलीखान हा गादीवर येतो, तो मोंगल बादशाहा अकबर याचें श्रेष्ठत्व मान्य करतो व खानदेशभर अकबराच्या नांवाचें नाणें पाडवितो; व त्याच्या नांवाचा खुत्बा वाचविण्यास सुरवात करतो; त्याची कारकीर्द; तो सुपें सोनपत येथील युद्धांत दारूच्या भयंकर स्फोटांत जागच्या जागीं ठार होतो; व त्याचा मुलगा मिरान बहादूरखान हा गादीवर येतो; पान २२०--२२१; त्याची कारकीर्द; त्याच्यावर अकबराची गैरमर्जी होते; मोंगली सैन्य खानदेश प्रांतावर स्वारी करून तो प्रांत आपल्या ताब्यांत घेतें; अकबर खानदेशचें राज्य मोंगली साम्राज्यांत सामील करतो; बहादूरखानास ग्वाल्हेर येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेवितो; व तेथें तो मृत्यू पावतो; आणि अशाप्रकारें खानदेशच्या राज्याचा स्वतंत्र इतिहास समाप्त होतो; पान २२१; जंजिरेकर सिद्दी यांची हकीकत; पान २२२--२३२; जंजिरा, हबसाण प्रांत व जंजिरेकर यांची पूर्व हकीकत; पान २२२-२२५; सिद्दी अंबर व आंगरे यांची हकीकत; पान २२५--२२६; जगांतील पूर्वकालीन राजकीय व व्यापारी घडामोडीचीं त्रोटक हकीकत; पान २२६--२३२; पोर्तुगीज लोकांची हकीकत; पान २३२--२४९; पोर्तुगाल देशाची पूर्व हकीकत; पान २३२--२३३, वास्कोदिगामा आणि त्याचा भाऊ पोलोदिगामा हे उभयतां मलबार किनाऱ्यावरील कालीकोट बंदरांत येऊन उतरतात, पान २३३, तेथील राजाशीं व्यापारी तह करून व व्यापारी जिन्नस बरोबर घेऊन पोर्तुगाल देशास परत जातात, पान २३४, पोर्तुगाल देशानें अज्ञात प्रदेशाचे शोध लावल्यामुळें युरोपियन राष्ट्रांच्या दृष्टीनें पंधराव्या शतकाच्या अखेरीस घडून आलेलें विलक्षण स्थित्यंतर व त्याचे महत्वाचे परिणाम; यासंबंधी विवेचन पान २३४--२३६, पोर्तुगीज लोकांच्या हिंदुस्थानावरील स्वाऱ्या, पान २३६--२३७, वास्कोदिगामा हा पुन्हा वीस गलबतें व आठशें लढाऊ लोक बरोबर घेऊन कालीकोट बंदरांत येतो; त्यानें केलेलीं अनेक क्रूरकृत्यें; पोर्तुगीज लोकांचीं क्रूरकृत्यें व धार्मिक जोरजुलूम, आणि त्यांचे परिणाम; पान २३७–२३८; दीव शहराचा वेढा, अलमीडा, अलबुकर्क व न्यनोड कून्हा यांची हकीकत, पान २३८—२४२, नोऱ्होना, स्टिफोडगामा व अफॉन्सोडसूझा, कॅस्ट्रो व

गार्शिया डसा वगैरेची हकीकत, पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील प्रदेशाचें विवेचन, पान २४३–२४८, इंग्रज व इंग्रज ईस्टइंडिया कंपनीची पूर्व हकीकत, पान २४९–२५६; इलिझाबेथ राणीच्या काळांत, ब्रिटिशराष्ट्रीय व्यापार, आरमार व वाङ्मय यांची झालेली वृद्धी; पान २४९–२५२, इलिझाबेथ राणीनें हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांना देण्यासाठीं पहिल्या सफरीच्या मुख्यापाशीं दिलेलें पत्र, पान २५३–२५४; इलिझाबेथ राणीनें इंग्रज कंपनीस कांहीं विशिष्ट हक्क व अधिकार दिले त्याचें विवेचन, पान २५४–२५५; डच लोक इंग्रज लोकांची मोल्यूकस मधील अंबोयना बेटांत कत्तल करितात, इंग्रज लोक व्यापाराकरितां हिंदुस्थानाकडे वळतात, व या देशांत व्यापारी व नंतर राजकीय श्रेष्ठत्व मिळवितात, पान २५५–२५६, इंग्रज लोक मोंगल बादशहाच्या फरमानांअन्वयें इ. सन १६१२ मध्यें सुरत येथें आपली पहिली वखार स्थापन करतात, पान २५६, इंग्लंडचा राजा जेम्स यांजकडून सर टामस रो या नांवाचा एक वकील जहांगीर बादशहाच्या दरबारीं येतो, व व्यापारविषयक विशिष्ट सवलती व हक्क मिळावितो, पान २५६—२५७, हिंदुस्थानांत इंग्रज, पोर्तुगीज व डच यांच्यांमध्यें चालू असलेली व्यापारी स्पर्धा, पान २५७–२५८, इ. सन १६०१ तें इ. सन १६२१ या दरम्यान इंग्रज कंपनीला व्यापारांत अतीशय भरभराट होते, व त्यांच्या व्यापाराचा उत्तम जम बसन जातो, पान २५८—२६०, इंग्रज मद्रास येथें वखार व किल्ला बांधितात, पान २५९–२६०, बंगालमध्यें हुगळी नदीच्या वरील भागावर इंग्रज लोक आपली एक वखार स्थापन करतात, पान २६०, मुंबईबेट इंग्रजांच्या ताब्यांत जातें, मुंबई बेटाची हकीकत, २६०–२६३, हिंदुस्थानांत व्यापार करण्याला मोंगल बादशहाची परवानगी मिळविण्याकरितां, इंग्रज कंपनी स्थापन होण्यापूर्वी मिल्डन हाल कॅप्टन हॉकिन्स वगैरे इंग्रज लोकांनीं केलेल्या प्रयत्नाची हकीकत, पान २६३–२६४, मुंबई, कलकत्ता, व मद्रास हीं शहरें इंग्रज कंपनीचीं मुख्य ठाणीं बनतात, इंग्रज व मोंगल यांच्या नाण्याचा इतिहास, पान २६४–२६५, हिंदुस्थानांत इंग्रज व्यापारी ईस्टइंडिया कंपनी स्थापन झाल्यापासून शंभर वर्षांच्या आंतच हिंदुस्थानांत आपलें राष्ट्र स्थापन करण्याच्या अनुरोधानें कसे प्रयत्न करीत होती, त्यासंबंधीं विवेचन, पान २६५—२६८, मराठ्यांना भूगोलविषयक माहिती होती याचें द्योतक असणारें एक गुंडाळें नानाफडणीसाच्या दफ्तरांत सांपडलें, त्यांतील मजकूर, पान २६८—२७३, मराठ्यांच्या राज्याच्या उत्कर्षाच्या इतिहासाप्रमाणेंच, त्या राज्याच्या उच्छेदाचा दुःखपर्यवसायी इतिहासही महत्वाचा व वर्णनीय असल्याबद्दल विवेचन, पान २७४,

२५४८७

# भाग तिसरा.

:o:

## प्रास्ताविक माहिती.

( मागील भागावरून पुढें चालू. )

मा.
ता.

## परिच्छेद पहिला.

### मुसलमानांतील धार्मिक मतभेद आणि त्याचे राजकीय परिणाम.

मागील भागांत, बादशहा बाबर यानें हुमायून यास केलेल्या उपदेशांत "शिया व सुनी यांतील भेदाकडे कानाडोळा कर, नाहीं तर मुसलमानी धर्मात फूट पडल्याचें शत्रूच्या नजरेस येईल" असें बजाविलें; त्यासंबंधीं—अफगाण व मोंगल यांच्यामधील वैरभावासंबंधीं, आणि "ज्यांच्या पराक्रमावर सगळ्या लष्कराची भिस्त, अशा शियापंथी प्रबळ सरदारांचा" औरंगझेबानें छळ केला, त्यासंबंधीं—उल्लेख करण्यांत आलेला आहे; परंतु ह्या धार्मिक मतभेदामुळें, मोंगली साम्राज्यांत व विशेषतः दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांत पुढें अतिशय घोटाळे व भानगडी उत्पन्न झाल्या; राजकीय परिस्थिति अत्यंत धोक्याची झाली, आणि दक्षिणेंत मराठ्यांचें महत्त्व स्थापन होण्याला इतर अनेक गोष्टींबरोबर हीहि गोष्ट प्रमुखत्वानें कारणीभूत झाली. त्याप्रमाणेंच मराठ्यांसंबंधींचा अवरंगझेबाच्या हाडींमासीं खिळलेला द्वेष, जसा त्यांच्या उत्कर्षास उत्तेजक झाला, तसाच शियापंथाविषयीं त्याच्या ठिकाणीं बाणलेला द्वेषही मराठ्यांच्या उत्कर्षास पोषक झाला. कारण या धार्मिक मतभेदाच्या द्वेषामुळें त्यानें दक्षिणेंतील विजापूर व गोवळकोंडें येथील शियापंथी मुसलमानी राज्यें बुडविलीं; त्यामुळें त्या राज्यांतील मोठमोठे बलाढ्य मराठे सरदार मराठ्यांना येऊन मिळाले; आणि तेच अवरंगझेबाचा नाश करण्यास उद्युक्त झाले. शिवाय अवरंगझेबाच्या ह्या विध्वंसक व कुटिल राजनीतीचा मराठ्यांना आणखी दुसरा असा महत्त्वाचा फायदा मिळाला कीं, दक्षिणेंत मराठ्यांना मोकळें मैदान सांपडल्यासारखें झालें; आणि प्रसंगीं मराठ्यांविरुद्ध त्यांची औरंगझेबास जी मदत मिळाली असती, तीही नष्ट होऊन गेली. अशा रीतीनें अवरंगझेबाच्या मराठ्यांवरील विरोधी भक्तीमुळें त्यांचा दुहेरी

फायदा झाला; ह्मणून या धार्मिक मतभेदासंबंधीं थोडक्यांत याठिकाणीं हकीकत दिली असून त्यावरून तत्कालीन राजकीय परिस्थितीचें योग्य ज्ञान होईल, अशी आशा आहे.

मुसलमान लोकांत शिया, सुनी, सुफी, वाहबी, शेख, सय्यद, अफगाण, तुर्क, युझबेग, इराणी, आरब वगैरे अनेक भेदाचे व पंथाचे जातिविभाग आहेत. प्रारंभीं सर्व मुसलमान लोक मोहरम महिन्याचा पहिला पंध्रवडा, "सणाचे दिवस" ह्मणून पाळीत होते; परंतु पुढें त्या महिन्याच्या दहाव्या दिवशीं, अथवा तारखेस हुसेनचा खून झाल्यामुळें, हिंदूलोकांच्या मूर्तिपूजेच्या धर्तीवर शियापंथी मुसलमान ताबुतांत हुसेनचें भजन करूं लागले. मोंगल बादशहा बाबर हा शियापंथी होता; तथापि प्रारंभीं दक्षिणेंत आलेले मुसलमान व त्यांचे वंशज बहुतेक सुनी पंथाचे होते; व या लोकांस "दक्षणी" असें नांव मिळालें होतें. बादशहा बाबर याच्या काळापासून बादशाही फौजेंत आणि विशेषत: वरिष्ट अधिकारांच्या जागांवर आपल्या धर्माच्या अथवा जातीच्याच लोकांना आपल्या जन्मभूमींतून आणवून भरती करण्याचा प्रघात पडला होता. कारण मोंगल बादशहा हे हिंदुस्थानांत परके असल्यामुळें, तद्देशियांवर पूर्ण भरंवसा ठेवणें त्यांना धोक्याचें वाटत होतें; आणि भरंवशाचे, खात्रीचे व आपल्या जिवास जीव देण्याइतक्या जिव्हाळ्याचे असे आपल्या भूमींतील लोक हिंदुस्थानांत आणण्याची त्यांना आवश्यकता वाटत होती; व नेहमीं ताज्या रक्ताचे लोक स्वभूमींतुन आणवुन व त्यांची सैन्यांत भरती करून, बादशाही सैन्याचें सामर्थ्य कायम ठेवण्यांत येत होतें. मुसलमानांत शिया व सुनी, या दोन पंथांमध्यें जरी पुष्कळच विरोध आहे, तरी ज्याला त्याला आपआपल्या मर्जीप्रमाणें यापैकीं कोणताही पंथ स्वीकारण्याची मुभा आहे; आणि बाप शियापंथी असून मुलगा सुनीपंथी असल्याचेंहि इतिहासांत दाखले आहेत. उदाहरणार्थ, दक्षिणेंत बहामनी राज्याची स्थापना करणारा हसन गंगू हा शियापंथी असून त्याचा मुलगा महंमदशहा हा सुनीपंथाचा होता, ह्मणजे अशाप्रकारें जरी प्रत्येकाला आपल्या मर्जीप्रमाणें शिया अथवा सुनी पंथ स्वीकारण्याची पूर्ण मुभा आहे, तरी त्यामुळें परस्परांमधील विरोधाची तीव्रता कमी झालेली नाहीं; उलट त्यामुळेंच पुष्कळ निरनिराळ्या राजकीय भानगडी उपस्थित झाल्या.

युझबेग मोंगलांचा सरदार, आणि चंगीझखान याचा वंशज महंमद शयबानीखान यानें इ० सन १५०३ मध्यें अक्शी येथें बाबर याचा पूर्ण पराजय केला. तेव्हां तो काबूल येथें आला व तेथील राज्य त्यानें आपल्या हस्तगत करून घेतलें. (इ० सन १५०४) या काळापूर्वीं समर्कंद हें शहर बाबरच्या ताब्यांत होतें; परंतु त्याच्या शत्रूंनीं तें हस्तगत करून घेऊन त्यास हांकलून लाविलें; तेव्हां बाबर यानें इराणचा शियाधर्मी शहा इस्मईल सुफी याची मदत मिळवून समर्कंदचें राज्य तिसऱ्यावेळीं मिळविलें. (इ० सन १५११;

अक्टोबर ) यावेळीं इराणच्या शहास संतुष्ट करण्याकरितां बाबर यानें शियापंथाचा स्वीकार केला; परंतु बाबर बरोबरील सुनी मंडळींना त्याबद्दल वाईट वाटून ते त्यास सोडून गेले; आणि समर्कंद येथील सुनी मुसलमानही बाबरवर नाराज होऊन, त्यांच्या मनांत त्याच्याविषयीं द्वेषभाव बाणला. त्यानंतरही समर्कंद शहर बाबरच्या हातून गेलें; तेव्हांही पुन्हां इराणी लोकांची मदत मिळवून तें हस्तगत करावें, आणि आपल्या शत्रूंची खोड मोडावी, अशी बाबर याची खटपट होती; परंतु इराणी लोकांनीं समर्कंद परत मिळविण्याच्या कामीं त्यास मदत केली नाहीं; तथापि त्यांनीं बाबरचा कट्टा शत्रु जो शयबानीखान याच्या विरुद्ध त्यास मदत केली; त्यामुळें खानाचा वध होऊन बाबरचा एक बलाढ्य व भीतिप्रद शत्रू नष्ट झाला. या खानाचा वध केल्यानंतर त्याच्या शरिराचे तुकडे आसपासच्या राज्यकर्त्यांकडे "नजराणा" ह्मणून पाठविण्यांत आले; त्याच्या डोक्यांत पेंढा भरून तें कान्स्टांटिनोपल येथील बादशहाकडे नजर ह्मणुन रवाना करण्यांत आलें; आणि त्याच्या कपाळाची कवटी सोन्यानें मढवून ती इराणच्या शहानें स्वतः आपल्या मद्य प्राशनाच्या उपयोगांत आणिली !—थोडक्यांत ह्मणजे बाबर याला स्वतःलाच शिया व सुनी यांच्यामधील तीव्र धार्मिक मतभेदाचा अनुभव आला होता; त्यामुळेंच त्यानें आपला प्रिय मुलगा हुमायून यास केलेल्या कल्याणप्रद व अमोल्य उपदेशांत, शिया व सुनी यांतील भेदाकडे कानाडोळा करून वागत जा;—धार्मिक मतमतांतरांना राजकीयदृष्ट्या बिलकूल महत्व देऊं नकोस—असें मुद्दाम बजाविलें होतें, हें उघड आहे.

बादशहा बाबर याच्याप्रमाणेंच बादशहा हुमायून हा हिंदुस्थानांत पदभ्रष्ट होऊन समर्कंदकडे गेल्यानंतर, मिर्झा अस्करीपासून—आपल्या दगाबाज भावापासून—आपला जीव बचावण्याकरितां, तो आपला प्रीय मुलगा अकबर यास मागें टाकून, आपली बायको व त्याची आई हमीदाबानू हिला आणि आपला विश्वासु, एकनिष्ठ, हुषार व साह्यकारी सरदार बहरामखान यास बरोबर घेऊन तसाच इराणांत पळाला. त्यावेळीं इराणांत शियापंथाची स्थापना करणारा व त्या पंथाचा कट्टा अभिमानी असलेला प्रसिद्ध शहा इस्माईल सुफी—यासच संतुष्ट करून आपल्या पक्षास मिळवून घेण्याकरितां बाबर यानें शियापंथाचा स्वीकार केला होता—याचा मुलगा तहमास्प हा गादीवर होता. या शहाची मदत मिळवून, "आपण आपलें हिंदुस्थानांतील गमाविलेलें राज्य पुन्हां परत मिळवावें;" अशी हुमायून याची इच्छा होती; ह्मणून त्यानें बहरामखानामार्फत त्याच्याशीं बोलणें सुरू केलें. त्यावेळीं "हिंदुस्थानांत शियापंथ सुरू कराल, तरच तुह्मांस मी मदत देतों;" असें शहानें हुमायून यास स्पष्ट कळविलें; परंतु हुमायून यास शहाचें हें ह्मणणें मान्य करवेना; तेव्हां, आपलें ह्मणणें हुमायून यास मान्य झालें नाहीं, असें पाहून तहमास्प यानें रागानें हुमायूनकडे एक

लांकडाची मोळी पाठविली; आणि त्यास कळविलें कीं, " तुह्मी जर शियाधर्माचा अनादर कराल, तर हींच लांकडें तुमच्या अंत्यविधीस उपयोगांत आणिलीं जातील." त्यामुळें नाइलाजानें हुमायून शहाच्या ह्मणण्यास मान्य झाला व कंदाहार प्रांत जिंकून तोही त्यास देण्याचें अभिवचन दिलें; नंतर शहाचा मुलगा मिर्झा मुराद यास बरोबर घेऊन जाऊन, कंदाहारप्रांत जिंकून तो त्यानें मुराद याच्या ताब्यांत सोपविला; परंतु हा प्रांत ताब्यांत आल्यानंतर शहानें हुमायून यास मदत करण्यासंबंधीं—त्याचें हिंदुस्थानांतील गेलेलें राज्य पुन्हां परत मिळवून देण्याच्या बाबतींत त्यास साह्य करण्यासंबंधीं—फारशी उत्सुकता दाखविली नाहीं; आणि हुमायून यासही तशी विशेषशी आशा वाटली नाहीं; ह्मणून त्यानें शहाचा नाद सोडिला; आणि अन्यप्रकारें खटपट करून त्यानें हिंदुस्थानांतील आपलें गेलेलें राज्य पुन्हां परत मिळविलें.

तथापि बाबर व हुमायून यांना या धार्मिक मतभेदाच्या बाबतींतील प्रसंग हिंदुस्थानांत आलेला नव्हता; बाह्यप्रदेशीं आलेला होता; परंतु हुमायूनचा मुलगा अकबर याच्या काळांत तो हिंदुस्थानांतच उपस्थित झाला. हिंदुस्थानांत मुसलमानी राज्य स्थापन झाल्यानंतर, एखाद्या महत्त्वाच्या धार्मिक प्रश्नाचा निकाल करण्याकरितां सर्व उलमांना—ह्मणजे मुसलमानी धर्मशास्त्रपारंगत मंडळींना—एकत्र जमविण्याची पद्धत असे; आणि त्यांचें दरबारांतही अतिशय वजन असून कोणत्याही महत्त्वाच्या व बिकट धार्मिक प्रश्नाचा निकाल खुद्द बादशहासही, त्यांचें मत घेतल्याशिवाय करितां येत नसे. इतकेंच नाहीं तर अशा कोणत्याही प्रश्नावर उलमांनीं दिलेला अभिप्राय, हाच त्या प्रश्नाचा अखेरचा निकाल, असें समजलें जात असे. अकबरानें आपला " दिने इलाही " हा नवीन धर्म स्थापन करण्याची खटपट चालविली; त्यावेळीं त्यास आग्रा येथील उलमा मंडळीकडून मोठ्या जोराचा प्रतिरोध झाला. अकबराची आई—राजमाता हमीदाबानू ही इराणदेशांतील असल्यामुळें, अकबराचें वर्तन व विचारसरणी, हीं इराणी वळणावर होतीं; पण धार्मिक बाबतींत तो बिलकुल आग्रही नव्हता; उलट ढिला व बेपर्वा होता; आणि कट्ट्या मुसलमानासारखी हेकेखोर व आग्रही धार्मिक श्रद्धाही त्याच्या ठायीं वसत नव्हती. शिवाय मुसलमानी धर्माशीं तिळमात्रही संबंध नसलेल्या इराणी वर्षाच्या पहिल्या दिवसाचा " नवरोझ " हा सण पाळून त्या दिवशीं तो

---

**टीप १:**—तथापि, अखेरच्या काळांत अकबराच्या धार्मिक मतांत पूर्णपणें बदल झाला; आणि आपल्या मृत्यूपूर्वी त्यानें " सदर जहान "—ह्मणजे धर्माध्यक्ष यास बोलावून आणवून त्याजकडून कलमा वाचविला, आणि आपणही त्याच्या बरोबर तो, आणि कुराणांतील इतर कित्येक भाग व कबरें मोठ्यानें ह्मटलीं; आणि इस्लामी धर्माप्रमाणें पूर्णपणें आचरण करून तो मृत्यू पावला.

मोठा समारंभ करीत असे व सूर्याची मूर्ति मोठ्या समारंभानें गादीवर बसवून तो तिची पूजा करीत असे; दररविशीं भिन्न रंगाचे पोषाख करून तो सप्त ग्रहांची पूजा करीत असे; व आपल्या रजपूत राण्यांबरोबर तो यज्ञयाग व ब्राह्मणोक्त धर्मविधी करून, ब्राह्मणांस दक्षणा देत असे; परंतु अकबराचें हें धर्मबाह्य वर्तन व त्यानें नवीन धर्माचा केलेला उपक्रम या गोष्टी आग्रा येथील उलमा मंडळीस बिलकूल पसंत नव्हत्या. ही उलमा मंडळी व त्यांचा पुढारी व मुख्य धर्माध्यक्ष मखदुम्--उल्मुल्क् हे कट्टे सुनीपंथानुयायी असून शियापंथानुयायी मंडळीविरुद्ध त्यांची सारखी खटपट सुरू होती. अकबर पूर्ण राज्याधिकारी होईपर्यंत बहूरामखान हाच सर्वसत्ताधीश होता; परंतु तो शियापंथी होता; त्यामुळें, सर्व शियापंथानुयायी मंडळीप्रमाणेंच, त्याच्याविषयींहि उलमा मंडळींचें प्रतिकूळ मत होतें; पण तो पूर्ण सत्ताधीश असल्यानें या उलमा मंडळीस, उघड्या डोळ्यांनीं शियापंथाचें वर्चस्व पहात स्वस्थ बसावें लागत होतें; परंतु त्याचा पाडाव झाल्यावर ही उलमा मंडळी जोरांत आली; व शियापंथाविरुद्ध त्यांनीं मोठ्या जोरानें खटपट करण्यास सुरवात केली; अकबराला आपल्या मुठींत आणण्याचा दीर्घ प्रयत्न केला; व अकबर हा त्यांच्या तंत्रानें वागणारा नसल्यामुळें त्यांनीं त्याच्या विरुद्ध आणि त्याच्या नव्या धर्माविरुद्ध मोठा गिल्ला चालविला; आणि "जुना" व "नवा" असे दोन पक्ष निर्माण होऊन, हें धार्मिक भांडण जोरांत येण्यास सुरवात झाली.

तथापि त्यांतही पुन्हां एक निराळेंच वैशिष्य आहे. हिंदुस्थानांतील मुसलमानांत शिया व सुनी हे दोन पंथ तर यावेळीं अस्तित्वांत होतेच; परंतु त्यांतच तिसरा "सुफी" या नांवाचा एक पंथ इराणांत निर्माण होऊन त्याची हिंदुस्थानांत मोठ्या झपाट्यानें वाढ होत चालली होती. या धर्माची उत्पत्ति मूळ इराणांत झाली असल्यानें पारशी लोकांकडून सूर्य व अग्नि यांची उपासना ह्या पंथांतील लोकांनीं स्वीकारिली होती. अर्थात् हिंदुस्थानांत या काळांत, शिया, सुनी व सुफी असे मुसलमानांत तीन धार्मिक पंथ अस्तित्वांत होते; तथापि त्यांपैकीं सुनी पंथाचें त्यावेळीं विशेष प्राबल्य होतें; आणि आग्रा येथील सुनीपंथीय उलमा मंडळी, शिया व सुफी ह्या दोन्हीही पंथांचा द्वेष करीत असून त्या पंथांतील लोकांचा छळ करीत होती; न्यायाच्या कामांत अन्याय व पक्षपात करीत होती; त्यांच्या विरुद्ध अकबराकडे सारख्या कागाळ्या येऊं लागल्या होत्या; आणि उलमांचें वर्चस्व हाणून पाडण्याकरितां अनेक मंडळींचे मोठ्या नेटानें प्रयत्न सुरू झाले होते.

शिवाय याच काळांत, मुसळमानी धर्माच्या इतिहासांतील एक भविष्य खरें व्हावयाचें होतें; आणि तें खरें होणार असा जनतेचा समज होता. "इस्लामाचीं एक हजार वर्षे भरतांच जिकडे तिकडे धर्माची अवनति होईल; सर्वत्र हाहाःकार उडेल; परमेश्वरास

संकट पडून धर्माचें व लोकांचें तारण करण्याकरितां परमेश्वर पृथ्वीवर अवतार घेईल." असें हें भविष्य होतें; आणि हिजरी शकाचीं एक हजार वर्षें इ० सन १५९१ मध्यें पूर्ण होत असल्यामुळें, मुसलमान समाजांत खळबळ उडाली होती; मुसलमानांत जे बारा इमाम होऊन गेले, त्यांतील शेवटचा इमाम तिसरा महंमद ऊर्फ महदी हा पुन्हां पृथ्वीवर अवतरणार, आणि हें भविष्य खरें होण्याची हीच वेळ आहे, असें लोकांस वाटूं लागलें होतें. जोनपूर येथे एक नवीन महदी उत्पन्न झाला; आणि अशाच प्रकारचे अनेक महदी दुसऱ्या ठिकाणींही पुढें आले; व या नवीन पंथाचा प्रसार करण्यास त्यांनीं सुरवात केली. उलमा मंडळींचा पोकळ अभिमान, दांभिक आचरण, ढोंगी विद्वत्ता व सरकारी नोकरी मिळविण्याकरितां त्यांनीं केलेल्या अयोग्य खटपटी वगैरेबद्दल सारखा चोहोंकडे उपहास होऊं लागला; उलमा मंडळींच्या हातीं न्यायाचें काम असल्यानें तेही उलट अधिकाराच्या जोरावर आपल्या प्रतिपक्षियांचा सूड घेऊं लागले; या नवीन पंथाच्या पुष्कळ अध्यापकांना आणि महदींनां त्यांनीं ठार मारिलें; हे नवीन धर्मविचार लोकांत पसरूं नयेत, ह्मणून अनेक प्रयत्न, खटपटी व भानगडी करण्यास सुरवात केली; आणि अकबर राज्यारूढ झाला, त्या वेळेपासून, या उलमा मंडळींचें अशा प्रकारचें जें क्रूरपणाचें आचरण सुरू होतें, त्याला त्यावेळीं पुष्कळच अधीक जोराची गति मिळून, त्यामुळें धार्मिक व राजकीय वातावरण अतीशय क्षुब्ध होऊन गेलें होतें.

या उलमा मंडळींचें वर्चस्व ह्मणून पाडण्याच्या खटपटींत ज्या मोठमोठ्या मंडळींनीं भाग घेतला होता, त्यांतच शेख मुबारिक-प्रसिद्ध अबुल्फज्ल व फैजी यांचा बाप-या नांवाचा एक विद्वान् मनुष्य प्रमुखत्वानें पुढें आलेला असून तोच विशेषतः या खटपटीचा आणि नवे विचार लोकांत पसरविणाऱ्या मंडळींचा आद्य प्रवर्तक होता; शेख मुबारिक ( जन्म इ० सन १५०५; मृत्यु इ० सन १५९३ ) हा मूळ सुनी पंथाचा असून पुढें त्यानें शियापंथ स्वीकारिला होता. त्याचे पूर्वज मूळचे अरबस्थानांतील राहणारे असून पुढें हें घराणें सिंधप्रांतांत स्थाईक झालें होतें; त्यांतील शेख खिजर या नांवाच्या साधुवृत्तीनें राहणाऱ्या एका मनुष्याचा मुबारिक हा मुलगा असून त्याचा जन्म राजपुतान्यांत नागोर येथें झाला; व तो लहान असतांनाच त्याचा बाप व नंतर आई मृत्यु पावलीं होतीं; तथापि अशा स्थितींतही त्यानें विद्या संपादन करण्याचा निश्चय केला; व तो मोठा तीव्र बुद्धीचा असल्यानें लवकरच आपल्या अंगिकृत कार्यांत यशस्वी झाला. तो अहंमदाबाद येथें पुष्कळ

---

**टीप १:**—जोनपूर हें शहर बनारसच्या उत्तरेस, सुमारें ४० मैलांवर गोमती नदीच्या कांठीं आहे. .या शहराचें मूळ नांव राठगड असें असून समोरच्या तीरावर जाफराबाद या नांवाचें, दुसरें—उत्तम ह्मशींसंबंधीं प्रसिद्ध असलेलें शहर आहे.

दिवस राहिला; उत्तरहिंदुस्थानांत पुष्कळ प्रवास करून व अनेक गुरुजनांजवळ विद्याध्ययन करून त्यानें अतीशय ज्ञान व विद्वत्ता संपादन केली; व नंतर तो आग्रा येथें आला; आणि अकबरानें विद्वान् लोकांच्या उपजीवनाकरितां कांहीं जमिनी तोडून दिल्या होत्या, त्यांतील नेमणुकीवर, यमुना नदीच्या कांठीं एका साधूच्या जवळ राहून, अध्यापकाचें काम करूं लागला. तो जुन्या पुस्तकांवर विश्वास न ठेवितां स्वतंत्ररीतीनें साधकबाधक गोष्टींचा पूर्णपणें विचार करून खन्याखोट्याचा निर्णय करीत असे; आणि प्रचलित पद्धतीहून अगदींच निराळी, अशी त्याची शिक्षणपद्धति असे; त्यामुळें लौकरच त्याचा अतीशय लौकीक झाला; आणि प्रचलित धर्माच्या अत्यंत अभिमानी असलेल्या उलमा मंडळीविरुद्ध होणाऱ्या खटपटींत तो प्रमुख असल्यामुळें ती मंडळी त्याला पूर्ण पालथा घालण्याच्या प्रयत्नाला लागली. त्यामुळें त्यांनीं "शेख मुबारिक हा स्वतः पतित असून दुसऱ्यास अधोगतीस पोंहोंचवीत आहे, यासाठीं त्यास एकदम देहांतप्रायश्चित्त द्यावें" असें सांगून शेख मुबारिक यास कैद करण्याचा अकबराकडून हुकूम मिळविला; परंतु मुबारिक यास ही बातमी अगाऊ लागल्यानें, तो आपले दोन्ही मुलगे, ( अबुल फैजी; जन्म इ० सन १५४७ मृत्यु इ० सन १५९५ ता० ५ आक्टोबर; आणि अबुलफज्ल जन्म इ० सन १५५१ मृत्यु इ० सन १६०२ ता० १२ आगष्ट ) आग्रा येथें टाकून, शिक्री येथील प्रसिद्ध साधु-पुरुष सेख सलीम चिस्ती—ज्या साधुपुरुषाच्या कृपेनें आपणांस हा पुत्र झाला असें समजून अकबरानें त्याचें नांव सलीम असें ठेविलें होतें; तो साधुपुरुष शेख सलीम चिस्ती—याच्या मदतीनें गुजराथप्रांतांत आपला जीव घेऊन पळून गेला; आणि बादशाहा अकबर याचा दूधभाऊ आणि त्या प्रांताचा सुभेदार अजीज कोका याच्या आश्रयास राहिला; त्यानंतर अजीज यानें बादशहाकडे मुबारिकबद्दल रदबदली केली; इतक्यांतच योगायोगानें त्याचा वडील मुलगा फैजी याचाही अकबर बादशहाशीं भेटीचा योग घडून आला व त्यामुळें या घराण्याचें महत्त्व वाढून राजकीय पटावरील महत्त्वाच्या मोहऱ्यांत तें प्रमुखत्वानें झळकण्यास प्रारंभ झाला.

अबुल फैजी हा यावेळीं अगदीं तरुण ह्मणजे २१ वर्षांचा होता; तो स्वतः साधुवृत्तीनें राहणाऱ्या सुफी पंथाचा असून नेहमीं निरनिराळ्या विचारांत व सुवासिक फुलें, सुगंधी द्रव्यें व तेलें व सुंदर मद्यें यांतच नेहमीं गढलेला असे, आणि तो उत्तम कवनें करीत असून त्यांत निरनिराळ्या नव्या नव्या व चमत्कारिक कल्पना असत; व तीं कवनें ईशस्तुतीपर व भक्तिरसानें ओथंबलेलीं असत; यावेळीं अकबरानें चितोड येथें वेढा दिला होता; व तेथें असतांनाच फैजीची कीर्ति त्याच्या कानावर गेली व त्यानें फैजीस चितोड येथें आपल्या भेटीस बोलाविलें; व त्यास तिकडे पाठविण्याविषयीं आग्रा येथील स्थानिक अधिकाऱ्यास हुकूम

पाठविला. आग्रा येथील उलमा मंडळीस हें कांहींच माहीत नसल्यामुळें, फैजी यास शिक्षा करण्याकरितांच बादशहानें चितोड येथें बोलाविलें आहे, अशी त्यांची समजूत होऊन त्यांना फार आनंद झाला: आणि तेथील फौजेच्या अधिकाऱ्यानें फैजीच्या घरीं जाऊन व त्यास पुष्कळ त्रास देऊन, त्यास पकडून बादशहापुढें हजर केलें; फैजीही घाबरलेला होताच; पण बादशहानें त्याचा योग्य सत्कार केला, तेव्हां त्याच्या जिवांत जीव आला; या वेळे-पासून अकबरानें त्यास आपणाजवळ ठेविलें;* व त्याच्याच शिफारसीनें पुढें त्याचा भाऊ अबुल्‌फज्ल याची व अकबराची ओळख झाली; मुबारिक आग्रा येथून पळून गेला, तरी त्याच्या या उभयतां मुलांनीं आपला विद्यार्जनक्रम सतत चालू ठेवून ते दोघेही मोठे विद्वान् निपजले; तथापि या उभयतांमध्यें अबुल्‌फज्ल हा अलौकिक बुद्धीचा, अतीशय धोरणी व मधुरभाषणी असल्यामुळें अकबरास खूष करून त्यानें लवकरच अकबरावर आपली पूर्ण छाप बसविली; पुढें पुढें तो अकबराचा विश्वासू मित्र व चतुर सल्लागार बनला; आणि शेवटीं तर तो अकबराचा इतका जीव कीं प्राण होता कीं, जहांगीरनें अबुल्‌फज्ल यास ओर्च्छेकर राजा वीरसिंहदेव याच्या मार्फत ठार मारविल्यानंतर ( ता० १२ आगष्ट इ० सन १६०२ ) अकबर हा कबूतरें उडविण्याची मजा पहात बसला असतां फरीदबक्षी यानें येऊन अबुल्‌फज्ल याचा खून झाल्याची बातमी त्यास कळविली; त्याबरोबर अकबर एकदम मोठ्यानें ओरडून बेशुद्ध पडला! आणि पुढें कांहीं वेळानें शुद्धीवर आला, तरी त्याच्या डोळ्याचें पाणी कित्येक दिवस खळलें नाहीं. या दुःखानें-या भयंकर वज्राघातामुळें, अकबर हा पुढें मरेपर्यंत नेहमीं अतीशय शोक करीत असे; अत्यंत विव्हळ होत असे; आणि " सलीम-भावी जहांगीर-यास राज्यच पाहिजे होतें, तर त्यानें खुद्द मलाच ठार मारावयाचें होतें! गरीब बिचाऱ्या अबुल्‌फज्ल यास मारून त्याला काय मिळालें? " असें तो नेहमीं कळवळून ह्मणत असे; असा हा अकबराचा कंठमणी असलेला अबुल्‌फज्ल हा अकबराच्या सन्निध असल्यानें या धार्मिक भानगडीला चांगलाच रंग चढला. नवा आणि जुना हे दोन्हीही पक्ष एकेरीवर आले; प्रत्येक दुसऱ्याला नामशेष करण्याच्या अट्टाहासास पेटला; मुबारिक यास कैद करण्याचा उलमा मंडळींनीं हुकूम मिळविल्यामुळें या विजयानें, आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा बीमोड करण्याला त्यांना दुप्पट हुरूप आला; मुबारिकची मह-त्वाची शिकार हातची निसटल्यामुळें उलमा मंडळी अधीक चवताळली, आग्रा येथील सुनी

---

* याच वेळेपासून मुबारिकचा वनवास संपून तो आग्रा येथें परत आला; उलमा मंडळीकडून त्याचा होणारा छळ बंद झाला, व पूर्वीप्रमाणें अध्यापकाचें काम करून तो तेथें सुखानें कालक्रमणा करीत राहिला.

पंथाच्या सरन्यायाधीशानें, पुष्कळ लोकांस त्यांनीं शिया पंथाचा स्वीकार केल्याबद्दल देहांतशिक्षा सांगितल्या; आणि त्या अमलांत आणण्याबद्दल उलमा मंडळींनीं अकबरास अतिशय आग्रह केला; परंतु अशा घोर शिक्षा अमलांत आणण्यास अकबराचें मन कचरूं लागलें; अबुल्फज्ल् हा हें सर्व उघड्या डोळ्यांनीं, व बंद तोंडानें स्वस्थ पहात बसला होता; अकबराच्या मनांतील हेतू त्यानें ताडिला होता; आपल्या बापास त्रास देणारे हेच उलमा आहेत, हें तो विसरला नव्हता; त्यांच्या तुटपुंज्या ज्ञानाची त्याला पूर्ण माहिती होती; त्यांची आपसांतील फूट तो जाणून होता; आणि आपल्या बापाच्या त्यांनीं केलेल्या छळणुकीचा सूड सव्याज उगवून घेण्याला आतां सोन्यासारखी संधी अनायासेंच प्राप्त झाली आहे, अशी त्याची खात्री होती; तथापि तो दरबारी व्यवहार-वागणुकींत पूर्ण वाकबगार, महा दूरदर्शी व निग्रही असल्यानें वरकरणीं "आपण तर कशांतच नाहीं;" असा मोठा साळसूदपणाचा त्यानें आव आणिला; आणि आंतून मात्र आगींत तेल ओतण्यांत तो मोठ्या उत्सुकतेनें व उल्हासानें तत्पर राहिला.

त्यानंतर अकबरानें सर्व उलमांना एकत्र बोलावून आपणांसमक्ष सर्व प्रश्नांचा त्यांनीं ऊहापोह करावा, असें ठरविलें; फत्तेपुरशिक्री येथें आपल्या खासबागेंत "इबादत-खाना" या नांवाचें एक भव्य मंदिर उभारिलें; आणि त्याला चार मोठालीं दालनें ठेवून त्यांत सर्व जातींच्या, व धर्मांच्या लोकांस बसण्याची व्यवस्था केली; अबुल्फज्ल् ह्मणतो कीं, शिया, सुनी, सुफी, पंडित, धर्मोपदेशक, वकील, ब्राह्मण, बौद्ध, क्रिस्ती, यहुदी, फारशी व इतर पंथाचे विद्वान् लोक या सभेंत वादविवाद करण्यासाठीं आणिले होते; व प्रत्येकजण आपआपलें ह्मणणें निर्भयपणें सांगत होता. अबुल्फज्ल् हा अकबरच्या आज्ञेनें, प्रश्न काढून वादविवादास सुरवात करीत असे; आणि पाहिजे ते वांकडे तिकडे प्रश्न पुढें आणून उलमा मंडळींना चिडवीत असे; त्यामुळें एक दिवस वादविवादांत मोठी आरडाओरड झाली, व अखेरीस एकमेकांचीं उणीं काढून परस्परांस शिव्या देण्यापर्यंत मजल आली; शेवटीं उलमा मंडळींतच फार मतभेद असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें;-आणि फज्लू याच्या अडवणुकीच्या मार्गामुळें, आणि त्यांच्यांत आपसांतच एकोपा नसल्यामुळें हा मतभेद अधीक स्पष्टपणें निदर्शनास आला. तेव्हां ज्या ठिकाणीं उलमांचा मतभेद होईल, त्याठिकाणीं बादशहानें अखेरचा निकाल करावा, असें अकबरानें सुचविलें; व त्यानंतर उलमांच्या नांवानें एक करारनामा करण्यांत आला, त्यांत, "ज्या ज्या वेळीं उलमामंडळींमध्यें मतभेद होईल, त्या त्या वेळीं, त्या त्या प्रश्नाचा अखेरचा निकाल करण्याचा, व कुराणांतील वचनास अनुसरून धर्मांत नवीन फेरफार करण्याचा, अधिकार बादशहास आहे." असा मजकूर असून तो अबुल्-फज्लचा बाप शेख मुबारिक यानें लिहून काढिला; आणि त्यावर सर्व उलमांनीं नाइलाजानें

सह्या केल्या. ( इ० सन १५७९ ) नंतर या करारनाम्याची चोहोंकडे प्रसिद्धी करण्यांत आली, त्यामुळें उलमांचें महत्व नष्ट झालें; अधिकार नाहींसा झाला; उलमांचा अध्यक्ष व सरन्यायाधीश या उभयतांनाही अकबरानें नोकरींतून काढून टाकिलें; आणि उलमांचा पाडाव झाल्यामुळें एक दडपण नाहींसें होऊन बाद्शहाचा धार्मिक अधिकार, राजकीय अधिकाराप्रमाणेंच स्वतंत्र झाला; व त्यामुळें, ही आपसांतील चुरशीची धार्मिक स्पर्धा थंड झाली.

या काळांत अशाच प्रकारचे स्मरणीय धर्मकलह क्रिस्तीधर्मांतही माजले होते, आणि नवीन मतांची सुधारक मंडळी थोतांडी व दांभिक उपाध्यायांशीं भांडून धर्मगुरूंचे स्तोम व महत्व नाहींसें करण्याचा प्रयत्न करीत होती; इंग्लंडच्या आठव्या हेनरीनें पोपचा संबंध तोडून टाकून ज्याप्रमाणें आपण स्वतःच धर्मगुरू ह्मणून जाहीर केलें, तसाच प्रकार हिंदुस्थानांत अकबरानें केला होता; आणि युरोपांतील लूथर, विक्लिफ वगैरे स्वतंत्र विचाराच्या विद्वान् लोकांप्रमाणेंच शेख मुबारिक हा हिंदुस्थानांत उत्पन्न झाला होता; थोडक्यांत ह्मणजे, युरोप व हिंदुस्थान या देशांतील राजकीय व धार्मिक परिस्थिती तुलनात्मकदृष्टया पाहतां मुसलमानी रियासतींत ह्मटल्याप्रमाणें, एकंदरींत अकबर बाद्शहाची गणना पृथ्वीवरील थोर राजकर्त्यांमध्यें झाली पाहिजे. हिंदु मुसलमान यांच्यासंबंधानें त्यानें जातिभेद किंवा धर्मभेद दाखविला नाहीं. इतका निःपक्षपात हिंदुस्थानांत कधीं कोणी दाखविल्याचें उदाहरण आढळत नाहीं. स्वजातियांच्या हेकेखोरपणाबद्दल त्यानें शब्दानें व कृतीनें तिरस्कार व्यक्त केला आहे. दोनहि धर्मांतील आढळून आलेलीं व्यंगें काढून टाकण्याचा त्यानें प्रयत्न केला, हें विलक्षण होय. शौर्यामध्यें त्याची बरोबरी करूं शकणारे असे थोडेच पुरूष सांपडतील. त्याची बुद्धी अचाट होती. इंग्लंडांत त्याच्या वेळेस इलिझाबेथ राणी राज्य करीत होती. अकबर गादीवर येण्याचे अगोदर युरोपांत सीझर बॉर्जिया नुकताच मरण पावला होता. सन १५२७ त रोम शहराची सात महिनेपर्यंत भयंकर लुटालूट चालली होती. इंग्लंडांत गणितशास्त्रावर पहिलें पुस्तक सन १५४० त छापलें गेलें; सेंट बार्थोलोमोची कत्तल सन १५७२ त झाली. स्पेन देशाहून इंग्लंड देश जिंकण्याकरितां आलेल्या मोठ्या आरमाराचा सन १५८८ त नाश झाला. शेक्सपीयर कवीचें पहिलें काव्य सन १५९३ त छापलें गेलें; सन १६०० मध्यें रोम शहरांत ब्रूनोला जिवंत जाळलें. युरोपांतील भिन्न भिन्न राष्ट्रांमधील व्यवहारांचें नियमन करणारा कायदा तयार होण्यास आणखी शंभर वर्षांचा काल लागला. चेटकें करणारांस इंग्लंडांत सन १७१२ पर्यंत फांशीची शिक्षा होत असे. सन १७१८ पर्यंत फ्रान्सांत व सन १७८० पर्यंत स्पेन देशांत चेटकी लोकांस

(३१)

जाळून टाकीत. प्रत्यक्ष लूथर (सन १५३०) ह्यास भूतांबरोबर सबंध कसवें लागलें; ह्मणजे लूथरसारख्या माणसाचा त्यावेळीं भूतावर विश्वास होता. त्याकाळच्या लोकांत चेटकाविषयीं असा समज होता कीं, चेटक करणारणीच्या घरचें मांजर घेऊन त्याचें रक्त काढावें; सात वर्षांच्या कुमारिनें सूर्योदयापूर्वी उठून कांहीं वनस्पतींचा पाला गोळा करावा, आणि तो त्या रक्तांत वाटून त्याचा लेप लावावा, ह्मणजे चेटक उतरतें; असा युरोपांत समज होता. ब्लेझ्पस्कल एक वर्षाचा असतांनाच त्याचें चेटक वरील उपचारानें उतरलें. विद्वान् शास्त्रवेत्ता केप्लर याच्या मावशीस चेटक करण्याबद्दल फांशीची शिक्षा झाली; त्याची आई मोठ्या मिनतवारीनें ह्या संकटांतून सुटली. स्वतः केप्लर सर्व युरोपांत त्यावेळेस शास्त्रीय विषयांत इतका विद्वान असतां, "चेटकें सत्य आहेत; तीं मिथ्या असें कोणास ह्मणतां यावयाचें नाहीं;" असा त्याचा स्वतःचा मह होता. केप्लर सन १६३० त मरण पावला. सारांश अकबराच्या वेळचें हिंदुस्थान व युरोप ह्यांची तुलना केली असतां, हिंदुस्थानचीच योग्यता अधीक ठरते. युरोपांतील बहुधा कोणत्याही देशाची राज्यव्यवस्था हिंदुस्थानपेक्षां चांगली नव्हती. अकबराच्या ताब्यांतील मध्यहिंदुस्थानच्या सामान्य लोकांपेक्षां इंग्लंडांतील सामान्य जनसमूहाची स्थिती जास्त सुखकर नव्हती. सतराव्या शतकाच्या आरंभीं युरोपच्या शेतकरी वर्गाची स्थिती वास्तवीक कशी होती हें समजण्यास फारसा मार्ग नाहीं; तरी "सायमन साधूचें चरित्र" ह्मणून फ्रेंच भाषेंत एक पुस्तक आहे, त्यांत सन १७०९ च्या सुमारास, ह्मणजे अकबरानंतर शंभर वर्षांनीं फ्रान्सच्या शेतकऱ्यांची स्थिती कशी होती, ह्याचें फार मनोरम वर्णन दिलें आहे, तें वाचलें असतां हिंदुस्थानचें मागें दिलेलें वर्णन मिथ्या अगर अतिशयोक्तीचें असें कोणासही वाटणार नाहीं. फ्रान्सच्या शेतकऱ्यांची स्थिती विशेष निकृष्ट होती, ही गोष्ट खरी, पण अकबरानें दुःसह कर बंद करून, लोकांस तगाईच्या रकमा देऊन आणि आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांस धान्य वाटण्याची तजवीज अमलांत आणून आपत्काळीं, लोकांचें रक्षण करण्याची उत्कृष्ट योजना करून ठेविली होती. इंग्लंडच्या लोकांच्या स्थितीबद्दलही अनेक पुस्तकांतून माहिती मिळते; पण अकबराच्या रयतेपेक्षां ते लोक सुखी होते, असें मानण्यास कोठेंच आधार नाहीं.—ह्मणजे, त्या काळांत धार्मिक व राजकीय बाबतींत युरोपखंडाच्या मानानें हिंदुस्थान देश अधीक पुढें होता; आणि युरोपांतील बहुधा कोणत्याही देशाच्या राज्यव्यवस्थेपेक्षां हिंदुस्थानची राज्यव्यवस्था अधीक चांगली होती, असें ह्मणण्यास कांहींच प्रत्यवाय रहात नाहीं.

अकबर बादशहा हा स्वतः सुनी पंथाचा होता; तरी मुसलमानी धर्मांतील इतर पंथ, व त्या पंथाचे लोक—आणि इतर निरनिराळे धर्म व त्या धर्मांतील लोक,

यांना तो समान दृष्टीनें पहात होता; तथापि दुसऱ्याच्या समाधानाकरितां, व दुसऱ्यास संतुष्ट ठेवण्याकरितां, त्याला " शियापंथ मला पसंत नाहीं " असें ह्मणून तात्पुरती सुनी धर्माची महती कबूल करावी लागली. अकबराच्या धर्मस्वातंत्र्याच्या नवीन कल्पनांनीं बंगालप्रांतांत बंड झाल्यानंतर अकबरानें आपलें धोरण बदललें; इतक्यांतच तुराणचा सुनीपंथी राज्यकर्ता अबदुल्लाखान युझबेग याच्याकडून एक वकील अकबराकडे पत्र घेऊन आला; या पत्रांत अकबराच्या नवीन धर्माबद्दल त्याचा उपहास केला होता; मुसलमानी धर्माची अवज्ञा करीत असल्याबद्दल त्यास दोष दिला होता; आणि ब्राह्मण वगैरे पंडितांना तो आदरानें वागवीत असल्याबद्दल त्याची पुष्कळच कानउघाडणी केली होती. त्यावर अकबरानें अबदुल्लाखान यास जें उत्तर पाठविलें, त्यांत तो ह्मणतो:— " माझा धर्म कुराणास अनुसरून आहे; आणि त्यामुळेंच माझ्या राज्याची अशी सारखी भरभराट होत आहे. धर्म आणि भाग्य—कर्म आणि किसमत—हीं दोन्हीं जुळीं भावंडें आहेत; व सर्व धर्माचे लोक माझ्या भजनीं आहेत. अशा रीतीनें हिंदू व किरस्ती, या उभयतांचाही मी पाडाव केला आहे; त्यामुळें मुसलमानी धर्माला मीं जें स्वरूप दिलें आहे, तेंच निःसंशय योग्य आहे. आतां माझी एवढीच इच्छा आहे कीं, हिंदूलोक पूर्णपणें ताब्यांत आल्यावर मग फिरंग्यांचा—पोर्तुगीज लोकांचा—समाचार घ्यावा; कारण त्यांनीं पश्चिम किनाऱ्यावर बराच प्रदेश काबीज केला असून, शिवाय ते आमच्या मक्केस जाणाऱ्या येणाऱ्या यात्रेकरूंनाही मुद्दाम विनाकारण त्रास देत असतात,—व आहेत. आणि मी-तुमच्याच सुनी पंथाचा असून शिया पंथ मला पसंत नाहीं."—ह्मणजे अबदुल्लाखान यास खुष करण्याकरितांच त्यानें शियापंथाबद्दल नापसंती दाखवून, सुनी पंथाची महती मान्य केली होती, हें उघड आहे.

बादशहा जहांगीर याला स्वतःलाच मुळीं आपल्या धर्माची फारशी परवा नव्हती; तेव्हां त्याच्या कारकीर्दींत धार्मिक भानगडी होण्याचें मुळीं कारणच नव्हतें. तथापि त्याच्या कारकीर्दींत अकबराच्या वेळचें हिंदी वळण कमी होऊन इराणी वळण अतीशय वाढलें; आणि नूरजहान हीच सर्व राज्याची सूत्रचालक बनल्यामुळें, तिचें सर्व कुटुंब वैभवसंपन्न झालें. नूरजहानचा आजा ख्वाजामहंमद शरीफ हा खुरासानच्या सुलतानाचा वजीर असून तो मोठा विद्वान् व कवी होता; व त्याचा मुलगा—नूरजहानचा बाप—घ्यासबेग हा इराणांतून आपला जीव जगविण्याकरितां पळून हिंदुस्थानांत आलेला होता. हें घराणें शियाधर्मी होतें; आणि नूरजहानमुळें, या काळांत अनेक शियाधर्माचीं कुटुंबें इराणांतून हिंदुस्थानांत येऊन, त्यांचेंही दरबारांत व राज्यकारभारांत महत्व वाढलें होतें. तथापि जहांगीर, नूरजहान, घ्यासबेग अथवा इतर कोणीही धार्मिक बाबतींत न पडल्यानें, कोणतीच मानगड उपस्थित झाली नाहीं.

बादशहा शहाजहान हा तर धार्मिक बाबतींत तिळमात्रही आग्रही नसल्यामुळें; त्याच्या कारकीर्दींतही धार्मिक मतभेदाच्या स्पर्धेमुळें, कोणतीच भानगड उपस्थित झाली नाहीं तथापि सुन्नी पंथाच्या एका बलिष्ट प्रतिस्पर्ध्याशीं त्याला कांहीं काळ झगडावें लागलें; तो प्रतिस्पर्धी ह्मणजे इब्राहीम लोदी विरुद्ध, बाबर यास हिंदुस्थानांत बोलाविणारा अफगाण सरदार दौलतखान लोदी त्याचा मुलगा पीरखान, ऊर्फ खानजहान लोदी हा होय. खानजहान हा पहिल्यानें दानियल याच्या पदरीं असून जहांगीरच्या कारकीर्दींत तो प्रसिद्धीस आला; व "त्यास खानजहान" ही पदवी मिळाली. इ॰ सन १६०९ मध्यें जहांगीर यानें महाबतखानास दक्षिणेंतून परत बोलावून घेऊन, तिकडील कारभारावर

---

टीप १:—महाबतखान, हा प्रसिद्ध सरदार मूळचा रजपूत असून बाटून मुसलमान झालेला होता. मेवाडचा शूर व प्रसिद्ध राणा प्रतापसिंह हा इ॰ सन १५९७ मध्यें मृत्यु पावल्यावर त्याचा शूर मुलगा अमरसिंह हा गादीवर आला. तो शांतताप्रिय होता, तरी मोठा शूर होता; व त्यानें दोनदां—ह्मणजे इ॰ सन १६०८ व इ॰ सन १६१० मध्यें—मोंगली सैन्याचा पराभव केला होता. त्यास सुग्राजी ऊर्फ संगराजित या नांवाचा एक भाऊ असून तो पूर्वीपासूनच मोंगलांस मिळालेला होता. अमरसिंह हा मोंगल बादशहाशीं शत्रुत्वानें वागत असल्यामुळें, त्यास नतीजा देण्याकरितां जहांगीर बादशहानें संगराजितास चितोडगडावर राज्याभिषेक करून मेवाडचा राज्यकर्ता बनविलें; परंतु राजपुतान्यांत त्यास कोणीच जुमानिलें नाहीं. या नामधारी राजपदावर तो सात वर्षें होता; तथापि तो मोंगलांच्या वशिल्यानें गादीवर आलेला असल्यानें, आणि स्वकीयांत त्यास काडीचेंही महत्त्व नसल्यानें त्याचा हा काळ पूर्णपणें उदासीन स्थितींतच गेला; शिवाय स्वार्थप्रेरित उन्मादाची धुंदी उतरल्यावर त्याला आपल्या वीर, पराक्रमी पूर्वजांचीं अलौकिक कृत्यें आठवूं लागलीं. "जिकडे तिकडे महायोद्ध्यांच्या समाधी, मोठाले जयस्तंभ, त्यांजवर तेथें घडलेल्या पराक्रमांचीं खोदलेलीं वर्णनें, आणि किल्ल्यावर जेथें तेथें अनेक स्मरणीय स्थानें, हीं पाहून त्याला असें वाटावें कीं, माझ्या वाडवडिलांनीं काय काय कीर्ति-शौर्याचीं कामें केलीं? आणि मी पहा कसा कीं दुस्मान मोंगल यांजकडे फितूर होऊन त्यांचा हस्तक ह्मणून पुनरपि या माझ्या पूर्वजांच्या परमपूज्य राज्यपदावर निर्लज्जपणें येऊन बसलों! तेव्हां मला धिक्कार असो!" या विचारांनीं तो नेहमीं उदासीन राहूं लागला; त्यास तें कांटेरी वैभव आहे, असें वाटूं लागलें; या वैभवाचा त्याग करण्याचा त्यानें निश्चय केला; आणि राज्याचा खरा वारस जो अमरसिंह, त्याच्या स्वाधीन राज्य करून तो—पर्वती व चंबळा या दोन नद्यांच्या संगमावर, रणथंभोर या प्रसिद्ध व बळकट किल्ल्याजवळील—कंधार या नांवाच्या किल्ल्यावर एकांतवासांत येऊन राहिला. नंतर कांहीं काळानें तो जहांगीर बादः

शहाजादा पर्वीझ याची नेमणूक केली; त्यावेळीं खानजहान यास त्याच्या मदतीस नेमिलें. तिकडे असतांनाच, जहांगीरच्या कारकीर्दीतच तो बराच बलिष्ट बनला

शहास भेटण्याकारितां दिल्ली येथें गेला; परंतु त्याच्या ह्या विश्वासघातकी आचरणाबद्दल जहांगीरनें त्याची भरदरबारांत अतीशय निर्भत्सना केली; तेव्हां तो मानभंग संगराजितास असह्य होऊन त्यानें तेथल्या तेथेंच आपली कट्यार आपल्या पोटांत भोंसकून घेऊन प्राणत्याग केला ! !

याच संगराजिताचा, बाटून मुसलमान झालेला महाबतखान हा मुलगा होय; हा रजपुतांच्या " गोतास काळ " होता, व झाला होता; आणि मोंगल बादशहाच्या राजपुतान्यांतील बहुतेक सर्व मोहिमांत,—आणि दक्षिणेंतील मोहिमांतही—स्वकीयांविरुद्ध लढण्यांत त्यानें प्रमुखत्वानें भाग घेतला होता; तो मोठा शूर व साहसी असून खुद्द जहांगीर यासही, त्याचा मुलगा शहाजहान याच्या अनुमतीनें त्यानें कैद केलें होतें; त्यामुळें या वेळेपासून तो शहाजहान याचा विशेष विश्वासू मदतगार व प्रेमी स्नेही बनला.

महाराणा अमरसिंह हा पुढेंही कांहीं काळ बादशाही सैन्याबरोबर झगडत होता; व इ० सन १६११ मध्येंही त्यानें पुन्हां बादशाही सैन्याचा पराभव केला; तेव्हां जहांगीर यानें शहाजहानबरोबर मोठें सैन्य देऊन त्यास अमरसिंहावर पाठविलें. त्यावेळीं या सैन्याबरोबर झगडण्यांत आपला निभाव लागणार नाहीं, असें पाहून तो जहांगीर यास शरण गेला; त्यावेळीं जहांगीर यानें त्याचा सन्मान करून, त्याचा प्रसिद्ध व शूर मुलगा कर्ण यास आपल्या दरबारांत थोर पद दिलें; व उभयतांचा तह होऊन हें युद्ध समाप्त झालें.

त्यानंतर अमरसिंह यानें स्वहस्तानें युवराज कर्ण याची गादीवर स्थापना केली; आणि वानप्रस्थाश्रम धारण करून, पांच वर्षांनंतर विक्रमसंवत् १६७७ मध्यें—इ० सन १६२१ मध्यें तो मृत्यु पावला.

याच प्रसिद्ध कर्णराजाच्या कारकीर्दींत शहाजहान यानें जहांगीरविरुद्ध बंड केलें; आणि तें निष्फळ झाल्यावर तो उदेपूर येथें येऊन कर्णाच्या आश्रयास राहिला; आणि कर्णानें त्यास—जहांगीरच्या रागाची भीति अथवा मेहेरबानीची पर्वा न बाळगतां—मोठ्या उदारपणानें पुष्कळ काळपर्यंत आश्रय देऊन, अतीशय सन्मानानें वागविलें; घरच्याप्रमाणें सुखांत ठेविलें; आणि आपल्या शत्रूवर उपकार करून—तो संकटांत असतां, व आपण होऊन घरीं चालून आल्यामुळें पूर्णपणें सूड घेण्याला सुसंधी प्राप्त झाली असूनही तिचा क्षुद्रपणानें फायदा करून न घेतां, अथवा तसा नुसता अनीतीचा विचारही आपल्या उदार अंतःकरणांत न येऊं देतां—आपल्या, रजपुतांच्या मनाचा थोरपणा व्यक्त केला.

राजा कर्ण हा सात वर्षें राज्याचा उपभोग घेऊन इ० सन १६२८ मध्यें मृत्यु पावला.

आणि तो स्वतः सुनीपंथाचा असल्यानें, त्याच पंथाचा मलिकंबर यास मिळून, त्यानें मोंगलांनीं जिंकलेला निजामशाहींतील पुष्कळ प्रदेश त्यास दिला.—उलटपक्षीं इ० सन १६१६ मध्यें शहाजादा खुर्रम, भावी शहाजहान यानें जहांगीरच्या हुकुमानें दक्षिणेंत निजामशाहीवर स्वारी केली, त्यावेळीं मलिकंबर हा सुनी पंथाचा, आणि विजापूर व गोवळकोंडें येथील राज्यकर्ते शियापंथाचे असल्यानें, त्यांनीं मलिकंबर यास मदत केली नाहीं; त्यामुळें मलिकंबर याचा पराभव होऊन, ह्मणजे दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांतील हीं धार्मिक वैमनस्यें शहाजहान यास फारच फायदेशीर होऊन अहंमदनगर पुन्हां मोंगलांच्या ताब्यांत गेलें. पुढें जहांगीरच्या मृत्यूनंतर शहाजहान गादीवर आल्यावर त्यानें खानजहान यास दिल्लीस बोलाविलें; परंतु त्याप्रमाणें तो तिकडे गेला नाहीं. नंतर शहाजहान यानें महबतखानास पुन्हां दक्षिणेच्या सुभ्यावर पाठविलें; आणि खानजहान याची माळवा प्रांताच्या सुभेदारीवर नेमणूक केली. त्यानंतर शहाजहान यानें त्यास पुन्हां दिल्ली येथें बोलावलें; व त्याप्रमाणें यावेळीं तो तिकडे गेला. त्यावेळीं शहाजहान यानें त्याचा योग्य सत्कार केला; परंतु बादशहाची ही वागणूक वरपांगीं असून तो आपणास दग्यानें कैद करणार आहे, असा त्यास संशय आला; व शहाजहानविरुद्ध बंड करण्याचा निश्चय करून तो तेथून पळाला. यावेळीं त्याच्याबरोबर त्याच्या दोन बायका व तीन मुलें एवढा परिवार होता. त्यांपैकीं उभयतां स्त्रियांनीं आपण होऊन एका खोलींत कोंडून घेऊन गुप्तपणें आपल्या जिवाचा नाश करून घेऊन, खानजहान यास आपल्या काळजींतून मुक्त केलें! या स्त्रियांच्या मृत्युमुळें त्यास अतीशय दुःख झालें; परंतु ती दुःख करीत बसण्याची वेळ नव्हती; ह्मणून त्या स्त्रियांची अखेरची व्यवस्था करून त्यानें आपल्या तिन्हीं मुलांस बरोबर घेतलें; व पाठीवर असलेल्या बादशाही सैन्यास दाद न देतां, आपल्या विश्वासू व जिवास-जीव देणाऱ्या दोन हजार सैन्यासह बुंदेलखंड व गोंडवण या मार्गानें तो दक्षिणेंत आला.

अफगाण आणि मोंगल, यांचें वांकडें असून अफगाण लोकांकडून मोंगल लोकांनीं राजसत्ता हिसकावून घेतल्यामुळें,—लोदी घराण्याला नामशेष करून बाबर यानें दिल्ली येथील तख्त मिळविलेलें असल्यामुळें—आतां पुन्हां तसाच उलट प्रसंग येतो कीं काय अशी खानजहानच्या बंडामुळें शहाजहान यास स्वाभाविकरीत्याच भीति वाटूं लागली. शिवाय त्याचा पक्ष सारखा प्रबळ होत जाण्यानें ती दुणावत गेली; छत्रपति शिवाजीचा बाप शहाजी त्यास मिळालेला होता; निजामशाही सरदार त्यास अनुकूळ झालेले होते; आणि विजापूर व गोवळकोंडें येथील राज्यकर्ते जर त्यास अनुकूळ झाले तर दक्षिणप्रांत—अत्यंत खर्चानें, श्रमानें व त्रासानें मिळविलेला दक्षिणप्रांत, आपल्या हातचा जाईल,

इतकेंच नव्हे तर दक्षिणेंत विजयी झाल्यावर दिल्लीवरही तो चाल करून येईल, अशी भीतिप्रद शंका त्यास आली; आणि खानजहानच्या या अरिष्टांस, हातपाय फुटण्यापूर्वीच त्याचा निकाल करावा, म्हणून तो स्वतः मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत आला. (इ० सन १६२९) व बऱ्हाणपूर येथें मुक्काम ठेवून त्यानें आपल्या सैन्याचे तीन भाग केले; व ते कसलेल्या सेनानायकांच्या हाताखालीं सोंपवून त्यांची खानजहानवर रवानगी केली. त्यांपैकीं एका भागाचा सेनानायक अजीमखान या नांवाचा सरदार असून त्यानें खानजहानचा असा सारखा पिच्छा पुरविला कीं, त्याच्या सैन्याची वाताहत होऊन तो आश्रयाकरितां भटकूं लागला; त्याची अशी स्थिती झालेली पाहून शहाजी व इतर सरदारांनीं त्याचा पक्ष सोडून ते शहाजहान यास मिळाले. तेव्हां खानजहान हा विजापूर येथें महंमद अदिलशहा याचा आश्रय मागण्याला गेला; व तेथें तो न मिळाल्यामुळें मूर्तुजा निजामशहाकडे अहंमदनगर येथें त्याचा आश्रय मागण्यास गेला; निजामशहा यानें त्यास कांहीं काळ आश्रय दिला; परंतु त्यामुळें मोंगली सैन्य त्याच्यावर चाल करून आलें; व त्याच्याशीं युद्ध करून त्यास पूर्णपणें पराभूत केलें. त्यामुळें त्यास लोदीस दिलेला आश्रय काढून घ्यावा लागून शिवाय धारूरपर्यंतचा सर्व प्रदेशही मोंगलांना द्यावा लागला. अशारीतीनें सर्व बाजूंनीं दक्षिणेंत आश्रय मिळण्याची आशा नष्ट झाल्यामुळें, तो बादशाही फौजेस चुकवून पुन्हां बुंदेलखंडांत परत आला. तथापि तिकडेही मदत न मिळतां तशाच स्थितींत नाइलानें त्यास मोंगली सैन्याशीं युद्ध करावें लागलें; आणि कालिंजर नजीक बादशाही सैन्याशीं युद्ध करीत असतांनाच तो मारला गेला; आणि मोंगल बादशहाशीं शत्रुत्वानें असणाऱ्या बलिष्ट सुनी अफगाणांतील या शूर प्रतिस्पर्धी सरदाराच्या नाशानें शहाजहान हा एका मोठ्या काळजींतून मुक्त झाला!

बादशहा अवरंगझेब ऊर्फ आलमगीर याचा स्वभाव खरोखरीच इतका अगम्य आहे, कीं त्याचें यथातथ्य वर्णन करणें, अतीशय बारकाईनें निरिक्षण करून सुद्धां,

---

**टीप १:**—कालिंजर हें प्रसिद्ध ठिकाण बुंदेलखंडांत बांदा जिल्ह्यांत, बांदा शहरापासून दक्षिणेस ३३ मैलांवर आहे. येथील किल्ला पूर्वकाळचा, प्रसिद्ध, भव्य, बळकट व प्रेक्षणीय असून त्यास सात दरवाजे आहेत. किल्ल्याखालीं, पायथ्याशींच कालिंजर हें गांव असून त्यास "तऱ्हाटी" हें स्थाईक नांव आहे. हें गांव बदाऊसा तहशिलींत बांदा येथून ३८ मैलांवर, व तेथून कालिंजर सडकेनें अजमासें १८ मैलांवर आहे. हा किल्ला समुद्रसपाटीपासून १२३० फूट उंचीवर आहे; बांदा व बदाऊसा हीं जी. आय. पी. रेलवेच्या कानपूर—बांदा, व झांशी-माणिकपूर मार्गांवरील स्टेशनें आहेत.

साध्य होणार नाहीं; त्यांचीं सर्व कृत्यें धर्मानें प्रेरित झालेलीं असत. धर्म व धार्मिक आचारविचार यांच्या जोपासनेकरितां तो आपला प्राणही देण्यास तयार असे. ही गोष्ट अगदीं खरी आहे; पण कुराणावर हात ठेवून सुद्धां अखेरीस त्यानें मुरादशीं विश्वासघात केला व त्यास कैद केलें; त्यावेळीं "कुराणावर हात ठेवून तूं शपथा घेतल्या आहेस त्या ह्याच काय? असा मुराद यानें अवरंगझेबास खडा सवाल टाकिला! आतां तुझा "धर्म" कोठें गेला? ह्मणून त्याला प्रश्न विचारिला। पण अवरंगझेब बोलणार काय? व उत्तर देणार काय? त्याप्रमाणेंच आपल्या फायद्यापुरताच त्यानें धर्मशास्त्राचा आधार घेतला! "मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें मद्य प्राशन करणारा मनुष्य पातकी व राज्य

---

१ टीपः—अवरंगझेब हा कधींही दारू पीत नसे इतकेंच नाहीं तर कोणीही दारू पिऊं नये, याबद्दल त्याचा अतीशय कटाक्ष असे; या बाबतींत खालील माहिती ॲडव्होकेट पत्रांत इंग्रजींत प्रसिद्ध झाली आहे व तिचें खालीलप्रमाणें (ता० १९ मंगळवार जुलै इ० सन १९२१ चा केसरी पान २, कॉलम ५ वरील अवरंगझेब व मद्यपान हा लेख पहा.) भाषांतर आहे तें:—

अवरंगझेब धर्माचे बाबतींत अतीशय करडा मुसलमान होता व मद्यपानास कुराणानेंच बंदी केली असल्यानें त्यानें मद्यपान बंद करण्याकरितां फार खटपट केली. त्याकरितां त्यानें एक बादशाही फर्मानही काढलें होतें. या त्याच्या चळवळीबद्दल त्यावेळच्या एका गृहस्थानें खालीलप्रमाणें उद्गार काढल्याचें आढळून येतें:—

"अवरंगझेब कुराणाचा कट्टा अनुयायी होता व त्यास मद्यपानाची अतीशय चीड होती; तरी त्याचे राज्यांत, मुख्यत्वे दिल्ली शहरांतच, हिंदू-मुसलमान मनसोक्त मद्यपान करीत असल्याचें त्यास आढळून आलें. मद्यपानास प्रथम खरी सुरवात जहांगीरचे कारकीर्दींत झाली. त्याचे पूर्वी अकबरानें फक्त ख्रिश्चन लोकांस दारू तयार करून पिण्याची मोकळीक ठेविली होती. जहांगीरचे कारकीर्दींत मात्र मद्यपानाचा सर्रास फैलाव झाला. शहाजहानच्या वेळीं तर राजपुत्र दाराचें अनुकरण करून लोक पाण्याप्रमाणें वाटेल तशी मनसोक्त दारू पीत असत.

"अवरंगझेब गादीवर बसला तेव्हां तर ही संवय इतकी बळावली होती कीं, त्यानें एक दिवस "मी व मुख्य काजी अबदुल वाहाब याखेरीज सगळ्या हिंदुस्थानांत एकही इसम दारू न पिणारा असा नाहीं" असे उद्गार काढिले। मद्यपान बंद करण्यास अवरंगझेबानें खालील उपाय अमलांत आणिले. वैद्य हकीम वगैरे लोकांखेरीज इतर सर्व ख्रिश्चन लोकांस शहर सोडून दोनचार मैलांवर तोफखान्याचे शेजारीं वस्ती करण्यास हुकूम केला; व तेथें त्यांना दारू तयार करण्यास व पिण्यास मुभा ठेविली. मात्र ती कोणासही

चालविण्यास नालायक " या सबबीवर त्यानें मुराद् यास कैद केलें; पण कुराण हातांत घेऊनही विश्वासघात करणारा अवरंगझेबच तरी मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें, राज्य चालविण्यास लायक कसा ठरला ! अर्थात् धर्मानें नव्हे पण तरवारीनें तो यशस्वी ह्मणून लायक ठरला, आणि ती तरवार उपयोगांत आणितांना त्यानें धर्माचा आश्रय घेतला, असेंच ह्मणावें लागतें.

अवरंगझेबाच्या पुढील वर्तनांतही असाच परस्पर विरुद्ध प्रकार आहे; तो भित्रा नव्हता; छातीठोक मर्द गडी होता; एकदां एक सिंह मोकळा सुटला. त्यावेळीं त्यानें स्वतः त्याच्या अंगावर चाल करून जाऊन त्यास जागच्याजागीं ठार मारलें होतें. तो कच्चया काळजाचा नव्हता, धडाडीचा राजपुरुष होता; एकदां आग्रा येथील यमुना-नदीच्या वाळवंटांत तो घोड्यावर बसून हत्तीच्या टकरा पहात असतां एक मस्त हत्ती त्याच्या अंगावर चाल करून आला; त्याबरोबर त्यानें आपल्या हातांतील भाला नेमधंद त्या हत्तीवर फेंकला; तेव्हां हत्तीनेंही आपल्या सोंडेचा एक तडाका त्याच्या घोड्यावर मारिला; त्याबरोबर घोडा आणि तो, हे उभयतांही खालीं पडले; तथापि न डगमगतां औरंगझेब तसाच ताडकन् उठून उभा राहिला; आणि पुन्हां हत्तीवर धांवून गेला;-पायींपायींच धांवून गेला; इतक्यांत लोकांनीं धांवत येऊन त्यास या संकटांतून मुक्त केलें; तो संकटांना जुमानणारा नव्हता; पूर्ण हिंमतीचा व प्रसंगावधानी होता; सुलेमान यास सोडून अवरंगझेबास मिळण्याकरितां राजा जयसिंह हा पुढें येत असतां, अवरंगझेब हा फार थोड्या लोकांनिशीं एकटाच भटकत आहे, असें त्यास कळलें; तेव्हां त्यास गांठून सहजासहजीं त्याचा नाश करावा, असा त्यानें विचार केला; पण अवरंगझेब महाधूर्त ! त्यानें जयसिंहाचा हा उद्देश बरोबर ताडला; आपण होऊन मोठी हिंमत करून त्याला जाऊन

---

विकण्याची त्यांनां मनाई होती. नंतर त्यानें दारू विकणाऱ्या हिंदू अगर मुसलमानास हुडकून काढण्यास कोतवालास सांगितलें; व गुन्हेगाराचा एक हात व एक पाय तोडण्याची शिक्षा सांगितली व ही शिक्षा बऱ्याच लोकांच्या बाबतींत अमलांतही आणिली गेली.

" हा हुकूम पाहिल्यानें फारच कडक रीतीनें पाळण्यांत आला; परंतु पुढें पुढें हे नियम थोडेसे शिथिल करण्यांत आले. ख्रिश्चन लोकांनीं दारू विकूं नये ह्मणून त्यांच्यावर पहारा ठेवण्यांत आला होता; तरी सुद्धां जबर नफ्याच्या लोभानें ते हजारों युक्त्या लढवून दारू विकीतच असत. असा एकादा गुन्हेगार आढळला ह्मणजे त्याचें घर लुटण्यांत येई; व कोतवालाच्या घरापर्यंत त्याची मिरवणूक काढण्यांत येई; व नंतर त्यास कित्येक महिने प्रतिबंधांत ठेवून, शेवटीं दंड भरून व मार खाऊन त्याची तेथून मुक्तता होत असे।

भेटला; त्याच्याशीं गोड बोलून, आणि आपल्या गळ्यांतील मोत्यांचा हार त्याच्या गळ्यांत घालून, त्याला अशी कांहीं भुरळ पाडिली कीं, तो आपला पूर्वीचा सर्व बेत सोडून अवरंगझेबाच्या पक्षास वळला; त्याची आज्ञा उठविण्यास तयार झाला व अवरंगझेबानें त्यास लाहोर येथें सुभेदार नेमून तिकडील बंदोबस्त करण्यास पाठवून दिलें; ह्मणजे अवरंगझेबाची हिंमत, धाडस, शौर्य आणि धोरणी स्वभाव यांचें स्वरूप थोडक्यांत वर लिहिल्याप्रमाणें आहे. त्याच्या स्वभावांतील इतर वैशिष्ट्य पाहतां त्यानें पुष्कळवेळां अविचार व निर्दयपणाही केला आहे; तथापि खरेंसुद्धां वाटणार नाहीं इतका शांतपणा, आपला कदाचित् प्राणघात होईल अशा प्रसंगींही त्यानें स्वीकारिल्याचें उदाहरण आहे; " अकबराहून अवरंगझेब जास्त क्रूर होता, असा लोकांचा सामान्य समज आहे; परंतु बादशाही तरुन मिळविण्याच्या व धर्मसंस्थापना करण्याच्या मार्गांत जे जे प्रतिस्पर्धी पुढें आले, त्या त्या सर्वांचा अवरंगझेबानें साफ निकाल उडविला. ही बाबत बाजूस ठेविली ह्मणजे उगाच लहरीखातर त्यानें लोकांचे प्राण घेतल्याचें एकही उदाहरण घडलेलें नाहीं. उलटपक्षीं जरूरीहून कमीच शिक्षा तो देत असे; खाफीखान ह्मणतो:—" अवरंगझेब हा अपराधाच्या मानानें कमी शिक्षा देण्यांत अस्थानीं दया दाखवीत असल्यामुळेंच त्याच्या राज्यांत अव्यवस्था माजली. " बादशहा अवरंगझेब हा ज्या खोलींत निजत असे, तिच्याच खालच्या मजल्यांत एकदां चुकीनें नोकरांच्या हातून बंदुकांची दारू ठेविली गेली! ही गोष्ट अवरंगझेबास कळल्यावर तो शांतपणानें फक्त एवढेंच ह्मणाला कीं, " जर जहांगीरसमोर असा प्रकार घडला असता, तर त्याच दारूवर त्यानें तुह्मांस बसवून लागलींच उडवून दिलें असतें. "—ह्मणजे नोकराच्या एवढ्या भयंकर चुकीबद्दलही त्यानें फक्त " ह्मणण्या " पलीकडे कांहींही केलें नाहीं!—अकबराचा स्वभाव जात्याच क्रूर होता, तथापि सारासार विचारानें तो पुढें पुष्कळ नरम पडला. आपणास अप्रीय असलेल्या लोकांना आपल्या भेटीस बोलावून त्यांच्याकडून वीष घातलेले विडे खावविणें, गर्भाची वाढ तपासण्यासाठीं गर्भवति स्त्रियांचीं पोटें चिरणें, मुलांची उपजतबुद्धि पाहण्याकरितां त्यांना एकांतवासांत कोंडून कायमचीं मुकीं बनविणें, हे अकबराचे प्रकार शास्त्राच्या नांवाखालीं सुद्धां क्षम्य नाहींत; अकबर हा न्यायाच्या कामांत आपपर बिलकुल लक्षांत आणीत नाहीं;—सर्वांना सारख्याच रीतीनें वागवितो—असें अबुलफज्ल वारंवार लिहितो; पण प्रत्यक्ष त्याचाच खून जहांगीरनें केला, अशी अकबराची खात्री झाल्यावर त्यानें मुलास कोणती शिक्षा केली ? " ( Beveridges Articeles on Akbar; The Indian world, 1905-06 )—ह्मणजे कांहीं बाबतींत अवरंगझेब अकबराहूनही श्रेष्ठ होता, असें ह्मणतां येईल; पण त्याचा अगम्य व अति शहाणा स्वभाव त्याला ठिकठिकाणीं नडून, अखेरीस त्याचा आणि मोंगली साम्राज्याचा पूर्णपणें बोजवारा उडाला!

अवरंगझेब बादशहाची कारकीर्द, राजकीय बाबतींत ज्याप्रमाणें महत्त्वाची आहे, त्याप्रमाणेंच ती धार्मिक बाबतींतही आहे. त्यानें राजकीय वातावरणांत ज्याप्रमाणें मोठ्या जोराची खळबळ उडवून दिली, त्याप्रमाणेंच ती धार्मिक वातावरणांतही उडवून दिलेली आहे; राजकीयप्रमाणेंच धार्मिक वातावरणही क्षुब्ध होऊन त्यास धार्मिक शत्रूही उत्पन्न झाले आहेत, आणि राजकीयप्रमाणेंच, त्याच्या धार्मिक बाबतींतील आचरणाचा पूर्णपणें बोजवारा उडाला आहे। धर्मसंबंधीं दुराग्रहाचे हट्ट तडीस नेतांना, राज्य गेलें तरी हरकत नाहीं, कितीही त्रास झाला तरी फिकीर नाहीं, कितीही अडथळे आले तरी गुमान नाहीं; प्रत्यक्ष प्राण गेला तरी पर्वा नाहीं; इतक्या परमावधीस त्याच्या मनोवृत्ति गेलेल्या असल्यामुळें त्याला आपले हट्ट तडीस नेतांना, कोणत्याच बाबतींचा विचार करण्याचें मुळीं कारणच रहात नव्हतें; आणि तसा विचार त्यानें केलाही नाहीं; अवरंगझेब हा हिंदुधर्माचा द्वेष्टा होता, रजपुतांचा वैरी होता व उभयतांनाही नामशेष करण्याचा त्यानें अट्टाहास केला होता; तथापि त्याबरोबरच तो स्वजातीय पण भिन्नपंथीय लोकांचाही द्वेष्टा होता;—ह्मणजे स्वधर्मांतील मतमतांतरावरही त्याचा कटाक्ष होता व त्यांचाही—मराठे व रजपूत यांच्याप्रमाणेंच—समूळ उच्छेद करण्याच्या खटपटीस तो लागला होता हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

अवरंगझेबाची ही धार्मिक प्रवृत्ति, त्याच्या कावेबाज स्वभावाप्रमाणेंच तो गादीवर येण्यापूर्वीही दिसून आली होती. इ० सन १६६५ मध्यें मीरजुम्ला यानें गोवळकोंडें येथील शियाधर्मी कुतूबशाही राज्यावर स्वारी करण्याविषयीं त्यास कळविलें; तेव्हां त्या राज्याचा, व त्याबरोबरच शियाधर्माचा पाडाव करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यास अतीशय आनंद झाला; व त्यानें त्याच वर्षी तिकडे स्वारीही केली; परंतु शहाजहान यानें त्यास परत बोलाविल्यामुळेंच हें राज्य व तेथील राज्यकर्ता सुदैवानें त्यांच्या तडाक्यांतून यावेळीं बचावले; पुढें शहाजहान याच्या चारी मुलांत—दारा, सुजा, अवरंगझेब आणि मुराद या चार भावाभावांत—राज्यप्राप्तीकरितां सुरू झालेल्या यादवींतही शिया व सुनी या मतभेदाचें उग्र स्वरूप दृग्गोचर झालें. दाराच्या तर्फे सुजाशीं युद्ध करण्यास त्याचा वडील मुलगा सुलेमान यास त्यानें पाठविलें. या फौजेंत सुनी धर्मियांचा विशेष भरणा होता. उलटपक्षीं सुजा याच्या फौजेंत शियाधर्मियांचा विशेष भरणा होता. त्यामुळें सुजाच्या शियाधर्मीय लोकांशीं केव्हां एकदां आपण युद्ध करूं व त्यांचा नाश उडवूं, असें सुलेमानच्या सैन्यांतील सुनी धर्मीयास होऊन गेलें होतें; व त्याप्रमाणें त्यांनीं भयंकर चुरशीनें युद्ध करून व सुजा याचा—ता० १४ फेब्रुवारी इ० सन १६५८ रोजीं बनारस ऊर्फ काशी या शहरासमोरील बहादरपूर या गांवीं—पूर्णपणें पराभव करून त्यास बंगाल प्रांतांत पळवून लाविलें. इकडे अवरंगझेबानें सुजा व दारा विरुद्ध मूर्ख मुराद याला आपल्या पक्षाकडे वळवून

घेण्याचा उद्योग आरंभिला; त्यावेळीं त्यानें मुरादजवळ सुनीधर्माचीच महती वर्णन केली; "सुजा हा पाखंडी आहे; इराणचा शियाधर्म त्याला आवडतो; परंतु खऱ्या मुसलमानी-धर्माचा—म्हणजे अवरंगझेबाच्या मताप्रमाणें सुनीधर्माचा—अभिमान तुह्मास एकट्यासच काय तो आहे" असें त्यास कळवून राज्यप्राप्तीच्या ध्येयांतही त्यानें मोठ्या अभिमानानें आपल्या सुनीधर्माची थोरवी पुढें आणिलेली आहे! तथापि मतलबी अवरंगझेबाच्या जाळ्यांत मूर्ख व मतिहीन मुराद फसला जाऊन तो अवरंगझेबास मिळाला! त्यानंतर ते उभयतां दिल्लीवर चाल करून आले; आणि सुजाबरोबरील युद्धांत धार्मिक द्वेषाचा फायदा जसा दारा—सुलेमान यांस बहादरपूर येथें मिळाला, तसाच तो दाराविरुद्ध यावेळीं अवरंगझेब—मुराद यांना मिळाला. अवरंगझेब हा मुरादसह दिल्लीवर चाल करून येत आहे, असें दारा यास कळल्यावर त्यानें जसवंतसिंह यांस रजपूत सैन्याचें, आणि कासीमखान यास मुसलमानी सैन्याचें, आधिपत्य देऊन त्यांना अवरंगझेबावर पाठविलें; परंतु कासीमखानाचें मन अगोदर-पासूनच दाराविषयीं शुद्ध नव्हतें. शिवाय तो स्वतः सुनीधर्मीय असल्यामुळें, औरंगझेबा-बरोबरील सुनी सैन्याशीं युद्ध करण्यास उत्सुक नव्हता; इतकेंच नाहीं तर सुनी अवरंगझेबास आपण जाऊन मिळावें अशी त्याची अंतस्थ इच्छा होती. त्यामुळें अवरंगझेब हा मुरादसह मांडवगडाहून उज्जयनी येथें येत असतां त्यास कासीमखानानें जाणूनबुजून मार्गातील खिंडींत अडवून धरिलें नाहीं; त्यामुळें ते ती खिंड ओलांडून सहजरीत्या अलीकडे आले. त्यानंतरही पुन्हां त्यानें अवरंगझेबाच्या सैन्यास विश्रांती मिळून तें ताजेंतवानें होण्यास सवड दिली; व पुढें उज्जयनीच्या दक्षिणेस दहा मैलांवर धरमतपूर गांवाजवळ ता० १५ एप्रील इ० सन १६५८ रोजीं उभयतांच्या सैन्यामध्यें युद्ध सुरू झालें; त्यावेळीं, ऐन युद्धप्रसंगीं, कासीमखानानें माघार घेतली व एकट्या जसवंतसिंहाच्या रजपूत सैन्यावर युद्धाचा सर्व भार येऊन पडला, आणि त्याची स्थिति मोठी धोक्याची झाली. तथापि जसवंतसिंह व त्याचें रजपूत सैन्य, न डगमगतां त्यांनीं मोठ्या निकरानें युद्ध प्रसंग केला; त्यांत पुष्कळ रजपूत सैन्य, कटून मृत्यू पावलें; जसवंतसिंह मोठ्या धडाडीनें शत्रुसैन्याची फळी फोडून जोधपूरकडे निघून गेला; आणि अवरंगझेब विजयी होऊन व त्यास पुष्कळ युद्धसामुग्री व इतरही सामान मिळून त्याचा अतीशय फायदा झाला. पुढें अवरंगझेबानें आग्रा शहराच्या दक्षिणेस चंबळा नदीवरील सामूगड ऊर्फ फत्याबाद येथील युद्धांत, ता० २९ मे इ० सन

---

१ टीपः—फत्याबाद ऊर्फ फत्तेहबाद हें गांव व रेलवे-स्टेशन, राजपुताना माळवा रेलवेची खांडवा ते अजमीरपर्यंत जी लाईन गेली आहे, तिजवर इंदूर पलीकडे असून तें हल्लीं शिंद्यांच्या राज्यांत आहे; व येथून उज्जयनीपर्यंत चौदा मैलांचा एक रेलवेचा फांटा नेलेला आहे. अजमीर रस्त्यावर फत्याबाद पलीकडे जवळच चंबळा नदी असून तिजवर रेलवेचा पूल आहे व त्यावरून निमच, चितोडगडवरून अजमीरपर्यंत गाडी गेलेली आहे.

१६५८ रोजीं, दाराचा पराभव करून त्यास लाहोर येथें पळवून लाविल्यानंतर—आणि शहाजहानें बादशहास प्रतिबंधांत ठेवून व आपण मुराद यास ता० २३ जुलई इ० सन १६५८ रोजीं कैद करून आपण बादशहा बनल्यानंतर—फत्तेपूरच्या पश्चिमेस तीस मैलांवर कोजवा या गांवीं त्याचें सुजाबरोबर एक भयंकर रक्तपाताचें युद्ध झालें; आणि या युद्धास भीषण स्वरूप येण्याला व भयंकर प्राणहानि होण्याला, शिया व सुनी यां पक्षांमधील परस्परांत जागृत असलेला विशेष तीव्र वैरभाव, हाच मुख्यतः प्रमुखत्वानें कारणीभूत झाला!

त्यानंतर अवरंगझेब हा गादीवर आल्यावर तर शियाधर्माचा पाडाव करून सुनीधर्माचें प्राबल्य वाढविण्याचा त्यानें मोठ्या जोरानें खटाटोप सुरू केला. बादशहा हा जहांगीर याच्या कारकीर्दीत त्याच्या पदरीं थोडेसे युरोपियन नोकर असून त्याची स्वतःची बगी चालविणारा नोकरही युरोपियन होता. शहाजहानच्या कारकीर्दीत दारा कारभार पहात असतां मोंगलांच्या दरबारांत युरोपियन लोकांना विशेष महत्व प्राप्त झालें. इमारती कामावर व तोफखान्यावर त्यानें पुष्कळ युरोपियन लोकांच्या नेमणुका केल्या; आणि उत्तम तोफा, कसलेले युरोपियन गोलंदाज ठेवून आणि आपल्या सैन्यांतही युरोपियन लोकांचीच पुष्कळ भरती करून त्यानें बादशाही सैन्य व तोफखाना उत्तम व जय्यतस्थितींत ठेविला; पण त्याचा सर्व भरंवसा फक्त युरोपियन लोकांवरच काय तो होता; रजपूत अथवा मुसलमान या उभयतांवरही तो तिळमात्र सुद्धां, बहुतेक विश्वास ठेवीत नव्हता; आणि त्या उभयतांशींही तो पूर्ण बेपर्वाईनें वागत असून त्यांचीं मनें त्यानें दुखविलीं होतीं. त्याप्रमाणेंच अवरंगझेबाची सर्व भिस्त—विश्वास नव्हे—एकट्या सुनीपंथाच्या लोकांवर असून शिया मुसलमान, रजपूत व युरोपियन, या सर्वांविषयीं तो पूर्णपणें बेपर्वा होता; तथापि दारा व अवरंगझेब या उभयतांच्या स्वभावामध्यें असा एक महत्त्वाचा फरक आहे कीं, दारा हा निदान युरोपियन लोकांवर तरी विश्वास ठेवित होता; पण अवरंगझेबाच्या हृदयकोशांत "विश्वास" हा शब्दच नसल्यानें, जगांत त्याचा कोणावरही भरंवसा नव्हता; आणि मरेपर्यंत त्याचा अविश्वासी स्वभाव कायम होता; तथापि अविश्वासामुळेंच फक्त नव्हे, मनाच्या धार्मिक समाधानाकरितांही त्यानें आपल्या दरबारीं असलेल्या शूर व लढवय्या इराणी शियापंथी सरदारांच्या नेमणुका बंद केल्या व त्यांना काश्मीरकडे निघून जाणें भाग पाडिलें. त्याप्रमाणेंच दिल्ली, काश्मीर व काबूल येथेंही त्यानें आपल्या धर्माचा प्रसार करण्याची शिकस्त केली; पण त्यांत त्यास अखेरीस निराश होण्याचाच प्रसंग आला!

अवरंगझेबानें गादीवर येण्याकरितां अनेक अघोर कृत्यें केलीं; त्यामुळें तो गादीवर आल्यावर त्याच्यासंबंधीं जनतेचीं मनें अतीशय क्षुब्ध होऊन गेलीं. दिल्ली येथील काजीनें शहाजहान जिवंत असल्यानें अवरंगझेबास "बादशहा" असें कबूल करण्याचें,

व त्याच्या नावानें " खुत्बा " वाचण्याचें टाकून दिलें. त्याप्रमाणेंच त्यानें आपल्या वकिला-बरोबर मक्का येथील धर्माध्यक्षाकडे पुष्कळ संपत्ति व नजराणे पाठविले; परंतु त्यांनीही त्यांचा स्विकार न करितां; व त्यास " बादशहा " असें कबूल न करितां, त्याच्या वकिलास तसेंच परत पाठवून दिलें. इतकेंच नव्हे तर, " शहाजहानशिवाय हिंदुस्थानच्या दुसऱ्या बादशहास आपण ओळखीत नाहीं. " असें त्यानें यात्रेकरूंना जाहीर केलें. अशारीतीनें गादीवर आल्यानंतर लागलींच त्यास मानभंग व अपमान सहन करण्याचा प्रसंग आला. दिल्ली येथील काज़ीचें नुकसान करणें त्याच्या हातचें होतें; त्याप्रमाणें त्यानें दिल्लींतील सर्व मुल्लां मंडळीस बोलावून घेऊन त्यांच्यासमक्ष त्या काजीस कामावरून दूर करून दुसऱ्या काजीची त्याच्या जागीं नेमणूक केली; व इ० सन १६६० च्या आक्टोबर महिन्यापासून अवरंगझेबाच्या नांवानें खुत्बा वाचण्यास सुरवात झाली; परंतु या प्रसंगांतून तो निभावला तोंच त्याच्या सुनीपंथावरील प्रेमामुळें—अथवा शियाधर्मावरील उग्र स्वरूपाच्या कटाक्षामुळें—एका निराळ्याच दिशेनें त्याच्यावर आपत्ति कोसळण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. व तें संकट कसें टाळावें, या विवंचनेंत कांहीं काळ मग्न होण्याचा त्याच्यावर प्रसंग ओढवला!

औरंगझेबाचीं अघोर कृत्यें व शियाधर्माच्या बाबतींतील त्याची कठोर करणी, हीं इराणचा शियापंथी शहा दुसरा अब्बास यास बिलकूल पसंत न पडल्यामुळें त्यानें अवरंगझेबाकडे आपलें एक वकीलमंडळ पाठविलें; आणि त्यांच्या मार्फत " शहाजहान यास

---

१ टीपः—मुसलमानांत " मुल्ला " " काजी " हे दोन अधिकारी त्यांच्या वस्तीमध्यें असतात. मुल्ला या नांवाच्या अधिकाऱ्याकडे जनावरें मारण्याचें काम असतें. बकरीं, कोंबडीं वगैरे जनावरें झटक्यानें अथवा बुक्क्यांनीं कुंबलून मारणें गैर असल्यानें, शास्त्र-विधीनें व देवाचें नांव घेऊन जनावरांचा जीव घेणारा " मुल्ला " या नांवाचा एक स्वतंत्र अधिकारी नेमिलेला असतो; आणि मुल्लाच्या हातानें न मारिलेलें जनावर खाण्यास योग्य नसून तें अपवित्र म्हणजे " हराम " व " नापाक " असें समजलें जातें; व शास्त्रविधीनें व ईश्वराचें नांव घेऊन मुल्लानें मारिलेलें जनावर खाण्यास योग्य, म्हणजे " हलाल, " व " पाक " ( पवित्र किंवा शुद्ध ) मानण्यांत येतें.

२ " काजी " या नांवाच्या अधिकाऱ्याकडे, लग्नमुहूर्त लावणें किंवा तोडणें, सणवार वगैरेंचे शास्त्रार्थ सांगणें वगैरे धर्मसंबंधीं व न्यायाचीं कामें सोंपविलेलीं असतात.

३ मुसलमानांत जो राज्यकर्ता गादीवर असेल त्याच्या नांवानें त्याचें व त्याच्या कुटुंबाचें कल्याण व्हावें, म्हणून मशीदींत काजी प्रार्थना करितात, त्यास " खुत्बा " असें म्हणतात.

तावडतोब प्रतिबंधांतून मुक्त करावें, नाहीं तर आह्मी तुह्मांबरोबर युद्ध करण्यास तिकडे चाल करून येऊं " असें त्यास कळविलें; यावेळीं औरंगझेबाची राजकीय स्थिति विशेष धोक्याची झाली होती; शिवाय तो स्वतःही अतीशय आजारी असून, जगतो का मरतो, इतकी त्याची प्रकृति खालावलेली होती; त्यामुळें काश्मीरमध्यें हवाफेर करण्याकरितां जाणें त्यास अत्यावश्यक होतें व त्याचा तिकडे जाण्याचा विचारही होता; उलटपक्षीं, शहाजहान जिवंत असल्यामुळें, आणि रजपूत व शियाधर्मी सरदारांशीं त्यानें वैर संपादन केलें असल्यामुळें, ते शहाजहानच्या पक्षाचे होऊन, आपण काश्मीरमध्यें गेल्यास, पदभ्रष्ट होऊं, अशी त्यास भीति होती;—ह्मणजे " शहाजहानचें अस्तित्व " हीच त्यास मुख्य भीतीची विवंचना होती; ह्मणून त्यानें, या पाषाणहृदयी मनुष्यानें आपल्या असुरी धुंदीच्या उन्मादांत शहाजहान यासच जगांतून नष्ट करावें, असें ठरविलें ! आणि हा विचार त्यानें आपल्या मुलीस कळविला ! ! परंतु औरंगझेबाची ही घोर–महा घोर, महा दुष्ट, महा नीच, महा क्रूरकर्मी मसलत त्या मुलीस पसंत पडली नाहीं; व तिनें या कृत्यास प्रवर्तक होण्याचें साफ नाकारिलें; तेव्हां अवरंगझेबानें शहाजहानच्या वैद्यामार्फत, आपल्या बापाचा नाश करण्याकरितां वीष पाठविलें; परंतु तो वैद्य राजघराण्यांतील पुरातन व इमानी असल्यामुळें, शहाजहान यास विषप्रयोग करण्याची त्याची बिलकुल इच्छा नव्हती; पण इकडे अवरंगझेबास तसें स्पष्ट सांगून आपले धिंडवडे करून घेण्याचीही त्याची तयारी नव्हती; ह्मणून त्यानें स्वतःच तें वीष प्राशन करून घेऊन तो मरून गेला ! तेव्हां नाइलाजानें शहाजहान यास जिवंत ठेवूनच त्यास काश्मीरकडे जावें लागलें; तथापि तिकडे जातांना त्यानें आपणांबरोबर मोठी फौज घेतली; तेव्हां तिकडे शहा अब्बास यानेंही, अवरंगझेबाचा

---

१ टीपः—आपल्या बापाविरुद्ध फुटून निघून बंड करण्याचा सांप्रदाय सलीम ऊर्फ जहांगीर यानें प्रथम निर्माण केला व अकबराविरुद्ध त्यानें बंड केलें ! पुढें जहांगीरच्या विरुद्ध शहाजहान यानें बंड केलें; पण जहांगीरप्रमाणेंच त्याच्याही बंडाचा बोजवारा उडून त्यालाही आपल्या वडिलाची क्षमा मागावी लागली; शहाजहान जहांगीरला शरण गेला; तेव्हां, पुढें चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल दारा व औरंगझेब हे शहाजहानचे दोन मुलगे, जहांगीर यानें " ओलीस " ह्मणून आपणांजवळ लाहोर येथें ठेवून घेतले; ते तेथें राणी नूरजहान हिच्या ताब्यांत होते; पुढें जहांगीर वारल्यावर शहाजहान हा आग्रा येथें येऊन सिंहासनारूढ झाला; तेव्हां नूरजहानचा भाऊ आसफखान–याची मुलगी मुम्ताज–महल्ल ही शहाजहान याची बायको व दारा, औरंगझेब वगैरे चौदा मुलांची आई होती;–यानें, त्यांना आग्रा येथें आणून शहाजहानच्या स्वाधीन केलें; आणि हाच सांप्रदाय पुढें औरंगझेब व त्याच्या चिरंजिवांनींही चालू ठेविला ! !

कदाचित् आपल्या प्रदेशावर स्वारी करण्याचा विचार असेल असें समजून, कंदाहारच्या आसपास आपली फौज जमविली; परंतु अवरंगझेब हा स्वतः हिंदुस्थानांतच निरनिराळ्या भानगडींत गुरफटला गेला असल्यामुळें, शहाबरोबर आणखी एक नवी भानगड उपस्थित करण्याची त्याची इच्छा नव्हती; ह्मणून शहास खुष करून, तिकडील संकट टाळण्याकरितां आपल्या वकिलाबरोबर मौल्यवान् नजराणे देऊन त्यांना त्याच्याकडे पाठविलें; परंतु अवरंगझेबानें शिया धर्माविरुद्ध चालविलेल्या मोहिमेमुळें शहा अतीशय संतापून गेलेला होता; त्यामुळें त्यानें भरदरबारांत अवरंगझेबाच्या वकिलाचा एक शब्दही ऐकून न घेतां, त्याचा अतीशय अपमान केला; अवरंगझेबानें पाठविलेल्या नजराण्यांचा स्वतः स्वीकार न करितां त्यानें ते दरबारांतील मंडळीस वांटून दिले; अवरंगझेबाचा ढोंगीपणा व पितृद्रोह याबद्दल त्याची उघड उघड निर्भत्सना केली; आपल्या नाण्यावर "आलमगीर" (ह्मणजे जगज्जेता, किंवा जग जिंकणारा) हीं अक्षरें खोदविल्याबद्दल त्याची थट्टा उडविली; शेवटच्या भेटींत शहाच्या एका नौकरानें त्याच्या वकिलाच्या दाढीस आग लाविली; "हिंमत असेल तर काबूलकडे येऊन आमच्याबरोबर युद्ध करा;" असा सणसणीत निरोप त्या वकिलाबरोबर अवरंगझेबाकडे पाठवून शहानें त्यास परत जाण्यास रजा दिली; आणि मोठ्या धडाक्यानें आपल्या सैन्यासह तो अफगाणिस्थानांत येऊन दाखल झाला; तेव्हां अवरंगझेब मनांत तर अतीशयच घाबरला; परंतु तसें वर न दाखवितां उलट शहाकडून अपमान सोसून परत आलेल्या आपल्या वकिलावरच तो अतीशय संतापला; "तुह्मी शहाचा तेथल्या तेथेंच खून कां केला नाहीं?" असें ह्मणून त्यास सर्पदंश करवून तावडतोब ठार मारविलें; आणि बाह्यात्कारीं आपल्या फौजेची मोठी तयारी करून शहाशीं टक्कर देण्याचा त्यानें आविर्भाव आणिला; परंतु इतक्यांतच शहा अब्बास हा एकाएकीं आजारी पडून मृत्यु पावला; त्यामुळें सुदैवानें अनायासेंच या एका बलिष्ट व शूर शत्रूच्या भीतिपासून अवरंगझेब पूर्णपणें मुक्त झाला.

त्यानंतर शियाधर्मी अफगाण लोकांचा अवरंगझेबानें सारखा छळ आरंभिल्यामुळें त्यांनीं अफगाणिस्थानांत एक मोठें बंड उभारिलें; आणि तो बंडावा देशभर पसरून अवरंगझेबाची राजकीय परिस्थिती पुन्हां धोक्याची झाली; अफगाण लोक मोठे शूर, कडवे व कटून मरणारे, पण न हटणारे असल्यामुळें, त्यांच्याशीं युद्ध करून त्यांना नामशेष करणें ही गोष्ट आपल्या आटोक्याबाहेरची आहे, अशी अवरंगझेबाची खात्री झाली; तेव्हां त्यानें कपटनीतीचें अवलंबन केलें; कासमखान या नांवाच्या एका सरदारामार्फत त्यानें अफगाण सरदाराशीं वरपांगीं सख्य केलें; अफगाण लोकांवरील कर माफ करून व अशाच प्रकारच्या इतर कित्येक गोष्टी करून, त्यानें त्या लोकांमध्यें आपणाविषयीं विश्वास उत्पन्न केला व कपटजाल पसरून व त्यांत त्यांना अडकावून अवरंगझेबानें त्यांनीं त्यास दिलेल्या

त्रासाचा सूड पूर्णपणें उगवून घेतला; तथापि स्वतः आपण नामानिराळें राहून कासमखाना मार्फत त्यानें हें कृत्य करविलें; कासमखानानें अफगाणी लोकांचा विश्वास पूर्णपणें संपादन केल्यानंतर पेशावर येथें आपल्या वडील मुलाची सुंता करण्याचा एक मोठा समारंभ केला; व त्याप्रसंगीं बहुतेक सर्व लहानमोठ्या अफगाण सरदारांना त्यानें तेथें बोलावून घेतलें; नंतर एकेदिवशीं रात्रीं, मेजवानी चालू असतां, अगाऊ ठरविल्याप्रमाणें, फळ चिरतांना बोट कापल्याचें निमित्त करून कासमखान मेजवानींतून उठून बाहेर आला; आणि हीच इशारत समजून अफगाण लोकांची-एकदम कापाकापी सुरू झाली; या कत्तलींतून कोणीही जिवंत राहूं नये, असा कासमखानानें अगाऊच कडेकोट बंदोबस्त केला असल्यामुळें बहुतेक सर्व अफगाण सरदारमंडळी ठार मारिली गेली; आणि अफगाणी लोकांत सर्वत्र दुःख, उदासीनता व भीति यांची छाया पसरून ते निमूटपणें अवरंगझेबाच्या वर्चस्वाच्या आधीन झाले !

अफगाण लोकांच्या या कत्तलींत अवरंगझेबानें कोणत्याही प्रकारें प्रत्यक्षपणें भाग घेतला नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यानें कासमखानाच्या ह्या अघोर कृत्याबद्दल आपली पूर्ण-पणें नापसंती दाखवून व त्याच्यावर इतराजी करून त्यास परत बोलावून घेऊन, कामावरूनही दूर केलें, ही गोष्ट अगदीं सत्य आहे; आणि त्याच्या ह्या " सारवणी " वर्तनावरून या बाब-तींत अवरंगझेब पूर्णपणें निर्दोषी आहे, असें वाटण्याचा संभव आहे; परंतु एकंदर परिस्थिति लक्षांत घेतां तोच या घोर कृत्यास मूळ, अंतस्थ रीतीनें कारणीभूत असावा, असेंच ह्मणणें सयुक्तिक दिसत आहे. कारण अवरंगझेबाचा आपल्या ठिकठिकाणच्या सर्व स्थानिक अधि-कान्यांवर व प्रांतिक सुभेदार–सरदार वगैरे मंडळीवर किती विलक्षण दरारा होता,—कारण त्याची व्यवस्था, शिस्त व अंमलबजावणी अतीशय कठोर होती;—हें लक्षांत घेतां कासम-खानानें औरंगझेबाचा अगाऊ विचार घेतल्याशिवाय हें कृत्य केलें असेल असें बिलकूल संभवत नाहीं; अवरंगझेब हा हुकुमांची व नियमांची अंमलबजावणी अत्यंत कसोशीनें करीत असे; नियम अथवा हुकूम मोडणारांची, मग तो कोणीही मोठा अथवा त्याच्या प्रेमांतील असो, तो कधींही उपेक्षा करीत नसे; " एक नियम मोडूं दिला कीं लागलींच लोक सर्वच नियम मोडूं लागतात; " असें तो ह्मणत असे; त्याच्या स्वदस्तूरच्या हुकुमाशिवाय राज्यभर काडीसुद्धां हालत नसे; परगण्यांतील एखाद्या लहानशा अंमलदाराची अथवा कारकुनाची नेमणूक–निवड, हीं कामें सुद्धां तो स्वतःच करीत असे; आणि आपले कामगार कसा कार-भार चालवितात, याचा नेहमीं तो पूर्ण तपास ठेवीत असे; ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतल्या ह्मणजे, एवढें मोठें अघोर कृत्य, औरंगझेबाच्या संमती व परवानगीशिवाय करण्याची कासम-खानास कधींही हिम्मत झाली असेल, असें बिलकूल ह्मणवत नाहीं; शिवाय अवरंगझेबाचा

स्वभाव लक्षांत घेतां, एवढें अघोर कृत्य त्याच्या संमतीशिवाय कासमखानानें केलें असतें तर अवरंगझेबानें त्यास " फक्त कामावरून काढून टाकणें " एवढीच क्षुल्लक शिक्षा करून जिवंत ठेविलें असतें, हेंही संभवत नाहीं; आणि ज्या अर्थी त्याला पुन्हां लवकरच अवरंगझेबानें " कामावर रुजू करून घेतलें, " इतकेंच नव्हे तर त्याला " पहिल्याप्रतीचे मानमरातब दिले, " त्या अर्थी तर हें कृत्य कासमखानानें अवरंगझेबाच्या विचारानें, सल्ल्यानें व आज्ञेनेंच केलें असलें पाहिजे, असें स्पष्ट ह्मणण्यास—ह्या प्रत्यक्ष व प्रत्यंतरी आधार व पुराव्यामुळें—कोणताच प्रत्यवाय शिल्लक रहात नाहीं.

हिंदुस्थानांत मोंगली राज्याची स्थापना करणारा बादशहा बाबर यानें मेवाडाधिपती राणा संग याच्यावर जय मिळविल्यानंतर या जयाचें द्योतक असें " गाजी " हें नांव त्यानें धारण केलें होतें; व हा किताब शेवटपर्यंत त्याच्या वंशजांकडे—ह्मणजे वंशांतील राज्यकर्त्यांकडे चालू असून त्यांच्या सनदांत, शिक्क्यावर व नाण्यांवर हें नांव अखेरपर्यंत वापरण्यांत येत असे. राणा संगबरोबरील युद्धांत मुसलमानांनीं वीरश्री व विजयश्रीनें उन्मत्त होऊन, रणांगणांत सांपडलेल्या रजपुतांचीं शिरें कापून त्यांचे ढीग रचिले; व बाबर " गाजी ' झाला. पुढें अकबर व अहमदशहा आदिली आणि हिमू, यांच्यामध्यें युद्ध होऊन, त्यांत हिमू अकबराच्या हातीं जिवंत सांपडला; तेव्हां, या " काफरास " स्वहस्तानें ठार मारून " गाजी " हें नांव मिळवावें, असा बहूरामखानानें अकबरास पुष्कळ आग्रह केला; परंतु पतित व पाडाव शत्रूस ठार मारण्याचें अकबराच्या जिवावर आलें; त्याच्या डोळ्यांत आंसवें आलीं; व तसें करण्याला त्याचें मन मागें घेऊं लागलें; हें पाहून बहूरामखानानें लागलींच पुढें येऊन आपल्या हातानें हिमूचा शिरच्छेद केला; तथापि पुढें चितोड येथें अकबरानें पुष्कळ मानवहानी करून " गाजी " हें नांव मिळविलें; तरी सुद्धां बाबर, अकबर वगैरे राज्यकर्ते आणि औरंगझेब यांची तुलना केली तर " गाजी " या शब्दाच्या खऱ्या अर्थानें सर्व बादशहांत अवरंगझेब हा एकटाच " गाजी " या यथार्थ पदवीचा बादशहा झाला. प्रत्यक्ष भावांच्या बाबतींतही तो गाजी होता; " दारा मुसलमानी धर्मविरुद्ध वागतो; " " सुजा पाखंडी आहे; " " मुराद मद्यपि आहे; " असें त्यानें त्यांच्यावर आरोप ठेवून

---

टीपः—" काफर " " गिजा " व " गाजी " हे आरबी भाषेंतील शब्द आहेत; व काफर ह्मणजे कुराणोक्त धर्म न मानणारे, गिजा ह्मणजे कुराणोक्त धर्म न मानणाऱ्या लोकांचें, ह्मणजे काफरांचें पारिपत्य आणि गाजी ह्मणजे गिजा अथवा काफर लोकांचें पारिपत्य करणारा, असे त्यांचे अर्थ आहेत. मुसलमानांनीं केलेल्या धर्मयुद्धांना " जीहाद " व लढाईत जे काफर मारितात त्यास " वाजबुल कत्तल " ह्मणजे वध्य, वधार्ह किंवा वध करण्यास योग्य असें ह्मणतात.

त्यांचा निकाल उडविला; पण " गाजी " या शब्दाचा " यशस्वी " असाही एक अर्थ असून, त्याप्रमाणें ह्मणावयाचें ह्मणजे त्याची कारकीर्द यशस्वीपणाची झाली नाहीं, आणि प्रत्येक बाबतींत अतिरेक होऊन त्यानें राज्यनाशाची पूर्वतयारी करून ठेविली, असेंच ह्मणणें प्राप्त होतें; कारण अवरंगझेबाच्या मृत्यूनंतर लवकरच मोंगल साम्राज्याचे तुकडे पडले; आणि वास्तवीकरीत्या आपल्या हातांतील बाहुल्याप्रमाणें नाचवितां येण्याइतपत निःसत्व, निर्बल व नामधारी बनलेल्या बादशहाला योग्य मानमरातब देण्याचें बेगडी प्रदर्शन करून व " फिद्वी–बादशाहे–गाजी " असे शिक्के करून अनेक सरदारांनीं आपआपलीं स्वतंत्र राज्यें निर्माण केलीं; आणि सरतेशेवटीं नष्ट ऐश्वर्याच्या अवशिष्ट वैभवांत अस्तित्वांत असलेलें मोंगलसाम्राज्यही नष्ट होऊन गेलें. !!

हिंदुस्थानावर इ० सन १७३८–३९ या वर्षी स्वारी करणारा प्रसिद्ध धाडसी, शूर पण तितकाच निर्दय सेनानायक नादीर कुली ऊर्फ नादीरशहा हा अवरंगझेबाप्रमाणेंच शियापंथाचा कट्टा शत्रु होता. त्यानें इ० सन १७३६ मध्यें इराणचा शहा तहमास्प यास पदभ्रष्ट करून, पूर्णपणें शियापंथीं असलेलें इराणचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें; व तेथील बहुतेक लोकांना त्यानें सक्तीनें सुनीपंथाचा स्वीकार करण्यास भाग पाडिलें; शिवाय तो इतका क्रूर होता कीं, शियापंथी इराणी लोकांशीं तर अतीशय कठोरपणानें वागून, त्यानें त्यांची " ना धनी, ना त्राता, " अशी भणंग स्थिति तर करून सोडिली होतीच; पण प्रत्यक्ष आपल्या एका शूर मुलाचेच डोळे काढवून त्यास जन्मांध व मृतवत् स्थितींत आणून

---

१ टीपः—" फिद्वी–बादशाहे–गाजी " याचा अर्थ खालीलप्रमाणें आहे; तोः–फिद्वी ह्मणजे गुलाम किंवा बंदा नौकर; बादशहा ह्मणजे राजा, आणि गाजी ह्मणजे यशस्वी; ह्मणजे यशस्वी राजाचा गुलाम; या बाबतींत लोकहितवादीच्या शब्दांत ह्मणावयाचें ह्मणजे, दिल्लीचे जे सरदार पुढें स्वतंत्र राजे व नबाब झाले, त्यांनीं जे शिक्के केले होते, त्यांजवर वरील अक्षरें कोरलीं होतीं; व त्यांवरून ते, " आह्मी दिल्लीच्या बादशहाच्या हुकुमानें त्याचे नौकर ह्मणून आपआपलीं राज्यें करितों, " असें दर्शवीत होते; परंतु हा केवळ बाहेरचा देखावा होता. मराठी राज्याचे तुकडे होऊन जीं निरनिराळीं राज्यें निर्माण झालीं, त्यांतही पहिल्यानें, " शाहू चरणीं तत्पर " असा शिक्काच चोहोंकडे वापरीत असत; परंतु ही तत्परता शिक्क्यांतच काय ती राहिली होती. पहिल्यानें ती तत्परता सर्वांनीं आपल्या कृतींत दाखविली; परंतु पुढें त्या तत्परतेचें केवळ ढोंग होऊन, ती शब्दशेष मात्र झाली ! सातारा, कोल्हापूर, वगैरे लुटून आणावीं; आणि " शाहूचरणीं तत्पर " हे शिक्के वापरावे ! ह्मणजे त्या शिक्क्यांत किती सद्धेतू होता, तो उघड दिसतो ! हीच अवस्था दिल्लीच्या बादशाहीची झाली होती ! !

टाकिलें होतें! अखेरीस त्याच्या या दुष्ट स्वभावास सर्वच लोक कंटाळले; आणि एका अफगाण सरदारानें त्याचा इ० सन १७४७ मध्यें खून केला; त्यामुळें इराणमधील लोक त्याच्या त्रासांतून व शिया धर्माविरुद्धच्या त्याच्या छळांतून कायमचे मुक्त झाले.

औंधच्या उत्तरेकडील सरहद्दीवर हिमालय पर्वताची ओळ, गंगा नदीचा वरील भाग, यांच्या कोनांत "रोहिलखंड" या नांवाचा एक मोठा सुपीक व महत्वाचा प्रदेश असून तो पूर्वी अफगाणिस्थानांतील सुनींपंथाच्या "अफगाण" किंवा "रोहिले" लोकांच्या ताब्यांत होता. या रोहिले लोकांनीं मोंगल बादशहा जहीरुद्दीन महंमद बाबर यास त्याच्या राज्यसंस्थापनेंत व वृद्धींत मदत केल्यामुळें त्यानें तो त्यांनां तोडून दिला होता; पुढें बादशहा महंमदशहा याच्या कारकीर्दीत इ० सन १७४४ मध्यें ते स्वतंत्र झाले. या रोहिलखंडाच्या राज्यास लागूनच औंधचें राज्य होतें; व तेथील राज्यकर्ता "वजीर" शियापंथी होता; त्यामुळें रोहिले व वजीर या उभयतांमध्यें नेहमींचेंच वांकडें असून सतत युद्धकलह व निरनिराळ्या भानगडी उपस्थित होत असत; पुढें औंधच्या वजिरानें (सफ्तरजंग) शिंदे, होळकर व भरतपूरकर, सुरजमल्ल जाट यांची मदत घेऊन रोहिल्यांचा पुष्कळ नाश केला; आणि पुढील काळांत, इ० सन १७७४ मध्यें, औंधचा वजीर-ऊर्फ नवाब-सुजाउद्दौला व इंग्रज या उभयतांनीं मिळून रोहिले लोकांवर स्वारी केली; त्यावेळीं रोहिले लोकही या दोस्त सैन्याबरोबर मोठ्या शौर्यानें लढले; परंतु अखेरीस रोहिले लोकांचा पूर्ण पराभव होऊन, त्यांचा सरदार हाफीज रहिमतखान हा मारला गेला; व रोहिलखंडांतील अफगाण सरदार मंडळाची अल्पायुषी सत्ता पूर्णपणें नष्ट होऊन गेली.

# परिच्छेद दुसरा.

## दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांतील धार्मिक मतभेद
## आणि
## त्याचे सर्वसाधारण राजकीय परिणाम.

बहामनी राज्यांतील व त्याच्या पुढील काळांत बनलेल्या पांची शाखांतील, आणि प्रारंभीं दक्षिणेंत आलेल्या मुसलमानांतील बहुतेक सर्व सुनीपंथाचे होते; परंतु दक्षिणेंतील सर्व मुसलमानी राज्यांतील सैन्यांत, बादशाही सैन्यांत, आणि इराण वगैरे देशांतून हिंदुस्थानांत येऊन उत्तरेस मोंगली राज्यांत व दक्षिणेस तिकडील सर्व मुसलमानी राज्यांत वास्तव्य करून राहिलेल्या मंडळींत, बहुतेक सर्व मुसलमान शियापंथाचे होते; आणि दक्षिणेंतील सुनीपंथाच्या लोकांस ज्याप्रमाणें बहामनी राज्याच्या काळापासून "दक्षिणी" हें नांव मिळालेलें होतें, त्याप्रमाणेंच शिया वगैरे पंथाच्या इतर परदेशीय मंडळीस "परदेशी" हें नाव मिळालेलें होतें. बहामनी राज्यांत इराणी, मोंगल, तुर्की व हबशी वगैरे परदेशी लोकांचा अतीशय भरणा होता; त्यामुळें त्या राज्यांत पक्षभेद उत्पन्न होऊन सतत चुरशीचीं भांडणें व कटकटी सुरू असत; आणि शियापंथाचे मोंगल लोक सुनीपंथाच्या अफगाण लोकांचा अतीशय द्वेष करीत असत; त्यामुळें जरी मोंगल लोक प्रसंग पडेल त्याप्रमाणें सुनीपंथ स्वीकारीत असत तरी सुद्धां-हिंदू व मराठे लोकांचें साह्य घेऊन ते सुनीपंथाच्याच अफगाण लोकांचा पाडाव करण्यास नेहमीं तत्पर असत; उलटपक्षीं अफगाण लोक हे सुनीपंथाचे कट्टे अभिमानी असून ते हिंदू व हिंदूधर्म यांचा अतीशय द्वेष करीत असत; त्यामुळें त्यांना हिंदू लोकांकडून मदत न मिळतां, ती त्यांच्या प्रतिस्पर्धी मोंगल लोकांस मिळत असे; त्यामुळें आणि त्यांच्यांतील अनेक पोटजातीमध्यें आपसांतही नेहमीं द्वेषभाव, मतभेद आणि प्रखर शत्रुत्व, वास करीत राहिल्यामुळें त्यांचीं अनेक राजघराणीं अल्पावकाशांतच नामशेष होऊन गेलीं; याच घोंटाळ्याच्या राजकीय परिस्थितीमुळें हिंदू लोक राजकीय रंगभूमीवर, मुसलमानांच्या राज्यांत सुद्धां, प्रमुखत्वानें पुढें आले. त्यामुळेंच मुसलमान लोकांना आपल्या मुसलमान प्रतिस्पर्ध्यांसच नामशेष करण्याकरितां हिंदू लोकांची मदत घेणें आवश्यक झालें; याच कारणामुळें कर्तृत्ववान् हिंदू मंडळी राजकीय रंगभूमीवर पुढें आली. याच कारणामुळें हिंदू लोकांना आपलें राजकीय महत्त्व स्थापन करण्यास संधी प्राप्त झाली; याच कारणामुळें, प्राप्त झालेल्या संधीचा योग्य फायदा घेऊन, आपलें महत्त्व स्थापन केल्यानंतर, हिंदू लोकांना ते वाढवीत नेऊन वर्चस्वप्राप्ती करून घेण्याचा सुयोग उत्पन्न झाला;—आणि इतर अनेक कारणां-

प्रमाणेंच याही एक प्रमुख कारणामुळेंच मुसलमानी राज्यांत पुष्कळ मराठे सरदार उदयास येऊन, त्या त्या राज्याच्या विशिष्ट व प्रधान आधारभूत मंडळाच्या मालिकेंत त्यांना अग्रस्थान प्राप्त झालें.

बहामनी राज्यांत दक्षिणी व परदेशी यांच्यामध्यें अपसांत मोठी तीव्र स्पर्धा असून अल्लाउद्दीन शहाच्या कारकीर्दीत (इ० सन १४३५ ते इ० सन १४५७) ती परमावधीस गेली; इ० सन १४३६ मध्यें शहानें आपला सरदार दिलावरखान याजबरोबर एक मोठें सैन्य देऊन त्यास कोंकणपट्टी सर करण्याकरितां तिकडे पाठविलें; त्याप्रमाणें त्यानें तिकडे जाऊन रायरी व सोनखेड येथील राजांचा पराभव केला; शहास नियमीतपणें खंडणी पाठविण्याचें, त्यांच्याकडून कबूल करून घेतलें; आणि परत येतांना सोनखेड येथील राजाची सुंदर व गाननिपुण मुलगी शहाकरितां त्यानें नजर आणिली. त्या मुलीवर शहा अतीशय लुब्ध झाला; त्यानें तिला "परी-चेहरा" हें नांव दिलें; व तिच्या-शिवाय त्याला क्षणभरही करमेनासें झालें, त्यामुळें अल्लाउद्दीनशहा याची राणी व खानदेशचा सुलतान मलिक नासीरखान याची मुलगी, मलिक जहान हिला अतीशय वैषम्य वाटूं लागलें; व तिनें यासंबंधीं आपल्या वडिलांकडे गाऱ्हाणें केलें; तेव्हां अल्लाउद्दीन शहाबरोबर युद्ध करण्यास ही योग्य संधी मिळाली आहे, असें पाहून, त्यानें गुजराथचा सुलतान अहंमदशहा यास आपल्या पक्षास मिळवून घेऊन, वऱ्हाडप्रांत हस्तगत करण्याचा विचार केला; आणि त्या प्रांतांतील दक्षिणी सरदारांकडून आपणांस येऊन मिळण्याविषयीं अभिवचन मिळवून,—आणि गोंडवाडा येथील राज्यकर्त्यांची मदत घेऊन—तो वऱ्हाड प्रांतावर चाल करून गेला; तथापि अशा आणिबाणीच्या प्रसंगीं न डगमगतां, अल्लाउद्दीनशहा यानें दौलताबाद[1] येथील शूर सुभेदार मलिक-उत-तुजार, यास नासीरखानावर पाठविण्याचें ठरवून, त्याप्रमाणें तुजार यास हुकूम दिला; परंतु दक्षिणी व परदेशी लोकाचें आपसांत भयंकर हाडवैर असल्यानें दक्षिणी लोकांस परदेशी लोकांचें—आणि त्याप्रमाणेंच परदेशी लोकांस दक्षिणी लोकांचें महत्व, अथवा वर्चस्व बिलकूल सहन होत नव्हतें; व त्यामुळें ते परस्परांचा पाडाव करण्याकरितां प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें सारख्या निरनिराळ्या खटपटी, कारस्थानें व भानगडी करीत होते; व दक्षिणी लोकांच्या कुचराईमुळेंच तुजार याचा पूर्वीं माहीम येथें पराभव झाला होता; ह्मणून त्यानंतरच्या अनेक मोहिमांत त्यानें दक्षिणी लोकांची बिलकूल मदत घेतली नव्हती; त्यामुळें शहानें त्यास नासीरखानावर चाल करून जाण्याचा हुकूम

१ टीपः—दौलताबाद हा गांव आणि किल्ला, निजामाच्या राज्यांत औरंगाबादे-पासून १० व हैद्राबादेपासून २८ मैलांवर वायव्येस आहे; यास "देवगिरी" हेंही नांव असून याच ठिकाणीं जाधवांची राजधानी होती.

दिला त्यावेळीं तुजार यानें, " यावेळीं फक्त परदेशी सैन्य माझ्याबरोबर द्यावें, " अशी अल्लाउद्दीनशहा यास नम्रपणानें विनंती केली. त्याप्रमाणें शहानें त्याच्याबरोबर फक्त परदेशी सैन्य दिलें; हें सैन्य घेऊन तुजार नासीरखानावर चाल करून गेला; त्याचा पूर्ण पराजय केला; आणि पुष्कळ लूट मिळवून तो यशस्वीपणानें परत येऊन शहास भेटला; त्यावेळीं शहानें " यापुढें दरबारांत पहिला मान दक्षिणी लोकांस न मिळतां परदेशी लोकांस मिळावा " असें फर्माविलें; त्यामुळें दक्षिणी व परदेशी लोकांमधील चालत आलेल्या हाडवैराला जोराचें चालन मिळालें व पुढें त्याचे परिणाम अत्यंत अनिष्ट होऊन ते अखेरीस बहामनी राज्यासही खडतरपणें भोगावे लागले.

विजयानगर येथील देवरायाविरुद्ध विजय मिळविल्यानंतर लवकरच अल्लाउद्दीनशहा अतीशय विषयासक्त झाला; त्यानें आपली राज्यव्यवस्था प्रधानमंडळाकडे सोंपविली आणि मनोहर स्त्रिया व मौल्यवान मद्यें यांतच तो रात्रंदिवस मषगुल होऊन राहिला; यावेळीं शहाचा वजीर मियामन–उल्ला दक्षिणी यानें कोंकणपट्टींतील समुद्रकिनाऱ्यावरील सर्व किल्ले हस्तगत करून घेण्याचा विचार केला; व शहाच्या अनुमतीनें त्यानें या कामगिरीवर तुजार याचीच नेमणूक केली; व त्याच्याबरोबर परदेशी सैन्यासह दक्षिणी, हबशी वगैरे सैन्यही रवाना केलें; व यावेळीं तुजार यास काय भुरळ पडली कोण जाणे, पण तो परदेशी लोकांशिवायचें इतर सैन्य–विशेषतः दक्षिणी सैन्यही–बरोबर घेऊन या मोहिमेवर गेला. त्यानंतर तुजार यानें पहिल्यानें चाकणचा[१] किल्ला आपल्या हस्तगत करून घेऊन तेथें आपलें मुख्य ठाणें ठेविलें; आणि तेथून कोंकणांत सैन्याच्या तुकड्या पाठवून तिकडील कित्येक राज्यकर्त्यांना त्यानें शहाच्या अंकित होणें भाग पाडिलें; नंतर तो स्वतः कोंकणांत गेला; आणि तिकडील " शिर्के " या नांवाच्या मराठा राजास त्यानें जिंकिलें; व त्यास आपल्या स्वाधीन होणें भाग पाडिलें. त्यावेळीं तुजार यानें शिर्क्यांस असा आग्रह केला कीं, " तूं मुसलमानी धर्माचा स्वीकार कर; नाहीं तर तुला ठार मारीन. " त्यावेळीं मोठ्या धूर्त व नम्रपणानें तुजार यास अशी विनंती केली कीं, " येथून जवळच-संगमेश्वरच्या दक्षिण बाजुस, खेळणा ऊर्फ विशाळगड[२] या नांवाचा एक

१ टीपः—चाकण हे गांव व किल्ला, पुणें जिल्ह्यांत, खेड तालुक्यांत, खेडपासून ६ मैलांवर असून येथील किल्ला पूर्वकाळीं विशेष महत्वाचा म्हणून गणला गेला होता.
२ विशाळगड हें संस्थान कोल्हापूरकर छत्रपतींचें मांडलीक असून तेथील संस्थानिकांस " पंतप्रतिनिधी " असा किताब आहे विशाळगड ही या राज्याची पूर्वीची राजधानी असून मलकापूर ही हल्लींची राजधानी आहे. विशाळगड हें ठिकाण मलकापूरपासून अजमासें ३६ मैलांवर असून मलकापूर हें कोल्हापूरपासून पश्चिमेस २८ मैलांवर शाळी नदीच्या कांठीं आहे;

किल्ला असून तो व त्याच्या आसपासचा प्रदेश, यांवर शंकरराय या नांवाचा एक राजा राज्य करीत असून तो माझा शत्रू आहे; त्यामुळें मी जर मुसलमानी धर्म स्विकारिला तर तुह्मी व तुमचें मुसलमानी सैन्य परत गेल्यावर तो माझा नाश करील; ह्मणून आपण दोघे मिळून त्यास पहिल्यानें मुसलमान करूं; व नंतर मीही तो धर्म स्वीकारीन.'' त्यावर खेळणा प्रांतांतील रस्ता,—ह्मणजे राजापूर व संगमेश्वर यांच्यामधील कोल्हापूरच्या पश्चिमेकडील घांटमाथ्याचा रस्ता अरण्यमय व अवघड आहे, अशी तुजार यानें हरकत दाखविली; तेव्हां शिर्क्यानें, "मी आपणास चांगला मार्ग दाखवून त्या ठिकाणीं सुरक्षितपणें नेतों" असें कबूल केलें; तेव्हां तुजार यानें खेळणा प्रांतावर स्वारी करण्याचा निश्चय करून तसा त्यानें आपल्या सैन्यास हुकूमही दिला; परंतु यावेळीं त्याच्याबरोबर दक्षिणी सैन्याचाच विशेष भरणा असून, त्यांनीं खेळणा प्रांतांतील अवघड प्रदेशांत तुजारबरोबर जाण्याचें साफ नाकारिलें; आणि त्यामुळेंच परदेशी लोकांवर भयंकर आपत्ती कोसळून त्यांचा अतिशय संहार उडाला.

शिर्क्यानें तुजार यास कबूल केल्याप्रमाणें, आपला त्याला पूर्ण विश्वास पटावा ह्मणून, पहिले दोन दिवस त्याचें सैन्य चांगल्या रस्त्यानें नेलें; व त्यावरून तुजारनें त्याची तारीफही केली; परंतु त्यानंतर, तिसऱ्या दिवसापासून, शिर्क्यानें आपला वर्तनक्रम साफ बदलला; त्यामुळें तुजार याच्या सैन्यास अत्यंत अवघड व असुरक्षित मार्ग—ज्या ठिकाणीं सूर्यदर्शनही होत नाहीं, अशा निबिड अरण्यांतील, वाईट व एकच असलेला पहाडी अवघड मार्ग—त्या सैन्यास आक्रमावा लागला; त्यामुळें तुजार व त्याचें सैन्य अतिशय थकून व त्रासून गेलें; आणि तिकडील हवाही अतिशय रोगट असल्यामुळें त्याचें पुष्कळ सैन्य, व तो स्वतःही आजारी पडला; अशा स्थितींत शिर्क्यानें स्वतः जाऊन शंकरराय यास ही बातमी दिली; त्याला मोठ्या सैन्यानिशीं बरोबर घेऊन तो तुजारवर चाल करून आला; आणि मध्यरात्रीं त्याचें सैन्य व तो स्वतः बेसावध व कष्टमय स्थितींत विश्रांती घेत पडला असतां त्यांच्यावर चोहोंकडून छापा घालून, त्याच्या बहुतेक सर्व सैन्याची कत्तल उडविली; यावेळीं अजमासें सात हजार मुसलमानी सैन्य मारलें जाऊन शिवाय त्यांचा शूर सरदार व सेनानायक मलिक्-उत्-तुजार हाही मारला गेला; अशारीतीनें या मुसलमानी सैन्याचा संहार उडाल्यानंतर शिर्के पुन्हां पूर्वीप्रमाणें आपल्या प्रदेशावर राज्य करूं लागला; परंतु पुढें सोळाच वर्षांनीं—इ० सन १४६९ मध्यें—मुसलमानांनीं पुन्हां त्या

---

आणि संगमेश्वर हें छत्रपति संभाजी महाराजामुळें विशेष प्रसिद्धीस आलेलें गांव, रत्नागिरी जिल्ह्यांत त्याच नांवाच्या एका तालुक्याचें ठिकाण—शास्त्री नदीच्या कांठीं, समुद्रकिनाऱ्यापासून अजमासें वीस मैलांवर आहे.

प्रदेशावर स्वारी केली; आणि शिर्के व शंकरराय, या उभयतांचीं राज्यें नामशेष करून तिकडे आपला अंमल बसविला.

वरील कत्तलींतून थोडेसे लोक मोठ्या कष्टानें बचावून परत येऊन त्यांनीं चाकणच्या किल्ल्याचा आश्रय घेतला; दक्षिणी लोकांच्या विश्वासघातामुळेंच परदेशी लोकांवर हा भयंकर प्रसंग कोसळला असल्यामुळें, परदेशी सय्यद मंडळींनीं, " ही सर्व हकीकत आम्ही शहास कळवितों; " अशी दक्षिणी लोकांस धमकी दिली; त्यावेळीं आपलें कारस्थान बाहेर फुटेल, या भीतीनें दक्षिणी लोकांनीं अगोदरच या परदेशी लोकांविरुद्ध शहाकडे मलभलत्या हकीकती लिहून पाठविल्या; व दरबारांतील शीर-उल्-मुल्क् दक्षिणी व इमाद्-उल्-मुल्क् घोरी, याचा मुलगा निजाम-उल्-मुल्क् यांनीं त्या शहास फुगवून सांगून त्याचें मन परदेशी लोकांविषयीं पूर्णपणें कलुषित करून टाकिलें; त्यामुळें शहास अत्यंत राग आला; आणि त्यानें सर्व परदेशी लोकांस पकडून ठार मारण्याबद्दल हुकूम दिला; त्याप्रमाणें दक्षिणी सरदार मंडळी आपल्या मोठ्या सैन्यानिशीं चाकणवर चाल करून गेली; इकडे ही सर्व हकीकत परदेशी लोकांस कळल्यावर, आपण पूर्णपणें निरपराधी असल्याची व एकंदर खऱ्या हकीकतीचीं पत्रें, त्यांनीं शहाकडे रवाना केलीं, परंतु दक्षिणी लोकांनीं तीं मधल्यामधेंच दाबून टाकिलीं; आपल्या सैन्यासह चाकणच्या किल्ल्यास वेढा देऊन, त्यांत परदेशी लोकांस कोंडून टाकिलें; आणि परदेशी लोकांनीं, मरेपर्यंत किल्ला लढविण्याचा निश्चय केल्याचें दक्षिणी सरदार शीर-उल्-मुल्क् यास कळल्यावर त्यानें कोंकणच्या स्वारीवरून आपल्या दक्षिणी सैन्यास बोलावून घेऊन वेढा दिलेल्या सैन्यास किल्ला हस्तगत करून घेण्यास मदत केली; परंतु परदेशी लोक निर्वाणीनें लढत असल्यामुळें त्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं. पुढें किल्ल्यांतील धान्यसामुग्री संपत आल्याचें पाहून परदेशी सरदार मंडळींनीं आपल्या बायकामंडळींच्या संरक्षणार्थ कांहीं इसम किल्ल्यांत ठेवून " शत्रूवर निकरानें तुटून पडावें; व त्यांची फळी फोडून, थेट शहास जाऊन भेटून, सर्व खरी हकीकत त्यास कळवावी. " असा मनसुबा केला; ही हकीकत दक्षिणी मंडळीस कळल्यावर त्यांना अतिशय भीति उत्पन्न झाली; व या परदेशी मंडळींना नामशेष करण्याकरितां त्यांनीं एक निराळेंच कपटजाल पसरिलें. " तुमच्या अपराधाची क्षमा करण्याविषयीं, आम्ही दक्षिणी लोकांनीं शहास विनंती केल्यावरून, त्यानें कृपाळू होऊन, तुम्हांस क्षमा केली आहे; आणि तुमच्या अथवा तुमच्या बायकामंडळींच्या केंसासही धक्का न लावितां, तुम्हां सर्वांस शहानें आपल्या राज्याच्या बाहेर निघून जाण्यास परवानगी दिली आहे. " अशा आशयाचा शहाचा एक खोटा हुकूम

। त्यांनीं स्वतःही शपथा

घेतल्या. तेव्हां अजमासें अडीच हजार परदेशी मंडळी आपल्या बायकामुलांसह किल्ल्याबाहेर येऊन त्यांनीं किल्ला दक्षिणी लोकांच्या हवाली केला; व तेथून जवळच ते तळ देऊन राहिले. त्यानंतर दक्षिणी लोकांनीं त्यांच्याशीं वरपांगी मोठ्या प्रेमाचें वर्तन ठेवून त्यांचा विश्वास संपादन केला; व चवथ्या दिवशीं सर्व परदेशी सरदार. मंडळींस त्यांनीं किल्ल्यांत मेजवानीस बोलाविलें. त्याप्रमाणें कासिमबेग वगैरे दोन तीन परदेशी सरदारांशिवाय बाकी सर्व किल्ल्यांत गेले; व मेजवानी चालू असतांनाच अगाऊ ठरविल्याप्रमाणें त्या सर्वांची मोठ्या निर्दयपणानें कत्तल उडविण्यांत आली. ही हकीकत किल्ल्याबाहेर कासीमबेग यास कळल्याबरोबर तो आपल्या मंडळींसह राजधानीकडे पळाला; दक्षिणी लोकांशीं लढत लढत मोठ्या कष्टानें राजधानींत जाऊन शहास भेटला; व दक्षिणी लोकांच्या विश्वासघाताची व कारस्थानांची सर्व हकीकत त्यास निवेदन केली; तेव्हां शहानें या सर्व प्रकरणांचा तपास करून सर्व अपराधी दक्षिणी लोकांना भयंकर शिक्षा दिल्या; ( इ० सन १४५३; ) आणि परदेशी-दक्षिणी लोकांमधील ही भानगड त्यानें तात्पुरती मिटवून टाकिली.

तथापि पुढें लवकरच या आपसांतील तीव्र मतभेदाच्या अग्नीनें पुन्हां पेट घेतला. महंमदशहाच्या मृत्यूनंतर ( इ. सन १४८२ ) त्याचा मुलगा महंमूदशहा हा गादीवर आला; आणि दहा वर्षांतच, इ. सन १४९३ मध्यें बहामनी राज्य–जरी इ. सन १५२६ पर्यंत धुगधुगी राहिली होती तरी–नष्ट होऊन महंमद गवान याचें भविष्य खरें ठरून अनुभवास आलें. महंमूदशहा गादीवर आल्यावर लवकरच पुन्हां दक्षिणी व परदेशी लोकांमधील वैरभाव जोरांत येण्यास प्रारंभ झाला. या शहाच्या कारकीर्दींत निजाम उल्-मुल्कूबहिरी या नांवाचा एक उच्चकुलांतील बाटलेला हिंदू प्रधान असून तो दक्षिणीपक्षाचा प्रमुख होता व यूसफ् अदिलशहा या नांवाचा पूर्वीं गुलाम असलेला तुर्की सरदार विजापूर प्रांताचा सुभेदार असून तो परदेशी पक्षाचा पुढारी होता. या बलिष्ट व दिवसेंदिवस वाढत चाललेल्या सरदारास पदभ्रष्ट करून त्याच्या जागीं विजापूर प्रांतावर, वारंगळ प्रांताचा नायब सुभेदार आदिलखान या दक्षिणी मनुष्याची नेमणूक करावी असा निजाम–उल–मुल्कू यानें घाट घातला; परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. तथापि शहा हा बहुतेक त्याच्या हातांतील बाहुलीसारखा असल्यामुळें त्यानें शहाकडून युसफ् अदिलखान व फत्तेउल्ला इमाद्–उल्–मुल्क—हा वऱ्हाड प्रांताचा सुभेदार होता;—या उभयतांना

---

१ टीपः—वारंगळ हें गांव हल्लीं निजामाच्या राज्यांत, तैलंगण प्रांताची राजधानी म्हणून प्रसिद्ध असून तें वाडी–बेझवाडा रेलवे लाइनीवर, हैद्राबादच्या पुढें ९३ मैलांवर एक रेलवे-स्टेशन आहे; येथें उत्तम सतरंज्या तयार होतात.

राजधानींत बोलावून घेवविलें; आणि त्यांच्या सैन्याची पाहणी करण्याच्या मिषानें त्यांनां राजवाड्यासमोर आणविलें; नंतर त्याठिकाणीं शहानें त्यांना सांगितलें कीं, परदेशी सैन्य बंडखोर झालें असून त्या सैन्यानें शहरांत अतीशय अत्याचार केले आहेत; त्यामुळें आतां परदेशी लोकांविरुद्ध दक्षिणी सैन्य उपयोगांत आणणें भाग आहे. त्यानंतर निजामाच्या हुकुमाप्रमाणें दक्षिणी सैन्य लागलीच परदेशी लोकांवर मोठ्या निकरानें तुटून पडलें; व त्यांचा कोंडमारा करून त्यांची भयंकर कत्तल उडविली. तथापि यूरिशखान, खुश कदमखान वगैरे मंडळी दक्षिणी लोकांशीं लढत लढत वेशीजवळ आली; व वेशीचे दरवाजे फोडून त्यांनीं दर्याखान वगैरे आपल्या परदेशी सरदारांचें सैन्य आंत घेतलें. त्यानंतर सतत वीस दिवस राजधानींत सारखा रक्तपात सुरू होता. या अवधींत उभय पक्षांकडील मिळुन निदान चार हजारांहून अधीक लोक मारले गेले; अखेरीस पुष्कळ मध्यस्थी केल्यावर युसफ आदिलशहा हा आपल्या अनुयायांसह विजापूर येथें व फत्तेउल्ला, इमाद्–उल्–मुल्क हा वऱ्हाडांत परत गेला व ही भानगड कशी तरी एकदांची निकालास लागली.

तथापि निजाम–उल्–मुल्क, व इमाद्–उल्–मुल्क यांचें वर्चस्व दिलावरखान हबशी या नांवाच्या एका सरदारास सहन होत नव्हतें; म्हणून त्यानें एक दिवस शहा एकटा आहे असें पाहून, त्या उभयतांविषयीं त्याचें मन कलुषित केलें; व त्यांना ठार मारण्याची शहाकडुन परवानगी मिळविली; व त्यानंतर ते उभयतां राजवाड्यांत आल्यावर, दिलावरखानानें त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ झाला; तेव्हां दिलावरखान जिवाच्या भीतीनें आपल्या बायकामुलांसह बऱ्हाणपूर येथें पळून गेला; इकडे कासीम बेरीद या सरदारानें निजामाच्या तर्फे राजवाडा आपल्या ताब्यांत घेऊन व सर्व द्वारांवर नाकेबंदी करून शहाचें दळणवळण पूर्णपणें बंद केलें; तेव्हां नाइलाजानें शहानें निजामाची क्षमा मागितली. नंतर निजाम आपला मुलगा मलिक अहंमद यासह पुन्हां राजधानींत येऊन आपल्या वजीरी पदावर स्थानापन्न झाला; व इमाद्–उल्–मुल्क हा वऱ्हाडप्रांतांत आपल्या सुभेदारीवर परत निघून गेला. त्यानंतर लवकरच पुन्हां परदेशी लोकांचा पक्ष जोरांत आला; बेदर येथील सुभेदार पसंदखान यानें निजाम–उल्–मुल्क यास ठार मारिलें; त्याचें शीर मुद्दाम मनुष्याबरोबर महंमूदशहाकडे तातडतोब पाठवून दिलें–आणि अशा रीतीनें शहाची निजामाच्या त्रासांतुन कायमची मुक्तता झाली.

---

१ टीपः—बेदर हें शहर हल्लीं निजामाच्या राज्यांत, त्याच जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून तें राजधानीचें शहर हैद्राबाद येथून ७५ मैलांवर, मांजरानदीच्या पूर्वकांठावर आहे. हें शहर बहामनी राज्याच्या राजधानीचें ठिकाण असून तेथें किल्ल्याचे व इतर

परंतु शहा निजामाच्या त्रासांतून मुक्त झाल्याबरोबर पूर्णपणें ऐषआरामांत मग्न होऊन गेला. महंमूदशहा ( कारकीर्द इ. सन १३५८ ते इ. सन १३७५ ) यास वारंगळच्या राजानें एक रत्नजडित सिंहासन नजर केलें होतें; व तें नऊ फूट लांब व तीन फूट रुंद असून त्याची किंमत चार कोट रुपये होती. त्यास " तख्त-ई-फेरोज " हें नांव असून बहामनी राज्यकर्ते दरबारांत याच तख्तावर आरूढ होत असत. अशा या मौल्यवान् व सुंदर तख्ताची शहानें विल्हेवाट लाविली! तें तख्त फोडून, त्याचे हिरे त्यानें मद्यपात्रें ठेवण्याचीं तबकें, सुरया व मद्यप्राशन करण्याचे पेले वगैरेंना जडविले! आणि स्वतः पूर्णपणें व्यसनाधीन होऊन अखेरीस त्याचा कळस झाला! या शहाच्या कारकीर्दींत परदेशी लोकांचें महत्व अतीशय वाढलेलें असून त्याबद्दल दक्षिणी व हबशी मंडळींना अतीशय वैषम्य वाटत होतें म्हणून त्यांनीं शहा व्यसनाधीन झाल्यावर, त्याच्याविरुद्ध एक प्रबळ व भयंकर कट उभारिला; आणि निजामास ठार मारून त्याचें शीर महंमूद शहास नजर करणाऱ्या पसंदखान या सरदारानेंच त्याच महंमूदशहास ठार मारण्याची कामगिरी आपल्या अंगावर घेतली; आणि हा आपला उद्देश तडीस नेण्याकरितां तो आपल्या साथीदारांसह सशस्त्र राजवाड्यांत जाऊन, संधी साधून, त्यानें शहावर हल्ला केला; परंतु पहाऱ्यावरील परदेशी मंडळी, अजीजखान तुर्क वगैरेंनीं आपले प्राण बळी देऊन शहाचा बचाव करण्याचा प्रयत्न केला; त्यामुळें शहास वेळ मिळून तो तेथून पळाला; आणि त्यानें परदेशी सैन्यास ही बातमी पोहोंचविली. त्याबरोबर कासीम बेरीद तुर्क वगैरे परदेशी सरदार तावडतोब आपल्या सैन्यासह शहाच्या मदतीस धांवून आले. त्यांनीं मोठ्या हिंमतीनें वेशींतून आंत प्रवेश करून शहराचा ताबा घेतला; व अस्तमानाच्या सुमारास त्यांनीं शहास पुन्हां आपल्या अधिकारावर स्थानापन्न केलें. ( इ० सन १४९० ). त्यानंतर शहानें दक्षिणी व हबशी लोकांना धुंडाळून काढून त्यांचा उच्छेद करण्याचा व त्यांची माल-मिळकत जप्त करण्याचा परदेशी लोकांस हुकूम दिला; त्याप्रमाणें सतत तीन दिवस या हुकूमाची अंमलबजावणी चालू राहून पुष्कळ मानवी-संहार झाला; व सर्व शहर भयाण दिसूं लागलें. अखेरीस शहा मोहीबउल्ला याच्या एका मुलानें हा हुकूम रद्द करण्याविषयीं महंमूदशहास विनंती केली; व सुदैवानें शहानें त्याचें म्हणणें मान्य करून हें सत्र एकदाचें बंद पाडिलें.

त्यानंतर या भयंकर प्रसंगांतून आपण सुरक्षितपणें निभावलों, याबद्दल महंमूदशहानें आनंदप्रदर्शन करण्याकरितां सतत चाळीस दिवस मोठ्या थाटाचा उत्सव केला; पुन्हां लवकरच तो पूर्वीप्रमाणें मद्यपि बनला; त्याचें मद्यपान सारखें अधीक अधीक वाढत गेलें. तो दारूचा घोंट घेण्याला घाबरा होऊन, दारूची तल्लफ जावी म्हणून जसजसा एक एक पेला अधीक अधीक घेऊं लागला, तसतसी त्याची तल्लफ वाढत गेली; नशेच्या नरडीस नख देण्याकरितां—आपल्या तल्लफेस दारूंत बुडवून तीं नाहींशी करण्यासाठीं—तो

जसजसी अधीक अधीक दारू आपल्या घशांत ओतीत गेला, तसतशी त्याची दारूची भूक सारखी वाढत गेली; त्याचा दरबार दारूबाजांचा अड्डा बनला; त्याचा परिवार दारूड्यांचा गोट बनला; राज्याचीं सूत्रें व्यसनी व नालायक दारूबाजांच्या हातांत गेलीं; त्यानें सुरू केलेला दारूचा सांप्रदाय अतीशय वृद्धि पावून त्याच्या प्रजेनेंही त्याचें अनुकरण केलें; माननीय साधुलोक इतके दारूबाज बनले कीं खुद्द त्यांच्या अंगांतील कपडे सुद्धां दारू-दुकानदाराकडे गहाण पडले. पाठशाळांतील पूज्य शिक्षकमंडळीही आपला व्यवसाय सोडून देऊन मद्याच्या मजलसींत पुढारीपणानें भाग घेऊन व पूर्ण दारूबाज बनून झिंगूं लागले; शहाचा अधिकार नामशेष होऊन—आणि बहामनी राज्यांतील बलिष्ट सरदारांनीं आपआपले सवते सुभे निर्माण करून,—इ० सन १४९३ च्या सुमारास, तें राज्य कसें तरी जीव जगवून जिवंत राहण्यापर्यंत हीनस्थितीप्रत पोहोंचलें; आणि अशा कुत्तरओढींतच अखेरीस इ० सन १५२६ मध्यें, या बहामनी राज्याची समाप्ती झाली.

बहामनी राज्यापासून निरनिराळीं पांच राज्यें—ह्मणजे अहंमदनगर येथील निजामशाही, विजापूर येथील आदिलशाही, गोवळकोंडें येथील कुत्बूशाही अथवा कुतुबशाही, बेदर येथील बेरीदशाही, आणि वऱ्हाडची ह्मणजे गाविलगडची[१] इमादशाही, हीं पांच राज्यें—निर्माण झालीं. त्यांतील कांहीं राज्यांतही अशाच प्रकारची तीव्र धार्मिक मतभेदामुळें भयंकर धोक्याची राजकीय परिस्थिती उत्पन्न झाली; आणि त्या राज्यांनाही बहामनी राज्याप्रमाणेंच हा वैरभाव नडून, त्यांच्या नाशास इतर अनेक कारणांबरोबर हेंही एक प्रमुख कारण होऊन बसलें.

अहंमदनगर येथील निजामशाही राज्य स्थापन करणारा अहंमदशहा हा इ. सन १५०८ मध्यें मृत्यु पावला; व त्याचा सात वर्षांचा अज्ञान मुलगा बुऱ्हाण निजामशहा हा त्याच्या जागीं गादीवर आला. शहा ताहीर या नांवाचा एक साधू व विद्वान् आणि मुत्सद्दी पुरुष या बुऱ्हाण शहाच्या आश्रयास होता; त्याच्या अनुमतीनें इ. सन १५३७ मध्यें शहानें अबू बकर, (इ. सन ६३२ ते इ. सन ६३४, ) उमर (इ. सन ६३४ ते इ. सन ६४४)

---

१ टीपः—गाविलगडचा डोंगरी किल्ला ऐतिहासिकदृष्ट्या अतीशय महत्वाचा असून तो वऱ्हाडांत उमरावती जिल्ह्यांतील मेळघांट तहशिलींत आहे. हा किल्ला विशेष अवघड असून त्याच्या एका अत्युच्च टोंकावर एक सुंदर मशीद आहे; व ती अतीशय भव्य असून तींत आठ तलाव आहेत; व त्यांतील चार तलावांत बाराही महिने उत्तम पाणी रहात असून त्यांत जिवंत झरे आहेत. वऱ्हाड प्रांताच्या उत्तरेस मेळघाटांत सातपुडा पर्वताचे फांटे पसरले असून त्यांस " गाविलगडचे डोंगर " असें ह्मणतात; व त्यांतच गाविलगडचा किल्ला आहे. गाविलगडच्या डोंगराचें " वैराट " हें उंच शिखर असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून ३९८९ फूट आहे.

वगैरे खलिफांचीं नांवें खुतब्यांतून गाळून इमामांच्या नांवानें खुतबा वाचण्यास सुरवात केली; व आपल्या निशाणाचा व छत्राचा रंग बदलून तीं हिरवीं करून, खलिफांस रस्त्यांत व मशीदींत शिव्याशाप देण्यासाठीं कांहीं लोक वेतनें देऊन नोकरींत ठेविले; आणि अशा रीतीनें शहानें आपल्या राज्यांत जबरदस्तीनें शियाधर्माची स्थापना केली; परंतु सुनी लोकांनीं हा फेरफार निमूटपणें सहन केला नाहीं; शहाच्या ह्या कृत्यामुळें त्यांना अतीशय राग आला; ते चिडीस गेले; त्यांनीं दंगा माजविला आणि पीरमहंमद या नांवाच्या एका मुल्लाच्या* धुरीणत्वाखालीं राजवाड्यास गराडा घालून त्यांनीं शहास कैद करण्याचा घाट घातला; परंतु बुऱ्हाणशहास दैवयोगानें ही बातमी अगाऊ मिळाली; त्यामुळें त्यानें तावडतोब पीरमहंमद यास कैद करून ह्या दंगा साफ मोडून टाकिला; तथापि सुनी लोक त्यामुळें स्वस्थ बसले नाहींत; शांत झाले नाहींत अथवा शहाविरुद्धची त्यांची चळवळ व खटपटही थंडावली नाहीं; इतकेंच नव्हे तर सुनी धर्माच्या व सुनीधर्मीय लोकांच्या अशा अपमानामुळें इतर सुनीधर्मीय मुसलमान राज्यकर्तेही शहाविरुद्ध कट करण्यास प्रवृत्त झाल्यावांचून राहिले नाहींत. शहाच्या ह्या कृत्याबद्दल गुजराथ, खानदेश व विजापूर येथील सुनीधर्मीय राज्यकर्त्यांना अतीशय राग आला; आणि त्यांनीं एकत्र होऊन, निजामशाही राज्यावर स्वारी करून तें राज्य नष्ट करून, तिघांनीं मिळून वांटून घेण्याचा मनसुबा केला; तेव्हां—या त्रिवर्गाच्या एकत्र सैन्याबरोबर आपला बिलकूल निभाव लागणार नाहीं अशी बुऱ्हाणशहा याची पूर्ण खात्री असल्यामुळें—त्यानें मोंगल बादशहा हुमायून याजकडे वकील पाठवून मदतीची मागणी केली; व गुजराथेवर मोंगली फौज रवाना केल्यास, तो प्रांत बादशाही अमलाखालीं आणण्यांत मी आपल्या सैन्यास मदत करीन, असें त्यास आमिष दाखविलें; शहाच्या या निरोपाप्रमाणें, गुजराथसारखा समृद्ध व सुसंपन्न प्रदेश हस्तगत करून घेण्याची घरबसल्या आलेली ही संधी हुमायून फुकट दवडण्याइतका भाबडा अथवा विचारशून्य नव्हता; पण शीरशहा सूरबरोबरील भानगडी व युद्धकलह, यांत तो पूर्णपणें गुरफटला जाऊन त्याचें स्वतःचेंच तख्त डळमळीत झालेलें होतें; त्यामुळें हुमायून याला नाइलाजानें गुजराथ प्रांतावर स्वारी करितां आली नाहीं; अथवा बुऱ्हाणशहासही त्याच्या मागणीप्रमाणें, वरील त्रिवर्गाविरुद्ध मदत देतां आली नाहीं. तेव्हां निजामशहानें गुजराथ व खानदेश येथील सुलतानाकडे संधान बांधून व त्यांच्याशीं सख्य करून त्यांना या कटांतून फोडिलें. विजापूरकर इब्राहीम अदिलशहानें आपल्या नोकरींतून कमी केलेले लोक स्वतःच्या पदरीं चाकरीस ठेवून, विजापूरवर स्वारी केली; इब्राहीमशहाचा पूर्णपणें पराभव केला; आणि अशारीतीनें धार्मिक मतभेदामुळें उत्पन्न झालेल्या ह्या भयंकर प्रसंगांतून तो व त्याचें राज्य सुरक्षितपणें निभावून कायम राहिलें.

निजामशाहीप्रमाणेंच अदिलशाही राज्यांतही या धार्मिक मतभेदामुळें अनेक भानगडी उपस्थित झाल्या; आणि अनेकवेळां राजकीय शांततेचा भंग होऊन निकराचे तंटेबखेडे व युद्धकलह माजून गेले. विजापूरच्या आदिलशाही राज्याचा संस्थापक अबुल्‌मुज्फर-युसफ अदिलशहा हा इ० सन १५१० मध्यें मृत्यू पावला; आणि त्याचा मुलगा सुलतान इस्मईल आदिलशहा हा गादीवर आला. सुलतान यूसफ हा शियापंथाचा असून त्यानें आपल्या कारकीर्दींत दरबारांतील अधिकारांच्या बहुतेक जागांवर आपल्याच पंथांतील लोकांच्या नेमणुका केल्या होत्या; तथापि त्याचा मुख्य प्रधान कमालखान लेहेरी हा सुनीपंथाचा होता. सुलतान इस्मईल हा गादीवर आला, त्यावेळीं अज्ञान म्हणजे फक्त नऊ वर्षांचा होता. त्यामुळें वजीर कमालखान हा जरी सुनीपंथाचा होता तरी, सुलतान युसफ यानें त्यासच विश्वासपात्र समजून आपल्या मुलाचा—आपल्या मृत्यूनंतर—प्रतिपाळ करण्यास नेमिलें होतें; त्यामुळें इस्मईलच्या पोरसवदा कारकीर्दींत कमालखान हाच सर्वसत्ताधीश बनला होता, युसफशहा जिवंत होता, तोंपर्यंत त्याच्या दराऱ्यामुळें कमालखानास आपल्या सुनीपंथाची प्रगति करण्यास तिळमात्रही सवड मिळाली नाहीं; पण त्याच्या मृत्यूनंतर कमालखान हा सर्वसत्ताधीश बनल्यावर त्यानें आपला सुनीपंथ जोरांत आणण्यास सुरवात केली; त्यानें दरबारांतील सर्व शियापंथी मंडळीस नोकरींतून कमी करून त्यांच्याजागीं आपल्या सुनीपंथानुयायी मंडळींची भरती केली; आणि सुलतान इस्मईल हा वयांत आल्यावर आपल्या—आणि आपल्या वडिलांच्या—शियापंथाचा त्याग करून आपल्या इच्छेप्रमाणें सुनीपंथाचा स्वीकार करील, अशी त्यास खात्री वाटत असल्यानें त्यानें ह्या वेळेपासूनच तसे उद्योग करण्यास सुरवात केली होती; परंतु इस्मईलशहास कमालखानाचें हें वर्तन आवडलें नाहीं. त्यामुळें परस्परांचीं मनें एकमेकांविषयीं अतीशय कलुषीत झालीं; तेव्हां कमालखानानें आसपासच्या राज्यकर्त्यांना अनुकूल करून घेऊन इस्मईल व त्याची आई या उभयतांना कैद करून ठार मारावें व आपणच राजगादी बळकवावी, असें कारस्थान उभारिलें; परंतु ही हकीकत शहाची आई बुबूजीखान हीस कळली. तेव्हां तिनें लागलींच या संकटांतून मुक्त होण्याची तजवीज केली; ही बाई मोठी हुषार, शूर, धोरणी व राजकारणकुशल असून ती मुकुंदराव या नांवाच्या एका मराठे सरदाराची बहीण होती; आणि तिच्यावर युसफ आदिलशहाचें अतीशय प्रेम असून, तिच्याठायीं विशेष कर्तृत्वशक्ति वसत असल्याचेंही त्यास माहीत होतें; तिनें कमालखानास कोणत्याही प्रकारें दाद न जातां, उलट त्याचा प्रयत्न हाणून पाडून त्यासच नामशेष करण्याचा निश्चय केला; युसफतुर्क या नांवाच्या एका शूर बलिष्ट सरदारास मोठ्या गुप्तपणानें आपल्या पक्षांत मिळवून घेतलें; आणि त्याच्या मदतीनें मोठ्या युक्तीनें व हिंमतीनें कमालखानास आणि त्याच्या सर्व साथीदारांस पकडून त्यांना ठार

मारिलें. इतक्यांत कमालखानाचा मुलगा सफूतरखान यानें आपल्या बापाच्या वधामुळ चिडून जाऊन दंगा केला; परंतु याहीवेळीं राणीनें स्वतः पुढें होऊन त्याच्याशीं सामना केला; त्याचा पूर्णपणें पराभव करून व त्यास पकडून त्याचाही वध केला. त्यामुळें हें अख्यान एकदाचें कायमचें समाप्त झालें. त्यानंतर दक्षिणी व हबशी लोकांना सैन्यांतून कमी करून त्यांच्याऐवजीं त्या त्या ठिकाणीं परदेशी लोकांची भरती करण्यांत आली; सुनी पंथानुयायी मंडळींना—ज्या मंडळीस कमालखानानें नेमिलें होतें त्यांना—दरबारांतून काढून टाकण्यांत येऊन पूर्वीच्या जुन्या व अनुभवी शियापंथानुयायी लोकांना पुन्हां पूर्वीप्रमाणें कामावर नेमण्यांत आलें; आणि आसदखान या नांवाच्या एका हुषार, इमानी व स्वामिनिष्ट मनुष्याच्या व आपल्या आईच्या सल्ल्यानें शहा राज्यकारभार करूं लागला. त्यामुळें राज्यांतील व दरबारांतील सर्व अव्यवस्था लवकरच नाहींशी होऊन राज्यकारभार सुरळीतपणें चालूं लागला; त्याप्रमाणेंच अदिलशाहीमधील ह्या भानगडी, घोटाळे व अंदाधुंदी यांचा फायदा घेऊन जमल्यास विजापूरचें राज्यही नामशेष करावें, अशा उद्देशानें बेदर, नगर व वऱ्हाड, येथील राज्यकर्त्यांनीं एकमत करून त्या राज्यावर स्वारी केली होती; त्यावेळीं त्या सर्वांना इस्मईल शहा यानें फोडून त्यांचा पूर्णपणें पराजय केला; त्यांना आपआपल्या ठिकाणीं परत जाणें भाग पाडिलें;—आणि अशा रीतीनें शिया व सुनी यांच्यामधील भयंकर स्पर्धेमुळें विजापूरच्या राज्यावर आलेलें गंडांतर नाहींसें होऊन तें राज्य ह्या प्रसंगांतून सुरक्षितपणें बचावून जिवंत राहिलें.

याच राज्यांत अशाच प्रकारची दुसरीही एक गोष्ट घडून आलेली आहे; ती अशी कीं, सुलतान पहिला इब्राहीम अदिलशहा, ( कारकीर्द इ० सन १५३४ ते इ० सन १५५७ ) यानें राज्यकारभार हातीं घेतल्यानंतर लागलींच सुनीपंथाचा स्वीकार केला; आणि आपल्या राज्यांतही शियापंथ मोडून सुनी पंथाची स्थापना केली; परंतु इब्राहीमशहाचा प्रसिद्ध शियापंथी वजीर आसदखान यास शहाचें हें धर्मांतर पसंत पडलें नाहीं. त्यामुळें त्या उभयतांमधील प्रेमभाव नष्ट झाला; व त्यास कांहींसें वैमनस्याचें स्वरूप आलें. शिवाय शहानें आपल्या सैन्यांतील शियापंथी परदेशी लोकांस नोकरींतून काढून टाकिलें त्यामुळें ते लोकही शहाविषयीं असंतुष्ट होऊन, त्यांनीं अहंमदनगर व विजयानगर येथें जाऊन तेथील राज्यकर्त्यांकडे नोकऱ्या पतकरिल्या. वजीर आसदखान हा जरी शहानें धर्मांतर केल्यामुळें त्याच्या त्या कृत्याबद्दल निषेध प्रदर्शित करणारांपैकीं एक होता, आणि जरी त्याचें व शहाचें मन परस्परांविषयीं कलुषित झालेलें होतें, तरी तो अत्यंत राजनिष्ठ आणि इमानी होता; आपण शहाच्या विरुद्ध खटपट करावी असें त्याच्या कधींही मनांत आलें नव्हतें; इतकेंच नाहीं तर,—जरी त्याच्यावर अनेकवेळां शहाची इतराजी झाली होती तरी—तो नेहमीं एकनिष्ठेनें वागून शहाचीच बाजू

सांभाळून वागत होता. तथापि त्यांच्याशीं शहाचें वितुष्ट आलें, ही बातमी बुऱ्हाण निजामशहा यास समजल्यावर त्यानें या संधीचा फायदा करून घेण्याकरितां एक कारस्थान उभारिलें; आणि बेदरकर अमीर बेरीद याच्याशीं सख्य करून " आसदखान हा आपणांस इब्राहीम आदिलशहाविरुद्ध गुप्तरीतीनें सामील आहे, त्यानें आपणा उभयतांस इब्राहीम शहाशीं युद्ध करण्याकरितां विजापूरच्या राज्यांत बोलाविलें आहे आणि बुऱ्हाणशहास त्यानें या कामगिरीबद्दल बेळगांवचा किल्ला बक्षीस देण्याचें अभिवचन दिलें आहे; " अशी खोटीच बातमी पसरविली. पुढें ही बातमी इब्राहीम शहाच्या कानावर गेली; तेव्हां आसदखानाविषयीं त्याचें मन अतीशय कलुषित झालेलें असल्यामुळें, त्याला ती खरीच आहे असें वाटलें; आसदखान हा भयंकर कारस्थानी व कपटी मनुष्य आहे, असें त्याच्या मनानें घेतलें; तो दग्यानें आपला घात करील अशी त्याला भीति उत्पन्न झाली; आणि तो आसदखानाविषयीं अतीशयच सावध व साशंकपणानें वागूं लागला.

अशारीतीनें विजापूरच्या राज्यांत शहा व वजीर यांच्यांमधील वैमनस्य परमावधीस गेलें आहे, असें वाटून बुऱ्हाण निजामशहा यानें सोलापूरचा किल्ला आपल्या हस्तगत करून घेऊन बेळगांववर हल्ला केला; इतकेंच नाहीं तर तो थेट विजापूरवरही चाल करून गेला; परंतु इब्राहीमशहानें वऱ्हाडकर इमादशहाची मदत घेऊन त्याचा पूर्ण मोड केला; अखेरीस सोलापूर व त्याखालील साडेपांच महाल बुऱ्हाणशहानें इब्राहीम आदिलशहास देऊन त्याच्याशीं तह केला व ही भानगड एकदांची अखेरीस निकालांत आली.

विजापूरच्या आदिलशाही राज्याप्रमाणेंच गोवळकोंडें येथील कुत्यशाही राज्यांतही भानगडी झालेल्या आहेत. महंमदकुली कुत्यशहा याच्या कारकीर्दीत ( कारकीर्द इ० सन १५८० ते इ० सन १६११ ) दोन वेळां धार्मिक मतभेदामुळें अशाचप्रकारची धोक्याची राजकीय परिस्थिती उत्पन्न झाली; त्यांपैकीं पहिल्यानें, ह्मणजे इ० सन १६०७ मध्यें व दुसऱ्यानें ह्मणजे इ० सन १६०९ मध्यें होय; इ० सन १६०७ च्या सुमारास आग्रा, दिल्ली, लाहोर वगैरे ठिकाणांहून पुष्कळ परदेशी मोंगललोक हैद्राबाद येथें येऊन राहिले होते; त्यांपैकीं कांहीं लोक परवानगी न घेतां नौबद घाटावरील राजवाडे व बागबगीचे पाहण्यास गेले; त्यांतील बहुतेक मंडळी दारू पिऊन धुंद झालेली होती; हे लोक टेंकडीवर चढून गेले; आणि तेथील खोजे पहारेकरी त्यांना राजवाड्यांत जाण्यास प्रतिबंध करीत असतां, त्यांना न जुमानितां ते तसेच आंत घुसले; तेव्हां पहारेकऱ्यांनीं त्यांबद्दल शहास वर्दी दिली; शहानें तात्काळ शहरचा कोतवाल अल्ली आकादक्षिणी यास त्यांचा बंदोबस्त करण्याचा हुकूम दिला. त्यावेळीं अल्ली आका यानें परदेशी लोकांविषयीं शहास खोट्या गोष्टी सांगून त्याचें मन त्यांच्याविषयीं कलुषित केलें. तेव्हां, " जे परदेशी मोंगललोक

उद्योगधंदा न करितां शहरांत वास्तव्य करीत असतील, त्यांनीं तावडतोब शहर सोडून निघून जावें; " असा जाहीरनामा काढण्याविषयीं शहानें अल्ली आका यास सांगितलें; परंतु शहाच्या ह्या हुकुमाचा त्यानें विपर्यास करून, " सर्व परदेशी लोकांनीं,—ह्मणजे मोंगल, इराणी, अरब, तार्तार, पठाण अथवा इतर कोणीही असोत, त्यांनीं—शहर सोडून तावडतोब निघून जावें; " असा जाहीरनामा काढिला; आणि " सर्व परदेशी लोकांना शहरांतून हांकलून लावा; व ते न ऐकतील तर त्यांना कैद करा; " असा त्यानें आपल्या हाताखालील लोकांस हुकूम दिला. त्यामुळें परदेशी लोकांवर मोठेंच अरिष्ट कोसळलें. उलटपक्षीं सर्व दक्षिणी लोकांस अतीशय आनंद झाला; त्यांनीं आपआपले व्यवसाय बंद ठेवून परदेशी, व्यापारी, सावकार, सरदार वगैरे मंडळींच्या घरांवर बेधडक हल्ले करून त्यांची मालमत्ता लुटण्याचा सपाटा चालविला; शेंकडों खून होऊं लागले; व सर्व शहरभर सारखा धुमाकूळ माजून गेला. इतक्यांत शहाचा मोठा हुषार व पराक्रमी वजीर अमीर—उल्–मुल्क ऊर्फ मीर-जुम्ला, यास ही हकीकत समजली; त्याबरोबर तो तसाच तावडतोब शहास भेटण्याकरितां राजवाड्यांत गेला; तेव्हां शहा निजला असल्याचें पहारेकऱ्यांनीं त्यास सांगितलें तथापि तो तसाच आंत गेला; शहास जागें करून शहरांतील धुमाकुळीची सर्व हकीकत त्यास निवेदन केली; आणि " अजनही याबद्दल संशय असल्यास खिडकींतून बाहेर डोकावून शहराची स्थिति पहा; अशी त्यास विनंति केली; त्याप्रमाणें शहानें खिडकींतून बाहेरचा देखावा पहातांच हा सर्व प्रकार खरा असल्याचें त्याच्या निदर्शनास आलें. त्याबरोबर त्यानें तात्काळ अल्ली आका यास आपणांसमोर बोलावून घेतलें; " आतांच्या आतांच हा दंगा बंद न केलास, तर तुला हत्तीच्या पायीं देऊन तावडतोब ठार मारीन " असें त्यास बजावून, शांतता स्थापन करण्याकरितां शहरांत रवाना केलें; आणि " जर कोणीही परदेशी लोकांच्या अथवा कोणाच्याही व कोणत्याही वस्तूचा अथवा माल मिळकतीचा अन्यायानें अपहार करण्याचा प्रयत्न करील, तर त्यास तावडतोब देहांतशिक्षा देण्यांत येईल. " असा जाहीरनामा काढून त्याची तात्काळ प्रसिद्धी करविली; त्यामुळें शहरांतील धूमाकूळ बंद होऊन, पुन्हां पूर्वीप्रमाणें सर्वत्र शांतता स्थापन झाली.

त्यानंतर इ. सन १६०९ मध्यें महंमदकुली कुत्बशहा याचा सुन्नीपंथाचा स्वीकार केलेला धाकटा बंधु मिर्झा महंमद खुदाबंद यानें एक भयंकर कट उभारिला; आणि आपल्या पक्षास पुष्कळ लोक सामील करून घेऊन शियामंडळीची कत्तल करावी आणि आपला शियापंथी वडील भाऊ महंमदकुली यास पदभ्रष्ट करून आपण राज्यपद बळकवावें या इराद्यानें त्यानें बंड केलें; परंतु या कटाची बातमी शहास अगाऊ मिळाल्यामुळें तो सावध असल्यानें त्यानें तावडतोब हें बंड जागच्याजागींच—त्याचा फैलाव होण्याच्या

पूर्वीच-चिरडून टाकिलें; या बंडांत सामील असलेल्या प्रमुख मंडळीस ताबडतोब पकडून ठार मारिलें; आणि आपला धाकटा भाऊ मिर्झा महंमद् खुदाबंद् यास गोवळकोंडें येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें-याठिकाणीं तो पुढें दोन वर्षांनीं मृत्यू पावला-आणि अशा रीतीनें पुन्हां राज्यांत शांतता प्रस्थापित झाली.

वरील तांत्रिक हकीकतीवरून, शिया व सुनी यांच्यामधील तीव्र विरोधामुळें दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांमध्यें, कशी चमत्कारिक राजकीय परिस्थिति उत्पन्न होत गेली याबद्दल कोणासही योग्य अनुमान बांधितां येईल. मुसलमानांत शिया व सुनी या पंथाप्रमाणेंच सुफी, वाहबी, रुय्यद, शेख, हबशी, युझबेग, अफगाण, तुर्क वगैरे निरनिराळे पोटभेद अथवा पंथ आहेत. त्यांपैकीं सुफी पंथांतील लोक बहुधा साधुवृत्तीनें राहतात. याशिवाय इतर सर्व परदेशी लोक, मोंगल बादशाहींत आणि दक्षिणेंतील सर्व मुसलमानी राज्यांत सैन्यामध्यें नोकरी करीत असत. याशिवाय, " महद्दी " या नांवाचा एक पंथ असून त्यांतील लोक विशेष कडवे असतात. या पंथाचा शिया व सुनी या पंथाप्रमाणें इतर कोणत्याही पंथाशीं तीव्र मतभेद नाहीं-तरी स्वपंथाचें व स्वपक्षाचें महत्व व वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या अट्टाहासामुळें, धार्मिक मतभेदास तीव्र स्वरूप प्राप्त होऊन, दक्षिणेंतील निजामशाही राज्यांत, इस्मईल निजामशहाच्या कारकीर्दींत, ( कारकीर्द; इ. सन १५८८ ते इ. सन १५९१ ). हा नवा पंथ निर्माण होऊन त्यामुळें त्या राज्यांत भयंकर घोटाळे माजून गेले आणि पक्षभेद विकोपास जाऊन व युद्धकलह जोरांत येऊन, कांहीं काळपर्यंत निजामशाही राज्यांत पूर्णपणें अंदाधुंदी माजून गेली; मिरान हुसेन निजामशहा याच्या कारकीर्दींत, जमालखान या नांवाचा एक दक्षिणी पक्षाचा, आणि महद्दी पंथाचा सरदार बराच बलिष्ट झालेला होता. मिरान हुसेन याचा इ. सन १५८८ मध्यें खून झाला; व मूर्तुजा निजामशहाचा भाऊ बुऱ्हाण निजामशहा याचा राज्यपदारूढ होण्याचा प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर तो अकबर बादशहाच्या आश्रयास जाऊन राहिला; तेव्हां त्याचे दोन्ही मुलगे इब्राहीम व इस्मईल हे लोहगड[१] येथें प्रतिबंधांत होते त्यांपैकीं इस्मईल यास मिरान हुसेनच्या मृत्यूनंतर

---

१ टीपः—लोहगड हें ठिकाण व हा प्रसिद्ध डोंगरी बळकट किल्ला पुणें जिल्ह्यांत, भोरखिंडीच्या माथ्यावर, खंडाळ्यापासून चार मैलांवर नैऋत्य दिशेस आहे. हा जुनाट किल्ला बहामनी राज्याच्या वेळेपासून प्रसिद्ध असून, इ० सन १६४८ मध्यें तो शिवाजीनें घेतला. पुढें तो अवरंगझेबाकडे व पुन्हां मराठ्यांकडे येऊन, इ० सन १७१३ मध्यें कान्होजी आंग्रे यांच्यापासून बाळाजी विश्वनाथाकडे आला; बाळाजी हा याच ठिकाणीं रहात असे. मुसलमानी काळांत व पुढें पेशव्यांच्यावेळीं या किल्ल्यावर राजकीय कैदी ठेवीत

निजामशाही गादी प्राप्त झाली. इस्मईल हा गादीवर आला त्यावेळीं जमालखानाच्या हातांत बहुतेक सर्व सत्ता गेलेली होती; त्यानें इस्मईल यास " शहा " असें कबूल केलें; आणि उलटपक्षीं इस्मईल यानेंही जमालखानास आपला मुख्य वजीर असल्याचें मान्य केलें. जमालखान हा महदी पंथाचा कट्टा अभिमानी असल्यामुळें, शहानें त्याला मुख्य वजीर ह्मणून मान्य केल्यानंतर, त्यानें इस्मईल शहाकडून त्या पंथाचा स्वीकार करविला; शिवाय राज्यांतील मुख्य मुख्य अधिकारांच्या जागांवरही त्यानें आपल्या पंथाच्या लोकांच्याच नेमणुका केल्या; माजी शहा मिरान हुसेन याच्या कारकीर्दींत दक्षिणी व परदेशी, या दोन पक्षांमध्यें भयंकर तंटे माजून दक्षिणी लोकांनीं परदेशी लोकांची कत्तल केली होती; तथापि या भयंकर प्रसंगांतून कांहीं थोडेसे लोक बचावले होते; त्यांना आतां जमालखानानें राज्याबाहेर हांकलून लाविलें; ( इ. सन १५८८ ) व तो सर्व राज्यभर पूर्ण सत्ताधीश होऊन बसला.

या काळांत, हा जो " महदी " या नांवाचा एक नवा पंथ निर्माण झाला, त्याची हकीकत अशी आहे कीं, हनफी पंथांतील सय्यद महंमद या नांवाच्या एका मनुष्यानें इमाम महदी हें नांव धारण केलें; आणि " परमेश्वरानें आपणांस ऐक नवीन पंथ काढण्यास प्रेरणा केली आहे. " असें लोकांस सांगून त्यानें आपल्या या पंथाकडे लोकांना वळवून घेण्यास व त्या पंथाचा मोठ्या झपाट्यानें प्रसार करण्यास सुरवात केली. इमाम महदी याच्या ह्या ह्मणण्यावर पुष्कळ लोकांचा विश्वास बसला; आणि पुष्कळच दक्षिणी व उत्तर हिंदुस्थानांतील मुसलमान लोक या नव्या पंथाचे अनुयायी बनले. त्यांतच निजामशाही राज्याचा सूत्रचालक व सुलतान इस्मईलशहा याचा वजीर जमालखान हाही एक होता; व तो या पंथाचा कट्टा अभिमानी असल्यामुळें—जरी त्यानें शहाकडून आपल्या या नव्या पंथाचा स्वीकार करविला होता, आणि जरी मोठमोठ्या अधिकारांच्या सर्व जागांवर आपल्याच पंथांतील लोकांच्या नेमणुका केल्या होत्या तरी, तेवढ्यानेंही त्याचें समाधान न होतां, शहाच्या खास तैनातींतही त्यानें याच पंथांतील लोकांच्या नेमणुका केल्या; आणि इतर

---

असत; शिवाय अपराध्याचा कडेलोट करून त्यास मारावयाचा असल्यास, त्यास या किल्ल्याच्या वरील टोंकावरून, आणि समुद्रांत बुडवून मारावयाचा असल्यास अलीबागच्या पूर्वेस सहा मैलांवर सागरगड या नांवाचा एक किल्ला आहे त्याच्या " वानर टोंक " या नांवाच्या वरील टोंकावरून, त्यास खालीं लोटीत असत. लोहगडच्या किल्ल्यांत एक देवालय व एक मशीद असून, इंग्रजांनीं पेशव्यांचें राज्य घेतल्यानंतर, इ० सन १८८५ पर्यंत तेथें इंग्लिश सैन्याची एक लहानशी तुकडी रहात असे. येथील हवापाणी उत्तम, व आसपासच्या वनश्रीचा देखावा मनोहर ह्मणून उन्हाळ्यांत व हवापाणी पालटण्यास हल्लीं कांहीं लोक लोहगड येथें जातात.

पंथाच्या लोकांचा तो अमर्यादपणें छळ करूं लागला. त्यामुळें दरबारांत दुफळी उत्पन्न झाली आणि निजामशाहींतील माजी वजीर नामे सलाबतखान—हा यावेळीं वऱ्हाडच्या सरहद्दीवरील खेरला येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत होता;—यास तेथून सोडवून आणून त्याच्या प्रमुखत्वाखालीं, जमालखान व त्याच्या नवीन पंथाचा प्रबल पक्ष नामशेष करण्याकरितां एक मोठा जोरदार व क्रांतिकारक कट उभारण्यांत आला; त्यांत राज्यांतील अनेक सरदार व इतर बडे लोक सामील करून घेण्यांत येऊन शिवाय विजापूरकरांचीही मदत मिळविण्यांत आली. त्यांच्या तर्फे त्याचा मुख्य वजीर दिलावरखान यास अदिलशाही सैन्यासह आपल्या कुमकेकरितां मागवून घेण्यांत आलें; आणि दोघांनीं दोहोंकडून हल्ला करून आपली कार्यसिद्धी घडवून आणावी, असा घाट घडविण्यांत आला; तथापि जमालखान हा मोठा शूर, कडवा व हिंमती होता; त्याचा आपल्या नवीन पंथांतील लोकांवर—त्यानें आपल्या धुरीणत्वाखालीं निर्माण केलेल्या व बलिष्ट बनविलेल्या स्वतःच्या नव्या पक्षांतील मंडळींवर—त्याचा अतीशय भरंवसा होता; आणि ते आपल्या जिवास जीव देऊन एक तर आपणांस यशस्वी करितील अथवा आपणाकरितां कटून मरून जातील, पण माघारही घेणार नाहींत, अथवा दगाही करणार नाहींत, अशी त्याची पूर्ण खात्री होती; त्यामुळें तो यत्किंचितही डगमगला तर नाहींच पण उलट त्यानेंही आपल्या प्रतिपक्षास साफ नामशेष करण्याची मनापासून व मोठ्या जोरानें तयारी केली; आणि मोठ्या झपाट्यानें सलाबतखानावर हल्ला करून व त्यांत त्याचा पूर्णपणें पराभव करून त्यास बऱ्हाणपुराकडे माघार घेऊन पळून जाणें भाग पाडिलें; ( इ. सन १५८८. ) यावेळीं सलाबतखान हा वार्धक्य व आजारीपणा यामुळें बराच अशक्त झाला होता, म्हणून शहाच्या परवानगीनें तो बऱ्हाणपूर येथून दक्षिणेंत आला; आणि लवकरच तळेगांव येथें,—याच गांवास तळेगांव-दाभाडे असें म्हणत असून याच सलाबतखानानें तो गांव वसविला असा उल्लेख आढळतो.—मृत्यू पावला. ( इ. सन १५८९ मध्यें. ) त्यानंतर जमालखानानें विजापूरकरांच्या फौजेकडे आपला मोर्चा फिरविला; व या उभयतां सैन्याची सोलापूर जिल्ह्यांतील अष्टी या गांवीं गांठ पडली; परंतु युद्ध न होतां तीं दोन्ही सैन्यें त्या ठिकाणीं पंधरा दिवस स्वस्थपणें तळ देऊन राहिलीं; व अखेरीस उभयतांमध्यें तह होऊन जमालखानावरील हें अरिष्ट तात्पुरतें दूर झालें; व त्याच्या महत्वास कोणत्याही प्रकारें तिळमात्रही कमीपणा न येतां तो पूर्वीप्रमाणेंच बलाढ्य व भीतिप्रद स्थितींत कायम राहिला.

यावेळीं सुलतान इस्माईल याचा बाप बुऱ्हाण निजामशहा हा दिल्ली येथें अकबर बादशहाच्या आश्रयास जाऊन राहिला होता; त्यास निजामशाहींत माजलेले हे घोटाळे समजल्यावर त्यानें यासंबंधींची सर्व हकीकत अकबराच्या कानावर घातली; व त्याच्या परवानगीनें आणि मदतीनें निजामशाही राज्य आपणाला प्राप्त करून घेण्याच्या उद्धेशानें तो दक्षिणेंत

आली; त्यावेळीं अकबरानें खानदेशाचा सुलतान राजा अलीखान (कारकीर्द इ. सन १५७६ ते इ. सन १५९६) यास बुन्हाण निजामशहा याला त्याच्या राज्यप्राप्तीच्या खटपटींत मदत करण्याविषयीं कळविलें; आणि बुन्हाणशहाच्या प्रयत्नांत त्यास यशप्राप्ति होऊन तो राज्याधिकारी होईपर्यंत खर्चाकरितां मदत ह्मणून, मोंगल साम्राज्याच्या सरहद्दीवरील हंडियें हा महाल अकबरानें त्याच्या दिमतींत दिला. अशा रीतीनें बुन्हाणशहा हा दक्षिणेंत आल्यावर जमालखानानें त्याचा मुलगा इस्मईल याचयाशीं तात्पुरतें सख्य केलें; तेव्हां बुन्हाणशहा त्या उभयतांवर चाल करून गेला; व त्यांच्यामध्यें युद्ध होऊन त्यांत बुन्हाणशहाचा पराभव झाला; व त्यास माघार घेणें भाग पडलें. तेव्हां त्यानें विजापूरकर वगैरे आसपासच्या सत्ताधाऱ्यांकडे खटपट करून मदत मिळविली; आणि जमालखानाशीं पुन्हां निकराचा सामना देण्याचा निश्चय केला. इकडे जमालखानानेंही इस्मईल यास आपणांबरोबर ठेवून आपल्या दहा हजार महूदी पंथाच्या सैन्यासह बुन्हाणशहाशीं सामना देण्याचा बेत ठरविला; आणि वऱ्हाडप्रांताचा सुलतान सय्यद उमजुद उल्मुक व खानदेशचा सुलतान राजा अलीखान यांची मदत मिळविण्याची खटपट केली; परंतु अलीखान हा तटस्थ राहिला, आणि वऱ्हाडकरांची सर्व फौज बुन्हाणशहास जाऊन मिळाली. त्यामुळें या उभयतां सत्ताधाऱ्यांकडून मदत मिळण्यासंबंधींची जमालखान याची आशा नष्ट झाली. तथापि तो मोठा छातीठोक व धाडशी असल्यानें तिळमात्रही हताश झाला नाहीं. त्यानें मोठ्या झपाट्यानें कूच करून विजापूरकराच्या सैन्यावर दाराशन या गावीं मोठ्या निकरानें हल्ला केला; व त्या सैन्याची दाणादाण उडवून त्यास पळवून लाविलें. नंतर त्यानें बुन्हाणशहाच्या सैन्यावर चाल करून जाण्याकरितां तिकडे कूच केलें; पण जमालखानाची पाठ फिरल्याबरोबर, पराभूत झालेला सुलतान इब्राहीम आदिलशहा यानें आपले बर्गी स्वार जमालखानाच्या सैन्यामागें लावून त्याचा घांस-दाणा बंद केला; आणि लांडगेतोड करून जमालखानास व त्याच्या सैन्यास नामशेष करावें, असा गनिमी कावा आरंभिला. त्यामुळें खानाच्या सैन्याचे अतीशय हाल होऊं लागले;

---

**टीपः**—हंडिया हें गाव आणि किल्ला नर्मदानदीच्या दक्षिण तीरावर, हल्लीं मध्यप्रांतांतील हुशंगाबाद जिल्ह्यांत हरदा तहशिलींत, हरद्यापासून बारा मैलांवर असून तेथील किल्ला पूर्वकाळीं विशेष प्रख्यात व नाकेबंदीच्या दृष्टीनें अतीशय महत्वाचा ह्मणून गणला गेला होता. दुसरा बाजीराव पुणें येथून पळून उत्तरहिंदुस्थानाकडे गेल्यानंतर नर्मदानदीच्या कांठाकांठानें पश्चिमेस धार संस्थानापासून तों पूर्वेस भोपाळ संस्थानाच्या सरहद्दीपर्यंत, त्यास कोठेंही नर्मदानदी उतरतां येऊं नये ह्मणून जनरल मालकम यानें नाकेबंदी केली होती; त्यावेळीं हंडिया येथील किल्ल्यावर ले० क० रसेल यास कांहीं पलटणें देऊन त्यानें ठेविलें होतें.

घ तो रोहणखेडा घाटाकडे वळला; परंतु त्याच्या शत्रूस त्याच्या हालचालींची पूर्ण माहिती नेहमीं मिळत असल्यामुळें त्यास खिंडींत गांठून नामशेष करण्याच्या इराद्यानें त्यांनीं हा घाट पूर्णपणें अडवून धरिला; त्यामुळें तो ओलांडून जाण्याचा प्रयत्न केल्यास आपल्या सैन्याची अतीशय प्राणहानि होईल—आणि शिवाय आपल्या ह्या धाडसाच्या कृत्यांत आपला पराभव झाल्यास आपले पुढील सर्व बेत विस्कळीत होतील; सततच्या प्रवासानें व दगदगीनें त्रासत चाललेलें आपलें सैन्य पूर्णपणें नाउमेद होऊन त्यामुळेंच शत्रूच्या सैन्याला उत्तेजन मिळून तें उत्साहपूर्ण होऊन जोरांत येईल—अशी त्यास भीति वाटूं लागली; ह्मणून त्यानें हा मार्ग टाळून दुसऱ्याच एका मार्गानें पलीकडे जाण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें मार्ग क्रमण्यास सुरवात केली; परंतु तो रस्ता बिकट व सैन्यसामुग्रीच्या वाहतुकीस अवघड असून शिवाय सर्व मार्गभर पाण्याचीही अतीशय टंचाई होती; त्यामुळें त्याच्या सैन्याचे मार्गांत विशेष हाल होऊं लागले; व त्या सैन्यास पुढें पाऊल टाकणेंही जिवावर आलें. इतक्यांत येथून जवळच तीन कोसांवर पाणी आहे, अशी जमालखान यास बातमी मिळाली; तेव्हां त्यानें तिकडे कूच करण्याविषयीं आपल्या सैन्यास हुकूम दिला; व त्या ठिकाणापर्यंत, त्याचें सैन्य, आपणांस पाणी मिळेल, या आशेनें लवकरच येऊन दाखल झालें. पण तेथें आल्यावर ती जागाही शत्रूंनीं अडवून धरिली आहे, असें त्यास आढळून आलें तेव्हां—चोहोंकडून अशा सारख्या अडचणी, हाल-आपत्ति व शत्रुसैन्याचा त्रास सोशीत राहण्यापेक्षां—एकदांच काय तो सोक्षमोक्ष करावा, अशा निश्चयानें तो आपल्या सैन्यासह, शत्रुसैन्यावर—बुऱ्हाण निजामशहा याच्या तेथेंच पाणी अडवून असलेल्या सैन्यावर—एकदम मोठ्या जोरानें तुटून पडला; आणि बुऱ्हाणशहाचा पूर्ण पराभव होऊन, जमालखान यशस्वी होणार, असा सुमार दिसूं लागला; इतक्यांत अकस्मात शत्रुसैन्यांतील एक गोळी येऊन ती जमालखानाच्या मर्मस्थानीं लागली व त्याबरोबर तो तात्काळ जागच्याजागींच ठार झाला! तेव्हां लागलींच त्याची फौज नाउमेद होऊन भीतीनें समरभूमी सोडून पळून गेली; आणि बुऱ्हाणशहास निर्विवादपणें विजयप्राप्ती होऊन तो लागलींच अहंमदनगर येथील निजामशाही राज्याचा अधिपति बनला. जमालखानाच्या मृत्यूनंतर त्याच्या सैन्याच्या झालेल्या पळापळींतच—सुलतान बुऱ्हाण निजामशहाचा धाकटा मुलगा व निजामशाहीचा माजी राज्यकर्ता—इस्मईलशहाही होता; त्यास बुऱ्हाणशहाच्या लोकांनीं पकडून आणून बुऱ्हाणशहाच्या हवालीं केलें व शहानें त्यास प्रतिबंधांत ठेवून राज्यसूत्रें आपल्या हातांत घेतलीं; ( इ० सन १५९१ मध्यें. )—आणि अशारीतीनें महूदी पंथानुयायी लोकांच्या राजकीय वर्चस्व मिळविण्याच्या बाबतींतील प्रतिस्पर्धेमुळें उत्पन्न झालेल्या एका लक्षांत ठेवण्यासारख्या बंडाचा बीमोड करण्यांत येऊन, निजामशाही राज्यांत पुन्हां पूर्वीप्रमाणें शांतता प्रस्थापित करण्यांत आली.

याच काळांत—ह्मणजे इ० सन १५८८ मध्यें, [illegible]लखानानें परदेशी लोकांची भयंकर कत्तल उडवून बाकी राहिलेल्या थोड्याशा लोकांना ज्यावेळीं निजामशाही राज्यांतून हांकलून लाविलें, त्यावेळीं प्रसिद्ध मुसलमान इतिहासकार फेरिस्ता हाहि अहंमद्-नगरहून विजापूर येथें निघून गेला; आणि तेथील राज्यकर्ता इब्राहीम अदिलशहा याच्या पदरीं नौकरीस राहिला. या प्रसिद्ध इतिहासकाराविषयीं आणि त्याच्या काळांत निजामशाहींत झालेल्या अनेक चमत्कारिक व घोटाळ्याच्या भानगडींविषयीं पुष्कळांस माहिती नसल्यानें आणि फेरिस्ता यानेंच दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास लिहिलेला असून शिवाय खुद्द त्याचाही दक्षिणेंतील राज्यांशीं राजकीयसंबंध आलेला असल्यानें-ती या ठिकाणीं त्रोटक-रीतीनें ग्रथित केली आहे.

फेरिस्ता यानें स्वतःविषयीं लिहिलेल्या हकीकतीवरून, आणि त्याच्या इतिहासाचा इंग्रजींत तर्जुमा करणाऱ्या ले० क० जॉन ब्रिग्स यानें आपल्या पहिल्या भागाच्या प्रारंभीं दिलेल्या फेरिस्त्याच्या त्रोटक चरित्रावरून असें दिसतें कीं, त्याचें सर्व नांव महंमद कासीम गुलामअल्ली हिंदूशहा फेरिस्ता हें असून तो मूळचा इराण देशांतील राहणारा होता. त्याचा जन्म कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यावरील अस्त्राबाद या शहरीं इ० सन १५७० या वर्षी झाला. त्याचा बाप गुलामअल्ली हिंदूशहा, हा मोठा विद्वान् मनुष्य असून तो आपल्या या मुलासह हिंदुस्थानांत येऊन दक्षिणेंत अहंमदनगर येथें गेला; व मूर्तुजा निजामशहा याच्या आश्रयास राहिला. यावेळीं महंमद कासीम फेरिस्ता यास नुकतेंच बारावें वर्ष लागलें होतें; व तेथें गेल्यावर तो राजपुत्र मिरान हुसेन याचा—ह्मणजे ज्यानें इ० सन १५८७ मध्यें, आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षी प्रत्यक्ष आपला बाप मूर्तुजा निजामशहा याचा वध करून आपण राज्याधिकारी बनला, त्या राजपुत्र मिरान-हुसेन याचा-सहाध्यायी होता. फेरिस्ता याचा बाप, गुलामअल्ली हा मोठा विद्वान् असल्यानें राजपुत्र मिरान-हुसेन यास उर्दू अथवा पर्शियन भाषा शिकविण्याकडे त्याची योजना करण्यांत आली होती. त्यानंतर लवकरच फेरि-स्त्याचा बाप मृत्यू पावला आणि फेरिस्ता हा पोरका झाला; परंतु मूर्तुजा निजामशहा यानें त्यास आपल्या पदरीं ठेवून घेतलें; व पुढें लवकरच शहाची त्याच्यावर विशेष कृपा जडली.

फेरिस्ता हा सोळा वर्षांचा असतांना निजामशाही राज्यांत खालील प्रसंग उद्भवला; व त्यांत खुद्द त्यालाही बऱ्याच प्रमुखपणानें भाग घ्यावा लागला.—यावेळीं मूर्तुजा निजामशहा यास "दिवाणा निजामशहा" असेंही ह्मणत असत.—याची कारकीर्द सुरू झाली होती. हा शहा गादीवर आल्यावर कांहीं काळानें, भ्रमिष्ट, वेडसर व खरें-खोटें अथवा बरें-वाईट न समजण्याइतका अप्रबुद्ध बनला होता. त्याच्या पदरीं चंगीझखान या नांवाचा एक मोठा शूर, हुषार, राजनिष्ठ व इमानी मनुष्य त्याचा वजीर असून, तो जिवंत होता तोंपर्यंत त्यानें त्या

राज्याच्या व शहाच्या कल्याणाकरितां अश्रांत परिश्रम घेतले होते; त्या राज्याविरुद्धचीं अनेक कारस्थानें मोडून टाकलीं होतीं; व त्याच्या दक्षतेमुळेंच निजामशाहीच्या शत्रूंना त्या राज्याविरुद्धच्या आपल्या खटपटी यशस्वीपणें सिद्धीस नेतां येत नव्हत्या. त्यामुळें या एकनिष्ठ वजीर चंगीझखान याचा नाश करण्याची निजामशाहीचे हितशत्रू व त्याचे प्रतिस्पर्धी एकसारखी संधि पहात टपून बसले होते. अशा स्थितींत बेदरच्या राज्याच्या वकिलानें निजामशहाचें मन चंगीझखानाविषयीं अतिशय कलुषित केलें; आणि मूर्तुजाशहानें कोणत्याही प्रकारें खऱ्याखोट्याचा तपास अथवा योग्य विचार न करतां, त्यास विषप्रयोग करून ठार मारिलें; परंतु पुढें खरा प्रकार समजून आल्यावर चंगीझखानाच्या वधाबद्दल त्यास अतिशय पश्चाताप झाला; व यापुढें राज्य चालविण्याइतकी आपल्या मनाची योग्य स्थिति राहिली नाहीं, असें त्यास वाटून त्यानें काझीबेग, अमीर उल्मुल्क्, मिर्झामहंमद नक्की, आणि कासीमबेग हकीम हे चार हुषार अधिकारी नेमून त्यांच्या हातीं राज्यकारभार सोंपविला; आणि आपण अहंमदनगर येथील राजवाड्यांतील "बगदाद" या नांवाच्या उपमंदिरांत, आणि नंतर पुढें "बहिस्ती बाग" या नांवाच्या उद्यानांतील राजवाड्यांत तो राहूं लागला.

मूर्तुजा निजामशहा, याच्याजवळ साहेबखान या नांवाचा एक अतिशय निंद्यकर्मी, अनीतिमान् व सुरापानी मनुष्य असून तो शहाच्या इतक्या प्रेमांतील होता कीं, या पशुतुल्य आचरणाच्या व्यक्तीशिवाय तो दुसऱ्या कोणाचीही भेट घेत नसे. त्यामुळें त्याचें प्रस्थ अतिशय वाढून गेलें; आणि त्याच्या पापमय कृत्यांची परमावधि होत गेली; पण शहास त्याच्यावांचून क्षणमात्रही करमत नव्हतें; त्यामुळें इकडे साहेबखानाची घटकोघटकी मर्जी जात असे, खप्पा होत असे; आणि "हा मी चाललों;" अशी शहास नेहमीं गुरकावणी दाखवीत असे; अशा स्थितींत एकदां तो खरोखरीच बेदर येथें निघून गेला; तेव्हां शहानें स्वत: तेथें जाऊन त्याची मनधरणी केली; व त्यास आपणाबरोबर नगर येथें परत आणिलें. त्यानंतर पुन्हां साहेबखानानें रागावून, मूर्तुजा शहास सोडिलें व तो नगर येथून निघून गेला; तेव्हां शहानें साहेबखानाची समजूत करून त्यास नगर येथें परत आणण्याकरितां आपले कांहीं सरदार त्याच्याकडे पाठविले; परंतु त्याच्याविषयीं चोहोंकडे अत्यंत द्वेषभाव पसरलेला असल्यामुळें तो कोणासच हवा असा नव्हता; व त्याचा नाश करण्याचीच प्रत्येकजण संधि पहात होता; त्यामुळें याच सरदारांनीं त्याची समजूत करून त्यास परत नेण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं, त्यास ठार मारिलें; आणि "आपणांशींच साहेबखानानें दंगा केला व त्यांत तो मृत्यू पावला;" असें खोटेंच शहास सांगितलें; याप्रमाणें या महादुष्ट व नीच मनुष्याच्या कल्पनातीत धिंडवड्यांतून निजामशाही दरबार व प्रजा मुक्त झाली न झाली तोंच फत्तेशहा या नांवाच्या एका फकिरावर शहाची अतिशय मर्जी बसली; आणि याच वेळेपासून शहाच्या वेड-लीलामृताच्या दुसऱ्या अध्यायास सुरवात झाली.

चंगीझखान मृत्यू पावल्यानंतर त्याच्याप्रमाणेंच सलाबतखान या नांवाचा एक मोठा राजनिष्ठ, हुषार व इमानी मनुष्य वजीराच्या पदावर होता; परंतु साहेबखानाच्या आग्रहावरून शहानें त्याला कामावरून काढून टाकिलें होतें; तथापि शहा हा सलाबतखानाची योग्यता व कर्तृत्वशक्ति पूर्णपणें जाणून असल्यामुळें, साहेबखानाच्या मृत्यूनंतर त्यानें सलाबतखानास पुन्हां आपल्या पूर्वपदावर स्थानापन्न केलें होतें; व शहाची त्याच्यावर पूर्ववत् मेहेरनजर झाली होती; परंतु त्याबरोबरच फत्तेशहा फकीराचेंहि प्रस्थ साहेबखानाप्रमाणेंच अधिक अधिक वाढत चाललें होतें व शहा त्याच्या पूर्ण आधीन झाल्यासारखा होता. शहानें त्याचा अतिशय बडेजाव माजविला होता; तो ह्मणेल त्याप्रमाणें वागत होता, करीत होता; त्याला नेहमीं संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न करीत होता; आणि त्याला खुष ठेवण्याकरितां शहानें त्याला पुष्कळ जमीन आणि सरकारी जामदारखान्यांतून अनेक मौल्यवान् हिरे, रत्नें वगैरे बक्षीस दिलीं होतीं; तथापि तेवढ्यानेंहि तो संतुष्ट झाला नाहीं; त्याचें समाधान झालें नाहीं; आणि विजयानगरकर रामरायाकडील लुटींत हिरे, पाचू, मोतीं वगैरेंनीं युक्त असलेल्या दोन अतिशय मौल्यवान् कंठ्या निजामशहास मिळालेल्या होत्या, त्या त्यानें शहाजवळ मागितल्या; आणि शहानें त्या दोन्हीहि कंठ्या फत्तेशहास ताबडतोब देण्याबद्दल सलाबतखानास हुकूम दिला, परंतु एवढ्या मौल्यवान् कंठ्या जामदारखान्यांतून जाऊं नयेत, अशा इच्छेनें त्या स्वामिनिष्ठ वजीरानें फत्तेशहास तशाच दोन खोट्या कंठ्या दिल्या; व फत्तेशहानेंही त्या खऱ्या आहेत असें समजून त्यावेळीं त्या आनंदानें घेतल्या; परंतु पुढें वजीराची ही लबाडी फत्तेशहास समजली; तेव्हां त्यानें ताबडतोब ही हकीकत शहास सांगून पुन्हां खऱ्या कंठ्यांची मागणी केली; त्यावर शहानें, "आपल्या जामदारखान्यांतील सर्व जडजवाहीर मला पाहण्याकरितां मांडावें;" असा सलाबतखानास हुकूम दिला; तेव्हां वजीरानें कित्येक विशेष महत्वाचीं व मौल्यवान रत्नें, हिरे, मोतीं, पाच, वगैरे व विजयानगरकराकडील त्या दोन्हीं कंठ्या लपवून ठेवून बाकी जडजवाहीर शहास पाहण्यास एकत्र मांडिलें; परंतु फत्तेशहासह शहानें तें पाहिलें, तेव्हां त्यांत त्या दोन्हीं कंठ्या व आपल्या पूर्णपरिचयाचें कांहीं मौल्यवान् जडजवाहीर त्यांत नाहीं, असें त्यास दिसून आलें; त्यामुळें त्याला अतिशय संताप आला; तें सर्व जडजवाहीर, त्यानें अग्नि पेटवून त्यांत फेंकून दिलें; व तसाच रागानें, फत्तेशहासह तो आपल्या दिवाणखान्यांत परत गेला. इकडे सलाबतखानानें लागलींच, मोठ्या चपळाईनें तें सर्व जवाहीर विस्तवांतून बाहेर काढविलें; त्यांत मोतीं मात्र त्यांचें पाणी गेल्यानें खराब होऊन, बाकी सर्व जवाहीर सुस्थितींत त्याच्या हातीं आलें व त्यानें पुन्हां पूर्वीप्रमाणें तें जामदारखान्यांत ठेवून दिलें.

वर लिहिल्याप्रमाणें शहाची मानसिक स्थिति बिघडलेली असतांनाच "आपला मुलगा—फेरिस्त्याचा सहाध्यायी—मिरान-हुसेन हा आपणांस पदभ्रष्ट करून स्वतः राज्यपद मिळ-

विण्याचीं खटपट करीत आहे; असें त्याच्या मनांत कोणी भरवून दिलें; व त्यासही तें खरें वाटून त्यानें मिरान-हुसेन याला ठार मारण्याचा प्रयत्न आरंभिला; परंतु वजीर सलाबतखान यानें मिरानच्या संरक्षणाची अतिशय काळजी घेतल्यामुळें, या बाबतींतील शहाचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. सलाबतखानानें फत्तेशहास आपल्या हुकुमाप्रमाणें कंठ्या दिल्या नाहींत, ह्मणून शहा आधींच त्याच्यावर रागावलेला होता; आपण स्वतः जडजवाहिर पाहण्यास मागितलें त्यावेळीं सलाबतखान यानें मौल्यवान् जवाहीर मागें ठेविलें, त्यामुळें त्या रागांत भर पडली होती; आणि प्रत्यक्ष आपला मुलगा मिरान हा आपल्या विरुद्ध असून त्यासही आतां सलाबतखानानें आश्रय दिला आहे; ह्मणजे अंतस्थरीतीनें सलाबतखान आपल्या विरुद्ध आहे, अशी शहाची खात्री होऊन तो सलाबतखानाचा सूड घेण्याच्या विचारास लागला; आणि तशी संधीही त्यास लवकरच प्राप्त झाली. त्यानें सलाबतखानास—त्यानें आपणांस न विचारितां इब्राहीम आदिलशहा यास उद्धटपणाचा जबाब पाठविला असा आरोप ठेवून—कामावरून दूर करून जुन्नर येथें प्रतिबंधांत ठेविलें; आणि कासीमबेग हकीम यास आपला दिवाण ह्मणजे वसुली-खात्याचा मुख्य अधिकारी, आणि मिर्झा महंमद तुर्की यास आपला मुख्य वजीर नेमिलें. त्यानंतर आपला मुलगा मिरान याच्याविषयीं शहाच्या मनांत आलेला विकल्प तात्पुरता दूर झाला; व पुढें विजापूरकराशीं तह होऊन मिरान हुसेन याचें शहाजादी खुर्दीजा हिच्याशीं मोठ्या थाटानें लग्न झालें; परंतु या गोष्टीस फारसा काळ लोटला नाहीं तोंच पुन्हां शहास आपल्या मुलाविषयीं संशय उत्पन्न झाला; व त्यानें त्याचा-आपला मुलगा मिरान-हुसेन याचा नाश करण्याचा निश्चय केला; तथापि बाह्यात्कारीं तसें काहींही न दाखवितां त्यानें दिवाण कासीम-बेग ह्यास, "माझा मुलगा मिरान हुसेन हा माझ्या सान्निध रहावा अशी माझी इच्छा आहे;" असें ह्मणून त्यास आपणांजवळ आणून ठेवण्याविषयीं त्यास सांगितलें. कासीम बेग यास, शहाचें हें ह्मणणें खरें वाटलें; शहाची पुन्हां आपल्या मुलावर प्रेमदृष्टी वळली, याबद्दल त्यास फार आनंद वाटला; व त्यानें मिरान-हुसेन यास शहाकडे किल्ल्यांत रवाना केलें. त्यानंतर, तो किल्ल्यांत आल्यावर शहानें त्यास आपल्या खोलीजवळच राहण्यास जागा दिली; आणि रात्रीं तो निजला असतां शहानें त्याच्या बिछान्यास आग लाविली; व बाहेर येऊन खोलीचें दार बंद करून तो आपल्या खोलींत निघून गेला; इकडे बिछाना व इतर वस्त्रें पेटल्यावर शहाजादा खडबडून उठला; व पेटलेलीं अंगावरील वस्त्रें फेंकून देऊन, त्यानें दरवाजाकडे धांव मारिली; परंतु दरवाजा बाहेरून बंद असल्याचें त्यास आढळून आलें. तेव्हां त्यानें मोठमोठ्यानें आरोळ्या मारण्यास सुरवात केली; परंतु कोणीही लवकर दार उघडण्यास आलें नाहीं. इकडे खोलींत आग सारखी पसरत चालली होती; आणि कोंडलेला धूर व ज्वाळा, यामुळें गुदमरून जाऊन शहाजादा मरणप्राय स्थितींत येण्याच्या पंथास

लागला होता. इतक्यांत शहाचा जिवलग स्नेही फकीर फत्तेशहा यास त्याची दया येऊन त्यानें दार उघडून शहाजाद्यास बाहेर काढिलें; आणि दिवाण कासिम-बेग याजकडेस त्याची तावडतोब रवानगी करून दिली; त्याप्रमाणें शहाजादा कासीम-बेगकडे सुरक्षित पोहोंचला; व त्यानें घडलेली सर्व हकीकत त्यास सांगितली; तेव्हां अशा स्थितींत शहाजाद्यास राजधानींत ठेवणें धोक्याचें आहे, अशी कासीम-बेग याची खात्री झाली, व त्यानें शहाजाद्याचा जीव बचावण्याकरितां त्याची तावडतोब दौलताबाद येथें रवानगी करून दिली.

पुढें बऱ्याच वेळानें मूर्तुजाशहा हा पुन्हां आपल्या मुलाच्या खोलींत गेला; आणि तेथें पडलेल्या राखेंत त्याच्या हाडांचा तपास करूं लागला; परंतु तेथें त्यास एकही हाड आढळून आलें नाहीं; तेव्हां तो अतिशय संतापला; व यासंबंधीं त्यानें फत्तेशहाजवळ तपास केला; तेव्हां फत्तेशहानें घडलेली खरी हकीकत त्यास सांगितली. वास्तविक फत्तेशहा यानेंच शहाजाद्यास वांचवून त्याची आपण होऊन कासीमबेगकडे रवानगी केली होती; ह्मणजे शहानेंच वास्तविक निर्दयपणाचें कृत्य करण्याचा प्रयत्न केला असून सुद्धां त्याच्या मताप्रमाणें, न्यायदृष्ट्या जर कदाचित् कोणास अपराधी-शहाच्या इच्छेविरुद्ध त्याच्या मुलाचा जीव वांचविला ह्मणून व जरी तो वास्तविकरीत्या अपराध नव्हता तरी-गणावयाचें असेल तर तें त्यानें फत्तेशहासच गणावयास पाहिजे होतें; परंतु तो शहाच्या पूर्ण प्रेमांतील असल्यामुळें त्याला फत्तेशहानें मुळीं अपराधच केला आहे, असें वाटलें नाहीं; आणि शहानें त्याला या संबंधांत एक शब्दानेंही दुखविलें नाहीं; पण बिचाऱ्या कासिमबेगास मात्र त्यानें तावडतोब पकडून त्याची प्रतिबंधांत रवानगी करून दिली; त्याच्या जागीं दुसऱ्या दिवाणाची नेमणूक केली; व त्यास शहाजाद्याचा वध करण्याची कामगिरी सांगितली; परंतु त्यानेंही ती साफ नाकारिली; त्यामुळें शहानें त्यास तावडतोब कामावरून दूर केलें; आणि औपचारिकरीत्या आपण शहाच्या पक्षाचे आहों, असें त्यास भासविणाऱ्या मिर्झा-खान या नांवाच्या एका सरदाराची शहानें, त्याच्याजागीं नेमणूक केली.

परंतु वास्तविकरीत्या मिर्झाखान हा राजपुत्र मिरानहुसेन याच्या पक्षाचा असून, मूर्तुजाशहा यास पदभ्रष्ट करून, मिरानहुसेन यास गादीवर बसवावें, अशी त्याची इच्छा होती; तथापि वरपांगीं तसें यत्किंचितही न दाखवितां, तो शहा ह्मणेल ती प्रत्येक गोष्ट मान्य असल्याचें दाखवूं लागला; शहाजवळील नोकर-चाकर व विशेषतः फत्तेशहा यास, नेहमीं बक्षिसें व नजराणे देऊन, तो त्यांना खुष ठेवूं लागला; व लवकरच त्यानें फत्ते-खानाची पूर्ण मर्जी व विश्वास संपादन करून घेतला. शिवाय त्यानें अंतस्थरीतीनें विजापूर-कराकडे, तेथील दिवाण दिलावरखान याच्या मार्फत संधान बांधिलें; आणि तिकडून आपल्या मदतीस सैन्य येईल, अशी तजवीज केली. त्याप्रमाणें विजापूरकरांचें सैन्य

निजामशाहीच्या सरहद्दीवर येऊन दाखल झालें; तेव्हां लागलींच मिर्झाखान हाही आपल्या सैन्यासह अहमदनगर येथून निघून राणूरी येथें येऊन मुक्काम करून राहिला. तेव्हां शहास मिर्झाखानाबद्दल संशय उत्पन्न झाला; व त्यानें प्रसिद्ध इतिहासकार फेरिस्ता यास, " राणूरी येथें जाऊन मुक्काम करण्याचें कारण काय ? " ह्मणून मिर्झाखान याला विचारण्याकरितां तिकडे पाठविलें; व त्याप्रमाणें फेरिस्ता मिर्झाखानाच्या तळावर राणूरी येथें गेला; इकडे फेरिस्ता हा शहाच्या पक्षाचा आहे, आणि त्याला जर आपला खरा उद्देश समजला तर तो शहास ती सर्व हकीकत सांगितल्याशिवाय राहणार नाहीं, ही गोष्ट मिर्झाखान यास पूर्णपणें माहीत होती, ह्मणून त्यानें फेरिस्ता यास आपल्या गुप्त मसलतीचा कोणत्याहीप्रकारें मागमूस न लागूं देण्याबद्दल अतिशय सावधगिरी ठेविली; आणि इकडे अंतस्थरीत्या शहाचा जिवलग दोस्त फकीर फत्तेशहा यास मुबलक लांच देऊन त्यास आपल्या पक्षास अनुकूल करून घेतलें; आणि मिर्झाखानानें आपल्या बरोबरील सैन्यासह पुढें विजापूरकडे कूच करून जावें; असा शहाचा हुकूम घेऊन फत्तेशहा यानेंच आपल्या छावणींत राणूरी येथें यावें; अशी तजवीज केली; त्याप्रमाणें फत्तेशहा हा निजामशहाचा हुकूम घेऊन मिर्झाखानास राणूरी येथें त्याच्या छावणींत येऊन भेटला; व त्यास शहाचा हुकूम देऊन तो नगर येथें परत गेला; मध्यंतरीं—जरी मिर्झाखान यानें आपली मसलत फेरिस्ता यास समजूं नये ह्मणून अत्यंत सावधगिरी ठेविली होती तरी—फेरिस्ता यास मिर्झाखानाच्या अंतरंगांतील भेद कळून आला; उलटपक्षीं मिर्झाखान हाही अतिशय धोरणी असल्यानें, फेरिस्ता यास आपला खरा उद्देश पूर्णपणें कळून चुकला असावा; अशी त्यानें योग्य अटकळ बांधिली; व फेरिस्त्यास कैद करण्याचा हुकूम दिला; परंतु ही बातमी फेरिस्त्यास अगाऊच मिळाली; तेव्हां तो मिर्झाखानाच्या छावणींतून रात्रींच जीव घेऊन पळाला; व थेट अहमदनगर येथें परत येऊन त्यानें शहास व फकीर फत्तेशहास, मिर्झाखानाचा खरा उद्देश व घडलेली सर्व हकीकत निवेदन केली; परंतु फत्तेशहा हा मिर्झाखानास आंतून मिळाला असल्यामुळें त्यानें " ही हकीकत खोटी आहे; " असें बाह्यात्कारीं प्रतिपादन केलें, त्यावर फेरिस्त्यानें त्यास पुन्हां असें बजाविलें कीं, माझें व मिर्झाखान याचें कोणत्याहीप्रकारें वैमनस्य नाहीं; त्यामुळें त्याच्या सद्धेतूचा विपर्यास करण्याचें, अथवा त्याच्यावर खोटा दोषारोप करण्याचें मला कोणत्याहीप्रकारें प्रयोजन नाहीं; आणि मी काय ह्मणतों याची तुह्मास लवकरच प्रचीतीही आल्याशिवाय राहणार नाहीं; इतक्यांत, शहाजादा मिरान-हुसेन यास अहमदनगर येथें आणून गादीवर बसविण्यासाठीं मिर्झाखानानें दौलताबाद येथें कूच केलें आहे, अशी बातमी आली; तेव्हां फेरिस्त्याच्या ह्मणण्याची आतां आपणांस सत्यता पटली, असें फत्तेशहा यानें वरपांगीं दाखविलें; व लागलींच त्याच्या धोरणानेंच पूर्णपणें वागत राहणाऱ्या

निजामशहाचीही तशी खात्री पटली; आतां या अरिष्टांतून सुरक्षित व यशस्वीपणें निभावून जाण्यास काय इलाज करावा, अशाबद्दल शहाला विवंचना उत्पन्न झाली; आणि त्यानें "आतां काय करावें ?" ह्मणून फेरिस्त्यास प्रश्न केला; त्यावर फेरिस्त्यानें शहास असें सांगितलें कीं, आपण एकांतवासाचा त्याग करून आपल्या मंडळीसह शहराबाहेर निघावें; ह्मणजे बहुतेक सरदार मिर्झाखानाचा पक्ष सोडून आपणांस येऊन मिळतील; परंतु निजामशहा हा यावेळीं आजारी असल्यानें त्यास घोड्यावर बसण्याची शक्ती नव्हती; त्यामुळें दुसरा कांहीं उपाय असल्यास तो सुचविण्याविषयीं शहानें फेरिस्त्यास सांगितलें; त्यावेळीं, "माजी वजीर सलाबतखान याचो प्रतिबंधांतून मुक्तता करून त्यास पुन्हां पूर्वपदावर स्थापन करावें; ह्मणजे तो लोकप्रिय असल्यानें पुष्कळ मंडळी मिर्झाखानाचा पक्ष सोडून आपल्या पक्षास येऊन मिळतील; इतकेंच नाहीं तर सलाबतखानाच्या मुलाखतीकरितां आपणही मर्जी असल्यास मेण्यांतून जुन्नरपर्यंत जावें;" असें फेरिस्त्यानें शहास सुचविलें; शहास त्याचें हें ह्मणणें पसंत पडलें; त्यानें सलाबतखानास तावडतोब बंधमुक्त करण्याविषयीं जुन्नर येथील किल्लेदारास मुद्दाम हुकूम पाठविला; व स्वतः तिकडे जाण्याचीही त्यानें तयारी केली; परंतु ही गोष्ट फत्तेशहानें ऐकल्यावर-तो प्रतिपक्षास अंतस्थरीतीनें फितूर असल्यामुळें-त्यानें शहाकडे जाऊन त्यास असें सांगितलें कीं, आपण जर राजवाडा सोडून बाहेर जाल तर येथील पहारेकरी मंडळी नवीन शहाची मर्जी संपादन करण्याकरितां आपणांस कैद करून शहाजाद्याकडे पाठवितील; ह्मणून आपण राजवाडा न सोडतां येथेंच रहावें; फत्तेशहाचें हें ह्मणणें शहास खरें वाटलें; त्यानें आपला जुन्नरकडे जाण्याचा बेत रहित केला; व तेथेंच तो सलाबतखानाच्या येण्याची मोठ्या आतुरतेनें वाट पहात राहिला; परंतु शहाचें असें अस्थीर व धरसोडीचें वर्तन पाहून किल्ल्यांतील सर्व फौजेनें शहाचा पक्ष सोडून मिर्झाखानाच्या पक्षास जाऊन मिळण्याचा बेत ठरविला; इतकेंच नव्हे तर सलाबतखान अहंमदनगर येथें येऊन दाखल होण्यापूर्वींच, राजवाड्यांतील व इतर सर्व निजामशाही फौज दौलताबाद येथें निघून जाऊन मिर्झाखान यास मिळाली; आणि सर्व मिळून शहाजादा मिरान-हुसेन यास बरोबर घेऊन ते अहंमदनगर येथें येऊन दाखल झाले. त्यानंतर मिर्झाखान हा शहाजादा मिरान-हुसेन यासह शहरांत येऊन राजवाड्याकडे गेला; त्यावेळीं फेरिस्त्याकडे राजवाड्यांतील पाहरेकऱ्यांवरील मुख्य अधिकाऱ्याचें काम सोंपविण्यांत आलेलें होतें; ह्मणून त्यानें या मंडळींचा राजवाड्यांत प्रवेश न होऊं देण्याबद्दल खटपट केली; परंतु शहाच्या पक्षाला इमानी फेरिस्ता, फितुरी फत्तेशहा फकीर व इतर फारच थोडी मंडळी असल्यानें-आणि उलटपक्षीं शहाजादा मिरानहुसेन व मिर्झाखान यांच्या पक्षास राज्यांतील बहुतेक सर्व प्रमुख सरदार, सेनापति व चाळीस हजार सैन्य असल्यानें-शहाच्या पक्षाचा पूर्ण नाइलाज होऊन त्यास

हार खावी लागली. मिर्झाखान व मिरानहुसेन हे आपल्या सैन्यासह नगरच्या किल्ल्यांत शिरले; त्यांनीं सर्व शहर, किल्ला व राजवाडा आपल्या ताब्यांत घेतला; आणि किल्ल्यांतील व राजवाड्यांतील मंडळींची कत्तल उडविली; त्यावेळीं फेरिस्ता हाही प्राणास मुकला असता; परंतु शहाजादा मिरान-हुसेन व फेरिस्ता हे उभयतां पूर्वकाळांतील सहाध्यायी आणि गुरुबंधू असल्यामुळें शहाजाद्यानें स्वतः मध्यस्थी करून त्यास मात्र जीवदान दिलें. नंतर शहाजादा मिरान-हुसेन हा आपला बाप मूर्तजा निजामशहा याच्याकडे गेला; व त्याचा अतिशय अपमान करून व त्यास ताडण करून, त्याचा वध करण्याकरितां त्यानें तरवार उपसली; तेव्हां " माझा अशारीतीनें वध करण्यापेक्षां माझ्या आयुष्याचे राहिलेले थोडे दिवस मला सुखानें कंठूं दिल्यास तुझी अधीक कीर्ति होईल, " असें शहानें मोठ्या दुःखानें व कळवळ्यानें आपल्या मुलास विनविलें; आणि त्याचा तात्पुरता परिणाम होऊन शहाजादा त्यावेळीं या कृत्यापासून परावृत्त झाला. यावेळीं शहा हा एका दुःसाध्य रोगानें मरणोन्मुख स्थितीप्रत येऊन पोहोंचला होता; तथापि मिरानहुसेन यास, त्याचा आपोआप मृत्यू होई-पर्यंत वाट पाहण्याचा धीर होईना; व शहा जिवंत राहिल्यास आपणास पदभ्रष्ट होण्याचा आज ना उद्या केव्हां तरी पण खात्रीनें प्रसंग येईल, ही भीतीही त्याच्या मनांतून जाईना; तेव्हां अखेरीस त्यानें आपल्या मनाचा पूर्ण निर्धार करून आपल्या बापास—मूर्तुजा निजाम-शहा यास—एका हमामखान्यांत, ह्मणजे स्नानगृहांत नेऊन ठेविलें; त्याठिकाणीं मोठा विस्तव पेटवून त्याचे सर्व दरवाजे बंद करविले; आणि त्यामुळें धूर, वाफ व उष्णता यांनीं त्याचा जीव गुदमरून तो अगदीं थोडक्याच वेळांत त्या ठिकाणीं मृत्यू पावला!

अशारीतीनें आपल्या बापाचा वध करून ( इ. सन १५८६ मध्यें ) मिरान हुसेन हा मिर्झाखानाच्या मदतीनें गादीवर आला; परंतु त्याच मिर्झाखानानें त्यानंतर एक वर्षाच्या आंतच—जमालखानाच्या धुरिणत्वाखालीं दक्षिणी लोकांनीं दंगा करण्यास प्रारंभ केल्यानंतर तो नामशेष करण्याचा रामबाण तोडगा ह्मणून—त्याच मिरान-हुसेन याचा वध केला; आणि त्याचें शीर एका काठीच्या टोंकावर लावून तें लोकांना दाखविण्याकरितां किल्ल्यांतील एका बुरुजावर टांगून ठेविलें; त्यामुळें दक्षिणी लोक चवताळले; त्यांनीं परदेशी लोकांवर तुटून पडून त्यांची भयंकर कत्तल आरंभिली; त्यामुळें मिर्झाखान आपला जीव

मिरान हुसेन हा अवघा दहा महिने व तीन दिवस गादीवर होता; या शहाच्या, आपल्या वडिलांच्या वधासंबंधींच्या कृतीवरून,-त्याचा सहाध्यायी-प्रसिद्ध इतिहासकार फेरिस्ता यानें असे उद्गार काढिले आहेत कीं, " ज्यांनीं आपल्या बापाचा वध करून गादी संपादन केली, असे राज्यकर्ते एक वर्षाहून अधीक काळपर्यंत गादीवर टिकलेले-अथवा अशांचीं राज्यें एक वर्षाहून अधीक काळपर्यंत टिकलेलीं-असें आपल्या पाहण्यांतील इतिहासांत एकही उदाहरण आजपर्यंत आढळून आलें नाहीं.

यावेळीं फेरिस्ता याचें वय सतरा वर्षांचें होतें; निजामशाहीमधील त्याचा आश्रयदाता मुर्तुजाशहा मृत्यु पावलेला होता; आणि नुकत्याच झालेल्या राजक्रांतीमुळें त्याचें मन त्या राज्यांत राहण्यास विटलेलें होतें; शिवाय निजामशाहींत सुनी पंथाचें अतीशय प्राबल्य माजलें असून तो स्वतः शिआपंथाचा असल्यानें त्यास तेथें कोणीही फारसे स्नेही-सोबती नव्हते; त्यामुळें स्वाभाविकरित्याच तेथून दुसरीकडे जाण्याचा त्यानें निश्चय केला; व त्याप्रमाणें विजापूर येथें जाऊन तेथील प्रसिद्ध वजीर दिलावरखान यास भेटला; वजिरानें त्याचें योग्य आदरातिथ्य केलें; आणि सुलतान इब्राहिमशहा यास भेटवून त्याच्याकडून फेरिस्त्यास आपल्या आश्रयास ठेवून घेवविलें व त्यास तेथील सैन्यांत नोकरीही देण्यांत आली; व अखेरपर्यंत तेथेंच तो वास्तव्य करून राहिला.

त्यानंतर लवकरच महूदी धर्माचा कट्टा अभिमानी व निजामशाही राज्याची सर्व सत्ता बळकावून बसलेला सरदार जमालखान याच्या विरुद्ध तेथील राज्याचा अधिकारी बुऱ्हाण निजामशहा यास,-त्याचें राज्य परत मिळविण्याच्या बाबतींत-मदत करण्याबद्दल वजीर दिलावरखान यानें इब्राहिम आदिलशहाचें मन वळविलें; परंतु त्यानंतर उभयतांमध्यें थोडासा मतभेद झाला; कारण दिलावरखानाचें मत असें होतें कीं, जमालखानावर एकदम चढाई करून जाऊन त्याच्याशीं युद्धास सुरवात करावी; उलटपक्षीं शहाचें मत असें होतें कीं, जमालखान हा चढाई करून आल्यानंतर त्याच्याबरोबर युद्ध करावें; इतक्यांत जमालखान हा अहंमदनगराहून परांडा मार्गानें विजापूरच्या रोखानें चाल करून आला; तेव्हां इब्राहीम शहाच्या हुकुमाविरुद्ध वजीर दिलावरखान यानें भीमानदीच्या आसमंतातील प्रदेशांत त्याच्यावर हल्ला केला; परंतु या युद्धांत विजापूरकराचे कित्येक प्रसिद्ध व शूर सरदार दिलावरखानास युद्धभूमीवर सोडून-सिना व भीमा या नद्यांच्या संगमाजवळील-दरसन या गावीं जेथें इब्रा-

टीपः—या फेरिस्त्याप्रमाणेंच औरंगझेबाच्या कारकीर्दींत खाफीखान या नांवाचा एक प्रसिद्ध इतिहासकार होऊन गेला; तो नेहमीं औरंगझेबाबरोबर रहात असे; त्यानें औरंगझेबाच्या कारकीर्दीचा एक मोठा महत्वाचा व सुंदर माहितीपूर्ण असा इतिहास लिहिला; परंतु औरंगझेब सुनीपंथी व खाफीखान शियापंथी, त्यामुळें औरंगझेब जिवंत होता तोंपर्यंत अज्ञातवासांत ठेवून, अवरंगझेबाच्या मृत्यूनंतरच त्यास तो प्रसिद्ध करावा लागला.

हीम आदिलशहा याचा तळ पडला होता, त्याठिकाणीं येऊन शहास मिळाले; त्यामुळें दिलावरखानाचा पराभव झाला; आणि तो आपल्या सैन्यासह शहादुर्गाकडे परत फिरला. यावेळीं फेरिस्ता हा दिलावरखानाबरोबर असून त्यानें या युद्धांत भाग घेतला होता. तो ह्मणतो:- "या युद्धांत मला जखमा झाल्या; त्यामुळें मला दिलावरखानाच्या सैन्याबरोबर शहादुर्गाकडे जातां आलें नाहीं आणि मी जमालखानाच्या हातीं सांपडलों; परंतु मी लवकरच त्याच्या छावणींतून पळून जाऊन मार्गी तेथून मुक्तता करून घेतली." या अवधींत बुऱ्हाण निजामशहा हा जमालखानाबरोबर युद्ध करण्याच्या तयारीनें त्याच्यावर चाल करून आला; त्यामुळें विजापूरकराच्या सैन्याबरोबरील युद्धाचा बेत रहित करून त्यास बुऱ्हाणशहाच्या सैन्याकडे वळणें भाग पडलें; व इकडे जमालखानाच्या तावडींतून निसटलेला फेरिस्ता विजापूरकरांच्या सैन्यांत सुरक्षितपणें येऊन दाखल झाला. जमालखानानें निजामशाही सैन्याकडे पाठ फिरविल्याबरोबर विजापूरकरांच्या सैन्यानें अजमासें १६० मैलपर्यंत—ह्मणजे रोहणखेड्याच्या घाटापर्यंत—त्याचा सारखा पाठलाग केला; परंतु या ठिकाणींही पुन्हां आदिलशहा व त्याचा वजीर दिलावरखान यांच्यामध्यें मतभेद झाला. वास्तविकरीत्या दरसन येथील युद्धापासूनच या मतभेदास तीव्र स्वरूप येत चाललें होतें; आणि आतां तर पुन्हां मतभेद झाल्यानें त्याची परमावधि होण्याचा रंग दिसूं लागला होता. इब्राहीम आदिलशहा अज्ञान होता तोंपर्यंत दिलावरखान ह्मणेल ती पूर्वदिशा, अशी आदिलशाही राज्याची स्थिति होती; परंतु शहा हा जसजसा वयांत येऊं लागला तसतसा दिलावरखानाचा जाच त्यास असह्य होऊं लागला; व तो आपल्या हातीं राज्यसूत्रें घेण्याची खटपट करूं लागला; दिलावरखान हा अतिशय हुषार व राजकारणकुशल असून त्यानें शहाच्या अज्ञानावस्थेंत आदिलशाही राज्याचा कारभार उत्तमप्रकारें चालविला होता; तथापि तो अतिशय स्वार्थी होता; व माजी प्रधान अबुलहुसेन याला ठार मारूनच त्यानें वजीरीपद मिळविलें होतें. अर्थात् आपल्या हातीं आलेल्या सत्तेचा तिळमात्रही अंश शहाच्या हवालीं करण्यास तो तयार नव्हता; इतकेंच नव्हे तर त्यानें शहावर नेहमीं सख्त पाहरा ठेविला होता; व राजवाड्यांत स्वारीमध्यें आणि त्याच्या खास तैनातींत, त्यानें आपल्याच पक्षाची व पूर्ण विश्वासाची मंडळी ठेविली होती. त्यामुळें दिलावरखानाच्या मगरमिठींतून आपण कसें मुक्त व्हावें या विचारांत तो मग्न होता. अखेरीस त्यानें ऐन-उल्-मुल्क गिलनी या नांवाच्या एका शूर, बलिष्ट व दिलावरखानाच्या तोडीच्या सरदाराकडे मोठ्या गुप्तपणें संधान बांधिलें; आणि त्यास आपल्या पक्षाकडे ओढून घेतलें. नंतर एके रात्रीं शहा घोड्यावर बसून आपल्या तळावरून अजमासें एक मैलावर असलेल्या ऐन-उल्-मुल्क याच्या तळावर जाण्यास निघाला; त्यावेळीं त्याचा दुधभाऊ इलीसखान हा पाहऱ्यावरील मुख्य अधिकारी होता, त्यानें शहास अशारीतीनें बाहेर जाण्याच्या तयारींत पाहिलें, तेव्हां तो त्याच्याजवळ गेला; आणि "आपण कोठें जातां" ह्मणून त्यानें शहास विचारिलें;

परंतु शहानें त्यास, " मला कोणताही प्रश्न यावेळीं येथें न विचारितां, तुला जर माझ्या बरोबर यावयाचें असेल तर चल; " असें सांगितलें; तेव्हां इलिसखानही आपणांबरोबरील शंभर स्वारांसह शहाबरोबर गेला; आणि त्याच रात्रीं इतरही अनेक सरदार शहास येऊन मिळून त्याच्याजवळ एकंदर तीन हजारपर्यंत सैन्य जमलें.–फेरिस्ता ह्मणतो कीं, याचवेळीं मीही शहास जाऊन मिळालों.–अशारीतीनें शहा मोकळा झाल्यावर लवकरच दिलावरखानाचें सर्व महत्व नष्ट झालें; तथापि त्यानें शहास पकडण्याची व आपलें वर्चस्व पुन्हां प्रस्थापित करण्याची अतिशय धडपड केली; परंतु त्यांत त्यास यश न येतां उलट आपला जीव बचावण्याकरितां त्यास अहंमदनगर येथें पळून जावें लागलें; परंतु तेथेंही त्यास थारा न मिळाल्यामुळें तो कोठें तरी आश्रय मिळविण्याकरितां भटकत फिरूं लागला. इकडे इब्राहीमशहाही स्वस्थ बसला नव्हता; त्यानें दिलावरखानाच्या हालचालींवर पाळत ठेविली; त्यास फसवून पकडून विजापूर येथें आणिलें; त्याला पूर्ण निरुपद्रवी बनविण्याकरितां, दोन्ही डोळ्यांनीं आंधळें केलें; आणि त्याची सातारा येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत रवानगी केली; व त्याच ठिकाणीं तो पुढें दहा वर्षांनीं आपल्या वयाच्या ९० व्या वर्षीं इ. सन १६०६ मध्यें मृत्यु पावला.

त्यानंतर बरींच वर्षें फेरिस्त्याच्या नांवाचा उल्लेख आढळत नाहीं; त्यावरून याच काळांत त्यानें दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ केला असावा असें दिसतें. तो ह्मणतो:–" मला इतिहास लिहिण्याला मुबलक साधनसामुग्री मिळवून देण्यांत इब्राहीम आदिलशहा यानें पाण्यासारखा पैसा खर्च केला. " अशाप्रकारें फेरिस्त्यास राजाश्रय मिळून त्यानें आपल्या वयाच्या २६ व्या वर्षीं इ० सन १५९६ मध्यें, विजापूर येथील आदिलशाही राज्याचा इतिहास लिहून पूर्ण केला; अकबर बादशहाचा दुसरा मुलगा दानियल मिर्झा यास, त्यानें इ० सन १५९९ मध्यें दक्षिणप्रांताचा सुभेदार नेमून तिकडील कामगिरी सोंपविली होती; व त्याप्रमाणें तो बऱ्हाणपूर येथें येऊन दक्षिणप्रांताचा कारभार पहात होता. या शहाजाद्याबरोबर विजापूरकर इब्राहीम आदिलशहा याची कन्या नामें बेगम सुलताना हिचा विवाह ठरला; त्यावेळीं विजापूर येथून अहंमदनगर येथें त्या राजकन्येस सांभाळून नेण्याची महत्वाची व जबाबदारीची कामगिरी इब्राहीमशहानें फेरिस्ता याजकडे सोंपविली होती. हें लग्न गोदातीरीं मुंगीपैठण येथें इ० सन १६०४ मध्यें झालें; त्यावेळीं फेरिस्ताही त्याठिकाणीं हजर होता; आणि दानियल यानें त्यास आग्रह केल्यावरून तो शहाजादीच्या परिवाराबरोबर बऱ्हाणपूर येथें तिला पोहोंचविण्यास जाऊन व तेथें कांहीं दिवस त्या उभयतांचा पाहुणचार घेत राहून, नंतर तो पुन्हां विजापूर येथें परत आला होता.

अकबर बादशहाचा हा मुलगा,–ह्मणजे दानियल–हाच त्याच्या बाकीच्या सर्व मुलांच्या मानानें विशेष हुषार व कर्तृत्ववान् होता; आणि सर्व मुलांत हाच अकबराचा अतिशय लाडका असून इ० सन १५९९ मध्यें जेव्हां अकबरानें त्यास दक्षिणेची कामगिरी

सोंपविली, त्यावेळीं तो स्वतः दानियलबरोबर बऱ्हाणपूर येथें आला होता; अकबर बादशहाचे तीनही मुलगे—सलीम, मुराद व दानियल हे तिघेही मुलगे मद्यपि निघाले; आणि दानियलचें विजापूरकर बेगम सुलताना हिच्याशीं लग्न झाल्यानंतर लवकरच, ( ता० ८ एप्रील इ० सन १६०५ ) तो बऱ्हाणपूर येथेंच मद्यातिरेकानें मृत्यू पावला; त्यामुळें अकबराच्या शोकपरंपरेंत भर पडली; तो हताश बनला; पूर्ण निराश झाला; भांबावून गेला; त्याला सर्व जग अंधारमय दिसूं लागलें; त्याच्या सर्व आशा नष्ट होऊन तो शून्यमय बनला; आणि त्याच वर्षाच्या सप्टेंबर महिन्यांत अंथरुणास खिळून ता० १५ आक्टोबर रोजीं तो आग्रा येथें मृत्यू पावला; व सलीम ऊर्फ जहांगीर हा गादीवर आला यावेळीं फेरिस्ता याची विजापूर दरबारांतून तिकडे वकील ह्मणून रवानगी करण्यांत आली; त्याचें कारण काय असावें हें नक्की समजत नाहीं; पण अकबराच्या मृत्यूबद्दल दुःख प्रदर्शित करून जहांगीरचें सांत्वन करण्याकरितां, आणि त्याच्या राज्यारोहणाबद्दल त्याचें अभिनंदन करण्याकरितां, त्यास वकील ह्मणून तिकडे पाठविण्यांत आलें असावें, असें अनुमान निघतें. यावेळीं जहांगीर हा काश्मीरमध्यें हवा खाण्यास जात असून मार्गांत लाहोर येथें त्याची छावणी पडली होती. त्याठिकाणीं जाऊन फेरिस्ता त्यास भेटला. ( इ० सन १६०६ या वर्षीं; यावेळीं प्रसिद्ध फ्रेंच प्रवासी बर्नियर हा जहांगीरच्या स्वारीबरोबर होता. ) आणि आपली कामगिरी संपवून तो विजापूर येथें परत आला.

फेरिस्ता यानें इ० सन १५९६ मध्यें—ह्मणजे विजापूरच्या आदिलशाही राज्याचा इतिहास लिहून पूर्ण केल्यानंतर " नवरसनामा " या नांवाचा एक इतिहास लिहिला; त्यांत निजामशाही वगैरे राज्यांची इ० सन १६११ पर्यंतची हकीकत दिलेली आहे; आणि यांतच त्या वर्षीं सुरत येथें पोर्तुगीज व इंग्रज लोकांच्या वखारी असल्याचा उल्लेख केला आहे—ह्मणजे इ० सन १६११ च्या पुढील माहिती त्यांत नाहीं. त्यावरून त्यानंतर लवकरच तो मृत्यू पावला असावा, असें अनुमान निघतें.

फेरिस्त्यानें हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्यांचा—विशेषतः दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा इतिहास लिहिलेला असून त्याचे अनेक तर्जुमे झालेले आहेत; आणि फेरिस्त्याच्या इतिहासाची उत्तमांत गणना होत असून, मुसलमान इतिहासकारांमध्यें त्यास आजतागायत श्रेष्ठ स्थान देण्यांत येत आहे.

वरील एकंदर हकीकतीवरून, निजामशाहींत सुनीपंथाचें विशेष प्राबल्य कसें होतें, शिया, सुनी व महदवी वगैरे पंथभेदांमुळें राजकीय परिस्थिति किती घोटाळ्याची झाली होती; आणि नगर, विजापूर व गोवळकोंडें या राज्यांत कशा भानगडी होत राहिल्या होत्या हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल; पुढील काळांत निजामशाहींत शिया व सुनी हे दोन्ही पंथ मागें पडून महदवी पंथ जोरांत आला; आणि जमालखानाचा नाश झाल्यावरच त्या

पंथाचें वर्चस्व नष्ट झालें. सुलतान बुऱ्हाण निजामशहा यानें गादीवर आल्यावर, जमालखानाच्या कारकीर्दींतील मार्गाल सर्व व्यवस्थेंत पूर्णपणें फेरबदल केला; महदी पंथाविषयीं जमालखानानें प्रसिद्ध केलेले सर्व हुकूम त्यानें रद्द करून टाकिले; महदी पंथांतलि मताविषयीं जे दुराग्रह दाखवितील, त्यांना तात्काळ देहांतशिक्षा देण्यांत येईल, असा हुकूम फर्मांविला; महदी पंथ नामशेष करण्याचे निरनिराळे मार्ग स्वीकारिले; त्या पंथांतील सर्व लोकांना अधिकारभ्रष्ट करून त्यांचें महत्व नाहींसें केलें; पण इतकेंही करून त्याचा राग शांत झाला नाहीं; अथवा महदी लोकांचा पिच्छा त्यानें सोडिला नाहीं; तर त्या लोकांचा अतिशय छळ करण्यास त्यानें सुरवात केली; प्रत्यक्ष शहाच महदी पंथाच्या विरुद्ध होऊन त्या पंथांतलि लोकांचा छळ करूं लागल्याबरोबर इतरांनींही त्या पंथांतलि लोकांना त्रास देण्यास सुरवात केली; आणि अखेरीस या छळवादास कंटाळून त्या पंथांतील सर्व लोक निजामशाही राज्य सोडून दुसरीकडे निघून गेले. निजामशाहींत पहिल्यानें सुनीपंथाचें अतिशय प्राबल्य होतें; पण आतां निजामशाही गादीवर आलेला सुलतान बुऱ्हाणशहा हा शियापंथी असल्यानें, याच्या कारकीर्दींत सुनी पंथ मागें पडून शियाधर्माचें महत्व वाढलें; आणि त्यानें या पंथाची आपल्या राज्यभर वृद्धि करण्याचा प्रयत्न केला.

त्याप्रमाणेंच पुढील काळांत ह्मणजे इब्राहीम निजामशहा याच्या कारकीर्दींत–हा बुऱ्हाणशहाचा मुलगा असून तो दुर्व्यसनी होता; व त्यानें फक्त चारच महिने राज्य केल्यावर तो मारला गेला;–प्रारंभींच, मिआनमंजू हा त्याचा मुख्य वजीर झाल्यानंतर, दाक्षणांविरुद्ध हबशी आणि मौलीद–ह्मणजे परदेशी लोकांची हिंदुस्थानांत जन्मास आलेली संतति–यांच्यामध्यें मोठ्या जोराचे दोन पक्ष निर्माण झाले; त्यामुळें पुन्हां राज्यभर भांडणें व निरनिराळ्या भानगडी उपस्थित झाल्या; दरबारांतील दुफळी मोठ्या निकरावर येऊन विजापूरकराशीं युद्ध सुरू झालें; त्यांत शहा मारला गेला; आणि त्यानंतरही हे तंटे असेच चालू राहून मिआनमंजू यानें अकबराचा मुलगा मुराद यास निजामशाहींत बोलाविलें; त्याप्रमाणेंच पुढील काळांत निजामशाहीचा प्रसिद्ध प्रवर्तक मलिकंबर हा सुनीपंथाचा असल्यामुळें, गोवळकोंडें व विजापूर येथील शियापंथी सुलतानांनीं त्यास, मोंगलांविरुद्ध मदत केली नाहीं; त्यामुळेंच त्याचा पूर्णपणें पराजय होऊन शहाजहान–शहाजादा खुर्रम–विजयी झाला; परंतु ह्या व अशाच प्रकारच्या इतर भानगडी यांचा याठिकाणीं स्थलाभावामुळें त्रोटकच उल्लेख केलेला आहे; तथापि वरील एकंदर विवेचनावरून दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांत त्यांच्याच निरनिराळ्या पंथांतील मतभेद किती प्रखर होते; व त्यामुळें निरनिराळ्या वेळीं कसकशीं चमत्कारिक व भिन्न भिन्न राजकीय स्थित्यंतरें वेगवेगळ्या ठिकाणीं घडून आलीं, आपसांतच परस्पर राज्यांत, आणि एकाच राज्यांतील परस्पर दोन पक्षांत कसकसे चुरशीचे व निकराचे सामने घडून आले, आणि त्याचे परिणामही बहुतेकवेळां किती भयंकर व क्रांतिकारक झाले, आपआपसांतील

धार्मिक मतमतांतराच्या स्पर्धेमुळें उत्पन्न झालेल्या वैमनस्याचें राजकीय वर्चस्वप्राप्तींत रूपांतर होऊन त्यामुळें परस्परांनीं एकमेकांस कसें निर्बळ करून घेतलें; आणि त्यानंतर राजकीय स्थित्यंतरें वरचेवर घडून येण्यास तीच निर्बलता कशी कारणीभूत झाली वगैरे बाबतींचें योग्य अनुमान कोणासही सहज करतां येईल असें मानणें चुकीचें होणार नाहीं.

दक्षिणहिंदुस्थानांत या काळांत मुसलमान लोकांतील आपसांतील धार्मिक मतभेदामुळें ज्याप्रमाणें निरनिराळीं राजकीय स्थित्यंतरें घडून येऊन त्याचा फायदा मराठे व मोंगल यांना मिळाला तसाच फायदा पुढील काळांत पोर्तुगीज व फ्रेंच लोकांविरुद्ध इंग्रज लोकांना हिंदुस्थानांत मिळाला आहे; आणि तुलनात्मकदृष्ट्या त्यासंबंधींचें विवेचन, मोठें मनोरंजक, बोधप्रद व मननीय असल्यानें तें याठिकाणीं अगदीं थोडक्यांत केलें आहे. हिंदुस्थानांत इंग्रजांना पहिल्यानें पोर्तुगीज व नंतर फ्रेंच या दोन युरोपियन राष्ट्रांशीं झगडावें लागलें. त्यांत पहिल्यानें पोर्तुगीज लोकांशीं युद्धकलह झाले, परंतु ते व्यापारविषयक बाबतींवरून झाले; त्या काळांत पोर्तुगीज लोकांचें व्यापारी वर्चस्व परमावधीस गेलें होतें; परंतु इतर अनेक कारणाबरोबर त्यांनीं हिंदुस्थानांत जे धार्मिक जोरजुलूम केले, तेंही एक महत्वाचें कारण होऊन, त्यांच्या वर्चस्वाची हानि झाली; उलटपक्षीं इंग्रज लोकांनीं पहिल्यापासूनच धार्मिक बाबतींत उदार व दिलदार वर्तन ठेविल्यामुळें, पोर्तुगीज लोकांप्रमाणें त्यांच्याविषयीं अप्रीति उत्पन्न न होतां, त्यांचा अतिशय फायदा झाला; त्यानंतर इंग्रजांचा फ्रेंच लोकांशीं संबंध आला; आणि हिंदुस्थानच्या राजकीय रंगभूमीवरील वर्चस्वाचें बक्षीस मिळविण्याकरितां उभयतांमध्यें मोठ्या जोराची व चिकाटीची स्पर्धा सुरू झाली. तथापि त्याबरोबरच फ्रान्समधील धार्मिक वातावरणाचाही हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या राजकारणावर अत्यंत विघातक व इंग्रजांना अत्यंत फायदेशीर असा परिणाम झाला. इ० सन १६२४ मध्यें रिचेल्यू हा फ्रान्सचा प्रधान झाल्यानंतर पश्चिमेकडील कानडा देशापासून तों तहत मादागास्कर आणि ईस्टइंडिजपर्यंत जगांतील निरनिराळ्या भागांत क्रमाक्रमानें वसाहत करणाऱ्या मंडळ्यांच्या स्थापना व वाढ करणाऱ्या सनदा एकामागून एक देण्यांत आल्या; आणि जुन्या राजसत्तेखालीं स्थापन झालेल्या फ्रेंच वसाहतींना दिलेल्या सनदांमध्यें जीं तत्वें आणि हेतू ग्रथित करण्यांत आले होते, तेच ह्या नव्या सनदांमध्येंही स्पष्टपणें नमूद करण्यांत आले होते. पण लक्षांत ठेवण्यासारखी महत्वाची गोष्ट ही आहे कीं, इंग्लंड आणि हालंड यांच्या व्यापारी दप्तरामध्यें त्यांचा मागमूसही नव्हता. शिवाय त्यावेळीं रोमनक्याथलीक धर्माचें महत्व वाढून इतर सर्व धर्मांना कडक बहिष्कार घालण्यांत आला होता; पण उलटपक्षीं धर्मांतर केलेल्या विधर्मीयांलाही फ्रेंच नागरिकांचे सर्व हक्क मिळत होते. शिवाय या स्वाऱ्यांचा मुख्य उद्देश वसाहती स्थापन करण्याचा होता; तरी त्याला धर्मप्रसार हीही एक तितकीच महत्वाची पुरवणी जोडण्यांत आली होती; व समुद्रापलीकडील विस्तीर्ण प्रदेश एकसारखा बळकावीत चाललेला

फ्रान्सचा भयंकर प्रतिस्पर्धी जो स्पेन त्याला जगांतील ख्रिस्तेतर लोकांवर आपला हक्क सांगतां येऊं नये, ह्मणून प्रतिक्रियेच्या नांवाखालीं क्याथलिक धर्मांतील मुख्य धर्मगुरूंच्या हस्तें, कंपन्यांची घटना करण्यांत आली होती. रिचेल्यु नंतर माझारीन हा फ्रान्सचा प्रधान झाला; आणि त्याच्याही कारकीर्दीत, रिचेल्यूप्रमाणेंच, समुद्रापलीकडील देशांत फ्रेंच क्याथलीक लोकांकडून " प्रभूच्या नांवावर " स्पेनला तोडीस तोड ह्मणून वसाहती स्थापन करविणें, हेंच सतराव्या शतकाच्या पहिल्या अर्ध-भागांत फ्रान्स देशाचें वसाहतींविषयक बाबतींचें मुख्य तत्व ठरून गेलेलें होतें, ह्मणजे यावेळीं फ्रान्समध्यें धार्मिक कल्पनांचें अतिशय स्तोम माजलें होतें; व त्याचे वसाहतींविषयक बाबतीवर विघातक परिणाम घडत होते; पुढें अठराव्या शतकांतही फ्रान्सचें धार्मिक धोरण हिंदुस्थानांतील त्यांच्या राजकीय उत्कर्षास असेंच विघातक झालें; फ्रान्समध्यें पूर्वीपासूनच परदेशांत वसाहती स्थापन करण्याच्या विरुद्ध एक पक्ष अस्तित्वांत होता; आणि या शतकाच्या पूर्वार्धांत त्या पक्षाचा व्हाल्टेयर हा प्रसिद्ध लेखक प्रमुख बनलेला होता. त्यानें फ्रान्सच्या हातून कानडा देश गेला—यांत फ्रान्सचा कांहींही तोटा झाला नाहीं—हा फ्रान्सचा फायद्याच झाला, असें उघड उघड बोलून दाखविलें. थोड्याशा कमीअधीक बर्फाच्छादित जमीनींच्या तुकड्याकरितां लढाया करण्याच्या मूर्खपणाबद्दल त्यानें तेथील सरकारचा उपहास केला; आणि पारीस व लंडन येथील रहिवाशांकरितां बुंद, तपकीर आणि मसाला हीं मिळविण्यासाठीं केलेल्या रक्तपाताबद्दल त्यानें दुःखही प्रदर्शित केलें; त्यानंतर—लायल याच्या ह्मणण्याप्रमाणें—त्या शतकाच्या उत्तरार्धांत फ्रान्समधील मुत्सद्दी लोकांच्या आणि तेथील लेखकांच्या मनावर तात्विक राजकीय विचारांचा अधिक परिणाम झाला. तेव्हां रुसो यानें ऐषाराम व अर्वाचीन सुधारणा, यांपासून भ्रष्टतेला नेणारे परिणाम उत्पन्न होतात, असें ह्मणून व मोठमोठे दांडगे लेख लिहून त्याच बाजूचें समर्थन केलें; आणि जरी ह्या लेखकांच्या वर लिहिलेल्या गोष्टीकडे पाहण्याच्या दिशा भिन्न भिन्न असत, तरीही धार्मिक अधिकाऱ्यांची महत्वाकांक्षा, आणि त्यांनीं आपल्या मतांचा व तत्वांचा विस्तार करण्याकरितां अनियंत्रित मार्गानें चालविलेले ढोंगधत्तूरे, यांवर कधीं तेजोभंग करणारे उपरोधिक वाक्प्रहार करण्यांत, तर कधीं निराशेमुळें आपली निव्वळ नापसंती दाखविण्यांत, त्या सर्वांचें एकमत होतें. कानडा देशांत नानाप्रकारच्या धार्मिकपंथांची सत्ता पुष्कळच जोरांत होती; त्यामुळें धार्मिक हितसंबंधाचा राजकीय हितसंबंधावर अतिशयच पगडा असून त्यामुळें तेथील फ्रेंच गव्हर्नरची सत्ताही पुष्कळवेळां दाबली जात असे; त्याप्रमाणेंच इकडे हिंदुस्थानांत सुद्धां जेसुइट लाव्हर यानें रचलेलीं दुर्दैवी लालीविरुद्धचीं कारस्थानें हींच त्याचा बदलौकिक आणि नाश घातुकरीतीनें जवळ जवळ ओढून आणण्याला कारणीभूत झालीं होतीं, ही महत्वाची गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. उलटपक्षीं, ज्यावेळीं फ्रान्समध्यें

परदेशांतील व्यापार आणि दूरवरच्या वसाहती हातांतून गेल्यामुळें झालेल्या नुकसानीबद्दल तेथील लोक भूतदयेच्या वेदांततत्त्वाच्या नवीन उत्पन्न झालेल्या कल्पनांनीं आपलें शांतवन करून घेत होते; त्याचवेळीं, इकडे इंग्लंडमध्यें, अठराव्या शतकांत प्रचलित असलेल्या उदार विचारस्वातंत्र्याचा व उदात्त प्रगतिपर कल्पनांचा परिणाम आशियांतील–हिंदुस्थानांतील–इंग्लिशांच्या राज्यविस्तारावर उलट न होतां कांहींसा फायदेशीरच होत होता. व्यापारापासून ज्याप्रमाणें धार्मिक आणि राजकीय बाबतींत सर्व जगभर स्वतंत्र विचार उत्पन्न झाले, त्याप्रमाणेंच त्यामुळें उत्पन्न झालेलीं उदारमतें, आणि कार्यकारणभाव पाहून वागण्याची पद्धति, यांनींही आपल्यापरीनें व्यापाराला बरीच मदत केली. कारण ज्या चुकांनीं व दुराग्रहांनीं स्पेन, पोर्तुगाल व अंततः फ्रान्स, यांच्या व्यापाराच्या साहसी व्यवसायाला धक्का बसला होता, त्या चुका होण्यापासून त्यामुळें इंग्लंडचें राष्ट्र अलिप्त राहिलें. अठराव्या शतकाच्या मध्यार्धाच्या सुमारास इंग्लंडच्या हिंदुस्थानांतील दिग्विजयांना सुरवात झाली होती; आणि त्या शतकाच्या अगदीं शेवटीं शेवटीं झालेला अत्युत्तम इतिहासकार जो लेकी याच्या ह्मणण्याप्रमाणें, ( Lecky's History of England in the eighteenth Century. हें पुस्तक पहा. ) "त्यावेळीं सुशिक्षित समाजामध्यें धार्मिक बाबतींत चोहोंकडे व्यापक प्रमाणावर तटस्थवृत्ति पसरलेली असून त्यांत नास्तिकपणाचीही थोडीशी छाया दृग्गोचर होत होती." ( A latent Scepticism and a wide spread indifference might be everywhere traced among the cultivated classes ") स्वधर्मांतील मतमतांतरें समान दृष्टीनें पाहण्याची संवय झाली ह्मणजे परधर्मीयांना आपल्या धर्मपंथाची दीक्षा देण्याचा प्रयत्न करण्याच्या भानगडींत कोणीही पडत नाहीं; आणि त्याप्रमाणेंच मूर्तिपूजक समाजाशीं व्यवहार करितांना धार्मिक आणि ऐहिक हितसंबंधाचा घोटाळा उडण्याला कांहींही जागा रहात नाहीं. हिंदुस्थानदेशाच्या ह्या धार्मिक वातावरणामध्यें युरोपियन लोकांना यापेक्षां अधिक योग्य अशी मानसिक तयारी मिळणें शक्य नव्हतें; आणि धार्मिक वर्चस्वाला बळी पडून केलेलें एखादें कृत्य अथवा राजकीयदृष्ट्या गैर असलेलें एखाद्याचें सक्तीनें धर्मांतर, करविल्याचें उदाहरण इंग्लिश ईस्टइंडिया कंपनीच्या कट्या हाडवैऱ्यांनाही आजपर्यंत दाखवितां आलें नाहीं.–ह्मणजे सर्व बाजूंनीं विचार केला असतां हिंदुस्थान देशांत आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां–पहिल्यानें युरोपियन व नंतर एतद्देशीय सत्ताधाऱ्यांबरोबर–झगडत असतांना इंग्लिश ईस्टइंडिया कंपनीला जीं कित्येक नैतिक स्थित्यंतरें फायदेशीर झालीं,— आणि ज्या फायद्यांचा पुढें इंग्लिशांच्या राज्यविस्तारांतही अतिशय महत्वाचा व मौल्यवान् उपयोग झाला, त्यांपैकींच त्या काळांतील इंग्लिश लोकांची शांत आणि दिलदार वृत्ति हेंही एक कारण होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

# परिच्छेद तिसरा.

## दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें

आणि

## मराठ्यांच्या राजकीय उत्कर्षाचें पूर्वस्वरूप.

दक्षिणेंतील मुसलमानी अमलांत मराठ्यांच्या राष्ट्रघटनेस आणि तिच्या प्रगतीस कोणकोणतीं नैसर्गिक, राजकीय, धार्मिक आणि सामाजिक कारणें साह्यभूत झालीं त्यांची मीमांसा करितांना (न्या० रानडेकृत The Rise of The Marhatta Power हें पुस्तक पहा.) खालील कारणें आढळून येतात तीं:—(१) दक्षिणेंतील मुसलमान लोकांचें दिल्ली येथील अफगाण, गिलची, तुर्क, युझबेग, मोंगल इत्यादि कट्टया धर्माभिमानी जातींपासून दूरीकरण; (२) ब्राह्मणी ऊर्फ बहामनी राज्यसंस्थापक हसन गंगू याचें हिंदूलोकांविषयीं उत्तम मत व त्यामुळें त्याच्या कारकीर्दींत झालेलें हिंदूलोकांचें प्राबल्य; (३) त्यामुळें वसूलीखात्यांत व खजिन्याच्या कामांत हिंदू व कायस्थ व पुढें दक्षिणी ब्राह्मण व प्रभू यांचा झालेला प्रवेश; (४) हिंदूलोकांच्या हातीं राज्याच्या हिशोबाचा सर्व अधिकार आल्यामुळें बहामनी राज्यानंतर विजापूर, वऱ्हाड, अहंमदनगर, बेदर व गोवळकोंडें येथील दप्तरांत झालेला मराठी भाषेचा शिरकाव; (५) विजयानगरच्या हिंदुराज्याचें तालीकोटच्या युद्धापर्यंत दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांवर असलेलें विलक्षण वर्चस्व; (६) विजयानगरच्या हिंदुराज्यामुळें हिंदू व मुसलमान यांच्या शक्तीचें समतोलन होऊन मराठे शिलेदारांस मुसलमानी दरबारांत मिळालेली बढती; (७) मुसलमानी राज्यकर्त्यांचे हिंदूलोकांच्या मुलींशीं झालेले शरीरसंबंध व त्यामुळें हिंदूंची त्यांच्या दरबारांत—व राजकारणांत—बसलेली छाप; (८) ज्या मूळच्या हिंदूलोकांचें धर्मांतर होऊन ज्यांना राजपद मिळालें, त्यांचें स्वजातियांविषयींचें उत्कट प्रेम; (९) आणि या सर्व कारणांमुळें दक्षिणेंतील मुसलमानी बादशहांच्या ठिकाणीं आलेलें हिंदुधर्माविषयींचें सहिष्णुत्व, आणि त्यायोगानें सर्व हिंदूलोकांस, राजकीय, धार्मिक आणि सामाजिक गोष्टींत मिळालेल्या सवलती, अधिकार व उत्तेजन;—हीं नऊ कारणें, आणि महाराष्ट्रदेशाची नैसर्गिक रचना, स्थिति व लोकस्वभाव यांची त्यांत पडलेली भर, यामुळें पुढें मराठ्यांचें राज्य स्थापन झालें; ह्मणून या बाबतीचें जास्त स्पष्टीकरण करण्याकरितां, दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांची त्रोटक माहिती, आणि त्यांच्या अमलाखालील, व काळांतील हिंदूंच्या आणि मराठ्यांच्या राजकीय उत्कर्षाच्या पूर्वस्वरूपाची तात्त्विक हकीकत याठिकाणीं ग्रथित करणें आवश्यक आहे.

दक्षिणेंतील पहिलें मुसलमानी राज्य ह्मणजे ब्राह्मणी अथवा बहामनी राज्य हें होय. या राज्याचा संस्थापक जाफरखान ऊर्फ हसन गंगो हा असून, त्याच्यासंबंधीं व या राज्यासंबंधीं पहिल्या भागांत बरीच माहिती दिली आहे; त्यामुळें मराठ्यांच्या उत्कर्षास पोषक, एवढीच माहिती फक्त याठिकाणीं ग्रथित केलेली आहे. जाफरखान हा मोठा कर्तबगार मनुष्य असून तो गंगोपंडित नुजूमू ह्मणजे ज्योतिषी याच्याजवळ दिल्ली येथें गुलाम होता. हा गंगोपंडित महंमद तुघ्लख बादशहाजवळ एक प्रसिद्ध ज्योतिषी ह्मणून असून, त्याच्यावर बादशहाची अतिशय कृपा होती; व त्याच्याच शिफारशीमुळें बादशहानें हसन यास दहा हजार स्वारांची सरदारकी दिली होती; व त्यास दक्षिणेच्या सुभेदाराच्या मदतीस पाठविलें होतें; त्यानंतर त्यानें दक्षिणेंत इ० सन १३४७ मध्यें एक नवीन राज्य स्थापन केलें; "सुलतान अल्लाउद्दीन हसन गंगो बहामनी" असें नवें नांव धारण केलें; गंगो पंडिताच्या कृपेमुळें आपण वैभवास चढलों या उपकाराबद्दल आपल्या शिक्क्यांतही आपल्या नांवापुढें "बंदे सुलतानी हजरत सुभानी अल्लाउद्दीन हसन गंगो बमहनी" असा त्याच्या नांवाचा उल्लेख केला; त्याला दक्षिणेंत आणून आपल्या नवीन राज्याच्या जमाखर्चाचें काम सोंपविलें; मुख्यतः सर्व महाराष्ट्रदेशभर—ह्मणजे दक्षिणेस कृष्णानदीपासून उत्तरेस नर्मदानदीपर्यंत; आणि पूर्वेस तैलंगणचें राज्य व गोंडवणचा अरण्यमय प्रदेश, यांपासून तों पश्चिमेस थेट सह्याद्रिपर्वतापर्यंत—आपल्या राज्याचा विस्तार केला; तेथील जुना हिंदूवतनदारवर्ग त्यांच्या पूर्ववतनावर कायम केला; कर्तृत्ववान् हिंदूलोकांस लष्करी अधिकार देऊन त्यांना जहागिरीही दिल्या; व याच सुलतानाच्या कारकीर्दीपासून हिंदूंना व मराठ्यांना राजकीय वर्चस्व प्राप्त होण्यास प्रारंभ होऊन, हरनाक पोळ व कामराज घाडगे, हे मराठे मनसबदार उदयास आले.

हसन गंगो नंतर त्याचा मुलगा महंमदशहा हा गादीवर आला. ( इ० सन १३५८ ते इ० सन १३७५. ) या शहाच्या कारकीर्दींत मराठ्यांनीं बहिरामखान मझिंदराणी या नांवाच्या एका, त्या शहाच्याच सरदारास उत्तेजन व मदत देऊन, एक मोठें बंड उभारिलें. यावेळीं महंमदशहा मृत्यू पावल्याची खोटी बातमी पसरली होती व दौलताबाद येथील सैन्य कर्नाटक प्रांताच्या मोहिमेवर गेलेलें होतें; अशावेळीं गोविंददेव ( जाधव ) या नांवाच्या एका कर्तृत्ववान् व शूर मराठा सरदारानें पुढें होऊन, शहाविरुद्ध, बहिरामखान यास युद्धास प्रवृत्त केलें; स्वतः पुढारीपणा घेऊन त्याची सर्व व्यवस्था करून दिली; स्वतः आपलें सैन्य बरोबर घेऊन तो बहिरामखानाच्या मदतीस आला; आणि बागलाण व वऱ्हाड प्रांतांतील राजांकडूनही गुप्तपणानें त्यानें मदत मिळविली. नंतर बहिरामखानानें महाराष्ट्रांतील बराचसा प्रदेश व प्रसिद्ध दौलताबादचा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला; हस्तगत करून घेतलेल्या—प्रदेशांतून वसूल

गोळा करून आपल्या सैन्यांत नवीन भरती केली व एकंदर दहा हजार सैन्यानिशीं तो शहाशीं युद्ध करण्यास तयार झाला. शहास ही बातमी कळल्यानंतर त्यानें बहिरामखानाच्या ह्या कृत्याबद्दल त्यास अतिशय दोष दिला व " अजूनही हा बंड करण्याचा नाद सोडून परत आल्यास तुला व तुझ्या अनुयायांना मी क्षमा करीन " असें त्यानें बहिरामखानास कळविलें. तेव्हां " पुढें काय करावें ? " याबद्दल त्यानें गोविंददेवाचा सल्ला घेतला. आणि " तुम्हास स्वतंत्र होण्याची आलेली ही संधि व्यर्थ घालविणें मूर्खपणाचें आहे " अशी त्यानें बहिरामखानास भर दिल्यामुळे तो शहाबरोबर युद्ध करण्याच्या निश्चयानें आपल्या सर्व सैन्यासह व गोविंददेवासह पैठण येथें गेला व त्याठिकाणीं त्या उभयतांनीं आणखीही सैन्य जमविलें; तेव्हां शहानें मसनद अल्लीखान महंमद या नांवाच्या एका अनुभवी व शूर सरदाराबरोबर सैन्य देऊन त्यास त्यांच्यावर रवाना केलें. हा सरदार मोठा धोरणी होता; ह्मणून त्यानें बहिरामखानाच्या सैन्याबरोबर एकदम युद्ध न सुरू करितां तो पैठणजवळ शेवगांव[१] येथें तळ देऊन राहिला. तेव्हां बहिरामखानानें त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला; परंतु मसनदअल्ली हा पूर्णपणें सावध व तयारींत आहे असें पाहून तो तसाच मागें परतला; तथापि हीच गोष्ट त्याच्या नुकसानीस कारणीभूत झाली; त्यामुळें त्याच्या शत्रूस त्याचा दुर्बलपणा दिसून आला, आणि त्याच्या सैन्यालाही यशस्वी होण्याबद्दल शंका वाटूं लागली. त्यानंतर लागलींच मसनदअल्लीनें बहिरामखानावर हल्ला करण्याची तयारी केली. तेथून जवळच शिकार करीत असलेल्या शहास बोलावून घेतलें, आणि बहिरामखानाबरोबर युद्धास प्रारंभ करण्याकरितां तो पुढें चाल करून गेला; परंतु बहरामखानाचें सैन्य यशस्वी होण्याच्या बाबतींत पहिल्यापासूनच साशंक होतें; शहाबरोबरील युद्धांत आपला निभाव लागणार नाहीं, अशीच प्रथमपासून त्या सैन्याची भावना झालेली होती; त्याच्याबरोबरील

---

**टीप १:**—शेवगांव, हें तालुक्याचें ठिकाण नगर जिल्ह्यांत, नगरपासून ईशान्येस ४० मैलांवर आहे. हें शहर हल्लीं मोडकळीस आलें असून तेथें पूर्ववैभवद्योतक तट अस्तित्वांत आहे. या तालुक्याची व निजामच्या राज्याची हद्द लागलेली असून पैठण हें निजामच्या राज्यांतील गांव, शेवगांवपासून अजमासें १४ मैलांवर आहे; व अहंमदनगर ते पैठणपर्यंत पक्की सडक असुन त्या सडकेवरच शेवगांव हें ठिकाण आहे.

पैठण हें निजामशाहींत औरंगाबाद जिल्ह्यांत तालुक्याचें ठिकाण असून तें औरंगाबादेहून दक्षिणेस ३० मैलांवर गोदावरीनदीच्या कांठीं आहे; हें ठिकाण हिंदूलोकांच्या पवित्रस्थानांपैकीं एक असुन—येथूनच एकनाथाची पालखी पंढरपूर येथें जात असते—निरनिराळ्या प्रकारच्या मौल्यवान् व उत्तम रेशमी कापडाबद्दलही प्रसिद्ध आहे.

सैन्य कसलेलें नव्हतें, कच्चें होतें; त्यामुळें लढाईची सरबत्ती उडण्यापूर्वींच तें भीतिग्रस्त झालेलें होतें, अर्थात मसनदअली चालकरून मोठ्या धडाक्यानें पुढें येत आहे, एवढी नुसती बातमीच त्या सैन्यास कळल्याबरोबर त्याची पूर्ण पांगापांग झाली. बहरामखानाच्या मदतीस आलेला बागलाणचा राजा, आपल्या सैन्यासह जीव घेऊन पळून गेला; व बहरामखान व गोविंददेव हेही निराधार होऊन दौलताबाद येथें पळाले; पण तेथेंही निभाव न लागल्यामुळें ते उभयतां गुजराथप्रांतांत पळून गेले व हें बंड जागच्याजागींच थंड झालें; त्याचा पूर्णपणें बोजवारा उडाला. बहामनी राज्याच्या नाशास प्रारंभ होईपर्यंत मराठे लोकांनीं त्याच राज्यांतील एक सरदार पुढें करून—व त्यास प्रमुखपणानें मदत देऊन व पुरवून—उभारिलेलें, असें हें पहिलें, आणि शेवटचेंच बंड होय.

महंमदशहानंतर गादीवर आलेल्या सुलतानांत महंमूदशहा (कारकीर्द इ० सन १३७८ ते इ० सन १३९७.) हा मोठा विद्वान्, न्यायी, दयाशील व सद्गुणी निपजला. गुलाम वंशांतील प्रसिद्ध राज्यकर्ता नासिरुद्दीन महंमूदप्रमाणेंच "मी राज्याचा केवळ संरक्षक आहे; मालक नाहीं," असेंच या शहाचेंही मत असे; व तो गादीवर आल्यावर नेहमीं पांढरे स्वच्छ व साधे कपडे वापरीत असे. त्यानें मलीक सैफ-उद्दीन या हुषार व राजकारणी पुरुषास आपला वजीर नेमलें; व त्याच्याच सल्ल्यानें सुव्यवस्थित राज्यकारभार चालविला. त्याचें नैतिक आचरण कडक असून त्यानें मरेपर्यंत एकपत्निव्रताचें पूर्णपणें पालन केलें; त्यास कवितांचा नाद असून तो स्वतःही कविता करीत असे; या सुलतानानें सुमारें १९ वर्षें मोठ्या शहाणपणानें राज्यकारभार चालविला व आपल्या कारकीर्दींत निरर्थक युद्धें व रक्तपात होऊं दिले नाहींत; शिवाय तो मोठा उदार, शहाणा, विद्याव्यासंगी व रसिक असून विद्वान् व कविमंडळीचा चाहता होता; व त्यानें अशा अनेक विद्याव्यासंगी लोकांस उत्तेजन दिलें होतें; आणि विद्येच्या प्रसाराकरितां गुलबर्गा, बेदर, खंदार, इलीचपूर, दौलताबाद, चौल व दाभोळ वगैरे ठिकाणीं शाळा संस्थापित केल्या होत्या; त्यानें ठिकठिकाणीं अनाथगृहें स्थापन केलीं; आंधळ्या लोकांस नेमणुका बांधून दिल्या; मुसलमानी धर्मोपदेशक ठेविले; व राज्यांत दुष्काळ पडला त्यावेळीं स्वतः दहा हजार बैल बाळगून व बाह्यप्रदेशांतून धान्य आणवून तें गरीब लोकांना स्वस्त दरानें देण्याची तजवीज केली; या सुलतानानें नेहमीं गरीबांचा परामर्ष घेत राहून आपला राज्यकारभार शांततेनें चालविला असून त्याच्या औदार्य, दयाळुत्व, रसिकता, प्रजावात्सल्य, व राजकारणचातुर्य वगैरे सद्गुणांच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत; हा बादशहा आपलें कर्तव्य पूर्णपणें जाणत असे; व "परमेश्वरानें जी राजसंपत्ति दिली आहे, तिचे राजेलोक हे फक्त रक्षक आहेत; आणि

तिचा गैरविनियोग करणें, ह्मणजे परमेश्वराचा विश्वासघात करणें आहे, " असें तो नेहमीं ह्मणत असे. या शहाची कीर्ति ऐकून अनेक मुसलमान कवी व विद्वान् मंडळी त्याच्या आश्रयास गुळबर्गा येथें येऊन राहिली होती व त्याच्या अशा विद्याप्रीयतेमुळें त्यास "मुसलमानी आरिस्टाटल" अशी मानाची पदवी प्राप्त झाली होती; या शहाची कीर्ति ऐकून इराणमधील शिराज येथील प्रसिद्ध कवी हाफीज हा त्याची भेट घेण्याकरितां हिंदुस्थानांत येण्यास निघाला व इराणच्या आखातापर्यंत जेमतेम आला; तोंच समुद्रांत मोठें तुफान होण्यास प्रारंभ होऊन त्यामुळें त्याला फार त्रास झाला; व रत्नाकराचें भयानक स्वरूप पाहून—आणि त्यांत कदाचित् आपणाला जलसमाधी घेण्याचा प्रसंग येईल अशी भीति वाटून—त्यानें गुळबर्गा येथे येण्याचा बेत रहित केला व तेथूनच सुलतान महंमूद, यास एक मोठें मनोरंजक कवितावद्ध पत्र पाठविलें; त्याचा आशय असा कीं, "हे बादशहा, तुझ्या संपत्तीला मोहून, समुद्रपर्यटन करून, मी तुझ्या राजधानींत येण्याचा विचार केला होता; परंतु मला आतां जगांतील सर्व संपत्ति तुच्छ वाटते; आणि माझ्या उद्यानांतील थंड वारा घेत बुलबुल पक्ष्यांचा मंजुळ स्वर ऐकत, आणि गुलाब-पुष्पांची शोभा पहात, मी आतां येथेंच राहतों. तुझ्या राजमुकुटाचीं रत्नें अतीशय सुंदर व देदिप्यमान असतील; व मला त्यांचा मोह पडून मी अनेक संकटें व अडचणी सोसून तुझ्याकडे येईनही; परंतु कदाचित् तोंपर्यंत माझें मस्तकच ठिकाणीं राहणार नाहीं! तुझ्याजवळील मौल्यवान् मौक्तिकांचा विचार मनांत येऊन मला असें वाटलें कीं, तुझ्या राजधानीपर्यंतचा माझा प्रवास, फारशा धोक्यावांचून सहज पार पडेल; परंतु आतां माझी अशी खात्री झाली आहे कीं समुद्राची एक लाट जो अनर्थ करील, तो तुझ्या सर्व संपत्तीनें देखील भरून येणार नाहीं, माझ्या स्वदेशांत माझे स्नेहीसंबंधी व प्रेमीजन पुष्कळ आहेत, त्याअर्थी मला तुझ्याजवळील दुर्मिळ व अमोल्य मोतीं व रत्नें, यांची पर्वा करण्याची काय जरूर आहे? ह्मणून हे बादशहा? ह्या हफीजास मला थोड्याशा मोहरा देऊन जगांतील काळज्या सोडून येथेंच समुद्रापासून व त्याच्या कल्पनातीत भीतिपासून दूर शांततेनें व स्वस्थचित्तानें राहूंदे ह्मणजे त्यांतच मी संतुष्ट राहीन" हें पत्र सुलतान महंमूद यास मिळाल्यावर त्याला फार आनंद झाला आणि त्यानें एक हजार मोहरांच्या किंमतीच्या हिंदुस्थानांतील कलाकौशल्याच्या निरनिराळ्या वस्तू त्यास नजर पाठविल्या; या सुलतानाच्या काळापर्यंत व याच्याही कारकीर्दीत मराठ्यांचा विशेष उत्कर्ष झाल्याचें निदर्शनास येत नाहीं.

ह्या अलौकिक व थोर स्वभावाचा शहा ता० २० एप्रील इ० सन १३९७ रोजीं मृत्यू पावला; आणि चमत्कार हा कीं, त्याचा मुत्सद्दी व अत्यंत मेहेरबानींतील वजीर सैफ—उद्दीन् घोरी, हा त्याच्याच दुसऱ्या दिवशीं—ता० २१ रोजीं, आपल्या

वयाच्या १०७ व्या वर्षी—मृत्यू पावला. सुलतान महंमूदनंतर त्याचा विषयी, व्यसनी, व रंगेल स्वभावाचा मुलगा फिरोजशहा हा गादीवर आला; व त्याच्यानंतर, महंमद वल्ली, ( कारकीर्द इ० सन १४२२—१४३५ ) अल्लाउद्दीनशहा, ( कारकीर्द इ० सन १४३५—१४५७ ) हुमायूनशहा, ( कारकीर्द इ० सन १४५७—१४६१ ) "जालिम" निजामशहा ( कारकीर्द इ० सन १४६१—१४६३ ) व महंमदशहा दुसरा ( इ० सन १४६३ ते इ० सन १४८२ ) हे अनुक्रमें गादीवर आले. त्यांपैकीं अल्लाउद्दीन शहाच्या कारकीर्दींत ख्याजेखान महंमद गवान या नांवाचा एक मनुष्य त्याच्या दरबारीं सरदार म्हणून उदयास आला; आणि फक्त दक्षिणेंतीलच नव्हे तर हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्यांतील एक अद्वितीय मुत्सद्दी, योद्धा व महाविरक्त साधुपुरूष म्हणून भावी काळांत त्याची अतीशय प्रसिद्धी झाली. या थोर पुरुषासारखे अलौकिक पुरुष हिंदू अथवा मुसलमान राज्यांत क्वचितच निर्माण झालेले असल्यानें त्याच्यासंबंधीं त्रोटक हकीकत याठिकाणीं ग्रथित करणें आवश्यक आहे.

ख्वाजा महंमदगवान याचे वाडवडील इराणदेशांतील गिलन येथील राजांच्या वजिराच्या कामावर फार दिवसांपासून होते. पुढें गवानच्या घराण्यांतील एका पुरुषास रश्द ( Rushd ) येथील राज्य प्राप्त झाल्यावर त्याचा जन्म झाला. हें राज्य या घराण्याकडे इराणचा राजा शहा तहमास्प याच्या काळापर्यंत चाललें; या शहाच्या मनांत गवानविषयीं वैषम्य उत्पन्न झाल्यामुळें तो आपणास दगा करील अशी त्यास भीति वाटूं लागली; म्हणून तो स्वदेश सोडून व्यापार करण्याच्या उद्देशानें बाहेर पडला. त्यानें पुष्कळ देशांत प्रवास केला, आणि त्या त्या देशांतील प्रसिद्ध व विद्वान् मंडळींचा त्यानें परिचय करून घेतला. नंतर आपल्या वयाच्या ४३ व्या वर्षी, दक्षिणेंतील विद्वान् लोकांच्या भेटी घेण्याकरितां व व्यापाराकरितां तो दाभोळ बंदरांत येऊन उतरला आणि तेथून पुढें दिल्ली येथें जाण्याच्या इराद्यानें बेदर येथें आला. यावेळीं अल्लाउद्दीन दुसरा हा गादीवर होता. त्यानें गवानच्या अंगीं वसत असलेल्या अनेक अलौकिक गुणांची पारख करून त्यास आपल्या पदरीं सरदाराची जागा दिली; व पुढें हुमायूनशहा यानें आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभींच इ० सन १४५७ मध्यें आपल्या वडिलांच्या इच्छेप्रमाणें महंमद गवान यास "मलिक-उत्त-तुजार" असा किताब देऊन त्याची मुख्य वजिराच्या जागेवर नेमणूक केली. नंतर हुमायूनचा मुलगा निजामशहा याच्या कारकीर्दींतही तो वजीरपदावर असून त्याच्याच सल्ल्यानें शहा नेहमीं राज्यकारभार चालवीत असे. या शहाच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ महंमदशहा दुसरा हा इ० सन १४६३ मध्यें अगदीं अज्ञान म्हणजे नऊ वर्षांचा असतां गादीवर आला. या शहाच्या

आईचें नांव माई राणी हें असून ती मोठी हुशार, विचारी व धोरणी स्त्री होती; व महंमदशहाच्या कारकीर्दींत बहामनी राज्याची विशेष भरभराट होण्यालाही तीच पुष्कळ-अंशीं कारणीभूत झालेली होती. तिनें शहाचा दूधभाऊ ख्वाजा जहान व महंमद गवान या उभयतांना आपल्या मदतीस घेऊन राज्यकारभार चालविला; परंतु पुढें या उभयतां मुत्सद्द्यांमध्यें आपसांत स्पर्धा उत्पन्न झाली; तेव्हां माई राणीनें ख्वाजा जहान यास ठार मारून हें भांडण मिटविलें; आणि महंमद गवान हा एकटाच सर्व राज्याचा-माई राणीच्या अनुमतीनें कारभार पाहूं लागला.

महंमद गवान हा " परदेशी " असून सुनी पंथाचा होता; त्यामुळें याच्या कारकीर्दीपासून दरबारांत दक्षिणी लोकांचें वजन कमी होऊन परदेशी लोकांचें महत्व परमावधीस गेलें. त्याच्या स्वतःजवळ त्यानें दोन हजार मोंगल सैन्य खाजगीरीतीनें बाळगिलें होतें, आणि बहामनी राज्यांतील दहा हजार स्वारांच्या सैन्याची सरदारी-ही त्यास मिळालेली होती. तथापि तो मोठा विरक्त व उदार असून अतीशय राजनिष्ठ होता. त्याची महंमदशहावर अकृत्रिम भक्ती होती; त्याच्या औदर्याची कीर्ति सर्व अशियाखंडभर पसरली होती, आणि विद्वान् मनुष्यांना त्याच्या औदार्याचा लाभ मिळाला नाहीं असें शहरही क्वचितच आढळून येत होतें. शिवाय तो विशेष सुस्वभावी व मनमिळाऊ होता, आणि त्याची न्यायपद्धतीही पूर्ण निर्दोष होती; त्याप्रमाणेंच तो शूर असून अलौकीक मुत्सद्दी होता, आणि त्याच्याच कर्तृत्वामुळें राज्यांत शांतता व सुस्थिति नांदत होती.

अल्लाउद्दीन शहाच्या कारकीर्दींत इ० सन १४५३ मध्यें खेळणा ऊर्फ विशाळगड येथील राजा शंकरराय याच्याबरोबरील युद्धांत बहामनी राज्यांतिल बहुतेक परदेशी सैन्याचा नाश झाला, आणि शूर सरदार तुजार हाही मारला गेला; ही गोष्ट गवानच्या पूर्णपणें ध्यानांत होती; म्हणून त्यानें इ० सन १४६९ मध्यें आपणाबरोबर एक मोठें व पहाडी पायदळ सैन्य घेऊन तिकडे स्वारी केली, व दोन वर्षेपर्यंत कोल्हापूर येथें मुक्काम ठेवून शंकरराय व इतर राजेरजवाड्यांवर आपली मोहीम सारखी चालूं ठेविली. शिर्क्यांचें राज्य नष्ट करून इतर राजेरजवाड्यांना नामशेष केलें व शंकर-रायाविरुद्धही मोठ्या जोरानें मोहीम सुरू केली. यावेळीं शंकरराय हा मोठा बलाढ्य असून त्याच्या ताब्यांत खेळण्याचा मजबूत किल्ला व आसपासचा पहाडी अवघड प्रदेश असून शिवाय तीनशें जहाजांचें एक आरमार त्याच्याजवळ नेहमीं सज्ज असे; व थेट समुद्रकिनाऱ्यापर्यंत त्याचा अंमल चालत असून त्या आरमाराच्या साह्यानें तो बहामनी राज्याच्या व्यापाराला अतीशय उपसर्ग देत असे. असा हा एक

जबरदस्त शत्रू बहामनी राज्यास उत्पन्न झाला होता, परंतु महंमद गवान यानें अखेरीस त्याचा पूर्ण पराजय केला; त्याच्या ताब्यांतील खेळणा किल्ला, रामगडचा किल्ला व त्याचा इतर सर्व प्रदेश हस्तगत करून घेऊन त्यास नामशेष केलें; विजयानगरकराच्या ताब्यांतील गोवें हें महत्वाचें बंदर हस्तगत करून घेतलें; आणि दाभोळ, चौल वगैरे प्रांतांत या प्रदेशाची भर घालून व अशारीतीनें सर्व कोंकणपट्टी बहामनी राज्याच्या अमलाखाली आणून त्या प्रांताच्या बंदोबस्ताकरितां पन्हाळा येथें एका सुभेदाराची नेमणूक केली, व या महत्वाच्या स्वारींत विजय मिळवून तो राजधानींत परत आला.

या विजयामुळें महंमदगवान याचा अतीशय लौकीक होऊन त्याचें महत्व परमावधीस पोहोंचलें. शहानें त्याचा विशेष बहुमान केला; आपल्या आईसह त्याच्या घरीं जाऊन त्याची भेट घेतली; त्यास मानाच्या अनेक पद्व्या अर्पण करून स्वतःच्या अंगावरील झगा काढून त्याच्या अंगावर घातला, व राजमातेनें त्यास आपला " भाऊ " या नांवानें हांक मारून त्याचा गौरव केला. महंमदशहा आपल्या आईसह राजवाड्यांत परत निघून गेल्यावर महंमद गवान आपल्या खोलींत गेला, आणि जमीनीवर अंग टाकून पुष्कळ रडला; नंतर कांहीं वेळानें तो बाहेर आला; बेदरमधील विद्वान् व पूज्य मंडळींना बोलावून आणवून आपणाजवळील हत्ती, घोडे व ग्रंथसंग्रह याशिवायची सर्व संपत्ती त्यानें त्या लोकांना वांटून दिली आणि ह्मणालाः— " ईश्वराला धन्यवाद असोत ! मी मोहजालांतून बचावलों; त्यामुळें आतां मला कोणत्याही प्रकारें भीति राहिली नाहीं. " त्यावेळीं शमसुद्दीन या नांवाच्या एका मुल्लानें " असें करण्याचें कारण काय ? " ह्मणून त्यास विचारिलें; तेव्हां महंमद गवान ह्मणाला, " जेव्हां शहा माझ्या भेटीस आला, आणि राजमातेनें मला " भाऊ " ह्मणून हांक मारिली त्यावेळीं माझी विवेकबुद्धी नष्ट होऊन माझ्या मनांत राजमातेविषयीं पापवासना उत्पन्न झाली; त्यामुळें मला अतिशय त्रास व मानसिक दुःख झालें; ह्मणून या सर्व दुःखाचें मूळ असणारी जी संपत्ती ती सर्व मी वांटून टाकीत आहे. हत्ती व घोडे हे माझे नसून शहाचे आहेत; व माझ्याजवळील पुस्तकसंग्रह मी विद्यार्थीवर्गाच्या उपयोगाकरितां जवळ ठेविला आहे. " यादिवसापासून महंमदगवान हा नेहमीं साधे व हलक्या किंमतीचे कपडे वापरून गरीबीनें रहात असे; राज्यकारभारांतून वेळ मिळेल त्यावेळीं तो आपल्या स्वतः बांधिलेल्या मशीदींत अथवा त्यानें राजधानींत बेदर येथेंच बांधिलेल्या भव्य पाठशाळेंत जाऊन सद्गुणी, विद्वान् व पूज्य मंडळींच्या सहवासांत आपला काळ घालवीत असे; दर शुक्रवारीं वेष पालटून लोकांस दानधर्म करण्याकरितां तो शहरांत फिरत असे व " हें तुह्मांस शहानें दिलें आहे " असें सांगून तो गरीब लोकांना दानधर्म करीत असे; शिवाय कोंकणपट्टीवरील स्वारीनंतर महंमद गवान यानें शहास

राज्यकारभारांतील अनेक बाबतींत व स्वाऱ्यांत अमोल्य मदत केली; त्यामुळें शहा आपल्या अंगिकृत कार्यात यशस्वी होत जाऊन त्याच्या राज्याची अतीशय भरभराट झाली; अर्थात् गवानचें महत्व व वर्चस्वही त्याबरोबरच परमावधीस पोहोंचलें; त्यामुळें पुष्कळ सरदारांच्या मनांत गवानविषयीं अतीशय द्वेषभाव उत्पन्न झाला; त्यानें सैन्य व राज्यव्यवस्थेंत निरनिराळ्या सुधारणा घडवून आणून पूर्वीची अव्यवस्थित पद्धति साफ मोडून टाकण्याचा प्रयत्न केल्यामुळें तर त्या द्वेषाग्नींत तेलच ओतल्यासारखें झालें; आणि त्याचा भडका होऊन त्यांतच अखेरीस या थोर, अलौकिक, निरापराधी व विरक्त साधुपुरुषाचा अंत झाला.

बहामनी राज्य हें पूर्वी चार सुभ्यांमध्यें—ह्मणजे गुलबर्गा, दौलताबाद, तेलंगण व वऱ्हाड, या चार सुभ्यांमध्यें-विभागिलेलें असे; व त्या प्रत्येकावर एक एक सुभेदार नेमिलेला असे; पूर्वी ज्यावेळीं हें राज्य बाल्यावस्थेंत होतें, त्यावेळींही राज्यव्यवस्थेची विभागणी त्यास अनुरूप अशीच होती; परंतु यावेळीं या राज्याचा विस्तार विशेषच व्यापक झाला असल्यामुळें महंमद गवान यानें राज्याचे पूर्वीचे चार सुभे होते त्याऐवजीं आतां आठ केले ते खालीं लिहिल्याप्रमाणें:—

**जुने सुभे.** **नवे सुभे.**

**१ गुलबर्गा**—या सुभ्याचे आणि त्याप्रमाणेंच इतरांचे दोन सुभे करण्यांत आले.

**१ विजापूर**—भीमानदीच्या कांठचे पुष्कळ जिल्हे व रायचूर व मुद्गल हे प्रांत; हा प्रदेश महंमद गवान यानें स्वतःकडे ठेविला.

**२ अहसनाबाद**—यांत गुलबर्गा, सागर, नळदुर्ग व सोलापूर या प्रांतांचा समावेश होत असून, तो हबशी कंचुकी ( Eunuch ) दस्तूर दिनार याजकडे सोंपविला होता.

**२ दौलताबाद—३ दौलताबाद**—हा प्रदेश यूसुफअदिलखान याच्या ताब्यांत होता.

**४ जुन्नर**—यांत कोंकणप्रांत, दक्षिणेकडील इंदापूर, वाई, माण, बेळगांव व गोवें या प्रांतांचा समावेश होत असे. त्यावर फक्रु-उल्-मुल्क् याची नेमणूक केली होती.

**३ तेलंगण—५ राजमहेंद्र**—यांत मच्छलीपट्टण, विलकोंडा, ओरिया व इतर कित्येक ठाणीं यांचा समावेश होत असून, हा प्रदेश निजाम-उल्-मुल्क् बहिरी याच्या ताब्यांत दिला होता.

६ **वारंगळ**—हा प्रदेश आजीमखान याजकडे सोंपविला होता.

४ **वऱ्हाड**—७ **गावेल**—हा प्रदेश फत्तेउल्ला-इमाद्-उल्-मुल्क् याच्या ताब्यांत दिला होता.

८ **माहूर**—हा प्रदेश हबशी खुदावंदखान याच्याकडेस सोंपविला होता.

शिवाय या सर्व सुभ्यांमधील राज्यकारभाराचें बारकाईनें निरीक्षण करतां यावें म्हणून या आठीही सुभ्यांमधील कित्येक ठिकाणचा वसूल शहाच्या खाजगी खर्चाकडे लावून दिला होता; व त्याठिकाणांची व्यवस्था ठेवून तो गोळा करण्याकरितां स्वतंत्र अधिकारी नेमण्यांत आले होते; त्याप्रमाणेंच पूर्वी सुभेदाराच्या ताब्यांत त्याच्या प्रांतांतील सर्व किल्ले असत; त्यामुळें त्यांना बंडें करण्यास सवड मिळत असे; परंतु गवान यानें नवीन व्यवस्था करून प्रत्येक सुभेदाराच्या ताब्यांत फक्त एकच किल्ला ठेविला व वाटल्यास त्यानें त्या किल्लांत रहावें असें ठरवून बाकी किल्ल्यांवर स्वतंत्र अधिकाऱ्यांची व सैन्याची नेमणूक केली; ही व्यवस्था महंमद् गवानच्या मृत्यूपर्यंत कायम राहिली; परंतु त्यानंतर सर्वच राज्यव्यवस्थेंत उलटापालट झाली; अनेक घोटाळे माजले; प्रांतिक सरदार शिरजोर झाले; बहामनी राज्याच्या ऱ्हासाचीं व नामशेष होण्याचीं पूर्वचिन्हें उघड उघड दृग्गोचर होऊं लागलीं; शहाचा अधिकार संपुष्टांत येऊन नष्ट होण्याच्या मार्गास लागला, आणि अखेरीस या बहामनी राज्याचा ऱ्हास होऊन त्यांतून निरनिराळीं पांच स्वतंत्र मुसलमानी राज्यें निर्माण झालीं.

महंमद् गवान यानें राज्यव्यवस्थेसंबंधीं ज्याप्रमाणें उपरीनिर्दिष्ट व्यवस्था केली, त्याप्रमाणेंच त्यानें सैन्याच्या बाबतींतही सुव्यवस्था केली; व सैन्यास नियमीतपणें पगार देण्यासंबंधीं नियम ठरवून त्याची सक्तीनें अंमलबजावणी केली. ले० कर्नल-ब्रिग्स्-यानें लिहिलेल्या फेरिस्त्याच्या इंग्रजी पुस्तकांत ( भाग दुसरा; पान ५०४ पहा. ) या सैन्यविषयक बाबतींसंबंधीं एक मोठा महत्वाचा तुलनात्मक तक्ता दिलेला आहे, व त्यावरून महंमद् गवानच्या सैन्याच्या बाबतींतील व्यवस्थेचें योग्य महत्व सहज लक्षांत येण्यासारखें आहे. तो तक्ता खालीं लिहिल्याप्रमाणें:—

" दक्षिणेंतील बहामनी राज्याच्या कारकीर्दींत स्वतःचा घोडा व हत्यारें बाळगणाऱ्या पांचशें घोडेस्वारांच्या पथकाचा इ० सन १४७० मधील खर्च, आणि तेवढ्याच इंग्रजी लष्कराचा इ० सन १८२८ मधील खर्च, याचा तुलनात्मक तक्ता. "

| संज्ञा. | इ० सन १४७० मधील बहामनी पलटण. | | इ० सन १८२८ मधील इंग्रजी पलटण. | | शेरा. |
|---|---|---|---|---|---|
| | प्रत्येक वर्गाचा दरमहा पगार. | प्रत्येक वर्गाच्या दरमहा पगाराची एकूण बेरीज. | प्रत्येक वर्गाचा दरमहा पगार. | प्रत्येक वर्गाच्या दरमहा पगाराची एकूण बेरीज. | |
| सेनापती | २५०० | २५०० | १००० | १००० | इंग्रजी पलटणींत सेनापति युरोपियन असतो. |
| रिसालदार | ८०० | ८०० | ५०० | ५०० | |
| पांच जमादार | २०० | १००० | १०० | ५०० | |
| वीस दफेदार | ९० | १८०० | ६० | १२०० | |
| हिशोबनीस | १५० | १५० | ५० | ५० | |
| पांचशें स्वार | ४० | २०००० | ३० | १५००० | |
| | | २६२५० | | १८२५० | |
| | | १२ | महिने | १२ | महिने |
| | एकूण | ३१५००० | रुपये. | २९९००० | रुपये. |

शिवाय मि० ब्रिग्स याच्याच शब्दांत म्हणावयाचें " ह्मणजे ही तुलना मनोवेधक व उपयुक्त आहे, आणि इतिहासकार फेरिस्ता यानें दिलेली माहिती—जी उघड उघड खरी आहे असें दिसतें, ती ग्राह्य धरिली तर हल्लींच्या मानानें त्यावेळीं हिंदी सैन्याला पुष्कळच अधीक सढळपणानें पगार दिला जात असे, हें सिद्ध होतें; व त्यावेळची आणि हल्लींची पैशाची किंमत विचारांत घेतली ह्मणजे तर या फरकास विशेषच व्यापक स्वरूप प्राप्त होतें.

महंमद गवान यानें वरील बाबतींशिवाय न्याय व शिक्षणखात्यांत सुधारणा करून जमिनीची नवी मोजणी केली. व जमिनीवर सरकार देण्याचे कर ज्या या जमिनीच्या मगदुराप्रमाणें कायमचे ठरवून दिले; परंतु या सर्व व्यवस्थेमुळें सरदारमंडळींत अतीशय असंतोष उत्पन्न झाला, आणि महंमदगवानचा दत्तक मुलगा व प्रसंगीं त्याच्या जिवास जीव देणारा त्याचा मदतगार यूसफ्-आदिलखान, हा नरसिंगरायावर तैलंगण

प्रांतांत मोहिमेवर गेला आहे ही संधी साधून दक्षिणी व हबशी मंडळींनीं—म्हणजे जरी बहामनी राज्यांत परदेशी लोकांचें विशेष महत्व वाढलें होतें तरी महंमद गवान यानें स्वतः परदेशी, दक्षिणी अथवा हबशी असा कोणत्याहीप्रकारें मनांत भेदभाव न बाळगितां ज्यांना मोठमोठ्या अधिकाराच्या जागांवर स्थानापन्न केलें होतें त्याच दक्षिणी व हबशी मंडळींनीं—निजाम-उल्-मुल्क बहिरी याच्या प्रमुखत्वाखालीं व मदतीनें त्याच्या विरुद्ध एक गुप्त कट उभारिला. झरीफ—उल्—मुल्क व मुफ्ता या नांवाच्या दोन सरदारांनीं हा कट यशस्वीपणें तडीस नेण्याची कामगिरी आपणावर घेतली; महंमदशहा विरुद्ध ओढ्याच्या राजास गवाननें लिहिलेलें असें एक बनावट पत्र तयार केलें; आणि गवानच्या गुलामास दारूंत धुंद करून त्याच्या ताब्यांत असलेलें गवानचें मोर्तब या बनावट पत्रावर करून घेऊन तें आपण रस्त्यांत पकडलें असें शहास सांगून त्याच्या हवालीं केलें; तेव्हां शहानें सत्यासत्याचा कोणत्याहीप्रकारें तपास न करितां गवान यास आपणासमोर बोलाविलें; त्याच्या अनेक हितचिंतकांनीं यावेळीं शहाकडे न जाण्याविषयीं त्यास आग्रह केला; परंतु कोणाचेंही न ऐकतां तो शहाकडे गेला. शहानें त्यास हें पत्र दाखविलें; तें पाहून गवाननें "हें पत्र बनावट आहे; व आपण पूर्णपणें निर्दोषी आहोंत"—असें शहास सांगितलें; व त्याची तशी खात्री करण्याचाही पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्याचा काहींही उपयोग न होतां दारूच्या धुंदींत असलेल्या शहानें त्यास ठार मारिलें. मरतांना या थोर मनुष्यानें शहास बजाविलें कीं, "मी निरपराधी असून मला ठार मारिल्यास तुमच्या नांवास काळीमा येईल, आणि शेवटीं तुमचें राज्यही नष्ट होईल"—आणि हेच गवानचे शब्द पुढें अक्षरशः खरे ठरून, बहामनी राज्य लवकरच नष्ट झालें.

महंमदगवानजवळ अपार संपत्ती आहे, असें महंमदशहानें अनेकवेळां ऐकिलें होतें; त्यामुळें गवान यास ठार मारिल्यावर त्याचा कोशरक्षक निजामुद्दीन हुसेन् गिल्नी यास शहानें त्याची संपत्ती दाखविण्यास सांगितलें; तेव्हां निजामुद्दीन खजाननीसानें "जिवास अपाय करणार नाहीं." अशी शहाकडुन शपथ घेववून शहास गवानचे दोन खजिने दाखविले; त्यांपैकीं एक शहाचा खजिना असून त्यांत फौज, तबेला व खाजगी खर्च यांकरितां ठेविलेले पंधरा हजार रुपये शिल्लक होते; आणि दुसरा गरीब लोकांकरितां ठेविलेला खजीना असून त्यांत फक्त तीनशें रुपये होते; शिवाय त्याच्या राहत्या वाड्यांत स्वतःच्या निजण्याबसण्याच्या भिकार चटया, व स्वयंपाकाचीं मातीचीं भांडीं होतीं; त्याप्रमाणेंच त्याच्या पुस्तकालयांत तीन हजार ग्रंथ होते; परंतु ते त्यानें अगोदरच स्वतः स्थापन केलेल्या पाठशाळेस देऊन टाकिलेले होते.

महंमदगवान हा इराणांतून इकडे आला, त्यावेळीं त्यानें आपणाबरोबर चाळीस हजारांची रक्कम आणिली होती; त्या रकमेवर तो मरेपर्यंत व्यापार करीत असे; व मुद्दल कायम ठेवून जो नफा मिळेल त्यांतून दोन रुपये स्वतःच्या खाण्याकडे व दोन रुपये कपड्यालत्त्याकडे तो खर्च करीत असे. याप्रमाणें या थोर पुरुषाचा अतीशय साधा वर्तनक्रम असल्याचें कोशरक्षक निजामुद्दीन याजकडून कळल्यावर शहासच फक्त नव्हे तर गवानच्या शत्रूसही अतीशय आश्चर्य वाटलें. त्यानंतर गवान विरुद्धचें हें सर्व कारस्थान बाहेर आलें; आणि या थोर पुरुषाचा वध केल्याबद्दल महंमदशहास इतका पश्चात्ताप झाला कीं, त्यामुळें तो झुरणीस लागून पुढें लवकरच मृत्यू पावला.

महंमद गवान हा मोठा मुत्सद्दी, हुषार, शूर व साधुस्वभावाचा असून तो स्वतः कविता करीत असे व त्यास गणितशास्त्राचेंही उत्तम ज्ञान असे. "महंमद गवानची योग्यता त्यावेळीं सर्व लोकांत मोठी होती; इतकेंच नाहीं, पण हिंदुस्थानांतील त्यावेळेपर्यंतच्या सर्व मुसलमानांमध्यें इतका थोर व शहाणा पुरुष निपजला नाहीं असें समजतात. स्वदेशाची नोकरी करितांना स्वार्थ साधण्याची किंवा स्वतः मोठेपणास चढण्याची त्यास यत्किंचित् इच्छा नव्हती. राजावर त्याची भक्ति अगदीं पूर्ण व अकृत्रिम होती. दोन अल्पवयी व अप्रबुद्ध राजांचें त्याने संगोपन केलें; पण त्यांस बाजूस सारून स्वतःचा तळीराम गार करण्याचा अधमपणा त्यानें केला नाहीं. त्यानेंच थोरपदास चढविलेले सरदार पुढें लवकरच अधिकार बळकावून स्वतंत्र होऊन बसले; तर तीच गोष्ट त्यास करण्यास फारशी दुर्घट नव्हती. औदार्य व निःपक्षपात कायम ठेवून त्यानें केलेल्या सुधारणा, युद्धकलेंत दिसून आलेलें त्याचें चातुर्य व धीटपणा, त्याची अप्रतिम न्यायबुद्धि आणि खाजगी व सरकारी संबंधांत परोपकार करण्याची इच्छा इत्यादि अनेक गुणांनीं इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें आहे." ( मुसलमानी रियासत पान २३६–२३७ पहा. ) बहामनी राज्याच्या इतिहासांत त्याच्या थोरपणाच्या अनेक गोष्टी नमूद केलेल्या आहेत; आणि दक्षिण देशांत अथवा हिंदुस्थान देशांतच नव्हे तर जगांतील कोणत्याही देशाच्या इतिहासांतील थोर पुरुषांच्या मालिकेंत या पुरुषाची गणना होईल इतकी अलौकिक त्याची योग्यता होती; ही गोष्टही वरील विवेचनावरून सहज सिद्ध होत आहे.

महंमूदशहा बहामनी याच्या काळांत बहामनी राज्यांतून पांच स्वतंत्र राज्यें निर्माण झालीं; व इ० सन १५२६ मध्यें तें नष्ट झालें. "सुरवंट" किंवा "गुळा" ("घुला") या नांवाचा कांटेरी केसाचा एक सरपटणारा प्राणी आहे. या प्राण्याच्या जन्माबरोबरच त्याच्या आईचा मृत्यु ठरलेला असतो; आणि आपल्या आईला खात

खात हे प्राणी मोठे होत जाऊन ज्या दिवशीं तिच्या शरीराचा शेवटचा अवशेष ते खाऊन टाकितात त्याच दिवशीं त्यांची वाढ पूर्ण होऊन ते स्वतःचें जीवन चालविण्याइतके मोठे व स्वतंत्र होतात. त्याप्रमाणेंच बहामनी राज्यापासून निर्माण झालेल्या पांच राज्यांनीं त्या राज्यास खाऊन टाकून, व त्याच राज्यावर तीं पोसलीं जाऊन मोठीं व स्वतंत्र झालीं. हें बहामनी राज्य पूर्ण भरभराटींत असल्यावेळीं मोठें ऐश्वर्यवान् व दिल्लीच्या मोंगल बादशाहतीच्या तोडीचें होतें; दक्षिणेस तुंगभद्रा नदीपासून उत्तरेस थेट नर्मदा नदीपर्यंत त्याचा व्यापक विस्तार झालेला होता व तें मोंगली राज्याप्रमाणेंच नियमबद्ध, व्यवस्थित व सत्तापूर्ण होतें; परंतु न झेंपणाऱ्या अवजड सत्तेचें एकीकरण, अवजड राज्यविस्तार, अव्यवस्थित राज्यकारभार, प्रांतिक अधिकाऱ्यांना दिलेली अमर्याद सत्ता व त्यामुळें त्यांचा वाढत गेलेला शिरजोरपणा, नालायक राज्यकर्ते गादीवर आल्यामुळें मध्यवर्ती सत्तेस लागलेली ओहोटी व आपसांतील धार्मिक मतभेदामुळें तिला मिळालेली गती—वगैरे अनेक कारणांमुळें तें राज्य अखेर नामशेष होऊन गेलें; आणि योगायोग असा कीं, याच वर्षी—दक्षिणेंतील बलाढ्य बहामनी राज्य नष्ट झालें त्याच वर्षी—उत्तरेस दिल्ली येथें बादशहा बाबर यानें एका बलिष्ट मोंगल साम्राज्याची स्थापना केली; ह्मणजे बहामनी राज्याच्या मृत्यूबरोबर मोंगल राज्याचा जन्म झाला; आणि याच मोंगल राज्यानें पुढें बहामनी राष्ट्रपुरुषाच्या कांहीं मुलांना खाऊन टाकिलें; व तीं राज्यें नामशेष करून टाकिलीं.

या बहामनी राज्यांत बहुतेक प्रजा हिंदू होती. बहामनी राज्यकर्ते आपल्या हिंदू-प्रजेस विनाकारण त्रास देत नव्हते, अथवा धार्मिक छळही करीत नव्हते; इतकेंच नव्हे तर हिंदू लोकांच्या मदतीचीच त्यांना नेहमीं आवश्यकता भासत होती; यादवांच्या राज्याच्या काळापूर्वीपासूनच कोंकणांत, घाटमाथ्यावर व महाराष्ट्रांत सरदार, जहागिरदार, जमिनदार व इनामदारवर्ग अस्तित्वांत होता आणि "इ० सन १४५० च्या सुमारास खानदेशाच्या बारींत निकम ठाण्यास बिंबदेव राणे याचे वंशज, कोळवणांत कोळी, रामननगरास राणे, सोनगड व रायरी प्रांतांत येथील राजे, शिरकाणांत शिरके, खेळण्यास शंकरदेव, वाडीस सांवत, बेळगांवास कर्णराज, मोरागिरीस मोऱ्ये ( ऊर्फ मोरे ) असे लहान लहान मराठे संस्थानिक राज्य करीत होते व या सर्व राज्यांना पुढें बहामनी सत्तेच्या अंकीत व्हावें लागलें होतें. ( राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें; खंड ८ प्रस्तावना पहा. ) तथापि राज्यांत वसाहती व लागवड करून तेथील वसूल गोळा करण्याकरितां देशमूख, सरदेशमूख, देशपांडे, सरदेशपांडे, कानगो व सरकानगो, पाटील व कुळकर्णी वगैरे अधिकारी मुसलमानी राज्यांत नेमण्यांत येत असत; त्यांपैकीं बहुतेक सर्व हिंदू अथवा मराठे वतनदार असत; आणि राज्याच्या वसुलीच्या प्रधान-बाबतींत त्यांना हिंदू वतनदार-

वर्गावर अवलंबून रहावें लागत असे; त्यामुळें हिंदुलोकांना मुसलमानी काळांत बरेंच राजकीय महत्व प्राप्त झालें होतें; ह्मणजे राजा तोडरमल्ल यानें " राज्याचे हिशोब फारसी भाषेंत ठेवावे, " असा अकबर बादशहाच्या अनुमतीनें हुकूम दिल्यानंतर पुढें लवकरच हिंदु लोकांना मोंगल दरबारांत जें राजकीय महत्व प्राप्त झालें, तसें महत्व, बहामनी राज्याच्या प्रारंभापासून, वतनदारवर्ग आणि त्याप्रमाणेंच, " मराठी हीच सरकारी दप्तरची भाषा " कायम राहिल्यामुळें हिंदु व मराठे लोकांना दक्षिणेंतील बहामनी राज्यांत, आणि त्यापासून निर्माण झालेल्या राज्यांत पहिल्यापासूनच प्राप्त झालेलें होतें, ही गोष्ट विशेष महत्वाची व लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

हुसेन गंगो बहामनी याच्या कारकीर्दीत हरनाक पोळ व कामराज घाटगे हे दोन शूर मराठे मनसबदार उदयास आले. " घाटगे " हें सूर्यवंशी क्षत्रीय घराणें असून तें पुष्कळ प्राचीन आहे. कामराज घाटगे याचें घराणें ( सातारा जिल्ह्यांतील ) खटाव प्रांतांतील मलवडी येथील राहणारें असून मलवडी व ललगुण या दोन महालांची कामराज याजकडे देशकत होती; यांना " मलवडीकर घाटगे " असें ह्मणतात. यांचा मूळपुरूष कामराज घाटगे हा सोळा वर्षांचा असतां त्यास ब्राह्मणी राज्यांत तीनशें स्वारांची मनसबदारी मिळाली होती. पुढें कामराजनें पराक्रम गाजविल्यामुळें शहाची त्याच्यावर मर्जी बसली; व त्यानें हरनाक ऊर्फ हणंगनाक पोळ या नावांच्या एका मराठा सरदाराच्या मुलीबरोबर त्याचें लग्न लावून दिलें- या हरनाक पोळासही बहामनी राज्यांत कामराजप्रमाणेंच तीनशें स्वारांची मनसबदारी होती. कामराज घाटगे हा धार्मिक प्रवृत्तीचा मनुष्य असून रामेश्वर भटजी या नांवाचा एक सिद्ध-पुरुष त्याचा पुरोहित होता व त्याच्याच कृपेनें कामराजास वैभव प्राप्त झाल्यामुळें त्यानें या महापुरुषाच्या गंधाक्षताचें निशाण व चंबूचा शिक्का केला होता व तो या घराण्यांत शेवटपर्यंत चालत होता. या महापुरुषाचा जांवई नारायण हरी ह्मणून एक देश-कुळकर्णी होता, व त्याच्यावर कामराजाचा अतीशय विश्वास होता; त्यामुळें त्यानें नारायण हरीस आपल्या वतनाची व्यवस्था लावण्याकरितां मुतालीक नेमिलें होतें व आपण बेदर येथें शहाच्या दरबारीं रहात होता. कामराज हा अनेक पराक्रम करून इ० सन १४३९ मध्यें मृत्यू पावला. त्यास परसनाक, लोहनाक, नयनाक, जैतपाळनाक, बगडनाक व लोकनाक असे सहा मुलगे होते; व त्यांचा पुढें पुष्कळ विस्तार झाला असून हल्लीं घाटगे मंडळ ह्मणून जेवढें आहे तें सर्व या सहा पुरुषांचे वंशज आहेत. या सहा पुरुषांपैकीं परसनाक व जैतपाळनाक यांचा वंश खटाव, मलवडी, बुध, ललगूण वगैरे ठिकाणीं देशकत करून राहिला. लोकनाकाचा वंश कागल येथें जाऊन तिकडेस प्रसिद्धीस आला, आणि लोहनाकाचा वंश पुढें निजा-

मशाहींत उत्कर्ष पावून अतीशय प्रसिद्धीस आला व त्याचा पुढें मराठी राज्याशीं विशेष महत्वाचा व निकटचा संबंध घडून आला.

याच काळांत बहामनी राज्यांत एक ब्राह्मण मुत्सद्दीही उदयास आला. तो ह्मणजे महापुरुष रामेश्वरभटजी याचा नातू दादू नरसू हा होय. इ० सन १३९६ मध्यें महाराष्ट्रांत दुर्गादेवी या नांवाचा एक बारा वर्षांचा भयंकर दुष्काळ पडला व त्यामुळें सर्व देश उध्वस्त होऊन गेला. त्यानंतर पुन्हां पर्जन्य पडला; तथापि गोदावरी व कृष्णा या नद्यांमधील प्रदेश इतका निर्जन होऊन गेला होता कीं, त्यानंतर तीस वर्षें त्या प्रदेशाचा जेमतेम अगदीं अल्प वसूल गोळा होत असे. शिवाय दुष्काळ संपल्यानंतर महाराष्ट्रांत बेरड व रामोशी लोकांनीं कित्येक डोंगरी किल्ले व इतर बळकट जागा आपल्या ताब्यांत घेऊन रयतेस भयंकर त्रास देण्यास व लूटमार करण्यास सुरवात केली, आणि खटाव येथें भूपतराव बेरड यानें व मौजे भांडवली कसबे मलवडी येथें महिपतराव बेरड यानें आसपासच्या प्रदेशांत प्रळय करून सोडिला. तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां व पूर्वीच्या लोकांची वसाहत करून देण्याकरितां सुलतान अहंमदशहा वली बहामनी यानें इ० सन १४२९ मध्यें आपला-पुढें खेळणा प्रांतावरील स्वारींत मारला गेलेला शूर सरदार—मलिक्-उत्-तुजार यास खटाव प्रांतीं सैन्य देऊन पाठविलें; व त्याच्याबरोबर दादू नरसू ( याचा दादाजी नरसिंह या नांवानेंही उल्लेख केलेला आहे. ) या नांवाच्या एका ब्राह्मण मुत्सद्याची तिकडे रवानगी केली. त्याप्रमाणें तुजार हा पहिल्यानें कृष्णानदीच्या तीरानें कऱ्हाडास येऊन तेथून माण प्रांतांत गेला. तिकडील बेरड दंगेखोर लोकांशीं सतत दोन महिने युद्ध केलें; त्यांच्या ताब्यांतील कांहीं किल्ले व प्रदेश हस्तगत करून घेतला व बेरड लोकांशीं सलोखा करून व त्यांना वाघिनगिरा, पाल, चित्रदुर्ग, वगैरे गांवीं जागा देऊन तो आपल्या सैन्यासह व दादाजी-सह बेदर येथें परत आला. त्यानंतर शहानें सर्व खटावप्रांत दादू नरसू व दरबारांतील एक तुर्क खोजा यांच्या ताब्यांत देऊन त्यांची तिकडे रवानगी करून दिली; व त्याची लावणी-संचणी करण्याचें काम त्यांच्याकडेस सोंपविलें. तेव्हां त्यांनीं तिकडे जाऊन ठिकठिकाणीं एका पांढरीच्या चार करून त्यांना गांवांचीं निरनिराळीं नांवें दिलीं; लोकांस वसाहत व लावणी-संचणी करण्यास भरपूर सवलती देऊन अतीशय उत्तेजन दिलें; व पहिल्या वर्षी जमीनीचा वसूल न घेतां दुसऱ्या वर्षी दर बिघ्यास फक्त एक तोब्राभर धान्य घेण्याचा ठराव केला. या वसुलास "दादोनरसिंही तोब्रा" हें नांव असून तें अद्यापि प्रसिद्ध आहे; यावरून मुसलमानी अमदानीत दुष्काळ संपल्यावर प्रारंभास शेतसारा किती अल्प घेत असत हें निदर्शनास येत आहे.

दादाजी नरसिंह हा तिकडील कारभार पाहूं लागल्यावर त्यानें खटाव, ललगून व मलवडी येथील देशकुळकर्णाचें काम नारायण हरी या नांवाच्या मनुष्याकडे सोंपविलें व त्यावर स्वतः देखरेख ठेवून कामराज घाटगे याच्या देशगतीची—ह्मणजे देशमुखी वतनाची—उत्तम व्यवस्था चालू राखिली; व तिकडील सर्व बंडावे मोडून शांतता स्थापन केली. एकंदरींत पाहतां दादाजी हा मनुष्य मोठा हुषार व शहाच्या विशेष मेहेरबानींतील असावा असें दिसतें; तथापि त्याच्याविषयीं याहून अधिक माहिती उपलब्ध नसून तो पुढें कधीं मृत्यू पावला, हेंही बरोबर समजून येत नाहीं.

सुलतान अल्लाउद्दीन शहाच्या कारकीर्दीतील मलिक्‌—उत्‌—तुजार याच्या इ० सन १४५३ मधील कोंकणपट्टीवरील स्वारींत व महंमद गवान याच्या इ० सन १४६९ मधील त्या प्रदेशावरील स्वारींत " शिर्के " हें नांव आलेलें आहे. हें घराणें फार जुनें, उच्चप्रतीचें, विशेष प्रसिद्ध व सातारा आणि कोल्हापूर येथील छत्रपतींच्या नात्यांतील असून मराठी राज्याच्या काळांत त्यांनीं पुष्कळच महत्वाची कामगिरी बजाविली आहे. त्यामुळें या घराण्यासंबंधींही याठिकाणीं थोडक्यांत उल्लेख करणें आवश्यक आहे. ग्रँड डफ यानें आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत ( पान २७ पहा. ) शिर्क्यांसंबंधीं असें लिहिलें आहे कीं, तेराव्या शतकाच्या प्रारंभीं, ह्मणजे ज्यावेळीं सिंघण राजानें पन्हाळ्याच्या राजाचें राज्य जिंकून घेतलें त्यावेळीं, कृष्णानदीच्या उगमासभोंवतालचा प्रांत ज्या पाळेगारानें हस्तगत करून घेतला त्याचेच शिर्के हे वंशज आहेत; परंतु डफ यानें आपल्या या लिहिण्यास पुष्टिकारक आधार दिलेला नसल्यानें त्या माहितीवर कितपत भरंवसा ठेवावा हा प्रश्नच आहे. उलटपक्षीं उपलब्ध असलेल्या निरनिराळ्या माहितीवरून व पुष्टिकारक आधारावरून शिर्के हे महाराष्ट्रांतील अति प्राचीन क्षत्रीयकुलांतील उच्चप्रतीचे मराठे आहेत असेंच सिद्ध होत आहे; व हीच माहिती, ग्रँड डफच्या लिहिण्याहून अधीक सयुक्तिक व ग्राह्य मानणें आवश्यक आहे.

या शिर्के घराण्यांतील मूळ पुरुषाचें नांव वज्रपाळ हें असून तो सचीवाच्या ताब्यांतील मुसे खोऱ्यांतील शिरकवली या गांवीं जंगलांत शिरकाई देवीचें स्थान आहे तेथें जाऊन राहिला; त्याठिकाणीं असतां त्यानें शिरकाई देवीस प्रसन्न करून घेतलें; पुढें तळकोंकणांत जाऊन त्यानें तिकडील ८४ गांवें आपल्या हस्तगत करून घेतलीं; त्यानंतर या घराण्यानें कोंकणांतील पुष्कळ प्रदेश आपल्या ताब्यतां मिळवून ते तिकडे स्वतंत्रपणें राज्य करूं लागले; व साताऱ्या जिल्ह्यांतील कुंभारली घांटाच्या दक्षिणेस दोन कोसांवर सह्याद्री पर्वताच्या माथ्यावर बहिरवगड ह्मणून एक किल्ला आहे त्याठिकाणीं त्यांनीं आपल्या राहण्याचें व सर्व व्यवस्थेचें मुख्य ठाणें ठेविलें. शिर्क्यांचें

कोंकणांतील हें राज्य पुढें इ० सन १४६९ मध्यें बहामनी राज्यांतील प्रसिद्ध सरदार व मुत्सद्दी महंमद गवान यानें नष्ट केलें व तिकडे मुसलमानी अंमल चालू केला.

बहामनी राज्यापासून उत्पन्न झालेल्या पांच राज्यांपैकीं वऱ्हाडची इमादशाही ही फत्तेउल्ला इमादशहा या नांवाच्या एका शूर पुरुषानें स्थापन केली. हा मूळचा विजयानगर येथील एका तेलंगी ब्राह्मणाचा मुलगा होता. विजयानगरच्या राज्यकर्त्याबरोबर चाललेल्या युद्धांत तो मुसलमानांच्या हातीं सांपडला व त्यानंतर त्यानें मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली. बहामनी राज्याचा आधारस्तंभ असलेला प्रसिद्ध मुत्सद्दी महंमद गवान याची त्यानें मेहेरबानी संपादन केली; इमाद-उल्-मुल्क हा किताब व वऱ्हाडची सुभेदारी त्यानें मिळविली व इ० सन १४८४ मध्यें " इमादशहा " हें नांव धारण करून तो स्वतंत्र झाला. हें राज्य अल्पकाळ जिवंत राहिलें व पुढें लवकरच इ० सन १५७२ मध्यें निजामशाहीस जोडलें गेलें; त्यामुळें या राज्यांत मराठ्यांचा उत्कर्ष होण्यास फारशी अवधीच मिळाली नाहीं; व त्यांना या औटघटका जिवंत राहिलेल्या राज्यांत विशेष राजकीय महत्व प्राप्त झाल्याचा उल्लेखही आढळून येत नाहीं.

बहामनी राज्यापासून निर्माण झालेलें दुसरें राज्य म्हणजे बेदरची बेरिदशाही ही होय. या घराण्याचा मूळपुरुष काशीम बेरीद हा पहिल्यानें महंमदशहा बहामनी याच्याजवळ गुलाम होता; या शहाच्या कारकीर्दींत पैठण आणि चाकण यांच्या दरम्यान साबाजी या नांवाच्या एका मराठा नाईकाच्या प्रमुखत्वाखालीं मराठ्यांनीं बंड केलें; तेव्हां तें मोडण्यासाठीं शहानें काशीम बेरीद याची तिकडे रवानगी केली. त्याप्रमाणें काशीमनें तिकडे गेल्यावर साबाजीशीं युद्ध करून त्यास ठार मारिलें; व तें बंड साफ मोडून टाकिलें. त्यामुळें महंमदशहानें संतुष्ट होऊन साबाजीच्या ताब्यांतील सर्व प्रदेश काशीम यास बक्षीस दिला व साबाजीच्या मुलीचें काशीमचा मुलगा अमीर याच्याशीं लग्न लावून दिलें. ( कांहीं ठिकाणीं साबाजीच्या मुलीचें लग्न खुद्द काशीमशींच झालें, असाही उल्लेख आढळतो. ) यावेळीं साबाजीच्या फौजेंतील अजमासें चारशे मराठे कासीमच्या नोकरींत राहिले; व त्यांपैकीं बहुतेकांनीं मुसलमानी धर्माचा स्वीकार केला. या मराठा सैन्यावर कासीमचा अतीशय विश्वास व मेहेरबानी असे व त्याच्या अमलाखालील प्रदेशांत व त्याच्या दरबारांतही या मराठा सैन्याचें पुष्कळच राजकीय महत्व असे. त्यामुळें—अदिलशाही, निजामशाही व इमादशाहीप्रमाणेंच या सैन्याच्या बळावर व या तीन्हींही राज्यकर्त्यांच्या अनुमतीनें आपणही स्वतंत्र व्हावें असा त्यानें घाट घातला व इ० सन १४९२ मध्यें तो बेदर येथें स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. तो बारा वर्षें राज्य करून इ० सन १५०४ मध्यें मृत्यू पावला व त्याचा मुलगा अमीर बेरीद हा गादीवर

आला; याच्याच कारकीर्दीपासून ( इ० सन १५०४–१५४९ ) या राज्यास उतरती कळा लागण्यास मोठ्या झपाट्यानें प्रारंभ झाला, आणि अली बेरीद् शहाच्या कारकीर्दीत ( इ० सन १५४९–१५९२ ) तें राज्य नष्ट झालें. हें राज्यही वऱ्हाडच्या इमादशाही" प्रमाणेंच अल्पकाळ अस्तित्वांत राहिलेलें असल्यामुळें त्यांत मराठ्यांचा विशेष उत्कर्ष होण्यास अवसर मिळाला नाहीं.

बहामनी राज्यापासून निर्माण झालेलें तिसरें राज्य, ह्मणजे गोवळकोंडें येथील कुत्बूशाही राज्य हें होय. या घराण्याचा मूळपुरुष कुली कुत्बूशहा हा इराणमधील एका प्रमुख जातींत, हमदान प्रांतांतील सय्यदाबाद या गांवीं जन्मास आला. हा मनुष्य लहानपणापासूनच मोठा हुषार व चलाख असून तो आपल्या चुलत्याबरोबर दक्षिणेंत आला व सुलतान महंमदशहा बहामनी याच्या आश्रयास राहिला. पुढें एके रात्रीं महंमदशहा हा आपल्या दरबारी मंडळींसह गाणें ऐकत बसला असतां दक्षिणी व हबसी लोकांनीं त्याच्यावर एकाएकीं हल्ला केला; त्यावेळीं कुली कुत्बूशहा व दुसरी दहा परदेशी मंडळी, यांनीं मोठा पराक्रम करून त्यास सुरक्षीतपणें किल्ल्यांत नेऊन पोहोंचविलें; त्यामुळें शहाचा जीव बचावला; तेव्हांपासून त्याची कुली कुत्बूशहावर अतीशय मर्जी बसली व त्यानें कुत्बूशहास " मलिक्,–कुत्बू–उल्मुल्क् " असा किताब देऊन त्यास आपल्या राज्याचा दुय्यम वजीर नेमिलें; पुढें मलिक दिनार या सरदारावरील स्वारींत त्यानें पराक्रम गाजविल्यामुळें शहानें महंमद गवान याच्या शिफारशी करून, व त्यास " अमीर–उल्–उमराव " असा किताब देऊन तेलंगण प्रांतावर सुभेदार नेमिलें; कोतगीर व उदगीर हे दोन गांव त्याच्या खास तैनातीस लावून दिले; ( इ० सन १४९५ व त्याप्रमाणें तिकडील प्रांताचा तो कारभार पाहूं लागला.

त्यानंतरच्या काळांत एका बंडांत दोन हिंदू सरदारांचा नामनिर्देश आढळतो कोंकणप्रांताचा सुभेदार बहादूरखान गिलनी यानें महंमदशहा विरुद्ध बंड उभारिलें; तेव्हां महंमदशहा, कुलीकुत्बूशहासह त्याच्यावर चाल करून गेला, आणि बहादूरखान हा मिरज येथील किल्ल्यांत आहे असें पाहून त्यानें त्या किल्ल्यास वेढा दिला तेव्हां बहादूरखानाकडील सरदार पोटानाईक व त्याचा मुलगा देव नाईक यांनीं कुत्बूशहाच्या सैन्यास एकीकडे घेऊन त्याच्याशीं मोठ्या निकरानें सायंकाळपर्यंत युद्ध केलें; व त्याचा पूर्ण पराभव करण्याची वेळ आणिली. इतक्यांत पोटानाईकाचा मुलगा देव नाईक अकस्मात युद्धांत मारला गेला व पोटानाईक त्या दुःखानें हताश होऊन शहास शरण येऊन त्यानें मिरजचा किल्ला कौलानें शहाच्या स्वाधीन केला. नंतर कुलीकुत्बूशहा हा तेलंगण प्रांतांत आपल्या सुभेदारीवर जाऊन तिकडील कारभार पाहूं

लागला; व बहामनी राज्यांतील इतर सुभेदार स्वतंत्र झाले तरी तो त्या राज्याशीं पुष्कळ काळ एकनिष्ठेनें वागला; परंतु अखेर महंमदशहाचा वजीर अमीर बेरीद याचा अंमल त्यास सहन न होऊन त्यानें इ० सन १५१२ मध्यें "शहा" हा किताब धारण करून तो स्वतंत्रपणें राज्यकारभार करूं लागला; गोवळकोंडें हें शहर त्यानें आपल्या राजधानीचें ठिकाण केलें, पूर्व तैलंगणप्रांत हस्तगत करून करून घेऊन आपल्या राज्याचा थेट समुद्रकिनाऱ्यापर्यंत विस्तार केला व या हस्तगत केलेल्या सर्व प्रदेशभर त्यानें मुसलमानी धर्म चालू केला. त्यामुळें कामामेटचा राजा सीतापती, कंडापिलीचा राजा रामचंद्र देव व ओढ्या प्रांतांतील राज्यकर्ते विडियाद्री व हरिश्चंद्र वगैरे हिंदू राजांनीं एकत्र होऊन कुली कुत्बशहाचा नाश करण्याचा प्रयत्न केला; त्याप्रमाणेंच विजयानगरचा राजा कृष्णराय व त्याचा जांवई शिवराय यांनींही त्याच्या विरुद्ध असाच प्रयत्न केला; पण यांपैकीं कोणालाहि यश न येतां कुली कुत्बशहाचें वर्चस्व कायम राहून उलट वाढीस लागलें. या शहास त्याचा दुसरा मुलगा जमशीद यानें गोवळकोंडें येथील कोतवाल मीर महंमद हमदानी याच्याकडून ठार मारविलें; ( इ० सन १५४३. ) त्यानंतर जमशीदनें आपला वडील भाऊ कुत्बुद्दीन याचे डोळे काढवून त्यास प्रतिबंधांत ठेविलें व राज्य बळकावून तो स्वतः कारभार करूं लागला. कुली कुत्बुशहा हा मृत्यू पावला त्यावेळीं नव्वद वर्षांचा होता. त्यानें सतत ४४ वर्षें स्वतंत्रपणें राज्यकारभार केला; व आपल्या राज्याची पुष्कळ भरभराट व वृद्धी करून त्यानें तें पुष्कळच वैभवास चढविलें.

या जमशीदच्या कारकीर्दींत एका मराठा सरदाराचा उदय झाला. हा शहा गादीवर आल्यावर लवकरच त्यानें बेदरवर स्वारी करण्याकरितां गोवळकोंडें येथून कूच केलें, आणि कोकस प्रांतांत आल्यावर बेरीदशाही मुलूख लुटून उजाड करण्यास त्यानें आपलें सैन्य तिकडे पाठविलें. तेव्हां कासीम बेरीद हा शहावर चाल करून आला. यावेळीं जमशीदबरोबर जगदेवराव नाईक या नांवाचा एक मराठा सरदार असून त्यानें कोकस नजीक शहाच्या इच्छेप्रमाणें एक लहानसा किल्ला बांधण्याची कामगिरी पतकरिली होती. त्यामुळें त्याच्याजवळ थोडीशी फौज ठेवून बाकी फौजेनिशीं शहा काशीम बेरीदवर चाल करून गेला व उभयतांमध्यें झटापटी सुरू झाल्या. इतक्यांत जगदेवरावानें किल्ला पूर्ण केल्याचें जमशीद यास कळलें; तेव्हां तो थोड्याशा सैन्यासह कोकसकडे वळला. हें पाहतांच काशिम यानें त्याच्या छावणीवर एकदम छापा घालून त्याचा पूर्णपणें पराभव केला; परंतु थेट जमशीदवर चाल करून जाण्याइतकें त्याच्या जवळ सैन्यबळ नसल्यामुळें तो बेदर येथें परत गेला, त्यामुळें अनायासेंच जमशीद यास

कोंकस, नारायणखेड व आसनाबाद हे प्रांत मिळाले. तेव्हां शहानें या तीन्हीही प्रांतांवर जगदेवराव याची नेमणूक केली व तो गोवळकोंडें येथें परत गेला.

त्यानंतर लवकरच अली बेरीद हा आदिलशहाची मदत घेऊन पुन्हां जमशीदवर चाल करून आला. तेव्हां त्यानें अलीबेरीद यास मार्गांत नारायणखेड येथेंच अडविलें. त्यावेळींही जगदेवराव नाईक, जमशीदच्या स्वारीबरोबर हजर होता. पुढें उभयतां राज्यकर्त्यांमध्यें युद्धास प्रारंभ झाला, त्यांतही जगदेवरावानें भाग घेतला होता व अखेरीस अली बेरीद याचा पूर्णपणें पराभव होऊन त्यास माघार घेणें भाग पडलें होतें.

जमशीद शहानें सात वर्षें राज्य केलें; ( इ० सन १५४३ ते इ० सन १५५० ). त्यानें गजपती वगैरे लहान मोठे बरेच हिंदूराजे आपल्या नियंत्रणाखालीं आणिले; पुढें पदभ्रष्ट झालेल्या कासीम बेरीद यास पुन्हां गादीवर बसवून तो परत आल्यावर एकसारखा विलासांत मग्न झाला व त्यांतच आजारी होऊन तो इ० सन १५५० मध्यें मृत्यू पावला.

सुलतान जमशीद कुत्बूशहा हा मृत्यू पावल्यावर त्याचा सात वर्षांचा मुलगा सुभान कुली हा गादीवर आला; व सैफखान ऊर्फ सैफ्–उल्–मुल्क् हा शहाच्या नांवानें राज्यकारभार चालवूं लागला. यावेळीं मराठा सरदार जगदेवराव याचें राज्यांत अतीशय वजन असून तो व सैफखान हेच राज्यांत वास्तवीक प्रमुख होते; तथापि त्यांतल्या त्यांत सैफखान हा अप्रीय होता; उलटपक्षीं जगदेवराव प्रीय असून त्याचा राज्यभर विलक्षण दरारा होता; त्यामुळें सैफखानाहूनही त्याचें अधिक महत्व वाढलें होतें. माजी शहा जमशीद याचा धाकटा भाऊ आणि गादीवर असलेल्या शहा सुभान कुली याचा काका दौलतखान हा भवानगडच्या किल्ल्यावर प्रतिबंधांत होता. त्यानें आपणांस गादीवर बसविण्याबद्दल यावेळीं जगदेवरावाकडे बोलणें लाविलें; व त्यानें तें मान्य करून तो आपल्या सैन्यासह गोवळकोंडा येथून निघून भवानगड येथें गेला; दौलतखानाची प्रतिबंधांतून मुक्तता केली, आणि आसपासच्या नाईक लोकांस अनुकूल करून घेऊन भवानगड व त्या भोंवतालच्या प्रदेशांत त्यानें दौलतखानाचा अंमल बसविला. त्यामुळें वजीर सैफखान हा त्यांच्यावर चाल करून गेला. तेव्हां जगदेवरावानें वऱ्हाडचा कारभारी तोफलखान याची मदत घेतली व सैफखानाच्या सैन्याबरोबर सिंग्राम येथें एक मोठें युद्ध केलें; परंतु त्यांत दौलतखान व जगदेवराव या उभयतांचाही पराभव झाला व बरेच दिवस झगडल्यावर ते उभयतांही सैफखानाच्या स्वाधीन झाले. तेव्हां त्यानें दौलतखानास पुन्हां भवानगडच्या किल्ल्यावर प्रतिबंधांत ठेविलें व जगदेवरावाची गोवळकोंडें येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत रवानगी केली.

परंतु हें बंड मोडल्यावर सैफखान हा अतीशय अनियंत्रितपणानें राज्यकारभार चालवूं लागला; त्यामुळें त्याचा अंमल सर्वांसच अतीशय दुःसह होऊन जमशीद्चा तिसरा भाऊ इब्राहीम हा विजयानगर येथें जाऊन तेथील राज्यकर्ता रामराय याच्या आश्रयास राहिला. तथापि या सैफखानाचा मराठे लोकांवर विशेष विश्वास होता असें दिसतें. कारण त्याच्या अशा अनियंत्रित व दुःसह होणाऱ्या कारकीर्दीत त्यानें जगतराव या नावांच्या एका मराठा अधिकाऱ्याची गोवळकोंडें शहराच्या बंदोबस्तावर नेमणूक केली होती. सैफखानाचा अंमल दिवसेंदिवस अधिक अधिक त्रासदायक होत गेल्यामुळें दरबारच्या मंडळींनीं कट करून इब्राहीम यास विजयानगरहून बोलावून घेतलें; त्याप्रमाणें इब्राहीम परत येत असतां त्यानें कोविलकोंडयाचे नाईक आपणास अनुकूल करून घेतले; त्यांच्या मार्फत गोवळकोंड्याचे नाईक आपणास सामील करून घेऊन त्यांच्याकडून जगदेवरावाची प्रतिबंधांतून सुटका करविली; व मोठ्या साहसानें व पराक्रमानें त्यांनीं तेथील अधिकारी जगतराव यास पकडून त्याची गोवळकोंडें येथील प्रतिबंधांत रवानगी करून दिली; शहाच्या सैन्याचा पराभव केला व त्यास पकडून कैद केलें. तेव्हां सैफखानाचा नाइलाज होऊन तो इब्राहीमखानास शरण गेला व त्यानें शहाची क्षमा मागितली. परंतु "मी गादीवर बसेपर्यंत कोणत्याच प्रकारचें अभिवचन देऊं शकत नाहीं" असें त्यानें सैफखानास उत्तर पाठविलें. तेव्हां जिवाच्या भीतीनें तो त्या राज्यांतून पळून गेला; व इकडे इब्राहीमशहाही त्याच्या पाठलागावर न जातां थेट गोवळकोंडें येथें येऊन इ० सन १५५० च्या जुलई महिन्याच्या ता० २७ रोजीं राज्यपदारूढ झाला.

इब्राहीमशहास राज्यपद प्राप्त होण्यास जगदेवराव हाच मुख्यतः कारणीभूत झाला व त्याच्या प्रयत्नामुळेच शहाची राज्यपदावर स्थापना झाली; त्यामुळें शहानें जगदेवरावाचे उपकार स्मरून त्यास आपला दिवाण नेमिलें; व त्याचा भाऊ व्यंकटराव यासही एक जहागीर दिली. त्याप्रमाणेंच राज्यकारभाराचें सर्व काम चोकसरीतीनें पाहून आपल्या राज्याचा उत्कर्ष करण्याचा तो मनापासून प्रयत्न करूं लागला. जगदेवराव दिवाणपदावर आल्यावर मराठ्यांचा पुष्कळच उत्कर्ष झाला. त्यानें आपल्या हाताखालीं त्याच्या अतीशय विश्वासांतील रायराव या नांवाच्या एका मराठा सरदाराची नेमणूक केली, आणि दरबारांत व सैन्यांतही पुष्कळ मराठे लोकांचा भरणा केला; परंतु ही गोष्ट मुसलमान सरदारमंडळीस न आवडल्यामुळें त्यांनीं जगदेवरावाविरुद्ध शहाकडे अनेक खऱ्या-खोट्या कागाळ्या केल्या. त्यानंतर इब्राहीमशहास पदभ्रष्ट करून त्याचा वेडगळ भाऊ दौलतखान यास गादीवर बसवून सर्व सत्ता आपल्या हातीं घ्यावी, असा जगदेवरावानें बेत केला व त्याच्या अत्यंत विश्वासांतील व प्रेमांतील सरदार रायराव हाही

मुसलमान सरदारांचा पदोपदीं उपमर्द करूं लागला. तेव्हां सर्व मुसलमान सरदारांनीं त्याबद्दल शहाकडे पुन्हां गाऱ्हाणीं केलीं व " जगदेवराव व रायराव या दोन हिंदु अधिकाऱ्यांवर आपण विशेष भरंवसा ठेवून वागतां याचा नीट विचार करा; कारण लष्करांत बहुतेक सर्व नाईक लोक असून ते जगदेवरावाच्या केवळ मुठींत आहेत." असें त्यास सांगितलें. तथापि शहानें यावेळींही त्यांच्या ह्मणण्याकडे लक्ष दिलें नाहीं. नंतर रायरावाविषयीं शहाकडे अतीशय कागाळ्या येऊं लागल्या; आणि याच संधीस जगदेवरावाचा भाऊ व्यंकटराव हा शहाचा निरोपही न घेतां आपल्या जहागिरीवर निघून गेला. त्यामुळें शहास या उभयतांविषयीं संशय उत्पन्न झाला व त्यानें पहिल्या सपाट्यास रायरावास पकडून तावडतोब ठार मारिलें. त्याबरोबर जगदेवराव घाबरून आपणाबरोबर दोन तीन हजार सैन्य घेऊन गोवळकोंडें येथून निसटला व एलगुडल वरून सर्व प्रदेश उजाड करीत तो वऱ्हाड प्रांतांत जाऊन दाखल झाला. जगदेवराव हा मोठा शूर व प्रसिद्ध सरदार असल्यामुळें बुऱ्हाण इमादशहानें त्यास आपल्या पदरीं ठेवून घेऊन दहा हजार स्वारांची सरदारी दिली; व खानदेशचा सुलतान मिरान महंमदखान याजबरोबर चाललेलेल्या युद्धावर त्यास पाठविलें त्याप्रमाणें त्यानें तिकडे जाऊन खानदेशच्या सुलतानाचा पूर्णपणें पराभव केला; पुष्कळ लूट मिळविली, आणि वऱ्हाड प्रांतांतील इतर कित्येक लहान लहान संस्थानिकांनाही त्यानें शहाच्या अंकित होणें भाग पाडिलें; शिवाय त्यानें स्वतंत्र होण्याच्या उद्देशानें आपल्या जहागिरींत तीन हजार स्वार व इराणी, हबशी, अरब वगैरे लोकांचें बरेंच पायदळ नोकरींत ठेविलें व खानदेश आणि वऱ्हाड येथील उभयतां सुलतानांनांही तो डोईजड झाला. तथापि बुऱ्हाण इमादशहाच्या विनंतीवरून, त्या शहाला कोणत्याही प्रकारें त्रास न देतां तो विजयानगरला जाण्याच्या इरायानें पुन्हां इब्राहीम कुत्बूशहाच्या ताब्यांतील एलगुड या गांवाकडे आला; त्यावेळीं इराणी व हबशी पांच हजार सैन्य, तीनशें हत्ती व शिवाय दक्षिणी पायदळ सैन्य त्याच्याबरोबर होतें. जगदेवराव हा पुन्हां आपल्या राज्याच्या हद्दींत आल्याचें इब्राहीमशहा यास समजतांच त्यानें आपला सरदार मुस्तफाखान यास त्याच्यावर पाठविलें; व उभयतांमध्यें मोठ्या निकराचें युद्ध होऊन त्यांत जगदेवरावाचा भाऊ व्यंकटराव व इतर चार सरदार ठार होऊन त्याच्या सैन्याचा अतीशय नाश झाला व त्याचा पूर्ण पराभव होऊन तो विजापूर येथें पळून गेला. इतक्यांत हुसेन निजामशहा व इब्राहीम कुत्बूशहा यांनीं विजापूरकराच्या प्रदेशावर स्वारी केली, व कल्याणीच्या किल्ल्यास वेढा दिला; तेव्हां विजापूरकर अल्ली अदिलशहा यानें बेदरकर अल्ली बेरीदशहा व विजयानगरकर रामराजा यांचें साह्य मागितलें. त्याप्रमाणें बेरीदशहा व रामराजातर्फे त्याचा भाऊ व्यंकटाद्रि व जग-

देवराव हे अदिलशहाच्या मदतीस आले व त्यांनीं कुत्बूशहा व निजामशहा यांच्या सैन्यास अतीशय त्रस्त करून सोडिलें, त्यामुळें त्या उभयतांनीं अदिलशाहीस दिलेला शह परत घेतला, आणि इब्राहीम कुत्बूशहा तर मोठ्या कष्टानेंच गोवळकोंडें येथें आपल्या राजधानींत परत येऊन पोहोंचला.

त्यानंतर इब्राहीमशहानें व्यंकटाद्रि व जगदेवराव यांच्यावर पुन्हां मुजाहिद्खान या नांवाच्या सरदारास, त्याच्या बरोबर सैन्य देऊन पाठविलें; व त्यांच्यामध्यें बरेच दिवस युद्ध सुरू राहिलें. तेव्हां इकडे रामराजानें कोंडबीडचा राजा सिंद्राज तिमप्पा यास पन्नास हजार स्वारांनिशीं कंडापिली, मच्छलीपट्टण हीं ठाणीं व आपला जांवई तुमराज यास देवाककोंडा व इंद्रकोंडा हीं ठिकाणें हस्तगत करून घेण्यास पाठविलें व आपण स्वतः गोवळकोंड्याच्या आसपास लुटालूट करूं लागला; इकडे जगदेवरावानें नाईक लोकांस फितवून पानगल, कोविलकोंडा व गणपुरा हे किल्ले आपल्या हस्तगत करून घेतले, आणि काशीराव या नांवाच्या मराठा किल्लेदारानें इंद्रकोंडा हा किल्ला तुमराजाच्या स्वाधीन केला अशा रीतीनें इब्राहीम कुत्बूशहा हा आपल्या राजधानींत कोंडला गेला; तेव्हां या युद्धाचा एकदांच काय तो सोक्षमोक्ष करून घ्यावा या विचारानें शहानें तारापल्ली येथें शत्रूवर हल्ला करण्याचा निश्चय केला. इतक्यांत त्यास अल्ली बेरीदशहाकडून गुप्तपणें असा निरोप आला कीं, " जगदेवरावास वश करून घेतल्याशिवाय तुह्मास फायदा होणार नाहीं; ह्मणून त्यास वश करून घेण्याची पहिल्यानें आवश्यमेव खटपट करावी. " त्याप्रमाणें शहानें मुस्तफाखानामार्फत जगदेवरावास वश करून घेतलें; तेव्हां गणपुरा व पानगल हे दोन किल्ले त्यानें आपणाकडे ठेवून घेऊन मोठ्या मुत्सद्दीपणानें हें पुष्कळ दिवस चाललेलें युद्ध बंद केलें; व या मुसलमान राजकर्त्यांचा आपसांत सलोखा करून दिला. थोडक्यांत ह्मणजे मराठा साम्राज्य स्थापन करण्याचा मराठ्यांनीं पुढें लवकरच जो एक प्रयत्न करून यशस्वीपणानें सिद्धीस नेला, त्याचा हा पूर्वरंगच होय, असें या मराठा सरदाराच्या कर्तबगारीवरून ह्मणण्यास हरकत नाहीं. या काळानंतरच्या इतिहासांत जगदेवरावाचें नांव आढळून येत नाहीं; त्यामुळें या सरदाराची पुढील हकीकत कळण्यास मार्ग नाहीं.

गोवळकोंडें येथील मुसलमानी राज्याच्या सैन्यांत जगदेवरावाच्या काळापासून हिंदू व मराठे लोकांचा विशेष भरणा झालेला होता. त्यांपैकीं हिंदु नाईक मंडळींनीं इब्राहीमशहा शिकारीस गेला आहे अशी संधी साधून मोठें बंड उभारिलें व किल्ल्याचे दरवाजे बंद करून त्यांनीं मुसलमान लोकांची कत्तल करण्यास सुरवात केली. तेव्हां दोन मुसलमानांनीं तटावरून उड्या टाकून इब्राहीम कुत्बूशहाकडे जाऊन त्यास हें वर्तमान कळविलें; त्याबरोबर शहा लागलाच परत आला व त्यानें किल्ल्यास वेढा दिला. त्यावेळीं " मुस्तफाखानानें

आह्मांस फार छळिलें आहे; करितां त्यास, "आमच्या स्वाधीन करा ह्मणजे आह्मी हें बंड मोडून आपणांस शरण येतों" असें नाईकांनीं शहाकडे बोलणें लाविलें. मुस्तफाखान हा मोठा शूर व इमानी सरदार होता; व शहाच्या हिताकरितां स्वतःचा प्राणही अर्पण करण्याची त्याची तयारी होती. त्यामुळें तो आपण होऊनच बंडवाल्या नाईक-मंडळीच्या स्वाधीन होण्यास तयार झाला; परंतु शहानें ती गोष्ट साफ नाकारून त्यास या कृत्यापासून परावृत्त केलें; आणि नाईक मंडळीस कौल देऊन शेवटीं त्या सर्वांना ठार मारून त्यानें हा बंडावा मोडून टाकिला.

त्यानंतर इब्राहीम शहाचा सरदार रिफतखान यानें इ० सन १५६७ या वर्षी पटापूर व राजकुंडी येथील राजा सीतापति व राजमहेंद्री येथील राजा विदियाद्री यांना जिंकिलें; त्यावेळीं त्या राज्यकर्त्यांबरोबर तहाचीं कलमें ठरविण्याकरितां रिफतखानानें आपल्या येलू पंडित या नांवाच्या ब्राह्मण कारकुनास त्यांच्याकडे पाठविलें होतें, असा उल्लेख आढळतो. वरील राज्यकर्त्यांप्रमाणेंच गोपाळपिली व वीरगुत्तम येथील राजा व्यंकटराज, कासीमकोटा येथील राजा सूर्वराज व त्याचा भाऊ बिलेंद्र, ओढ्या प्रांतांतील विदियाद्रीचा राजा वेलप, चंदुरवारचे राजे, नरसिंग व त्याचा भाऊ सूरसिंग, राजमहेंद्रीकडील कंडूदेवपल्ली येथील बलाढ्य राजा वैजनाथदेव, या सर्व हिंदूराजांनां रिफतखानानें जिंकून त्यांच्यापासून खंडणी घेतली व कुली कुत्बशहाच्या काळापासून ह्यावेळेपर्यंत अनेक हिंदू राज्यांचा नाश होऊन त्या सर्व प्रदेशावर मुसलमानांचें वर्चस्व स्थापन झालें.

त्यानंतर लवकरच निजामशाही व आदिलशाही फौज कुत्बशाही फौजेवर चाल करून गेली; त्यावेळीं त्या फौजेंत मराठे बर्गीस्वारांची एक तुकडी पिछाडीस ठेविलेली असून त्यांत विश्वासराव, बसवंतराव व कोळीराव हे तीन हिंदू सरदार आपआपल्या सहा सहा हजार स्वारांसह हजर होते; त्यांनीं इतर सैन्याबरोबर कुत्बशाही सैन्यावर हल्ला केला होता; परंतु त्यांत त्यांचें पुष्कळ कोळी सैन्य मारलें जाऊन अखेरीस निजामशाही व आदिलशाहीच्या सैन्याचा पराभव झाला; व कुत्बशहास विजय प्राप्त होऊन तो गोवळकोंडें येथें परत गेला.

पुढें विजयानगरकर श्रीरंगरायावर विजापूरकर आदिलशहानें स्वारी केली; त्यावेळीं श्रीरंगरायास सुदैवानें इब्राहीम कुत्बशहाची मदत मिळाली ह्मणूनच त्याचा निभाव लागला. मध्यंतरीं कुत्बशहा हा इतर मुसलमान राज्यकर्त्यांबरोबर युद्धाच्या भानगडींत गुरफटला आहे असें पाहून त्याचे मांडलीक राज्यकर्ते व्यंकटाद्री, कस्तूरी, तिमराज व नरसिंगराय यांनीं त्यास नेहमींप्रमाणें खंडणी न पाठवितां उलट कृष्णानदीच्या

अलीकडे येऊन बेजवाड्यापासून दहा मैलांवर असलेल्या कंडापिली या किल्ल्यावर हल्ला करून आसपासचा बराच प्रदेश उध्वस्थ करून टाकिला; ह्मणून कुत्बूशहानें त्यांच्यावर इमादूउद्दीन महंमद शिराझी या नांवाच्या सरदारास, त्याच्या बरोबर एक मोठें सैन्य देऊन, तिकडे रवाना केलें. त्याप्रमाणें तो कृष्णानदी उतरून त्यानें प्रथम इणकोंडचा किल्ला घेतला; तेथून तो कचलकोटच्या किल्ल्यावर चाल करून गेला. त्या किल्ल्यावर कस्तूरी रंगय्या व मुदनाचनय्या हे दोघे सरदार दहा हजार फौजेसह रहात होते; त्यांनीं कोणत्याही प्रकारें प्रतिकार न करितां इमादूउद्दीन यास तो किल्ला सोंपवून दिला. त्यानंतर कमपचा किल्ला घेऊन तो कोंडवीड या किल्ल्यावर गेला. त्याठिकाणीं कुंडी तिमण्णा, मुदनाचनय्या व कस्तूरी रंगय्या असे तिघे सरदार तीस हजार फौजेसह तयारीनें राहिले होते; त्यांनीं मोठ्या शौर्यानें व चिकाटीनें कित्येक महिनें किल्ला लढविला; व कुत्बूशहाच्या पुष्कळ सैन्याचा नाश केल्यानंतरच त्यांनीं नाइलाजानें तो अखेरीस इमादूउद्दीन याच्या हवालीं केला. याच ठिकाणीं विजयानगरकर प्रसिद्ध रामराजा याचा जांवई कंपूरी तिमराज हा इमादूउद्दीन याच्या हातीं सांपडला; ( इ० सन १५८९. ) या अलौकिक विजयामुळें इब्राहीम कुत्बूशहाचा अंमल थेट समुद्रकिनाऱ्यापर्यंत कायम झाला व त्या प्रदेशांतील हिंदू राज्यें नामशेष होऊन गेलीं.

यानंतर एकच वर्षांत, इ० सन १५८० मध्यें इब्राहीम कुत्बशहा हा मृत्यू पावला. या शहाच्या मृत्यूची हकीकत मोठी चमत्कारिक आहे; ती अशी कीं, इब्राहीमशहानें आपल्या दक्षिणेकडील सरहद्दीवरील हिंदू राज्यांचा बंदोबस्त केल्यानंतर आपल्या आसपासच्या मुसलमान राज्यकर्त्यांचा प्रतिकार करण्याकरितां त्यानें आपला सेनापती अमीरशहा मीर यास तिकडे पाठविलें; मुरारराव या नांवाच्या एका दक्षिणी ब्राह्मणास त्यानें आपला मुख्य प्रधान नेमून त्यास दहा हजार पायदळ सैन्याची खास तैनात व नौबतीचा मान दिला; आणि अशा रीतीनें प्रत्यक्ष राजघराण्यांतील इतर मंडळींहूनही अधीक असें मुाररावाचें महत्त्व वाढून तो सर्व राज्यांत श्रेष्ठ बनला; परंतु तो हिंदू व त्यांतही ब्राह्मण असून सुद्धां हिंदू नव्हता व ब्राह्मणही नव्हता, असें त्याच्या कृतीनेंच सिद्ध झालें. मुरारराव हा मुख्य प्रधान झाल्यानंतर तो फौज घेऊन बल्लारीपासून त्रेसष्ट मैलांवर असलेल्या अदोनी या गांवीं गेला; आसपासचा प्रदेश उध्वस्त करून तेथील लोकांस लुटिलें; अदोनी येथील प्रसिद्ध व साक्षात्कारी देवस्थानावर धाड घालून देवाचें जडजवाहीर व सोन्यारुप्याचे दागदागिने, बुचाडून घेतले; देवाची रत्नजडित मूर्तीही स्थानभ्रष्ट करून व ती आपणाबरोबर घेऊन तो गोवळकोंडें येथें परत आला व ती त्यानें इब्राहीमशहा यास दाखविली; परंतु ही मूर्ति पाहतांच शहाची प्रकृति एकदम बिघडली व तो आजारी पडून लवकरच इ० सन

१५८० च्या जून महिन्यांत ता० २ रोजीं गोवळकोंडें येथें मृत्यू पावला. त्यावेळीं त्याचें वय ५१ वर्षांचें होतें. त्यानें ३१ वर्षें राज्य केलें; त्यास एकंदर तीस मुलें झालीं; त्यांपैकीं त्याच्या मृत्यूच्या वेळीं सहा मुलगे व तेरा मुली जिवंत होत्या. या सहा मुलांपैकीं पहिला अब्दुल कादर हा देवरकोंडा येथील प्रतिबंधांत असून तो त्याच ठिकाणीं मृत्यू पावला. दुसरा मिर्झाहुसेन कली हा नाममूपिल्ली येथील तलावांत स्नान करीत असतां बुडून मृत्यू पावला. तिसरा महंमद कुली हा इब्राहीम शहाच्या मृत्यूनंतर गादीवर आला; चवथा अब्दुल फत्ते हा पुढें पंधरा वर्षांनीं मृत्यू पावला; पांचवा महंमद खुदबंद हा बंड करून प्रतिबंधांत मृत्यू पावला व सहावा महंमद अमीन हाही पुढें आपल्या वयाच्या २५ व्या वर्षीं मृत्यू पावला.

इब्राहीम शहा हा मोठा थोर व लौकिकवान् राज्यकर्ता होऊन गेला; या शहाच्या कारकीर्दींत हिंदू व मराठे लोकांना पुष्कळच राजकीय महत्व प्राप्त झालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हा शहा मोठा पराक्रमी व यशस्वी असून त्यास युद्धांत कधींही फारसा अपजय आला नाहीं. तो प्रत्यक्ष मोहिमेवर असतांना सुद्धां त्याच्या लष्करांत विद्वान् मंडळींचें निवासस्थान असे व त्यांच्याशीं तो कायदा, शास्त्र वगैरेसंबंधीं संभाषण व वादविवाद करीत असे. शिवाय त्यानें आपल्या राज्यांत, चोऱ्या, दरवडे व रस्तालुटी वगैरेसंबंधीं अतीशय कडक बंदोबस्त केला होता; त्यामुळें असे गुन्हे क्वचितच घडत; प्रसिद्ध तैलंगी चोरांवर त्यानें इतका विलक्षण दरारा बसविला होता कीं, त्याच्या लोखंडी हातानें त्यांचें निर्मूलन झाल्यासारखें होऊन नांवही ऐकूं येईनासें झालें होतें; आणि एखाद्या दुर्बल स्त्रीनेंही सोन्याचें भांडें आपल्या डोक्यावर घेऊन गोवळकोंड्याहून राज्यांत कोणत्याही दिशेस निर्भयपणानें जावें इतका कडक बंदोबस्त ठेविल्याबद्दल त्याची ख्याती होती. त्याच्या राज्यविस्तारांत कासिमकोटा, राजमहेंद्री व कोंडवीड हे महत्वाचे व मुख्य ह्मणून गणले जाणारे प्रदेश होते; या शहानें अनेक सुंदर व भव्य इमारती बांधिल्या—गोवळकोंडें येथील तटबंदी, इब्राहीमबाग, फुलबाग, लंगर (भिक्षागृह) इब्राहीमपत्तनचा तलाव, हुसेनसागर तलाव, बडवळ येथील बांध, गोवळकोंडें येथील काळा चबुत्रा व यांशिवाय पुष्कळ मशीदी व विद्यालयें या शहाच्या कारकीर्दींत बांधण्यांत आलीं. त्याप्रमाणेंच गोवळकोंडें येथें व्यापाराची अतीशय भरभराट होऊन सर्व देशांतून त्याठिकाणीं माल येऊन उतरूं लागला. अरबस्थान, तुर्कस्थान व इराण येथील व्यापारी त्याठिकाणीं व्यापाराचा क्रयविक्रय करण्याकरितां येऊं लागले; व पाहिजे तो जिन्नस गोवळकोंडें येथें मिळूं लागला. या शहाच्या वेळीं प्रजेची अतीशय आस्थापर्वक दाद

लागत असे, आणि न्यायाच्या बाबतींतही त्याचें विशेष लक्ष असे; इतकेंच नव्हे तर तो स्वतःही अन्यायाचें आचरण न करण्याविषयीं अतीशय काळजी घेत असे; एकंदरींत पाहतां इब्राहीमशहा हा पुष्कळच श्रेष्ठप्रतीचा राज्यकर्ता होऊन गेला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

इब्राहीम शहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा महंमद कुली हा गादीवर आला. या शहाच्या कारकीर्दीतही हिंदू राजांचा व मराठ्यांचा संबंध आलेला आहे. हा शहा गादीवर आला तोंच अल्लीखान लूर या नांवाच्या त्याच्या एका सरदारानें बंड केलें; कोंडबिडा येथील ब्राह्मण सुभेदार रायराव याच्याशीं भांडण करून तो पेणकोंडा येथील विजयानगरकर राजा व्यंकटपती यास जाऊन मिळाला व त्याच्याकडून मदत मिळवून, त्याचा जांवई मीकर तिम्मा याच्यासह तो रायरावावर चाल करून आला; परंतु रायरावानें त्यांचा पूर्णपणें पराभव करून त्यांना माघार घेणें भाग पाडिलें व पुढें रहिमदाद या नांवाच्या शहाच्या सरदारानें अल्लीखान यास पकडून व त्याचा वध करून हें बंड साफ मोडून टाकिलें.

त्यानंतर महंमद कुली कुत्बुशहा हा स्वतः विजयानगरकराच्या आगळिकीबद्दल त्यास शिक्षा करण्याकरितां व कृष्णानदीच्या कांठचे किल्ले हस्तगत करून घेण्याकरितां तिकडे गेला; व कृष्णानदी ओलांडून मुसलमरू हा किल्ला हस्तगत करून घेऊन तेथून नंदीमल व कुलगुड हे किल्ले ताब्यांत मिळविण्याकरितां तो पुढें चाल करून गेला. हे दोन्हीं किल्ले विजयानगरकर माजी राज्यकर्ता रामराजा याचा जांवई बसंतराज व त्याचा तण्या नरसिंगराय यांच्या ताब्यांत होते. त्यांनीं शहापुढें आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून त्यास खंडणी देण्याचें कबूल करून ते किल्ले त्याच्या स्वाधीन केले. त्याप्रमाणेंच जमूलमूरत, चुंद्रीचगल, नंदातकोटा, चिन्नूर, गंडीकोट वगैरे ठिकाणचे हिंदू जमीनदारही शहाच्या वर्चस्वाच्या आधीन झाले. नंतर शहा पेनकोंडा येथें विजयानगरकर व्यंकटपती याच्यावर चाल करून गेला व त्यानें पेनकोंड्यास वेढा घातला. तेव्हां व्यंकटपतीनें आपला दिवाण गोपराजतिम्मा व सेनापति पर्वा आचिट्टी यांस शहाकडे पाठवून त्याच्याशीं तात्पुरता तह केला. तेव्हां शहाच्या सैन्यानें वेढा उठविला; परंतु " शहाच्या सैन्यानें वेढा उठविला " असें पाहून व्यंकटपतीनें गुप्तपणानें किल्ल्यांत तीन दिवसांत भरपूर धान्य व इतर सामुग्री भरून ठेविली, आणि जगदेवराव, गुलरंग शेटी, मणूपराज व पांपीया स्वामी, या आपल्या सरदारांबरोबर तीस हजार स्वार व पायदळ, व चार हजार बंदुक-बारदार देऊन त्यांना किल्ल्यांत पाठवून शहाशीं मोठ्या जोरानें युद्ध करण्याची तयारी केली; ही हकीकत शहास समजल्यावर त्यानें पुन्हां

लागलीच किल्ल्यास वेढा दिला; परंतु पर्जन्यकाळ समीप आल्यामुळें त्यास वेढा उठवून तात्पुरतें परत फिरणें भाग पडलें; तथापि त्यानें गंडिकोट्यास संजलखान, मुसलमुरू येथें असीराव, नंदियल येथे जगतराव व कृष्णानदीच्या दक्षिणेकडील प्रदेशांत मूर्तिजाखान या सरदारांना आपआपल्या सैन्यासह मागें ठेविलें, त्यानंतर, कोंडबीड प्रांताच्या बंदोबस्तास विशेषशी मुसलमानी फौज नाहीं, असें पाहून व्यंकटपतीनें उद्‌गेरीदुर्ग येथील राजा कुवलनंद याची मदत मिळवून आपला जांवई उरीयराज यास तो प्रदेश उध्वस्थ करण्याकरितां तिकडे पाठविलें; परंतु शहाच्या सैन्यानें त्याचा पूर्ण पराभव करून त्यांना माघार घेणें भाग पाडिलें; तेव्हां व्यंकटपतीनें एलतमराज, गुलरंगशेटी व मनूपराज या सरदारांबरोबर पुन्हां मोठें सैन्य देऊन त्यांची तिकडे रवानगी केली; परंतु यावेळीं शहाच्या सैन्यानें त्यांचा पराभव केला व त्यांनां अयशस्वी होऊन परत येणें भाग पडलें.

अशारीतीनें लागोपाठ दोन वेळां जरी मुसलमानी सैन्यानें हिंदु सैन्याचा पराभव केला तरी त्या भागांत आपलें सैन्य थोडें आहे, असे पाहून शहानें रुस्तुमखान या नांवाच्या एका सरदारास त्याच्या हाताखालीं बरेंच सैन्य देऊन त्यास तिकडे पाठविलें व सर्व सैन्यांचे मुख्य अधिकारही त्याच्याकडेसच सोंपविले. इकडे व्यंकटपती यानेंही आपली फौज पुष्कळच वाढविली व तोही या सैन्याशीं युद्ध करण्याची मोठ्या जोरानें तयारी करूं लागला; इतक्यांत रुस्तुमखान हा शहाच्या आज्ञेप्रमाणें त्या भागांतील मुसलमानी सैन्यास येऊन मिळाला; मूर्तिजाखानाकडून त्यानें सर्व सैन्याचें आधिपत्य आपणाकडे घेतलें; व व्यंकटपतीबरोबर एकदम लढाई करण्याचा त्यानें निश्चय केला; त्यावेळीं "व्यंकटपतीशीं मैदानांत समोरासमोर युद्ध केल्यानें आपणास फायदा होणार नाहीं" असें मूर्तिजाखानाचें मत होते; त्यामुळें आपल्या सैन्याचे दोन भाग करून एक भाग पेनकोंडेकडील प्रदेशांत लूटमार करण्याकरितां पाठवावा व दुसरा भाग येथेंच ठेवून आसपासचा प्रदेश लूटमार करून हैराण करावा, अशी त्यानें रुस्तुमखानास सल्ला दिला. परंतु त्यानें मूर्तिजाखानाचें ह्मणणें लक्षांत न घेतां तो कृष्णानदी उतरून पलीकडे गेला, आणि जेथें नुकताच पाऊस पडून जमीन ओली झालेली होती, अशा एका काळ्या मातीच्या मैदानांत तो तळ देऊन राहिला. इतक्यांत हिंदूंचा "बेंदरी आमावस्या" अथवा "पोळा" हा सण आला. त्या दिवशीं अंगावर रंगीबेरंगी पट्टे ओढलेला व शिंगें सोनेरी वर्खानें मढविलेला, असा एक भला मोठा धष्टपुष्ट व धिप्पाड बैल, त्याच्या गळ्यांत घांटा व पायांत घुंगर बांधून व्यंकटपतीच्या हिंदू सैन्यानें रुस्तुमखानाच्या गोटांत सोडिला. असा हा चित्रविचित्र प्राणी पाहून रुस्तुमखान अतीशय घाबरला; आपणावर हें काय अरिष्ट

ओढवलें, या भीतीनें तो तेथून पळून पिछाडीस गेला व आपल्या सर्व सैन्यासही घाबरवून तेथून आपला तळ ताबडतोब हलविण्याची त्यानें धांदल सुरू केली. व्यंकटपतीचें सैन्य दुरून ही सर्व गंमत पहात तयारीनें होतें; त्यामुळें मुसलमानी सैन्यांत अशी धांदल उडाल्याचें पाहिल्याबरोबर त्यांनीं रुस्तुमखानाच्या फौजेस गराडा घातला; आणि पावसानें काळी जमीन ओली व चिकट झालेली असल्यानें मुसलमानी घोडेस्वारास व इतर सैन्यास लगबगीनें पळूनही जातां येईनासें झालें; त्यामुळें रुस्तुमखानाचें बहुतेक सैन्य मारलें गेलें व त्याचें पुष्कळ सामान व्यंकटपतीस मिळून त्याच्या सैन्यांत, मुसलमानी सैन्याबरोबर युद्ध करण्याचा पुन्हां नवा हुरूप उत्पन्न झाला.

अशा या अतीशय बिकट व आणीबाणीच्या प्रसंगीं शहाचा शूर व दूरदर्शी सरदार मूर्तिजाखान यानें आपल्या थोड्याशा बाकी राहिलेल्या सैन्यासह हिंदू सैन्याची फळी फोडिली; आणि पळून जाणाऱ्या कांहीं सैन्यास धीर देऊन व आपणाबरोबर घेऊन तो सुरक्षितपणें राजधानींत येऊन पोहोंचला; व त्यानें घडलेली सर्व हकीकत शहास निवेदन केली. मागाहून रणविन्मुख झालेला रुस्तुमखानही राजधानींत परत आला; परंतु झालेल्या पराजयास व भयंकर नाशास तोच कारणीभूत असल्यामुळें शहानें त्यास स्त्रीवेष देऊन रस्त्यांतून त्याची धिंड काढविली; व त्यास हद्दपार केलें! आणि मूर्तिजाखानाची कामगिरी लक्षांत घेऊन त्यास किताब व बक्षीस देऊन त्याचा सन्मान केला; तथापि व्यंकटपतीनें केलेला भयंकर पराभव शहाच्या मनास अतीशय लागला; त्यानें व्यंकटपतीशीं पुन्हां निकरानें युद्ध करून त्याचा पूर्णपणें नाश करण्याचा निश्चय केला; व रस्त्यांतील सर्व प्रदेश उध्वस्थ करीत विजयानगराकडे कूच करून जाण्यास त्यानें इतबारखान येजदी या नांवाच्या सरदारास हुकूम दिला. त्याप्रमाणें तो तिकडे गेल्यावर त्याची आणि अनंतगीरचा राजा नरसू नंदराज याची मोठी लढाई होऊन त्यांत तो विजयी झाला; व तिकडील प्रदेशांत त्यानें शहाचा अंमल बसविला.

इतक्यांत इकडे अमीर-उल्-मुल्क् अथवा मीरजुम्ला हा प्रधानपदावर आल्यावर त्यानें कित्येक हिंदू मुसलमान जहागिरदारांकडे जकातीबाबदची उत्पन्नाची बाकी बरेच दिवस तुंबली होती ती वसूल करण्यास कांहीं अधिकारी पाठविले; परंतु ही मागणी कित्येक वर्षें न केली गेल्यामुळें, ही नवीनच बाब आपणावर लादली जात आहे असें त्यांना वाटलें. त्यामुळें आमलखान पठाण, खानखानान, साबाजी मराठा व बाळाराव या जहागिरदारांनीं शहाविरुद्ध बंड केलें; व पेनकोंड्याच्या राजाची मदत मिळवून कोंडवीडच्या आसपास ते लुटालूट करूं लागले. तेव्हां अमीर-उल्-मुल्क् त्यांच्यावर चाल करून आला. कोंडवीडचा हिंदु सुभेदार कुवलनंद यास, त्यानेंच अंतस्थरीतीनें या जहागीरदार मंडळीस उत्तेजन देऊन

बंडास प्रवृत्त केलें, असा तर्क बांधून तावडतोब ठार मारिलें; नंतर या जहागिरदार मंडळींचा पिच्छा पुरवून त्यांना रानोमाळ भटकावयास लाविलें; त्यांच्या जहागिरी जप्त करून व लुटून तो कोंडवीड येथें परत आला व तेथेंही बंडखोरांना सामील असलेल्या दोनशें नाईकांना ठार मारून व तिकडील प्रदेशांत पुन्हां शांतता स्थापन करून तो हैद्राबाद येथें परत गेला.

पुढें कासीमकोंडा येथील राजा भाई बुलंदर हा मृत्यू पावला व त्याचा बारा वर्षांचा अज्ञान मुलगा मुकुंदराय हा गादीवर आला. त्यास शहानें भाई बुलंद याचा योग्य वारस असल्याचें मान्य केलें; राजधानींत बोलावून पोषाख देऊन त्याचा योग्य सन्मान केला व कासीमकोंडा येथें परत जाण्यास रजा दिली. त्याप्रमाणें तो कासीमकोंडा येथें परत आला; परंतु त्याचा नातलग विजयाद्री यानें त्यास शहाविरुद्ध भर दिली व मुकुंदराय हा अपक्वबुद्धीचा असल्यानें त्यानें विजयाद्री ( ऊर्फ विदियाद्री ) च्या सांगण्याप्रमाणें शहा-विरुद्ध वागण्याचा उपक्रम केला; आपला भाऊ देवराज यास ठार मारिलें; आणि शहाचा तिकडील सुभेदार बिरलासखान यास पकडण्याचा तो प्रयत्न करूं लागला. तेव्हां शहानें मीर-ह्रैन-उल्मुल्क या सरदारास मुकुंदरायावर स्वारी करण्याचा हुकूम दिला व त्यास मदत ह्मणून वजीर मीरजुम्ला हाही भाई बुलंदर याचा भाऊ हरिश्चंद्र व पुतण्या शंकरराज यांसह तिकडेस रवाना झाला. त्यानंतर या सैन्यानें मुकुंदराजाशीं मोठें युद्ध केलें. त्यांत पहिल्या झटापटींत राजमहेंद्री येथें मुसलमानांचा पराभव होऊन त्यांचा पुष्कळ नाश झाला; व शंकरराज युद्धांत मारला गेला; परंतु अखेरीस मुसलमानी सैन्य विजयी झालें; व मुकुंदराय तिकडून पळून जाऊन जलमूर प्रांत हस्तगत करून घेऊन तिकडे कारभार करूं लागला; परंतु तेथूनही त्यास मुसलमानांनीं हांकलून लाविलें; तेव्हां तो बंगालदेशांत पळून गेला; इकडे मीरजुम्ला यानें त्याचा सर्व प्रदेश खालसा करून तो कुत्बूशाही राज्यास जोडिला; व त्याच्या बंदोबस्ताकरितां कासिमकोंडा येथें सैन्य ठेवून तो राज-धानींत परत आला.

परंतु या मोहिमेंत मीरजुम्ला याच्या बरोबर राऊतराव या नांवाचा एक शूर हिंदू सरदार होता; त्यास मीर जुम्ला यानें कांहीं अयोग्य हुकूम दिल्यामुळें तो रागावला; हरिश्चंद्रास बरोबर घेऊन तो मीरजुम्ला याची छावणी सोडून निघून गेला; व स्वतंत्र सैन्य जमवून हरिश्चंद्र यास कासीमकोंडा येथील त्याच्या वडिलोपार्जित राज्यावर स्थापन कर-ण्याचा त्यानें उद्योग आरंभिला; तथापि कुत्बशाही सैन्याबरोबरील एका युद्धांत राऊतराव मारला गेला; तेव्हां हरिश्चंद्र हा तेथून नजीकच असलेल्या वैजनाथदेव या राजाकडे

गेला व त्याची मदत मिळवून त्यानें मुसलमानी सैन्याशीं दोन तीन वेळां लढाया दिल्या परंतु त्या सर्वांतच त्याचा पराभव झाला; तेव्हां वैजनाथदेवानें हरिश्चंद्राचा पक्ष सोडिला; आणि शहास दरसाल नियमीतपणें खंडणी देण्याचें व त्याचा मांडलीक होऊन राहण्याचें कबूल करून शहाशीं तह केला; तथापि त्यामुळें हें युद्ध बंद झालें नाहीं. मयत हिंदू सरदार राऊतराव यास किस्थनराव या नांवाचा एक तरुण व शूर मुलगा होता. त्यानें नावडतोंच थोडेंसें सैन्य जमवून मुकुंदरायास बंगाल प्रांतामधून बोलावून घेतलें व तो आल्यावर त्या उभयतांनीं मिळून पातूर व मंदवाड हीं शहरें हस्तगत केलीं; व कुत्यशाही सैन्याशीं युद्ध करण्याच्या इराद्यानें ते पुढें चाल करून आले. तेव्हां शहातर्फे चंगीझखान, धर्माजीराव व बाळाराव हे सरदार त्यांच्याबरोबर युद्ध करण्यास पुढें आले. त्यानंतर या उभयतांमध्यें युद्ध होऊन त्यांत मुकुंदरायाचा पराभव झाला; व तो मदवाडा येथील किल्ल्याच्या आश्रयास निघून गेला; परंतु हा किल्ला हस्तगत करून घेण्यास अतिशय कठीण असल्यामुळें धर्माजीराव यानें मुख्य सेनानायक मीर झैन-उल्-अबीद्दीन यास असा सल्ला दिला कीं, मुकुंदराय हा जर शहाचा मांडलीक होण्याचें कबूल करीत असेल तर त्यास मदवाडचा किल्ला व परगणा द्यावा; धर्माजीरावाची ही सल्ला अबीद्दीन यास पसंत पडली नाहीं; परंतु त्यामुळें धर्माजीरावाचें मन त्याच्याविषयीं कलुषीत झालें व त्यानें अबीद्दीन विरुद्ध शहाकडे कागाळी केली. तेव्हां शहासही धर्माजीरावाचें म्हणणें योग्य वाटून त्यानें अबीद्दीन यास परत बोलावून घेतलें व त्याच्या जागीं सय्यद हुसेन या नांवाच्या सरदाराची नेमणूक केली. त्याप्रमाणें सय्यद हुसेन तिकडे आल्यावर त्यानें मुकुंदरायाचा काका हरिश्चंद्र याच्याशीं योग्य अटींवर सलोखा केला व मुकुंदरायाशीं युद्ध सुरू केलें. त्यांत किस्थनराव मारला गेला; तेव्हां मुकुंदरायानें त्याच्या जागीं सदाशिवराव या नांवाच्या एका शूर सरदाराची नेमणूक करून युद्ध सुरू ठेविलें; परंतु पुढें सदाशिवरावही युद्धांत मारला गेला; त्यानंतर अमेराज व बचनाराज हे मुकुंदरायाचे दोन्ही सरदारही युद्धांत मारले गेले; तेव्हां मुकुंदरायानें आपलें सर्व सैन्य एकत्र जमवून शहाच्या सैन्यावर एक शेवटचा निकराचा हल्ला केला; परंतु त्यांत त्याचा पराभव होऊन त्याची इतकी विपन्नावस्था झाली कीं, त्यास तेथून पळून जाण्याशिवाय दुसरें गत्यंतरच राहिलें नाहीं; तेव्हां तो पुन्हां बंगाल प्रांतामध्यें पळून गेला; अशा रीतीनें कासिमकोट्याचा सर्व महत्वाचा व व्यापक प्रदेश महंमदकुली कुत्यशहा याच्या ताब्यांत आला; तेव्हां शहानें, सूर्याराव या नांवाच्या एका हिंदू सरदारामार्फत, कुत्बशाही राज्याशीं सख्यत्वानें वागणाऱ्या लोकांना त्या प्रांताची विभागिणी करवून जहागिरी देवविल्या व त्या प्रदेशाचा बंदोबस्त व व्यवस्था ठेवण्यासाठीं शहानें सूर्याराव याचीच त्या प्रांतावर नेमणूक केली.

अशा रीतीनें मुकुंदरायाचा निकाल लागला; परंतु त्याच्याच चिथावणीवरून व्यंकटपतीनें शहाच्या ताब्यांतील कोंडवीड या प्रांतावर स्वारी केली होती; ह्मणून त्याचें शासन करण्याकरितां शहानें एदिलखान बंगी या नांवाच्या एका सरदारास त्याच्यावर पाठविलें; परंतु मुसलमानांचें हें प्रचंड सैन्य पाहतांच व्यंकटपतीनें भिऊन आपल्या एका वकिलाबरोबर मौल्यवान् नजराणे देऊन त्यास शहाकडे पाठविलें; आणि कोंडवीड प्रांतांत मी स्वारी करण्याच्या उद्देशानें आलों नसून त्या प्रांतांतील "कमम" हें सरोवर पाहण्याकरितां आलों होतों, असें कळविलें;—( कमम हें सरोवर अतीशय मोठें व विशेष प्रसिद्ध आणि प्रेक्षणीय आहे; हें सरोवर सोळा मैल परीघाचें असून त्यास पुष्कळ लहान लहान नद्या मिळतात; व गुत्ताकमम या नांवाची एक बरीच मोठी नदी याच सरोवरापासून उगम पावून दोनशें तीस मैल वहात जाऊन नेलोर जिल्ह्यांतील ( मद्रास इलाखा ) अनगोळ या शहरावरून मूठापिली या गांवाजवळ समुद्रास मिळाली आहे. )—तेव्हां शहानें एदिलखान बंगी यास "तुह्मी व्यंकटपतीवर हल्ला करूं नये." असा हुकूम पाठविला. इतक्यांत रेडीवड लोकांनीं राजमहेंद्री व बेंगळूर येथें बंड उभारिलें; तेव्हां त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं तिकडे जाण्याचा एदिलखान यास शहानें हुकूम दिला; तेव्हां त्यानें त्या प्रदेशांत जाऊन रेडीवड लोकांचा पाठलाग चालविला; परंतु त्यांचे अजमासें दोन हजार लोक एका नदीच्या पलिकडे जमावानें सज्ज राहिले व ती नदी उतरण्याचा मुसलमानी सैन्याचा प्रयत्न ते एकसारखा निष्फळ करूं लागले; तेव्हां राजमहेंद्री येथून तोफा व बाण आणविले; तथापि ती नदी उतरल्याशिवाय त्यांचा कांहींच उपयोग होईनासा झाला. अशा रीतीनें उताराची जागा रेडीवड लोकांनीं अडवून धरिल्यामुळें तशी दुसरी उताराची जागा शोधून काढण्याकरितां चोहोंकडे माणसें रवाना करण्यांत आलीं. त्यांत बाबाजीराव, धर्माजीराव या उभयतां हिंदू मार्गशोधकांनीं मुसलमानी सैन्याच्या छावणीपासून दहा मैलांवर एक उताराची जागा शोधून काढिली व त्या ठिकाणाहून मुसलमानी सैन्य सहज व सुरक्षितपणें नदी ओलांडून पलीकडे गेलें; त्यानंतर रेडीवड लोकांवर कुत्बशाही सैन्यानें मोठ्या निकरानें हल्ला केला व त्यांचा पुष्कळ नाश करून या बंडाचें पूर्ण निर्मूलन करण्यांत आलें.

त्याप्रमाणेंच पुढें मोंगलबादशहा जहांगीर याच्या कारकीर्दींत शहाजादा खुर्रम ( भावी प्रसिद्ध बादशहा शहाजहान ) यानें जेव्हां दक्षिणेवर स्वारी केली त्यावेळीं वैजनाथ-देवानें या संधीचा फायदा घेऊन स्वतंत्र होण्याकरितां महंमद कुली कुत्बशहा याच्याबरोबर युद्ध सुरू केलें; परंतु त्यांत त्याचा पराभव होऊन तो मारला गेला; तेव्हां

शहानें त्याचा मुलगा किस्थनराज यास—त्यानें शहाचे मांडलीक राहून त्यास खंडणी देत जाण्याचें कबूल केल्यावरून—त्याच्या वडिलांच्या गादीवर बसविलें व वैजनाथ-देवाप्रमाणेंच ज्या इतर राज्यकर्त्यांनीं स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला होता, त्यांचाही शहानें पराभव करून व त्यांना पुन्हां आपल्या पूर्ण नियंत्रणाखालीं आणून, तिकडील प्रांतांत शांतता स्थापन केली व तिकडे आपला निर्वेध अंमल पूर्वीप्रमाणें कायम केला.

वरील हकीकतीवरून या शहाच्या कारकीर्दीतील हिंदूच्या व मराठ्यांच्या राजकीय स्थितीबद्दल योग्य अनुमान करितां येईल. एकंदरींत पाहतां महंमद कुली कुत्बशहा हाही पुष्कळच योग्यतेचा राज्यकर्ता होऊन गेला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इब्राहीम कुत्बशहाच्या कारकीर्दींत गोवळकोंडें शहराची अतीशय भरभराट झाली होती व लोकवस्तीनें तें शहर अतीशय गजबजून गेलें होतें; परंतु अतीशय दाट वस्ती झाल्यामुळें तेथील हवा बिघडली व त्याठिकाणीं पाण्याचाही विशेष तुटवडा भासूं लागला; ह्मणून महंमद कुली कुत्बशहानें इ० सन १५८९ या वर्षीं तेथून पांच कोसांवर मुशी नदीच्या कांठीं एक स्थळ पसंत करून तेथें नवीन राजधानीची स्थापना केली; आणि आपली आवडती स्त्री भागावती हिच्या स्मरणार्थ त्यानें या शहरास "भागानगर" असें नांव दिलें; व पुढें महंमदाचा मुलगा हैदर याच्या नांवावरून त्या शहरास "हैदराबाद" हें नांव पडलें. हेंच ठिकाण हल्लीं निझामच्या राज्याच्या राजधानीचें शहर असून तेथील सावकार मंडळींत अजूनही या शहरास भागानगर असें ह्मणतात व मराठ्यांच्या इतिहासांतील "पत्रें, यादी" वगैरे सर्व सरकारी दरबारीं, पत्रव्यवहारांतही या शहराचा "भागानगर" या नांवानेंच उल्लेख केलेला आढळतो. हें शहर वसवितांना प्रारंभींच सरळ व रुंद रस्ते आंखून व रस्त्यांच्या दुतर्फा झाडांच्या रांगा लावून तेथें सुंदर घरें बांधण्यांत आलीं. गोवळकोंडें शहराच्या वरील बाजूस नदीस मोठें धारण बांधून नळानें सर्व भागानगर शहरभर मुबलक पाणी आणून

तो

या

वाडा

या

विलें.

त्यानें

नीवर

। या

इमारतींत पुष्कळ खोल्या व दिवाणखाने काढिलेले आहेत. त्याप्रमाणेंच अनेक दवाखाने, हमामखाने, पाठशाळा व भिक्षागृहें या शहाच्या कारकीर्दींत बांधलीं गेलीं; यांपैकीं दवाखाने व हमामखाने चालविण्यास त्यानें मोठमोठ्या नेमणुका करून दिल्या होत्या. या शहाचें दरबारच्या व इतर लोकांनींही अनुकरण केलें व हैद्राबाद शहरांत अनेक मोठमोठे वाडे बांधण्यांत आले. त्याप्रमाणेंच या शहास बागबगीच्यांची विशेष आवड असे; त्यामुळें त्यानें इश्की महाल बाग, महंमदी बाग वगैरे अनेक बागा तयार करविल्या; व त्यांच्याप्रमाणेंच सरदार, अमीर—उमराव, सावकार व श्रीमंत लोक यांनींही चढाओढीनें अनेक बागा तयार केल्यामुळें या शहरास लवकरच अतीशय शोभा आली; शहरांत अतीशय वस्ती वाढल्यामुळें जागेस अतीशय किंमत पडूं लागली व तें सरकारी उत्पन्न इतकें वाढलें कीं, या एका शहराच्याच घरफाळ्याच्या उत्पन्नाची रक्कम दरसाल चार लाख रुपये येऊं लागली. शिवाय या शहानें योग्य कायदे करून आपला अंमल कोणत्याही प्रकारें अनीति अथवा जोर—जुलूम न करितां उत्तमप्रकारें चालू ठेविला होता. या शहास अनेक हिंदु राज्यकर्त्यांशीं युद्धें करावीं लागलीं, आणि त्याच्या कारकीर्दींत अनेक हिंदूराज्यें नष्ट झालीं, अथवा नष्टप्राय स्थितींत जिवंत राहिलीं; तरी त्यांच्याबरोबर युद्धप्रसंग घडवून आणण्यांत त्यानें आपण होऊन केव्हांही आगळीक केली नव्हती; आणि आपल्या प्रजेच्या सुखाची वृद्धी करण्याकडेसच तो आपला कालक्षेप करीत होता. या शहाच्या कारकीर्दींत एकंदर ७८ लाख होन लोकोपयोगी कामाकडे खर्च झाले व साठ हजार होन त्याने गरीब लोकांना धर्मादाय ह्मणून दरसाल खर्च केले; ह्मणजे साडे तीन रुपयांचा होन या भावाच्या प्रमाणानें ७८ लाख होनांचे २ कोटी ७३ लक्ष रुपये व या शहानें ३४ वर्षें राज्य केलें; त्या अवधींत दरसाल गरीब लोकांना धर्मादाय ह्मणून ६० हजार होन ह्मणजे ७१ लक्ष ४० हजार रुपये—ह्मणजे एकंदर ३ कोटी ४४ लक्ष ४० हजार रुपयांची रक्कम या शहानें आपल्या कारकीर्दींत लोककल्याणाकरितां खर्च केली. यावरून हा शहा आपल्या प्रजेची किती काळजी घेत असे याबद्दल कोणासही योग्य अनुमान करितां येईल. हा शहा—चौतीस वर्षें राज्य करून आपल्या वयाच्या ४९ व्या वर्षी एकाएकीं आजारी पडून इ० सन १६११ च्या अखेरीस मृत्यू पावला व त्याचा मुलगा अब्दुल्ला हुसेन कुत्बशहा हा गादीवर आला.

या शहाच्या कारकीर्दींत इ० सन १६३७ मध्यें शहाजहाननें अहंमदनगर येथील निजामशाही राज्याचा शेवट करून निजामशहास व त्याच्या इतर साथीदारांस पकडून आग्रा येथें नेऊन कैदेंत ठेविलें; व विजापूरकर महंमद आदिलशहा यानें शहाजहान यास नियमीतपणें

दरसाल खंडणी देण्याचें कबूल करून तह केला. त्याचवेळीं अबदुल्ला हुसेन कुत्बशहा यानेंही बादशहास नियमितपणें खंडणी देण्याचें कबूल केल्यामुळे ' व शहाजहान याची योग्य मर्जी राखिल्यामुळें, त्यानें कुत्बशाही राज्यास अथवा शहास कोणत्याही प्रकारें उपसर्ग दिला नाहीं; परंतु इ० सन १५५६ या वर्षी एक विशेष गोष्ट घडून येऊन त्यामुळें मोंगलांची फौज कुत्बशाही राज्यावर चाल करून आली. या शहाचा मुख्य वजीर मीरजुम्ला हा पूर्वी जव्हेरी असून तो विशेष कर्तृत्ववान व हुषार असल्यामुळें,—तो राजकीय बाबतींत पडल्यानंतर लवकरच महंमदास पोहोंचून-त्याची सर्व दक्षिणप्रांतांत प्रख्याती झाली होती; व इ० सन १५५३ मध्यें अवरंगझेब हा दक्षिण प्रांताचा सुभेदार असल्या वेळेपासूनच मिरजुम्ला यानें त्याच्याशींही सख्यत्व संपादन केलें होतें; त्यामुळें अवरंगझेबाचीही त्याजवर विशेष मेहरबानी होती. मीरजुम्ला यास महंमद अमीन या नांवाचा एक मुलगा असून तो वाईट चालीचा होता. या मुलानें, मीरजुम्ला हा तैलंगण प्रांतांत एका स्वारीवर गेला असतां, शहास राग येण्यासारखें कांहीं वाईट कृत्य केलें; त्यामुळें शहानें त्यास प्रतिबंधांत ठेविलें. पुढें मीरजुम्ला हा स्वारीवरून परत आल्यावर त्यानें या मुलास सोडविण्याची पुष्कळ खटपट केली; परंतु ती व्यर्थ गेली. तेव्हां शहाजहान व अवरंगझेब या उभयतांनाही त्याची माहिती असल्यानें, त्यानें त्याच्या आश्रयास जाण्याचा निश्चय केला; व शहाजहान बादशहाकडे याबद्दल कागाळी केली. अवरंगझेब हा स्वाभाविकरीत्याच मोठा महत्वाकांक्षी व मसलती असल्यामुळें कुत्बशाही राज्यांत आपला हात शिरकविण्याची आलेली ही संधी व्यर्थ दवडूं नये, म्हणून त्यानें शहाजहान बादशहास मीरजुम्ला याच्या तर्फे शिफारस केली; व शहाजहान यास आपल्या मुलाचें हें म्हणणें योग्य वाटून त्यानें " मीरजुम्ला याच्या मुलास ताबडतोब प्रतिबंधांतून मुक्त करावें " असा शहास हुकूम पाठविला; परंतु शहाजहान बादशहानें आपल्या राज्याच्या अंतर्व्यवस्थेच्या बाबतींत केलेल्या या ढवळाढवळीमुळें आपल्या स्वातंत्र्यावर घाला आला असें पाहून शहास अतिशय राग आला; त्यानें महंमद अमीन यास अधिक बंदोबस्तानें प्रतिबंधांत ठेविलें; आणि मीरजुम्ला याची सर्व मालमत्ता जप्त केली. शहाजहान यास ही बातमी समजल्यावर त्यासही अब्दुल्ला हुसेन कुत्बशहा याच्या या कृत्याबद्दल अतिशय संताप आला; व त्यानें अवरंगझेबास कुत्बशहावर चाल करून जाऊन त्याच्याशीं युद्ध करण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणें अवरंगझेब हा बादशाही सैन्यासह तिकडील प्रदेशांत दाखल होऊन मोंगली सैन्यानें तिकडे धुमाकूळ उडविला. तेव्हां शहा नाइलाजानें अवरंगझेबास शरण गेला; मीरजुम्ला याची जप्त केलेली

दा. क्र. २५४९

सर्व मालमिळकत त्यास परत दिली; त्याचा दुर्वर्तनी मुलगा महंमद अमीन यास प्रतिबंधांतून मुक्त केलें; सुलतान महंमदास आपली मुलगी देऊन त्यास कांही प्रदेश व द्रव्य दिलें; आणि दरसाल एक कोट रुपये खंडणी देण्याचें कबूल करावें लागून खंडणीचा पहिला एक कोट रुपयांचा हप्ता त्यास ताबडतोब अवरंगझेबाला देणें भाग पडलें. याच वेळेपासून कुत्बशाही राज्य मोंगली बादशाहीचें मांडलीक राज्य " बनलें; व अखेरीस तें खालसा होऊन मोंगलराष्ट्रांत सामील झालें.

त्यानंतर मीरजुम्ला हा शहाजहान बादशहाच्या नोकरींत राहिला, आणि भावी काळांत अवरंगझेबानें राज्यप्राप्तीकरितां जे कपटाचे व विश्वासघाताचे निरनिराळे उद्योग केले त्यांत पुढारीपणानें त्यास मदतगार होऊन अखेरीस तो बंगालप्रांताचा सुभेदार असतां आसाम प्रांतावरील मोहिमेंत आमांशाचा आजार होऊन इ० सन १६६३ या वर्षी मृत्यू पावला. अब्दुल्ला हुसेन कुत्बशहा हा आपल्या मृत्यूपर्यंत मोंगल बादशहास नियमीतपणें खंडणी पाठवीत होता. तो इ० सन १६५८ मध्यें—ह्मणजे अवरंगझेबास बादशाहीपद प्राप्त झालें त्याच वर्षी—मृत्यू पावला. हा शहा गादीवर आल्यावर लवकरच निरनिराळ्या राजकीय भानगडींत गुरफटला जाऊन, आपलें राज्य व प्रत्यक्ष स्वतःचा जीव जगविण्याच्या विवंचनेंत त्याला आपल्या आयुष्याचा पुष्कळ काळ घालवावा लागला; त्यामुळें त्याच्या कारकीर्दींत मराठ्यांसंबंधीं अथवा राज्यव्यवस्था व लोककल्याणाच्या तजविजी वगैरे इतर बाबतींसंबंधीं कोणत्याही प्रकारचा विशेष उल्लेख स्वाभाविकरीत्याच आढळून येत नाहीं.

अब्दुल्ला हुसेन कुत्बशहा, हा मृत्यू पावल्यावर त्याचा जांवई अबू हसन हा गादीवर आला. हा आळशी व मोठा विलासी होता; तरी राज्यकारभार उत्तमप्रकारें चालवून आपल्या प्रजेस सुखी ठेवण्याबद्दल तो नेहमीं दक्ष होता; त्यामुळें त्याच्यावर प्रजेची विशेष भक्ति होती. या शहानें मदनपंत ऊर्फ मादण्णा या नांवाच्या एका ब्राह्मणास आपला मुख्य प्रधान नेमिलें होतें; व त्याचा भाऊ एकनाथपंत ऊर्फ आकण्णा हाही त्याच्या पदरीं नोकरींत असून त्याच्याच मदतीनें मदनपंत हा राज्यकारभार पहात होता. या मदनपंतानें महसुलाचा व इतर राज्यकारभाराचा मोठ्या हुषारीनें उत्तम बंदोबस्त ठेविला होता; शहाचा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता व तो मदनपंताविरुद्ध कोणाचीही व कसलीही कागाळी ऐकून घेत नव्हता. ही गोष्ट स्वाभावीक रीत्याच मुसलमान सरदारांनां आवडली नाहीं, आणि इब्राहीमखान या नांवाच्या शहाच्या सेनापतीस तर त्याबद्दल अतीशयच राग आला. इतक्यांत इ० सन १६८३ या वर्षी अवरंगझेबानें दक्षिणप्रांतावर स्वारी केली, त्यावेळीं शहानें संभाजीशीं परस्परांच्या

बचावासाठीं एक निग्रहात्मक ( Defensive ) तह केला; परंतु ही गोष्ट अवरंगझेबास कळल्यावर त्यास अतिशय राग आला व त्यानें खानजहान यां सरदाराच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यास शहावर पाठविलें; व त्याची शहाच्या सैन्याबरोबर एक जोराची चकमकही उडाली. यावेळीं कुत्बूशहाचा सेनापती इब्राहीमखान यानें मोठा पराक्रम करून मोंगलीं सैन्याचा पूर्ण पराभव केला; तेव्हां अवरंगझेबानें शहाजादा मोअज्ञीम याच्याबरोबर मुद्दाम सैन्य देऊन त्यास खानजहानच्या मदतीस पाठविलें; परंतु इतक्यांतच इब्राहीमखानानें विश्वासघात केला. खानजहान यास ही कुमक येऊन पोहोंचण्याच्या पूर्वीच जर इब्राहीमखानानें स्वस्थ न बसतां पूर्वीप्रमाणेंच मोठ्या शौर्यानें त्याच्याशीं युद्ध चालू ठेविलें असतें तर त्याच्या सर्व सैन्याचा पूर्णपणें चुराडा उडून गेला असता; परंतु त्यानें त्याप्रमाणें कांहींही न करितां, उलट मोअज्जीमच्या सैन्याचा खानजहानच्या सैन्याशीं मिलाफ होऊं दिला; त्यानंतरही त्यांना कोणत्याहीप्रकारें प्रतिबंध न करितां थेट हैद्राबादेवर चाल करून जाऊं दिलें; व अखेरीस तो स्वतःच या बादशाही सैन्यास जाऊन मिळाला. हें बादशाही सैन्य राजधानींत आल्यावर एकच गडबड उडाली; त्यांत मदनपंत मारला गेला; व शहा गोवळकोंडें येथील किल्ल्यांत पळून गेला; तेव्हां तें शहर अनायासेंच पूर्णपणें मोंगली सैन्याच्या तावडींत सांपडलें व सतत तीन दिवस त्या सैन्यानें तेथें लूट केली. अशा रीतीनें शहाच्या गोटांत फितुरी झाली, खुद्द मुख्य सेनापतीच शत्रूच्या पक्षास मिळाला; त्याचा प्रधान मारला गेला; आणि तो स्वतः गोवळकोंडें येथील किल्ल्यांत कोंडला गेला; तेव्हां चोहोंकडूनच शहाचा नाइलाज झाला; आणि त्यानें मोंगलांनीं सांगितलेल्या सर्व अटी निमूटपणें मान्य करून त्याच्याशीं तह केला. ( इ० सन १६८६ ) त्या अन्वयें, " शहानें मोंगल बादशहास दरसाल दोन कोट रुपये खंडणी द्यावी " असें ठरलें. शिवाय बरेच जडजवाहीर व रोख रक्कमही शहास मोंगल बादशहाला नजर करणें भाग पडलें.

तथापि हा तह फार दिवस कायम राहिला नाहीं. कारण त्यानंतर लवकरच ( ता० १५ आक्टोबर इ० सन १६८६ रोजीं ) अवरंगझेबानें शिकंदर अदीलशहा यास पदभ्रष्ट करून कुत्बूशाही राज्यावर आपली दृष्टि फिरविली. परंतु शहाजादा मुअज्जीम यानें कुत्बूशहाशीं नुकताच तह केलेला असल्यामुळें त्यास राजरोस त्या राज्यावर चाल करून जाण्याच्या बाबतींत थोडासा विचार उत्पन्न झाला; तथापि त्याच्या नेहमींच्या घातकी व दुष्ट स्वभावास त्याची अलौकिक बुद्धिमत्ताही नेहमींच साह्यकारी असल्यामुळें, त्यास केव्हांही व कोणत्याही बाबतींत इलाजाचा तोडगा सुचण्यास

अथवा युक्तीचा बडगा मिळण्यास मरेपर्यंत मुळींसुद्धां अडचण आली नाहीं व वेळही लागला नाहीं त्यामुळें या प्रसंगींही विश्वासघाताचें, कपटाचें व दगाबाजीचें अवलंबन करून आपला हेतू सिद्धीस नेण्याचा त्यानें बेत केला; (इ० सन १६८७.) सय्यद् जिसूदूराज या प्रसिद्ध साधुपुरुषाच्या कबरीचें दर्शन घेण्याच्या मिषानें आपणाबरोबर मोठी फौज घेऊन तो कल्बुर्गा येथें जाण्यास निघाला; व याच वेळीं दक्षिणेकडून कुत्बशहास मिळणारी मदत अडवून धरण्याकरितां त्यानें गोवळकोंड्याच्या दक्षिणेस तिकडील तोंडावर एक जंगी फौज पाठवून दिली. गरीब बिचारा दुर्दैवी शहानें आपलें कितीही नुकसान झालें तरी चालेल; कितीही कमीपणा घ्यावा लागला तरी पतकरेल; कितीही त्रास सोसावा लागला तरी परवडेल पण अवरंगझेबाची मर्जी खप्पा न व्हावी,—त्यानें आपणावर कृपा ठेवावी, दयेनें वागवावें, प्रेमानें पहावें, ममतेनें आपला सांभाळ करून घ्यावा, मेहेरबानीनें आपणावर आश्रयाची सावली ठेवावी—म्हणून शहा नेहमीं झटत असे; अतिशय काळजी घेत असे; परंतु पाषाण-हृदयी अवरंगझेबास त्याची काय किंमत वाटणार? स्वार्थी मनुष्यास व्यावहारिक बंधनांची कितपत पर्वा असणार! अवरंगझेब हा कधींही दारू पीत नव्हता; पण अधिकारमदानें पोसली गेलेली अहंकाराच्या व हट्टाच्या दारूची उन्मादकारक धुंदी अखेरपर्यंत त्याच्या डोळ्यांवर कायम होती. मरतांना त्याला आपल्या कित्येक कृत्यांचा पश्चात्ताप झाला; पण पश्चात्तापानें त्याच्या पापाचें जरी कदाचित् क्षालन झालें असलें तरी पश्चात्ताप ही संजीवनी विद्या नसल्यामुळें त्यानें तोडिलेल्या अनेक गोष्टी पुन्हां जोडण्याचें कृत्य त्याच्या हातून होणें अशक्य झालें; आणि अवरंगझेब म्हणजे "एक विध्वंसी पुरुष" एवढीच काय ती त्याची कीर्ति त्याच्या मृत्यूनंतर जगांत कायम राहिली. औरंगझेब हा विद्वान् होता; शहाणा होता; त्याला सर्व समजत होतें; आपल्या कृतीचे भावी परिणाम त्याला माहीत होते; मनुष्यप्राणी जगांत "अमरपट्टा" घेऊन जन्मास आला नाहीं,—दुष्कृत्यें केलीं अथवा सत्कृत्यें आचरिलीं, तरी "मृत्यू" टळत नाहीं; मृत-देहावर, शेवटीं शरीर झांकण्याकरितां टाकिलेला लहानसा कापडाचा तुकडासुद्धां त्याच्या "मालकीचा" नाहीं; "आला तसा गेला" जन्म, मृत्यू टळत

---

**टीपः**—कलबुर्गा ऊर्फ गुलबर्गा हा हल्लीं निजामाच्या राज्यांतील दक्षिण-भागांतील एक जिल्हा आहे; हें शहर हैद्राबादेपासून रेलवेनें १३८ मैलांवर व रायचूरपासून ९० मैलांवर आहे; सय्यद् जिसूदूराज या साधुपुरुषाप्रमाणेंच बंदेल नवाझ या नांवाचा एक दुसरा साधुपुरुष याठिकाणीं होऊन गेला असून त्याच्या सन्मानार्थ या ठिकाणीं दरवर्षी नोव्हेंबर महिन्यामध्यें एक मोठा उरूस भरत असतो.

नाहीं—हें तो पूर्णपणें जाणून होता; मनुष्याच्या मृत्यूनंतर एक कीर्ति किंवा अपकीर्ति मागें राहते,—परोपकारांत आपलें आयुष्य खर्च करीत राहून, लोकसंग्रह व लोककल्याण साधीत राहून त्यांत आनंद मानणारा मानवी प्राणी, आणि हट्टी हाडामांसाचा, नेहमींच दुसऱ्याचें नुकसान करीत राहण्याच्या प्रवृत्तीचा, प्रत्येक विध्वंसकारक गोष्टींत सदोदित रममाण होऊन त्यांतच आनंद मानणारा मानवी प्राणी हे उभयतांही आपआपल्या मृत्यूनंतर कीर्ति व अपकीर्ति या रूपानें जिवंत राहतात, ही गोष्ट त्याला पूर्णपणें माहीत होती; पण एखादा अट्टल दारूबाज आपली "तल्लफ" घालविण्याकरितां जशी घशांत सारखी दारू ओतीत असतो, पण त्यामुळें त्याची तल्लफ न जातां ती सारखी वाढत जाते व तोही तलफेच्या नरडीस नख देण्याकरितां हट्टानें सारखे आपल्या नरड्यांत "गिलास" ढोसितो, व अखेरीस आपल्या जन्माचें मातेरें करून घेतो; अथवा एखादा अट्टल जुगारी सारखा अंगावर डाव येऊं लागल्यावर ज्याप्रमाणें चिडीस जाऊन आपण होऊन आपल्या सर्वस्वाचा नाश करून घेण्यास तयार होतो; त्याप्रमाणेंच औरंगझेबानें आपल्या कृतीनें निर्माण केलेल्या राजकीय तुफानी समुद्रांत जसजसें त्याच्या नशीबाचें तारूं भवितव्यतेच्या खडकावर फुटून आंत आंत जाण्याच्या मार्गास लागलें, तसतसा तोही पूर्णपणें हट्टास पेटून गेला; आणि याच हट्टानें तें तारूं निकालास लागून त्याच्या मृत्यूबरोबरच खऱ्या व वैभवसंपन्न मोंगलबादशाहीचा अंत झाला ! !

औरंगझेब जवळ आला असें कळतांच अबूहसन शहा यानें त्यास जडजवाहीर व नानाप्रकारच्या मौल्यवान् देणग्या पाठविल्या; तथापि औरंगझेबानें आपल्या जन्मस्वभावास अनुसरून, शहाच्या प्रधानास व सैन्यास फितवून आपला कार्यभाग सिद्धीस नेण्याचा उद्योग आरंभिला; आणि त्यांत यशस्वी झाल्यावर, त्यानें शहा बदफैली व विषयी आहे; त्यानें ब्राह्मणास प्रधानाची जागा दिली; संभाजीशीं स्नेह केला व पाखंडी लोकांस तो आश्रय देतो" असे शहावर दोषारोप केले; त्याच्याशीं युद्ध करण्याची तयारी केली; व शहाच्या—शरणागत शहाच्या विनवण्याकडे कोणत्याही प्रकारें लक्ष न देतां त्यानें गोवळकोंड्याच्या किल्ल्यास वेढा दिला. यावेळीं—जरी शहाचा वजीर व त्याचें पुष्कळ सैन्य फितूर होऊन अवरंगझेबास जाऊन मिळालें होतें तरी—शहानें मोठ्या शौर्यानें सतत तीन महिने अवरंगझेबाच्या सैन्याबरोबर टिकाव धरून किल्ल्याचें संरक्षण केलें; आणि अखेरीसही पुन्हां फितूर करूनच अवरंगझेबास तो किल्ला हस्तगत करून घ्यावा लागला. किल्ला हस्तगत झाल्यावर अवरंगझेबानें शहास पदभ्रष्ट करून त्याचें सर्व राज्य खालसा केलें;

व त्यास कैद करून दौलताबाद येथील किल्ल्यावर प्रतिबंधांत ठेविलें; ( इ० सन १६८७ सप्टेंबर ) व याच ठिकाणीं तो अखेरीस मृत्यू पावला. हा शहा मोठा लोकप्रिय होता; त्यामुळें त्यास विनाकारण पदभ्रष्ट केल्याबद्दल त्याच्या प्रजेस अतीशय वाईट वाटलें. या शहाच्या सौजन्याविषयीं व शौर्याविषयीं अनेक गोष्टी लोकांच्या तोंडून त्या प्रांतांत अद्याप ऐकूं येतात. अशा—सज्जन राज्यकर्त्याचा इतका दुःखदायक शेवट व्हावा ही त्याच्या नशिबाच्या चमत्कारिक योगायोगाची गोष्ट होय, असेंच ह्मणणें प्राप्त होतें.

अशारीतीनें गोवळकोंडें येथील कुत्बूशाही घराण्याचा शेवट झाला. हें राज्य बहामनी राज्याशीं व त्यानंतरच्या इतर राज्यांपैकींच्या चारी राज्यांशीं तुलना करून पाहतां पुष्कळच सुसंपन्न व सुव्यवस्थित होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मोंगल बादशाहीच्या इतिहासाकडे लक्ष देतां असें दिसतें कीं, बाबर हा त्यास राज्यपद प्राप्त झाल्यावर पुढें लवकरच मृत्यू पावला; हूमायून यासही एकसारखा राज्याचा उपभोग न घेतां येतां मधील पंधरा वर्षांचा काळ त्यास पदभ्रष्टतेंत कंठावा लागला; आणि इ० सन १५५६ मध्यें अकबर गादीवर बसला तेव्हांपासून तो इ० सन १७०७ मध्यें अवरंगझेब मृत्यू पावला तोंपर्यंतच्या सतत १५१ वर्षांच्या अवधींत एकामागून एक अशा—अकबर, जहांगीर, शहाजहान व अवरंगझेब या—चारच बादशहांनीं राज्य केलें आहे. ह्मणजे चारच राज्यकर्त्यांनीं लागोपाठ दीड शतकपर्यंत सारखें राज्य केल्याचीं इतिहासांत थोडींच—फार थोडींच उदाहरणें आहेत; कुत्बूशाही राज्य हेंही एक त्यांपैकींचेंच उदाहरण आहे; आणि मोंगली राजघराण्याप्रमाणेंच या घराण्यांतील फक्त सहाच सुलतानांनीं—ह्मणजे कुली, जमशीद, इब्राहीम, महंमदकुली, अब्दुल्ला हुसेन व अबू-हसन कुत्बूशहा यांनीं—इ० सन १५१२ पासून इ० सन १६८७ पर्यंतच्या १७५ वर्षें एकसारखें लागोपाठ राज्य केलेलें आहे; शिवाय अबू हसन पदभ्रष्ट होऊन कुत्बूशाही राज्य नष्ट झाल्यामुळेंच हा काळ पावणेदोन शतकांचा गणण्यांत आला आहे; आणि जर कुत्बूशाही राज्य नष्ट न होतां अबू हसन गादीवर असता तर त्याच्या मृत्यूपर्यंतच्या कालाची गणना केल्यास तो काळ वरील पावणेदोन शतकांच्या काळाहून अधिकच भरला असता हें उघड आहे; शिवाय अकबरापासूनच्या चारी मोंगल बादशहांप्रमाणेंच हे सहा राज्यकर्तेही कर्तबगार व हुषार निपजलेले आहेत; व अशीं उदाहरणें इतिहासांत फार थोडींच आढळून येत असल्यामुळें तीं लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

बहामनी राज्यापासून निर्माण झालेलें चवथें राज्य ह्मणजे अहंमदनगर येथील निजामशाही हें होय. विजयानगर येथें तिमाप्पा बहिरव या नांवाचा एक ब्राह्मण

रहात असे; त्याचा मुलगा मलिक नाईब निजामउलमुल्क हा असून त्याचा मुलगा अहंमद निजामशहा—अथवा मलिक अहंमद निजामशहा हा अहंमदनगर येथील निजामशाही घराण्याचा मूळपुरूष होय; या बाबतींत असा उल्लेख आढळतो कीं, निजामशाही घराण्याचे मूळ वंशज निजामशाहीच्या सरहद्दीवर असलेल्या वऱ्हाडांतील पात्री या गांवीं रहात असत; व ते तेथील पुरातन हक्कदार कुळकर्णी असत. पुढें कांहीं काळानें त्या वंशांतील तिमाप्पा बहिरव कुळकर्णी हा विजयानगर येथें येऊन राहिला; व त्याचाच वंशज बेदरास येऊन त्याचा मुलगा अहंमद यानें निजामशाही राज्याची स्थापना केली. एकदां अहंमदशहा बहामनी याची विजयानगर-कराशीं लढाई चालली असतां त्याच्या सैन्यांतील मुसलमान सैनिकांनीं मलिक नाईब यास कैद करून बेदर येथें नेलें. तेथें गेल्यावर त्यानें मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली व हस्सन हें नांव धारण केलें. तेव्हांपासून तो राजवाड्यांतील इतर गुलामा बरोबर तेथें रहात असे. पुढें अहंमदशहानें त्याची हुषारी पाहून त्यास आपला मुलगा शहाजादा महंमद याच्या तैनातींत ठेविलें. तेथें असतां त्यानें शहाजाद्याबरोबर अभ्यास करून अरबी व फारशी भाषेंत प्राविण्य मिळविलें व त्याच्यावर शहाजाद्याची कृपा जडून परस्परांमध्यें स्नेहभावही उत्पन्न झाला. पुढें कांहीं काळानें महंमदशहा गादीवर आला; तेव्हां त्यानें मलिक नाईब यास एक हजार पथकाची सरदारी दिली; पुढें वाढत वाढत कांहीं काळानें तो बहामनी दरबारांत पहिल्याप्रतीचा सरदार बनला व " अश्रफ हुमायून " आणि " निजाम-उल्-मुल्क् " हे किताब त्यास मिळाले. नंतर महंमदशहाचा वजीर ख्वाजा महंमद गवान याची त्याच्यावर अतीशय कृपा जडली; व त्यानें शहाजवळ शिफारस करून मलिक नाईब निजाम-उल्-मुल्क् यास तैलंगण प्रांताची सुभेदारी व राजमहेंद्री व कंडापिली या दोन प्रांतांची जहागीर देवविली. पुढें महंमदगवान याच्या वधानंतर त्याचें वजीरीचें काम व " मलिक नायब " हा किताब शहानें त्यास दिला. महंमदशहा मृत्यू पावल्यावर त्याचा मुलगा महंमूद शहा हा गादीवर आला; त्यानेंही निजामाकडेस राज्याची वजीरी व मलिक नायब हा किताब कायम ठेविला व राजमहेंद्री व कंडापिली शिवाय बिड व व दौलताबाद नजीकचे प्रांतही त्यास जहागीर दिले. तेव्हां त्यानें या दोन प्रांतांचा कारभार पाहण्यास आपला अज्ञान मुलगा मलिक अहंमद यास नेमिलें व त्याप्रमाणें तो जुन्नर येथें राहून या जहागीरीची व्यवस्था पाहूं लागला. महंमद गवानच्या वेळीं या प्रांतावर त्यानें मराठे अधिकारी नेमिले होते; त्यांनीं मलिक अहंमद याचा त्या प्रदेशाच्या ताब्यासंबंधीं सारखा प्रतिकार केल्यामुळें त्यास या जहागिरीचा शांततेनें

उपभोग घेतां आला नाहीं. पुढें तो प्रौढ झाल्यावर त्यानें शिवनेरी किल्ल्यावर हल्ला केला व तेथील मराठे शिबंदी सैन्याचा पराभव करून तो किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला. त्याठिकाणीं त्यास महाराष्ट्र व कोंकणप्रांताचा पांच वर्षांचा जमा केलेला मुबलक वसूल आयताच मिळाला; व या संपत्तीच्या जोरावर त्यानें सैन्यसामुग्रीची उत्तम सिद्धता करून चंदन, वंदन, लोहगड, तोरणा, सक्री, तिकोना, कोंडाणा, पुरंदर, मांडुप, जावधन, कुहरदुर्ग, मनरंजन, माहुली व पाली वगैरे किल्ले आपल्या हस्तगत करून घेतले, आणि कोंकण प्रांत सर करून राजापुरास वेढा दिला. इतक्यांत त्यास आपला बाप मलिक नाईब निजाम उल्मुल्क याचा वध झाल्याचें वर्तमान कळलें; त्याबरोबर तेथील वेढा उठवून तो एकदम जुन्नर येथें आला; व "अहंमद निजाम-उल्-मुल्क् बहिरा" हें नांव धारण करून-जरी त्यानें शहा हा किताब धारण केला नाही तरी-तो स्वतंत्र राज्यकर्ता बनला.

त्यानंतर त्यानें आपल्या ताब्यांखालील प्रदेशाची इतकी उत्कृष्ट व्यवस्था केली कीं, त्याच्या राज्यांतील एका टोंकापासुन दुसऱ्या टोंकापर्यंत पाहिजे तिकडे काठीस सोनें बांधून फिरावें. त्याप्रमाणेंच त्यानें राज्यभर इतका कडक बंदोबस्त ठेविला होता कीं, त्याच्या हुकुमाशिवाय राज्यांत कोणतीच गोष्ट घडून येत नसे. अहंमद स्वतंत्र होतो, असें पाहून त्यास शिक्षा करण्याच्या इराद्यानें बहामनी शहानें झैनउद्दीन या नांवाच्या एका सरदारास त्याच्यावर पाठविलें; परंतु हा सरदार चाकणच्या किल्ल्यांत आहे असें पाहून अहंमदनें त्याच्यावर छापा घालुन त्यास ठार मारिलें व बहामनी फौजेचा पूर्ण पराभव केला. त्यानंतर शहानें त्याच्यावर पुन्हां जहांगीरखान या नांवाच्या सरदारास पाठविलें; परंतु तो बेसावध असतां त्याच्यावरही अहंमदनें छापा घालून त्याच्या सैन्याची कत्तल उडविली व बहामनी सैन्याचा पुन्हांही पूर्णपणें पराभव करून टाकिला. त्यानंतर त्यानें "शहा" हा किताब धारण केला; व राजरोसपणें तो बहामनी राज्यापासून स्वतंत्र बनला. त्यानें दौलताबाद व जुन्नर यांच्या अगदीं मध्यभागीं असलेलें "बिंकर" या नांवाचें खेडें आपल्या राजधानीचें ठिकाण केलें; इ० सन १४९४ मध्यें त्यानें त्या शहाराचा पाया घातला, व त्या शहरास आपलें ह्मणजे "अहंमदनगर" हें नांव दिलें. याठिकाणीं अहंमदानें व त्याच्या सरदार मंडळींनीं सतत दोन वर्षें मोठे परिश्रम घेऊन, अनेक सुंदर वाडे व इमारती बांधविल्या व त्या शहरास अतिशय शोभा आणिली. या शहाच्या कारकीर्दींत मराठे लोकांनीं दक्षिणेंत बरीच पुंडाई आरंभिली होती; तथापि या काळांत मराठ्यांचा निजामशाहींत विशेषसा उत्कर्ष झाल्याचें आढळून येत नाहीं. हा शहा अत्यंत सद्गुणी होता; अहंमदशहाच्या अंगीं इतके सद्गुण होते कीं, त्यांचें यथार्थ वर्णन करण्यासही

आपण असमर्थ आहोंत, असें फेरिस्ता ह्मणतो. हा शहा पहिल्याप्रतीचा मर्यादशील असून त्याचें एकपत्निव्रत इतकें कडक असे कीं, त्याच्यासारखा अलौकिक नैतिक आचरणाचा दुसरा पुरुष मुसलमानांच्या इतिहासांत क्वचितच आढळेल. हा शहा रस्त्यानें जाऊं लागल्यास कदाचित् आपली नजर दुसऱ्या स्त्रीवर जाईल ह्मणून इकडे तिकडे पहात नसे; एकदां तो गाविलगडचा किल्ला हस्तगत करून घेण्यास गेला असतां त्याच्या एका सरदारानें, तेथें पकडलेल्या लोकांतील एक अतिशय सुंदर स्त्री त्यास नजर केली. या स्त्रीस पाहून शहाही तिच्यावर अतिशय मोहित झाला; परंतु तिनें जेव्हां " मला भ्रतार आहे. " असें सांगितलें तेव्हां त्यानें लागलींच आपला मोह आवरिला व त्या स्त्रीस तात्काळ तिच्या नानलगाच्या स्वाधीन केलें. याच शहाच्या कारकीर्दींत दक्षिणेंत द्वंद्वयुद्धाची पद्धत सुरू झाली. हा शहा इ० सन १५०८ मध्यें मृत्यू पावला व त्याचा सात वर्षांचा मुलगा बुऱ्हाण निजामशहा हा गादीवर आला.

या शहाच्या कारकीर्दींत मराठ्यांचा पुष्कळच राजकीय उत्कर्ष झाला. शेखजाफर या नांवाचा एक मुसलमान सरदार या शहाचा मुख्य प्रधान होता; परंतु तो त्या जागेस नालायक असून सर्वांनाच अप्रीय झाला होता, ह्मणून बुऱ्हाण निजामशहानें त्यास त्या कामावरून दूर करून कंबरसेन या नांवाच्या एका ब्राह्मणास त्याच्या जागीं नेमिलें. हा मनुष्य बुऱ्हाण निजामशहाच्या दरबारांत पुष्कळ दिवस मुख्य प्रधानाचें काम करीत असून तो मोठा हुषार, शहाणा, प्रामाणिक, दूरदर्शी व मसलती होता. या शहाच्या कारकीर्दींत इ० सन १५३० मध्यें गुजराथचा राज्यकर्ता बहादूरशहा यानें माळवाप्रांत आपल्या हस्तगत करून घेतला; तेव्हां त्याबद्दल त्याचें अभिनंदन करण्याकरितां बुऱ्हाणशहानें आपल्या दरबारच्या शहाताहीर या नांवाच्या एका मुत्सद्यास त्याच्याकडे वकील ह्मणून पाठविलें; त्यावेळीं त्याच्याबरोबर नरसो पंडित या नांवाचा दुसरा एक ब्राह्मण मुत्सद्दी वकील ह्मणूनच पाठविला होता, असा उल्लेख आढळतो. बहादूरशहा हा बऱ्हाणपूर येथें असतां खानदेशाचा सुलतान महंमदखान फरूकी याच्या मार्फत बहादूरशहानें या वकील मंडळाची भेट घेतली; " हिंदुस्थानचें सार्वभौमत्व तैमूरलंगाच्या वंशास प्राप्त होऊन मोंगली राज्याचा दिवसेंदिवस उत्कर्ष होत चालला आहे, तरी अशा वेळीं बुऱ्हाण निजामशहाशीं सख्य केल्यास आपला अतीशय फायदा होईल " असें फरूकी यानें बादशहास सुचविलें; तेव्हां बुराणशहाची व आपली बऱ्हाणपूर येथें भेट व्हावी व आपसांत सख्य व्हावें, असें ठरवून त्यास बऱ्हाणपूर येथें आणण्यास, बहादूरशहानें या वकीलमंडळाला अहंमदनगर येथें परत जाण्याला निरोप दिला.

बुऱ्हाण निजामशहा यास अशारीतीनें आपण बऱ्हाणपूर येथें बहादुरशहाच्या भेटीस जावें ही गोष्ट पसंत पडली नाहीं; तथापि शहा ताहीर व कंवरसेन यांनीं शहास विशेष आग्रह केल्यामुळें तो अखेरीस बहादुरशहाच्या भेटीस जाण्यास कबूल झाला. शहाजादा हुसेन व प्रधान कंबरसेन यांच्या हवालीं राज्याचा सर्व कारभार सोंपविला; संभाजी चिटणवीस व ख्वाजा इब्राहीम या दोन वकिलांना त्यानें पुढें पाठविलें; व आपणाबरोबर-सात हजार स्वार घेऊन तो शहा ताहीरसह बऱ्हाणपूर येथे गेला, आणि परस्पर राज्यकर्त्यांच्या भेटी होऊन उभयतांमध्यें सख्य झालें; नंतर तो अहमंदनगरकडे परत फिरला; शहा राजधानी नजीक आल्यावर शहाजादा हुसेन, कंबरसेन व विजापूर आणि गोवळकोंडें दरबारचे वकील त्यास सामोरे गेले व तो मोठ्या समारंभानें राजधानींत येऊन दाखल झाला.

त्यानंतर बुऱ्हाण निजामशहानें आपला हुषार प्रधान कंबरसेन याच्या मदतीनें आपल्या प्रदेशाची सुव्यवस्था व बंदोबस्त केला. अहंमद निजामशहा मृत्यू पावल्यावर डोंगरी प्रदेशांतून असणाऱ्या मराठे सरदारांनीं शहास खंडणी न देतां बंडाळी आरंभिली होती; या मराठ्यांच्या ताब्यांतील सुमारें तीस किल्ले शहानें कंबरसेन दिवाणाच्या साह्यानें आपल्या ताब्यांत घेतले; आणि अशा रीतीनें त्यांची खोड मोडल्यावर " जरूर पडेल त्यावेळीं नोकरी करीत जाऊं " असा त्यांच्याजवळून करार करून घेऊन, शहानें त्यांच्या जहागिरी त्यांना परत दिल्या. त्याप्रमाणेंच ख्वाजा इब्राहीम व संभाजी चिटणवीस या उभयतांनींही वकिलातीचें उत्तम काम बजाविल्यामुळें त्यांना अनुक्रमें " लतीफखान " व " प्रतापराव " असे किताब देऊन शहानें त्यांचीं नांवें आपल्या प्रमुख व भरंवशाच्या अधिकाऱ्यांत दाखल केलीं.

या शहाचा विजापूरकर इब्राहीम अदिलशहा यानें दोनदां पराभव केला. विजयानगरकर रामराजाची मदत घेऊन बुऱ्हाणशहानें विजापूरकरावर अनेक स्वाऱ्या केल्या, पण त्याचा कांहींही उपयोग न होतां इब्राहीमचा पराभव करण्याचे त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. अखेर अशाच एका स्वारींत—रामराजाची कुमक घेऊन त्यानें इ॰ सन १५५३ मध्यें विजापूर शहरास वेढा दिला. त्यावेळीं—त्यास पोटशूळाची जबरदस्त व्यथा होऊन त्याची प्रकृती अतीशय बिघडली; ह्मणून तो अहंमदनगर येथें परत आला, आणि थोड्याच दिवसांत मृत्यू पावला. त्याचें वय मृत्यूसमयीं चौपन वर्षांचें होतें. त्यानें एकंदर सत्तेचाळीस वर्षें राज्य केलें; त्याच्या कारकीर्दीचा पुष्कळ काळ युद्धांत गेला. त्यास, त्याची प्रीयकर राणी अमीना हिच्यापासून झालेले हुसेन व अब्दुलकादर हे दोन, विजापूरकर युसफ अदिलशहाची मुलगी, व शहाची दुसरी राणी बीबीमरियम हिच्यापासून झालेले शहा

अल्ली, व मिरानमहंमद बाहीर हे दोन; व तिसऱ्या एका स्त्रीपासून झालेला मुलगा हैदर ऊर्फ शहा हैदर असे पांच मुलगे होते. बुऱ्हाणशहाच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा हुसेन निजामशहा हा इ० सन १५५३ यावर्षी—गादीवर आला.

हा शहा गादीवर आला, त्यावेळीं तो तेरा वर्षांचा होता; या शहाच्या कारकीर्दीतील अत्यंत महत्वाची गोष्ट ह्मणजे " विजयानगरच्या राज्याचा ऱ्हास " ही होय. इ० सन १५६४ मध्यें अहंमदनगर, विजापूर, बेदर व गोवळकोंडें वगैरे दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांच्या राजकर्त्यांनीं संगनमत करून तालीकोटच्या नैऋत्येस सुमारें तीस मैलांवर विजयानगरकर रामराजाबरोबर युद्ध केलें; व त्यांत त्याचा पराभव करून व त्यास ठार मारून त्यांनीं तें राज्य नष्ट करून टाकिलें; या युद्धांतून विजयी होऊन हुसेन निजामशहा हा अहंमदनगर येथें परत आल्यावर लवकरच (ता० ७ माहे जून इ० सन १५६५ रोजीं) मृत्यू पावला. त्यावेळीं त्याचें वय चोवीस वर्षांचें होतें; त्यास चार मुलगे व चार मुली अशीं आठ अपत्यें होतीं; त्याच्या मृत्युनंतर त्याचा अज्ञान मुलगा मूर्तुजा निजामशहा हा गादीवर आला.

मूर्तुजा निजामशहा ( इ० सन १५६५ ते इ० सन १५८६ ) मिरान हुसेन निजामशहा ( इ० सन १५८६ ते इ० सन १५८८ ) इस्मईल निजामशहा ( इ० सन १५८८ ते इ० सन १५९१ ) बुऱ्हाण निजामशहा दुसरा ( इ० सन १५९१ ते इ० सन १५९४ ) या चारी राज्यकर्त्यांच्या कारकीर्दींत मराठ्यांचा राजकीय उत्कर्ष झाल्याचें आढळून येत नाहीं; व त्यांच्या कारकीर्दीतील महत्वाच्या गोष्टींचा मागें उल्लेख आला

---

**टीप १:**—या बाबतींत भा० इ० सं० मंडळाच्या नवव्या संमेलनांत के० पां० न० पटवर्धन यांनीं एक निबंध वाचला; त्याचा सारांश असा आहे कीं, " ज्या लढाईंत मुसलमानी संघ व अलिया रामराज यांमध्यें कृष्णानदीच्या कांठीं घनघोर संग्राम होऊन विजयानगरचा विध्वंस झाला, त्या लढाईस, " तालीकोटची लढाई " या नांवानें ओळखतात. ( के० ) गो० का० चांदोरकर धुळें यांनीं संपादिलेल्या बखरींत राक्षस तागडी असें नांव आहे. नुकत्याच सांपडलेल्या कानडी बखरींतही रक्कस तागडी असें नांव आहे. राक्षसतागडी हा रक्कसगी व तंगडगी या जोड नांवाचा अपभ्रंश आहे. हीं दोन्हीं गांवें एकमेकांपासून ८—१० मैलांच्या अंतरावर कृष्णानदीच्या कांठीं आहेत. मि० सिवेल यानें सुचविलेलें इंगलगी हें गांवही येथून जवळच आहे. तालीकोट पासून २५-३० मैलांवर कृष्णेच्या कांठीं वरील गांवीं लढाई झाली असतां व मराठी कानडी बखरींतून वर्णिलेल्या रणक्षेत्राची जागा वरीलप्रमाणें निर्णित होत आहे; तेव्हां यापुढें या युद्धास " तालीकोटचें युद्ध " असें न ह्मणतां " रक्कसगी तंगडगी येथील युद्ध " हेंच ह्मणणें इतिहासास धरून होईल.

असल्यामुळें त्याची याठिकाणीं द्विरुक्ती करण्याचेंही कारण नाहीं. बुऱ्हाण निजामशहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा इब्राहीम निजामशहा हा गादीवर बसला; परंतु चारच महिन्यांत तो मारला गेला; व राज्याचा प्रधान मिआन अंजू यानें इब्राहीमचा तान्हा मुलगा बाहादूर यास चावंदच्या किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेवून, आणि अहंमद या नांवाच्या एका बारा वर्षांच्या मुलास गादीवर बसवून तो स्वतः राज्यकारभार करूं लागला. यावेळीं एकलासखान वगैरे सरदारमंडळींनीं मिआन अंजू यास अशी सल्ला दिली कीं, इब्राहीम शहाचा मुलगा बाहादूर यास गादीवर बसवावें, आणि राज्याचा कारभार चांदबिबी हिच्या हवालीं करावा; परंतु ही सल्ला मिआन अंजू यास पसंत पडली नाहीं; व त्यानें वर लिहिल्याप्रमाणें, अहंमद या नांवाचा एक बारा वर्षांचा मुलगा दौलताबाद येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत होता, त्यास तेथून आणून त्याची निजामशाही गादीवर स्थापना केली. इतक्यांतच अहंमद हा निजामशाही वंशांतील खरा वारस नाहीं, असा वाद उपस्थित झाला; तेव्हां एकलासखान वगैरे मंडळींनीं व हबशी लोकांनीं मिआन अंजू याचा पक्ष सोडिला व दुफळी उत्पन्न होऊन मोठ्या जोराचे तंटे सुरू झाले. तेव्हां मिआन अंजू यानें, अकबराचा मुलगा शहाजादा मुराद हा गुजराथच्या सुभ्यावर होता त्यास आपल्या मदतीस बोलाविलें. तथापि तो अहंमदनगर येथें येऊन पोहोंचण्यापूर्वींच मियान अंजू यानें एकलासखानाचा पूर्ण पराजय केला होता. त्यामुळें मुराद यास आपण उगाच आपल्या मदतीस बोलाविलें, असें त्यास वाटूं लागलें होतें; तथापि झाली गोष्ट परत येत नाहीं असें समजून त्यानें राजधानीचा बचाव करण्याचें मनावर घेतलें; शिवाय किल्ल्यांत धान्यसामुग्री व दारूगोळा मुबलक भरलेला असल्यानें बंदोबस्ताची बहुतेक व्यवस्था झाल्यासारखीच होती म्हणून त्यानें राज्याचा सर्व कारभार चांदबिबी हिच्या हवालीं सोंपविला; अहंमदनगर येथील किल्ला अनसारखान या नांवाच्या सरदाराच्या हवालीं करून त्याच्या बंदोबस्ताची व बचावाची कामगिरी त्याच्याकडे सोंपविली; आणि शहाजादा मुरादविरुद्ध अदिलशाही व कुत्बशाही राज्याची मदत मिळविण्याकरितां तो अहंमद यास बरोबर घेऊन राजधानी सोडून निघून गेला. तथापि चांदबिबी ही अहंमद यास "निजामशाहीचा राज्यकर्ता" असें कबूल करण्यास तयार नव्हती; म्हणून मिआन अंजू राजधानी सोडून जातांच तिनें किल्ला व शहर संरक्षणाचें काम स्वतःकडे घेतलें; अनसारखानाचा वध करविला; बहादूर या नांवाच्या एका मुलास गादीवर बसवून त्याच्या नांवाची द्वाही फिरविली. समशेरखान हबशी व अबदुलखान बोरिशी वगैरे प्रमुख सरदारांस आपल्या पक्षांत ओढून घेतलें व तिनें स्वतः राज्यकारभार चालविण्यास प्रारंभ केला.

चांदबिबी ही मोठी शूर व अलौकिक स्त्री निर्माण होऊन गेली असल्यामुळें व दक्षिणेंतील इतिहासाशीं तिचा निकटचा संबंध असल्यामुळें; तिच्यासंबंधीं या ठिकाणीं थोडीशी अधिक हकीकत देणें अवश्यक आहे. ही लोकोत्तर स्त्री विजापूरचा प्रसिद्ध बादशहा अली अदिलशहा याची पत्नी व अहंमदनगरचा बादशहा हुसेन निजामशहा याची कन्या असून तिचा जन्म अजमासें इ० सन १५४७ मध्यें झाला. ही स्त्री मोठी सौंदर्यसंपन्नही होती. विजापूरकर अलीअदिलशहा हा गादीवर बसल्यानंतर—कारकीर्द इ० सन १५५७ पासून इ० सन १५८० पर्यंत—इ० सन १५६४ मध्यें—ह्मणजे दक्षिणेंतील मुसलमानी राज्यकर्त्यांनीं आपसांत एकोपा व सख्य करून विजयानगरकर रामराजास पालथा घालण्याकरितां जो एक प्रबळ कट तयार केला, त्याच्या थोडेच दिवस अगोदर—चांदबिबीचें अली अदिलशहाशीं लग्न झालें व तिला सोलापूरचा किल्ला आंदण देण्यांत आला. चांदबिबी ही विजापूर येथें गेल्यावर, ती तेथें अली-अदिलशहा यास राज्यकारभार चालविण्यांत मदत करीत असे व त्याच्या बरोबर ती अश्वारूढ होऊन युद्धसंग्रामासही जात असे. त्यामुळें तिच्या आंगीं वसत असलेल्या शौर्य-साहसादि गुणांची तिच्या पूर्ववयांतच चोहोंकडे प्रसिद्धी झाली होती. त्याप्रमाणेंच तिला फारशी व अरबी भाषांचें उत्तम ज्ञान असून, शिवाय मराठी व कानडी भाषाही अवगत असे. त्याप्रमाणेंच चित्रकला व संगितशास्त्र यांचीही तिला उत्तम माहिती होती. इ० सन १५८० मध्यें अली अदिलशहा याचा एका खोजानें खून केला; त्यास पुत्र-संतती नव्हती; त्यामुळें त्यानें आपल्या मृत्यूनंतर आपला भाऊ तहमास्प याचा नऊ वर्षांचा अज्ञान मुलगा इब्राहीम यास गादीवर बसवून आपल्या पत्नीनें सर्व राज्य-कारभार चालवावा अशी योजना केली होती. त्याप्रमाणें इब्राहीम हा गादीवर येऊन चांदबिबी ही प्रधान कामिलखान याच्या मदतीनें राज्यकारभार चालवूं लागली; परंतु कामीलखानानें सर्व सत्ता बळकाविण्याचा प्रयत्न केल्यामुळें तिनें त्यास कामा-वरून काढून टाकिलें व त्याच्या जागीं किश्वरखान या नांवाच्या सरदाराची नेम-णूक केली; तथापि तोही कामिलखानाप्रमाणेंच सर्व सत्ता बळकविण्याचा प्रयत्न करूं लागला; तेव्हां त्यास कामावरून काढून टाकून बंकापूरचा सुभेदार मुस्तफाखान यास त्या जागेवर नेमावें असा चांदबिबीनें बेत केला; परंतु कोणी विश्वासघात करून ही बातमी किश्वरखानास कळविली; तेव्हां त्यानें मुस्तफाखान यास ठार मारिलें; चांद-बीबीस कैद करून व तिची अतीशय अप्रतिष्टा व मानहानी करून तिला सातारा येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें; व अज्ञान बादशहा इब्राहीम याच्या नांवानें तो स्वतः राज्यकारभार चालवूं लागला. (इ० सन १५८२ च्या सुमारास) पुढें लव-

करेंच तो अतीशय अप्रीय झाला व अमीरउमराव व लष्करी लोक मिळून त्यांनीं त्याचा नाश करण्याची सिद्धता केली; परंतु किश्वरखानास ही बातमी अगाऊ समजल्यामुळें तो कसा तरी आपला जीव बचावून अहंमदनगर येथें पळून गेला; व तेथें त्यास आश्रय न मिळाल्यामुळे तो गोंवळकोंडें येथें गेला, परंतु तेथेंच मुस्तफाखानाच्या एका नातलगानें त्यास ठार मारिलें व त्याच्या इहलोकींच्या सर्व चरित्राची समाप्ती झाली. नंतर दरबारी मंडळींनीं चांदबिबीस पुन्हां सातान्याहून परत आणविलें व ती एकलासखान हबशी या नांवाच्या एका सरदाराच्या मदतीनें राज्यकारभार चालवूं लागली; अशारीतीनें राज्यांत पक्षभेद उत्पन्न झाल्यामुळे अहंमदनगर व गोंवळकोंडें येथील राज्यकर्त्यांनीं या संधीचा फायदा घेऊन विजापूर प्रांतावर स्वारी केली; व खुद्द राजधानीस वेढा देऊन तीही हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न केला; तेव्हां या आणीबाणीच्या प्रसंगीं चांदबिबी हिनें मोठ्या हिंमतीनें विजापूरच्या किल्ल्याचें संरक्षण केलें; सतत वर्षभर वेढा पडला असूनही तिनें शत्रू सैन्यास दाद दिली नाहीं; व अखेरीस शत्रुंनांच तेथील वेढा उठवून परत जाणें भाग पाडिलें. ( इ० सन १५८४. ) त्यानंतर इब्राहीम अदिलशहाची बहीण खुदिजा बेगम हिचें लग्न मूर्तुजा निजामशहाबरोबर झालें; तेव्हां या मुलीस सांभाळण्यास ती अहंमदनगर येथें माहेरीं परत आली व अखेरपर्यंत ती तेथेंच राहिली.

त्यानंतर निजामशाही राज्यांत निरनिराळ्या भानगडी उपस्थित होण्यास प्रारंभ झाला. मूर्तुजा निजामशहा व त्याचा मुलगा मिरान या उभयतांमधील कलह, त्यानें आपल्या पित्याचा केलेला वध, पुढें मिरानचाही लवकरच झालेला वध व त्यानंतरच्या अनेक भानगडी व पक्षभेद या सर्व काळांत चांदबिबी ही नगर येथेंच असून इ० सन-१५९४—९५ मधील अधिकारप्राप्तीसंबंधाच्या भांडणांत मिआनमंजूविरुद्ध तिनें प्रत्यक्ष व प्रमुखपणानें भाग घेतला होता; तिनें बहादूरशहाच्या नांवानें द्वाही फिरवून आपल्या हातीं राज्यकारभार घेतला. इतक्यांत शहाजादा मुराद हा अहंमदनगर येथें येऊन धडकला; यावेळीं मिआन मंजू हा बाह्यप्रदेशीं कुमक मिळविण्याकरितां गेला होता तरी त्याच्या पक्षाशिवाय तीन पक्ष खुद्द अहंमदनगर येथेंच निर्माण झालेले होते; त्यांपैकीं पहिला म्हणजे चांदबिबीचा असून तिनें तर बहादूर या नांवाच्या मुलास गादीवरही बसविलें होतें; दुसरा म्हणजे एकलासखान या नांवाच्या सरदाराचा असून त्यानें दौलताबादेनजीक आपला तळ ठेविला होता व मोती ह्या नांवाचा एक मुलगा निजामशाहीचा वारस ठरवून त्यास गादीवर स्थानापन्न करावें असा त्याचा प्रयत्न होता, आणि तिसरा म्हणजे नेहंगखान हबशी याचा असून तो पहिल्या बुन्हाणशहाचा यावेळीं सत्तर वर्षांचा असलेला दुसरा मुलगा शहाअल्ली

याचा पक्ष प्रबळ करून त्यास राज्यावर आणण्याची खटपट करीत होता; व त्याला आणण्याकरितां तो विजापूरच्या प्रदेशांत गेला होता; परंतु तो दौलताबादेहून नगर येथें परत येत असतां मोंगल सरदार दौलतखान लोदी यानें त्याचा गोदातीरीं पराभव केला; इकडे चांदबिबी हिनें जरी बहादूर निजामशहाच्या नांवानें द्वाही फिरविली होती तरी तो अद्याप चावंद येथील किल्ल्यांत प्रतिबंधांतच होता; व मीआन मंजू अहंमदशहास घेऊन विजापूरच्या राज्याच्या हद्दीवर होता; चांदबिबी हिनें नेहंगखान व शहाअली या उभयतांना आपणास येऊन मिळण्याविषयीं कळविलें; त्याप्रमाणें नेहंगखान यानें मोंगल सैन्याची फळी फोडून किल्ल्यांत जाऊन तो चांदबिबीस मिळाला; परंतु शहाअलीनें कच घेतल्यामुळें मोंगल सरदार दौलतखान लोदी यानें त्याचा पराभव करून व त्याच्या सैन्याचा नाश करून त्यास माघार घेणें भाग पाडिलें.

इतक्यांत विजापूर व गोंवळकोंडें येथील फौजा निजामशाहीच्या मदतीस येत असल्याचें वर्तमान मुराद यास समजलें; तेव्हां पुढें काय करावें हें ठरविण्यासाठीं त्यानें दरबार भरविला; त्यांत असें ठरलें कीं, या फौजा निजामशाही फौजेस येऊन मिळण्यापूर्वीच एकदम किल्ल्यावर हल्ला करावा. त्याप्रमाणें शहाजादा मुराद यानें ताबडतोब पांच बुरुजाखालीं पांच भुयारें खोदविलीं व तीं दारूनें भरून, आणि आंत तोफा नेण्याजोगी वाट ठेवून चुनेगच्ची दगडांनीं बांधून टाकिलीं. ही बातमी चांदबिबी हिला ख्वाजा महंमदखान शिराजी यानें गुप्तपणानें पोहोंचविली; तेव्हां चांदबिबी हिनें आपल्या लोकांसह स्वतः अतीशय परिश्रम घेऊन दोन भुयारांतील दारू काढून टाकून तीं रिकामी केलीं. व तिसरें भुयार रिकामें करण्याचा उद्योग सुरू झाला. इतक्यांत मुराद यानें त्या सुरूंगास एकदम बत्ती देवविली; त्यामुळें भुयारांतील पुष्कळ लोक ठार झाले; आणि बुरूज धडाडून खालीं कोसळून तटास खिंड पडली; त्याबरोबर किल्ल्यांतील मंडळीचें धैर्य खचलें व त्यांनीं तेथून पळून जाण्याची तयारी चालविली, तेव्हां चांदबिबी हिनें आपलें धैर्य न खचूं देतां ताबडतोब आपल्या अंगांत चिलखत चढविलें, हातांत तरवार घेऊन ती त्या खिंडाराजवळ आली; माझ्या जिवांत जीव असेपर्यंत मी शत्रुसैन्याचा किल्ल्यांत प्रवेश होऊं देणार नाहीं," अशी तिनें प्रतिज्ञा केली; तटास पडलेल्या खिंडारांतून आंत शिरण्याचा प्रयत्न करीत असलेल्या शत्रुसैन्यास ती सारखी कापून काढूं लागली; आपल्या सैन्यास उत्तेजन देऊन त्यांनाही शत्रुसैन्याबरोबर मोठ्या शौर्यानें व निकरानें युद्ध करण्यास प्रवृत्त केलें; सूर्योदयापासून सायंकाळपर्यंत मोंगल सैन्याशीं सारखी टक्कर देत राहून

त्यांचे सर्व हल्ले तिनें परत फिरविले, आणि उजाडण्याच्या आंत तिनें खिंडीच्या जागीं अजमासें आठ फूट उंचीचा नट मोठ्या धडाक्यानें बांधून काढविला; तथापि मोंगलसैन्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं, हें जाणून तिनें विजापूरच्या फौजेस त्वरेनें आपल्या मदतीस येण्याविषयीं पत्रें रवाना केलीं. तीं पत्रें मुरादच्या सैन्यांतील लोकांनीं पकडून त्याच्याकडे नेलीं; तेव्हां त्यानें "होईल तितकें लवकर या; तुह्मां सर्वांबरोबर एकदम लढावें, असा माझा मनोदय आहे." अशा मतलबाचीं पत्रें देऊन तीं सर्व पुढें रवाना केलीं. त्याप्रमाणें विजापूरकराकडील सोहलखान या नांवाचा सरदार आपल्या फौजेसह चांदबिबीच्या मदतीस येऊन दाखल झाला; आणि त्यानें मोंगली फौजेची दाणावैरण बंद करून त्यांची इतकी त्रेधा करून सोडिली कीं; "वऱ्हाडप्रांत आमच्या स्वाधीन करा ह्मणजे आह्मी निघून जातों." असें मुरादनें चांदबिबीपाशीं बोलणें लाविलें; व चांदबिबी हिनें तें मान्य केल्यावर मुराद वेढा उठवून दौलताबादच्या रस्त्यानें परत निघून गेला. (इ० सन १५९४.) त्यानंतर चांदबिबी हिनें चावंदच्या किल्ल्यांतून बहादूरशहा यास आणवून त्याची मोठ्या समारंभानें निजामशाहीच्या गादीवर स्थापना केली व महंमदखान या नांवाच्या सरदारास मुख्य प्रधान नेमून ती राज्यकारभार पाहूं लागली, "अहंमद हा निजामशाही घराण्याचा खरा वारस नाहीं," अशी इब्राहीम अदिलशहानें मिआन मंजूची खात्री करून दिली; तेव्हां त्यानें अहंमदचा पक्ष सोडिला; तेव्हां अदिलशहानें अहंमदास तहाहयात नेमणूक करून दिली; व मिआन मंजू यास आपल्या पदरीं सरदार ह्मणून ठेवून घेतलें.

बहादूर निजामशहा यानें इ० सन १५९४ पासून इ० सन १६०० पर्यंत राज्य केलें; चांदबिबी हिनें महंमदखानास राज्याचा मुख्य प्रधान नेमिलें; परंतु त्यानें राज्याचा सर्वच कारभार बळकाविला व दिवसेंदिवस तो अतिशयच प्रबळ होत चालला असें पाहून चांदबिबी हिनें ही हकीकत इब्राहीम अदिलशहास कळविली; व महंमदखानाचें प्रस्थ मोडून टाकण्याकरितां त्याची मदत मागितली; त्याप्रमाणें अदिलशहा यानें सोहलखान या नांवाच्या सरदारास तिच्या मदतीस पाठविलें; व त्यानें नगर येथें येऊन तेथील किल्ल्यांस वेढाही घातला; तेव्हां महंमदखानानें त्याचा प्रतिकार केला; व खानखानान या सरदाराच्या आधिपत्याखालीं वऱ्हाडांत मोंगली फौज होती, तिला आपल्या मदतीस बोलाविलें; परंतु महंमदखानाचें हें अविचाराचें कृत्य इतर सरदार मंडळीस आवडलें नाहीं; त्यामुळें त्यांनीं महंमदखानास पकडून चांदबिबीच्या हवालीं केलें; तेव्हां तिचा अधिकार पूर्वीप्रमाणें चालूं लागला. त्यानंतर तिनें नेहंगखान हबशी या नांवाच्या प्रतिबंधांत असलेल्या सरदारास तेथून मुक्त केलें व त्याची मुख्य प्रधानाच्या जागीं नेमणूक करून ती पुन्हां पूर्वीप्रमाणें राज्यकारभार करूं लागली.

शहाजादा मुराद याच्याशीं चांदबिबीनें तह केल्याअन्वयें वऱ्हाडप्रांत मोंगलांना देण्यांत आला होता; परंतु वऱ्हाडप्रांतच घेऊन स्वस्थ न बसतां त्यांनीं अतिक्रमण करून निजामशाही अमलाखालील पात्री वगैरे शहरें लुटून फस्त केलीं; तेव्हां चांदबिबीनें मोंगल लोकांशीं युद्ध करण्याकरितां विजापूर व गोवळकोंडें येथील राजाची मदत मागितली. त्याप्रमाणें विजापूरकरातर्फे सोहलखान व गोवळकोंडें येथून महंमदकुली सुलतान हे सैन्यासह तिच्या मदतीस आले. आणि त्यांचें सैन्य व निजामशाहीचें वीस हजार सैन्य, मिळून एकंदर साठ हजार सैन्य मोंगल सैन्याशीं सामना देण्याकरितां वऱ्हाडकडे चाल करून निघून गेलें.

यावेळीं शहाजादा मुराद हा शहापूर येथें असून मोंगल सेनापती खानखानान हा जालना येथें होता. त्यानें शहाजादा मुराद याची भेट घेतली; आपली सर्व फौज एकत्र केली; खानदेशचा सुलतान अलीखान व राजा जगन्नाथ यांची मदत मिळवून व त्यांना बरोबर घेऊन तो स्वसैन्यानिशीं या त्रिवर्गांच्या एकत्र झालेल्या सैन्याबरोबर युद्ध करण्यास पुढें चाल करून आला व या उभयतां सैन्यामध्यें गोदावरी नदीच्या कांठीं सोनपत ( अथवा सुपें सोनपत ) येथें ता० २६ जानेवारी इ० सन १५९७ रोजीं मोठ्या निकराचें युद्ध झालें, त्यांत अलीखान व राजा जगन्नाथ हे उभयतांही मारले गेले; व मोंगलांचें पुष्कळ नुकसान झालें; तथापि अखेरीस त्यांनाच विजयप्राप्ती झाली. निजामशाही व कुत्बशाही फौजा अगोदरच समरभूमि सोडून निघून गेल्या होत्या; तथापि मोंगलसेनापती खानखानान याच्याप्रमाणेंच अदिलशाही सरदार सोहलखान यानें आपल्या पराक्रमाची शिकस्त केली व मोंगलफौजेवर तोफांचा सारखा सेलगार केला; परंतु अखेरीस त्याचा पराभव होऊन त्यास शहादुर्ग येथें माघार घेऊन निघून जाणें भाग पडलें; व मोंगलसैन्यास या त्रिवर्गांच्या एकत्र झालेल्या सैन्यावर निर्णयात्मक विजय प्राप्त झाला.

परंतु त्यानंतर लागलींच शहाजादा व सेनापती या उभतांमध्यें मतभेद उत्पन्न झाला. शहाजादा मुराद याचें असें मत होतें कीं, आपण तात्काळ नगरच्या किल्ल्यास वेढा द्यावा; उलटपक्षीं सेनापती खानखानान याचें असें म्हणणें होतें कीं, वऱ्हाडमधील

**टीपः**—खानखानान हा अकबराचा प्रसिद्ध वजीर बहरामखान याचा मुलगा असून त्याचें मूळचें नांव मिर्झा अब्दुर्रहीम हें होतें; अकबरानें बहरामखानास " खान-खानान " म्हणजे श्रेष्ठांतील श्रेष्ठ, असा किताब दिला होता, तोच त्यानें त्याच्या या मुलास दिला व त्यावेळेपासून त्याचें मिर्झाखान हें नांव मागें पडून खानखानान या नांवानें तो ओळखला जाऊं लागला. हा अकबराचा कांहीं दिवस वजीर असुन इतरही मोठमोठीं अधिकाराचीं व महत्वाचीं कामें अकबरानें त्यास दिलीं होतीं. खानखानानची नात शहाजहान यास दिलेली असून, खानखानानच्या हुकुमानें खुश्रूचा वध होऊन शहाजहानच्या

बरेच बळकट किल्ले अजून आपल्या हस्तगत होणें बाकी राहिलेले आहेत, ते पहिल्यानें हस्तगत करून घ्यावे व नंतर नगरवर स्वारी करावी; परंतु मुराद यास खानखानानचा हा सल्ला पसंत पडला नाहीं. इतकेंच नाहीं तर त्यास खानखानानचा रागही आला; व त्यानें त्याच्याविरुद्ध अकबर बादशहाकडे कागाळी केली; तेव्हां अकबरानें खानखानान यास परत बोलावून घेऊन त्याच्याऐवजीं आपल्या विशेष प्रेमांतील अबुल्फज्ल यास दक्षिणेंत पाठविलें.

अशाच स्थितींत इकडे निजामशाहींत पुन्हांही एक भानगड उपस्थित झाली. प्रधान नेहंगखान हा दिवसेंदिवस अधिक अधिक प्रबळ होत गेला; आपल्या इच्छेप्रमाणें राज्यकारभार करूं लागला; आणि चांदबिबीस कैद करून व बालराजा बहादूरशहा यास आपल्या ताब्यांत घेऊन आपण निर्वेधपणें अधिकार चालवावा, अशा इच्छेनें तो चांदबिबी-विरुद्ध खटपटी करूं लागला. ही बातमी चांदबिबीस समजली तेव्हां तिनें किल्ल्याचे दरवाजे बंद करून घेतले व शहरांतच राहून सरकारी काम करण्याविषयीं नेहंगखानास हुकूम दिला; कांहीं काळ तो त्याप्रमाणें वागला; परंतु लवकरच त्यानें आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. त्यानें सैन्य जमविलें; नगरच्या किल्ल्यास वेढा दिला; चांदबिबीच्या सैन्याबरोबर कित्येक चकमकी उडविल्या; आणि पर्जन्यकाळ सुरू झाला असून खानखानान हाही आपल्या सैन्यासह दक्षिणेंतून परत गेला आहे असें पाहून शीरख्वाजा या सरदाराच्या धुरीणत्वाखालीं दक्षिणप्रांताच्या बंदोबस्ताकरितां असलेल्या मोंगली फौजेवर बीड येथें हल्ला करून तिचा

---

राज्यप्राप्तीचा मार्ग मोकळा झाला, त्यावेळेपासून तो शहाजहानच्या विशेष प्रेमांतील बनला; अकबर बादशहाच्यावेळीं तो दक्षिणच्या सुभ्यावर होता; व खानदेशाचा सुलतान राजा अलीखान यास त्यानेंच खटपट करून अकबराच्या नियंत्रणाखालीं आणिलें होतें; दक्षिण-प्रांताचा त्याच्या हातून योग्य बंदोबस्त न झाल्यानें जहांगीरनें त्यास परत बोलावून घेऊन महाबतखान व खानजहान लोदी यांना तिकडे पाठविलें; तथापि जहांगीरनें, त्यास निर-निराळ्या ठिकाणीं काम देऊन पुढें पुन्हां दक्षिणेंत पाठविलें; शहाजहाननें जहांगीरविरुद्ध केलेल्या बंडांत त्यानें शहाजहान यास मदत केली; मलिकंबरची व त्याची उत्तम दोस्ती असल्यानें बादशाही कामगिरी बजाविण्यांत विश्वासघाताचें आचरण केलें. त्याच्या या अशा वर्तनामुळें त्याची फारशी किंमत राहिली नाहीं व त्याच्यावर कोणी विश्वासही ठेविला नाहीं; तथापि तो विद्वान् असून त्यास पुष्कळ भाषा येत होत्या; व ठिकठिकाणीं हेर ठेवून मोठ्या गुप्त बातम्या काढण्यांत तो मोठा पटाईत असून एकंदर तीस वर्षें तो दक्षिणेंत होता; त्यामुळें दक्षिणच्या इतिहासांत त्याच्या नांवाचा नेहमीं उल्लेख येतो. तो लाहोर येथें इ० सन् १६२६ मध्यें मृत्यू पावला.

पराभव करून टाकिला. इतक्यांत शहाजादा मुराद मृत्यू पावल्याची खबर अकबर यास मिळाली; आणि तो स्वतःही अबुल्फज्लच्या बोलाविण्यावरून दक्षिणेंत बऱ्हाणपूर येथें येऊन दाखल झाला; ( इ० सन १५९९. ) आणि त्यानें आपला धाकटा मुलगा दानियल व खानखानान या उभयतांना दक्षिणेच्या मोहिमेवर अहंमदनगर येथें पाठविलें. मोंगली फौज अहंमदनगरावर चाल करून जात आहे, असें नेहंगखान यास समजल्यावर त्यानें बीड शहरास दिलेला वेढा उठविला, आणि आपल्या पंधरा हजार सैन्यानिशीं त्या सैन्यास अडविण्याकरितां त्यानें जयपूर, कोटलीचा घाट अडवून धरिला; परंतु ही बातमी मोंगलास त्यांच्या हेरांकडून गुप्तपणें समजली; तेव्हां ती वाट सोडून मोंगलसैन्यानें फेऱ्याच्या रस्त्यानें पुढें कूच केलें व नेहंगखानास चकवून मणेरीच्या रस्त्यानें ते थेट अहंमदनगर येथें येऊन दाखल झाले; अशारीतीनें आपल्या दोन्हींही अंगिकृतकार्यांत आपणांस अपयश आलें, असें पाहून त्यानें अहंमदनगर येथें येऊन चांदबिबीशीं पुन्हां सलोखा करण्याची खटपट केली; परंतु त्यांतही त्यास अपयश आल्यामुळें तो जुन्नर येथें पळून गेला; इकडे मोंगलसैन्यानें बिनहरकत अहंमदनगरच्या किल्ल्यास वेढा दिला व किल्ल्यास सुरुंग लावण्याचा उद्योग आरंभिला. याप्रसंगीं चांदबिबीजवळ एकही भरंवशाचा मनुष्य नव्हता; तरी तिनें हमीरखान खोजा या नांवाच्या एका अधिकाऱ्यास " पुढें काय तजवीज करावी ? " ह्मणून सल्ला विचारिला; त्यावर त्यानें " मोंगल सैन्याशीं युद्ध करून किल्ला लढवावा. " असें मत दिलें; परंतु रूध्याच्या काळीं तरी आपणास कोणावरच विश्वास ठेवितां येत नाहीं, ह्मणून आपण किल्ला मोगलांच्या स्वाधीन करून द्यावा व बाळराजासह तूर्त जुन्नर येथें निघून जावें, हें मला बरें दिसतें. " असें चांदबिबी ह्मणाली. तिचें हें भाषण ऐकतांच हमीरखानास अतीशय संताप आला; आणि " चांदबिबी हीच मोंगलास गुप्तरीतीनें सामील असून ती त्यांच्या हवालीं किल्ला करणार आहे; " अशी त्यानें दक्षिणी लोकांत खोटीच बातमी पसरविली; आपल्याबरोबर कित्येक लोक घेऊन येऊन तो चांदबिबीच्या महालांत शिरला, आणि जागच्याजागींच त्यानें तिला ठार केलें ! त्यानंतर थोडक्याच अवकाशांत मोंगलांनीं बरींच मोठमोठीं भुयारें तयार केलीं; सुरुंग उडवून किल्ल्यास पुष्कळ खिंडारें पाडिलीं; अहंमदनगरचा किल्ला सर केला. बहादूरशहा व निजामशाही घराण्यांतील इतर स्त्रीपुरुष मंडळी कैद केली;, आणि अकबरास ही सर्व हकीकत कळवून बाळराजाचीही त्याच्याकडे रवानगी करून दिली. त्यानंतर खानदेश व दक्षिण या दोन्ही प्रांतांचा कारभार दानियलच्या हवालीं सोंपवून अकबर परत गेला; ( इ० सन १६०० ) बहादूरशहास ग्वाल्हेर येथील किल्ल्यांत बंदोबस्तानें ठेविलें; आणि चांदबिबी मृत्यू पावल्याबरोबर निजामशाही नामशेष होण्याचा प्रसंग येऊन ठेपला; परंतु या आपत्तीच्या प्रसंगांतूनही

निजामशाही सरदारांनीं स्वतःच्या कर्तबगारीवर तें राज्य कांहीं काळ जिवंत ठेविलें- मिआन राजू, मलिकंबर व छत्रपति शिवाजीचा पिता शहाजी, या तिघांनीं तें राज्य जगविण्याकरितां अविश्रांत परिश्रम घेतले, आणि त्यांतल्या त्यांत मलिकंबरच्या मृत्यूनंतर ( इ० सन १५२६. ) शहाजीनें सारखी चिकाटीनें धडपड सुरू ठेवून तें राज्य मरूं नये ह्मणून, व मरेपर्यंत त्यास जगविण्याची आपली पराकाष्टा केली; अकबर आग्रा येथें निघून गेल्यावर निजामशाही सरदारांनीं शहाअलीचा मुलगा मूर्तुजा यास गादीवर स्थापन करून परिंडा येथे निजामशाही राज्याची राजधानी केली; व तें राज्य कायम राखून त्याचा उत्कर्ष करण्याचा त्यांनीं जारीनें प्रयत्न सुरू केला.

प्रसिद्ध व पराक्रमी स्त्री चांदबिबी ही खरोखरच एक अलौकिक स्त्री निर्माण होऊन गेली यांत कांहींही संदेह नाहीं. ती स्वरूपानें सुंदर असून ऐन तारुण्यांत तिला वैधव्यदशा प्राप्त झाली; तथापि तिनें आपलें नैतिक आचरण आमरण अत्यंत पवित्र व उज्वल असेंच ठेविलें. आणि कर्मयोगांतील प्रधानतत्व जें "कर्तव्य" तें करीत करीत त्यांतच अखेरीस तिनें स्वदेहाचा त्याग केला. कर्नल मेडोज टेलर यानें या असामान्य स्त्रीसंबंधीं "Noble queen" या नांवाची एक मोठी मनोवेधक व हृदयद्रावक ऐतेहासिक कादंबरी लिहिली आहे आणि तींत चांदबिबीच्या ठायीं वसत असलेल्या अनेक सद्गुणांचें अगदीं यथायोग्य वर्णन केलें आहे; तो ह्मणतो:— 'इंग्लंडमध्यें ज्या काळांत राणी एलिझाबेथ ही राज्य करीत होती त्याच काळांत, हिंदुस्थानांतील दक्षिणेंतील राज्यांपैकीं एका राज्यावर चांदबिबी ह्या नांवाची एक स्त्रीच राज्य करीत होती, ही गोष्ट इंग्लंड मधील फारच थोड्या लोकांना माहीत आहे; ती एलिझाबेथप्रमाणेंच कर्तृत्वान् होती. तशीच राजकीय बुद्धिमत्तेची होती; आणि जरी देशकाल परिस्थित्यनुरूप निराळ्याप्रकारचें तरी एलिझाबेथप्रमाणेंच तिलाही शिक्षण मिळालेलें होतें व तिच्याप्रमाणेंच हीही गुणसंपन्न होती. शिवाय तिनेंही इंग्लंडसारख्याच श्रीमान्, बुद्धिमान व पुष्कळ लोकवस्तीच्या एका मोठ्या राज्यावर राज्य केलें होतें. तिला तिचा मत्सर करणारे अनेक शत्रू असूनही तिनें आपलें शौर्य व सोशिकपणा या सद्गुणांच्या जोरावर आपल्या राज्याचा नाश अथवा त्याची विभागणी होऊं दिली नाहीं; शिवाय जरी मोह उत्पन्न करण्यासारखें तिचें वैभव होतें आणि जरी तिच्या हातीं राज्याची पूर्ण सत्ता होती, तरी ती अत्यंत साधी, उदार, निष्कपटी व दयाळू होती; व त्याप्रमाणेंच ती पवित्र, सद्गुणी धर्मनिष्ट व परोपकारी होती. थोडक्यांत ह्मणजे हिंदुस्थानांतील स्त्रियांत एक निर्दोष व अमोल्य असें चांदबिबी हें

स्त्रीरत्न निर्माण होऊन गेलें, असेंच निदर्शनास येत आहे. " यावरून ही स्त्री किती असाधारण योग्यतेची होती, याबद्दल कोणासही सहजच अनुमान करितां येईल.

अकबर बादशहा दक्षिणेंतून आग्रा येथें परत गेल्यावर, मोंगलांचें सैन्य जरी दक्षिण प्रदेशभर पसरलें होतें तरी, मिआन राजू दक्षिणी व मलिकंबर या उभयतांनीं दहा-बारा वर्षांत बहुतेक निजामशाही प्रांत आपल्या ताब्यांत मिळविला. यापैकीं कुत्बुशाही व अदिलशाही सरहद्दीपासून ह्मणजे उत्तरेकडील बीड या शहरापासून एक कोस व अहमदनगरच्या अलीकडे चार कोसपर्यंत, आणि दौलताबादेच्या पुढील आठ कोसांच्या प्रदेशापासून तों पुढें थेट चौल बंदरच्या अलीकडे आठ कोसांपर्यंतचा सर्व प्रदेश मलिकंबरच्या ताब्यांत होता; आणि दौलताबादेपासून उत्तरेस गुजराथच्या सरहद्दीपर्यंतचा आणि दक्षिणेस अहमदनगरच्या अलीकडे सहा कोसांपर्यंतचा सर्व प्रदेश मिआन राजूच्या ताब्यांत होता; आणि या उभयतांनीं मूर्तुजाशहास राहण्यास आवशाचा किल्ला दिला व त्याच्या खर्चासाठीं सभोंवतालचा कांहीं प्रदेशही त्यास स्वतंत्रपणें तोडून दिला होता; परंतु लवकरच या उभयतांमध्यें स्पर्धा सुरू झाली व ते एकमेकांचा हेवा करूं लागले. यावेळीं मोंगल सरदार खानखानान हा अहमदनगर येथें होता. त्यास या उभयतां सरदारांमध्यें वैमनस्य उत्पन्न झाल्याचें समजल्याबरोबर त्यानें तैलंगणच्या सरहद्दीवरील मलिकंबरच्या ताब्याखालील कांहीं प्रदेश हस्तगत करून घेण्याकरितां वऱ्हाडमधील आपल्या सैन्याची एक तुकडी तिकडे रवाना केली; परंतु मलिकंबरनें या सैन्यावर ताबडतोब

---

" Few in England know that the contemporary of our Queen Elizabeth in the Deccan Kingdoms was a woman of equal ability, of equal political talent, of equal though in a different sense, education, and accomplishments; who ruled over a realm as large, a population as large and as intelligent, and as rich as England; a woman who surrounded by jalous enemies, preserved by her own personal valour and endurance her kingdom from destruction and partition; who through all temptations and exercise of absolute power, was atonce simple, generous, frank, and merciful, as she was cheste, virtuous, religious, and charitable-one who among all the women of India, stands out as a Jewel without flaw and beyond price. "

—*Meadows Jayler.*

हल्ला करून त्याचा पराभव केला व त्या सैन्यास परत जाणें भाग पाडिलें. तेव्हां खानखानान यानें आपला मुलगा मिर्झा एरीच यास, मलिकंबरवर पाठविलें; त्यानें झपाट्यानें कूच करून मलिकंबर यास गोदावरी नदीच्या पश्चिम तीरावर नांदेड शहरापाशीं गांठिलें, आणि त्याच्याशीं मोठ्या निकराचें युद्ध केलें. त्यांत मलिकंबरचा पराभव होऊन तो जखमी झाला; व त्यास शत्रूच्या हातांत सांपडण्याचाच प्रसंग आला होता; परंतु त्याच्या इमानी लोकांनीं स्वतःचा जीव धोक्यांत घालून त्यास सुरक्षितस्थळीं नेलें; त्यामुळें त्याचा बचाव झाला. पुढें मलिकंबर बरा झाल्यावर मोंगल सैन्याशीं पुन्हां युद्ध करण्याकरितां सैन्य जमवूं लागला; आणि तो शूर व लोकप्रीय असल्यामुळें लवकरच त्याच्याजवळ पुष्कळ सैन्य जमा होईल व त्याच्याशीं होणाऱ्या युद्धांत कदाचित् आपणास पराभूतही व्हावें लागेल, अशी खानखानान यास भीति उत्पन्न झाली; तेव्हां त्यानें मलिकंबरशीं तहाचें बोलणें लाविलें व उभयतांमध्यें तह ठरून निजामशाही व मोंगली प्रांताच्या सरहद्दी निश्चित झाल्या.

याच सुमारास व्यंकटराव कोळी, फऱ्हादखान मौलीद, मलिक संदल खोजा वगैरे सरदारांनीं मलिकंबरचा पक्ष सोडून ते आवशें येथें जाऊन मूर्तुजा निजामशहास मिळाले, तेव्हां मलिकंबर त्यांच्यावर चाल करून गेला व त्यानें त्यांचा पूर्ण पराभव केला. या युद्धांत व्यंकटराव पाडाव होऊन मलिकंबरच्या हातीं सांपडला; नंतर त्यानें शहासही आपल्या स्वाधीन करून घेतलें; व त्यास परिंड्याच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें; परंतु तेथें राहिल्यावर लवकरच त्यानें मलिकंबराविरुद्ध मिआन राजूकडे कागाळ्या केल्या व "आपणास मलिकंबर नीटरीतीनें वागवीत नाहीं;" असें त्यास कळविलें. तेव्हां मिआन राजू हा परिंड्यास जाऊन शहास भेटला व त्यानें मलिकंबरबरोबर अनेक युद्धप्रसंग करून त्यास बरेंच जेरीस आणिलें; तेव्हां त्यानें मोंगली सरदार खानखानान याची मदत मागितली व त्याच्याकडून बीडचा सुभेदार हुसेन अलीबेग हा मदतीस आल्यावर त्याच्या साह्यानें मिआन राजू याचा पराभव केला व त्यास माघार घेऊन दौलताबाद येथें जाणें भाग पाडिलें.

---

टीप १:—नांदेड हें निजामच्या राज्यांत एक जिल्ह्याचें ठिकाण असून तें हैद्राबादपासून १६८ मैलांवर व हिंगोलीपासून ४५ मैलांवर आहे; व तें निजामरेलवेच्या मनमाड–हैद्राबाद रस्त्यावर रेलवेस्टेशन असून, हिंगोली हें ठिकाण परभणी जिल्ह्यांत आहे. हिंगोली येथें निजामची कांहीं तैनाती फौज ( Haiderabad Subsidiary Force ) रहात असे; हिंगोली हें गांव वऱ्हाडच्या सरहद्दीपासून अजमासें वीस मैल आहे. अकोला येथून हिंगोलीपर्यंत सडक असून, मार्गांत वासीम ( Bassim ) हें तालुक्याचें ठिकाण आहे; अकोल्याहून हिंगोली ८० व वासीमहून २८ मैल आहे.

इतक्यांतच शहाजादा दानियल हा मृत्यु पावला व त्याच्याजागीं खानखानान याची नेमणूक होऊन तो बऱ्हाणपूर येथून जालना येथें गेला, यामुळें मलिकंबर यास आपल्या सत्तेचा विस्तार करण्यास आयतीच संधी मिळाली; व त्यानें दौलताबादेवर हल्ला करून मियान राजूचा परभव केला; तेव्हां त्यानें खानखनान यास आपल्या मदतीस बोलाविलें; व तो आल्यावर त्यानें उभयतांमध्यें एक तात्पुरता तह घडवून आणिला; त्यानंतर मूर्तुजा निजामशहाचे व मलिकंबर याचें परस्परांविषयीं शुद्ध मन होऊन शहानें इ० सन १६०७ यावर्षी मलिकंबरसह जुन्नरवर स्वारी करून तेथील किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला व तें आपल्या राजधानीचें ठिकाण करून निजामशाही गादी तेथें नेली. नंतर शहानें मिआन राजूवर सैन्य पाठवून व त्याच्याशीं युद्ध करून त्याचा पराभव केला, आणि त्यास कैद करून त्याच्या ताब्यांतील सर्व प्रदेश निजामशाही राज्यांत सामील केला.

प्रसिद्ध इतिहासकार फेरिस्ता यानें निजामशाही राज्याचा लिहिलेला इतिहास इतकाच आहे, व तो समाप्त करितांना त्या राज्याच्या तत्कालीन स्थितीविषयीं त्यानें खालीलप्रमाणें लिहिलें आहे. तो ह्मणतो:—"मलिकंबरचें महत्व व वर्चस्व दिवसेंदिवस वाढत चाललें आहे. शहाअलीचा मुलगा मूर्तुजा हा गादीवर आहे; सर्व राज्यकारभार मलिकंबर हा मोठ्या हुषारीनें व दक्षतेनें चालवीत आहे; तरी तें राज्य लवकरच लयास जाण्याचीं चिन्हें दिसत आहेत; कारण दिल्लीचा बादशहा तें काबीज करून आपल्या प्रचंड राज्यांत सामील करून घेण्यास योग्य संधीची वाट पहात टपून बसला आहे; व पुढें काय घडून येईल, तें एकट्या परमेश्वरासच काय तें माहीत आहे." फेरिस्त्याचें हें भविष्य पुढें लवकरच खरें झालें, आणि निजामशाही राज्य खालसा होऊन तें मोंगल राज्यांत सामील करण्यांत आलें.

चांदबिबीप्रमाणेंच निजामशाही राज्याला तारणारा दुसरा पुरुष, ह्मणजे मलिकंबर ( इ० सन १५४६ ते इ० सन १६२६. ) हा होय. हा जातीनें हबशी असून पहिल्या मूर्तुजा निजामशहाचा इमानी दिवाण चंगीझखान याच्याजवळ नोकरीस होता व त्याच्याच दिमतींत राहून तो राज्यकारभाराच्या कामांत तरबेज झाला होता. अहमदनगर हें शहर मोंगलांच्या ताब्यांत होतें, ह्मणून दौलताबादेपासून सहा मैलांवर "खडकी" या नांवाचें एक शहर वसवून व तेथें मोठमोठे वाडे व हवेल्या बांधवून त्यानें निजामशाहीची राजधानी केली; व याच ठिकाणीं राहून तो राज्यकारभार करूं लागला; याच शहरास पुढें अवरंगझेब बादशहानें "अवरंगाबाद" हें नांव दिलें. त्यानें आपल्या पदरीं पुष्कळ मराठे सरदार ठेविले होते; शिंदखेडचे

देशमुख जाधवराव व मालोजी भोंसले हे उभयतांही सरदार पूर्वीपासूनच निजामशाही राज्यांत होते; व निजामशाही व आदिलशाही या दोन्हीं राज्यांत लष्करीखात्यांत पुष्कळ मराठे सरदार व इतर मराठे लोक असून ते युद्धविद्येंत तरबेज होऊन पुढें पुष्कळच उदयास आले होते. राजपुत्र सलीम यानें बंड केल्यामुळें अकबर बादशहा उत्तरहिंदुस्थानांत निघून गेल्यावर पुढें लौकरच मृत्यू पावला व राजपुत्र सलीम उर्फ जहांगीर हा गादीवर आला; व त्याचा मुलगा खुश्रू यानें बंड उभारिलें, आणि इकडे मोंगल सरदार खानखानान व त्याचे सरदार यांच्यामध्येंही बेबनाव होऊन कडाक्याचीं तंटाभांडणें सुरू झाली. मोंगल बादशाहींत ह्या ज्या अनेक भानगडी सुरू झाल्या होत्या, त्याचा मलिकंबर यानें योग्य फायदा करून घेतला; त्यानें सैन्य जमवून अहंमदनगर सुद्धां सर्व निजामशाही प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला; व खानखानान याचा पराभव करून त्यास वऱ्हाणपूर येथें निघून जाणें भाग पाडिलें.

अशारीतीनें मोंगल सैन्यास निजामशाही राज्यांतून घालवून दिल्यावर त्यानें देशस्थिती सुधारून प्रजेची उन्नती करण्याच्या कामास सुरवात केली; व त्यांत त्याला इतकें पूर्णपणें यश आलें कीं,—उत्तरहिंदुस्थानांतील राजा तोडरमल्लप्रमाणेंच दक्षिणेंतील नवीन जमाबंदीबद्दल मलिकंबरचें नांव चिरस्मरणीय झालें आहे.

मोंगल बादशहांनीं दक्षिणेंतील, खानदेश, वऱ्हाड व अहंमदनगर हीं तीन्हीं राज्यें नष्ट करून आपल्या साम्राज्यांत सामील केल्यावर हे तीन नवे सुभे करण्यांत आले; व त्यांना राजा तोडरमल्ल याचीच नवी जमाबंदी पद्धत लावण्यांत आली, ह्मणजे दक्षिणेंतील कांहीं प्रदेशाशीं या पद्धतीचा संबंध असल्यामुळें त्या जमाबंदी पद्धतीचें याठिकाणीं थोडक्यांत विवेचन केलें आहे; अकबराच्या " ऐने–अकबरी " या ग्रंथामध्यें या पद्धतीविषयीं विस्तृत विवेचन केलेलें असून त्यासंबंधीं इतिहाससंग्रहांतही तोडरमल्लच्या चरित्रासह त्रोटक माहिती दिली आहे; ती अशी कीं:—मुसलमानी राज्यकर्त्यांनीं जमीनीची पाहणी व मोजणी करून सरकारसारा ठरविण्याचा प्रयत्न, अकबर बादशहाच्या पूर्वीपासून थोडाबहुत करण्यास प्रारंभ केला होता; पूर्वीं " तैमूरची वसूल पद्धति " ह्मणून कांहीं ठोकळ नियम अस्तित्वांत होते; शीरशहानें त्यांत चांगली सुधारणा करून जमीनीची आकारणी ठरविली होती, परंतु त्या सर्वांमध्यें खरोखर प्रजेस व राज्यास सारखीच हितकारक, न्यायीपणाची, सुनियंत्रित व सुव्यवस्थित, अशी जर कोणती सुधारणा झाली असेल, तर ती राजा तोडरमल्ल यानें शोधून काढिलेली वसूल पद्धति, हीच होय. ही अद्यापि प्रसिद्ध असून सांप्रतच्या वसूल पद्धतींत ती तत्वतः दृग्गोचर झाल्यावांचून रहात नाहीं.

राजा तोडरमल्लप्रमाणेंच[1], दक्षिणेंतील नवीन जमाबंदी व्यवस्थेबद्दल मलिकंबर

---

टीप १:—तोडरमल्ल हा इ० सन १५३५ च्या सुमारास जन्मास आला; यांचें जन्मस्थान अयोध्या प्रांतांतील लहरपूर—हें ठिकाण सितापूर जिल्ह्यांत, तेथून सतरा मैलांवर आहे—हें गांव आहे; तोडरमल्लच्या घरची स्थिति गरीबीची असून त्याचा बाप लहानपणींच मृत्यू पावला; त्यामुळें त्यास आपल्या वयाच्या १५ व्या वर्षींच कारकुनीची जागा पत्करावी लागली; तो जातीनें खत्री असून शेरशहा सूरच्या वेळीं उदयास आला आणि रोहटक येथील किल्ला—गक्कर लोकांनीं उपस्थित केलेले सर्व अडथळे नाहींसे करून—शेरशहाच्या हुकुमानें त्यानें बांधिल्यामुळें तो प्रसिद्धीस आला. त्यानंतर अकबराच्या कारकीर्दींत एक दोन मोहिमा त्यानें यशस्वीपणें केल्यानंतर, अकबरानें त्याच्याकडून गुजराथ व बंगालप्रांताची जमाबंदी करून घेतली; व तिकडील बंडें मोडण्यास पाठवून तीही कामगिरी करून घेतली. पुढें इ० सन १५७८ मध्यें वजीरी व नंतर बंगालची कामगिरी केल्यावर इ० सन १५८३ मध्यें पुन्हां आग्रा येथें आल्यानंतर त्यानें जमाबंदीच्या नवीन सुधारणा अमलांत आणिल्या. तोडरमल्ल हा अतीशय उद्योगी व प्रामाणिक होता व ही नवीन जमाबंदीची व्यवस्था अमलांत आणण्यास त्यानें अतीशय परिश्रम घेतले होते. ही व्यवस्था करण्यांत शहा मनसूर या नांवाचा एक मुसलमान सरदार अकबरानें तोडरमल्ल याच्या मदतीस दिला होता व तोही मोठा उद्योगी व हुषार असून त्याचा तोडरमल्ल यास फार उपयोग झाला होता; तथापि शहा मनसूरवर पुढें राजद्रोहाचा आरोप येऊन अकबरानें त्याचा वध करविला व नंतर हें काम एकट्या तोडरमल्ल यानेंच पूर्णतेस नेलें.

राजा तोडरमल्ल यानें वसूलपद्धतिप्रमाणेंच बादशाही टंकशाळेंतही सुधारणा केली; शिवाय त्यानें राज्यकारभारांत आणखी एक दुसरी महत्वाची सुधारणा घडवून आणून हिंदुलोकांना मोंगली बादशाहतींत आपला राजकीय उत्कर्ष करून घेण्यास एक अमोल्य संधी प्राप्त करून दिली. ती सुधारणा ह्मणजे, त्यानें सर्व मुलकीखात्यांत हिंदीभाषेच्या ऐवजीं फारशी भाषा उपयोगांत आणण्याची नवी पद्धति सुरू केली ही होय. तोडरमल्ल यानें ही नवी पद्धत सुरू केल्यामुळें सर्व राज्याचे हिशोब फारशी भाषेंत होऊं लागले; त्यामुळें फारशी भाषा शिकण्याचें हिंदुलोकांत विशेष अगत्य वाटूं लागलें व तेणेंकरून त्यांना पुढें येण्यास व मुसलमान राज्यकर्त्यांशीं धर्मभेद विसरून अधिक दळणवळण ठेवण्यास सुगम झालें,—ह्मणजे हिंदुस्थानामध्यें "इंग्रजी" ही राजभाषा झाल्यामुळें जें स्थित्यंतर झालें, तसाच परिणाम कांहीं अंशीं या नवीन सुधारणेमुळें घडून आला. अकबर बादशहाची उदार राज्यपद्धती व तोडरमल्लसारख्या मुत्स-

याचें नांव चिरस्मरणीय झालेलें आहे. तोडरमल्ल यानें गुजराथ, बंगाल, वगैरे सुपीक प्रांतांमध्यें जमीनीची पाहणी करून तिच्या मगदुराप्रमाणें धारा बसविण्याची जी

---

याची योग्य सल्लामसलत, त्यांच्या योगानें हिंदूलोकांस दिल्लीच्या राजदरबारीं उदय पावण्यास चांगली संधी मिळाली; व हिंदूलोक त्या भाषेंत प्राविण्य मिळवून राजकारणांत पुढें येऊं लागले. त्यांना सर्व मुसलमान सरदारांकडे शिक्षकांच्या जागा मिळूं लागल्या; बहुधा हिंदूलोकांच्याच वसुली कामावर नेमणुका होऊं लागल्या; मनोहरसारखे प्रसिद्ध फारशी कवि निर्माण झाले; हिंदूंनीं फारशी भाषेंत अनेक ग्रंथ लिहिले; व्याकरणें, कोश वगैरे मार्मिक ग्रंथ तयार केले, आणि अखेरीस हिंदूलोकांचें फारशी भाषेंतील प्राविण्य व फारशी भाषेवरील प्रभुत्व, इतकें परमावधीस गेलें कीं, शहाजहान बादशहाचा वजीर सादुल्लाखान हा मृत्यु पावल्यावर रायरघुनाथ व चंद्रभान या उभयतांइतका फारशीभाषेंत पत्रव्यवहार करण्याइतका निष्णात तिसरा कोणी नसल्यानें त्यांनाच शहाजहान यानें या कामावर नेमिले होतें; थोडक्यांत ह्मणजे " राज्याचे हिशोब फारशी भाषेंत ठेवावे, " या तोडरमल्लच्या हुकुमानें, हिंदूलोकांच्या दृष्टीनें, मोंगली राज्यांत महत्वाचें स्थित्यंतर घडून आलें, असेंच ह्मणणें प्राप्त होतें.

राजा तोरडमल्ल हा जसा मुत्सद्दी होता, त्याप्रमाणेंच योद्धाही असून, त्याची दोन्हीं बाबतींतील कामगिरी यशस्वीपणाची आहे. बादशहा अकबर याच्या दरबारास " नवरत्नांचा दरबार " हें नांव असून त्यांत १ हकीमहुमाम, २ तोडरमल्ल, ३ मानसिंह ४ बिरबल, ५ मुल्लादोप्याजा, ६ फैझी, ७ अबुल्फज्ल्, ८ तानसेन व ९ बहरामखान या नऊ जणांचा समावेश होत असे; पेशावरच्या पलीकडे हिंदूकुश पर्वताच्या पहाडी प्रदेशांत युझफझै जातीचे अफगाण लोक रहात असत; या लोकांना आपल्या वर्चस्व-कक्षेखालीं आणण्याकरितां अकबरानें आपला दूधभाऊ झैनखान कोका यास पाठविलें होतें; त्यानें तिकडे गेल्यावर अकबराकडे आणखी मदत पाठविण्याविषयीं विनंती केली; तेव्हां मदत सैन्याबरोबर कोणास पाठवावें ह्मणून विचार होऊन अबुल्फज्ल् व बिरबल या दोघांच्या नांवाच्या चिठ्ठ्या टाकिल्या; त्यांत बिरबलचें नांव आलें; तथापि बिरबल यास युद्धाचा अनुभव नसून त्याची तिकडे जाण्याची इच्छाही नव्हती; पण आपणाला लोकांनीं भित्रा ह्मणूं नये, ह्मणून तो मोठ्या हिंमतीनें त्या सैन्याबरोबर तिकडे गेला; आणि झैनखानासारखा कसलेला योद्धा पुढें तोंडावर असल्यानें बिरबल यास पाठविण्यास कांहीं हरकत नाहीं, असें समजून अकबरानें त्याची रवानगी केली; परंतु मोंगली फौज डोंगराळ प्रदेशांत आल्यावर अफगाण लोकांनीं रात्रीच्यावेळीं सर्व वाटा बंद केल्या; आणि बिरबल व त्याच्याबरोबरील आठहजार सैन्यास कापून काढिलें !

योजना केली, तिचेंच अंशतः अनुकरण करून प्रथम त्यानें इजाऱ्यानें शेतें देण्याची चाल बंद केली. मुसलमान अंमलदारांच्या देखरेखीखालीं ब्राह्मण कारकून मंडळीकडे वसूलाचे

---

ही अनर्थाची बातमी अकबर यास अटक येथें कळल्यावर ( फेब्रुवारी इ० सन १५८६ ) त्यास अतीशय वाईट वाटलें; बिरबलाच्या मृत्यूबद्दल तो अत्यंत खिन्न झाला; सेनापति निवडण्याचा प्रश्न आपण उगीच चिठ्ठ्या टाकून ठरविला, याबद्दल त्यास पश्चात्ताप झाला; अकबर यानें बिरबलप्रमाणेंच राजा मानसिंह व तोडरमल्ल या उभयतांना दुसऱ्या बाजूनें खैबरघाटांतून अफगाणलोकांवर पाठविलें होतें; त्यांनीं या अफगाण लोकांवर जय मिळवून व त्यांच्याजवळून कांहीं करार करून घेऊन ते परत आले; नंतर अकबर काश्मीरमध्यें गेला, त्यावेळीं तोडरमल्ल लाहोर येथें राहून राज्यकारभार पहात असे. पुढें वृद्धापकाळ झाल्यानें त्यानें गंगातीरीं जाऊन राहण्याबद्दल अकबराची परवानगी मागितली व तो हरिद्वारपर्यंत निघूनही गेला होता; परंतु अकबरानें त्यास आग्रहानें परत आणिलें; आणि " गंगातीरीं रिकामें राहण्यापेक्षां लाहोर येथेंच स्वस्थपणें कालक्रमणा करा " असें त्यास सांगितलें व अकबराच्या इच्छेस मान देण्याकरितां तो येथें राहिला व आपल्या वयाच्या अजमासें ५४ व्या वर्षी ता. १० नोव्हेंबर सन १५८९ रोजीं मृत्यू पावला; आणि विशेष चमत्कार हा कीं, त्याच्या अंत्यविधीस जयपूरकर राजा भगवानदास हा हजर राहिला होता, तोही स्मशानांतून परत आल्याबरोबर लागलींच मृत्यू पावला.

राजा तोडरमल्ल स्वभावानें तापट व हट्टी असे, तथापि तो स्वधर्मनिष्ठ होता— बिरबलासारखा अकबराचा नवा धर्म त्यानें स्वीकारला नव्हता—तो देवपूजा केल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नसे. एकदां अकबराबरोबर स्वारींत असतां त्याचे देव हरवले, त्यावेळीं कित्येक दिवस त्यानें तोंडांत पाणीही घातलें नाहीं; शेवटीं अकबरानें स्वतः जाऊन त्याची समजूत करून त्यास नवीन देव आणून दिले; व नंतरच त्यानें देवपूजा करून अन्न ग्रहण केलें. शिवाय तो दररोज ईश्वरभजनामध्यें आपला कांहींकाळ नियमीतपणें घालवीत असे व पुष्कळ दानधर्मही करीत असे. त्याप्रमाणेंच त्यानें देवालयें व विहिरी बांधिल्या असून काशी येथील पांडव मंडपांतील द्रौपदीकुंडाचा त्यानें संवत् १६४६ मध्यें उद्धार केल्याचा उल्लेख आढळतो. तोडरमल्ल हा अतिशय धर्मनिष्ठ असल्यानें अबुल्फज्ल याचें त्याच्याशीं विशेष सख्य नव्हतें; तथापि अबुल्फज्ल ह्मणतोः—प्रामाणिकपणा, चोख वर्तन, धारिष्ट आणि राजकारणकौशल्य या गुणांत तोडरमल्लची बरोबरी करूं शकेल असा दुसरा कोणीही पुरुष मिळावयाचा नाहीं; " यावरूनच त्याची असाधारण योग्यता निदर्शनास येते.

तोडरमल्ल यास अकबर बादशहानें " वकिल-उस्सल्तनत, " आणि " मुश्रीफ-इ दिवान " असे दोन मोठे अधिकार दिले होते; शिवाय बादशाही दरबारामध्यें विशेष मानाची

काम सोंपविलें; सर्व शेतांची पाहणी व मोजणी केली; "बागायत" व "जिरायत" असे जमीनीचे दोन भाग ठरवून त्यांतही पुन्हां "अव्वल," "दुम," "सीम," "चारसीम" अशी प्रतवारी ठरविली. शेतांतील कांहीं वर्षांचें पीक कापून त्यावरून उत्पन्नाची सरासरी बनविली; आणि कित्येक वर्षांच्या दरांची सरासरी करून प्रत्येक शेताचें नक्त देणें ठरविलें;–जमीनीच्या उत्पन्नाप्रमाणें २/५ दोन पंचमांश हिस्सा धान्यरूपानें सरकारांत वसूल घेण्याचें ठरविलें.—शिवाय हें देणेंही जमिनींत जे पीक आलें असेल, त्या मानानें बदलीत जावें, असा ठराव केला. त्याप्रमाणेंच कांहीं वर्षे लोकांस सरकारी शेतसाऱ्याची माफी देऊन त्यानें कित्येक पड जमीनी लागवडीस आणविल्या. या कामांत त्यानें कित्येक मराठा सरदारांची पुष्कळच मदत घेतली होती; आणि साबाजी आनंदराव, शिवाजीपंत मुत्सद्दी व सखारामपंत मोकाशी वगैरे मंडळी मलिकंबर याच्या प्रमुख मदतगारांपैकीं होती. इ० सन १६१४ नंतर मलिकंबर यानें धान्यरूपानें सरकारसारा घेण्याची पद्धति कांहीं-ठिकाणीं बंद करून उत्पन्नाच्या मानानें १/३ नगदी वसूल घेण्याचा प्रघात सुरू केला. मलिकंबर यानें तोडरमल्लप्रमाणें कायमची धारेबंदी केली नाहीं; परंतु उत्पन्नाच्या मानावर वसूलाचें प्रमाण अवलंबून ठेविलें; त्यामुळें त्याची वसूलपद्धति लोकप्रीय झाली; शिवाय या नवीन जमाबंदी व्यवस्थेमुळें, कित्येक सरकारी अधिकाऱ्यांचा रयतेवर जो जुलूम होत असे, त्यांतून प्रजा मुक्त झाली. नियमीत वेळीं बिनतक्रार ठरीव वसूल गोळा होत राहिल्यानें मलिकंबर यास आपला अवाढव्य खर्च चालवितां आला; लढाईचा खर्च वजा जाऊनही

---

व फारच थोड्या हिंदूसरदारांना मिळालेली अशी चार हजारी मनसबीही त्यास दिली होती; ह्मणजे २७० खासे घोडे, ८० हत्ती, ६५ उंट, १३० गाड्या इत्यादि प्रकारचा बादशाही लवाजमा त्याच्याजवळ होता व त्यास पगार दरमहा सुमारें २२००० ( बावीस हजार ) रुपये होता. तोडरमल्लवर अकबराचें अतीशय प्रेम होतें; व मुसलमान अधिकाऱ्यांनीं त्याच्या विरुद्ध गिल्ला केल्यास तो तिकडे लक्ष देत नव्हता; आणि "तुमच्यापैकीं एकाचेंही कोणतेंही काम हिंदूकामगारांची मदत घेतल्याशिवाय तडीस जात नाहीं; आणि तुमच्या-प्रमाणेंच मीही एक हिंदू कामगार माझ्या कामांत मदतीस घेतला, तर तें मात्र तुह्मास कां खपत नाहीं ?" असा खडा सवाल टाकून त्यांना गप्प बसवीत असे. अकबर काबूल येथें असतां त्यास तोडरमल्ल मृत्यू पावल्याचें कळलें; तेव्हां त्यास फार दुःख झालें व तो तसाच लाहोर येथें निघून आला; राजा तोडरमल्ल यास धारू या नांवाचा एक मुलगा असून त्याच्याकडेही सातशें स्वारांची मनसबदारी होती; व तोही अकबर बादशहाच्या कार-कीर्दींत एक प्रसिद्ध योद्धा ह्मणून नांवाजलेला होता, तो ठट्टा येथील युद्धांत रणक्षेत्रांतच मृत्यू पावला!

त्याच्या खजिन्याची स्थिति सदोदित समाधानकारक राहिली व प्रजा सधन, समृद्ध व सुखी झाली; त्याप्रमाणेंच त्यानें ग्रामसंस्थेचेंही पुनरुज्जीवन केलें; व पाटील-कुलकर्णी यांचीं व इतर ग्रामाधिकाऱ्यांचीं वतनें वंशपरंपरेचीं केलीं. सारांश मलिकंबर यानें निजामशाही राज्य-व्यवस्थेंत अनेक महत्वाच्या सुधारणा घडवून आणून दक्षिणेच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे, यांत कांहींही संदेह नाहीं.

मलिकंबर यानें, मोंगली राज्यांत उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या मानगडींचा पूर्ण फायदा घेऊन, निजामशाही राज्याची उत्तम व्यवस्था लाविल्यानंतर त्यानें मोंगलाच्या ताब्यांतील प्रदेशावर स्वारी करण्याची तयारी केली; इतक्यांत मोंगलीराज्यांतील मानगडी मिटून—दक्षिणेंतील निजामशाही राज्यावर एकदम चोहोंकडून हल्ले करून त्या राज्याची लांडगेतोड करावी व मलिकंबर यास नामोहरम करावें, असा जहांगीर बादशहानें मनसुबा घडविला; आणि गुजराथचा मोंगल सुभेदार अब्दुल्लाखान यानें तिकडून मलिकंबरवर चाल करून यावें व त्याचवेळीं शहाजादा पर्वीझ् आणि खानजहान लोदी यांनीं राजा मानसिंग याची कुमक घेऊन खानदेश व वऱ्हाड प्रांतांतून मलिकंबरवर चाल करून यावें असा कार्यक्रम ठरविला; परंतु बादशाही फौज येऊन दाखल होण्यापूर्वीच,—ह्मणजे नियोजित काळापूर्वींच, अब्दुल्लाखान हा एकटाच मलिकंबरवर चाल करून आला; तेव्हां अब्दुल्लाखानाच्या चुकीचा मलिकंबरनें पूर्ण फायदा करून घेण्याचा निश्चय केला; मराठे लोकांप्रमाणेंच गनीमी काव्यानें लढण्याची युद्धपद्धती मलिकंबर यानें स्वीकारलेली असल्यामुळें त्यानें अब्दुल्लाखानाच्या सैन्याची इतकी दुर्दशा उडविली व त्यास इतकें त्रस्त करून सोडिलें कीं, तो कसाबसा आपला जीव जगवून बागलाणच्या डोंगरांत पळाला व तेथून गुजराथेंत निघून गेला. इतक्यांत मोंगल फौज दक्षिणेंत मलिकंबरवर चाल करून आली; परंतु अब्दुल्लाखानाच्या सैन्याची दुर्दशा झाल्याचें कळल्यावर तें सैन्य पुढें न येतां बऱ्हाणपूर येथेंच तळ देऊन जमावानें राहिलें.

त्यानंतर इ० सन १६१७ मध्यें जहांगीर बादशहानें आपला मुलगा शहाजादा शहाबुद्दीन महंमद खुर्रम् ऊर्फ शहाजहान यास दक्षिणेवरील मोहिमेवर पाठविलें व आपणही प्रसंग पडल्यास पुढें चाल करून जावें ह्मणून जहांगीर यानें मांडू येथें येऊन तळ दिला. शहाजहान यानें दक्षिणेंत आल्यावर विजापूरकर इब्राहीम आदिलशहा यास मलिकंबरच्या स्नेहांतून फोडिलें व मागें उल्लेख केल्याप्रमाणें लुकजी जाधवराव वगैरे कित्येक मराठे सरदारांत फितुरी करून त्यांनाही आपल्या पक्षाचे करून घेतलें. अशारीतीनें गोटांत फितुरी झाल्यामुळें मलिकंबर हा नाइलाजानें शहाजहान यास शरण गेला; आणि

त्यानें मोंगलांच्या ताब्यांतून पूर्वी घेतलेला प्रदेश म्हणजे अहंमदनगर व त्या सभोंवतालचा प्रदेश, शहाजहान यास परत देऊन ( इ० सन १६२४ च्या सुमारास ) त्याच्याशीं तह केला.

परंतु पुढें शहाजहान दक्षिणेंतून काश्मीरकडे निघून गेल्यावर मलिकंबरनें त्या प्रदेशावर स्वारी करून तो हस्तगत करून घेतला; तेव्हां बऱ्हाणपूर येथील मोंगल अधिकाऱ्यानें जहांगीर यास ही हकीकत कळवून ताबडतोब कुमक पाठविण्याविषयीं विनंती केली; त्याबरोबर त्यानें शहाजहान यास मोठ्या सैन्यानिशीं दक्षिणेंत पाठविलें; परंतु तो इकडे येऊन दाखल होण्यापूर्वीच मलिकंबर यानें थेट नर्मदा नदीपर्यंतच्या प्रदेशांत लूट केली; व नर्मदा नदी उतरून मांडू शहरावर चाल करून जाऊन तेथील वेशीच्या बाहेरील घरेंही त्यानें लुटून फस्त करून टाकिलीं; इतक्यांत शहाजहाननें तेथें येऊन त्याचा पराभव केला; त्याचे गनीमी काव्याचे प्रत्येक डावपेंच मोडून काढिले; आणि त्यास आपणास शरण येणें भाग पाडिलें; त्यानंतर मलिकंबरनें शहाजहानशीं तह केला व आपले परत घेतलेले प्रांत त्यानें पुन्हां मोंगलांच्या ताब्यांत देऊन त्यांच्याशीं सख्य केलें.

त्यानंतर मलिकंबर हा मोंगलाशीं सख्यत्वानें वागला व उलट मोंगलांनींही त्यास उपद्रव न देतां तें सख्यत्व कायम ठेविलें. मलिकंबर यास पुन्हां अशारीतीनें शांततेचा लाभ झाल्यावर त्यानें निजामशाही राज्याची भरभराट करण्याचे परिश्रम घेतले, आणि आसपासच्या राज्यावरही आपला दरारा बसवून विजापूर व गोवळकोंडें, येथील राज्यकर्त्यांकडून खंडण्याही वसूल केल्या. याप्रमाणें मोठ्या वैभवानें, कीर्तिनें व इभ्रतीनें, राज्यकारभार करीत, आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी इ० सन १६२६ मध्यें मृत्यू पावला व त्यानें दौलताबाद येथें जो एक मोठा घुमट बांधिला, त्यांतच त्याचें दफन करण्यांत आलें. याठिकाणीं मलिकंबरची कबर असून तिच्या संरक्षणाकरितां ठेविलेल्या नोकर लोकांस त्यावेळीं इनाम जमीनी लावून दिल्या होत्या, त्या अद्यापि त्यांच्या वंशजाकडे चालत आहेत. मलिकंबर हा मोठा न्यायी, धार्मिक व उदार असून शिवाय तो कसलेला योद्धा व नामांकित मुत्सद्दीही होता; आणि त्या कालच्या दक्षिणेंतील कर्तृत्ववान् पुरुषांमध्यें तो अग्रगण्य म्हणून गणला गेला होता; मलिकंबरच्या असामान्य योग्यतेबद्दल—त्याची न्यायबुद्धि; समता, सहिष्णुत्व, प्रजेविषयीं प्रेमभाव व सुखकर राज्यपद्धति वगैरे गुणांबद्दल अनेक मुसलमान व इंग्रज इतिहासकारांनीं मोठे प्रशंसनीय उद्गार काढिले आहेत. मलिकंबर यानें हिंदु आणि मुसलमान हा भेदभाव केव्हांही मनांत आणिला नाहीं, त्यानें हिंदूंच्या देवस्थानांचें रक्षण करून त्यांचीं उत्पन्नें चालविलीं; इतकेंच नाहीं तर चिंचवड येथील मोरया देवास त्यानें एक नवीन इनाम करून दिलें. त्याप्रमाणेंच त्यानें ब्राह्मण, मराठे वगैरे मंडळीस त्यांच्या कर्तबगारीप्रमाणें राज्यकारभारांत मोठमोठ्या जागा दिल्या. अशारीतीनें

मलिकंबरच्या अंगीं अनेक सद्गुण वास करीत असल्यानें मलिकंबरची कारकीर्द महाराष्ट्रामध्यें अतीशय लोकप्रिय झाली; आणि दक्षिणेंतील उत्तम राज्यकर्त्या मुत्सद्द्यांमध्यें त्याचें नांव चिरकाल दाखल झालें. थोडक्यांतच ह्मणजे " जहांगीरनामा " या ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें ह्मणावयाचें ह्मणजे, युद्धकला, सेनापतित्व, व्यवहारज्ञान; आणि राज्यशासन, ह्या गुणांमध्यें मलिकंबरच्या तोडीचा दुसरा कोणीही पुरुष नाहीं. त्याला दक्षिणी लोकांची—ह्मणजे मराठ्यांची—लढाईची पद्धति " कझाकी " ( Predatory Warfare) चांगली माहिती होती. ( तिला मराठी भाषेंत " बर्गेगिरी " हें नांव आहे. ) त्यानें दंगेखोर लोकांना दाबामध्यें ठेविलें, आणि शेवटपर्यंत आपला मोठा दर्जा कायम राखून सन्मानानें आपल्या कारकीर्दीची समाप्ती केली. एक हबशी गुलाम—मलिकंबर—एवढ्या मोठ्या पदावर चढल्याचें इतिहासांत दुसरें उदाहरण नाहीं; आणि या एका अभिप्रायावरूनच त्याची असामान्य योग्यता व कर्तृत्व याबद्दल कांहींही संदेह रहात नाहीं.

मलिकंबर यास फत्तेखान व चंगीझखान असे दोन मुलगे होते; परंतु या उभयतांपैकीं एकाच्याही अंगीं मलिकंबरचें कर्तृत्व व शहाणपण वसत नव्हतें. तथापि त्यांतल्या त्यांत फत्तेखान हा अगदींच कर्तृत्वहीन अथवा नालायक नव्हता; आणि निजामशाही जिवंत राखण्याविषयीं त्यानेंही—जरी मलिकंबरइतका नाहीं तरी—थोडाफार प्रयत्न केला होता. मूर्तुजा निजामशहा हा मूर्ख व नालायक राज्यकर्ता होता; परंतु मलिकंबर जिवंत होता, तोंपर्यंत त्यानें शहास आपल्या योग्य नियंत्रणाखालीं आणि सरदारमंडळावर योग्य दाब ठेवून राज्यांत कोणत्याही प्रकारची अव्यवस्था अथवा भानगडी होऊं दिल्या नव्हत्या; परंतु मलिकंबर मृत्यू पावल्यावर शहाला व शिरजोर सरदार मंडळीला योग्यप्रकारें दाबांत ठेवील असा एकही अधिकारी पुरूष निजामशाही राज्यांत अस्तित्वांत नव्हता; त्यामुळें शहाचा अनियंत्रित कारभार सुरू झाला; निजामशाही सरदार आपसांतच तंटाभांडणें करूं लागले, आणि फत्तेखानांत योग्य नियंत्रणशक्ति नसल्यामुळें त्याला कोणीही जुमानीनासें झालें. ही संधी साधुन मोंगलांनीं पुन्हां निजामशाहीवर चढाई केली; आणि फत्तेखानास त्यांनीं इतकें त्रासवून सोडलें कीं, त्यास अखेरीस नाइलाजानें मोंगलांशीं सख्य करणें भाग पडलें. ( इ० सन १६२७ ). त्यावेळीं खानजहान लोदी यानें ( हा सरदार यावेळीं दक्षिणप्रांताचा सुभेदार होता; ) निजामशहाजवळून लांचादाखल भली मोठी रक्कम घेऊन त्याच्याशीं सख्य केलें, आणि मोंगली सैन्यानें आपल्या ताब्यांत घेतलेला सर्व प्रदेश त्यानें पुन्हां शहास परत दिला.

त्यानंतर निजामशहानें आपल्या कित्येक सल्लागारांच्या सांगण्यावरून फत्तेखान यास—मूर्तुजा निजामशहाची आई ही फत्तेखानाची बहीण होती; ह्मणजे शहानें आपला मामा

असलेला वजार फतेखान यास—त्या पदावरून दूर करून खिवरच्या किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें व त्याच्या जागीं तकरीबखान या नांवाच्या सरदाराची नेमणूक करून तो राज्यकारभार करूं लागला. मागे उल्लेख केल्याप्रमाणें लुकजी जाधवराव या नांवाचा एक प्रमुख, प्रबळ व महत्वाकांक्षी मराठा सरदार निजामशाहींत नोकरींत होता. इ० सन १६२१ च्या सुमारास मलिकंबरचें मोंगल सैन्याशीं मोठ्या निकराचें युद्ध होऊन त्यांत मलिकंबरचा पूर्ण पराजय झाला; त्यावेळीं त्याच्या पक्षाचे जे कित्येक मराठे सरदार फितूर होऊन मोंगलांस मिळाले त्यांत लखूजी जाधवराव हा प्रमुख होता; व त्याचा मोंगल बादशहानें अतीशय गौरव करून त्यास चोवीस हजार पायदळ व १५ हजार स्वारांची मनसबदारी दिली होती. लखूजी जाधवराव हा देवगिरीकर रामदेवराव जाधव ( ऊर्फ यादव याच्याच घराण्यांतील असून त्यास निजामशाहींत दहा हजारांची मनसबदारी होती. ) देवगिरीकर रामदेवराव यास शंकरदेव व भीमदेव असे दोन मुलगे होते, त्यापैकीं शंकरदेवाचा मुलगा गोविंददेव ( इ० सन १३१२ ते इ० सन १३८० ) यानें हसन गंगू यास बहामनी राज्य स्थापन करण्यांत मदत केली होती व बागलाण प्रांतांत कांहीं प्रदेश हस्तगत करून घेऊन तो तिकडेसच रहात होता. पुढें त्याचा मुलगा ठाकुरजी ( इ सन १३८० ते इ० सन १४२९ ). हा हल्लीं निजामशाहींत वऱ्हाडच्या सरहद्दीवर असलेल्या शिंदखेड या गांवीं गेला व तेथें त्यानें देशमुखी वतन मिळविलें. पुढें त्याचा मुलगा भूखणदेव ऊर्फ भेतोजी यानें खानदेशांतील बराच प्रदेश मिळवून बहामनी दरबारांत आपलें महत्व वाढविलें; त्याचा मुलगा अचलकर्ण ऊर्फ अचलोजी याच्या वेळेस बहामनी राज्य नष्ट झालें व शिंदखेडकडील प्रदेश निजामशाही अमलाखालीं आला; या काळांत प्रसिद्ध कंबरसेन हा निजामशाही राज्याचा दिवाण होता; त्याच्या कारकीर्दींत मराठ्यांचा पुष्कळच उत्कर्ष झाला व त्यानें अनेक मराठे सरदारांना निजामशाही सैन्यांत मनसबी दिल्या; त्यावेळीं अचलकर्ण ( इ० सन १५०० ते इ० सन १५४० ). यांसही पांच हजार स्वारांची मनसबी दिली; त्याचा मुलगा विठ्ठलदेव हाही असाच निजामशाही राज्यांत मनसबदार असून नालीकोटजवळील विजयानगरकराविरुद्धच्या घनघोर युद्धांत त्यानें भाग घेतलेला होता; त्याचाच मुलगा लक्ष्मणदेव ऊर्फ लखूजी ( लुकजी ) जाधव ( इ० सन १५७१ ते सन १६२९ ) हा असून हा तर निजामशाहींत व मोंगली राज्यांतही एक बलिष्ट सरदार म्हणूनच गणला गेला होता; हा सरदार निजामशाही पक्ष सोडून मोंगलास जाऊन मिळाल्यावर लवकरच त्याच्यावर प्राणसंकट ओढवलें; व त्यांतच अखेरीस त्याचा अंत झाला. मलिकंबर यानें इ० सन १६२४ मध्यें मोंगली व अदिलशाही फौजेवर, निजामच्या राज्यांतील भातवाडी याठिकाणीं अकस्मात मोठ्या जोराचा छापा

राजा तोडरमल्ल याच्या या वसूल पद्धतीस " असल-इ-जमा-इ-तुमार " असें नांव आहे. तिला दक्षिणप्रांतीं " तनखा " असेंही ह्मणतात. प्रथमतः तोडरमल्ल यानें प्रत्येक प्रांतांतील जमीनीची एक प्रमाणांत मोजणी केली; निरनिराळ्या प्रांतांमध्यें निरनिराळे मोजण्याचे प्रकार होते; परंतु ते सर्व बंद करून त्यानें एक प्रमाण ठरविलें. त्यास " गज, " " तेनाब " व " बिघा " अशीं नांवें दिलीं. पूर्वी गजाचे प्रकार तीन होते; लोदी बादशहा सुलतान शिकंदर यानें मूळ ४१½ ( साडे एकेचाळीस ) इस्कंदरीचा एक गज काढिला. तो हुमायून बादशहानें बरोबर ४२ ( बेचाळीस ) इस्कंदरीचा पूर्ण गज केला; इस्कंदरी किंवा शिकंदरी ह्मणजे एक रुप्याचे व तांब्याचें मिळून केलेलें वाटोळें नाणें होतें व त्याच्या प्रमाणावर गजाची लांबी ठरविली होती. हा बेचाळीस शिकंदरीचा गज बत्तीस बोटें भरत असे. कांहीं ग्रंथकार ह्मणतात कीं, हा गज लोदी बादशहाच्या पूर्वीही अस्तित्वांत होता. तें कसेंही असो; परंतु शीरखान व सलीमखान या बादशहांनीं तो उपयोगांत आणिला यांत तर कांहींच शंका नाहीं. नंतर मोजणीचें एकसारखें प्रमाण ठरवून तोडरमल्ल ह्यानें जो नवीन गज काढिला, त्यास " इलाही गज " असें नांव पडलें. " तेनाब " या नांवाची एक दोरी असे; व तिचा हिंदुस्थानांत मोजणीचे कामीं उपयोग होत असे; परंतु हवेच्या फेरफारामुळें तिचें प्रमाणही बरोबर जुळत नसे, ह्मणून आतां बांबूस लोखंडी सांखळी जोडून त्याची तेनाब करण्यांत आली; आणि " बिघा " किंवा " जरीब " ह्मणजे तीनहजार सहाशें ( ३६०० ) चौरसगज असें एकंदर प्रमाण ठरविण्यांत आलें.

ह्याप्रमाणें मोजण्याचीं निश्चित प्रमाणें ठरविल्यानंतर जमीनीचें वर्गीकरण करण्यांत आलें. पहिलें; " पुलेज " ह्मणजे प्रत्येक ऋतूमध्यें यथायोग्य पीक देणारी जमीन; ह्या जमीनीवर " वजिफा " ह्मणजे पिकण्याचा विचार न करितां आकारिलेली ठरीव पट्टी घेत असत. दुसरें " पेरोती " ह्मणजे सतत एक पीक देणारी जमीन; अशी जमीन कांहीं दिसत पड पडूं देत असत; तिसरें " चचर " ह्मणजे पाऊसपाण्यानें वाहून जाणारी जमीन; तिची लागवड करीत त्यावेळीं तिच्यावर सरकारपट्टी एकदम घेत नसत. तर पहिले वर्षी सरकारपट्टीचा ⅖ ( दोन पंचमांश ) दुसरे वर्षी ⅗ ( तीन पंचमांश ) तिसरे वर्षी ⅘ ( चार पंचमांश ) याप्रमाणें सारा वसूल करीत असत. पुढें चौथ्या वर्षापासून शेंकडा पांच टक्केप्रमाणें वसूल व दर बिघ्यामागें एक दाम कर घेत असत. चौथें " वंजर " ( वनचर ) ह्मणजे पड अथवा पडित जमीन; हिचा आकार अगदीं माफक असे. " ऐने अकबरी " मध्यें यासंबंधीं असें लिहिलें आहे कीं, " वंजर " जमीनीमध्यें पहिल्या वर्षी, फक्त दोन शेर धान्य, सरकारपट्टी ह्मणून घेत असत; दुसरे वर्षी पांचशेर,

परंतु तें जमीनीच्या मगदुरावर व परिस्थितीवर ठरवीत असत; आणि शेतकऱ्यानें जमीनीचा सारा नक्त द्यावा, किंवा धान्यरूपानें द्यावा अशी सवलत ठेविली होती.

ह्या जमीनीच्या वर्गीकरणांपैकीं पहिल्या दोन वर्गांतील जमीनीचा सारा नक्त घेण्याचा परिपाठ होता; ह्मणून अकबर बादशहाच्या कारकीर्दीच्या १९ वर्षांचे धान्याचे दर काय होते याबद्दल बारीकरीनीची चौकशी करण्यांत आली; आणि त्यानंतर त्याची सरासरी काढून आकारणीचे दर ठरविण्यांत आले.

पहिल्या दोन वर्गांच्या जमीनी, ह्मणजे " पुलेज " व " पेरोती " ह्यांच्यामध्यें पुन्हां " उत्तम, " " मध्यम, " व " कनिष्ठ " अशा वर्गवारी करण्यांत आली व त्याप्रमाणें पुन्हां साऱ्याची आकारणी करण्यांत आली, तथापि त्यांनही पुन्हां एकूणीस ( १९ ) वर्षांची सरासरी अधिक वाटूं लागली; ह्मणून अवघ्या दहा ( १० ) वर्षांची सरासरी घेऊन त्यावर आकारणीचें प्रमाण बसविण्यांत आलें.

राजा तोडरमल्ल यानें ही वसूलपद्धति ठरविण्यासाठीं दहा कानूगो–अथवा कानूनगो,–ह्मणजे जमाबंदीचे मुख्य कामगार नेमिले; ( यांना सरकानूगो, सरकानगो अथवा सरकानूनगो, असेंही ह्मणत असत. ) त्यांनीं प्रांतांप्रांतांतील कानूगो लोकांनीं तयार करून पाठविलेली माहिती एकत्र जमविली; व त्याप्रमाणें, सर्व प्रांतांची वसूल आकारणी तयार झाल्यावर " तक्षीममुलूक "–ह्मणजे एकंदर राज्याची प्रांतवार जमा–ठरवून सर्व राज्याचा वसुली आंकडा कायम करण्यांत आला. त्यामुळें हिंदुस्थानच्या बारा सुभ्यांची सुरेख व्यवस्था झाली. ह्या सुभ्यांचे " सरकार " व " महाल " असे भाग व पोटभाग केले होते; अकबर बादशहाचे एकंदर सुभे बारा होते; त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:–१ अलाहाबाद २ आग्रा, ३ अयोध्या, ४ अजमीर, ५ अहंमदाबाद, ६ बहार, ७ बंगाल, ८ दिल्ली ९ काबूल, १० लाहोर, ११ मुलतान, आणि १२ माळवा. या बारा सुभ्यांत व वऱ्हाड, खानदेश आणि अहंमदनगर, हे तीन नवे सुभे सामील झाले व एकंदर संख्या पंधरा झाली. ह्या नवीन तीन सुभ्यांसही हीच वसूलपद्धति लावण्यांत आली; या नवीन वसूलपद्धतिप्रमाणें अकबर बादशहाच्या राज्याचा एकंदर जमीनमहसूल ९,०७,४३,८८१ ( नऊकोटी, सातलक्ष त्रेचाळीस हजार आठशें एक्यायशीं ) रुपये झाला.

राजा तोडरमल्ल यानें ही जी नवीन जमीन महसुलाची पद्धति शोधून काढिली, ती सर्वप्रीय झाली व तिच्यायोगानें प्रजेस सुख लागलें, हें सांगावयास नकोच; ह्याच पद्धतीच्या आधारावर पुढील सर्व वसूलपद्धतीची योजना झालेली असून सर जान शोअर व मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्यांनीं या पद्धतीची प्रशंसा केलेली आहे; आणि ह्या वसूलपद्धतीमध्यें जी दूरवर राजकीयदृष्टि दिसून येते, ती हिंदुस्थानच्या–हल्लींच्या–राज्यकर्त्यांसही नवीन धाऱ्याची पद्धति अमलांत आणण्यापूर्वीं पुष्कळच उपयुक्त होण्यासारखी आहे.

घालून त्यांची अशी धूळधाण उडविली कीं, त्या उभयतांच्या सैन्यांतील बहुतेक सरदार धरले अथवा मारले गेले; आणि लखूजी जाधव व माहूरचा देशमुख उदाराम ऊर्फ उद्धावरांव[1] हे पहिल्याच तडाक्यास पळून गेले, ह्मणून बचावले. ग्रांडडफ याच्या ह्मणण्याप्रमाणें निजामशहा यानें फत्तेखान ( मलिकंबरचा वडील मुलगा ) यास वजीरी-पदावरून दूर करून प्रतिबंधांत ठेविल्यावर लखूजी जाधव यानें शहास, " मी पुन्हां तुमच्या आश्रयास येतों; " अशी विनंति केली; परंतु शहा हा स्वभावानें खुनशी असून, लखूजी हा आपला पक्ष सोडून मोंगलास जाऊन मिळाला; त्यामुळें त्याच्या

---

१ टीपः—उद्धवराव यास " वासीमचे राजे " अशीही संज्ञा आहे. हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून त्यास अकबरानें वासीम व माहूर या दोन परगण्यांची पांच हजारी मनसब दिली होती. उद्धवराव मृत्यू पावला त्यावेळीं त्याचा मुलगा जगजीवन हा अज्ञान असल्यामुळे त्याची आई सर्व कारभार पहात असे. ही बाई मोठा शूर व राजकारणी होती; उद्धवराव मृत्यू पावलेला, मुलगा अज्ञान व कारभारी बाई माणूस असें पाहून, हरचंद्राय यानें त्या प्रांतावर स्वारी केली; ती या बाईनें मोठ्या शौर्याने परत फिरविली; ह्मणून औरंगझेबानें तिला " पंडिता " " व रायबागीण " ( ह्मणजे स्त्रीशार्दुल ) असे दोन किताब दिले. या बाईचें व शिवाजीमहाराजांचें इ० सन १६७० मध्यें उमरखिंडींत युद्ध झाले असून त्याबद्दल बखरींत उल्लेख आहे आणि शिवकालीन प्रसिद्ध घराण्यापैकींचें हें एक घराणें असून त्यास शिंदखेडकर जाधवांच्या खालोखाल मान आहे.

**सूचनाः**—यासंबंधीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या नवव्या संमेलनांत आमचे मित्र रा. यादव माधव काळे B A. L L B. वकील बुलढाणा यांनीं एक मोठा माहितीपूर्ण निबंध वाचिला; तो या घराण्यासंबंधीं अधीक माहिती पाहिजे असल्यास वाचावा.

**खुलासाः**—वाशीम हें तालुक्याचें गांव वऱ्हाडांत अकोले जिल्ह्यांत अकोल्यापासून सडकेनें अजमासें ५१ मैलांवर आहे; शिंदखेड हें बुलढाणा जिल्ह्यांतील मेहकर तालुक्यांत अजमासें १९ मैलांवर निजामच्या सरहद्दीवर आहे. उमरखेड हें यवतमाळ जिल्ह्यांत पुसद तालुक्यांत आहे व जवळच उमरखिंड आहे. जी. आय. पी रेलवेच्या नागपूर लाइनीवरील मूर्तिजापूरपासून यवतमाळपर्यंत जो फांटा गेला आहे, त्यावर दारव्हा ह्मणून एक रेलवे-स्टेशन आहे; तेथून दिग्रस, पुसद, उमरखेड व माहूर असा रस्ता गेलेला आहे. दारव्हा येथून दिग्रस अजमासें १८, पुढें पुसद १८, पुढें उमरखेड २० व येथून निजामच्या हद्दींत वीस मैलांच्या आंतच माहूर, हें ठिकाण आहे.

मनांत लखूजीविषयीं तीव्र द्वेष उत्पन्न झाला होता, त्याबद्दल त्याचा सूड उगविण्याची इच्छा शहाच्या मनांत पूर्णपणें वसत होती; आणि " आपल्या राज्यांतील पूर्वीचा सरदार व माहितगार लखूजी जाधव हा मोंगलास मिळालेला आहे, आणि तोच आपल्या राज्यांतील छिद्रें मोंगलास दाखवून देत असल्यामुळें मोंगल आपणांस भारी झाले आहेत याकरितां कसेंही करून पहिल्यानें लखुजीचा बंदोबस्त केल्याखेरीज आपणास केव्हांही विजयप्राप्ती व्हावयाची नाहीं, " असें त्याच्या सल्लागारांनीं त्याच्या मनांत पूर्णपणें भरवून दिल्यामुळें तर कोणत्याही युक्तीप्रयुक्तीनें लखूजीस बोलावून आणून त्यास कैद करण्याचा त्यानें बेत केला होता; त्याप्रमाणें मायावी ममत्व व कांगावी कळवळा दाखवून त्यानें लखूजी जाधवास भुरळ पाडिली व त्यास आपल्या भेटीस बोलावून घेतलें. शहाच्या बोलवण्याप्रमाणें लखूजी आपल्या घरच्या मंडळीसह दौलताबाद येथें येऊन त्यानें आपल्या सैन्यासह शहराबाहेर तळ दिला व त्याचा भाऊ जगदेवराव हा किल्ल्याबाहेर कोतुळकच्या तळ्यावर उतरला. ठरलेल्या दिवशीं लखूजी जाधवराव ( याचें सर्व नांव लुकजी कुकजी यादव असें असल्याचें " मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें " खंड १५ " शिवकालीन घराण्यांचे पत्रव्यवहार " लेखांक ३ पान १३ वर लिहिलेलें आहे. ) हा आपले मुलगे अचलोजी व राघोजी व नातू वसंतराव व इतर आप्तस्वकीय लोक बरोबर घेऊन किल्ल्यावर गेला; तेथें गेल्यावर या सर्व लोकांना असें समजविण्यांत आलें कीं, " सरकार स्वारीस तुमची भीति वाटते; ह्मणून तुह्मी पहाऱ्यावर आपलीं हत्यारें ठेवून राजवाड्यांत गेलांत तरच तुमची व हुजूरची भेट होईल; नाहीं तर होणार नाहीं. " लखूजीच्या मनांत शहा आपणास दगा करील असा कोणत्याहीप्रकारें संशय नसल्यामुळें त्यानें शहाच्या इच्छेप्रमाणें पहाऱ्यावर आपली तरवार सोडून ठेविली व आपल्या सर्व अनुयायांकडूनही तसेंच करविलें, त्यानंतर ही सर्व मंडळी राजवाड्यांत गेली; दरबार होऊन निजामशहाची भेट झाली व निजामशहा क्षणभर बसून व बोलून कांहीं निमित्तानें उठून गेला, तोंच दरबारच्या दिवाणखान्यांत मारेकरी घुसले व लखूजीस कैद करूं लागले; परंतु कैद

---

शिंदखेड हें शिवाजी महाराजांची आई जिजाबाई हिच्या माहेरचें ह्मणजे लखूजी जाधवाचें गांव आहे. माहूर हें श्रीगुरुदेवदत्त महाराजांचें निद्रास्थान असून, तें एक तीर्थयात्रेचें महत्वाचें प्रसिद्ध व साक्षात्कारी देवस्थान आहे. निजामच्या राज्याची हद्द व वऱ्हाडची हद्द यांच्यामध्यें उमरखेड आहे; आणि उमरखेड येथें प्रसिद्ध गोचरस्वामीचा मठ असून तें व मेहकर हीं पैनगंगानदीच्या कांठीं आहेत; आणि मेहकर व वाशीम येथें श्रीबालाजी महाराजांचीं प्रसिद्ध देवालयें आहेत.

होण्यापेक्षां मरण बरें असें वाटून तो त्या मारेकऱ्यांबरोबर लढण्यास तयार झ
मारेकऱ्यांनीं तरवारी चालविल्या, लखूजी व त्याचे अनुयायी यांच्या कमरेस
कट्यारी राहिल्या होत्या तरी मारेकऱ्यांवर चढाई करून ते मारतां मारतां गत
झाले. या कत्तलींत लुकजीबरोबर त्याचे मुलगे अचलोजी व राघोजी, नातू वसं
व दुसरे कित्येक आप्तइष्ट मारले गेले, ही वार्ता किल्ल्याबाहेर जगदेवराव उ
होता त्यास कळतांच तो व त्याचा मुलगा बहादूरजी हे तात्काळ शिंदखेड येथें
गेले, मागें लष्करांत लखूजीची बायको म्हाळसाबाई—अथवा गिरजाबाई—ही एक
होती; तिला ही बातमी समजल्याबरोबर तीही न डगमगतां तळावर असे
मंडळीसह शत्रुसैन्याच्या देखत देखत शिंदखेडास निघून गेली. ही कत्तल शके १५
श्रावण शुद्ध १५ म्हणजे इ॰ सन १६३० च्या आगष्ट महिन्यांत झाली. (
इ॰ सं॰ मंडळ त्रैमासिक वर्ष १ लें अंक १ ला व जेधे यांची शकावली पह
लखूजी जाधव व म्हाळसाबाई यांचीच महाप्रसिद्ध व अलौकिक कन्या जिजाब
छत्रपती शिवाजी महाराजांची माता—हीच राजे शहाजी भोंसले यांची वडील पत्नी
लखूजीच्या सरदारकीस वारस न राहिल्यामुळें मोंगल बादशहानें ती सरदारी त
भाऊ जगदेवराव यास दिली; व त्याचवेळीं जगदेवरावाचा मुलगा बहादूरजी
नातू मानसिंगराव यासही मोंगली फौजेंत निरनिराळ्या मनसबा मिळाल्या, त
" मराठे कुळांचे इतिहास " भाग पहिला यांत या घराण्यासंबंधीं जी हकीकत
आहे, त्यावरून असें दिसतें कीं, लखूजी सवारस होता; तो म्हणजे लखूजीचा
व अचलोजीचा मुलगा सुजनसिंग ऊर्फ संताजी हा होय; म्हणजे लखूजीचा म
अचलोजी, अचलोजीचा सुजनसिंग ऊर्फ संताजी, संताजीचा शंभुसिंग व त
मुलगा म्हणजे भावी प्रसिद्ध सरदार धनाजी जाधव अशी वंशपरंपरा असल
उल्लेख आढळतो. या घराण्यास " शिंदखेडचे जाधव " असें म्हणत असून ते देवगि
रामदेवराव जाधव ऊर्फ यादव यांचे वंशज आहेत.

राजे शहाजी यांच्यासंबंधानें पुढें छत्रपती शिवाजीच्या चरित्रांत वि
हकीकत येणार असल्यानें त्यांच्या राजकीय कर्तृत्वाचें त्रोटक वर्णन या ठि
केलेलें आहे. आपला सासरा लखूजी जाधवराव व आपले मेहुणे वगैरे मंडळी यांचा
दगाबाजीनें घात केला, हें ऐकून शहाजी अतीशय चिडून गेला, आणि निजामश
आपला असलेला संबंध साफ तोडून टाकून तो स्वतंत्र झाला; परांडें येथून ताब
आपल्या सैन्यासह निघून रस्त्यांतील प्रदेशाची जाळपोळ उडवीत तो संगमनेरास व
पुण्यास आला; आणि आसपासचा निजामशाही व आदिलशाही ताब्यांतील बराच प्रदेश

हस्तगत करून घेतला. शहाजीनें आपलाही प्रदेश बळकाविला असें पाहून अदिलशहानें मुरारराव ऊर्फ मुरारपंत ( याची हकीकत अदिलशाही राज्याच्या हकीकतींत पुढें दिली आहे. ) या नांवाच्या एका शूर व कर्त्या ब्राह्मण सरदारास शहाजीवर पाठविलें; त्याप्रमाणें मुरारराव पुण्याच्या रोखानें शहाजीवर चालून आल्यावर शहाजी जुन्नर येथें गेला; तेथील किल्ल्यावर—ह्मणजे शिवनेरी किल्ल्यावर—त्याचीं मुलें—माणसें होतीं, व याठिकाणीं असलेला सुभेदार श्रीनिवासराव हा त्याचा स्नेही होता. त्याच्या मदतीनें शहाजीनें शामगड किल्ला मिळविला, आणि संगमनेरपासून अहंमदनगर व दौलताबादपर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला. इकडे मुरारराव यानेंही शहाजीच्या जहागिरी प्रदेशांत शिरून पुणें व इंदापूर प्रांताची नासाडी केली; आणि शहाजीनें पुन्हां अदिलशाही प्रदेशांत अतिक्रमण करूं ह्मटल्यास त्यास अडथळा करण्याकरितां आपल्या राज्याच्या सरहद्दीवर-पुण्यापासून अजमासें तीस मैलांवर-दौलतमंगळ ऊर्फ भुलेश्वर या नांवाचा किल्ला बांधून तेथें अदिलशाही फौज ठेविली; व निजामशाही तळ कोंकण काबीज करण्याकरितां त्यानें चंद्रराव मोरे व बाजी दळवी वगैरे सरदारांची रवानगी करून तो विजापूर येथें परत गेला. मुररावाच्या हुकुमाप्रमाणें मोरे व दळवी यांनीं तळ कोंकणांत जाऊन महाडकडील चौलपासून दाभोळपर्यंतचा सर्व प्रदेश सर करून घेतला; परंतु एक वर्षांतच निजामशहानें सिद्दी सैफखान या सरदाराच्या हाताखालीं सैन्य देऊन त्याची तिकडे रवानगी केली; या निजामशाही सैन्यानें मोरे व दळवी या उभयतांचाही पराभव केला; बाजी दळवी यास ठार मारिलें, आणि सर्व निजामशाही प्रदेश पुन्हां परत मिळविले.

मध्यंतरीं बादशहा जहांगीर हा मृत्यू पावला व शहाजहान हा तक्तनशीन झाला. त्याचें आणि मोंगल सरदार खानजहान लोदी याचें वांकडें होतें; त्यामुळें त्यानें शहाजहान विरुद्ध बंड उभारिलें व तो दक्षिणेंत आला; तेव्हां शहाजी व दुसरे कित्येक मराठे सरदार त्यास अनुकूळ झाले; परंतु बादशाही फौज लोदीच्या पाठीवर असल्यामुळें त्यानें लोदीचा पक्ष सोडिला व तो शहाजहान यास शरण गेला; तेव्हां बादशहानें त्यास पांच हजार स्वारांची सरदारी दिली; शहाजीचा आश्रय सुटल्यावर खानजहान लोदी विजापूर येथें गेला; परंतु तेथेंही त्यास आश्रय न मिळाल्यामुळें तो मूर्तुजा निजामशहाकडे आला व शहानें त्यास कांहीं काळपर्यंत आश्रय दिला त्यामुळें बादशाही फौज निजामशाहीवर चाल करून आली; तेव्हां निजामशहानें आपली फौज दौलताबाद येथें जमविली व मोंगल सैन्याशीं सामना दिला; परंतु त्यांत त्याचा पराभव होऊन व लोदीस दिलेला आश्रय काढून घेऊन शिवाय धारूरपर्यंतचा सर्व प्रदेश त्यास मोंगलांना परत द्यावा लागला.

याच आपत्तीच्या प्रसंगीं निजामशाही राज्यावर दुसरेंहि एक मोठें अरिष्ट कोसळलें. इ० सन १६२९ मध्यें पाऊस पडला नाहीं, व दुष्काळास प्रारंभ झाला, आणि पुढील

वर्षी—ह्मणजे इ० सन १६३० मध्येंहि अवर्षण झाल्यामुळें दुष्काळाची परमावधी झाली; माणसांचा आणि गुरांढोरांचा भयंकर संहार उडाला; प्रांतचे प्रांत ओसाड झाले; व त्यांतच पटकीचीहि सांथ उद्भवून त्यामुळें आपत्तींचा कळस झाला; आणि इतक्यांतच दक्षिणेंत असलेल्या मोंगली फौजेस कुमक ह्मणून आणखी बादशाही सैन्य येऊन धडकलें. फत्तेखान हा शहाचा मामा असल्यानें त्याच्या आईनें आपल्या या भावास प्रतिबंधांतून मुक्त करण्याविषयीं शहास अनेकवेळां आग्रह केला होता; आणि आपला प्रधान नालायक असून त्याच्या मूर्खपणामुळेंच निजामशाही राज्याची अशी दुर्दशा उडाली आहे असें त्यास वाटूं लागलें होतें; ह्मणून त्यानें फत्तेखानास प्रतिबंधांतून मुक्त करून पुन्हां प्रधानपदावर स्थानापन्न केलें; परंतु फत्तेखानाला अधिकारापन्न करण्याच्या बाबतींत शहानें अतीशय अविचार केला. कारण मोंगललोक निजामशाही राज्य नष्ट करणार, आणि त्यानंतर आपल्या राज्यावरही तोच प्रसंग येणार असें पाहून महंमद आदिलशहा यानें मुर्तुजा निजामशहास भेटून त्याच्याशीं एक बचावाचा तह [ Defensive alliance ] केला होता; आणि त्याअन्वयें " निजामशहानें सोलापूरचा किल्ला व त्याखालील प्रदेश, आणि कोंकणांतील कांहीं परगणे आदिलशहास द्यावे व आदिलशहानें निजामशहास मोंगलाविरुद्ध कुमक करावी असें ठरून उभयतांमध्यें सख्य झालें होतें; अर्थात् विजापूरकरांची मदत मिळविल्यानंतर फत्तेखानास प्रतिबंधांतून मुक्त करण्याची मुळींच आवश्यकता नव्हती; तथापि ही चूक केली तर केली पण त्याबरोबरच त्याला पुन्हां अधिकारापन्न करण्यांत तर त्यानें एवढी मोठी दुसरी चूक केली कीं, या घोड व जोड चुकीचा एक भला भक्कम खिळा झाला; आणि त्याच खिळ्यानें मुर्तुजाशहाचा मस्तकभेद करून त्यास जगांतून कायमचें नष्ट करून टाकिलें.

फत्तेखान प्रधानपदावर आल्यावर तो निजामशाही राज्य नव्हे, तर आपल्या हातीं आलेला अधिकार नष्ट होऊं नये अशाबद्दल खटपट करूं लागला. त्यानें शहास भ्रमिष्ट ठरवून त्याची प्रतिबंधांत रवानगी केली; राज्यांतील अजमासें पंचवीस प्रमुख सरदारांना ठार मारून सर्व राज्याधिकार आपल्या हातांत घेतला; आणि शहाजहान यास खंडणी पाठवून " मी आपणास शरण येत आहे, " असें त्यानें कळविलें; तेव्हां शहाजहान यानें त्याच्या उपरीनिर्दिष्ट सर्व कृत्यांना संमती दिली आणि प्रतिबंधांत ठेविलेल्या मुर्तुजा निजामशहास ठार मारण्याविषयीं व त्या राज्यांतील जडजवाहीर, खजिना व हत्ती, वगैरे आपणाकडे पाठविण्याविषयीं त्यास कळविलें; त्याप्रमाणें फत्तेखानानें मुर्तुजाशहास ठार मारून त्याच्या जागीं त्याचा दहा वर्षांचा मुलगा हुसेन यास गादीवर बसविलें; इतक्यांत पूर्वी विजापूरकरांशीं झालेल्या तहाअन्वयें आदिलशाही सैन्य निजामशाही फौजेच्या मदतीस आलें; परंतु ज्याच्याशीं हा तह झाला होता, तो मुर्तुजाशहा यावेळीं मृत्यू पावलेला होता; व त्याला ठार मारणारा फत्तेखान हाच मुळीं मोंगलांस सामील झालेला

असल्यामुळें, आदिलशाही सैन्याशीं मोंगलाविरुद्ध तो संगनमत करील, हें शक्य नव्हतें. त्यामुळें आदिलशाही सैन्याची पूर्ण फसगत झाली; व मोंगल सैन्यानें त्या फौजेचा सहज पराभव करून तिला परत जाणें भाग पाडिलें. इकडे मूर्तुजाशहास ठार मारण्यापुरतें फत्तेखानानें शहाजाहानचें ह्मणणें मान्य केलें होतें आणि तेंही स्वतःला फायदेशीर होणारें असल्यामुळेंच त्यानें मान्य केलें होतें; कारण त्यामुळेंच दहा वर्षांचा अज्ञान मुलगा शहा हुसेन हा गादीवर बसवून निजामशाही राज्याचा सर्व अधिकार त्याला आपल्या हातांत घेतां आला होता; परंतु निजामशाही जडजवाहीर, खजिना वगैरे तो मोंगलांच्या ताब्यांत देण्यास तयार नव्हता; त्यामुळें शहाजहान यानें पुन्हां त्याच्यावर सैन्य पाठविलें; तेव्हां मोंगलांच्या सैन्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं, असें पाहून तो शहाजहान यास शरण गेला व त्यास त्याच्या सर्व मागण्या कबूल करून, आठ लाख रुपये नजराणा देऊन, शिवाय दरवर्षी नियमीत खंडणी देत जाण्याचें त्यानें कबूल केलें व या वेळेपासूनच तें राज्य नष्ट होण्याच्या पूर्वरंगास प्रारंभ झाला.

शहाजी हा मोंगलांची नोकरी पतकरून पांच हजारी सरदार झाला होता; तथापि वर्ष दीड वर्षांतच त्यानें त्यांची नोकरी सोडिली होती; आणि जरी तो त्यानंतर निजामशाहीच्या नोकरींत नव्हता तरी निजामशाहीची आस्था त्यानें सोडिली नव्हती, व तें राज्य जगावें अशी त्याची इच्छा व प्रयत्न होता; त्यामुळें अर्थातूच त्यास फत्तेखानाच्या ह्या वागणुकीचा अतिशय राग आला; त्यानें विजापूर दरबारचा प्रधान अथवा प्रधानवजा असलेला ब्राह्मण सरदार मुरारराव ऊर्फ मुरारपंत याच्या मार्फत त्या दरबाराशीं सख्य केलें, आणि फत्तेखानाच्या अप्रीयतेविषयीं व दौलताबाद किल्ल्यावर धान्यसामग्री वगैरेही यावेळीं फारशी नाहीं अशाविषयीं, आदिलशहाची खात्री करून देऊन त्यानें दौलताबादचा किल्ला हस्तगत करून घेण्याकरितां शहाची फौज तेथें आणिली; तेव्हां फत्तेखानानें तावडतोब ही हकीकत मोंगल बादशहा शहाजहान यास कळविली व "दौलताबादचा किल्ला मी आपल्या स्वाधीन करण्यास तयार आहें; मला विजापूरकरांविरुद्ध युद्ध करण्यासाठीं कुमक पाठवावी, अशी विनंती केली; तेव्हां शहाजहान यानें मोहबतखान या नांवाच्या सरदारास दौलताबादचा किल्ला हस्तगत करून घेण्यास पाठविलें. मोहबतखान तेथें येऊन

---

टीपः-१ बादशहानें फत्तेखानास जी जहागीर दिली, तींतच शहाजीच्या जहागिरीपैकीं पुणें व सुपें, हे दोन प्रांत, बादशहानें फत्तेखान यास दिले ह्मणून-अथवा फत्तेखानाची जी जहागीर बादशहानें पूर्वी शहाजीस दिली होती, ती त्याच्याकडून परत घेऊन पुन्हां फत्तेखानास दिली ह्मणून-शहाजीनें मोंगलांचा पक्ष सोडिला, असाही उल्लेख आढळतो.

पोहोंचण्यापूर्वींच शहाजीसह आदिलशाही फौज तेथें येऊन थडकली होती; त्यामुळें मोंगल सैन्य तेथें आल्यावर उभयतांच्या सैन्यामध्यें मोठाच युद्धसंग्राम झाला व त्यांत शहाजीही मोठ्या शौर्यानें लढला; तथापि अखेरीस आदिलशाही सैन्याचा पराभव होऊन त्यास दौलताबादेहून सोळा मैल माघार घेऊन परत जावें लागलें.

त्यानंतर आदिलशहानें फत्तेखानास मोंगलांच्या गोटांतून फोडून व त्यास स्वतः-कडे ओढून घेऊन आपला पक्ष प्रबळ करण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्यास यशही आलें. त्यानें फत्तेखानास असें कळविलें कीं, तुह्मीं दौलताबादचा किल्ला मोंगलांच्या हवालीं केल्यास आपण होऊनच आपल्या शत्रूस घरांत घेऊन स्वतःचा सर्वस्वीं नाश करून घेतला असें होईल; उलटपक्षीं तुह्मीं शहाजीस पुन्हां आपल्या नोकरींत घेऊन दौलताबादचा किल्ला परत आमच्या स्वाधीन कराल तर आपलें व आमचें पूर्वीप्रमाणेंच पुन्हां सख्य होईल; व आह्मांकडून तुह्मांस मोंगलांविरुद्ध हरएक प्रकारची मदतहि देण्यांत येईल; हा निरोप पोहोंचल्यावर फत्तेखानास आदिलशहाची मसलत पसंत पडून तो त्याच्या पक्षास मिळाला; व त्यानें मोंगलांस दौलताबादचा किल्ला देण्याचें नाकारिलें; आणि किल्ल्यां-तून फत्तेखानानें व बाहेरून आदिलशाही सैन्यानें मोंगली सैन्यावर तोफांचा येलगार कर-ण्यास प्रारंभ केला; परंतु फत्तेखानाच्या या अस्थीर व विश्वासघातकी वर्तनामुळें, मोंगल सरदार महोबतखान—ज्यानें एकावेळीं खुद्द जहांगीर बादशहास कैद केलें होतें, तो प्रसिद्ध व बलिष्ठ योद्धा मोहबतखान—अत्यंत चिडीस गेला; त्यानें निजामशाही राज्याचा समूळ उच्छेद करण्याचा निश्चय केला; आपल्या जोरदार सैन्याचे तीन भाग केले; त्यापैकीं एकाला आदिलशाही सैन्याचा चुराडा उडविण्याची कामगिरी सोंपविली; दुसऱ्याला आपल्या फौजेस धान्यसामुग्री पुरविण्याच्या कामावर ठेविलें; तिसऱ्यास किल्ल्यावर कोणत्याही प्रकारची सामग्री जाऊं न देण्याविषयींची कामगिरी दिली; सैन्याच्या मुख्य भागावर स्वतः देखरेख ठेवून किल्ल्यास मोठ्या जोराचा वेढा दिला, आणि फत्तेखानाच्या आवाडावीचा बदला घेण्याच्या खुनशी ईर्षेनें व खऱ्या अट्टाहासानें त्यानें किल्ला हस्तगत करून घेण्याकरितां नेटाचे प्रयत्न सुरू केले. किल्ल्यांतील लोकांनींही मोठ्या शौर्यानें युद्ध करून सतत अट्ठावन दिवस किल्ला लढविला; परंतु किल्ल्यांत धान्यसामुग्रीचा पूर्ण दुष्काळ होऊन लोकांची अन्नान्नदशा झाली; त्यामुळें किल्ला अखेरीस मोंगलांच्या ताब्यांत आला. ( ता० १३ जून इ. सन १६३३. ) फत्तेखान व बालराजा हुसेन मोंगलास शरण आले; व त्या उभयतांनाही कैद करून दिल्ली येथें शहाजहान बादशहाकडे पाठविण्यांत आलें; त्यानंतर शहाजहाननें हुसेनशहास ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर प्रतिबंधांत ठेविलें; फत्तेखानावर शहाजहानची कृपा होऊन त्याची सर्व मालमिळकत त्यास परत मिळाली;

इतकेंच नाहीं तर तो फत्तेखानास सरदारीही देणार होता; परंतु यापूर्वीच त्याच्या डोक्यास एक जखम झाली होती व त्यामुळे त्याचा मेंदू बिघडून तो भ्रमिष्ट झाला होता; ह्मणून बादशहानें त्यास सरदारी न देतां सालीना दोन लक्षांची नेमणूक करून देऊन लाहोर येथें राहण्याची परवानगी दिली; व त्याच ठिकाणीं अखेरीस तो मृत्यू पावला. त्याप्रमाणेंच त्याचा दुसरा भाऊ चंगीजखान हा पूर्वीच मोंगल बादशहाच्या आश्रयास जाऊन राहिलेला होता; त्यास शहाजहान यानें " मनसूरखान " असा किताब देऊन दोन हजार स्वारांची मनसबी दिली; निजामशाही राज्य खालसा करून आपल्या प्रचंड मोंगल बादशाहींत सामील केलें; आणि अशारीतीनें निजामशाही राज्याची स्थापना झाल्यापासून दीडशें वर्षांनीं ह्मणजे इ० सन १६३३ मध्यें त्याची समाप्ती झाली.

परंतु, मरून मोगलांच्या महाराज्यांत मिसळून गेलेला हा निजामशाही राज्यपुरूष, आपल्या समशेरीच्या संजीवनीनें पुन्हां जिवंत करण्यास एक धडाडीचा कर्तबगार वीर पुढें सरसावला; व त्यानें त्या राज्यपुरुषास जिवंत करून, तो राजा निर्माण करण्याचा व राज्यकारभार करण्याचा धंदा करूं लागला; या सरदारानें स्वीकारिलेला हा धंदा, हीच मराठ्यांच्या राज्यसंस्थापनेची पूर्वतयारी होती; हिंदुस्थानच्या राजकीय रंगभूमीवरील मराठ्यांच्या भावी काळांतील उत्कर्षाची " नांदी " होती. या मराठा वीरपुरुषानें सुरू केलेला हाच धंदा पुढें मराठ्यांनीं चालू ठेविला; आणि इ० सन १७७१ च्या दिसेंबर महिन्यापर्यंत तर ते या धंद्यांत इतके पटाईत, इतके तयार व इतके तरबेज झाले कीं, त्यांनीं आपल्या सैन्यानें व शस्त्रानें, तरवारीस तोफखान्याचें जंगी पाठबळ देऊन, बादशहा शहाअलम यास—तो अलाहाबादेहून दिल्ली येथें येण्यास निघाल्यावर कुरा प्रांताच्या सरहद्दीपर्यंत त्याला पोहोंचविण्यास आलेला इंग्रजी तुकडीवरील अधिकारी " मराठ्यांची संगत धरूं नका. " असें बजावीत असतांही जो " डोळे मिटून " मराठ्यांना येऊन मिळाला त्या बादशहा शहाअलम यास—दिल्ली येथील बादशाही तख्तावर सहज स्थानापन्न करून टाकिलें, ह्मणून—आणि या दृष्टीनें विचार केला ह्मणजे " निजामशाही राज्य एका मराठा सरदारानें पुन्हां जिवंत करणें " ही गोष्ट—जरी त्यांत अखेरीस अपयश आलें तरी—अत्यंत महत्वाची आहे असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं.

हा मराठा वीरपुरुष ह्मणजे शिवछत्रपतीचा पिता " राजे " शहाजी भोंसले हा होय. दौलताबादचा किल्ला मोंगल लोकांच्या हातीं गेल्यानंतर शहाजी हा पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या डोंगरी प्रदेशांत राहूं लागला. याठिकाणीं त्यानें बरेंच मोठें सैन्य जमविलें; निजामशाही गादीवर एका मुलाची स्थापना केली; बरेच किल्ले व प्रदेश आपल्या ताब्यांत घेऊन व कित्येक हुषार ब्राह्मण नोकरीस ठेवून त्यांच्या सल्ल्यानें

नवीन शहाच्या नांवानें तो राज्यकारभार करूं लागला व लवकरच त्यानें सर्व कोंकण-पट्टी व पूर्वेस अहंमदनगरापर्यंत व निरानदीपासून चांदवडच्या किल्ल्यापर्यंत सर्व प्रदेश आपल्या हस्तगत करून घेतला; तेव्हां आजपर्यंतची सर्व खटपट व्यर्थ झाली असें पाहून शहाजहान यानें खान डौरान व खान झमन या उभयतां सरदारांना शहाजीवर पाठविलें, व मागाहून आपण स्वतःही दक्षिणेंत येऊन दाखल झाला; तथापि शहाजहान दक्षिणेंत येऊन दाखल होण्यापूर्वी शहाजीनें या उभयतां मोंगल सरदारांना बिलकुल दाद दिली नव्हती; कारण त्यानें स्वतः मोठें सैन्य जमा केलेलें होतें; त्यास विजापुरकर आदिलशहा, दिवाण मुरारपंत व सेनापती रणदुल्लाखान यांची पूर्ण मदत होती व त्यामुळें त्या उभयतांही मोंगल सरदारांस शहाजीचा पराभव करणें कठीण झालें होतें.

शहाजहान दक्षिणेंत येऊन दाखल झाल्याबरोबर त्यानें पहिल्यानें विजापुरकराकडे वकील पाठविले; आणि अदिलशहाशीं असें बोलणें लाविलें कीं, " निजामशाही राज्याचे तुह्मी घेतलेले किल्ले परत द्यावे; तुह्मीं परिंडा किल्ल्यावरून विजापूर येथें नेलेली " मुलुख-मैदान " तोफ आह्मांस द्यावी; विशेषतः शहाजीचा पक्ष सोडावा व त्यास अथवा त्याच्या पक्षांतील लोकांस बिलकुल मदत करूं नये; याप्रमाणें वागण्याला तुह्मी कबूल असल्यास तुह्मांस निजामशाहींतील सर्व कोंकणपट्टी, सोलापूरचा किल्ला व त्याखालील प्रदेश देऊं; व त्याप्रमाणें वागण्याला तुह्मी नाकबूल असल्यास तुमचेंही राज्य आह्मी निःसंशय बुडवून टाकूं; " परंतु शहाजहानचे ह्मणणें अदिलशहानें अमान्य केलें व शहाजीच्याच पक्षास तो चिकटून राहिला; तेव्हां शहाजहाननें आपल्या सैन्याचे चार भाग करून त्यांतील दोघांची विजापुरकरावर व दोघांची शहाजीवर रवानगी केली; शहाजीवर पाठविलेल्या सैन्यापैकीं एका भागावर शाएस्तेखानाची नेमणूक केली होती व त्यास चांदवड, नाशीक आणि संगमनेर कडील शहाजीच्या ताब्यांतील किल्ले हस्तगत करून घेण्याची कामगिरी सोंपविली होती; व दुसऱ्या भागावर खान जमान यास नेमून शहाजीस दक्षिणेंतील मैदान प्रदेशांतून हांकलून लावून त्याचा पाठलाग करण्याचा व त्याच्या ताब्यांतील कोंकणपट्टींतील किल्ले ताब्यांत घेण्याचा हुकूम

---

**टीपः—१** चांदवड हा तालुक्याचा गांव, हल्लीं नाशिक जिल्ह्यांत असून लासल-गांव रेलवेस्टेशनपासून चांदवड १४ मैल आहे; दोन्हीं ठिकाणीं जाण्यास सडक असून चांदवड हें पूर्वकाळीं एक महत्वाचें ठिकाण होतें; हें ठिकाण पूर्वी होळकराच्या ताब्यांत होतें; तेथील कांहीं स्थळें प्रेक्षणीय असून किल्लाही विशेष अवघड, बळकट व समुद्रसपाटीपासून अजमासें ३९९४ फूट उंचीवर आहे; व लासलगांव स्टेशनपासून विंचूरचा किल्ला ३ मैलांवर आहे.

दिला होता; त्याप्रमाणें शाएस्तेखानानें चांद्वड, नाशीक व संगमनेरकडील शहाजीच्या ताब्यांतील त्रिंबक, शिवनेरी व कोंडाणा वगैरे किल्ल्यांशिवाय सुमारें पंचवीस किल्ले हस्तगत करून घेतले; आणि खानजमान यानेंही कोंकणपट्टींत धुमाकूळ उडवून शहाजीस त्रासवून सोडिलें; व इकडे आदिलशहानेंही शहाजहानशीं तह केला; तेव्हां शहाजी कोंकण-प्रांताकडे वळला; परंतु मोंगली फौजेनें त्याचा सारखा पिच्छा पुरविला; तेव्हां अखेरीस चोहोंबाजूंनीं शहाजीचा नाइलाज झाल्यावर तो शहाजहान बादशहास शरण गेला; व आपणांस पदरीं ठेवण्याबद्दल त्यानें बादशहास विनंती केली; परंतु ती त्यानें मान्य न करितां त्यास विजापूरकराच्या पदरीं चाकरीस राहण्याची परवानगी दिली; व त्यानें निजामशाही गादीवर स्थापन केलेल्या बालराजास ( मूर्तिजाशहा यास ) ग्वाल्हेर येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेवून निजामशाही राज्याचा शेवट केला; अशारीतीनें बहामनी राज्यापासून निर्माण झालेल्या पांच राज्यांपैकींच हें चवथें व महत्वाचें " निजामशाही " राज्य कायमचें नष्ट झालें.

भोंसले घराण्यांतील राजे शहाजी यांच्याप्रमाणेंच शिर्के घराण्यांतील राजे वाघोजी या नांवाच्या एका शूर मराठा पुरुषाचा निजामशाहींत उत्कर्ष झाला; व त्याच्या कर्तृत्वशक्तीवर निजामशहानें त्यास " रायरी " ऊर्फ रायगड ह्या प्रांताच्या बारा महालांची सरदेशमुखी करून दिली. पुढें वाघोजीराजे व त्याचा मुलगा तान्हाजीराजे निजामशाहीमध्यें बादशाही मनसबीवर होते; त्यामुळें रायरी प्रांताच्या वतनावर तेथील कारभार पाहण्याकरितां त्यांनीं दुलपतराव या नांवाचा एक पाताणे प्रभू जातीचा मुतालिक ठेविला होता. पुढें अदिलशाही व निजामशाही राज्यांमध्यें युद्धकलह सुरू झाले; तेव्हां शिर्क्यांनीं आदिलशाही प्रदेशास अतीशय उपद्रव दिला; तेव्हां आदिलशहानें त्यांच्यावर चंद्रराव मोरे यास पाठवून त्यांचा रायरी किल्ला काबीज करविला; ( इ० सन १५७८ ) तेव्हां ते तळ कोंकणांत शृंगारपूर येथील मराठे सरदार सुर्वे यांच्या आश्रयास गेले; सुर्वे व शिर्के या उभयतां सरदारांचें नातें असून सूर्याजीराजे सुर्वे यांची कन्या वाघोजीराजे शिर्के यांचा धाकटा मुलगा पिलाजी-राजे यास दिली होती; हे सुर्वे विजापूरच्या आदिलशाही राज्यांत मनसबदार होते; त्यामुळें त्यांनीं खटपट करून, आपल्या वशिल्यानें शिर्के यांस दाभोळचें सरदेशमुखीचें वतन मिळवून दिलें होतें; परंतु शिवाजीनें कोंकणप्रांत काबीज केल्यामुळें त्या वतनाचा भोगवटा झाला नाहीं. पुढें शिवाजीनें शिर्के सरदार आपणास अनुकूल करून घेऊन पिलाजीरावाचा मुलगा गणोजीराव यास आपली कन्या राजकुंवरबाई दिली; व पिलाजीराव याची कन्या येसूबाई ही आपला मुलगा संभाजी यास करून घेतली. याच पिलाजीरावानें वाडीचा लक्ष्मण सांवत व शिवाजी यांचा तह करून दिला; त्यावेळीं शिवाजीनें राजकुंवर हीस जो

मुलगा होईल त्यास दाभोळचें सरदेशमुखीचें वतन देऊं असें वचन दिलें. पुढें संभाजी-महाराजांच्या कारकीर्दींत "शिरकाण" (ह्मणजे शिर्के घराण्यांतील पुरुष सांपडतील तेथें त्यांचीं डोकीं मारणें) झालें; तेव्हां या शिर्के सत्रांतून दोन तीन असामी पळून हबशांच्या मुलखांत जाऊन राहिले व त्यांनीं मोंगलांची चाकरी पतकरिली; शिवाजीमहाराजांचा जांवई गणोजी राजे हा या शिरकाणांतून जिवंत राहिला होता. त्यानें जिंजीच्या वेढ्याच्या-वेळीं राजाराममहाराजांस साह्य केलें; शिवाजीची दुसरी बायको सोयराबाई, शाहूची बायको सकवारबाई, धाकटा शाहू व धाकटा प्रतापसिंह यांच्या बायका, ह्या सर्व शिर्के घराण्यांतील होत्या. शिवाजीमहाराजांचा जांवई गणोजी राजे शिर्के यानें शाहूमहाराजां-बरोबर त्यांच्या संरक्षणाकरितां समुद्रांत उडी टाकून त्यांस समुद्राबाहेर काढून उभयतांनीं आपले जीव वांचविले, असें ग्रांटडफ यानें आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत लिहिलें असून या शिर्के घराण्यानें मराठा राज्यास उत्कृष्ट मदत केली आहे.

बहामनी राज्यापासून निर्माण झालेलें पांचवें राज्य ह्मणजे विजापूरची आदिलशाही हें होय. या राज्याचा संस्थापक अबुल् मुज्फर यूसुफ आदिलशहा या नांवाचा एक मनुष्य असून तो ऑटोमन अथवा युरोपांतील तुर्कस्थानच्या बादशाही घराण्यांपैकीं, ह्मणजे रूमच्या बादशहाचा मुलगा होता. हिंदुस्थानच्या पश्चिम दिशेस अरबी समुद्राच्या पलीकडे अस-लेल्या अरबस्थान देशाच्या उत्तरेस सीरीया, आशियामायनर व तुर्कस्थान हे देश आहेत; या देशांना व मुख्यत्वेंकरून आशियांतील तुर्कस्थान देशाला पूर्वी "शाम" व युरोपांतील तुर्कस्थानाला "रूम" असें ह्मणत असत; व हा सर्वव्यापक प्रदेश पूर्वी टर्की अथवा युरो-पांतील तुर्कस्थानच्या बादशहाच्या ताब्यांत असल्यानें त्यास "रूमशामचा बादशहा" असें ह्मणत असत. यूसफच्या बापाचें नांव मुराद् ऊर्फ आगा मुराद् हें असून त्याच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा व यूसफचा वडील भाऊ महंमद् हा गादीवर आला (अजमासें इ० सन १४५०—५१) पूर्वी त्या राज्यांत एक तोतया उत्पन्न होऊन त्यानें "राज्याचा खरा हक्कदार वारस मी आहे," असें जाहीर करून राज्यभर मोठी अस्वस्थता व धांदल उडवून दिली होती. तसा प्रसंग पुन्हां येऊं नये ह्मणून आपल्या प्रधान-मंडळीच्या सल्ल्यानें महंमद् यानें यूसुफ यास ठार मारण्याचें ठरविलें; परंतु यूसुफच्या आईनें त्यास, ख्वाजा इमाद्-उद्दीन् या नांवाच्या इराणमधील सावा येथील एका गुलामाच्या व्यापा-र्‍याच्या हवालीं करून त्याचा मोठ्या युक्तीनें बचाव केला. त्याठिकाणीं अजमासें सोळा वर्षांचा होईपर्यंत तो राहिला; व इमाद्-उद्दीन् यानें त्याचें पुत्राप्रमाणें पालन करून त्यास ज्ञानसंपन्न केलें. पुढें तो इराणांतून हिंदुस्थानांत येण्यास निघाला व इ. सन १४५९—६० यावर्षी आपल्या वयाच्या अजमासें सतराव्या वर्षी दाभोळ बंदरीं येऊन उतरला;

याठिकाणीं ख्वाजामहंमद् गुर्जिस्थानी या नांवाच्या व्यापाऱ्याशीं त्याची ओळख झाली व त्यानें त्यास आपणाबरोबर बहामनी राज्यांत बेदर येथें घेऊन येऊन त्या राज्याचा प्रसिद्ध व अलौकिक प्रधान ख्वाजा महंमद् गवान यास विकत दिलें. पुढें लवकरच ह्मणजे दोन तीन महिन्यांतच महंमद् गवान यानें राजमातेच्या सल्ल्यानें त्यास अजीजखान या नांवाच्या अश्वशाळाधिकाऱ्याच्या हाताखालीं नेमिलें व त्या कामांत तो लवकरच इतका निष्णात झाला कीं, अजीजखान मृत्यू पावल्यावर ख्वाजा महंमद् गवान याच्या शिफारशीनें महंमदशहानें त्याचीच अजीजखानाच्या जागीं नेमणूक केली; परंतु त्या ठिकाणीं असलेल्या हिशोबनीस ब्राह्मण अधिकाऱ्याशीं त्याचें न पटल्यामुळें त्यानें त्या नौकरीचा राजीनामा दिला; व दरबारांतील एक प्रमुख सरदार निजाम उल्-मुल्क याच्याशीं त्याचा विशेष स्नेह व बंधुभावाचा प्रेमसंबंध असल्यामुळें तो त्याच्याजवळ आश्रयास राहिला.

त्यानंतर निजाम उल्मुल्क याची वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमणूक झाली; त्यावेळीं त्यानें महंमदशहाकडून आपला स्नेही युसूफ यास "अदिलशहा" हा किताब व पांचशें स्वारांची मनसबदारी देवविली; व त्यास आपणाबरोबर वऱ्हाडप्रांतांत नेलें. पुढें निझाम हा खेरला येथील चकमकींत मारला गेल्यावर युसूफनें मोठ्या पराक्रमानें किल्ला लढविला व यशस्वी होऊन व लूट मिळवून तो परत आला. त्यामुळे शहाची त्याच्यावर विशेष मर्जी बसली, व त्यावेळेपासून त्याचा झपाट्यानें भाग्योदय होण्यास प्रारंभ होऊन अखेरीस शहानें त्याची विजापूरच्या सुभ्यावर नेमणूक केली. याठिकाणीं असतांनाच महंमद्-शहा मृत्यू पावला व युसूफ अदिलशहा हा विजापूर येथें स्वतंत्रपणें कारभार पाहूं लागला. युसूफ हा मोठा हुषार, मुत्सद्दी, दूरदर्शी व कारकुनी कामांत निष्णात असून स्वपराक्रमानेंच तो वैभवास चढला होता; आणि त्याच्या आयुष्याचा बहुतेक काळ युद्धांत गेलेला होता. हा शहा स्वतः शियापंथी असून त्यानें आपल्या दरबारांत उघड उघड या पंथाची स्थापना केली; त्यामुळें पुष्कळ सुनी पंथाचे सरदार व इतर मंडळी त्याची नोकरी सोडून गेली; आणि याचवेळीं राज्यांत भावीकाळांतील तीव्र धार्मिक स्पर्धेचें बीज पेरलें गेलें; तथापि हा शहा मोठा धर्मसहिष्णु होता. त्यानें धार्मिक बाबतींत समदृष्टी कायम ठेविली होती; हिंदूलोकांवर व विशेषतः मराठ्यांवर त्याची विशेष मेहेरनजर होती; त्यानें दरबारांत व सैन्यांत, त्यांच्या मोठमोठ्या अधिकारावर नेमणुका केल्या होत्या; त्यांच्या सल्ल्यानें व मदतीनें आपल्या राज्याचा त्यानें पुष्कळ विस्तार केला होता; आणि विशेषतः मराठे सरदार मंडळीवरच त्याचा अतीशय भरंवसा असून, त्यांच्या वर्चस्वास व उत्कर्षास तोच प्रमुखत्वानें कारणीभूत झाला होता.

हा शहा एकवीस वर्षें राज्य करून, ( इ० सन १४८९ पासून ) इ० सन १५१० मध्यें मृत्यू पावला. त्यानें मुकुंदराव या नांवाच्या एका शूर मराठा सरदाराच्या बहिणीशीं लग्न करून तिचें नांव बबूजीखान असें ठेविलें होतें; व तिच्यावर त्याची अतीशय प्रीति होती. या स्त्रीपासून त्यास तीन मुली व एक मुलगा अशीं चार अपत्यें झालीं. यांपैकीं तीन मुलींतील वडील मरियम् ऊर्फ मेरी ही अहमदनगरकर बुऱ्हाण निजामशहा यास दिली होती; मधली खुदीजा ही वऱ्हाडचा राज्यकर्ता अल्लाउद्दीन इमाद्–उल्–मुल्क यास दिली होती; व धाकटी बिबी मस्सीती ही गुलबर्गा येथील अहंमदशहा बहामनी यास दिली होती. त्याचा मुलगा इस्मईल हा त्याच्या मृत्यूनंतर गादीवर आला. त्यावेळीं त्याचें वय नऊ वर्षांचें होतें.

इस्मईल आदिलशहा ( इ० सन १५१० ते इ० १५३४ ) हा गादीवर आला त्यावेळीं निव्वळ नऊ वर्षांचा असल्यामुळें कमालखान या नांवाच्या, सुलतान महंमदशहा बहामनी दुसरा याच्या दरबारांत पूर्वी असलेल्या, एका सरदारास त्याचा सांभाळ करण्याकरितां नेमिलें होतें. त्याप्रमाणें कमालखान हा राज्यकारभार पाहूं लागल्यावर लवकरच त्यानें आपलें वर्चस्व परमावधीस नेलें, आणि अखेरीस आसपासच्या राज्यकर्त्यांशीं स्नेह करून राजमाता व बालराजा या उभयतांना नाहींसें करून आपण राज्यपद बळकवावें, असा त्यानें घाट घातला; त्यावेळीं राणीनें आपल्या अतीशय विश्वासांतील सरदार—जो राणीशीं मिलाफी असल्यामुळें ज्याचा कमालखान हा अतीशय द्वेष करीत असे, तरी सुद्धां ज्याला वरपांगीं तो अतीशय सन्मानानें वागवीत असे तो सरदार—आणि बालराजा इस्मईलशहा पालक—पिता ( Foster-Father ) युसूफ तुर्क याच्याकडून त्यास युक्तीनें ठार मारविलें; तेव्हां कमालखानाचा मुलगा सफ्दरखान यानें मोठा दंगा करण्यास सुरवात केली; परंतु शहाची आई बबूजीखान आणि पालक आत्या दिलशाद आगा या उभयतांनीं मर्दानी पोषाख करून परदेशी सैन्याच्या मदतीनें त्याचा पराभव करून त्यास ठार मारिलें; व दुसऱ्याच दिवशीं इस्मईल राज्यपदारूढ झाला. त्यावेळीं त्यानें मोठा दरबार भरविला; आपल्या हातीं राजसूत्रें घेतल्याबद्दल इतर आसपासच्या दरबारास खलिते रवाना केले; व दक्षिणी व हबशी लोकांना राज्यांतून घालवून देऊन आपल्या सैन्यांत व दरबारांत परदेशी लोकांच्या नेमणुका केल्या; पुढें इ० सन १५१४ मध्यें महंमदशहा बहामनी, अमीर-बेरीद बऱ्हाण निजामशहा व कुली-कुत्बशहा हे एक होऊन त्यांनीं विजापूरवर चाल

युक्तीनें फोडून त्यांचा पराभव केला; त्यानंतर

ल बळकाविलेले मुडकल ऊर्फ मुद्गल व रायचूर

दुआबचे प्रांत परत मिळविण्याकरितां त्यानें इ० सन १५१९ मध्यें तिकडे स्वारी केली; परंतु त्यांत त्याचा अतीशय नाश झाला; त्याचा प्रसिद्ध इमानी व शूर सरदार मिर्झा जहांगीर हा मारला गेला व सर्व अदिलशाही सैन्य नाउमेद होऊन गेलें; तेव्हां शहानें आपला प्रसिद्ध पराक्रमी व कर्तबगार मुत्सद्दी आसदखान याच्या सल्ल्याप्रमाणें युद्ध बंद केलें व तो विजापूर येथें परत आला.

त्यानंतर इ० सन १५२५ मध्यें अहंदनगरकर बुऱ्हाण निजामशहा यानें विजापूरवर हल्ला केला, त्यावेळीं इस्मईलशहा यानें आसदखानाच्या मदतीनें त्याचा पूर्ण पराभव केला; त्यांच्या सैन्याचा पुष्कळ नाश केला; आणि पुष्कळ युद्धसामग्री व निजामशाही निशाणही आसदखानाच्या हातीं आलें, तथापि हा डाव मनांत ठेवून बुऱ्हाण निजामशहानें अमीर बेरीद यास बरोबर घेऊन इ० सन १५२८ मध्यें पुन्हां आदिलशाही प्रांतावर स्वारी केली; परंतु त्याचा आसदखानानें पूर्णपणें पराजय केला; व त्यांना परत पिटाळून लावून परिंड्यापर्यंत त्यांचा पाठलाग केला; व पुष्कळ युद्धसामुग्री मिळवून तो राजधानींत परत येऊन शहास भेटला.

इस्मईल आदिलशहा याचा सर्वांत खटपटी शत्रु अमीर बेरीद हा असल्यानें त्यानें सय्यद हुसेन आरब आसदखान वगैरे सरदार मंडळी व दहा हजार घोडेस्वारांचें सैन्य बरोबर घेऊन अमीरबेरीदवर स्वारी केली; व तो थेट बेदर शहरावर चाल करून गेला. यावेळीं अमीरबेरीद हा वृद्ध व दुबळा झालेला होता; व हिमाजी या नांवाचा एक ब्राह्मण त्याचा प्रधान होता; त्याच्या सल्ल्यानें अमीरबेरीद यानें बेदरचा किल्ला आपला मुलगा अल्लीबेरीद याजकडेस सोंपविला व आपण उदगीर येथील किल्ल्यांत आश्रयाकरितां निघून गेला; इकडे इस्मईलशहा बेदर येथें आल्यावर त्यानें लागलींच बेदरशाही सैन्याशीं मोठ्या निकराचें युद्ध केलें; त्यांत अमीरबेरीदचे दोन मुलगे मारले गेले; व इस्मईलशहा विजयी झाला. त्यानें बेदरचा किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला; अमीरबेरीद यास आपल्या स्वाधीन होणें भाग पाडून त्याची सर्व संपत्ति लुटून घेऊन ती आपल्या मंडळीस वांटून दिली व त्यास आपणाबरोबर विजापूर येथें घेऊन येऊन जहागीर देऊन जवळ ठेविलें. ( इ० सन १५३१ ) नंतर इस्मईलशहानें विजयानगरकरावर स्वारी केली; त्यावेळीं अमीरबेरीद यानें त्यास उत्तम मदत केली; त्यामुळें शहानें त्यास बेदरचें राज्य पुन्हां परत दिलें; परंतु इस्मईल शहाच्या नियंत्रणाखालुन तो स्वतंत्र झाल्याबरोबर त्यानें पुन्हां लागलींच पूर्वीप्रमाणें खटपटी करण्यास प्रारंभ केला; व बुऱ्हाण निजामशहा यास भर देऊन त्याला इस्मईलशहाशीं युद्ध करण्यास प्रवृत्त केलें; त्याप्रमाणें बुऱ्हाणशहा इस्मईल शहावर चाल करून आला; परंतु आदिलशहानें त्याचा पराभव केला; तेव्हां उभयतांची सरहद्दीवर भेट होऊन तह झाला; त्याअन्वयें

विजापूरकरांनीं कुत्बूशहाचा प्रदेश जिंकून आपल्या ताब्यांत घ्यावा व निजामशहानें इमादशाही प्रदेश जिंकून आपल्या ताब्यांत मिळवावा असें ठरलें, तथापि या तहाची अंमलबजावणी होण्यापूर्वींच इस्मईलशहाच्या तापानें उलट घेतली; व तो मृत्यू पावला; ( ता० ६ सप्टेंबर इ० सन १५३४ ) त्यानें पंचवीस वर्षें राज्य केलें. त्याचें दफन विजापूरपासून तीस मैलांवर असलेल्या गोगी या गांवीं त्याच्या वडिलांच्या कबरी शेजारीं करण्यांत आलें.

या शहाविषयीं फेरिस्त्यानें असें म्हटलें आहे कीं, इस्मईल आदिलशहा हा मोठा न्यायी, दूरदर्शी, धीरोदात्त व उदार होता; व तो अतीशय मोठ्या मनाचा असल्यामुळें आपल्या खजिन्याच्या स्थितीचें बारकाईनें निरीक्षण न करितांही इनामें देत असे; राजकीय कैद्यांना क्षमा करीत असे; कोणाहीं चहाड्या ऐकत नसे; रागांतही तो कोणास टाकून बोलत नसे. समयोचित व खुबीचें भाषण करण्यांत तो निष्णात असे; संगीत व काव्य यांमध्यें त्याची कोणीही बरोबरी करूं शकत नसे; आणि कवी व विद्वान् मंडळी यांचा तो अतिशय भोक्ता असून त्यानें आपल्या दरबारांतही अशा अनेक मंडळीस मोठ्या सढळपणानें आश्रय दिला होता; थोडक्यांत म्हणजे इस्मईलशहा हा विशेष कर्तृत्वान् व सद्गुणी राज्यकर्ता होऊन गेला असेंच निदर्शनास येतें. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा मल्लू हा गादीवर आला.

इस्मईल आदिलशहा यानें आपल्या मृत्यूसमयीं या राजपुत्रास आसदखानाच्या देखरेखाखालीं सोंपविलें; आणि "जरी राज्यकारभार चालविण्याचें कर्तृत्व त्याच्याठायीं वसत नाहीं तरी तो वडील असल्यानें त्यासच राज्यावर बसवाव;" अशी त्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें आसदखानानें मल्लू यास गादीवर बसविलें; परंतु तो अतीशय दुर्व्यसनी असून त्यानें अनेक दुष्कृत्यें केलीं; तेव्हां त्याची आजी बबुजीखान, सरदार यूसफखान व आसदखान यांनीं त्यास पदभ्रष्ट केलें; त्याचे व त्याचा धाकटा भाऊ अल्लू याचे डोळे काढण्यांत आले आणि त्याचा तिसरा भाऊ इब्राहीम यास गादीवर बसविण्यांत आलें.

इब्राहीम आदिलशहाच्या कारकीर्दींत ( कारकीर्द इ० सन १५३४ ते इ० सन १५५७. ) झालेल्या धार्मिक मतभेदाच्या व विजयानगरकराच्या भानगडींचा मागें उल्लेख आलेला आहेच. या शहाच्या कारकीर्दींतील विशेष महत्वाची गोष्ट ही आहे कीं, इस्मईल अदिलशहाच्या वेळीं सर्व दफ्तर फारशी भाषेंत ठेवण्याची वहिवाट होती; ती इब्राहीमशहानें बंद करून त्याऐवजीं मराठी भाषा सुरू केली; व पुष्कळ ब्राह्मण व मराठे मंडळी निरनिराळ्या खात्यांतून नोकरींत ठेविली; त्यामुळें या शहाच्या कारकीर्दींत मराठ्यांचें महत्व पुष्कळच प्रमाणांत वृद्धिंगत झालें.

सुदैवानें या शहास मिळालेला वजीरही मोठा अलौकिक पुरुष होता; या प्रसिद्ध पुरुषाचें नांव आसदखान हें असून, तो तुर्कजातीचा होता व त्याचें मूळचें नांव खुश्रू असें होतें. तो मोठ्या बुद्धिवैभवाचा व सारासारविचाराचा मनुष्य असून इस्मईलशहाच्या वेळीं तो अतिशय प्रसिद्धीस आला. आसदखानानें वेळोवेळीं शहास अमोल्य मदत केली; त्यामुळें शहानें त्यास " आसद " हा किताब व बेळगांव परगण्याची जहागिरी बहाल केली. शिवाय तो इतका इमानी होता कीं, शहाच्या शत्रूंनीं त्याला वश करून घेण्याकरितां आपली शिकस्त केली; तथापि आपल्या धन्यावरील अढळभक्ति व इमानीपणा यांपासून तो — शहाची त्याच्यावर गैरमर्जी झाल्यावेळींसुद्धां — तिळमात्रही ढळला नाहीं; इतकेंच नाहीं तर आदिलशाही गोटांतून त्यास फोडून आपल्या पक्षाचा करून घेण्याकरितां प्रयत्न करण्यास आलेल्या शहाजोग शिष्टांनां त्यानें खडेजबाब सुनावून देऊन त्यांना हकालपट्टीचा आहेर केल्याशिवायही तो राहिला नाहीं. वजीर व सेनापती हीं दोन्हींहि महत्वाचीं कामें त्यानें पुष्कळ वर्षें केलीं. त्याची रहाणी मोठ्या भपक्याची होती; त्याचा खर्च अफाट होता; त्याचा डामडौल मोठ्या थाटामाटाचा होता; तो महंमद गवानसारखा साधा नव्हता; पण त्याच्याच तोडीचा मुत्सद्दी व सेनानायक होता; सतत चाळीस वर्षें दक्षिणेंतील नांवाजलेली आणि बडी मंडळी यांना त्याचाच आश्रय व पाठबळ होतें; विजयनगरकरासह आसपासचे सर्व राजेरजवाडे त्यास अतिशय मान देत होते; व त्याला नेहमीं नजराणे पाठवीत होते; प्रत्यक्ष आदिलशहाही त्याला वचकून होता; नजराणे व गौरवयुक्त पत्रें पाठवीत होता; त्याचे घरगुती कामाचे २५० नौकर होते; साठ मोठाले व १५० त्यांहून लहान हत्ती त्याच्या पिलखान्यांत होते; चारशें अस्सल अरबी घोडे-व शिवाय हिंदुस्थानांतील अस्सल पैदासीचे अनेक घोडे त्याच्या अश्वशाळेंत होते. त्यानें अगणित संपत्ति मिळविली होती; व त्याच्या पाकगृहांत दररोज दक्षिणी वजनाचे शंभर मण— २७०० पौंड—तांदूळ, पन्नास बकरीं, व शंभर कोंबडीं इतक्यांचा फन्ना उडत होता; यावरून त्याच्या रुर्च अफाट संपत्तीची व खर्चाची कोणासही कल्पना करतां येईल. सोनेरी कापडचा कंबरपट्टा जांबियासह उपयोगांत आणण्याची नवी पद्धत त्यानेंच पहिल्यानें सुरू केली; व पुढें दक्षिणेंत मोठमोठ्या सरदार अमीर उमरावांनीं त्याचें अनुकरण केलें. आसदखान हा १०५ वर्षांचा होऊन इ० स १५४९ ( जानेवारी ) मध्यें मृत्यू पावला. थोडक्यांत ह्मणजे विजापूरच्या आदिलशाही राज्यांत आसदखान हा एक चिरस्मरणीय पुरुष निर्माण होऊन गेला व त्याच्याच कर्तबगारीनें त्या राज्याचा अतिशय उत्कर्ष झाला, असें ह्मणणें अतिसयोक्तीचें होणार नाहीं.

इब्राहिम आदिलशहाचीं शेवटचीं कांहीं वर्षें युद्धांत, त्रासांत व संकटांत गेलीं. विजयानगरकराच्या मदतीनें निजामशहानें त्याचा पराजय केल्यानंतर तो अनेक संकटांनीं

व्याप्त झाला; बेसुमार मद्यपान करूं लागला; बेहद्द विषयविलासांत रममाण झाला; त्यानेंच तो आजारी झाला; त्यानें अनेक वैद्यांना ठार मारिलें; त्याला वेड लागलें व अशाच विपन्नावस्थेंत तो २४ वर्षें व कांहीं महिने राज्य करून इ० सन १५५७ मध्यें मृत्यू पावला. त्यास अली व तहमास्प असे दोन मुलगे व दोन मुली अशीं चार आपत्यें होतीं; त्यांपैकीं त्याचा वडील मुलगा अली अदिलशहा हा त्याच्या मृत्युनंतर आसदखानाचा मुलगा किश्वरखान याच्या मदतीनें गादीवर आला.

या शहाचा कल पहिल्यापासून शियापंथाकडे असल्यामुळें इब्राहीमशहानें त्यास त्याच्या गुरूसह मिरज येथील किल्ल्यांत ठेविलें होतें; व तेथील किल्लेदार शिकंदरखान यास कोणाहि शियापंथी मनुष्यास राजपुत्राला भेटण्याची परवानगी देऊं नये अथवा त्या धर्मपंथाचीं मतें त्याच्या समक्ष कोणासहि बोलूं देऊं नयेत, अशी ताकीद दिली होती. पुढें इब्राहिमशहा मृत्यू पावल्यावर तो किश्वरखानाच्या मदतीनें गादीवर आला; तेव्हां त्यानें सुनीपंथ मोडून राज्यांत पुन्हां पूर्वीप्रमाणें शियापंथ चालू केला. निजामशहा यानें अदिलशहा राज्यांतील कल्याणी व सोलापूर हे किल्ले बळकाविले होते; ते परत मिळण्याकरितां शहानें विजयानगरकरांची मदत मिळवून इ० सन १५५८ मध्यें निजामशाही प्रदेशावर स्वारी केली; व त्याचा सर्व प्रदेश उध्वस्त केला; त्यानंतर पुढच्याच वर्षीं इ० सन १५५९ मध्यें हुसेन निजामशहानें पुन्हां अली अदिलशहावर स्वारी केली; त्यावेळीं शहानें विजयानगरकर व इब्राहीम कुत्बशहा यांची मदत मिळवून हुसेन निजामशहाचा पराभव केला; परंतु या दोन्हीही स्वाऱ्यांत विजयानगरकरांच्या सैन्यानें अनेक अनन्वित प्रकार केले; व दुसरींत तर त्यांनीं अत्याचाराचा कळसच केला! विजयानगरकराविरुद्ध, मुसलमान राज्यकर्त्यांची जूट होण्यास त्यांचे हे अत्याचार, हेंही एक प्रमुख कारण होऊन बसलें; आणि पुढें लवकरच तालीकोटच्या नैऋत्येस तीस मैलांवर मुसलमान राज्यकर्त्यांनीं विजयानगरकराशीं मोठ्या निकराचें युद्ध करून तें राज्य नामशेष करून टाकिलें!

त्यानंतर अलीआदिलशहा हा विजयानगरच्या अवशेष राज्यांपैकींचीं बंकापूर वगैरे हिंदूराज्यें हस्तगत करून घेण्यास निघाला; त्यावेळीं त्यानें यशवंतराव, भोजनाईक व देवनाईक या तिघां मराठे सरदारांबरोबर आपलीं बायकामुलें विजापूर येथें परत रवाना केल्याचा—ह्मणजे मराठे सरदारांवर इतकी महत्वाची व नाजुक कामगिरी सोंपविल्याचा—उल्लेख आढळतो. त्यावेळीं या मराठे सरदारांबरोबर सहा हजार मराठे "बर्गी स्वार" होते. या मराठा सैन्यानें मार्गांत कुत्बशाही प्रांतांत लुटालूट केली; तेव्हां सलाबतखानानें त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा पराभव केला; व या मराठी सैन्याबरोबर असलेले फत्तेजंग व फतेलष्कर हे दोन उत्तम हत्ती व त्यांचें निशाणही हस्तगत करून

घेतलें; अशारीतीनें मराठ्यांचें सैन्य सलाबतखानाच्या सैन्याच्या मानानें लहान असल्यामुळें त्याचा पराभव होऊन बराच नाशही झाला; तथापि यशवंतरावानें अल्लीआदिलशहाच्या कुटुंबास मोठ्या शर्तीनें सुरक्षितपणें विजापूर येथें नेऊन पोहोंचविलें. थोडक्यांत ह्मणजे प्रत्यक्ष आपली बायकामुलें सुरक्षितपणें राजधानींत परत नेऊन पोहोंचविण्याची कामगिरी आदिलशहानें सर्वस्वीं मराठे सरदारांकडे सोंपविली होती; आणि त्याप्रमाणेंच सर्व वसुलाच्या कामावर त्यानें एका ब्राह्मणाची नेमणूक केली होती; यावरून त्या काळांत विजापूरच्या राज्यांत मराठ्यांना किती महत्व प्राप्त झालें होतें; व त्याचयावर कोणत्या परमावधीपर्यंत विश्वास ठेविला जात होता; याची कोणासही सहज कल्पना करितां येईल.

त्यानंतर लवकरच मूर्तुजा निजामशहानें गोंवळकोंडेकर इब्राहीम कुत्बूशहा याची मदत मिळवून अल्लीबेरीदशहावर स्वारी करण्याचें ठरविलें; तेव्हां बेरीदशहानें अल्ली आदिलशहा याजकडे कुमक मागितली; परंतु त्यानें " मला अमके दोन खोजे गुलाम द्याल तरच मदत करितों. " अशी अट घातली; तेव्हां नाइलाजानें बेरीदशहानें त्या दोन विवक्षित गुलामांना अल्ली आदिलशहाकडे जाण्यास सांगितलें; परंतु ते आपल्या धन्यास सोडून जाण्यास अत्यंत नाखुष होते; तथापि बेरीदशहानें त्यांना तसेंच जबरीनें तिकडे पाठविलें; तेव्हां त्यांपैकीं एका खोजानें विजापूर येथें पोहोंचल्यावर पहिल्याचमुलाखतींत अल्ली आदिलशहाचा खून केला. ( इ० सन १५८० ) हा शहा मोठा विद्वान्, धर्मनिष्ठ व परोपकारी होता. प्रसिद्ध चांदबिबी ही याचीच स्त्री होती. या शहानें तेवीस वर्षे राज्य केलें. याची कबर विजापूर येथें असून तिला " रोझाअली " असें ह्मणतात. त्यास पुत्रसंतान नसल्यामुळें, त्यानें आगाऊ ठरवून ठेविल्याप्रमाणें त्याचा पुतण्या व तहमास्प याचा मुलगा इब्राहीम हा गादीवर आला.

या शहाच्या कारकीर्दीची बरीच हकीकत चांदबिबी व फेरिस्ता यांच्या हकीकतींत मागें आलेली आहेच; फेरिस्ता यानें ज्या वर्षी ( इ० सन १५९६ ) विजापूरच्या आदिलशाही राज्याचा इतिहास लिहून पूर्ण केला, त्याच वर्षी इब्राहीम शहाचा भाऊ इस्मईल यानें राज्यपद मिळविण्याकरितां एक मोठें बंड उभारिलें; परंतु शहानें त्यास पकडून तोफेच्या तोंडीं देऊन तें बंड मोडून टाकिलें. हा शहा अजमासें ४६ वर्षे राज्य करून आपल्या वयाच्या ५६ व्या वर्षी इ० सन १६२६ मध्यें मृत्यू पावला; या शहास लोक मोठा साधू समजत असत; तो नरसोबाची वाडी येथील प्रसिद्ध सिद्धपुरुष श्रीपाद स्वामी यांचा शिष्य झालेला होता व त्यास " जगद्गुरू " अशीही संज्ञा होती. हा शहा मोठा पराक्रमी व प्रजादक्ष होता. त्यानें आपल्या राज्यांत तोडरमल्ल याची वसुलाची पद्धत सुरू केली, तो स्वतः सुनीपंथानुयायी होता; व त्यानें आपल्या राज्यांत शियापंथ मोडून

सुनी पंथ चालू केला होता; तथापि धार्मिक बाबतींत त्यानें कोणावरही सक्ती न करितां तो अतिशय समबुद्धीनें वागत असे; व सर्वांना सारख्यारीतीनें वागवीत असे. पोर्तुगीज लोकांना आपल्या नियंत्रणाखालीं आणण्याची त्यानें बरीच खटपट केली; पण ती गोष्ट आपणांस साध्य होणार नाहीं अशी त्याची खात्री झाली; तेव्हां त्यानें त्यांच्याशीं सख्य करून त्यांना आपल्या राज्यांत व्यापार करण्याची पूर्ण मोकळीक दिली; याच्या कारकीर्दीत अनेक प्रेक्षणीय इमारती बांधिल्या गेल्या; शिवाय त्यानें स्वतःही ३६ वर्षे ११ महिनें व ११ दिवस सतत बांधकाम चालू ठेवून एक मोठी कौशल्यनिपुण अशी सुंदर मशीद ५२८१५०० रुपये खर्च करून पूर्ण करविली व आपले वाडे व इतर इमारती रंगविण्याकरितां व त्यांत रंगीबेरंगी नक्षीकाम करण्याकरितां पोर्तुगीज चित्रकार नौकरींत ठेविले; आपल्या राज्यांत ख्रिस्ती देवालयें बांधून, ख्रिस्ती धर्मोपदेशकांना चांगला आश्रय दिला; थोडक्यांत ह्मणजे उत्तरहिंदुस्थानांत अकबरानें धार्मिक बाबतींत जें अत्यंत उदार वर्तन ठेविलें, आणि राजा तोडरमल्ल मार्फत जी नवी वसूलपद्धति अमलांत आणिली, तिचेंच इब्राहीमशहानें अनुकरण करून आपल्या प्रजेची अतीशय भरभराट केली. त्याप्रमाणेंच त्याची कारकीर्द हिंदू प्रजेसही अतिशय सुखदायक झाली; आणि त्यानें लष्करी व इतर खात्यांत मराठे व ब्राह्मण लोकांचा पुष्कळच भरणा केल्यामुळें मराठ्यांच्या वर्चस्वास पुष्कळच जोराचें चालन मिळालें. इब्राहीमशहाच्या मृत्यूनंतर त्याचा मधला मुलगा महंमद हा, आपल्या वडिलाच्या इच्छेप्रमाणें—परंतु आपल्या वडील भावास अंध करून आणि इतरांना राज्यकारभार चालविण्यास निरुपयोगी करून—गादीवर आला.

हा शहा गादीवर आल्यावर लवकरच त्याचा मांडलीक बंकापूरकर कदमराव यानें त्याच्याविरुद्ध बंड उभारिलें; तेव्हां शहानें आपला सरदार मिर्झाअली यास फौज देऊन त्याच्यावर रवाना केलें; त्याप्रमाणें मिर्झाअली यानें तिकडे जाऊन कदमराव यास पकडून ठार मारिलें; ( इ० सन १६२८ ) आणि त्या भागांत पुन्हां शांतता स्थापन करून तो विजापूर येथें परत आला.

या शहाचा प्रधान वास्तवीकरीत्या मुस्तफाखान या नांवाचा एक मनुष्य होता; परंतु यावेळीं तो नुसता नामधारी वजीर ह्मणून राहिला असून राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें खवासखान या नांवाच्या एका सरदाराच्या हातांत गेलेलीं होतीं. खवासखान हा जातीनें मूळचा मराठा होता; त्यास इब्राहीमशहानें बाटवून मुसलमान करून त्याचें नांव "दौलतयार" असें ठेविलें; त्याच्यावर इब्राहीमशहाची अतीशय बहालमर्जी असून त्यानें खवासखानास "दौलतखान" असा किताब दिला होता. पुढें इब्राहीमशहानें आपल्या मृत्यूपूर्वी

त्यास " खवासखान " ही पदवी देऊन; त्यास विजापूरचा सुभेदार नेमिलें; व आपला दुसरा मुलगा महंमद यास राज्यावर बसवून, त्याचा सांभाळ करून, राज्यकारभार चालविण्याची कामगिरी त्यास सोंपविली. त्यामुळें महंमदशहाच्या कारकीर्दींत खवासखान हाच सर्व राज्याचा सूत्रचालक बनला. या खवासखानाचा कारभारी व त्याच्या अतीशय विश्वासांतील व प्रेमांतील मुरारराव–मुरारपंत अथवा मुरारजगदेव, किंवा " ध्यानतराव " या नांवाचा एक ब्राह्मण असून तो मूळ सातारा जिल्ह्यांतील कोरेगांव नजीकचें नागरगांव ऊर्फ तुळापूर येथील कुळकर्णी होता; मुरारपंत हा मोठा शूर व कर्तबगार मनुष्य असून कोणत्याही स्वारीवर आदिलशाही सैन्य निघालें तरी सैन्याचा मुख्य अधिकार खवासखान हा त्याच्याकडेसच सोंपवीत असे आणि खवासखानानें राजधानींत राहून राज्यकारभार सांभाळावा व मुरारपंतानें बाह्यप्रदेशीं मोहिमा कराव्या, असा क्रम अनेक वर्षें चालू होता.

निजामशाहीचा त्राता प्रसिद्ध मलिकंबर हा ज्या वर्षी मृत्यू पावला, त्याच वर्षी—ह्मणजे इ० सन १६२६ मध्यें–विजापूरकर इब्राहीम आदिलशहा हा मृत्यू पावला; आणि त्याचा अल्पवयी मुलगा महंमद हा गादीवर आला. त्यानंतर एक वर्षांतच जहांगीर बादशहा मृत्यू पावला; ( ता० २८ ऑक्टोबर इ० सन १६२७. ) आणि त्याचा गादीवर आलेला मुलगा शहाजहान यानें निजमशाही राज्य नेस्तनाबूद करण्याचा अट्टाहास सुरू केला; तेव्हां मूर्तुजा निजामशहानें महंमद आदिलशहाची मदत मागितली; परंतु ती येण्या-पूर्वीच मुर्तुजा शहाचा खून होऊन फत्तेखान मोंगलास मिळाला; तथापि आदिलशाही सैन्य निजामशहाच्या मदतीस आलें; याबद्दल मोंगल लोकांस राग आला; आणि प्रसिद्ध मोंगल सरदार व राणी नूरजहान हिचा भाऊ आसफखान यानें विजापूरवर स्वारी केली; परंतु ती अयशस्वी होऊन त्यास आदिलशाही प्रांतांतून परत येणें भाग पडलें. ही हकीकत शहाजहान यास कळल्यावर त्यानें तावडतोब मोहबतखान यास दक्षिणेंत पाठविलें; तेव्हां पुन्हां निजामशाही सैन्यानें आदिलशहाची मदत मागितली; त्याप्रमाणें आदिलशहानें रणदुल्लाखान व मुरारराव या उभयतां सरदारांना त्यांच्या मदतीस पाठविलें; इकडे मोंगल सरदार मोहबतखान हा स्वतः मोठी फौज घेऊन मार्च महिन्याचे प्रारंभीं दौलताबादेस येऊन धडकला; तेथील किल्ला हस्तगत करून घेण्याचा मोठ्या चिकाटीनें प्रयत्न केला व अखेरीस तो हस्तगत करून घेऊन ( इ० सन १६३३ जून ) त्यानें निजामशाही राज्य नष्ट करून टाकिलें.

तथापि शहाजी हा निजामशाही राज्य पुन्हां जिवंत करण्याच्या खटपटींत होता, आणि त्यानें निजामशाहींतील बरेच परगणे व किल्ले हस्तगत करून घेतले होते. त्यानें जुन्नरच्या पश्चिमेस तीस मैलांवर जीवधन ऊर्फ अंजराई या नांवाचा एक किल्ला आहे,

त्या किल्ल्यांत निजामशाही घराण्यांतील मूर्तिजा या नांवाचा एक राजपुत्र प्रतिबंधांत होता, त्यास तेथून मुक्त करून शहागड ऊर्फ भीमगड येथें आणून तक्तावर बसविलें; ( इ० सन १६३३ जुलै. ) आणि जुन्नर हें शहर निजामशाही राज्याच्या राजधानीचें ठिकाण करावें, असा त्यानें बेत केला. यावेळीं जुन्नर येथें त्याचा स्नेही असलेला श्रीनिवासराव हाच सुभेदार होता. त्यास शहाजीनें, शहास राहण्याकरितां जुन्नरचा किल्ला, त्याच्या आसपासच्या प्रदेशासह, आपल्या ताब्यांत देण्याविषयीं विनंती केली; परंतु श्रीनिवासरावानें शहाजीचें हें ह्मणणें मान्य केलें नाहीं; तेव्हां अखेर नाइलाजानें शहाजीनें त्यास कैद केलें; त्याची मालमिळकत जप्त केली; आणि जुन्नरचा किल्ला व आसपासचा प्रदेश शहाजीच्या ताब्यांत येऊन शहा जुन्नर येथें येऊन राहूं लागला. शहाजीच्या या धडाडीच्या कृत्यामुळें त्याचें वजन अतीशय वाढलें; व निजामशाहीची पांगलेली बारा तेरा हजार फौज त्यास येऊन मिळून तो लवकरच पुष्कळच बलाढ्य बनला.

इकडे आदिलशाहींत खवासखान व मुरारराव यांचें वर्चस्व इतकें परमावधीस गेलें कीं, या उभयतां डोईजड व्यक्तीविषयीं, शहा हा आतां वयांत आलेला असल्यामुळें, त्यास अतीशय वैषम्य वाटूं लागलें; इतक्यांत खवासखानानें शहाजहान बादशहास विजापूरवर स्वारी करण्यास बोलाविलें; ही हकीकत शहास कळल्यावर त्यानें लागलींच खवासखान व मुरारराव यांचा वध करविला; तथापि खवासखानाच्या आमंत्रणाचा शहाजहाननें लागलींच फायदा घेतला, आणि इ० सन १५३५ मध्यें स्वतः दक्षिणेंत येऊन त्यानें आपला सरदार खानडौरान यास विजापूरवर पाठविलें, त्याप्रमाणें तो त्या शहरावर चाल करून येण्यास निघाला; परंतु महंमद आदिलशहानें विजापूरसभोंवतालचा दहा बारा मैलांचा प्रदेश ओसाड करून टाकिल्यामुळें त्यानें राजधानीकडे जाण्याचें तहकूब करून तो अदिलशाही प्रदेशांत लुटालूट करूं लागला. पुढें शहाजहान यानें शहाजीस व निजामशाही पक्षांतून महंमद आदिलशहास फोडून आपल्या पक्षाकडे ओढून घेतलें; व इ० सन १६३६ च्या मे महिन्यांत विजापूरकराचा व मोंगलाचा तह झाला; त्याअन्वयें, पुणें, सुपें, इंदापूर, बारामती, चाकण हे शहाजीच्या जहागिरीचे परगणे सिंहगड, पुरंदर, लोहगड व माहुली हे किल्ले, व दाभोळपासून वसईपर्यंतचा सर्व कोंकणप्रांत, असा निजामशाही राज्यापैकीं ऐंशीं लक्ष रुपये उत्पन्नाचा प्रदेश विजापूरकरास मिळाला. बाकी प्रदेश शहाजहान यानें मोंगली राज्यांत सामील केला व शहाजी यास, महंमद आदिलशहानें, शहाजहानच्या परवानगीनें आपल्या नोकरींत ठेवून घेतलें. ( इ० सन १६३७. )

त्यानंतर इ० सन १६४६ मध्यें शहाजी कर्नाटकच्या कामगिरीवर गेला. इतक्यांत इकडे त्याचा मुलगा शिवाजी यानें आदिलशाही राज्यांतील घाटमाथ्यावरील

अनेक किल्ले हस्तगत करून घेतले; आणि कल्याण प्रांताच्या सुभेदारास कैद करून तो सर्व प्रांतही हस्तगत करून घेतला; या सर्व गोष्टींमुळें विजापूर दरबारांत मोठी खळबळ उडून गेली; शिवाय रणदुल्लाखान कर्नाटकमधून परत आल्यावर शहाजीनें तिकडे आपलें वर्चस्व अतिशय वाढविल्यामुळें तें नष्ट करण्याची शहास इच्छा होतीच; त्यांतही "शिवाजीनें चालविलेली धामधूम," या गोष्टीची भर पडली; आणि मुस्तफाखान व शहाजी यांच्यामध्यें वैरभाव उत्पन्न झाल्यामुळें तर हें प्रकरण विकोपासच गेलें; "शिवाजीस शहाजीची फूस आहे," या सबबीवर शहानें शहाजी यास बाजी घोरपड्यामार्फत कर्नाटकांत पकडवून विजापूर येथें आणून प्रतिबंधांत ठेविलें; त्यावेळीं शिवाजीनें शहाजहान बादशहाचा आश्रय घेतला; आदिलशहास मोंगली दरबारचा "काट–शह" देऊन आदिलशाही शहांत अडकलेलें शहाजीचें मोहरें त्यानें सुरक्षितपणें त्यांतून काढून घेतलें; आणि इ० सन १५५३ च्या प्रारंभीं शहाजी पुन्हां कर्नाटकांत परत गेला.

महंमद आदिलशहा हा विलासी होता, तरी तो मोठा सदाचरणी, पापभीरू, साधा व प्रजादक्ष होता. त्यानें राज्यकारभार चालविण्यासंबंधीं ८२ कलमांचें एक नियमपत्रक तयार केलें होतें; आणि त्यांतील कांहीं नियम तर अतीशय महत्त्वाचे व अनुकरणीय असेच होते व आहेत; ह्मणून त्यांतील अगदींच थोडे नियम याठिकाणीं ग्रथित केले आहेत; ते येणेंप्रमाणें:—

१ "पादशहांनीं इनसाफ करणें, हीच आपलीं अलंकार-भूषणें आहेत असें समजून, सर्व हिंमत न्याय करण्याचे कामीं खर्च करावी. असें सांगितलें आहे कीं, "संपूर्ण आयुष्यांत एक घटका न्याय करणें हें, पादशहास शंभर वर्षे वैराग्य धारण करून ईश्वरसेवा करण्यापेक्षां अधिक पुण्यकारक आहे." पादशहांनीं खुद्द जातीनें मुलुकाची महामुरी व रयतेची आबादानी ठेवून, न्याय करण्याचे कामीं अंतर पडूं देऊं नये. कारण, मुलकाची आबादानी हें, राज्याच्या बंदोबस्ताचें व खजिन्याच्या आबादानीचें कारण आहे......"

६ "रयतेस पूर्ण सुखी ठेवून बहुत कृपेनें व दयाळूपणानें तिचें पालन करावें."

१० "असत्यवादी, बेमान, बदचालीचे, कुटिल, गर्विष्ठ, फंदफितूर करणारे ह्यांस सरकारी कामांत घेऊं नये व सरकारवाड्यांत येऊं देऊं नये. हे कोणत्याही भरंवशाच्या कामास उपयोगी नाहींत."

१२ चुगलखोर मनुष्याच्या बोलण्यावर भरंवसा ठेवूं नये व त्याजवर क्रोधही करूं नये. कधीं त्याचे सांगण्यांत खरेपणाही असतो.

६३ बादशहांनीं कोणत्याही कारभारांत अफरातफर होऊं देऊं नये. दिवसाच्या वेळाचे तीन विभाग करावे. प्रातःकाळपासून तीन तासपर्यंत विद्वान्, गुणवान् व कवी

यांसहवर्तमान राहून, अनेकप्रकारची माहिती करून घ्यावी. चवथे तासापासून साहावे तासापर्यंत उघड दरबारांत बसून, थोर, कारभारी, संभावीत व शिपाई लोक यांचा मुजरा घ्यावा. त्यावेळीं सर्वांस येण्यास मोकळीक असावी. गैरराबता नसावा.

६४ सातवे तासापासून नववे तासापर्यंत एकांतांतील कामें असतील तीं करावीं.

६५ नववे तासापासून एक प्रहर रात्रपर्यंतही एकांतीं बसून राज्यकारभारासंबंधीं कामें करावीं. ( अवशीचे पांच घटका रात्रीनंतर नमाज पढावी. ) ईषाम पढल्यानंतर हर पाहिजे तें काम करण्यास पादशाहा मुखत्यार आहे. ह्या कायद्याप्रमाणें वेळ घालवावी. शिरस्ता सोडून एक घटकाही वागूं नये. यावरून महंमद आदिलशहाची योग्यता व प्रजादक्षता निदर्शनास येते. हा शहा आपल्या वयाच्या ४७ व्या वर्षी तीस वर्षे राज्य करून, इ० सन १६५६ मध्यें ( ता० ४ नोव्हेंबर रोजीं ) मृत्यू पावला; व त्याचा मुलगा अली आदिलशहा हा गादीवर आला.

शहाजहान बादशहाच्या काळांत दक्षिणेंत मोंगलांचे चार सुभे होते; इ० सन १६४४ मध्यें अवरंगझेबानें दक्षिणेचा कारभार सोडल्यावर इ० सन १६५२ पर्यंत दक्षिणेंत अनेक मोंगल सुभेदारांनीं कारभार केल्यानंतर इ० सन १६५३ मध्यें अवरंगझेब हा पुन्हां दक्षिणप्रांताच्या सुभेदारीवर आला; पुढें महंमद आदिलशहा मृत्यू पावून त्याचा मुलगा अली दुसरा, हा गादीवर आला; त्यावेळीं आपल्या परवानगीशिवाय तो गादीवर आला, या सबबीवर अवरंगझेबानें विजापूरला वेढा दिला; आणि तें शहर त्याच वेळेस मोंगलांच्या ताब्यांत जाण्याचा रंग दिसूं लागला; परंतु इतक्यांतच शहाजहान आजारी पडल्यानें त्यास परत येण्याविषयीं निकडीचें बोलावणें आल्यावरून तो दिल्ली येथें गेला, आणि यावेळीं आदिलशाही राज्य या प्राणांतिक संकटांतून निभावलें.

तथापि आदिलशाहीचा शत्रू शिवाजी हा दिवसेंदिवस बळावत चालला होता; ह्मणून विजापूरकरांनीं अफझलखान या नांवाच्या सरदारास त्याच्यावर पाठविलें; ( इ० सन १६५९ सप्टेंबर ) परंतु तो ठार मारला गेल्यावर आदिलशहानें रुस्तुमुज्जमान यास शिवाजीवर पाठविलें; तथापि शिवाजीनें त्याचाही पराभव करून त्यास कृष्णानदीपलीकडे हांकलून लाविलें; तेव्हां अदिलशहानें कर्नाटकमधील कर्नूलचा सुभेदार मलिक रयहान याचा आश्रित व तो मेल्यानंतर त्याच्या मुलास बाजूस सारून कर्नूलचा कारभार बळकावून बसलेला सरदार—सिदीजोहर यास—त्यास सलाबतजंग असा किताब देऊन शिवाजीवर पाठविलें; व त्याच्याबरोबर अफझलखानाचा मुलगा फाजल महंमद याचीही रवानगी केली; परंतु तो आंतून शिवाजीस सामील असल्यामुळें ही स्वारीही निष्फळ

झाली; तेव्हां शहानें शिवाजीवर स्वतः स्वारी केली व पन्हाळा किल्ल्यास वेढा घालून त्यानें तो हस्तगत करून घेतला; परंतु शिवाजी तेथूनही निसटून गेल्यानें शहाच्या खटाटोपाचा कोणताही उपयोग न होतां त्यास शिवाजीचा नाद सोडून विजापूर येथें परत येणें भाग पडलें.

पुढें शहानें सिद्दीजोहरचें व बेदनूरकर भद्राप्पा नाईक यांचें बंड मोडल्यावर, शिवाजीचें वाढतें वर्चस्व मोडून टाकण्याकरितां मोंगल व आदिलशहा यांच्यामध्यें तह होऊन उभयतांनीं मिळून शिवाजीवर स्वारी करावी, असें ठरलें; त्याप्रमाणें अवरंगझेबानें राजा जयसिंह यास मोठ्या सैन्यानिशीं दक्षिणेंत रवाना केलें; व आदिलशाही सरदार खवासखान हाही आपल्या सैन्यासह मोंगल सैन्यास मिळण्यास रवाना झाला; परंतु हीं उभयतां सैन्यें एकत्र होण्यापूर्वींच विजापूरकराच्या सैन्याबरोबर एक जोराची चकमक उडवून शिवाजी पुरंदर किल्ल्याकडे निघून गेला. इतक्यांत जयसिंह आल्यावर त्यास शिवाजी पुरंदरच्या किल्ल्यांत आहे असें कळलें; त्याबरोबर त्यानें त्या किल्ल्यास वेढा दिला; तेव्हां मोंगलाच्या सैन्याबरोबर आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून त्यानें "आदिलशाही राज्य व दक्षिणदेश जिंकण्यांत मी मोंगलांना मदत करीन; असा जयसिंहास निरोप पाठविला; जयसिंहास शिवाजीचें हें म्हणणें मान्य झालें व त्यानें लागलींच पुरंदरचा वेढा उठवून आदिलशाही प्रदेश लुटण्यास सुरवात केली; तेव्हां अर्थातूच मोंगलांच्या या वचनभंगाबद्दल विजापूरकरास आश्चर्य वाटलें व रागही आला; त्यांनीं जयसिंहाशीं युद्ध करण्याची मोठी जंगी व जोराची तयारी केली; त्याचा दोनदां पराभव केला; त्याच्या मदतीस आलेला सरदार सलाबतखान याची अदिलशाही सरदार सर्जाखान यानें धुळधाण उडविली; पुढें कुत्बूशाही सैन्य मदतीस आल्यावर त्यांनीं कहीकबाड मारून रसद गल्ला लूटून, जयसिंहाच्या सैन्याची अन्नान्नदशा केली; एका युद्धप्रसंगांत तो स्वतः मरतां मरतां वांचला व अखेरीस अदिलशाहीचा नाद सोडून आपला जीव घेऊन दिल्लीकडे पळून जाणें त्यास भाग पडलें; अशारीतीनें यावेळीं अदिलशाही मोंगलांच्या तडाक्यांतून जिवंत राहिली; परंतु अलीशहाच्या मृत्यूनंतर चौदा वर्षांनींच ती नामशेष होऊन गेली.

हा शहा इ० सन १६७२ यध्यें मृत्यू पावला; तो विषयी होता तरी सुद्धां पराक्रमी, प्रजादक्ष व योग्य दाब व नियंत्रण ठेवणारा होता. तो स्वतः कवी होता, विद्वान् होता व विद्वानांचा आश्रयदाता होता; या शहाच्या कारकीर्दींत धर्माजी पंडित वगैरे हुषार ब्राह्मण—दक्षिणी व मराठे मंडळी—प्रसिद्धीस येऊन महत्वास चढली. अलीशहाच्या मृत्यूनंतर त्याचा अज्ञान पांच वर्षांचा मुलगा शिकंदर हा गादीवर आला.

यावेळीं आदिलशाही राज्यांत पूर्ण बजबजपुरी माजली होती; आपसांत फाटाफूट झालेली होती; राज्यांतील सरदारमंडळींत जोरांत असलेली आपसांतील स्पर्धा, अनुभवी मुत्सद्दी अब्दुल महंमद याची स्थानभ्रष्टता, कर्तृत्ववान् व अनुभवी धुरीणांचा आभाव, नालायक नेत्यांच्या हातांत गेलेलीं राज्यसूत्रें, राज्यकर्ता अज्ञान असल्यामुळें सरदारमंडळींत वाढत गेलेला शिरजोरपणा, सैन्यांत असंतोष, पठाण सैन्याचा पगार तुंबल्यामुळें उत्पन्न झालेली अप्रीति, चिंतो चिमणाजी या नांवाचा एक ब्राह्मण शिरजोर होऊन त्यानें शहरभर चालविलेल्या लुटफाटीमुळें व उडविलेल्या कहरामुळें विजापूरच्या प्रजेची " ना धनी ना त्राता " अशी स्थिति होऊन उत्पन्न झालेली अशांतता व उडालेली धांदल आणि त्याचाही प्रतिकार न करितां येण्याइतकी दुर्बल व विपन्न झालेली राजसत्ता—ह्या सर्व गोष्टींमुळें शिवाजी व त्याच्याहूनही पुष्कळच अधिक प्रमाणानें अवरंगझेब या उभयतांना आपआपला फायदा करून घेण्यास अत्यंत अमोल्य सुसंधी प्राप्त झाली; शिवाजीनें पन्हाळा किल्ला पुन्हां परत घेतला; आणि अवरंगझेबानें दक्षिणेंत नेमिलेला सुभेदार बहादूरखान याच्याशीं आदिलशाही राज्याचा सूत्रचालक खवासखान यानें सख्य करून उभयतांमधील विग्रहाला एक तऱ्हेचें ठिगळ दिलें होतें, तरी त्याच्यानंतर अवरंगझेबानें पाठविलेला आपला सरदार दिलेरखान याच्याशीं आदिलशाही सैन्यास युद्धप्रसंग करावे लागले; तथापि अशा स्थितींतही आदिलशाही सैन्यानें—दिलावरखानानें आपली होती नव्हती तेवढी शिकस्त केली तरी—त्याचे विजापूर हस्तगत करून घेण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ करून टाकिले; तेव्हां अवरंगझेब हा स्वतः दक्षिणेंत आला. ( इ० सन १६८३ ) व विजापूर शहरास वेढा देऊन तें शहर हस्तगत करून घेण्याच्या उद्योगास लागला; त्यावेळीं अवरंगझेबापुढें आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून अज्ञान सोळा वर्षांचा राज्यकर्ता दुर्दैवी शिकंदर हा ता० १५ आक्टोबर इ० सन १६८६ रोजीं—ता० ४ माहे जिल्काद सन हिजरी १०९७ रोजीं दिवसा दहा घटकेच्यावेळीं—अवरंगझेबाच्या तळावर जाऊन आपल्या सर्वस्वासुद्धां त्याच्या स्वाधीन झाला; तेव्हां अवरंगझेबानें त्यास सालीना एक लाखाची नेमणूक करून देऊन अवरंगाबाद येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें व विजापूरचें राज्य खालसा करून आपल्या मोंगलीसाम्राज्यांत सामील करून टाकिलें.

अशारीतीनें विजापूर येथील प्रसिद्ध आदिलशाही राज्याचा तें राज्य स्थापन झाल्यापासून १९७ वर्षांनीं शेवट झाला. " विजापूरवर्णन " या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें " आदिलशाही ज्यावेळीं ऐन भरभराटींत होती त्यावेळीं एखादे सणावाराचे दिवशीं बादशहाची स्वारी शहरांत निघाली असतां सर्व शहर कसें इंद्रभुवनाप्रमाणें शृंगारिलेलें

दिसे. जागजागीं गुढ्या उभारिलेल्या व तोरणें बांधिलेलीं असत. शहरांतील सर्व मार्गांवर चंदनाचे व कुंकुमाचे सडे घालीत व त्यांवर चित्रविचित्र रांगोळ्या काढिलेल्या असत. शहरभर चिराकदान करीत व नगरवासी स्त्रिया उत्तम वस्त्रालंकार लेवून पंचारती घेऊन आपापल्या वाड्याच्या दुमजल्या तिमजल्यावर उभ्या असत व स्वारीचा थाट व शोभा डोळे भरून पाहण्याकरितां मार्गांवर सर्व आबालवृद्ध प्रजा लोटली असे. बादशाहाची स्वारी ज्या ज्या मार्गावरून जाई त्या त्या मार्गावर नागरीक लोक जयजयकारप्रदर्शक सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत त्यानेंच सर्व रस्ता भरून जात असे. नंतर बादशाहाची स्वारी आर किल्ल्यांत परत शिरतांच सलामीच्या तोफांच्या आवाजानें सर्व शहर दणाणून जाई; परंतु हल्लीं त्याच आदिलशाही राजधानींत सर्व शहरभर मोंगल सैन्य पसरलेलें असून तिचा स्वामी जो बादशाहा शिकंदर आदिलशाहा तो कोठेंच दृष्टीस पडेना; यामुळें ज्या राजधानींत पूर्वी मोठ्या आनंदानें उत्सव व्हावयाचा तेथें सर्वत्र आक्रोश व हाहाःकार यांनीं ग्रस्त करून सोडिलें होतें. ज्या रस्त्यावर पूर्वी चंदनाचे कुंकुमाचे सडे घालीत असत तेथें रक्ताचा सडा पडला होता; व जागोजाग योद्ध्यांचीं छिन्नविछिन्न झालेलीं शिरें पडलेलीं असून त्यांवरून अवरंगझेबाचा असंख्य सैन्यभार पर्वा न करितां तुडवीत चालला होता. अवरंगझेबाचे लोकांनीं क्रोधानें शहरांतील मोठमोठे वाडे जमिनदोस्त करून टाकिले व मनमानेल तीं अनन्वित कृत्यें केलीं.

" यानंतर अवरंझेब एक वर्षपर्यंत शहराबाहेर खुशाल आनंदमग्न राहून आदिलशाही घराण्याचा खजिना व असंख्य मौल्यवान् उंची जवाहीर यांचीं उंटेच्या उंटें भरून घेऊन दिल्लीस चालता झाला. हें असें करण्याचें त्याच्या मनांत नव्हतें, पण ह्यावेळीं ( इ० सन १६८९ सालीं ) पटकीचा आजार सुरू होऊन एक लक्ष लोक मृत्यूच्या तोंडीं पडले. ह्या भीतीनें त्यानें शहर सोडिलें. "

" इकडे शिकंदर हा अवरंगझेबाच्या स्वाधीन झाल्यापासून त्यानें त्यास औरंगाबाद येथें कैदेंत ठेविलें होतें व तेथें तो पुढें चौदा वर्षें कैदेंत होता. नंतर इ० सन १७०० ह्यावर्षी ( इ० सन १७०१ ह्यावर्षी असाही उल्लेख आढळतो ) अवरंगझेबानें खरबुजांतून त्यास वीष पाठविलें; व " तुझी काय इच्छा आहे " ह्मणून त्यास विचारिलें, तेव्हां ह्यांतील हेतू त्याच्या डोळ्यापुढें उभा राहून त्यानें " माझें शव विजापूर येथें पाले बाजारांत माझा गुरू शहानदी मुल्ला याची कबर आहे त्याच्या पायापाशीं गाडावें " असें सांगून तें खरबूज खाऊन प्राण सोडला ! ! " त्यानंतर त्याच्या इच्छेप्रमाणें पालेबाजारांत त्याच्या गुरूच्या पायापाशीं त्याच्या शवाचें दफन करण्यांत आलें.

हाय हाय ! ज्या पराक्रमी पुरुषानें आदिलशाहीचें तक्त स्थापिलें त्याच्या तक्ताचा व विशेषतः वंशवृक्षाचा अशाप्रकारें शेवट व्हावा काय ? ज्या शिकंदरास मी

राज्याचें गाडें हांकीन, आपल्या पूर्वजांप्रमाणें तक्ताचा उपभोग घेईन, आपलें आयुष्य मोठ्या चैनींत घालवीन, असें करीन तसें करीन वगैरे आशा होती त्याच हतभाग्यास भर अठरावीचे सुमारास कारागृहवास भोगावा लागला! व शेवटीं दुसऱ्याच्या आज्ञेनें स्वहस्तें वीष खाऊन मरावें लागलें!!

"असो. अशाप्रकारें शिकंदर हा अवरंझेबाचे स्वाधीन झाल्या दिवसापासून आदिलशाहीचा सूर्य मावळला तो मावळलाच! व विजापूर या नांवाचा एवढा दरारा, एवढी थोरवी, एवढा लौकिक होता तेंच विजापूर तेव्हांपासून हा काळपर्यंत सांदीस पडून भयाण व उदास बनून राहिलें आहे!!"

हिंदुस्थानांतील इतर अनेक मुसलमान राज्यकर्त्यांप्रमाणेंच आदिलशाही सुलतानांनींही अनेक प्रेक्षणीय इमारती, मशीदी, महाल, घुमट वगैरे बांधकामें केलेलीं आहेत; आणि त्यांतील कांहीं तर अपूर्व अशींच आहेत. त्यांपैकीं "विजापूर येथील बोलघुमज" एवढा घुमज सर्व जगांत दुसरा क्वचित्च आढळेल. मि० जेम्स डगलस यानें आपल्या Book of Bombay या पुस्तकांत याविषयीं असें लिहिलें आहे कीं, "ह्या घुमजाचा व्यास १३० फूट आहे; त्यामुळें तो रोम येथील "पँथियन" आणि लंडन येथील "सेंटपाल" ह्या इमारतींच्या घुमजापेक्षां मोठा आणि "सेंटपिटर्स" पेक्षां अगदीं किंचित् कमी आहे." विजापूर येथील प्रसिद्ध बादशहा सुलतान महंमद (इ० सन १५२६ ते इ० सन १५५६) यानें आपल्या कारकीर्दीमध्यें विजापूर येथें हा अपूर्व मकबरा बांधिला. ह्या इमारतीची हमचौरस प्रत्येक बाहेरील चौथऱ्याची लांबी १९८ फूट व रुंदी तळमजला सोडुन कळसापर्यंत २२३ फूट आहे. चोहोंबाजूस चार अष्टपैलू मनोरे व मनोऱ्यांच्या सहाव्या मजल्यास लागून इमारतीच्या सभोंवती गच्ची, असा ह्या इमारतीचा बाह्य देखावा आहे. ह्या इमारतीच्या आंत जाण्यास तीन दरवाजे असून हल्लीं दक्षिणेच्या बाजूचा दरवाजा खुला आहे. त्यांतून आंत गेल्यावर घुमजाची १३५ फूट हमचौरस खोली आहे; व तिच्या मध्यभागीं ७६ हमचौरस फूटांचा एक चौथरा असून त्याच्याच मध्यभागीं सुलतान महंमद याची मोठी प्रेक्षणीय कबर आहे; व त्यांवर हमचौरस १४ फुटांचें लांकडी सुंदर मखर आहे. इमारतीस चोहोंबाजूस असलेल्या चारी अष्टपैलू मनोऱ्यांना आठ मजले आहेत व कबरीच्या खोलीच्या चारी कोंपऱ्याचे भिंतींतून वर जाण्यास चार मार्ग असून त्यांपैकीं नैऋत्येकडील मार्ग हल्लीं खुला आहे. ह्याच्या दरवाजाची उंची सहा फूट असून रुंदी पावणेतीन फूट आहे; व रस्ता सव्वा दोन फूट रुंदीचा असून तो भिंतींत दोन चौरसफूटांच्या दगडी खांबांस वळसा घालून वर वर निमुळता होत गेला आहे; व त्याची शेवटच्या मजल्यापर्यंत एकंदर उंची १८० फूट आहे; या

रस्त्यास दर तीन पायऱ्या नंतर वळण असून प्रत्येक वळणाच्या ठिकाणीं भिंतींत छिद्रें पाडून उजेड केला आहे. चोवीस चोवीस पायऱ्या चढल्यावर कोपऱ्यांतील मनोऱ्याच्या मजल्यावर एक बाजूस जाण्यास मार्ग लागतो. त्या एकेका मार्गानें एकेका मजल्यावर जातां येतें; ह्या प्रत्येक मजल्याचा व्यास बत्तीस फुटांचा असून त्याची उंची सोळा फूट आहे. ह्याच मार्गानें पुन्हां परत येऊन मुख्य रस्त्यास मिळावें लागतें व याचप्रमाणें आठी मजल्यांवर जावें लागतें. ह्या प्रत्येक मनोऱ्यावर एक एक घुमज असून सहाव्या मजल्यावर गेलें असतां मुख्य इमारतीच्या सभोंवतीं असलेली गच्ची लागते. तिच्या प्रत्येक बाजूची लांबी १४० फूट असून रुंदी २ फूट १० इंच व उंची ८ फूट ८ इंच आहे; व या गच्चीवर भरपूर हवा व उजेड रहावा ह्मणून तिला साडेतीन फूट रुंदीच्या अशा एकूणसि कमानी केलेल्या आहेत, यावरून सुलतान महंमदाची कबर पाहण्याकरितां छिद्र ठेविलेलें आहे व गच्चीवरून वरील घुमटाच्या पायथ्यापाशीं जाण्याकरितां प्रत्येक बाजूस दोन दोन मार्ग केलेले आहेत; त्याप्रमाणेंच मनोऱ्याच्या सातव्या मजल्यावरील गच्चीवर आणखी एक अडीच फूट रुंदीची पोटगच्ची केलेली आहे; परंतु तींत अशी खुबी आहे कीं, ही गच्ची भिंतींत असल्यामुळें बाहेरून पाहणारास तेथें अशी पोटगच्ची असावी अशी कल्पनासुद्धां होत नाहीं. तिलाही हवा व उजेड याकरितां अजमासें तीन तीन फुटांचीं छिद्रें ठेविलेलीं आहेत; पण ही इमारतच इतकी उंच आहे कीं, खालून पाहणारास हीं छिद्रें अतीशयच लहान दिसतात.

ह्या जगड्व्याळ घुमटाची जाडी बारा फूट असून आंत गेल्यावर एक अकरा फुटाची गच्ची लागते; पण याहि ठिकाणीं अशी मौज आहे कीं, सुलतान महंमदाच्या कबरेजवळ उभें राहिलें असतां ही गच्ची मुळींच दिसत नाहीं; याठिकाणीं जाण्यास आठ मार्ग असून त्यांची रुंदी अडीच व उंची सहा फूट आहे. दुरून हे रस्ते एखाद्या लहान छिद्राप्रमाणें दिसतात. ह्या गच्चीवरून खालीं कबरेकडे पाहिलें असतां डोळे फिरून जातात. या गच्चीवर बिनआधारी साठ फुटांचा अत्यंत भव्य घुमज ( अथवा घुमट ) असून त्याचा व्यास १२५ फूट व गच्चीचा घेर सुमारें ४०० फुटांचा आहे. ह्याठिकाणीं एक शब्द उच्चारिल्याबरोबर त्याचा प्रतिध्वनी निदान दहावेळां निघतो; परंतु तो गायनयुक्त असून हळू हळू नाहींसा होतो. त्यामुळें मनुष्यास पहिल्यानें भीति उत्पन्न होते. याच ठिकाणीं दुसरा आणखी एक असा विलक्षण व आश्चर्यचकित करून टाकणारा चमत्कार आहे कीं, दोन जणांनीं भिंतीच्या दोन टोंकास समोरासमोर बसून त्यांपैकीं एकानें भिंतीस तोंड लावून अगदीं हळू बोलावें व दुसऱ्यानें भिंतीस कान लावून तें ऐकावें, ह्मणजे जरी या दोन टोकांत १३० फुटांचें अंतर आहे तरी सुद्धां तो मनुष्य जसा कांहीं प्रत्यक्ष

आपल्याशींच बोलत आहे इतकें स्पष्ट व निकट ऐकूं येतें; व इतक्या लांबीच्या अंतरावर बसून आपणाशीं बोलणाऱ्या मनुष्याकडे पाहिल्यास, दूरत्वातिशयामुळें त्याची दिसणारी चिमुकली व विलक्षण मूर्ति भीति उत्पन्न करिते. ही पोटगच्ची जमीनीपासून १२० फूट उंच असून हें विशाळ काम पाहून मनोवृत्ति दंग होऊन जाते. या गच्चीस १८० पायऱ्या आहेत; आणि कसाही सशक्त मनुष्य असला तरी त्याला सुद्धां विश्रांती घेतल्याशिवाय थेट गच्चीपर्यंत पायऱ्या चढून जाणें अशक्य नसलें तरी अवघड आहे; असा हा अलौकिक घुमंज असून या इमारतीच्या दक्षिणेस एका लोखंडी सांखळीस एक दगड अडकावून ठेविला आहे, त्यास " विजेचा दगड " असें ह्मणतात.

या बोलघुमजासंबंधीं एका फारशी बखरीमध्यें खालीलप्रमाणें वर्णन आहे, तें:—

" सुलतान महंमद् पादशाहा यांनीं जिवंतपणीं घुमच ह्मणजे घुमट बांधविला त्या प्रकरणीं वर्णनः—

तो घुमट अशाप्रकारचा आहे कीं, आकाशाप्रमाणें उंच व कालचक्राचे पदवीचा ह्मणजे अति उंच बांधणावळीचा आहे. त्या घुमटाची इमारत व डौल फार नादर ह्मणजे अति उत्तम आहे. कारण कीं, दक्षिणदेशाचे तुकडींत हिंदुस्तानचे मुलकांत देखील अशी उत्तम इमारत दुसरी नाहीं. बहुधा पृथ्वींत फिरणारे प्रवासी व जगांत फिरणारे लोक पृथ्वींतील चहुंकडील मुलकांतून येतात व जेव्हां तो घुमट पाहतात तेव्हां त्या घुमटाचें उत्तम प्रकारचें डौलदार व चमत्कारिक बांधकाम पाहून अति संतोष मानितात व फार आश्चर्यचकित होऊन, ह्या पृथ्वींत असा घुमट बांधिलेला नाहीं असें बोलतात. ह्या घुमटाची उंची व थोरवी, कारागिरी व डौल अशाप्रकारचा आहे कीं, पाहणारास फार कौतुक वाटतें. प्रत्येक मनुष्य, लहान असो कीं वृद्ध असो, त्यास या घुमटांत आल्यानंतर शद्ब करण्याची प्रेरणा होते. त्या शद्बांचा प्रतिध्वनि ह्या घुमटांतून हुबेहुब ऐकूं येतो, त्यामुळें सर्वांस फार नवल वाटतें. कोणत्याही पर्वतासन्निध, खोल विहिरीमध्यें किंवा तलावांत मोठ्यानें आवाज केला तर त्याचा प्रतिध्वनि उमटतो; परंतु ह्या घुमटांत मनुष्याचा आवाज ज्याप्रमाणें हुबेहुब ऐकूं येतो, त्याप्रमाणें दुसऱ्या ठिकाणीं प्रतिध्वनि होऊं शकत नाहीं, हा येथें फार चमत्कार आहे. ह्या घुमटाचे दरवाजावर एक धोंडा लोखंडाचे सांखळींत बांधून लोंबविला आहे. त्या धोंड्यास विजेचा धोंडा ह्मणतात. तो धोंडा सर्वप्रसिद्ध आहे. त्या धोंड्याचा गुण हा आहे कीं, विजेच्या उपद्रवापासून तो इमारतीचें संरक्षण करितो. " सारांश " बोलघुमज " हें फक्त हिंदुस्थानांतीलच नव्हे तर जगांतीलही एक आश्चर्यकारक असें इमारती काम आहे, असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

विजापूरमधील दुसरें आश्चर्यकारक कारागिरीचें काम ह्मणजे मुल्क-ई-मैदान-रणभूमीची राणी-ही प्रसिद्ध व प्रचंड तोफ होय. ही " महांकाळी " या नांवानेंही प्रसिद्ध आहे. ही नामांकित तोफ चलीबी रुमीखान या नांवाच्या एका चतुर कारागिरानें बुऱ्हाण निजामशहाच्या हुकुमावरून अहंमदनगरपासून एक कोसावर इ० सन १५४९ मध्यें ओतविली; पुढें विजयानगरकर रामरायाबरोबरील तालीकोटजवळील युद्धावर जातांना हुसेन निजामशहानें ती आपणाबरोबर घेतली होती; व पुढें ती-निझामच्या राज्यांतील नळदुर्ग जिल्ह्यांतील सोलापूर जिल्ह्यांतील बार्शीरोड या रेल्वेस्टेशनापासून अजमासें बारा मैल असलेल्या—परिंडा या नांवाच्या किल्ल्यांत ठेविली होती. ही व अशीच दुसरी एक " कडक बिजली " या नांवाची, अशा दोन तोफा महंमद आदिलशहाच्या हुकुमाप्रमाणें परिंड्याहून मुरारराव हा विजापूर येथें आणीत असतां " कडक बिजली " कृष्णानदींत बुडाली व " मुल्क-ई-मैदान " सुरक्षितपणें विजापूर येथें येऊन पोहोंचली. ती कित्येक वर्षें शहराच्या पश्चिम तटाच्या " खरजे " या नांवाच्या बुरुजावर ठेविली होती. याठिकाणीं ती ठेवितांना अशी खुबीदार रचना केली होती कीं, तिला सहज वर्तुळाकार फिरवितां येत असे; पुढें सुलतान शिकंदर शहाचे कारकीर्दीत अवरंगझेबानें आदिलशाही राज्याचें वाटोळें केल्यावर ती तोफ खालच्या बुरुजावर आणून खालीं दोन्हीं बाजूस भरभक्कम व अगडबंब तुळ्वटा घालून त्यावर ठेविली; त्यावेळेपासून तिला फिरवितां येत नसून ती तेथेंच स्थाईक झाली आहे.

ही तोफ विशाळ—महाविशाळ आहे. ती अष्टधातूंची ओतलेली असून तिचें वजन कित्येकांच्या मतें ६० व कित्येकांच्या ४० खंडी आहे. तिची लांबी १४ फूट असून परिघही बरोबर तितकाच आहे; आणि तोंडाच्या पोकळीचा व्यास बरोबर दोन फूट चार इंच असून जाडी एक फूट आहे, त्याप्रमाणेंच तिला दोन बाजूंनीं दोन भल्या भक्कम कड्या असून त्या सव्वातीन इंच जाडीच्या व एक फूट व्यासाच्या पोकळीच्या आहेत. हिच्या तोंडाचा आकार सिंहाच्या जबड्याचा आहे व त्यानें तोंडांत हत्ती धरिला आहे असें दाखविलें आहे. अवरंगझेबानें विजापूर घेतलें त्यावेळीं या सिंहाकृतीच्या डोक्यावर आपल्या जयप्राप्तीबद्दलचा खालीलप्रमाणें लेख कोरून ठेविला आहे, तो:—

शाहे आलमगीर गाजी बादशाहे दीपनाह
फत्तह बिजापुर कर्दव हेरे तारिखें जफ़र
आके दादो अदलदाद मुल्कशहां गिरफ्त
रून मुद एक बाल गुफ्ता मुल्कमैदान गिरफ्त्

अर्थ:-- जो आलमगीर ( अवरंगझेब ) बादशाहा बहादूर, धर्मसंरक्षक, त्यानें सन तारीख

हिजरी १०९७ मध्यें विजापूर फत्ते केलें; व इनसाफीनें बादशहाचा मुलूख घेऊन आपल्या दैवानें प्रसिद्ध मुल्कमैदान ( रणभूमींतलि सिंहीण ) तोफ काबीज केली. ”

या तोफेचें अक्राळविक्राळ स्वरूप पाहून प्रेक्षकाची छातीच दडपून जाते. ही तोफ, तिच्यावर लोकांनीं वरचेवर हात फिरविल्यामुळें इतकीच चकचकीत झाली आहे कीं, तिच्यांत पाहाणाराचा चेहरा स्पष्ट दिसतो. कित्येक भाविक लोक अजून तिची पूजा-अर्चा व नवस नैवेद्य करितात. इंग्लंडचा राजा चौथा विल्यम यानें ही तोफ लंडन येथें पाठवावी म्हणून मुंबईसरकार मार्फत इ० सन १८२३ मध्यें हुषार इंजिनियर पाठविले होते; व त्यांनीं ती बुरुजावरून खालीं उतरविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला होता; परंतु त्यांचा सर्व प्रयत्न व्यर्थ झाला; व ती आजतागायत विजापूर येथें, अवरंगझेबानें तिला स्थानापन्न केलें त्याठिकाणींच स्थाईक होऊन राहिली आहे. या बाबतींत मि० जेम्स डगलस यानें आपल्या Book of Bombay या पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, “ लढाईच्या कामास मुल्कमैदान ही जंगी तोफ ही एक देणगीच आहे; आणि एडिंबरो येथील किल्ल्यावर “ मॉन्स मेग ” म्हणून जी एक नामांकित तोफ आहे ती तर या मुल्कमैदान तोफेच्या पासंगास देखील पुरवणार नाहीं. ” यावरून ही प्रचंड तोफ हें हिंदुस्थानांतीलच नव्हे तर जगांतीलही एक आश्चर्य आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

याशिवाय, आर किल्ल्यांतील अनेक इमारती, जुम्मामशीद मेहेतर महाल, आसार महाल, ताजबावडी, चंदाबावडी, उंची व व्यास हीं दोन्हीं सारख्या व चमत्कारदर्शक प्रमाणांत असलेला हैदरबुरुज आणि त्याच्यावरील दोन विशाल तोफा-यांपैकीं दक्षिणेच्या बाजूची तोफ ३० फूट लांब असून तिचा परीघ ७ फूट व तोंडाच्या पोकळीचा व्यास १४ इंच आहे; व दुसरी उत्तरेच्या बाजूची तोफ वीस फूट लांब असून तिचा परीघ ४ फूट व तोंडाच्या पोकळीचा व्यास १० इंचांचा आहे; व या दोन्ही तोफा तोडेदार घाटाच्या आहेत. शहरासभोंवतालचा तट, शहराच्या कोटाबाहेरील इब्राहीमरोझा, मोती घुमज, अमीन साहेबांचा दरगा, ऐनू-उल्-मुल्काचा घुमज, जहां बेगम घुमज, मशीद व महाल तोरवें ऊर्फ नवरोजपूर वगैरे अनेक स्थळांची पुष्कळ माहिती देतां येण्यासारखी आहे; परंतु स्थळाभावामुळें “ जुम्मामशीद ” या एकाच अद्वितीय इमारतीची थोडक्यांत पुढें माहिती देऊन इतरांचा फक्त उल्लेखच याठिकाणीं केला आहे.

तथापि वरील विवेचनावरून आदिलशाही राज्य किती वैभवसंपन्न होतें, याची कोणासही सहज कल्पना करितां येईल. मोडक कृत विजापूरच्या आदिलशाही राज्याच्या इतिहासांत त्या राज्याचें व तेथील राज्यकर्त्यांचें थोडक्यांत समालोचन केलेलें असून त्यावरून या राज्याचा उदय, उत्कर्ष व उच्छेद या तीन्हींही बाबतींचें चित्र डोळ्यांपुढें

उभें राहतें; व उच्छेद हा केव्हांही दुःखजन्य असल्यामुळें, त्याची हकीकत लिहितांना अथवा वाचतांना मन केव्हांही कष्टीच असतें; तें समालोचन येणेंप्रमाणें:-" यूसुफ़्बेगनें कुस्तंतुनियाच्या ( कान्स्टांटिनोपल येथील ) राजवंशांत जन्म घेऊन, गुलाम मंडळींत जागा मिळवून, आपल्या प्रारब्धाचे कित्येक दिवस इराणांत कंठिले; व कालांतरानें हिंदुस्थानांतील दाभोळसारख्या बंदरीं येऊन, बेदरच्या बहामनी राजाकडे चोपदारी पत्करली. पुढें आपल्या बाहुबलानें हजारों जेठींस ( मल्लांना ) जिंकून ब्रीद बांधून आलेल्या पहिलवानास चीत करून त्यानें पांच गांवांची सनद मिळविली. नंतर सरदारी संपादन करून आपल्या राज्यकारस्थानपटुत्वानें बहामनी राज्यांतील बेबंदशाही मोडून विजापूरसारख्या शहरीं आदिलशाही राज्याची स्थापना केली व आपल्या वंशजास राज्यप्राप्ति करून दिली. कित्येक बाजार व व्यापारासाठीं पेठा वसवून आणि अनेक अजस्र तट बांधून शहरास शोभा आणिली. तेवीस वर्षें सुखानें राज्य केलें. बेदर, अहंमदनगर, सोलापूर, परिंडा, मिरज इत्यादि किल्ल्यांचीं विशाल व मजबूत कामें ह्या कारकीर्दींत होऊन आदिलशाहीचा कीर्तिसूर्य उगवला. त्याच्या मागून इस्मईलच्या कारकीर्दींत तर तो कीर्तिसूर्य बराच वर आला. सव्वीस वर्षें राज्य करून, नानाप्रकारचे विलास भोगून व बंडें मोडून शांतता करीत असतां, त्यानें समरभूमीस देह समर्पण केला. त्यानें चंपामहाल व मुदुगल हे किल्ले बांधिले. त्याच्या मागून थोडे दिवस मल्लूनें राज्य केल्यानंतर इब्राहिम गादीवर येतांच, गोव्यापासून मिरजेपर्यंत गांवेंच्या गांवें जाळूनपोळून उजाड करणाऱ्या पोर्तुगीज लोकांचा त्यानें चांगला बंदोबस्त केला. अर्क किल्ल्यास ( अर्क ह्मणजे सूर्य; विजापूरच्या किल्ल्यास अर्क किल्ला हें नांव असून " आर किल्ला " हा त्याचा अपभ्रंश झालेला आहे. ) उत्तम दगडी कोट बांधून, इब्राहिमपूर शहर वसविलें. ह्याचेवेळीं निंबाळकर, घाडगे, घोरपडे, डफळे, माने, सावंत इत्यादि अनेक सरदार उदयास आले. ह्यानें पंधरा वर्षें राज्योपभोग घेतल्यानंतर अलीशहा तख्तनशीन झाला. विजयानगरचें प्राचीन, संपन्न व बलाढ्य राज्य नाहींसें करून, रामरायासारख्यास त्यानें बंदिवान केलें; सत्कर्मांत अपार संपत्तीचा विनियोग केला. गगनमहाल, जुम्मामशीद, शहाबुरूज, महाबुरूज ह्यासारखीं सुंदर कामें उठविलीं. ह्यानें एकवीस वर्षें राज्योपभोग घेतला. पुढें विलासी व गाण्याचा शोकी, परंतु शूर व शहाणा इब्राहिमशहा तख्तावर येऊन त्यानें ईश्वरकृपेनें " जगद्गुरू " हें नांव मिळविलें व ४७ वर्षांच्या मोठ्या कारकीर्दींत नवरसपूर, नवरस--महाल, सात मजली माडी, आनंद--महाल, आरसे--महाल, अशीं सुंदर व रम्य स्थळें बांधून, त्यावर जणूं काय आपल्या, माध्यान्ह कुलकीर्तिसूर्यास विसावा दिला. त्याचा अनुगामी सुलतान महंमद ह्यानें मुल्क-ई-मैदानसारख्या भयंकर तोफांचीं तोंडें शत्रु वक्षःस्थल विदारण्यास

तयार ठेवून मोंगलासारख्यांच्या प्रचंड प्रतापास दाद दिली नाहीं. बाले घुमटासारख्या उत्तम इमारती तयार करविल्या. ह्याच्यापुढें नवरत्नखचित शिरपेंच लटकलेले हजारों मानकरी सरदार, अमीरउमराव आणि बडे लोक लीनतेनें उभे असत. रत्नभूषणांनीं शृंगारिलेले शेंकडों हत्ती सज्ज असत. हा नुसता शहरांत फिरावयास गेला, तरी त्याजवर लोक सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत. ह्याच्या बरोबरच्या जिलिबीच्या हजारों घोड्यांच्या जिनांस हिरे, मोत्यें, पाच, माणकें वगैरे लटकलेलीं असत. वारंवार द्रव्याची तुळा करून तें तो गोरगरीब व फकीर ह्यांस वांटी. अशा थाटमाटांत व विलासांत शत्रूंचा फडशा पाडून, त्यानें आपली कारकीर्द लोटल्यावर अलीस राज्यपदप्राप्ती झाली. अलीच्या कारकीर्दींत अवघ्या विजापूर प्रांतांत सोन्याचा धूर निघत होता. ह्याच्या हाताखालीं कित्येक शूर, धीर, उदार, शहाणे, मुत्सद्दी आणि राजकारणचतुर पुरुष विराजमान झाले. शिवाजीस दाद न देतां त्यानें मोंगलांस घाबरें केलें; कर्नाटक व चंदीसारखीं अफाट राज्यें खालसा करून घेतलीं. तरी ह्याच्याच १९ वर्षांच्या कारकीर्दींत आदिलशाहीचा कीर्तिसूर्य अस्ताचलाप्रत जाऊं लागला. त्याचाच अनुगामी शिकंदर आदिलशाहा ह्यास अवघीं दहा वर्षें बाळपणांत राज्योपभोग घेऊन, एवढें अफाट, श्रीमान्, बलाढ्य, मजबूद व शोभिवंत राज्य औरंगझेब बादशाहाच्या हवालीं करून पदरीं असलेलें द्रव्य व जडजवाहीर खंदकांत ओतीत व दानधर्म करीत औरंगझेबाच्या तंबूंत जावें लागलें, आणि दांती तृण धरून कीर्तिसूर्यास अस्ताचलीं पोहोंचविण्याचा प्रसंग यावा ही केवढी दुःखाची गोष्ट ! ! ! तस्मात् " भवितव्यता बलीयसी " हेंच म्हणणें खरें. मानवीप्राण्यानें ऐश्वर्यमदानें धुंद होऊन जाऊं नये; व सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या अप्रतिहत इच्छेवर भरंवसा ठेवून, इहपरहित संपादण्यांत स्वशक्तीचा व्यय करावा, हें सत्यत्व त्या वैभवोत्तुंग शिखरास पोंचून प्रस्तुत जीर्णावस्थेस आलेल्या आदिलशाही राजधानीचें प्रत्यक्ष दर्शन घेणारांच्या व तिचा इतिहास वाचणारांच्या मनांत ठसल्यावांचून रहावयाचें नाहीं. "

अशाच प्रकारचें सत्यत्व पटवून, मानवीप्राण्यास " तूं नेहमीं सन्मार्गगामी रहा. " असा त्याच्या मनावर उपदेश ठसविणारी, विजापूर येथील प्रेक्षणीय व प्रसिद्ध स्थळांपैकींची " जुम्मामशीद " ही एक इमारत आहे. हीं इमारत अतीशय भव्य असून तिच्या सभामंडपाचें विस्तीर्ण पटांगण २४४ फूट लांब व १३८ फूट रुंद आहे. मुख्य इमारत या पटांगणापेक्षां थोड्याशा जास्त उंचीच्या चौथऱ्यावर आहे; व तिला २१ फूट रुंदीच्या अशा एकंदर ९ दर्शनी कमानी आहेत. ह्या कमानींच्या आंत सभामंडपाचें विस्तीर्ण पटांगण असून त्यावरील कमानी मोठ्या आश्चर्यकारक अशा तंतोतंत प्रमाणानें बांधिलेल्या आहेत; त्या अशा कीं, त्यांतील पहिली आडवी ओळ बरोबर २१ फुटांवर

असून त्याच्या पलीकडे नक्की तितक्याच अंतरावर दुसरी; अशा आडव्या नऊ ओळी आहेत; व तशाच तंतोतंत उभ्याही नऊ ओळी आहेत; आणि ह्या सर्व आडव्या ओळींतील प्रत्येक दोन ओळींच्या प्रत्येक दोन कमानीस, बरोबर २१ फूट रुंदीच्याच उजव्या बाजूनें एक व डाव्या बाजूनें एक अशा दोन कमानींनीं मधोमध जोडलेलें आहे. त्यामुळें उभ्या ओळींपैकीं उजव्या बाजूची एक व डाव्या बाजूची एक अशा दोन कमानी, आणि आडव्या ओळींपैकीं पूर्वेची एक व पश्चिमेची एक अशा दोन कमानी, यांच्यामध्यें तंतोतंत एकवीस एकवीस फुटांच्या अशा ठिकठिकाणीं सारख्या चौरस जागा पडतात; ह्मणजे २१ फूट रुंदीच्या ९ कमानींवर तंतोतंत प्रमाण बसवून हें प्रचंड काम केलेलें आहे. त्याप्रमाणेंच सभामंडपाचें विस्तीर्ण पटांगणही तशाच प्रमाणशीर पद्धतीनें बांधिलेलें आहे व ही मशीद ह्मणजे प्रार्थनेची जागा असल्यामुळें—ही मशीद इ०सन १५७५ यावर्षी अली आदिलशहा यानें मीरमहंमद् तगेहुसेनी या नांवाच्या एका हुषार व निष्णात कारागिराकडून बांधविली असून ती " जुम्मांबाजार या नांवाच्या पेठेंत आहे.—त्याठिकाणीं बसण्याची बरोबर शिस्त रहावी ह्मणून ३ फूट १० इंच लांब व २ फूट ८ इंच रुंद, अशी तंतोतंत सारख्या अंतराची व सारख्याच लांबीरुंदीचीं २४३० आसनें-ह्मणजे मनुष्यांना बसण्याचीं स्थानें-पाडिलेलीं २४३० आहेत; आणि प्रत्येक आसनास सारख्या प्रमाणांत त्याच्या सिमेच्या रेषा रेखून तीं सारखीं मर्यादित केलेलीं आहेत. ही आसनाची जागा चुनेगची असून हें सर्व काम अजून नव्यासारखें दिसतें. सभामंडपाच्या भव्य पटांगणाप्रमाणेंच या इमारतीस तीन बाजूंनीं गच्च्या काढिलेल्या आहेत, त्याही विशेष भव्य आहेत; आणि दक्षिणेकडील व उत्तरेकडील प्रत्येक बाजूच्या गच्चीची लांबी ३४० फूट असून तिला २३ कमानी आहेत; व पश्चिमेकडील गच्चीची लांबी २५४ फूट असून तिला १७ कमानी आहेत. सभामंडपाच्या कमानी—कमानीमधून पुढें बरेंच लांब गेल्यावर ह्या मशीदीची पश्चिमभागाची भिंत आहे;-मक्का हें शहर हिंदुस्थानच्या पश्चिमेस व उलटपक्षीं तुर्कस्थान वगैरे देशांच्या पूर्वेस, असल्यानें त्या दिशांचा बोध होण्याकरितां तशी योजना केली आहे व तिच्या मध्यावर एक विशाळ कमान असून, ती मलिन होऊं नये ह्मणून नेहमीं पडद्यानें झांकून ठेविलेली असते. हा पडदा एकीकडे करून ही कमान पाहिल्यावर डोळे दिपून जातात. तिच्यांत अनेक महिरपांतून सोनेरी अक्षरांनीं कुराणांतील वाक्यें मोठ्या कौशल्यानें लिहिलेलीं असून या सर्व कमानीभर सोनेरी कामाची अगदीं रेलचेल करून सोडिली आहे; हें काम सुलतान महंमदाच्या कारकीर्दींत इ० सन १६३५ यावर्षी झालेलें आहे. कमानींतील महिरपांतून लिहिलेलीं वाक्यें फारशी व अरबीभाषेंत असून तीं सुबोध वचनें आहेत; उदाहरणार्थः—

१ बरकसरे उम्रलकया मगर उस्त् बारनीस्त्

अर्थः—आयुष्य ( अथवा वय ) हीच कोणीएक इमारत आहे; पण तीवर भरंवसा ठेवणें रास्त नाहीं.

२ दार दारे बेकरार कसेरा करार निस्त्

अर्थः—दुनिया ही स्थीर नाहीं; आणि तींतील प्राणीहीं स्थीर नाहींत.

३ खुश मंजिलस्त दुनिया रौनकू बचश्मम

अर्थः—दुनियेमध्यें सफर करणें फार चांगलें आहे; व तींतील वास्तव्यचिजा फार चांगल्या दिसतात.

४ खुश् दौलत अस्त उम्रवले पायदार निस्त्

अर्थः—आयुष्य ही फार उत्तम संपत्ति आहे; पण तेंच आयुष्यही चिरकालीन नाहीं.

अशीं अनेक बोधवचनें त्याठिकाणीं लिहिलेलीं आहेत; आणि त्यावरून मानवी-प्राण्यानें ऐश्वर्यमदानें धुंद होऊन जाऊं नये व सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या अप्रतिहत इच्छेवर भरंवसा ठेवून, ईश्वरीसृष्टींतील घडामोडींत इहपरहित संपादन करण्यांत व लोकसंग्रह करून, लोककल्याण साधीत राहण्यांत, आपल्या आयुष्याचा,—सत्ता, संपत्ति, शरीर व शब्द वगैरेंचा—विनियोग अहर्निश, आनंदानें व उत्साहानें करीत रहावा, आणि जगांत चिरकालीन असें कांहींच नाहीं, हें सत्य व सावध करणारें वचन नेहमीं पूर्णपणें स्मरणांत ठेवून, स्वार्थाच्या सारखें हापापल्यासारखें पाठीस न लागतां—अथवा आधाशी आशा व स्वार्थ, यांच्या पाठीवर महत्त्वाकांक्षेस बसवून, हें जोड गाठोडें आपल्या पाठीवर न घेतां—लोककल्याण साधीत राहण्यांत, जनहित करीत असण्यांत, तनमनधनादिकेंकरून आपली शिकस्त करावी, करीत रहावी; हा बोध, हें सत्यवचन, हें दैवी संपत्तीचें श्रेष्ठ तत्व, हें पुरुषार्थाचें प्रधानध्येय, विचारी, विवेकी व विद्वान् मानवी प्राण्यांच्या अंतःकरणांत पूर्णपणें ठसल्यावांचून केव्हांही रहात नाहीं.

# परिच्छेद चवथा.

## दक्षिणेंतील मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार घराणीं.

**१ फलटणचे निंबाळकरः**—हें घराणें युसुफ अदिलशहा याच्या कारकीर्दींत उदयास येऊन, पुढें त्याचा अतिशय उत्कर्ष झाला; हें रजपूत घराणें अति प्राचीन असून त्याचें मूळचें उपनांव पवार हें आहे. या सूर्यवंशी पवार ऊर्फ परमार घराण्यानें नवव्या शतकाच्या प्रारंभीं माळव्यांत धार येथें राज्यस्थापना केली; मुंज व भोज हे प्रसिद्ध राज्यकर्ते याच वंशांत होऊन गेले. या घराण्यांत निंबराज, ऊर्फ निंबोदा या नांवाचा एक पुरुष धारानगरींत प्रसिद्ध होता; तो माळवा प्रांतांतून दक्षिणेंत आला; त्यानंतर त्यानें, इ० सन १२४४ च्या सुमारास शंभूमहादेवाचें शिखर सिंगणापूर नजीकचे नीरथडीचे अंगास, "निंबाचे झाडींत, तप करण्यास पर्णकुटिका बांधून, निराहार व्रतानें तपास अर्वा सबासीत मयांत प्रारंभ करून, अकरा वर्षें उग्र तप केलें. पुढें बारावेळां आश्विनमासीं नवचंडीचे घटाची स्थापना करून, अष्टमीपर्यंत दररोज महामंत्राचा जप एकासनी करून, मध्यरात्रीं होम करून पूर्ण आहुती आपले शिरकमळाची दिली; तेव्हां देवी प्रगट होऊन सावध करून दर्शन दिलें; आणि वर देऊन मोरचल दिलें. पुढें याची कीर्ति ऐकून पुष्कळ लोक जमले; व दिल्लीचें सैन्य येऊन एक वर्षानें त्यास मिळालें. नंतर चार वर्षानीं आनागोंदीचे (विजयानगरकर) किरीटी रामराजाशीं युद्ध जाहलें. त्यांत त्याचा पराजय झाला. पुढें त्यानें याच्याशीं सलोखा केला. नंतर त्याजकडे जाऊन एक वर्षानें आपल्या गांवीं जयघोष करीत परत आला. पुढें एक वर्षानें त्यानें कैलासवास केला." (इ० सन १२९१) त्यानें जें गांव वसविलें त्यास "निंबळक" ही संज्ञा आहे; व त्यावरूनच त्या घराण्यास "निंबाळकर" हें उपनांव प्राप्त झालें आहे. निंबराज यास निंबाच्या झाडाखालीं जी देवीची मूर्ति सांपडली तिची त्यानें देवालय बांधून तेंत स्थापना केली; या स्थानास हल्लीं "निंबजाई" हें नांव असून तें निंबाळकर घराण्याचें कुलदैवत आहे.

निंबराज यास पोद्लखा जगदेवराव ऊर्फ धारापतराव (तो धारातीर्थीं मृत्यू पावला ह्मणून त्यास धारापतराव हें नांव प्राप्त झालें.) या नांवाचा एक मुलगा होता. तो मोठा शूर व पराक्रमी असून त्याची कीर्ति ऐकून दिल्ली येथील महंमद तुघलख बादशहानें त्यास दिल्लीस नेलें, व बारा हजार स्वारांची सरदारी देऊन आपल्या पदरीं ठेवून घेतलें; पुढें बादशहाच्या नोकरींत असतांनाच, दुराणी लोकांबरोबरील युद्धांत तो मारला गेला; (इ० सन १३२७) तेव्हां बादशहानें त्याचा त्यावेळीं दिल्ली येथें असलेला मुलगा निंबराज यास निंबळक गांव व त्या भोंवतालचा साडेतीन लक्षांचा मुलूख जहागीर करून

देऊन " नाईक " असा किताब दिला; व त्याची दक्षिणेंत रवानगी करून दिली. त्याप्रमाणें दक्षिणेंत येऊन तो आपल्या जहागिरीचा उपभोग घेऊं लागला; तथापि तो निंबळक येथें न राहतां बाणगंगा नदीच्या कांठीं ठाणपें या नांवाच्या गांवीं राहूं लागला; तेंच सांप्रतचें **फलटण** हें शहर होय. निंबराज हा इ. सन १३४९ यावर्षी मृत्यू पावला व त्याच्या मागून त्याचा मुलगा वणंगभूपाळ नाईक हा त्या जहागिरीचा मालक झाला.

वणंगभूपाळ हा ब्राह्मणी राज्यांत प्रसिद्ध मनसबदार असून त्याच राज्यांतील पराक्रमी व प्रसिद्ध मनसबदार कामराज घाटगे याची मुलगी नामें जेवंताबाई हिजबरोबर त्याचा विवाह झाला होता; व तिजपासून त्यास वणंगपाळ या नांवाचा एक मुलगा झाला होता. " चोथे, कुचे व मुक्तबोध यांणीं बेदरचे सुभेदारास अनुकूळ करून सैन्य जमवून भोजनाचे वेळेस वणंगपाळ यास ठार मारिलें; ( इ. सन; १३७४ ) तेव्हां वणंगपाळाची तिसरी बायको व वणंगपाळाची आई आपल्या सहा महिन्याच्या मुलासह गुप्तपणें बाहेर एका शिंप्याच्या घरीं जाऊन राहिली; व तेथून गुप्तपणें इंदापूर प्रांतांतील निंबोडी ऊर्फ लांकडी निंबोडी या गांवीं गेली; परंतु तेथूनही शत्रूच्या भीतीनें ती जाळोली कोळोली येथें बाळोजी पाटील ढमे याच्याकडे जाऊन राहिली; व इकडे फलटण प्रांत वणंगभूपाळ यास ठार मारणाऱ्या शिलेदारांनीं आपल्या ताब्यांत घेऊन तेच स्वतंत्र रीतीनें त्या जहागिरीचा कारभार पाहूं लागले. पुढें वणंगपाळ मोठा झाल्यावर त्यानें फलटण प्रांतावर स्वारी करून व चोथे, कुचे व मुक्तबोध यांना ठार मारून आपली जहागीर परत मिळविली. तो पोटशूळाच्या व्यथेनें इ० सन १४०० मध्यें मृत्यू पावला. त्यानंतर त्याचा मुलगा वणंगोजी ( इ० सन १४०० ते इ. सन १४३० ) त्याचा मुलगा मालोजी ( इ. सन १४३० ते इ. सन १४३५ ) त्यानंतर त्याचा मुलगा बाजी नाईक ( इ. सन १४३५ ते इ. सन १४६५ ) त्याचा मुलगा पवारराव नाईक ( इ० सन १४६५ ते १४८० ) व त्यानंतर त्याचा मुलगा दुसरा बाजीनाईक असे पांच पुरुष निंबाळकरांच्या जहागिरीचे अधिपती झाले.

इ० सन १४८९ ह्यावर्षी अबुल्मुज्फर यूसुफ् यानें विजापूर येथें आपलें स्वतंत्र अदिलशाही राज्य स्थापन केलें; तेव्हां दुसरे बाजीनाईक " यांणीं विजापूरचा यूसफ अदिलशहा याची भेट घेऊन, त्याचे सल्लयानें राहण्याचा निश्चय करून, सन १४९० दांत आपले पूर्वजांनीं मिळविलेली सनद दाखवून दुमालपत्र करून घेतलें व ( युसफ ) बादशहानें स्वारांचा रिसाला ( दुसरे बाजी ) नायकाचे ताब्यांत दिला. तो फसली ९२५ मध्यें दिला. त्याच सालीं तिमाजी आंग्रे याची व बादशहाची लढाई झाली. त्यांत दुसरे बाजीनाईकांनीं मोठें शूरत्व केलें. त्याजवरून बादशहा खूष होऊन नायकाचा मोठा सन्मान करून वस्त्रें दिलीं. पुढें नाईक फलटणास आले. " बाजीनाईक इ० सन १५१२

मध्यें मृत्यू पावला व त्याच्या मागून त्याचा मुलगा मुधोजी हा फलटणच्या जहागिरीचा कारभार पाहूं लागला. पुढें इ० सन १५२७ मध्यें किल्ले ताथवडा ऊर्फ संतोषगड येथें काजीपणाचे मानाबद्दलचा तंटा उपस्थित झाला; त्याचा निकाल करण्यास यूसुफ अदिल-शहाच्या हुकुमाप्रमाणें मुधोजी हा तेथें गेला असतां त्यास किल्ल्यांतच कोणी दुष्ट मनुष्यानें ठार मारिलें. त्यास बाजी धारराव या नांवाचा एक मुलगा असून त्याचें वय यावेळीं आठ वर्षांचें होतें. त्यानें तेहतीस वर्षे आपल्या जहागिरीचा उपभोग घेतला व तो इ० सन १५६० मध्यें मृत्यू पावला व त्यानंतर दुसरा मालोजी ( इ० सन १५६० ते इ० सन १५७० ) व त्यानंतर त्याचा मुलगा प्रसिद्ध जगपाळराव हा फलटण येथील जहागिरीचा मालक झाला.

जगपाळराव ऊर्फ वणंगपाळ हा मोठा शूर असून मुसलमानी दरबारांत त्याचें अतीशय वजन असे. याच प्रसिद्ध पुरुषाच्या आश्रयानें छत्रपती शिवाजीमहाराजांचे पूर्वज मालोजी राजे व विठोजी राजे भोंसले हे उदयास आले. फलटन प्रांताजवळ शिखरशिंगणापूर या नांवाचें एक शंभुमहादेवाचें प्रसिद्ध स्थान आहे. तेथें मालोजी राजे व विठोजी राजे आपल्या मातोश्रीसहवर्तमान रहात होते; ( याठिकाणीं मालोजीनें बांधि-लेलें देवालय व व तलाव प्रसिद्ध असून याच ठिकाणीं त्याची छत्रीही आहे. मृत्यू इ० सन १६१९ ) या उभयतां बंधूनीं फलटणास येऊन नौकरीनिमित्तानें जगपाळरावाची भेट घेतली व मालोजी आणि विठोजी हे उभयतां बाराशें होनाची तैनात मान्य करून त्याच्या पदरीं नौकरीस राहिले. हे उभयतांही बंधू मोठे इमानदार, शूर व साहसी होते; व त्यांनीं जगपाळरावाच्या कोल्हापूरवरील स्वारीमध्यें अतीशय पराक्रम गाजविला होता; त्यामुळें जगपाळरावाचा व या उभयतां बंधूंचा विशेष स्नेह जुळला व त्यांचा लौकीक अहंमदनगर येथील निजामशाही दरबारांतही पसरून निजामशहानें त्यांचीं जप्त अस-लेलीं वतनें मोकळीं करून त्यांना परत दिलीं. ( इ० सन १६०४ ) आणि “ राजे ” हा किताब दिला; तेव्हां उभयतां बंधू पुन्हां निजामशाही नौकरींत दाखल झाले; अशा रीतीनें त्यांचा भाग्योदय झाल्यावर जगपाळराव यानें आपली बहीण दिपाबाई ही मालोजीस दिली; हीच राजे शहाजी यांची आई व छत्रपती शिवाजी याची आजी होय.

जगपाळराव निंबाळकर हा इ० सन १६२९ मध्यें अहंमदनगर येथें मोंगलाब-रोबरील युद्धांत मृत्यू पावला. निंबाळकर घराण्यांत हा पुरुष मोठा लौकिकवान् निपजला असून लुकजी जाधवरावाची कन्या जिजाबाई हिच्याशीं शहाजीचा विवाह करण्याची मालोजीची प्रतिज्ञा सिद्धीस नेण्यास जगपाळराव हाच मुख्यतः कारण झाला, असें ग्रांटडफनें म्हटलें आहे.

जगपाळराव मृत्यू पावल्यावर त्याचा सज्ञान मुलगा दुसरा मुधोजी नाईक ऊर्फ मुधोजीराव हा फलटण येथील जहागिरीचा अधिपति झाला. त्यानें प्रारंभींच आदिलशाही प्रदेशांत पुंडावा केल्यामुळें महंमद आदिलशहा यानें त्याच्यावर सैन्य पाठवून त्याचा पराभव केला; त्यास पकडून सातारा येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें; व फलटणची जहागीर जप्त केली; ( इ० सन १६३१ ) तो सातारा येथें सात वर्षें प्रतिबंधांत होता; त्यानंतर शहाजीनें आपलें वजन खर्च करून त्यास इ० सन १६३८ यावर्षीं तेथून सोडविलें; ( इ० सन १६३८ ) व आदिलशहाकडून फलटणची जहागीर व " नाईक " हा वडिलार्जित किताब त्यास पुन्हां प्राप्त झाला. अशा रीतीनें शहाजी भोंसले व मुधोजी निंबाळकर यांचा स्नेह जुळला; त्यानंतर लवकरच मुधोजीनें आपली मुलगी सईबाई ही शहाजीचा मुलगा शिवाजी यास दिली; ( इ० सन १६४० ) हीच छत्रपति संभाजी महाराज यांची माता असून त्याच्या जन्मानंतर दोनच वर्षांनीं तिच्या इहलोकींच्या जीवनयात्रेचा शेवट झाला व हा दुर्दैवी राजपुत्र आपल्या बालपणापासूनच मातृप्रेमास व सुखास कायमचा आंचवला ! ! कायमचा मातृहीन झाला ! ! !

मध्यंतरीं मुधोजी नाईक सातारा येथें प्रतिबंधांत असतांनाच निंबाळकर घराण्यांत भाऊबंदकी उत्पन्न झाली; आणि प्रतिस्पर्धी पक्षकारांमध्यें वारसदारीच्या हक्काबद्दल तंटे सुरू होऊन व ते निकरास जाऊन त्यामुळें जहागीरीचें नुकसान होऊन या घराण्याच्या तीन निरनिराळ्या स्वतंत्र शाखा निर्माण झाल्या; मुधोजी नाईक यास दोन बायका होत्या. त्यांपैकीं वडील बायकोस साबाजी व जगदेव असे दोन मुलगे होते व धाकटीस बजाजी हा मुलगा व सईबाई ( संभाजी महाराजांची माता ) ही कन्या अशीं दोन आपत्यें होतीं. यांपैकीं धाकटी स्त्री व मुलें बजाजी आणि सईबाई यांना मुधोजीनें, त्यांच्या जिवास अपाय होईल या भीतीनें आपणापाशीं सातारा येथें आणविलें. नाईकाचे ( ह्मणजे मुधोजीचे ) पहिले बायकोचे चिरंजीव जगदेव व साबाजीराव यांणीं आपले मातुश्रीसहित विजापुरीं जाऊन, बादशहाची नोकरी धरून त्यास खुष करून, दहिगांव व भाळवणी ( हीं गांवें स्वतंत्ररीत्या ) जहागीरवतन वंशपरंपरेनें करून घेतलीं आणि ( त्यांना ) हुजूर राहण्याची आज्ञा बादशहानें दिली. " ( इ० सन १६३४ ) पुढें मुधोजी नाईक सातारा येथून सुटून येऊन सईबाईचें शिवाजीशीं लग्न झाल्यानंतर शिवाजीच्या स्वराज्यसंस्थापनेंत मुधोजी हा त्यास साह्यकारी झाला; ही गोष्ट विजापूर दरबारास आवडली नाहीं. इतक्यांतच परभारें मुधोजीचा कांटा उखडून टाकण्याची त्या दरबारास संधी मिळाली; " नंतर फ० १०४१ त ( इ० सन १६४३-४४ ) जगदेव व साबाजीराव व बजाजीराव या तिघांच्या वांटण्या करून, बजाजीस फलटण

जहागीर वतन देण्याचा ठराव करून ( मुधोजी नाईकानें ) विजापूरचे बादशहाचा हुकूम आणिला. " परंतु ह्या व्यवस्थेस त्याचे जगदेव व साबाजी हे दोन्ही वडील मुलगे कबूल नव्हते; ह्मणून मुधोजीचें व या उभयतां दोन्हीं वडील मुलांचें वांकडें येऊन त्यांनीं मुधोजी-विरुद्ध विजापूरकराची मदत मिळविली; व ते मुधोजीवर चाल करून येऊन शिरवळ नजीक भोळी या गांवीं उभयतांमध्यें लढाई झाली; तींत मुधोजी हा एका वडाच्या झाडाखालीं आपल्या एका पुत्राच्याच हातून मारला गेला; ( इ० सन १६४४ ) या वडाला " बापमारीचा वड " असें ह्मणतात. या युद्धानंतर " बजाजीराव ( सईबाईचा भाऊ व छत्रपती संभाजीचा मामा ) यांस धरून विजापुरीं बादशहाकडे नेलें; त्यासमयीं त्याची स्त्री गरोदर होती. ती गुप्तरूपानें आपले माहेरीं गेली व तेथें प्रसूत जाली. पुत्र जाहला, त्याचें नांव महादाजी नाईक ठेविलें. बादशहानें फलटण जहागीर जप्त केली ते समयीं राजाळकर निंबाळकर यांणीं बादशाहापासून पलटण प्रांताची देशमुखी आपले तनख्यांत मागून घेऊन सनद घेतली. नाईकास ( बजाजीरावास ) बापाचे अपराधाबद्दल जिवें मारण्याची आज्ञा जाली. पुढें बादशहाचे सरदार माने, घाटगे, घोरपडे आदिकरून व काळोजी शिंदे ताथवडेकर यांणीं विनंती करून, मारण्याचा हुकूम रहित करून, मुसलमानी धर्म स्वीकारून, बादशहाची मुलगी बेगम हिच्याशीं बादशहानें लग्न लाऊन, आपलेपाशीं कांहीं दिवस ठेवून घेऊन, पुढें बेगमचे वतीनें ( बजाजी ) नाईकांनीं फलटणचा अंमल आपलेकडे घेऊन, बादशहाचा फर्मान घेऊन, फलटणांत सन सोळाशें एकावन्नांत येण्यास निघाले. पुढें महादेवीं येऊन शुद्ध जाले. नंतर फलटणीं आल्यावर बेगम हक्क जाहल्याचें ( मृत्यू पावल्याचें ) समजलें. तेव्हां ( बजाजीराव ) नाईकास दुःख जालें. पुढें फलटण प्रांताची लागण केली. " बजाजी नाईकास शिवाजीची आई जिजाबाई हिनें शंभू-महादेवाचे देवळांत प्रायश्चित देऊन परत जातींत घेतलें व त्याचा मुलगा महादजी याचें लग्न शिवाजीची मुलगी सखूबाई हिजबरोबर करून दिलें. त्यानंतर महादजी नाईक हा आपलें कुटुंब सखूबाई हिजसह आपला कुलस्वामी जेजूरी येथील श्रीखंडेराव याच्या दर्शनास गेला; " वाटेंत वाल्हे गांव लागला. तो पाहून महादजी नाईक बोलले कीं, हा गांव चांगला आहे. आपल्यास मिळेल तर बरें होईल. त्यावर पुढें दिपवाळीचे ओवाळणी-बद्दल सखुबाईनीं शिवाजीराजे भोंसले यांजकडून तो मागून घेतला. " ( इ० सन १६५७ ) याच सुमारास बजाजीराव मृत्यू पावला; त्याची घुमटाची समाधी आजतागायत फलटण येथें अस्तित्वांत आहे.

बजाजीस महादजी, मुधोजी व वणगोजी असे तीन पुत्र होते. त्यांपैकीं शिवाजीचा जांवई महादजी नाईक यास " ( शिवाजी ) महाराजांनीं सांगितलें कीं,

" तुह्मी फलटणचे जहागिरीचा हक्क सोडून द्या, आह्मी तुह्मास मोठें राज्य देऊं व तुमचे हातून महत्कार्य होणार आहे. याजकरितां वणंगोजी नाईक याजला अधिकारी गादीचे करण्यास परवानगी द्यावी. " त्याप्रमाणें महादजीनें फलटणच्या जहागिरीचा हक्क सोडिला व वणंगोजी नाईक तिचा अधिकारी झाला. त्यानंतर महादजी हा शिवाजीबरोबर नेहमीं स्वाऱ्यांमध्यें हजर असे; व त्यानें महाराष्ट्र-राज्यसंस्थापनेच्या कामीं शिवाजीस उत्तम साह्य केलें. पुढें अवरंगझेबानें संभाजीचा वध केल्यानंतर त्यानें अनेक मराठे सरदार पाडाव करण्याचा प्रयत्न केला; त्यांत महादजी त्याच्या हातीं सांपडला; तो शिवाजीचा जांवई ह्मणून अवरंगझेबानें त्यास त्याची पत्नी सखूबाई हिजसह भोल्हेर येथील किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें; तेथेंच तो पुढें मृत्यू पावला व त्याची पत्नी सखूबाई ही त्याजबरोबर सती गेली. महादजीस औरस संतति नव्हती. " महादजी यांचे दासीचे पुत्र ( दासीपुत्र ) संभाजी बाजी हैद्राबादेंत राहिले होते. त्यांस पुत्र जानोजी व त्यांचे पुत्र रावरंभा हे पुढें राजाराम महाराज यांजकडे गेले. ( त्यांना शाहूनें पांच हजार स्वारांची मनसब करून दिली होती. ) पुढें बाळाजी विश्वनाथ ( बाजीराव ) यांचें व त्यांचें बनेना; सबब तेथून ते निघोन हैद्राबादेस गेले. तेथें सरदार जाले. त्यांनीं मोठा लौकिक मिळवून पन्नास लक्षांची जहागीर मिळविली. " हैद्राबादेस " रावरंभा " हें सरदार घराणें अद्यापि अस्तित्वांत व प्रसिद्ध आहे; त्याप्रमाणेंच फलटणच्या जहागिरीचा अधिपती वणंगोजी नाईक इ० सन १६९३ मध्यें मृत्यू पावला. त्यावेळेपासून ही जहागीर वंशपरंपरे चालत आली असून ती आजतागायत अस्तित्वांत आहे.

२ मलवडीकर घाटगे:—हें घराणें पहिल्यानें निजामशाहींत व नंतर आदिलशाहींत प्रसिद्धीस आलें असून निजामशाही हकीकतीमध्यें त्यासंबंधीं लोहोनाक घाटगे याच्या काळापर्यंतची हकीकत दिलेली आहे. या लोहनाकास कडतोजी या नांवाचा एक मुलगा असून त्यास बाबाजी व बाळोजी असें दोन मुलगे होते. हे उभतांही पराक्रमी असून त्यांतल्यात्यांत बाबाजी हा विशेषच शूर व लौकिकवान् निपजला. या उभयतांनांही निजामशहाकडून " बाजी " हा किताब मिळाला होता. या उभयतां बंधूंपैकीं बाळोजी यास मालोजी भोंसल्याचा मेहुणा वणंगोजी निंबाळकर यानें आपली कन्या जानाई ही दिली होती; व हाच पुरुष पुढें विजापूर दरबारांत नोकरीस राहून एक प्रमुख व प्रसिद्ध मराठा सरदार बनला होता; परंतु त्याचें वाढतें वर्चस्व मुसलमान सरदारमंडळीस सहन न होऊन वजीर याकुत सर्जा यानें त्यास मेजवानीस बोलावून दग्यानें ठार मारिलें. त्यास सात मुलगे होते; त्यांपैकीं बाबाजी व मिटोजी हे पुढें विजापूर दरबारांत महत्वाचे सरदार ह्मणून प्रसिद्धीस आले; व त्यांनीं अनेकवेळां विजापूर दरबारची महत्वाची

कर्मगिरी वजाविली; त्यामुळें इब्राहीम आदिलशहानें खुष होऊन आपल्या मृत्यूपूर्वी बाबाजीस—ग्रांटडफच्या लिहिण्याप्रमाणें नागोजीस नव्हे—माणदेशची देशमुखी व "झुंजारराव" हा किताब दिला. "ह्या बाबाजी झुंझारराव घाटग्याची जी माहिती मिळते, तिच्यावरून त्यास उदयास आणण्यास एक तपस्वी ब्राह्मण कारण झाला असें दिसतें. त्याचें नांव परशुरामभट ( बिन वेदंभट ) असें होतें. ह्यास बाबाजी ह्यानें एकेदिवशीं विनंती केली कीं, " तुह्मीं थोर तपस्वी आहां. कांहीं अनुष्ठान करून आमचें उर्जित होऊन भाग्याची वृद्धि होयसारखें करावें. " त्यावरून परशुरामभट ह्यांनीं श्रीरामेश्वर प्रांत खटाव येथें श्रीजवळ अनुष्ठान केलें; तेव्हां श्रीनें साक्षात् प्रसन्न होऊन सांगितलें जे, विजापुरास जाऊन अंबरखान याची भेट घेणें. त्याचे हातून इब्राहीम जगद्गुरु पादशहास भेटवितील. दौलत अक्षयी होईल. चिंता नाहीं. " नंतर श्रीच्या अनुष्ठानाची सांगता करून बाबाजी घाटगे व परशुरामभट बुधास आले; व सुमुहूर्त पाहून स्वार होऊन विजापुरास गेले. तेथें हजरतीची मुलाजमत होऊन बाबाजी ह्यांचा दरबारांत प्रवेश झाला व त्यास सात लक्ष होनांची दौलत प्राप्त झाली. त्यांचे कुलगुरु श्रीपरशुरामभट हे त्यांजबरोबर सदैव असत. ते त्यास संकटप्रसंगीं वारंवार धीर देऊन व श्रीचा आशीर्वाद देऊन त्याचें कल्याण चिंतीत असत. ह्या त्यांच्या उपकारास्तव बाबाजी झुंझारराव ह्यांनीं त्यास मौजे सांवडें व मौजे रेठरें प्रांत पन्हाळा हीं दोन गांवें मुकासा करून दिलीं व त्यांस दिवटी व छत्री दिली. पुढें बाबाजी घाटगे लौकिक संपादन करून इ० सन १६४१ सालीं मृत्यु पावले. " त्यास दावजी व राजजी असे दोन मुलगे होते. त्यांपैकीं दावजी यास शहाजी भोंसले याची मुलगी दिली होती. पुढें दावजीवर कांहीं कारणामुळें आदिलशहाची इतराजी झाली; ह्मणून शहाजीच्या वशिल्यानें त्यानें भागानगर ऊर्फ हैद्राबाद येथें जाऊन कुत्बशाहींत सरदारकी मिळविली व पुढें लवकरच तो तिकडेच मृत्यू पावला. त्यानंतर दावजीचा भाऊ राजजी हा पुन्हां विजापूर येथें गेला व आदिलशहाची मर्जी संपादन करून त्यानें आपल्या वडिलांची जहागिरी व " झुंझारराव " हा किताब परत मिळविला. याच काळांत शिवाजीनें राज्यसंस्थापनेचा उद्योग आरंभिला होता; परंतु त्यांत राजजी यानें त्यास कोणत्याही प्रकारें मदत केली नाहीं. उलट तो अखेरपर्यंत शिवाजीविरुद्ध मोंगलांस चिकटून असून अफझलखानानें शिवाजीवर केलेल्या स्वारींत विजापूरकरातर्फे तो शिवाजीशीं युद्ध करण्यास आला होता. पुढें अफझलखानाचा वध झाल्यानंतर ( ता० ७ नोव्हेंबर इ० सन १६५९ ) त्याच्या सैन्याचें व शिवाजीचें जें युद्ध झालें, त्यांत तो, शिवाजीचा भायात मंबाजी भोंसले व त्याचा भाचा नरसोजी खडांगळे, या सर्वांनीं भाग घेतला होता; परंतु

त्या सर्वांचा खानाच्या सैन्याबरोबरच पराभव होऊन शिवाजीनें त्यांना कैद करून वाईस नेलें व तेथें कांहीं दिवस ठेवून त्यानंतर त्यांची मुक्तता केली; आणि राजजी झुंजारराव यास अलम गुमान घोडा व एक तरवार बक्षीस देऊन व मंबाजी भोंसले व नरसोजी खडांगळे यांसही बक्षीस देऊन त्यांना परत जाण्यास निरोप दिला; परंतु त्यानंतरही लागलींच नरसोजी व झुंजारराव हे उभयतां सैन्य जमवून विजापूर येथें जाऊन, शहास भेटून पुन्हां आदिलशाही नोकरींत दाखल झाले व राजजी यानें लवकरच शहाची मर्जी संपादन करून घेतली; तेव्हां शहानें खूष होऊन राजजी यास, त्याचा बहुमान करून, कारवे, जेहाचें तासगांव, तुळजापूर व कोरेगांव प्रांत, वांई हे मोकासे मुकरर करून दिले; त्यानंतर इ० सन १६८० मध्यें शिवाजी मृत्यू पावला त्या वेळेपर्यंत राजजी हा त्याच्या विरुद्धच्या मोहिमा व खटपटी, यांमध्यें सारखा भाग घेत होता; राजजी ऊर्फ झुंझारराव हा शिवाजीच्या मृत्यूनंतर पुढें दोन वर्षांनीं इ० सन १६८२ मध्यें मृत्यू पावला. त्यास सहा मुलगे होते; त्यांपैकीं वडील, पदाजी हा दौलतीचा अधिकारी झाला व अदिलशाही दरबारांत चाकरी करून राहूं लागला; परंतु पुढें अवरंगझेब दक्षिणेंत आल्यावर आदिलशाही नोकरी सोडून तो मोंगलांच्या आश्रयास गेला व अवरंगझेबानें त्यास कसबे मलवडी, खटाव व बुध वगैरे गांवाची देशमुखी, ठाणेदारी व फौजदारी दिली. पुढें या घाटगे घराण्याचा कुलोपाध्याय व तपस्वी पुरुष परशुरामभट यानें त्याचें मन वळवून त्यास मोंगलांच्या पक्षांतून फोडून मराठ्यांच्या गोटांत आणिलें; व स्वतः चंदीस जाऊन राजाराम महाराजांस मदत करून पदाजी घाटगे याची कन्या अंबिकाबाई

---

**टीप १:**—राजजी ऊर्फ झुंझारराव व शहाजी राजे यांचा विशेष स्नेह असून ती गोष्ट शिवाजीस माहीत होती; ह्मणून त्यानें झुंझाररावास आपल्या पक्षांत व आपणाजवळ राहण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला; परंतु तो शिवाजीजवळ राहण्यास कबूल झाला नाहीं; तेव्हां त्याचा मोठा सन्मान करून शिवाजीनें त्यास परत जाण्यास निरोप दिला. ( भा० इ. सं. मंडळाच्या नवव्या संमेलनांत रा. ब. पारसनीस यांनीं, या झुंझाररावास शिवाजी महाराजानें लिहिलेल्या पत्राची चिटणिसांनीं घेतलेली नक्कल वाचून दाखविली; त्यांत, " हे राज्यक्रांतीचे दिवस......आह्मी जाणूनबुजून तुह्माला त्रास देऊं, ही कल्पना तुह्माला शिवली तरी कशी, हें मला समजत नाहीं " असा महत्वाचा मजकूर आहे.

शिवाजीनें या शूर व प्रसिद्ध सरदारास आपल्या पक्षाला मिळवून घेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ झाला; इतकेंच नाहीं तर, आपल्या मृत्यूपर्यंत, आपल्या विरुद्ध सारख्या खटपटी करीत राहणारा, असा हा आपला एक जबरदस्त शत्रू आहे, असें शिवाजीच्या सारखें पूर्णपणें अनुभवास येत गेलें !

ऊर्फ भवानीबाई ही राजारामाचा मुलगा शिवाजी यास करण्याचें वचनप्रमाण घेतलें व त्याप्रमाणें पुढें राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाईच्या कारकीर्दींत रांगणा अथवा पन्हाळा येथें, इ० सन १७०१ मध्यें हा लग्नसंबंध घडून आला. राजारामानें पदाजी यास कसबे दिकसळ व कसबें बोर्थे हीं दोन गांवें इनाम दिलीं; व त्यावेळेपासून हें प्रसिद्ध घराणें मराठेशाहीच्या छत्राखालीं येऊन घाटगे मंडळीनीं स्वराज्याचा उत्कर्ष करण्यांत अमोल्य मदत केली.

३ **मोहिते**:-या घराण्याची फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. त्यावरून असें दिसतें, कीं " मोहिते " ( मोहीम जिंकणारे ) हे दिल्लीच्या प्राचीन चव्हाण राजांचे वंशज असून दिल्लीचें हिंदू सार्वभौम राज्य नष्ट झाल्यावर तें घराणें राजपुतान्यांत हाडोती प्रांतांत रहात होतें म्हणून त्यास " हाडे चव्हाण " असेंही म्हणत असत. पुढें दिल्ली येथील मुसलमानी अमदानींत या घराण्यानें पराक्रम गाजविल्यामुळें त्यांना " मोहिते " हा किताब मिळाला व चव्हाण हें उपनांव जाऊन मोहिते हें उपनांव प्राप्त झालें. हें घराणें पुढें उत्तरहिंदुस्थानांतून दक्षिणेंत आल्यावर त्यांपैकीं रंगराव चव्हाण मोहिते या नांवाचा एक इसम विजयानगरच्या रामराजाबरोबर तालीकोटजवळ झालेल्या महायुद्धांत (इ० सन १५६५) मुसलमानातर्फें लढत होता, अशी माहिती मिळते; त्यानंतर निरा व वारणा या नद्यांमधील प्रदेश कोंकणचे राजे शिर्के यांजकडून हस्तगत करून घेऊन ज्या कित्येक मराठा सरदारांना नतीजा देण्याकरितां विजापूरकर यूसुफ आदिलशहा यानें चंद्रराव मोरे या नांवाच्या एका मराठा सरदारास तिकडे पाठविलें होतें; त्या सरदारांमध्यें गुजर, मामुलकर व महाडीक यांच्याप्रमाणेंच " मोहिते " या सरदाराचाही निर्देश असल्याचें आढळतें; या मोहिते घराण्यांतील बाजी मोहिते " अमीरराव " हा विजापूरकराचा सरदार असून ( शेडगांवकर बखर पान १५ पहा. ) त्याची कन्या तुकाबाई हिच्याशीं शहाजीनें इ० सन १६३० मध्यें दुसरें लग्न केलें होतें. बाजी मोहिते हा सुपेप्रांताचा अधिकारी होता; शिवाजीनें पुढें सुपें प्रांत हस्तगत करून घेतला, त्यावेळीं बाजी यास वश करून घेण्याकरितां त्यानें पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ झाल्यानें शिवाजीनें त्यास कैद करून कर्नाटकांत तंजावर येथें पाठवून दिलें. याच मोहिते घराण्यापैकीं हंसाजी मोहिते या नांवाचा एक पराक्रमी पुरुष शिवाजीच्या पक्षास मिळाला व आपल्या कर्तबगारीवर तो शिवाजीच्या सैन्याचा " सरनोबत " अथवा मुख्य सेनापती बनला. तुकाबाईपासून शहाजीस व्यंकोजी या नांवाचा पुत्र झाला व पुढें शहाजीनें आपली कर्नाटकांतील जहागीर त्यास दिली; त्यामुळें तिकडे मोहिते घराण्याचें वर्चस्व पुष्कळ वाढलें; शिवाय शिवाजीची तिसरी बायको पुतळाबाई ही मोहिते घराण्यांतीलच असून ती शिवाजीबरोबर

सती गेली; त्यानंतरही सातारकर छत्रपती भोंसले व मोहिते या घराण्याचे अनेकवेळां शरीरसंबंध झालेले असून हें घराणेंही शिर्के, निंबाळकर वगैरे घराण्याप्रमाणें प्राचीन व उच्चप्रतीचें ह्मणून गणलें गेलेलें आहे.

**४ डफळेः**—हे जत परगण्याचे देशमुख असून डफळापूर येथील पाटिलकी वंशपरंपरें या घराण्याकडे होती ह्मणून त्यास "डफळे हें उपनांव प्राप्त झालें. जत हें त्याच संस्थानच्या राजधानीचें ठिकाण असून तें विजापूरपासून ४० व सातारा येथून अग्नेयीस १०० मैलांवर असून डफळापूर हें जतपासून तेरा मैलांवर आहे. या डफळे घराण्याचें मूळचें उपनांव "चव्हाण" हें असून विजापूर दरबारांत त्यास मनसब होती. जत येथें डफळे घराणें आजतागायत अस्तित्वांत असून प्रसिद्ध आहे.

**५ मानेः**—हें घराणेंही प्राचीन असून या घराण्याचा मूळपुरूष पाठकोजी हा ह्मसवड येथील देशमुखी करीत होता. तो दुर्गादेवीचा दुष्काळ संपल्यावर ह्मसवड प्रांताचा बंदोबस्त करीत असतां महादू या नांवाच्या एका बेरडाकडून ठार मारला गेला. त्याचा मुलगा सिदोजी हाही मोठा शूर निपजून ह्मसवड महालाच्या बंदोबस्तावर आलेला आदिलशाही अधिकारी सुजातमिया यास त्यानें आपल्या पराक्रमानें संतुष्ट केलें; तेव्हां सुजातमियानें "सिदोजी महाप्रतापी आहे, त्यानें एकांगी करून चार पांच लढाया जिंकल्या व आपल्या प्रांतावरील परचक्र नाहींसें केलें, त्याची देशगत त्यास देऊन त्याची हुकमत वाढवावी" अशी त्याची आदिलशाही दरबारांत शिफारस लिहून पाठविली. त्यावरून इब्राहीमशहा यानें त्यास भेटीस बोलावून त्याचा सत्कार करून त्यास तीनशें होनांची दरमहा तैनात चालू केली. पुढें बेदरकराविरुद्धच्या युद्धांत त्यानें पराक्रम गाजविल्यामुळें आदिलशहानें त्यास "बाजी" व त्याचा विश्वासू साह्यकर्ता नरसिंहपंत केसकर यास "विश्वासराव" असे किताब दिले. त्याप्रमाणेंच सिदोजीनें पुढें बदामीचा किल्लाही सर करून घेतला; त्यामुळें त्याची विशेषच ख्याती झाली. त्यास चिलोजी व नरसिंहराव असे दोन मुलगे होते. त्यांपैकीं नरसिंहरावास पांच मुलगे होते; त्यांपैकीं रथाजी हा आदिलशाहींतील मोठा नामांकित व शूर सरदार असून त्या दरबारांत त्याचें अतीशय वर्चस्व होतें; परंतु पुढें त्याच्यासंबंधीं दरबारांत अतीशय मत्सर उत्पन्न झाल्यामुळें तो मोंगली सैन्यास मिळाला; आणि मोंगलसरदार राजा जयसिंह यास तो दक्षिणेत आल्यावर रथाजी व त्याचा मुलगा नागोजी या उभयतांनीही अतीशय मदत केली; त्यामुळें त्यानें व सरदार सय्यद एखलास सर्जेखान यानें, अवरंगझेब बादशहाजवळ रथाजीची फार तारीफ केली. त्यावरून बादशहानें संतुष्ट होऊन रथाजी यास ह्मसवड, दहीगांव, अकलूज, माळवणी, कासेगांव, ब्रह्मपुरी, सांगोले, आटपाडी, नाझरे, बेलापूर, ह्या गांवांचें देशमुखी वतन दिलें. रथाजीच्या मृत्यूनंतर नागोजी हाही मोंगल

दरबाराच्याच आश्रयास राहून मान्यतेस पावला व अवरंगझेबाकडून त्यानें " राजे " हा किताब व मोर्चेलांचा मान मिळविला; त्यावेळेपासून छत्रपति राजारामाच्या कारकीर्दीत मोंगलांनीं चंजी येथें दिलेल्या प्रसिद्ध वेढ्यापर्यंत व वेढ्यांतही नागोजी हा मोंगलातर्फे मराठ्यांविरुद्ध युद्ध करीत होता; परंतु राजारामानें खटपट करून त्यास आपल्या पक्षांत ओढून घेतलें; आणि नागोजी माने यांनेंही स्वदेशाचा अभिमान बाळगून, स्वराज्याची चाड मनांत आणून—स्वार्थास आळा घालून, बादशाही मायामोहाची सरदारी झुगारून देऊन स्वदेशकार्याकरितां, कीर्तिसाठीं, महाराष्ट्रधर्म राखण्याला मदत करण्याच्या भावनेनें—मराठी राखिल्यास नीट; नाहीं तर आज बुडतो. तुह्मीं मराठी धर्माचे अगत्यवादी; त्यापक्षीं तुह्मीं आह्मांकडे यावें. तुह्मीं आह्मीं एक झाल्यास ही फौज मोडून हिंदूधर्म जतन करूं. ही राजाराम महाराजांची कळकळीची राष्ट्रीय विनंति मान्य करून मराठ्यांच्या पक्षाला मिळून मोठी अमोल्य मदत केली. प्रशंसनीय कामगिरी बजाविली; आणि " नागोजीनें आज राज्य जतन केलें. " असें राजाराम महाराजानें ह्मणून त्यास सत्तावीस माहालांचीं सरदेशमुखीचीं वतनपत्रें, शिवाय दोन चार इनाम गांवें व एक अभयपत्र देऊन त्याचा सन्मान केला; व त्यास पांच हजारी सरदारकी दिली. नागोजी माने याच्यासंबंधीं, व या घराण्यासंबंधीं[1] पुढें–राजाराम महाराजांच्या कारकीर्दीतील हकीकतींत येणार असल्यामुळें त्यासंबंधीं याठिकाणीं अधीक उल्लेख केला नाहीं.

---

**टीप १:**—या घराण्याचें " माने " हें उपनांव कसें पडलें याबद्दल ह्मसवडकर माने यांच्या बखरीवरून असें कळतें कीं, माने घराण्याचें मूळचें उपनांव " गवर " हें होतें. ते आपणास, " अंदारकरराजे " असें ह्मणवीत असत. या घराण्याचा मूळपुरुष अंताजी या नांवाचा होता. अंताजीस सात पुत्र होते; त्यांपैकीं कृष्णाजी हा आपल्या इतर सर्व बंधूंबरोबर नेहमीं भांडत असे; त्यामुळें त्यास वडिलांनीं घरांतून निघून जाण्यास सांगितलें; त्याप्रमाणें कृष्णाजी घराबाहेर पडला; व बेदर शहरीं जाऊन बादशहाकडे आपली दाद लावून घेण्याची खटपट करूं लागला. सुमारें एक मासपर्यंत त्याची दाद लागली नाहीं. कृष्णाजीस घोड्याच्या रोगांची चांगली परिक्षा असून त्यांवर उत्तम प्रकारचीं रामबाण औषधेंही त्यास माहीत होतीं व हें ज्ञान त्याची दाद बादशहाकडे लागण्याच्या कामीं उपयोगीं पडलें.

एके दिवशीं बादशहाचा एक उत्तम आवडता घोडा अतिशय आजारी पडला; व तो बरेच उपाय केले असतांनाही बरा होईना; तेव्हां बादशहास फारच चिंता लागली. ही खातमी कृष्णाजीस समजली, तेव्हां बादशहाजवळ आपली दाद लागण्याची ही उत्तम

६ **सावंतवाडीकर भोंसले**-यांना " वाडीकर सांवत " असें ह्मणतात व त्यावरूनच सांवतवाडी " हें नांव पडलें आहे. हें घराणें प्राचीन असून त्यांचें उपनांव घोरपड्याप्रमाणेंच, " भोंसले " हें आहे; व ते आपणांस उदेपूर येथील शिसोदे घराण्याचे वंशज आहेत, असें मानितात. या घराण्यांतील फोंडसांवत ह्या नांवाचा एक पुरुष विजयानगरच्या ताब्यांतील वाडी प्रांतांतील होडवडें या गांवीं येऊन राहिला; पुढें तालीकोटच्या युद्धानंतर, विजयानगरकरांचें राज्य नष्ट झाल्यावर हा प्रदेश विजापूरकर

---

संधी आलेली पाहून त्यानें बादशहाडे स्वतः जाऊन, कुरनिसात करून ह्मटलें कीं, " खाविंद, जर हुकूम असेल तर घोडा नीट करून फिरवून दाखवीन " हें ऐकून बादशहास आनंद जाहला; व कृष्णाजीस घोडा नीट करून आणण्याची आज्ञा केली. कृष्णाजीनें घोड्यास औषधें वगैरे देऊन आठ दिवसांत घोडा नीट करून स्वारीस तयार केला. हें अलौकिक ज्ञान पाहून बादशहा फार खुष झाला व त्याबद्दल त्यानें कृष्णाजीस एका किल्ल्याची नाईक व साडेचारशें लोकांची तैनात दिली.

पुढें माणदेशीं पाळेगार, चोर वगैरे लोकांनीं बरीच पुंडाई माजविली होती; ती मोडण्यासाठीं त्यास बादशहानें तिकडे पाठविलें. कृष्णाजीनें बादशहाची आज्ञा घेऊन, माणदेशीं जाऊन चोरांचा बंदोबस्त केला. ह्या कामगिरीबद्दल बादशहानें कृष्णाजीस त्या प्रांताची देशमुखी दिली. पुढें कांहीं दिवसांनीं कृष्णाजीचा अंतकाळ झाला; व त्याचे सर्व हक्क त्याचा पुत्र गोपाळजी नाईक यास मिळाले. गोपाळजीस तीन पुत्र होते; त्यांपैकीं नागोजी फार शूर असून धाडसी होता. तो आपल्या ताब्यांतील लोकांस फारच जरबीनें वागवी, हें त्या लोकांस न आवडून त्यांनीं त्यास कैद केलें; तेव्हां देशमुखी व पाटीलकी भरमजी यास मिळाली. नागोजीनें स्वतःस सोडण्याविषयीं लोकांस बरेंच सांगितलें; परंतु ते ह्मणाले कीं, ज्याअर्थीं तुह्मी आम्हांस जरब दाखविली आहे त्याअर्थीं तुह्मीं आमचा सूड घेतल्यावांचून राहणार नाहीं; ह्मणून आमच्यानें तुह्मास सोडतां येत नाहीं, परंतु नागोजी युक्तीनें तेथून निसटला व बादशहाकडे जाऊन सर्व हकीकत निवेदन केली; तेव्हां बादशहा इतका रागावला कीं, त्यानें त्यास कैद करण्याचा हुकूम केला; अशारीतीनें सुमारें सतरा महिने तो कैद होता. पुढें बेदरवर अर्काटचा राजा चाल करून आला व त्यानें बेदरच्या बादशहाचा बहुतेक मोड केला. लोक सैरावैरां पळूं लागले. हें पाहून नागोजीनें शिपायाचा पट्टा हिसकावून घेऊन बिड्यांसह किल्ल्यावरून उडी टाकिली व तो लोकांस उत्तेजन देत फार नेटानें लढूं लागला. त्यामुळें लोकांस नवीन उत्साह येऊन ते जोमानें लढूं लागले व त्यायोगानें शत्रुपक्षाचा मोड झाला व बेदरच्या बादशहाचा जय झाला. ह्या

अदिलशहाच्या ताब्यांत आला; त्यावेळीं कुडाळ प्रांताच्या देशमुखीचें ह्मणजे त्या प्रांतांतील जमीनिचा वसूल गोळा करून तो सरकारांत भरणा करण्याचें काम आदिलशाही दरबाराकडून एका प्रभू घराण्याकडे सोंपविण्यांत आलें. हें घराणें त्या काळांत तिकडे विशेष प्रसिद्ध असून त्यांच्यांत व सांवत मंडळींत अधिकारप्राप्तीकरितां अनेक

---

नागोजीच्या अचाट व अलौकिक शौर्यानें बादशहा फारच खुष जाहला व त्यास बोलावून आणण्यास दिवाणास अमीरउमराव बरोबर देऊन पाठविलें. त्याप्रमाणें तो दिवाणाच्या बरोबर मोठ्या सन्मानानें आला; परंतु बादशहास कुरनिसात न करितां रामराम करून बसला. ह्या चमत्कारिक वर्तनानें बादशहास राग येऊन त्यानें विचारिलें कीं, “ तुह्मी जमीदार असतां कुरनिसात केला नाहीं ! ही जमीदाराची रीत नव्हे. ” त्यावर नागोजी यानें उत्तर केलें कीं, जमीदाराची बेडी पायांत आहे; पण हल्लीं कचेरींत उमराव शिपाई या नात्यानें आलों आहे; ह्मणून रामराम केला; हें उत्तर ऐकून बादशहानें खुष होऊन सांगितलें कीं, “ तुह्मी रामराम करूनच असावें. तुह्मांस ताजीम देऊं ” ह्यानंतर नागोजीचा नातू सिदोजी ह्याच्या वेळेपर्यंत कोणासही दरबारीं येण्याचें कारण पडलें नाहीं; परंतु बंडाळी वाढल्यामुळें बंडखोर लोकांचें पारिपत्य करण्यास शिदोजीस हुकूम झाला. शिदोजी पुंडावा मोडून बादशहाचे भेटीस गेला, त्यावेळीं इब्राहीम बादशहा राज्य करीत होता. ( यावरून माने हे प्रथम बेदरच्या बादशाहीमध्यें प्रसिद्धीस आले व पुढें ते विजापूरच्या बादशाही दरबारांत गेले, असें दिसतें. ) बादशहास रामराम करून उभे राहिले; बादशहानें कारण विचारितां रीतीप्रमाणें करीत असल्याचा ( त्यानें ) जबाब दिला; तेव्हां बादशहानें प्रचीति पाहण्याच्या हेतूनें अशी व्यवस्था करविली कीं, कचेरींत शिरण्याच्या दरवाजावर तरवारी आडव्या बांधिल्या; व कचेरींत ताठच्याताठ येण्यास सांगितलें. दुसरे अमीरउमराव खालीं लवून मुजरा करून बसले, शेवटीं शिदोजी आला. त्यानें आपल्या बरोबरच्या लोकांस सांगितलें कीं, सरळच जावें; तेव्हां बरोबरचे लोक कापले गेले. शेवटीं शिदोजीस दरबारांत येण्याचा प्रसंग आला. तो स्वाभिमानी व पाणीदार असल्यामुळें नम्र न होतां तसाच ताठपणे येऊं लागला. तों मान कांपावयास लागली तेव्हां बादशहानें शिदोजीस मागें हटण्यास सांगून तरवारी काढून घेवविल्या; व खुष होऊन सांगितलें कीं, “ तुमचा बाणेदारपणा पाहून मी संतुष्ट झालों. आजपासून तुमचें नांव “ माने ” ठेवण्यांत आलें आहे. तुह्मीही रामरामच करावा. ” ही “ माने ” या उपनांवाची मूळ उत्पत्ती असून ह्या वेळेपासून त्यांचें “ गवर ” हें उपनांव मागें पडलें; व ते आपणास “ माने ” ह्मणूं लागले व तेंच उपनांव कागदोपत्रीं लावूं लागले; आणि हीच मिसल सातारकर छत्रपतींच्या दरबारांतही तशीच राहिली.

युद्धप्रसंग झाले. त्यावेळीं " दळवी " या उपनांवाचा एक पराक्रमी सरदार या देशमुखाचा सेनापती होता; त्याच्याशीं सांवतांनीं सख्य करून उभयतांनीं मिळून या प्रभू-घराण्याचा नाश करण्याचा उद्योग आरंभिला; परंतु यावेळीं तें घराणें समूळ नष्ट झालें नाहीं. पुढें इ० सन १६२७ च्या सुमारास खेमसांवत या नांवाच्या एका पराक्रमी पुरुषानें विजापूरकर अदिलशहाकडून कांहीं प्रदेशाची देशमुखी संपादन केली; त्यावरून त्यांना " देसाई " अथवा " सरदेसाई " हेंही नांव प्राप्त झालें. पुढें शिवाजीनें कोंकणप्रांत हस्तगत करून घेतला, त्यावेळीं या घराण्यांतील लखमा सांवत या नांवाच्या एका पराक्रमी पुरुषानें विजापूरकरांची मदत मिळवून शिवाजीच्या हातून आपला प्रदेश परत मिळविण्याचा प्रयत्न केला परंतु शिवाजीनें त्याचा पराभव केला, तेव्हां त्यानें गोवेकर पोर्तुगीज यांचा आश्रय केला; परंतु त्यांनाही शिवाजीनें जोराचा शह दिल्यामुळें, आतां आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून तो शिवाजीस शरण गेला आणि आपला कारभारी पितांबर शेणवी यांच्यामार्फत त्यानें शिवाजीशीं तह केला; ( इ० सन १६५९ एप्रील ) हा तह काव्येतिहास-संग्रह पत्रें यादी लेखांक ४११ वर दिला असून त्याअन्वयें असें ठरलें कीं, " प्रांतमजकूरचे महाल वगैरेंचा जो वसूल येईल त्यांतील निम्मे वसूल शिवाजीस द्यावा व निम्मे राहील त्यांत तीन हजार लोक पायदळ हेटकरी ठेवावे, आणि शिवाजी बोलवील तेव्हां या तीन हजार लोकांनिशीं चाकरीस यावें; खासाजातीनें येण्याचें प्रयोजन पडेल, जेव्हां बोलावणें होईल तेव्हां येत असावें. ( २ ) गोव्यांजवळील फोंडें हा किल्ला शिवाजीनें काबीज केला आहे, त्यास हरएक प्रसंगास कुमक राखीत जावी व बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्यांच्या कुमकेस जात असावें. ( ३ ) स्वराज्यसाधनाचा उद्योग करीत जावा. ( ४ ) आणि शिवाजीचे कामगार तपासणीस येतील त्यांना हिशोब दाखवीत जावा. " आणि हा तह सांवतांनीं पाळला ह्मणजे " प्रांतमजकूरची देशगत ( पुरातन ) वतनें तुमचीं व " बहादूर " किताब अजरामत चालेल, त्यांतील किल्ले-कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत. तेथें दास्तान करून जतन करावीं. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे. " त्याप्रमाणेंच दळवी हाही यावेळीं शिवाजीस शरण आला व शिवाजीनें त्यास आपल्या नोकरींत ठेवून घेतलें; तथापि सांवतांबरोबरील हा तह फार दिवस टिकला नाहीं; लखम सांवत पुन्हा विजापूरकरास जाऊन मिळाला, आणि शिवाजीचीं ठाणीं आदिलशहास देऊन मालवण हा गांव शहाकडून आपणास इनाम करून घेतला व आणखींही कांहीं हक्क मिळविले; आणि शिवाजीनें विशाळगडचा किल्ला घेतल्यावर त्याच्यावर आदिलशाही सैन्यानें चाल करून जाऊन युद्ध सुरू केलें, त्यांतही लखम सांवतानें पुढारीपणानें भाग घेतला. पुढें कुडाळ येथें आदिलशाही सैन्याची व शिवाजीची एक मोठी लढाई झाली; त्यांतही सांवतानें आदिलशहाच्या तर्फेंच प्रमुखत्वानें भाग घेऊन, मोठा पराक्रम

करून शिवाजीचा नाश करण्याचा प्रयत्न केला; लखम सांवत इ० सन १६७५ मध्यें मृत्यू पावला; त्यानें आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्याकरितां अनेक पराक्रम गाजविले, आणि स्वतःच्या नांवाचें नाणेंही पाडिलें होतें; शिवाजीच्या मृत्यूनंतर मोंगलांनीं कोंकण प्रांतावर स्वारी केली; शिवाय कुडाळचे मूळचें मालक प्रभू देशमूख हेही सांवताविरुद्ध आपली सत्ता पुन्हां मिळविण्याचा प्रयत्न करूं लागले; तेव्हां या घराण्यांतील प्रमुख पुरुष आणि फोंड-सांवत ( इ० सन १६४१–१६५१ ) याचा मुलगा दुसरा खेमसांवत ( इ० सन १६७५–१७०९ ) यानें अवरंगझेबाचा आश्रय घेतला व त्याजकडून देशमुखीची सनद मिळविली. त्यानें इ० सन १६९७ मध्यें कुडाळकर प्रभू देशमुखांच्या सत्तेचा संपूर्ण नाश करून कुडाळ प्रांत हस्तगत करून घेतला. या प्रभू घराण्यापैकीं एका पुरुषानें पुढें इ० सन १७५६ मध्यें बाळाजी बाजीराव पेशव्याची मदत घेऊन कुडाळ प्रांत परत मिळविण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. राजारामाच्या मृत्यूनंतर खेमसांवत हा पहिल्यानें ताराबाईस व नंतर शाहूस मिळाला व शाहूचें स्वामित्व मान्य करून त्यानें कुडाळ प्रांताशिवाय निम्मा साळसी महाल शाहूकडून इनाम करून घेतला. या घराण्याची हकीकत पुढें प्रसंगोपात येणार असल्यानें त्यासंबंधीं याठिकाणीं अधीक उल्लेख केला नाहीं.

**७ मोरेः**–ह्या घराण्याचें "धुळप" हें दुसरें उपनांव असून हें घराणेंही अति-प्राचीन व उच्च दरजाचें आहे. हें घराणें मूळचें उत्तरहिंदुस्थानांतील असून मोरे हा "मौर्य" शब्दाचा अपभ्रंश आहे. मौर्यांचें राज्य नष्ट झाल्यानंतर त्या घराण्यांतील कांहीं पुरुषांनीं दक्षिणेंत येऊन, दक्षिण हिंदुस्थानांतील विजयानगरच्या राज्यांत नोकऱ्या पतकरिल्या; व पुढें त्या राज्याचा नाश झाल्यावर ते आदिलशाहींत चाकरीस राहिले. या घराण्यासंबंधीं अशी माहिती मिळते कीं, ( बाजीराव मोरे या नांवाचा एक मनुष्य कर्नाटकमध्यें नाईक असून त्यास यूसुफ आदिलशहानें बारा हजार हिंदू पायदळांची सरदारी देऊन, निरा व वारणा या नद्यांमधील प्रदेश जिंकण्याकरितां व तिकडील शिर्के, गुजर, मामूलकर, मोहिते, महाडिक वगैरे मराठे सरदारांना नतीजा देण्याकरितां, त्या प्रांतांत रवाना केलें; त्याप्रमाणें मोरे यानें तिकडे जाऊन त्या सरदारांना योग्य नतीजा देऊन तो प्रदेश हस्तगत करून घेतला; त्यावरून आदिलशहानें त्यास "चंद्रराव" ( किंवा चंदरराव ) हा किताब व जावळीचें राज्य दिलें. पुढें त्याचा मुलगा यशवंतराव हाही पराक्रमी निपजला; आणि त्यानें बुऱ्हाणनिजामशहाबरोबरील परिंडा येथील युद्धांत मोठा पराक्रम गाजवून निजामशाही हिरवें निशाण काबीज केलें; तें आदिलशहानें त्यास बक्षीस देऊन त्यास तेंच आपलें निशाण ह्मणून वापरण्याची परवानगी दिली व त्यास जावळीचें राज्य बहाल केलें. या घराण्यानें सात पिढ्या जावळीचें राज्य केलें व त्यांच्या सौम्य व उपयुक्त राज्यकारभारामुळें

तो निर्जन प्रदेश त्यांनीं भरभराटीस आणिला. मुसलमानी व्यवस्थेखालीं हा प्रदेश अनियंत्रणीय स्थितींत असून तो मोऱ्यांनीं सुधारून सुसंपन्न केला; ते आदिलशाहाशीं पूर्ण नम्रभावानें नेहमीं वागत असत. त्यामुळें त्यांना आदिलशहास फारसी खंडणी द्यावी लागत नसे. भावी काळांतील " सुभा आरमार " आनंदराव धुळप हा याच " मोरे " घराण्यांतील पुरुष होता. चंद्रराव, मोऱ्यांची हकीकत पुढें शिवाजीच्या हकीकतींत येणार असल्यानें त्यासंबंधीं येथें अधिक माहिती दिली नाहीं.

८ **घोरपडे**:—यांचें मूळ उपनांव भोंसले हें असून हें घराणेंही प्राचीन व उच्चप्रतीचें ह्मणून गणलें गेलेलें आहे. या घराण्याचें " घोरपडे " हें उपनांव प्रचारांत आल्याबद्दल अशी आख्यायिका आहे कीं, ( भारतवर्ष, पुस्तक दुसरें अंक १ पहा. ) " एकेवेळीं विजापूरचे बादशाहाचे कारकीर्दींत, या घराण्यांतील एका पुरुषानें कांहीं फौजेनिशीं कोंकणांतील एक बळकट किल्ला सर करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो किल्ला अत्यंत दुर्गम असल्यामुळें व त्यावरील प्रतिपक्षाचे लोक फार बंदोबस्तानें असल्यामुळें तो त्यास हस्तगत होईना; तेव्हां त्यानें घोरपडीच्या कमरेस दोर बांधून ती किल्यावर सोडून दिली, आणि आपण त्या दोराच्या साह्यानें त्या किल्ल्यांत मोठ्या शिताफीनें चढून जाऊन, तो जिंकून घेतला. त्यामुळें विजापूर दरबारांत त्याचा मोठा लौकीक होऊन त्यास कांहीं प्रांतांची जहागीर देण्यांत आली. त्यावेळेपासून त्याच्या ह्या प्रशंसनीय कृत्याचें स्मारक ह्मणून ह्या घराण्यास " घोरपडे " हें अभिधान प्राप्त झालें. "

या घराण्याच्या शाखा सोंडूर, मुधोळ, कापशी, गजेंद्रगड, गुत्ती व दत्तवाड वगैरे ठिकाणीं आजतागायत विद्यमान आहेत. या घराण्यांतील मूळपुरुषाची माहिती बरोबर मिळत नाहीं; परंतु मालोजी ऊर्फ ह्मालोजी या नांवाच्या पुरुषापासून पुढील माहिती संगतवार मिळते. मालोजीचा उदय शिवाजीच्या काळांत झाला; त्यास शिवाजीनें पांचशें स्वारांची मनसबी दिली होती व पन्हाळा येथील किल्ल्याच्या बंदोबस्ताचें काम त्याच्याकडे सोंपविलें होतें; त्याप्रमाणेंच शिवाजीनें संभाजीस पन्हाळा येथें प्रतिबंधांत ठेविलें त्यावेळीं त्याच्यावर देखरेख ठेवण्याकरितां जनार्दनपंत हणमंते यास कोल्हापूर प्रांतांत व विठ्ठल त्रिंबक कारभारी, बाजी मुरार देशपांडे यांचा नातू हिरोजी फर्जंद, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी कंक वगैरे मंडळीस पन्हाळगडावर ठेविलें होतें, त्यांतच मालोजीसही त्यांच्याच बरोबर ही कामगिरी सोंपविली होती, असा उल्लेख आढळतो. पुढें संभाजी पकडला गेला. त्या गर्दींत मोंगलाबरोबरील चकमकींत मालोजी मारला गेला. त्यास संताजी, बहिरजी व मालोजी असे तीन मुलगे होते. हे तिघेही बंधू पराक्रमी निपजले; संताजी भावी काळांत मराठ्यांचा अलौकिक सेनापती झाला; राजाराममहाराजांच्या कारकीर्दींत त्यांना " ममलकतमदार "

" हिंदूराव " व " अमीर-उल्-उमराव " असे किताब मिळाले. संताजीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा पिराजी यास सेनापतीचीं वस्त्रें मिळालीं. ( इ० सन १६९८.) त्याचेच वंशज हल्लींचे कापशीकर घोरपडे हे आहेत. संताजीचा भाऊ बहिरजी यानें दक्षिण हिंदुस्थानांत थेट त्रिचनापल्लीपर्यंत मराठ्यांचा अंमल बसविला. त्यानंतर त्याचा मुलगा सिधोजी यानें सोंडूरचा किल्ला हस्तगत करून घेऊन तेथें आपलें राज्य स्थापन केलें; तेंच हल्लींचें मद्रास इलाख्यांतील बल्लारी जिल्ह्यांतील घोरपड्यांचें सोंडूर संस्थान हें होय. याठिकाणीं श्री-कार्तिकस्वामीचें एक प्राचीन व प्रसिद्ध देवालय आहे; त्यामुळें त्यास " कार्तिक स्वामीचें सोंडूर " असेंही ह्मणतात. सिधोजी इ० सन १७१५ मध्यें मरण पावला. त्यास दौलतराव, गोपाळराव ( ऊर्फ सुभानराव ), मुरारराव व भुजंगराव असे चार मुलगे होते. त्यांपैकीं दौलतराव गजेंद्रगड संस्थानचा अधिपति झाला; गोपाळराव सोंडूर संस्थानचा अधिपति झाला व मुराररावानें कर्नाटकांत गुत्ती येथें स्वतंत्र राज्य स्थापन केलें; संताजीची हकीकत पुढें राजाराममहाराजांच्या कारकीर्दींत येणार असल्यानें त्यासंबंधीं याठिकाणीं विस्तृत हकीकत दिली नाहीं.

९ **महाडिकः**—हें घराणेंही प्राचीन व उच्च दर्जाचें ह्मणून गणलें गेलेलें आहे व तें कोंकणांत महाड येथें राहूं लागल्यापासून त्यांस " महाडिक " हें उपनांव प्राप्त झालें आहे. या घराण्याकडे महाडची देशमुखी व सेड बंदरची मोकदमी होती. महाडिकांच्या वंशावळीमध्यें त्यांच्या मूळपुरुषाचें नांव मुधोजी असें दिलें आहे; त्यास कृष्णाजी, कान्होजी, रुद्राजी आणि प्रतापराव असे चार मुलगे होते; त्यांपैकीं कृष्णाजी राजे यास विजापूरच्या बादशहाकडून मुस्तफाबाद ऊर्फ दाभोळ या गांवची व बंदराची मोक-दमी मिळाली होती; ह्मणजे हा गांव त्यांस मोकासा, जहागीर व इनाम ह्मणून दिला होता व त्यास " राजे " हा किताब असून " प्रतापराव " व " रायानराव " अशा पदव्या होत्या. जावळीकर चंद्रराव मोरे यानें महाडिकांना नतीजा पोहोंचविण्याचा बराच प्रयत्न केला होता. पुढें हें घराणें शिवाजीच्या पक्षास मिळालें. त्यांच्यापैकीं कान्होजी तारळे येथें व रुद्राजी हा निवरी येथें रहात होता; यांपैकीं कान्होजीकडे आदिलशाही सरदारी चालू असून त्याच्या मृत्यूनंतर ( इ० सन १६५० च्या सुमारास ) ती त्याचा मुलगा परसोजी यास मिळाली; परंतु तो शिवाजीस गुप्तपणानें अनुकूल आहे असा त्याच्यावर आरोप घेऊन शहाची गैरमर्जी झाली; तेव्हां तो कर्नाटकांत शहाजी राजे यांच्या आश्रयास गेला व तिकडेच मृत्यू पावला. त्यास सात मुलगे होते, त्यांपैकीं वडील हरजी हा विशेष पराक्रमी व राजकारणकुशल निपजला; त्यास इ० सन १६६८ च्या सुमारास शिवाजीनें आपली मुलगी अंबिकाबाई ही दिली; आणि शिवाजीचे तीन्हीही जांवई—हरजीराजे, कुटुंब अंबिकाबाई, ( २ ) महादजी निंबाळकर, कुटुंब सखुबाई, ( ३ ) गणोजी शिर्के, कुटुंब राजकुंवरबाई—मराठी राज्याच्या अतिशय उपयोगीं पडले. हरजी राजे हा कर्नाटकांतील

शहाजी राजाच्या जहागिरीचा कारभारी रघुनाथ नारायण हणमंते याच्याजवळ राहून तिकडील प्रांताचा बंदोबस्त करीत असे व पुढें शिवाजीनें त्यास चंदी प्रांताची सुभेदारी दिली होती. शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजीच्या राज्यारोहणाच्या वेळीं हरजी राजे महाडिक, गणोजी राजे शिर्के व महादजी निंबाळकर हे त्याचे तिघेही मेहुणे हजर होते; त्याप्रमाणेंच संभाजीनें प्रधान मोरोपंत पिंगळे यांस कैद करून त्याच्या घरावर चौक्या बसविल्या त्यावेळीं या तिघांनीं "साहेब सिंहासनारूढ होणार, आणि प्रधान यांचे घरीं चौक्या; हें विहित नाहीं" असें संभाजीस स्पष्ट सांगून मोरोपंताची प्रतिबंधांतून मुक्तता करवून त्याच्या घरावरील चौक्या उठविल्या. हरजी राजे जिंजी येथील वेढ्यांत इ० सन १६९४ मध्यें मृत्यू पावला. त्यास प्रतापजी, दुर्गोजी, शंकरजी; जयसिंग, उदितसिंग, सुभानजी व गुणाजी असे सात मुलगे होते; त्यांपैकीं दुर्गोजी जिंजीस होता; शंकरजी शाहूबरोबर अवरंगझेबाच्या प्रतिबंधांत राहिला व प्रतापजीशिवाय बाकीचे तंजावरकडे गेले; प्रतापजीचें काय झालें तें समजत नाहीं. शंकरजी शाहूबरोबर दिल्लीस असतानांच शाहूची बहीण भवानीबाई हिजबरोबर त्याचा विवाह झाला व अवरंगझेबाच्या कृपेनें त्यास बादशाही सैन्यांत चार हजार स्वारांची मनसब मिळाली; शंकरजी हा शाहूच्या अगोदर बादशाही पंजांतून सुटून दक्षिणेंत आला. पुढें शाहू सुटून येऊन सिंहासनारूढ झाल्यावर शंकरजीस शाहूनें दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतांत शांतता स्थापन करण्याची कामगिरी सोंपविली; व पुढें त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वंशजांस शाहूनें तारळे महालाच्या देशमुखीची सनद दिली. हें घराणें आजतागायत अस्तित्वांत असून आपल्या प्राचीन वतनाचा तारळें येथें उपभोग घेत आहे. त्याप्रमाणेंच हरजी राजे, याची हकीगत पुढें राजारामाच्या कारकीर्दीत तो मृत्यू पावला, तेथपर्यंत येणार असल्यामुळें त्यासंबंधीं या-ठिकाणीं त्रोटकच उल्लेख केलेला आहे.

१० **शिर्के**:-यांची हकीकत पूर्वीं दिलेली आहेच; या घराण्यांतील वाघोजी या नांवाचा एक पुरूष निजामशाहींत आला व त्यानें शहाकडून रायरी प्रांताची सरदेशमुखी मिळविली; व पुढें त्याच्या घराण्यानें जावळी प्रांतांत येऊन वास्तव्य केलें; परंतु ते आदिलशाही शहास जुमानीनात; ह्मणून त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां आदिलशहानें आपला कर्नाटकमधील प्रसिद्ध शूर सरदार ( चंद्रराव ) मोरे यास, त्यांच्यावर पाठविलें; त्याप्रमाणें त्यानें तिकडे जाऊन शिर्क्यांस पदभ्रष्ट करून, ( इ० सन १५७८ ) त्याचे साथीदार गुजर, मोहिते व महाडिक यांचाही बंदोबस्त केला. पुढें घाटमाथ्याचे खालीं तळकोंकणांत संगमेश्वरनजीक श्रृंगारपूर ह्मणून एक गांव आहे, तेथें सुर्वे ह्मणून सरदार स्वतंत्रतेनें रहात असत, त्यांजपाशीं हे शिर्के जाऊन राहिले; शिर्के व सुर्वे यांची हकीकत पुढें शिवाजीच्या काळापासून कालानुक्रमाप्रमाणें येणार असल्यानें ती याठिकाणीं ग्रथित केली नाहीं.

# परिच्छेद पांचवा.

## दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांच्या आजुबाजूचीं मुसलमान राज्यें.

### ( गुजराथ, माळवा व खानदेश. )

१ गुजराथः—हिंदुस्थानच्या पश्चिमेकडील प्रदेशास "गुर्जरदेश" अथवा गुजराथ असें ह्मणतात. त्यांत "सौराष्ट्र" किंवा काठेवाड, आणि गुजराथ असे दोन भाग असून, कच्छच्या रणापासून खंबायतच्या आखातापर्यंतच्या प्रदेशास काठेवाड असें ह्मणतात; तथापि अहंमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच, सुरत हे जिल्हे, गायकवाडचें राज्य, कच्छ, खंबायत, पालनपूर वगैरे संस्थानें, काठेवाड, महीकांठा, रेवाकांठा ( रेवा ह्मणजे नर्मदा नदी; ह्मणजे मही व नर्मदा या नद्यांच्या कांठचा प्रदेश ) खेडा, सुरत वगैरे जिल्ह्यांतील संस्थानें, वगैरे सर्व प्रदेशाचा "गुजराथ" या सर्वसाधारण व्याख्येमध्यें समावेश होतो. या प्रदेशाच्या पूर्वेस मेवाड, माळवा व खानदेश, पश्चिमेस अरबी समुद्र, दक्षिणेस खंबायतचें आखात व ठाणे जिल्हा, आणि उत्तरेस कच्छचें रण, आखात व मारवाड प्रांत आहे. या प्रदेशांत नर्मदा, तापी, मही, साबरमती वगैरे मोठ्या नद्या वहात असून हा सर्व प्रदेश बहुतेक सपाट, सुपीक, सधन व समृद्ध आहे; त्यामुळें प्राचीन हिंदू राज्यांच्या काळाप्रमाणेंच मुसलमानी अमदानीतही त्याचें महत्व तसेंच कायम राहिलें आहे.

बादशहा अल्लाउद्दीन खिलजी यानें गुजराथ प्रांतांतील बराच प्रदेश हस्तगत करून घेऊन, आपणांतर्फे आलफखान या नांवाच्या एका सरदारास त्या प्रदेशाचा सुभेदार नेमिलें; तथापि सर्व गुजराथ यावेळीं त्याच्या हातीं न येतां अद्यापि पुष्कळ प्रदेश हिंदू राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं होता; आणि साबरमती नदीच्या पश्चिमेकडील विस्तृत प्रदेशांवर वाघेल, उत्तरेकडील डोंगरी प्रदेशांवर परमार व राठोड, कच्छचें रण व खंबायतचें आखात या प्रदेशांवर झाला, आणि पावनगड व त्याच्या पूर्वेकडील प्रदेश, यांवर खेंगार, या वंशांतील राज्यकर्त्यांचा अंमल होता. अल्लाउद्दीनच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा—व्यसनी, विषयी, अनीतिमान् व नटव्यासारखा सजून कसबिणीबरोबर बड्या लोकांच्या घरीं नाचावयास जाणारा, असा त्याचा हलकट मुलगा—मुबारिक हा गादीवर आला. त्यानें कमालुद्दिनखान या नांवाच्या एका सरदारास फौजेसह गुजराथचा बंदोबस्त करण्यास पाठविलें व लवकरच ऐनउल्मुल्क मुलतानी या नांवाच्या दुसऱ्या एका सरदाराची, त्यास मदत ह्मणून तिकडे रवानगी केली; परंतु तिकडील पुंडावा मोडीत असतां कमालुद्दीन मारला गेला; तरी ऐनउल्मुल्क यानें कसाबसा व कांहींसा गुजराथचा बंदोबस्त केला. इतक्यांत मुबारिक यानें आपला सासरा मलिक दिनार यास "जाफर-

खान " हा किताब देऊन गुजराथच्या सुभ्यावर पाठविलें; त्याप्रमाणें जाफरखार यानें तिकडे जाऊन व बंडखोर लोकांना कडक शिक्षा करून आपला चांगला अंमल बसविला; परंतु इतक्यांतच मुबारिक यानें त्यास दिल्ली येथे परत बोलावून घेऊन ठार मारिलें आणि हिसामुद्दीन या नांवाच्या एका मनुष्यास गुजराथच्या सुभेदारीवर पाठविलें. हा मनुष्य मुबारिकचा समानशील कंठमणी, मुख्य प्रधान, प्रमार घराण्यांतील मूळचा हिंदू पण आतां जातिभ्रष्ट, हसन ऊर्फ खुश्रू याच्याप्रमाणेंच बाटून मुसलमान झालेला, त्याचा भाऊ असून, त्याच्या वशिल्यानेंच या पदावर आला होता. हिसामुद्दीन हा मोठा चलाख व शूर होता व तो मूळचा हिंदू असल्यानें, हिंदू लोकांकडेसच त्याचा विशेष कल होता; शिवाय त्यानें तिकडील हिंदु बंडखोर लोकांस मिळवून घेऊन गुजराथ प्रांतावरील मुसलमानी अंमल नष्ट करण्याची मोठ्या गुप्तपणानें व सावधगिरीनें खटपट चालविली होती; परंतु ही गोष्ट त्याच्या हाताखालील एका मुसलमान सरदारानें बादशहास कळविली; त्यावरून मुबारिक यानें, वजेउद्दीन खुरेशी या नांवाच्या एका चलाख व शूर सरदारास गुजराथच्या सुभ्यावर पाठविलें; व त्यास हिसामुद्दीन याला कैद करून त्याची दिल्ली येथें रवानगी करून देण्याबद्दल हुकूम दिला. त्याप्रमाणें वजेउद्दीन यानें त्यास कैद करून दिल्लीस पाठवून देऊन गुजराथ प्रांताचा उत्तम बंदोबस्त केला; परंतु त्यासही मुबारिक यानें लवकरच परत बोलावून घेऊन आपल्या प्रेमांतील खुश्रू याची त्या जागेवर नेमणूक केली; परंतु बादशाही सत्ता स्वतःच्या हातीं बळकविण्याकरितां त्याला पुढील काळांत राज्यक्रांती करावयाची असल्यानें, त्यानें ती जागा पतकरिली नाहीं; व पुढें लवकरच मुबारिकचा वध करून त्यानें बादशाही तख्त बळकाविलें.

तथापि पुढें लवकरच पुन्हां राज्यक्रांती होऊन बादशाही तख्त तुघ्लख वंशाकडे गेलें; त्यावेळीं ग्यासुद्दीन तुघ्लखनें ताजउल्मुल्क या नांवाच्या एका मनुष्यास गुजराथच्या सुभेदारीवर पाठविलें; पुढें ग्यासुद्दीनच्या मृत्यूनंतर, इ० सन १३२५ मध्यें, महंमद तुघ्लख हा गादीवर आल्यावर त्यानें अहंमद अमाझ या नांवाच्या इसमास ताजउल्मुल्क याच्या ऐवजीं गुजराथच्या सुभेदारीवर नेमिलें व त्याप्रमाणें तो तिकडे जाऊन कारभार पाहूं लागला. इतक्यांत माळवाप्रांताच्या सुभेदारानें तिकडील अजमासें सत्तर मोंगल सरदार ठार मारिले; त्यामुळें त्यांच्या गुजराथेंतील नातलगांनीं चिडून जाऊन बंड केलें; तेव्हां महंमद स्वतः गुजराथेंत आला; आणि सुरत व खंबायत हीं शहरें लुटून व बंडखोरांचा पराजय करून तो पाटण येथें कांहीं दिवस राहिला; तथापि हे बंडावे सारखे सुरू राहून तो बंडखोरांचा पाठलाग करीत सिंधप्रांतांत गेला व तिकडेच ठठ्ठा येथें मृत्यू पावला. ( इ० सन १३५१; ) व त्याचा चुलतभाऊ फिरोज तुघ्लख हा गादीवर आला,

सुलतान महंमद यानें आपल्या कारकीर्दींत पुष्कळ भरवंशाच्या मुसलमान लोकांना जहागिरी व इनाम जमीनी वगैरे देऊन गुजराथेंत स्थाईक केलें होतें; पुढें फिरोजशहा गादीवर आल्यावर त्यानें सिंधप्रांताप्रमाणेंच, गुजराथ प्रांतावरही अनेक स्वाऱ्या केल्या होत्या; आणि गुजराथ प्रांताच्या कारभारावर जाफरखान या नांवाच्या एका सरदाराची नेमणूक केली होती; परंतु हा सरदार तिकडे मृत्यू पावला; तेव्हां त्याच्या मुलास "जाफरखान" हाच किताब देऊन शहानें त्याची त्याच्या वडिलाच्याच जागीं नेमणूक केली होती. त्यानंतर इ० सन १३७६ मध्यें शहास असें आढळून आलें कीं, गुजराथ प्रांताचा वसूल दिवसें-दिवस कमी होत चालला आहे. त्यामुळें त्यानें जाफरखान यास परत बोलावून घेतलें; व शमसुद्दीन दमघानी या नांवाच्या एका सरदाराची त्या जागेवर नेमणूक केली; पण त्याच्या हातून कोणत्याही प्रकारें विशेष बंदोबस्त न होतां गुजराथेंत एकसारखीं बंडें होत राहिलीं; शिवाय तोही स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करूं लागला; परंतु तितक्यांतच कित्येक सरदारांनीं त्यास ठार मारिलें; तेव्हां फिरोजशहानें फऱ्हतूं उलमुल्क रास्तीखान यास त्याच्या जागीं पाठविलें; परंतु दिल्ली येथें चालू असलेल्या निरनिराळ्या भानगडींचा फायदा घेऊन त्यानेंही हिंदू जमीनदारांच्या मदतीनें स्वतंत्र होण्याची खटपट केली. ही हकीकत दिल्लीस कळल्यावर इ० सन १३९१ मध्यें ( ता. २१ फेब्रुवारी ) सुलतान नाशीरशहा यानें, टाक जातीचा मूळचा हिंदू असून मुसलमान झालेला असा एक शूर मनुष्य पाहून व त्यास "मुज्फरखान" हा किताब व हिंदूरीतीचीं छत्रचामरादि राजचिन्हें देऊन, गुजराथच्या सुभेदारीवर पाठविलें; तथापि रास्तीखान हा आपला अधिकार सोडण्यास तयार नसल्यामुळें उभयतांमध्यें सिद्धपूरनजीक एक मोठी जोराची लढाई झाली; आणि तींत रास्तीखानाचा पराभव होऊन व तो मारला जाऊन मुज्फरखान हा गुजराथ प्रांताचा—इ०सन १३९१ मध्यें—कायम सुभेदार झाला.

" याकाळीं एक सुभेदार काढून दुसरा सुभेदार नेमण्याची मोठी पंचाईत होती. लढाई झाल्याशिवाय पहिला सुभेदार आपला अधिकार दुसऱ्याच्या स्वाधीन करीतच नसे; असा साधारणपणें त्या बादशहांच्या कारकीर्दींत नियमच झाला होता; त्यामुळें रयतेस सर्व प्रकारें दुःख व संकटें भोगणें प्राप्त होऊन तिला कधींही स्वस्थता व शांती मिळत नसे; आणि सुभेदारीच्या अधिकारप्राप्तीकरितां उभयतां सुभेदारांच्या फौजा तयार होऊं लागल्या कीं, त्यांना दाणावैरण वगैरे सामुग्री पुरविण्याकडे हजारों लोक खपत असत. गांवच्या लोकांस उपाशी राहून फौजांकडे धान्याचा पुरवठा करावा लागे; व मजूर बिगारीस व वेठीस धरून नेत असत. जिकडे तिकडे दंगेधोपे चालत; आणि त्यामुळें सर्व देशभर अस्वस्थता व अशांतता माजून त्याचा परिणाम प्रजेस भोगावा

लागत असे; आणि तशांतही मुसलमानी फौजा विशेष अनियंत्रित व अविचारी असल्यामुळें तर तो परिणाम अधीकच प्रमाणानें दृग्गोचर होत असे; वरील विवेचनावरून मुज्फूरशहापर्यंतच्या राजकीय परिस्थितीची, तत्कालीन राजकीय भानगडींची, कोणासही योग्य कल्पना होईल.

तथापि मुज्फूरशहाच्या काळापासून राज्यपद्धतीस स्थैर्य येत गेलें; व त्या त्या प्रमाणानें प्रजेस शांतता व स्वस्थता यांचा लाभ होण्यास प्रारंभ झाला. मुज्फूरशहा गुजराथच्या सुभेदारीवर स्थानापन्न झाल्यानंतर, रास्तीखानाबरोबरील युद्धांत ज्याठिकाणीं तो विजयी झाला, त्याठिकाणीं त्यानें एक शहर वसविलें व त्यास आपल्या विजयाचें द्योतक ह्मणून "जातपूर" हें नांव दिलें. मुज्फूरशहा हा मूळचा हिंदु होता; तरी सुद्धां हिंदुधर्माबद्दल त्याला बिलकुल सहानभुती नसून उलट त्या धर्मावर त्याचा विशेष कटाक्ष होता; त्यामुळे त्यानें सोरटीसोमनाथाच्या देवळाचे दगड काढून ते मशीदीला लाविले; हिंदूधर्माला विरुद्ध अशीं अनेक कृत्यें करून त्या धर्माची पायमल्ली केली व आपल्या सुलतानी सत्तेच्या रुखाखालीं आसपासच्या हिंदु राज्यांचे प्रतिरोधक कांटे नामशेष करण्याच्या उद्योगास त्यानें मोठ्या धडाक्यानें सुरवात केली. पाटण, मंडळगड, झालावाड वगैरे ठिकाणच्या राज्यकर्त्यांना त्यानें आपल्या कक्षेखालीं आणिलें. इराणचा शूर राणा रणमल्लजी याजबरोबर युद्ध करून ( इ० सन १३९३ मध्यें ) व त्यांत त्याचा पराभव करून, त्या सत्तेंतील सत्व तात्पुरतें कमी केलें. नंतर मुसलमान राज्यकर्त्यांवर त्याची दृष्टी गेली. त्यानें खानदेश व माळवा प्रांतांवर स्वारी करून तेथील राज्यकर्त्यांकडून खंडणी मिळविली; आणि यावेळेपासूनच निरनिराळ्या राजकीय स्थित्यंतरांचा त्याला अमोल्य फायदा मिळून तो गुजराथ प्रांताचा स्वतंत्र राज्यकर्ता बनला.

इ० सन १३९४ मध्यें दिल्ली येथील सुलतान महंमदशहा, हा मृत्यू पावल्यावर, हुमायून ऊर्फ शिकंदर व तो एकाएकीं मृत्यू पावल्यावर महंमदशहाचा दुसरा मुलगा महंमूद हा गादीवर आला. या राज्यकर्त्याच्या कारकीर्दींत राज्यव्यवस्थेची घडी पूर्णपणें विस्कळीत होऊन, निरनिराळ्या सरदारांनीं निरनिराळ्या ठिकाणीं आपआपले सत्तेसुभे निर्माण केले; आणि ( जोनपूर ) बंगाल, पंजाब, माळवा व खानदेश, यांच्याप्रमाणेंच गुजराथप्रांतही स्वतंत्र झाला. ( इ० सन १३९६ ) आणि मुज्फूरशहा गुजराथेंत त्या प्रांताचा पहिला राज्यकर्ता बनला.

मुज्फूरशहास तातारखान या नांवाचा एक मोठा शूर मुलगा असून तो दिल्लीस बादशहाचा वजीर होता; परंतु त्याचा प्रतिस्पर्धी मलिक इक्र्बालखान यानें त्यास स्थानभ्रष्ट केल्यामुळें, तो आपला मुलगा अहंमदशहा, यासह गुजराथेत आपल्या बापाजवळ—मुज्फूर-

शहाजवळ—येऊन राहिला होता व त्यानेंही आपल्या वडिलांस राज्यवृद्धी करण्याच्या कामीं पुष्कळ मदत केली होती. इतक्यांतच दिल्ली येथील भानगडी ऐकून प्रसिद्ध मोंगल बादशहा तैमूरलंग यानें दिल्लीवर स्वारी केली; आणि दिल्लीचें तख्त बळकाविलें. ही संधी साधून मुज्फरशहानें आपल्या नांवाचें नाणें पाडिलें; आपल्या नांवाची द्वाही फिरविली; आपल्या नांवानें मशीदींतून खुत्बा वाचविण्यास सुरवात केली व तिकडील प्रदेशाचा तो राजरोस पूर्ण स्वतंत्र राज्यकर्ता बनला.

तथापि त्याचा शूर व महत्त्वाकांक्षी मुलगा तातारखान याचें तेवढ्यानेंही समाधान झालें नाहीं. आपल्या वडिलांनीं, एवढ्यावरच संतुष्ट न राहतां, आपल्या मदतीनें दिल्लीवर स्वारी करावी, असें त्याचें मत होतें; व तो तसा आपल्या वडिलांस आग्रहही करीत होता; आणि असा आग्रह करण्यांत, आपला प्रतिस्पर्धी जो वजीर मालिक इकबालखान याचा सूड उगवावा, असाही एक त्याचा प्रधानउद्देश होता; परंतु त्याचें ह्मणणें मुज्फरशहास योग्य वाटलें नाहीं;—तसें करण्यास हा प्रसंग अनुकूल आहे असें वाटलें नाहीं; ह्मणून त्यानें आपल्या मुलाच्या इच्छेप्रमाणें वागण्याचें नाकारिलें; त्यामुळें या पितापुत्रांमध्यें विकल्प उत्पन्न होऊन तातारखानानें आपल्या वडिलांस प्रतिबंधांत ठेवून राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं; व दिल्लीवर चाल करून जाण्याची तो तयारी करूं लागला; परंतु इतक्यांतच तो आजारी पडला; आणि त्यांतच अखेरीस त्याचा अंत होऊन मुज्फरशहा पुन्हां राज्यावर आला.

तातारखानाचा मुलगा, आणि मुज्फरशहाचा नातू अहंमदखान हाही मोठा शूर व पराक्रमी होता. यावेळीं गुजराथ प्रांतांत आशावळच्या कोळीलोकांनीं मोठा धुंडावा माजविला होता; त्यामुळें त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां मुज्फरशहानें आपल्या या नातवास तिकडे पाठविलें. त्याप्रमाणें त्यानें त्या कोळीलोकांवर चाल करून जाऊन त्यांचा बंडावा मोडून टाकिला; तथापि याच वेळेपासून आपल्या वृद्ध आजोबाचा निकाल उडविण्याचे व स्वतः राज्य बळकविण्याचे स्वार्थी विचार त्याच्या मनांत घोळत होते; त्याप्रमाणें तो या स्वारींतून राजधानींत पाटण येथें परत आल्याबरोबर त्यानें आपल्या आजोबास—मुज्फरशहास—कैद केलें, आणि राज्यसूत्रें बळकावून तो गुजराथचा बादशहा बनला; परंतु आपल्या आजोबाचा हा कांटा जिवंत ठेवणें त्यास सुरक्षित वाटलें नाहीं; ह्मणून त्यानें विषाचा एक पेला तयार करवून तो मुज्फरशहास पिण्यास दिला; तरी अशा दुष्ट व निर्दय नातवाचें अभिष्ट चिंतून—" या ऐश्वर्याचा तूं दीर्घकाळ उपभोग घे " असा त्यास आशिर्वाद देऊन त्यास कित्येक बोधाच्या गोष्टी सांगून व परमेश्वराजवळ " त्याचें कल्याण कर " असें मागणें मागून—त्यानें तें विष प्राशन केलें; ( ता० २७ जुलै इ० सन १४११ )

आणि त्यामुळें लागलींच त्याचा अंत होऊन, त्या समाधानानें अहंमदशहानें आपले डोळे थंड करून घेतले.

मुज्फरशहाच्या एकंदर जीवनचरित्रावरून पाहतां, तो हिंदूधर्माचा द्वेष्टा होता आणि हिंदूधर्म व हिंदूधर्मी राजेरजवाडे, यांच्या बाबतींत तो कठोरपणानें वागला होता, यांत तर कांहींच संशय नाहीं; तथापि माळवा व खानदेश येथील सुलतानांवर स्वाऱ्या करून त्यांच्यापासूनही त्यानें चोपून खंडण्या घेतल्या; यावरून आपल्या महत्वस्थापनेच्या खटपटींत हिंदूप्रमाणेंच मुसलमानराज्यकर्त्यांचीही त्यानें उपेक्षा केली नाहीं; यावरून स्वजातीशीं वागतांना त्यानें–धार्मिक बाबतींशिवाय–भेदभाव दाखविला असेंही ह्मणतां येणार नाहीं; तथापि त्याचा खाजगी आयुष्यक्रम तसा कठोरपणाचा नव्हता. उलटपक्षीं तो मनाचा अतीशय कोंवळा होता; व त्याचें मुलांनातवांवर अढळ व असाधारण प्रेम होतें, असें दिसतें. आडवें आलें, ह्मणजे तें परकें, पाठचेंच काय पण पोटचें असलें तरी कापून काढून आपला जीव जगवून निर्धास्त होणारी, अशी त्याच्या मनाची ठेवण नसून पोटचें जगून त्यानें आपला जीव घेतला तरी पत्करला, अशी होती; त्यामुळें तातारखान यानें त्यास प्रतिबंधांत ठेविल्यानंतर, त्याच स्थितींत असतांनासुद्धां हे " चिरंजीव " मृत्यू पावल्याबद्धल त्यास अत्यंत दुःख झालें; तो अतीशय उदास झाला, आणि त्याच्या अमीरउमरावांनीं त्याला चार समाधानाच्या गोष्टी सांगून पुन्हां राजसूत्रें हातीं घेण्याबद्धल आग्रह केला, तेव्हांच तो पुन्हां पूर्वीप्रमाणें राज्यकारभार पाहूं लागला तथापि त्याच्या अपवादकारक प्रेमळ स्वभावाचें प्रत्यंतर त्या पुढील काळांत घडलेलें आहे. चिरंजिवानीं त्यास फक्त प्रतिबंधांत ठेविलें; पण नातवाची मजल त्याच्याही पुढें गेली व त्यानें आजोबास विष दिलें !! तथापि तें घेतांनाही या नातवाविषयींचें त्याचें प्रेम तिळमात्रही ढळलें नाहीं; ह्मणजे, वीष देणारा निर्दय नातू डोळ्यापुढें उभा असतां, त्याच नातवावर अढळ प्रेम ठेवून–कायम राखून त्याचें कल्याण चिंतून त्यास " मला ठार मारिलेंस तरी हरकत नाहीं; पण तूं या राज्यसुखाचा पुष्कळ वर्षें उपभोग घे; " असा आशीर्वाद देऊन, बोधाच्या चार गोष्टी सांगून, आणि त्याचें कल्याण करण्याकरितां ईश्वराची करुणा भाकून मुज्फरशहा मोठ्या शांतपणानें विषाचा पेला घेतो आणि मृत्यू पावतो, ही गोष्ट कादंबरींतही पचण्यास जड जाईल, इतकी अद्भुत, अगम्य व अपवादकारक आहे; पण–पण हीच गोष्ट–अशाप्रकारचें सत्य–अगदीं त्रिवार सत्य–असें घडलेलें हें एकच उदाहरण इतिहासांत आढळून येत आहे.

मुज्फरशहाचा नाश करून अहंमदशहा गादीवर आला, त्यावेळीं तो २१ वर्षांचा होता. हा शहाही आपल्या वडील व आजोबाप्रमाणेंच शूर होता. त्यास फिरोजखान या नांवाचा एक चुलतभाऊ होता; त्यानें राज्यप्राप्तीकरितां भडोच येथें बंड केलें; परंतु

अहंमदशहानें त्याचा पराजय करून तें मोडून टाकिलें व विजयी होऊन तो आपली राजधानी पाटण येथें येऊं लागला; त्यावेळीं मार्गांत त्यानें एकाठिकाणीं मुक्काम केला; तेव्हां तेथील हवा, पाणी व आसपासच्या जमीनीची सुपिकता, पाहून याठिकाणीं आपली राजधानी करावी असें ठरविलें; व नवीन शहर वसवून त्यास आपल्या नांवावरून "अहंमदाबाद" हें नांव दिलें१ ( इ० सन १४१२. ) व यावेळेपासून पाटण ऐवजीं अहंमदाबाद ही गुजराथ प्रांताची राजधानी झाली.

त्यानंतर अहंमदशहाचा चुलत भाऊ फिरोजखान यानें, इडरचा राणा रणमल्ल याच्या मदतीनें पुन्हां बंड केलें; परंतु तें शहानें मोडून टाकून, फिरोजखान यास पळून जाण्यास व रणमल्ल यास शरण येण्यास भाग पाडिलें. त्यानंतर माळव्याचा सुलतान हुसंगशहा हा आपल्या राज्यांतील बंडखोरांस आणि आपल्या शत्रूंस, आश्रय देतो, आणि आपल्या एका शत्रूस सौराष्ट्र देशाचा शूर राज्यकर्ता खेंगार यानें आश्रय दिला आहे, असें त्यास कळल्यावरून त्यानें त्या उभयतांवर स्वारी केली; त्यांत विजयी होऊन त्यांच्यावर व परत जातांना इतर कित्येक हिंदू राज्यकर्त्यांवर, त्यानें खंडण्या बसविल्या; तथापि अशा प्रकारच्या अनेक विजयामुळें नव्हे, तर हिंदुधर्माचा उच्छेद करण्याकरितां त्यानें जे विशेष प्रकारचे इलाज अमलांत आणिले, त्यामुळें त्याचें नांव गुजराथच्या इतिहासांत अजरामर झालें आहे.

अहंमदशहा यानें इ० सन १४१४ मध्यें ताजउल्मुल्क या नांवाच्या एका अत्यंत धर्माभिमानी मनुष्यास, मुसलमानी धर्मवृद्धीच्या व धर्मोत्तेजनाच्या स्वतंत्र खात्यावर मुख्य नेमून, त्यास मूर्तिपूजकांच्या देवालयांचा व मूर्तींचा दरोबस्त नाश करून टाकण्यास हुकूम दिला; व त्या बहाद्दरानेंही हा हुकूम मोठ्या उत्साहानें व काळजीनें

१ टीपः—सुलतान अहंमदशहा यानें हें शहर शेख महंमद खतूगंज बक्षी या नांवाच्या एका मनुष्याच्या मसलतीनें वसविलें असून, त्याठिकाणीं पूर्वी कर्णावती व श्रीनगर अशीं दोन गांवें होतीं. अहंमदाबाद हें शहर साबरमती नदीच्या पूर्वकांठावर वसलेलें असून तिचें पौराणिक कालांतील नांव "साभ्रमती" हें आहे व पद्मपुराणांत या नदीचें पुष्कळ महत्व वर्णन केलेलें आहे. साबरमती हें नांव साबर व हातमती, या दोन नद्या मिळून एका नांवानें चालू आहे व त्यांतील साबर ही नदी तोडगडांतून निघून पुढें तिला आमनगराजवळ हातमती ही नदी मिळाली आहे व तेथून पुढें तिला "साबरमती" हें संयुक्त नांव मिळालेलें आहे. अहंमदाबाद येथें सात मैल घेराचा विस्तीर्ण कोट, भद्र अथवा भद्दर या नांवाचा अंतरकोट, मोठमोठ्या इमारती व मशीदी वगैरे प्रेक्षणीय स्थळें असून तेथील पूर्ववैभव, अवशेषरूपानें आजतागायत अस्तित्वांत आहे.

अमलांत आणिला. गुजराथ देश, हा मूळचा हिंदूलोकांचा असल्यानें त्यांत ठिकठिकाणीं अनेक देवस्थानें होतीं; त्यामुळें चोहोंकडे देवळें पाडण्याचा सारखा सपाटा सुरू होऊन—आणि त्याठिकाणीं मशीदी उभारिल्या जाऊन—सर्व देशभर अतीशय खळबळ उडून गेली. शिवाय हिंदू राज्यें खालसा करीत राहण्याची त्यांत भर पडली; आणि अनेक जमीनदार व गिरासिये हिंदू मंडळीस आपल्या स्वातंत्र्यास मुकावें लागलें; त्यामुळें या खळबळीस फारच जोराचें चालन मिळालें होतें; एकंदरीत पाहतां, अहंमदशहाच्या कारकीर्दीचा बहुतेक काळ, आसपासच्या राज्यकर्त्यांशी युद्ध करण्यांत, आणि शेवटीं शेवटीं उत्तर कोंकणमध्यें बहामनी राज्यकर्त्यांबरोबर झगडण्यांत खर्च झालेला असून अतीशय अल्पप्रमाणांतच त्यास शांतता व विश्रांति, यांचा लाभ मिळालेला होता; तथापि हा शहा यशस्वी होता; शिवाय त्यानें रजपुतांशीं शरीरसंबंध केलेले असून, तो अतीशय न्यायी, अशी त्याची कीर्ति होती. त्याच्या न्यायीपणाचें एक असें उदाहरण उपलब्ध आहे कीं, एकदां त्याच्या जांवयानें एका मनुष्याचा खून केला; तेव्हां हें प्रकरण काजीकडे न्याय निवडण्याकरितां गेलें; त्यावेळीं काजीनें, "हा बादशहाचा जांवई" ह्मणून त्यास फक्त वीस मोहोरा दंड करून, खून झालेल्या मनुष्याच्या कुटुंबांतील मंडळींची त्यानें समजूत केली; व हें प्रकरण आपसांत दाबून टाकिलें; परंतु त्यानंतर ही गोष्ट अहंमदशहास समजली; तेव्हां त्यास, "हा अन्याय झाला," असें वाटून अतीशय राग आला; आणि त्यानें तावडतोब पुन्हां स्वतः चौकशी करून व हा खून आपल्या जांवयानेंच केलेला आहे अशाबद्दल पुन्हां आपली स्वतःची खात्री करून घेऊन त्यानें तावडतोब आपल्या जांवयास सुळीं देण्याचा हुकम देऊन तो अमलांत आणिला; त्यावेळीं तो ह्मणाला:—"फक्त वीस मोहोरांच्या दंडावरच जर खुनी मनुष्य अशारीतीनें सुटत जाईल तर आज शेंकडों श्रीमंत लोक हजारों खून करून दोषमुक्त होत जातील." या एकाच गोष्टीवरून त्याची कठोर व कट्टर न्यायप्रियता व्यक्त होते. हा सुलतान इ० सन १४४३ मध्यें ( ता० ४ जुलई ) अहंमदाबाद येथें मृत्यू पावला; व त्याचें शुक्रवारीं मशीदी समोरील बाजारांत "हजीरा" या नांवाच्या प्रसिद्ध मशीदींत दफन करण्यांत आलें असून त्याठिकाणीं त्याची सुंदर कबर आहे.

अहंमदशहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा महंमदशहा हा गादीवर आला. या शहाच्या कारकीर्दीच्या प्रारंभींच त्याचा, आणि इडरच्या राज्यकर्त्यांचा तंटा लागून कांहीं

---

**टीपः—इडर** हें, राजपुताना आणि मुंबई इलाखा, यांच्यामध्यें एक संस्थान असून इडर हेंच त्या संस्थानच्या राजधानीचें शहर अहमदाबादच्या ईशान्येस ६४ मैलांवर आहे व तें महीकांठा एजन्सीतील एक प्रमुख संस्थान आहे.

दिवस उभयतांमध्यें युद्धप्रसंग चालला; व शेवटीं इडरच्या राजाचा पराभव होऊन व त्यानें आपली मुलगी सुलतानास देऊन, त्याचें समाधान केलें व या युद्धाची समाप्ती झाली. नंतर इडरहून परत जातांना त्यानें भागड येथील राज्यकर्त्यांपासून खंडणी घेतली; त्यानंतर इ० सन १४४९ मध्यें त्यानें चांपानेरावर स्वारी केली; व तेथील राज्यकर्ता गंगादास याचा पराभव केला; तेव्हां त्यानें माळव्याचा सुलतान महंमद खिलजी याची मदत मिळवून अहंमदाबादेवर स्वारी करण्याची तयारी चालविली; परंतु इतक्यांतच, महंमदशहा हा दरबारांतील कांहीं मंडळीस अप्रीय असल्यानें, त्यांनीं गुप्तपणानें संगनमत करून त्यास विषप्रयोग करून ठार मारिलें; ( ता० ४ फेब्रुवारी इ० सन १४५१ ) आणि सहा वर्षांतच त्याच्या कारकीर्दीची समाप्ती होऊन त्याचा मुलगा कुत्बूशहा हा गादीवर आला.

महंमदशहाच्या कारकीर्दींत माळव्याचा सुलतान महंमद खिलजी यानें अहंमदाबादेवर स्वारी करण्याचा बेत केला होता; तो महंमदशहा मृत्यू पावला तरी कायम होता; व त्याप्रमाणें त्यानें अहंमदाबादेवर स्वारीही केली. तेव्हां कुत्बूशहाही त्याच्याशीं सामना करण्याकरितां पुढें गेला; आणि सरखेज व बटवा, यांच्यामध्यें उभयतांचा मुकाबला होऊन युद्ध झालें; व त्यांत माळव्याचा सुलतान विजयी होऊन उभयतांमध्यें तह झाला; आणि त्यांत, " उभयतांनीं मिळून एकमतानें वागावें; हिंदू राज्यांवर स्वाऱ्या कराव्या; व मुसलमानी धर्म वाढविण्याची खटपट करावी, " असें ठरलें; परंतु मेवाडचा प्रसिद्ध राणा कुंभ व माळव्याचा सुलतान महंमद खिलजी, यांचा परस्पर स्नेह असल्यामुळें हा ठराव अमलांत आला नाहीं. पुढें कुत्बूशहाचा, शमसखान या नांवाचा एक चुलत भाऊ नागोर येथें राज्य करीत होता, त्याच्यावर राणा कुंभ यानें स्वारी केली; त्यावरून भांडण उपस्थित होऊन, राणा कुंभ व कुत्बूशहा यांच्यामध्यें युद्ध झालें; त्यांत शहानें राण्याचा नागोर येथें पराभव केला, ( इ० सन १४५८ ) आणि तेथून परत आल्यावर लवकरच—ता० ३१ मे इ० सन १४५८ रोजीं तो मृत्यू पावला.

---

**टीपः—१** चांपानेर हें ठिकाण बडोदें येथून अजमासें २५ मैलांवर ईशान्येस पावागडच्या पायथ्याशीं, असून गडावर श्रीकालिकादेवीचें प्रसिद्ध देवालय आहे; व गुजराथेंत, डाकूरच्या देवस्थानाप्रमाणेंच, तें एक महत्वाचें देवस्थान आहे.

**टीपः—२** चितोडचा पराक्रमी व प्रसिद्ध राणा कुंभ—राणासंग याचा आजा—हा त्याचा बाप राणा मुकुल याचा खून झाल्यामुळें इ० सन १४१९ मध्यें गादीवर आला. हा राज्यकर्ता मोठा शूर, राजकार्यधुरंधर व हुषार असून चितोडच्या राजघराण्यांतील सन्माननीय व अलौकिक राज्यकर्त्यांमध्यें त्याची गणना आहे. माळवा व गुजराथ येथील

कुत्बूशहानंतर त्याचा चुलत भाऊ दाउदखान हा गादीवर आला; परंतु एक महिना, दहा दिवसांतच तो राज्य चालविण्यास नालायक ठरून त्यास पदभ्रष्ट करण्यांत आलें; आणि त्याचा १४ वर्षांचा सावत्रभाऊ महंमुद यास त्याच्या ऐवजीं गादीवर

सुलतानांनीं त्याच्यावर स्वारी केली; तींत त्यानें त्या उभयतांचा पराभव करून ( इ० सन १४४० मध्यें ) माळव्याचा सुलतान महंमद खिलजी यास युद्धांत पकडून चितोड येथें नेलें; परंतु पुढें सहा महिन्यांनीं त्याजकडून खंडणी वगैरे न घेतां मोठ्या सन्मानानें त्यास आपल्या राजधानींत परत पाठविलें. मेवाडच्या संरक्षणाकरितां जे एकंदर ८४ किल्ले बांधण्यांत आले त्यांतील ३२ किल्ले ह्या कुंभराण्यानें एकट्यानें बांधिलेले आहेत; आणि त्यांतील कुंभेमेर अथवा कुंभेर—अथवा कुमळनेर—येथील किल्ला तर अतीशय मजबूत असून त्याच्या अतीशय आवडीचा होता व तेथेंही तो कधीं कधीं रहात असे. या राण्यानें राज्य व धर्म या उभयतांचीही वृद्धी केली; तो स्वतः कवी असून विद्येचा मोका व कृष्णभक्त होता. त्याची प्रिय भार्या, परम कृष्णभक्त साध्वी मिराबाई—मेरटच्या ठाकूरची सौंदर्यवान्, गुणशीलवती पवित्र व पूज्य कन्या मिराबाई—ही कवयित्री, असून तिचीं पद्यें भक्तिरसप्रधान व प्रेमळ आहेत; व तिच्या प्रत्येक पदाच्या शेवटीं " मीराके प्रभू गिरिधर नागर " हा चरण येत असतो. कुंभोनें झालावाडची असाधारण सौंदर्यसंपन्न राज्यकन्या झालिनी हिच्या बाबतींत जें अयोग्य वर्तन केलें, तें त्याची परम सात्विक राणी मिराबाई हिला न आवडून ती द्वारका येथें गेली; व तेथेंच भगवद्भजनांत व श्रीकृष्ण-ध्यानांत मग्न होऊन शेवटीं त्याच ठिकाणीं तिचा अंत झाला. मिराबाईचा मठ अजून द्वारकेस प्रसिद्ध असून, आजतागायत या साध्वीची कीर्ति गुजराथेंत ऐकण्यांत येते.

पराक्रमी राणा कुंभ यानें पन्नास वर्षें राज्य केलें; व अनेक पराक्रमाचीं कृत्यें करून त्यानें अतीशय लौकिक संपादन केला; आणखींही कांहीं वर्षें तो राज्य करिता, पण;—पण त्याचा विलक्षण महत्वाकांक्षी, अतीशय उतावळा, मनस्वी बावळा, असा दिग्विजयी चिरंजीव—उदयसिंग यानें राज्यलोभानें त्यास—आपल्या बापास—ठार मारिलें आणि आपण राज्याधिकारी बनला ! ! या पितृघातकी पोरास त्याच्या या, अति निंद्य, अतिशय घोर, अत्यंत अधम, अपवादक नीच कृतीवरून त्यास " हत्यारी "—ह्मणजे हत्या करणारा, अथवा मारेकरी—या निंदाव्यंजक नांवानें ओळखीत असत व त्याचा उल्लेख करीत असत. उदेसिंग—उदयसिंग हा अतिशय मूर्ख, नेभळा, नालायक व नादान असून त्यानें अनेक अयोग्य कृत्यें केलीं, त्यामुळें तो अतीशय अप्रीय होत चालला होता; पण इतक्यांतच त्याच्यावर वीज पडून तो जागच्याजागीं ठार झाला; व त्यामुळें त्याच्या भावी लीलांचा ग्रंथ, तेथेंच समाप्त झाला.

बसविण्यांत आलें. महंमूद हा जरी इतका अल्पवयी होता, तरी तो मोठा इभ्रतीचा व कर्तबगार राज्यकर्ता होईल, असा अनुभव आला होता; तो राज्यावर आल्यावर लागलींच अजमासें तीस हजार लोकांनीं त्याच्या वजिराविरुद्ध बंड केलें; तेव्हां त्यानें स्वतः सामन्यास पुढें येऊन तें साफ मोडून टाकिलें होतें. त्यानंतर तीनच वर्षांनीं, म्हणजे इ० सन १४६१ मध्यें, त्यानें माळवा प्रांतावर सैन्य पाठवून तेथील सुलतानापासून बहामनी राज्याचें संरक्षण केलें; नंतर इ० सन १४६८ मध्यें, त्यानें मोठी जय्यत तयारी करून, सौराष्ट्र देशावर स्वारी करून व पुष्कळ प्रांत व गिरनारचा किल्ला हस्तगत करून घेऊन तो अहंमदाबाद येथें परत आला; तथापि तेथील मूर्तिपूजक राजकर्त्यांचा नाश व मुसलमानी धर्माची वृद्धि करण्याकरितां त्यानें पुन्हां गिरनार प्रांतावर स्वारी केली; त्यावेळीं गिरनारच्या राजकर्त्यानें त्यास शरण येऊन, आपल्या प्रजेस त्रास न देण्याबद्दल विनंति केली; परंतु सुलतानानें ती मान्य केली नाहीं व अखेरीस तो राज्यकर्ता बाटून मुसलमान झाला, तेव्हांच त्याची शांती झाली. नंतर त्यानें गिरनार प्रांताच्या राजधानीचें शहर जुनागड यास "मुस्तफाबाद" हें नांव दिलें; व यावेळेपासून गुजराथेंत अहंमदाबाद व काठेवाडांत जुनागड अशीं त्याच्या राजधानीचीं दोन शहरें बनलीं; आणि महंमूदशहा हा जुनागड येथें वारंवार येऊन राहूं लागल्यामुळें, अहंमदाबाद शहराप्रमाणेंच, तें शहरही प्रेक्षणीय व वैभवसंपन्न बनलें. त्यानंतर त्यानें कच्छ, सिंध, बलुचिस्थान व जाटलोकांच्या ताब्यांतील प्रदेश यांवर स्वारी करून, विजय संपादन केले व नंतर राणपूरचा जमेदार राणजी गोहेल याच्यावर तो चाल करून गेला; या राणाजीची बायको व महंमुदाची बायको, ह्या पूर्वीं सख्ख्या बहिणी होत्या; त्यामुळें राणाजीची खरी रजपूत साध्वी भार्या चारणदेवी, हीस बाटवून मुसलमान करण्याच्या इराद्यानें त्यानें राणपूरवर स्वारी केली; त्यावेळीं राणाजी हा अत्यंत शौर्यानें लढून धारातीर्थीं

---

या उदयसिंगाप्रमाणेंच जोधपूरचा राज्यकर्ता अभयसिंग यानेंही राज्यलोभानें पितृहत्या केली! अशाच प्रकारचे मराठ्यांच्या इतिहासांत प्रसिद्ध "कलीपुरुष" राघोबादादा यांचेंही एक घडलेलें उदाहरण आहेच!!

टीप १:—राणपूर हें ठिकाण, अहंमदाबाद जिल्ह्यांत, हल्लीं एक रेलवे स्टेशन असून तें गोमा व भद्दर या दोन नद्यांच्या संगमावर, वढवाण कँपपासून ३२ मैलांवर आहे; व या दोन नद्यांमधील उंचवट्याच्या जमीनीवर तेथील प्रसिद्ध किल्ला असून तो हल्लीं मोडकळीस आलेला आहे.

पतन पावला; आणि त्याच्या पतिनिष्ट भार्येनें त्याजबरोबर सहगमन केलें; तेव्हां त्याची जहागीर महंमूदाच्या ताब्यांत आली; ती त्यानें राणाजीचा भाचा व मुळी येथील बाटून मुसलमान झालेला जमिनदार हालूजी प्रमार यास देऊन तो अहंमदाबाद येथें परत आला.

त्यानंतर द्वारका, खंबायत व सुरत वगैरे ठिकाणीं त्यानें स्वाऱ्या करून तिकडील चांचे लोकांचा बंदोबस्त केला; आणि त्यांचा राजा भीमदेव यास पकडून, अहमदाबादेस आणून त्यास ठार मारिलें. ( इ० सन १४८२ ) व पुढें लवकरच त्यानें चांपानेर येथील पटाई रावळ जयसिंह याच्यावर स्वारी केली; व या स्वारींतही तो विजयी होऊन ( ता० १७ नोव्हेंबर इ० सन १४८४ ) तें शहर व जयसिंह त्याच्या हस्तगत झाले; नंतर जयसिंहास त्यानें अहंमदाबाद येथें आणिलें व तो, " मला जिवंत ठेवाल तर मी मुसलमानी, धर्म स्वीकारितों " असें ह्मणत असतांही, शहानें त्याचें ह्मणणें मान्य न करून, त्यास ठार मारिलें; व अशारीतीनें या प्राचीन व प्रसिद्ध शहराचा नाश होऊन त्याचें पूर्ववैभव नष्ट झालें.

या दिग्विजयानंतर, इ० सन १४९५ मध्यें, महंमूदशहानें वागड व इडर येथील राज्यकर्त्यांकडून खंडणी व नजराणे मिळविले; आणि इ० सन १५०७ मध्यें, पोर्तुगीज लोक गुजराथेंत वस्ती करून राहिले होते व अतिक्रमण करीत होते ह्मणून त्यांच्यावर स्वारी केली; व माहीम आणि दमणपर्यंत तो येऊन पोहोंचला; इतक्यांतच त्यास तुर्कस्थानचा बादशहा दुसरा बायाजीद याजकडून मदत येऊन मिळाली; व पोर्तुगीज लोकांशीं त्यांचीं एक दोन आरमारी युद्धें होऊन शहास पहिल्या पहिल्यानें विजय-प्राप्तीही झाली; परंतु पुढें त्याचा पराभव होऊन दीव, दमण माहीम वगैरे समुद्र-किनाऱ्यावरील ठिकाणें पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत गेलीं.

त्यानंतर तीन वर्षांनीं ह्मणजे इ० सन १५१० मध्यें, त्यानें पाटणवर सहाव्यानें स्वारी केली; या स्वारीहून परत आल्यावर त्यानें आपल्या सरदार मंडळीस एकत्र करून त्यांना, आपला मृत्यूकाल नजीक आला आहे, असें सांगितलें; व पुढील व्यवस्था ठरवून, तो नंतर लौकरच मृत्यू पावला. ( इ० सन १५११ ) हा सुलतान मोठा पराक्रमी असून त्यानें एकंदर ५३ वर्षें राज्य केलें; तथापि तो अतिशय धर्माभिमानी व दुराग्रही असल्यामुळें त्याच्यापासून हिंदू प्रजेस व धर्मास अतिशय त्रास झाला; महंमूदशहानें, जुनागड आणि पावागड, हे दोन मोठे गड ( किल्ले ) काबीज केल्यामुळें त्यास " बेगडा " असें ह्मणत असत. या सुलतानानें—अवरंगझेबाप्रमाणेंच—आपली कबर आपल्या हयातींत बांधवून ठेवविली होती; पाटणच्या स्वारीहून परत आल्यावर, चारच दिवसांनीं तो अहंमदाबाद येथून सारखेज येथील अहंमदखटू या साधूच्या कबरीचें दर्शन घेण्यास गेला;

---

टीप १:—मुळी हें काठेवाडांत एक लहानसें संस्थान असून मुळी हें राजधानीचें शहर, वढवाण कँप पासून १४ मैलांवर, भोगवा नदीच्या कांठीं आहे.

आणि त्याच कबरीशेजारीं आपलीही तयार झालेली कबर त्यानें पाहिली; व असेरच्या वेळीं,——त्याला आपल्या एकंदर आयुष्यक्रमांत केलेल्या अनेक गोष्टींचें व कठोर कृत्यांचें स्मरण होऊन—पश्चात्तापानें त्यास रडूं कोसळलें. असेंच आहे; असेंच व्हावयाचें; पापांचा—कठोर कृत्यांचा असाच पश्चात्ताप होतो, हा सिद्धांत आहे.

महंमदशहा हा तिकडून परत आल्यानंतर लागलींच आजारी पडला; व सतत तीन महिने त्याच स्थितींत राहिला; आपल्या अंतकाळीं आपला मुलगा जवळ असावा अशी त्यास इच्छा झाली; त्याप्रमाणें शहाजादा खलील यास त्यानें बडोदें येथून आपणां-जवळ बोलावून घेतलें;. आणि त्यानंतर लवकरच त्याचा इहलोकींचा आयुष्यक्रम समाप्त झाला.

महंमूदशहानंतर त्याचा मुलगा खलील हा मुज्फूरशहा हें नांव धारण करून गादीवर आला; या काळांत माळवा प्रांतावर सुलतान महंमद खिलजी हा राज्य करीत होता; परंतु यावेळीं तो निव्वळ नांवाचा राजा असून सर्व राजसत्ता त्याचा हिंदु प्रधान मेदिनीराय यानें बळकाविली होती; ह्मणून त्या प्रधानाचा नाश करून सर्व सत्ता आपल्या हातीं परत मिळविण्याच्या उद्देशानें खिलजीनें मुज्फरशहाजवळ मदत मागितली व ती देण्याचें त्यानें कबूल करून—आणि पाटणचा सुभेदार ऐन उलमुल्क यास अहंमदाबाद येथें बोलावून घेऊन आपल्या कारभारावर स्थानापन्न करून—तो स्वतः खिल-जीच्या मदतीस माळव्यांत गेला; ही संधी साधून इडरचा राज्यकर्ता भीमदेव यानें पुंडाई आरंभिली; तेव्हां शहानें परत येऊन त्याचा पराजय केला; इडर शहराचा विध्वंस उड-विला; व भीमदेवास आपल्या वर्चस्वाच्या आधीन होणें भाग पाडिलें. त्यानंतर भीमदेव हा लौकरच मृत्यू पावला; व भारमल्ल हा गादीवर आला; परंतु त्यास रायमल्ल या नांवाचा एक प्रतीस्पर्धी असून या उभयतांमध्यें राज्यप्राप्तीकरितां भांडण सुरू झालें. त्यावेळीं भारमल्लचा पक्ष मुज्फूरशहा यानें उचलिला; आणि रायमल्ल हा प्रसिद्ध राणा संग याचा जांवई असल्यामुळें, त्यानें रायमल्लास मदत केली व उभयतांमध्यें पुष्कळ काळपर्यंत युद्ध चालून मुज्फूरशहा—भारमल्ल हा पक्ष विजयी झाला; भारमल्ल हा इडरचा वारस ठरला; व त्यानंतर रायमल्ल हा आजारी पडून लवकरच मृत्यू पावल्यामुळें तर भारमल्ल हा बिनहरकतच इडरच्या गादीवर स्थाईक झाला.

या काळांत मलिक नुसरुत् उलमुल्क् या नांवाचा शहातर्फे एक ठाणेदार इडर येथें रहात होता; हा मनुष्य मोठा अधिकप्रसंगी व खाजवून खरूज काढणारा उपद्व्यापी होता; बहादुरशहाचा समकालीन मेवाडचा प्रसिद्ध राणा संग याची कीर्ति व लौकिक त्या प्रांतांतही पुष्कळ पसरलेला असून सर्व लोक त्याच्या नांवाचाही अतिशय

आदर दर्शवीत असत; पण या ठाणेदारानें, राणा संग यास व इतर लोकांस चिडविण्याकरितां मुद्दाम आपल्या दाराशीं एक कुत्रा बांधून, त्याला " राणासंग " असें नांव दिलें; व त्याच्याकडे कोणीही रजपूत अथवा हिंदू मनुष्य आल्यास त्याच्या देखत मुद्दाम त्या कुत्र्यास " राणासंग " कशी हांक मारून, त्यास व संग राण्यास चिडविण्याचा त्यानें उद्योग आरंभिला. ही बातमी संग राण्यास कळल्यावर संगराणा आपल्या मोठ्या सैन्यानिशीं इडरवर चाल करून निघाला; सिरोहीपर्यंतचा शहाचा प्रदेश लुटीत व उजाड करीत वानगडास आला. मुसलमानी सैन्याचा ठिकठिकाणीं पराभव करून आपल्या अपमानाचा वचपा काढून घेतला; आणि आपल्या विजयदुंदुभी वाजवीत व शौर्यध्वजा फडकावीत तो मोठ्या थाटानें चितोड येथें परत निघून गेला.

राणा संग परत गेल्यावर इडर प्रांत मुज्फरशहानें पुन्हां आपल्या ताब्यांत घेतला व राणा संग याच्याशींही तह होऊन त्यामुळें पुढील भानगडी निकालास लागल्या. मुज्फरशहाचा व इराणचा शहा ईस्मूईल सफरी यांचा स्नेहभाव असुन शहाकडून त्यास मौल्यवान् नजराणे आले होते व मुज्फुरशहानेंही तसेच मौल्यवान् नजराणे त्याच्याकडे पाठविले होते; इ० सन १५२४ मध्यें मुज्फुरशहाचा वडील मुलगा बहादूरशहा हा बापावर रुसून दिल्ली येथें जाऊन राहिला; त्यामुळें मुज्फुरशहास अत्यंत दुःख झालें. तो अतीशय उदास झाला; झुरणीस लागला; आणि त्याच स्थितींत तो इ० सन १६२६ मध्यें ( ता० २६ मार्च ) मृत्यू पावला; त्यानें एकंदर चौदा वर्षें राज्य केलें.

दुसरा मुज्फूरशहा याच्या मृत्यूनंतर त्याचा दुसरा मुलगा शिकंदरशहा हा गादीवर आला; परंतु अवघ्या दोन महिन्यांतच इमादू उल्मुल्क् या नांवाच्या सरदारानें त्यास ठार मारून त्याचा महंमुद या नांवाचा एक पांच वर्षांचा भाऊ होता, त्यास गादीवर बसविलें; आणि आपण त्याच्या नांवानें राज्यकारभार चालवूं लागला; परंतु ही गोष्ट कित्येक दरबारी मंडळीस पसंत न पडून त्यांनीं बहादूरशहा यास दिल्ली येथून परत बोलावून घेतलें; त्याप्रमाणें तो अहंमदाबादेस आला; तेथून चांपानेर येथें इमादू उल्मुल्क् याजवर चाल करून जाऊन त्यास पकडून त्याचा शिरच्छेद केला; व तख्तनशीन होऊन ( इ० सन १५२६ ) त्यानें राज्यकारभार आपल्या हातीं घेतला.

हा सुलतान मोठा दयाळू, उदार व दिलदार होता. तो गादीवर आला त्याच वर्षीं गुजराथेंत मोठा दुष्काळ पडला; त्यावेळीं त्यानें आपल्या राज्यांत जिकडे तिकडे अन्नछत्रें व सदावर्तें स्थापन केलीं; शिवाय तो इतका उदार होता कीं, एक मोहोरेहून कमी, असें, दान त्यानें कधींही व कोणासही दिलें नाहीं; तथापि इतकें असून सुद्धां त्यानें भ्रातृहत्या केली, ही गोष्ट याठिकाणीं नमूद केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

त्याला दींवकडे तिकडील अव्यवस्था मोडून टाकण्याकरितां जावयाचें होतें; परंतु त्यानें पदभ्रष्ट केलेला त्याचा धाकटा भाऊ महंमूद हा जिवंत असून त्याच्या पक्षाचे लोक बंडावा करीत होते; ह्मणून त्यानें महंमुदास—या एकट्याच प्रतिस्पर्धी वारसदारास—विषप्रयोग करून ठार मारिलें; व नंतर तो दींव येथें गेला; व तेथील बंदोबस्त करून जुनागड, संचायत वगैरे ठिकाणीं स्वतः जाऊन आपला तिकडील अंमल कायम केला; दक्षिणेवर स्वारी करून अहंमदनगर व दुसरीं कांहीं शहरें लुटिलीं व तसाच पुढें माळव्यावर चाल करून गेला. त्यावेळीं महंमूद खिलजी हा आपल्या साही मुलांसह त्यास शरण आला; तेव्हां बहादूरशहानें त्यांना कैद करून अहंमदाबाद येथें पाठविलें; परंतु मार्गांतच खिलजीच्या तर्फे बंडावा झाला; त्यामुळें त्यांच्या बरोबरील सरदारांनीं त्यांना ठार मारिलें व माळव्याचें स्वतंत्र राज्य नष्ट झालें.

या विजयानंतर बहादूरशहा हा उज्जयनी शहरावर चाल करून गेला; तेथील राज्यकर्ता शिलादित्य यास कैद करून दर्याखान मंडवी या नांवाच्या एका सरदारास तेथें आपल्यातर्फे कारभार पाहण्यास ठेविलें; व रायसीन येथें शिलादित्याचा भाऊ लक्ष्मणसिंह हा राज्यकर्ता होता, त्याच्यावर त्यानें स्वारी केली. यावेळीं त्याच्या स्वारीबरोबर शिलादित्य होता; त्यानें " मी माझ्या भावास आपणांजवळ घेऊन येतों;" असें शहास वचन दिलें; तेव्हां शहानें त्यास प्रतिबंधांतून मुक्त केलें; व तो रायसीन येथें आपल्या भावाकडे गेला. नंतर या उभयतांबंधूंनीं चितोडच्या राण्याची मदत मिळविली; आणि ते शहाच्या हातून निसटून चितोड येथें सुरक्षीत पोहोंचले. इकडे शहानें रायसेनचा किल्ला व शहर आपल्या ताब्यांत घेतलें; व इस्लामाबाद, हुशंगाबाद वगैरे शहरें आपल्या हस्तगत करून घेऊन तिकडे त्यानें आपला अंमल बसविला.

त्यानंतर बहादूरशाहा हा चांपानेरकडे येत असतां, त्यास, पोर्तुगीज लोकांनीं कित्येक मालांनीं भरलेलीं जहाजें दींव बंदरांत आणिलीं आहेत. " अशी बातमी मिळाली; ह्मणून तो तसाच संचायत येथें गेला; परंतु शहा दींव बंदरावर चाल करून येत आहे, अशी बातमी मिळाल्याबरोबर पोर्तुगीज जहाजें तेथून निघून गेलीं; नंतर शहा अहंमदाबाद येथें परत येऊन, तेथून त्यानें चितोडगडावर स्वारी केली. तेथील राणा विक्रमाजीत याचा पराभव केला. त्याच्या जवळून मोल्यवान् नजराणे व खंडणी घेतली; आणि तेथील वेढा उठवून तो अहंमदनगर येथें परत आला.

अशारीतीनें बहादूरशहा हा दिवसेंदिवस प्रबळ होत चालला होता; आणि तो आणखीही प्रबळ झाला असता; परंतु त्यानें मोंगल बादशहा हुमायून याच्या आज्ञेची

अवज्ञा केल्यामुळें, प्रबळ होण्याऐवजीं, कांहीं काळ पदभ्रष्ट होण्याचा मात्र त्याच्यावर प्रसंग आला. खोरासानचा राज्यकर्ता सुलतान हुसेन याचा नातू महंमद जमान मिर्झा हा आपल्या देशांतून पळून कांहीं दिवस हुमायूनजवळ येऊन राहिला होता. तो पुढें हुमायून यास सोडून अहंमदाबादेस बहादूरशहाजवळ येऊन राहिला होता; त्यास आपणांकडे परत पाठविण्याविषयीं हुमायून यानें बहादूरशहास कळविलें ! परंतु ही गोष्ट त्यानें अमान्य केली; व योगायोगानें चितोड काबीज करणारा गुजराथचा पूर्ण माहितगार व पराक्रमी सरदार रुमीखान हा बहादूरशहाच्या वचनभंगामुळें—चितोडगड काबीज केल्यास तो किल्ला तुला मी बक्षीस देईन, असें बहादूरशहानें रुमीखानास वचन दिलें होतें; परंतु किल्ला काबीज झाल्यावर शहानें त्याप्रमाणें न वागतां किल्ला आपल्याच ताब्यांत ठेवून वचनभंग केला, त्यामुळें—हुमायूनास मिळाला असल्यानें, त्याच्या माहितीचा हुमायून यास अमोलिक फायदा मिळाला; हुमायूननें गुजराथ प्रांत हस्तगत करून आपल्या ताब्यांत घेतला; बहादूरशहा पळून जाऊन पहिल्यानें मांडवगडच्या आश्रयानें राहिला; परंतु हुमायूननें तो किल्ला सर केल्यावर तो चांपानेर येथें पळाला; परंतु तेथेंही निभाव न लागल्यामुळें तो दींव बंदराकडे पळून गेला व हुमायून अहंमदाबाद येथें आला. इतक्यांत—त्यास पुढें पदभ्रष्ट करणारा—शेरखान यानें दिल्लीकडे बंडाळी माजविल्याची त्यास बातमी मिळाली; त्याबरोबर गुजराथचें काम अर्धवट टाकून,—आणि अहमदाबाद येथें आपला भाऊ हिंदाल, भडोच येथें कासमबेग, पाटण येथें यादगीरखान आणि चांपानेर येथें बाबा बेक झालेसरी, यांना आपल्या पाठीमागें बंदोबस्तास ठेवून—तो तसाच दिल्लीकडे परत गेला; आणि त्यानंतर बहादूरशहानें फौजेची जमवाजमव करून व महंमुदाबादेजवळ बादशाही फौजेचा पराभव करून नऊ महिन्यांतच आपलें गेलेलें राज्य पुन्हां मिळविलें.

त्यानंतर " दींवबंदरावर पोर्तुगीज लोकांनीं एक किल्ला बांधून त्याठिकाणीं ते आपली वस्ती पक्की करीत आहेत, " अशी बहादूरशहास बातमी समजली; तेव्हां त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां त्यानें तिकडे कांहीं सैन्य रवाना केलें; व उभयतांमध्यें कांहीं दिवस युद्ध चालून अखेरीस तह झाला; तेव्हां, शहा आपल्या भेटीस आल्यास आपणही त्याच्या परत भेटीस जाऊं, असें पोर्तुगीज लोकांनीं कबूल करून, बहादूरशहास आपल्या गलबतावर भेटीस बोलाविलें; तथापि यावेळीं उभयतांच्याही मनांत परस्परांविषयीं कपटभाव वसत होता; व ते परस्परांचा नाश करण्याच्या विचारांत होते; परंतु बहादूरशहा हा प्रथम पोर्तुगीज लोकांच्या भेटीस गेल्यामुळें त्यांचा डाव साधला व त्यांनीं त्यास व त्याच्या बरोबरील लोकांस समुद्रांत लोटून ठार मारिलें ! ( इ० स० १५३६ ) व अशा अकल्पित रीतीनें त्याच्या दहा वर्षांच्या कारकीर्दीचा शेवट झाला.

बहादूरशहा मृत्यू पावला, त्यावेळीं तो ७१ वर्षांचा होता; ह्मणजे आपल्या वयाच्या ६१ व्या वर्षीं तो गादीवर आला, हें उघडच होतें; तथापि साठी उलटल्यावर तो राज्यावर आला असूनही त्यानें जे अनेक कष्टाचे युद्धप्रसंग केले, ज्या अनेक स्वाऱ्या केल्या, अविश्रांत परिश्रम घेतले व जी कर्तबगारी दाखविली, त्यावरून त्याची असाधारण योग्यता निदर्शनास येते.

बहादूरशहा अशा अकल्पित रीतीनें मृत्यू पावल्यावर दरबारच्या मंडळीनीं त्याचा पुतण्या—त्याचा भाऊ लतीबखान याचा अज्ञान, अकरा वर्षांचा मुलगा महंमूदशहा ( दुसरा ) यास गादीवर बसविलें; व इमाद्-उल्-मुल्क् व दर्याखान हे दोन सरदार राज्य-कारभार चालवूं लागले; परंतु या उभयतांमध्यें वैमनस्य उत्पन्न होऊन इ० स० १५४४ पर्यंत त्यांचे आपसांत तंटे चालूच होते; परंतु त्यानंतर शहा वयांत आलेला असल्यानें, त्यानें आपल्या हातीं राज्यकारभार घेतला व बुऱ्हाण उल्–मुल्क् बाबी या हुषार सरदाराच्या—वजिराच्या मदतीनें व आलमखान लोदी यास सेनापति नेमून त्याच्याही सल्ल्यानें तो काम पाहूं लागला; तथापि दुर्दैवानें या शहाची कारकीर्द हिंदू व रजपूत लोकांना अतीशय नुकसानकारक झाली. त्यानें बुऱ्हाणच्या अनुमतीनें अनेक जहागिरदारांचीं उत्पन्नें भराभर खालसा केलीं; त्यामुळें सर्वत्र असंतोष उत्पन्न होऊन शिरोही, डोंगरपूर, इडर, लुनावाडा, राजपिंपळा, महीकांठा, झालावाड वगैरे ठिकाणच्या लोकांनीं बंडें केलीं; तेव्हां त्यांचें निर्मूलन करण्याकरितां सुलतानानें एकसारखें शस्त्र चालविलें; त्यामुळें हिंदुलोकांवर अतीशय जुलूम होऊन त्यांच्या वस्तींत दारिद्र्य, माजून सर्वत्र निरुत्साह व उदासीनता दिसूं लागली; व राजा आणि प्रजा यांच्यामधील प्रेमभाव नष्ट होऊन ते एकमेकांचे शत्रू बनले.

याचवेळीं महंमूदशहाचा सल्लामसलतगार माफीसखान यानें, शहा दारूच्या धुंदींत असतां त्याच्याकडून परवानगी घेऊन अल्लाउद्दीन लोदी—हा दिल्ली येथील प्रसिद्ध शिकंदर लोदी याचा भाऊ असून तो बहादूरशहाच्या वेळीं गुजराथेंत येऊन त्याच्या नोकरींत राहिला होता:—व सुलतानखान या दोघां सरदारांस विनाकारण ठार मारिलें; त्यावरून कांहीं सरदारांत आपसांत वैमनस्य येऊन जोराचें भांडण सुरू झालें; व तें विकोपास जाऊन इमाद् उल्मुल्क या नांवाचा एक सरदार मारला गेला, आणि पुढें लवकरच ( इ० सन १५५४ मध्यें ) वजीर बुऱ्हाण उल्मुल्क यानें महंमूदशहाचा खून करून स्वतः सुलतानपद बळकाविलें; परंतु त्याचा बलिष्ट प्रतिस्पर्धी शिरवानखान यानें त्याच्याशीं युद्ध केलें; व त्यांत विजयी होऊन त्यानें बुऱ्हाण यास ठार मारिलें.

त्यानंतर अहमदशहा या नांवाच्या राजघराण्यांतील एका मुलास दरबारी मंडळींनीं गादीवर बसविलें; ( ता० २९ फेब्रुवारी इ० सन १५५४ ) व पहिल्यानें सय्यद मुबारिक व नंतर इतिमादखान, हे अनुक्रमें वजीरीपदावर आले. तथापि दरबारांत पूर्वीप्रमाणेंच तंटेबखेडे चालू असून त्यांना दिवसेंदिवस अधिक अधिक उग्रस्वरूप येत चाललें होतें; ही संधी साधून गुजराथेवर स्वारी करण्याकरितां खानदेशाचा सुलतान तिकडून निघून भडोचजवळ नर्मदेपलीकडे येऊन उतरला; परंतु त्याचा बेत सफळ न होतां त्यास खानदेशामध्यें परत जाणें भाग पडलें; तथापि हें संकट दूर झाल्यावर सरदार मंडळींमध्यें अधीक अधीक चुरस व भांडणें होण्यास प्रारंभ झाला; अहंमदशहा दिवसेंदिवस अधीक अधीक व्यसनासक्त व कैफी बनत चालला; आणि शेवटीं इतिमादखान यानें अहंमदशहाचा वध करून ( ता० १२ एप्रील इ० सन १५६१ ) त्याचें प्रेत साबरमती नदीच्या रेतींत पुरून टाकिलें ! व नथू या नांवाच्या राजघराण्यांतील एका मुलास मुजफ्फरशहा ( तिसरा ) हें नांव देऊन, त्यास गादीवर बसवून व सर्व राज्यभर आपण श्रेष्ठ बनून, तो राज्यकारभार चालवूं लागला. मुज्फूरशहा हा वजीर इतिमादखान याच्या हातांतील एक निव्वळ कळसूत्रीबाहुलें बनलेला होता; सर्व गुजराथभर झोटिंगबादशाही माजली होती; राज्याचा सर्व घांस एकाच्याच घशाखालीं उतरणें अवघड असल्यानें त्याचे तुकडे, करून प्रत्येक प्रमुख सरदार ते आपल्या घशाखालीं उतरविण्याचा व पचविण्याचा उद्योग करीत होता; अहमदाबाद व खंबायत वगैरे ठिकाणें इतिमादखानाच्या ताब्यांत गेलीं होतीं; दुसऱ्या एका सरदारानें पाटण, सावर व बनास नदीच्या कांठचा प्रदेश बळकाविला होता, मघत इमादउलमुल्क याचा मुलगा चंगीझखान यानें भडोच, सुरत, चांपानेर व त्याच्या आसपासचा प्रदेश आपल्या अंगाखालीं घातला होता; सय्यद हमीद या सरदारच्या ताब्यांत धोळका व धंधुका, हे परगणे गेलेले होते; अमीरखान घोरी या नांवाच्या सरदारानें जुनागड व त्याच्या आसपासचा प्रदेश, ह्मणजे सोरटप्रांत आपल्या ताब्यांत घेतला होता; आणि राज्याची अशी सारखी कुत्तरओढ सुरू झाल्यानें, सर्व प्रजेची—व विशेषतः हिंदू प्रजेची अत्यंत विपन्नावस्था झाली होती. प्रत्येक सरदार स्वतःला शहाणा, सर्वज्ञ व स्वतंत्र समजत होता; सर्व प्रकारची शिस्त नाहींशी झाली होती; आपसांतील सलोखा व प्रेमभाव नष्ट झाला होता; गुजराथचें राज्य कांबळ्यावर टाकणारे लोभी शिष्ट सरदार पुढें पुढें सळकूं लागले होते; स्वार्थी महत्वाकांक्षेमुळें जुलूम व बेपर्वाईपणा उत्पन्न झाला होता; प्रजेसंबंधीच्या कर्तव्याच्या बेफिकीरपणाबरोबर बेहद्द स्वार्थ बोकाळल्यामुळें स्वतःचें महत्व स्थापन करण्याकरितां प्रत्येक सरदार साध्य व शक्य असलेले प्रत्येक सफीचे व साहसाचे इलाज योजण्यास तत्पर झालेला होता; सर्व सरदार व त्यांच्या फौजा मुसलमान असल्यानें—आणि त्यांतही पुन्हां फौजेवरील

योग्य दाब व नियंत्रण हीं नाहींशीं झालेलीं असल्यानें—हिंदूलोकांवरील अत्याचार, जुलूम व संकटें यांचा कळस होत चालला होता. हिंदूंनीं गंध लाविलेलें सहन होत नव्हतें; मुसलमानी वस्त्रांत आलेलें खपत नव्हतें; घोड्यावर बसलेलें चालत नव्हतें; त्यांच्या फिर्यादींची कोठेंच दाद लागत नव्हती; मजूरी व दुकानदारी यांशिवाय दुसरा धंदा त्यांना राहिला नव्हता; त्यांच्यांतील शांती, समाधान व सौख्य, हीं पार विलयाला जाऊन जिकडे तिकडे अशांती, असमाधान व असंतोष हीं पसरलीं होतीं; आणि "ना धनी ना त्राता" अशा भयंकर व असाधारण कष्टप्रद स्थितींत ते काळ कंठीत राहिले होते. थोडक्यांत म्हणजे—मध्यवर्ती सत्तेंतील जिवंत हुकमत व दरारा यांचा अभाव; आपआपले सवतेसुभे काढण्याच्या अट्टाहासांत व प्रयत्नांत उत्पन्न झालेली अशांतता, वर्चस्व प्राप्तीकरितां सुरू झालेला आपसांतील जोराचा झगडा, महत्वाकांक्षेमुळें दुणावलेली व परमावधीस गेलेली आपसांतील स्पर्धा व शत्रुत्व, त्यामुळें सर्वत्र फाटाफूट होऊन राज्यकारभाराची विस्कळीत झालेली घडी, धर्मवेडे व बदसल्लागार यांनीं घेरलेल्या सरदारांची विवेकभ्रष्टता, अनीति, अन्याय व अपहरण यांचा सुळसुळाट, दगा, अविश्वास व फंदफितुरी, हीं चोहोंकडे बोकाळल्यामुळें उत्पन्न झालेली धोक्याची परिस्थिती, आपसांतील यादवीची परमावधी, निव्वळ नशिबाच्या नांवेवरच आणि तरवारीच्या टोंकावरच राज्यकर्त्यांचें व सरदारमंडळीचें अवलंबून असलेलें अस्तित्व व जीवित व अशाच प्रकारच्या अनेक निरनिराळ्या कारणामुळें उत्पन्न झालेली क्षणभंगुर व अशाश्वत राजकीय परिस्थिती, हीं सर्व कारणें त्या राज्याच्या ऱ्हासाचीं उघड उघड पूर्वचिन्हेंच आहेत, असें दिसून येत होतें, इतक्यांतच एक निराळीच राजकीय परिस्थिति निर्माण झाली, आणि तिनें हा अखेरचा परिणाम फारच लवकर घडवून आणिला.

मोंगल बादशहा तैमूरलंग याचा वंशज सुलतानहुसेन मिर्झा, आणि त्याचे तीन मुलगे—महंमदहुसेन मिर्झा, मसाऊदहुसेन मिर्झा, आणि अलीहुसेन मिर्झा, हे तीन मुलगे—दिल्ली येथें अकबर बादशहाशीं भांडून गुजराथेंत येऊन राहिले होते; आणि इकडे वजीर इतिमादखान याचीं इतर सरदारमंडळीबरोबर भांडणें सुरू असून शिवाय शहाही

---

टीप १:—"मिर्झा" हा शब्द फारशी असून, त्याचाही अर्थ "शहाजादा" या शब्दाप्रमाणेंच, राजपुत्र, असा आहे व तो फक्त राजघराण्यांतील पुरुषासच लावण्याचा प्रघात आहे. "अमीर" हा आरबी व "खान" हा तुर्की शब्द आहे व ते दोन्हीही "मिर्झा" या अर्थाचे आहेत; आणि "बेग" खानाहून थोड्या कनिष्ट योग्यतेचा, असें मानण्याचा प्रचार आहे.

त्याच्यावर उलटला होता व आपसांत युद्धकलह सुरू होते; अशा स्थितींत, आपला एकट्याचा निभाव लागणें कठीण असें जाणून, इतिमादखानानें, अकबर बादशहास गुजराथेवर स्वारी करून येण्याविषयीं पाचारण केलें; अकबर हा ह्यावेळीं आपल्या साम्राज्याची वृद्धि करण्याच्या खटपटींत होता; त्यामुळें त्याला गुजराथच्या राज्याचें हें मौल्यवान्, पिकलेलें फळ आपल्या पदरांत पाडून घेण्याची आयतीच सुसंधी प्राप्त झाली व तिचा योग्य फायदा करून घेण्याकरितां तो मोठ्या तयारीनिशीं इ० सन १५७२ मध्यें एकदम डिसा[1] येथें येऊन धडकला व तेथून तसाच अहमदाबाद येथें आला; तथापि त्यापूर्वींच मुजफ्फरशहा हा पाटणच्या सुभेदारासह अकबराच्या भीतीनें राजधानींतून पळाला होता. त्यास अकबरानें पकडून आणवून योग्य बंदोबस्तांत ठेविलें; इतर सर्व बंडखोर सरदार अकबरास शरण आले; त्यानंतर, आपण विजयी झालों व आतां आपला बादशाही अंमल याठिकाणीं व प्रांतभर चालू झाला, असें सर्वांस जाहीर व्हावें ह्मणून, त्यानें, गुजराथच्या सर्व, पूर्वबादशाहतींतील, सरदार मंडळीस बरोबर ठेवून व आपण एका मोठ्या हत्तीवर बसून, अहमदाबाद शहरांत एक मोठी थाटाची स्वारी काढिली; नंतर एक मोठा दरबार भरवून सर्व हुद्देदार कामगार, सरदार-दरकदार व अमीरउमराव एकत्र जमवून, त्यांच्या विचारानें त्यानें आपल्या नांवाचें नाणें पाडण्याचा ठराव केला; सर्व राज्यभर मशीदींतून आपल्या नांवानें खुत्बा वाचण्याविषयीं हुकूम फर्माविला; यापुढें सर्व सरदार मंडळींनीं दिल्लीच्या बादशहाच्या अमलाखालीं शांततेनें व एकविचारानें वागलें पाहिजे, अशी त्यांना ताकीद दिली; इतिमादखान, हब्बदखान हबशी वगैरे दंगेखोर सरदारमंडळीकडून, पुढें चांगली वर्तणूक ठेवीत जाण्याबद्दल, जामीन घेतले; हा सर्व देश तुमच्या आपसांतील भांडणांनीं अगदीं विपन्नावस्थेप्रत येऊन पोहोंचला आहे; तरी यापुढें असले बखेडे माजल्यास तें मला बिलकुल पसंत पडणार नाहींत व त्यांची मी तिळमात्रही उपेक्षा करणार नाहीं; अशी त्यानें सर्वांना ताकीद दिली; आणि सर्वप्रकारचा बंदोबस्त करून व अकबर बादशहाकडे अहमदाबादचें तख्त व गुजराथचें राज्य येऊन (ता० १८ नोव्हेंबर इ० सन १५७२) त्याच दिवशीं त्याचा विजयध्वज अहमदाबाद येथील महाद्वारावर फडकला; आणि माळवाप्रांत तर पूर्वींच इ० सन १५२६ पासून गुजराथच्या राज्यांत सामील झालेला असल्यामुळें, गुजराथ व माळवा प्रांताचा व्यापक व महत्वाचा प्रदेश, मोंगल बादशाहींत सामील होऊन, या स्वतंत्र मुसलमानी राज्याची समाप्ती झाली.

---

टीप १:—हें ठिकाण पालनपूर संस्थानांत, पालनपूरपासून १८ मैलांवर बनास नदीच्या कांठीं आहे. या गांवास पूर्वीं फरीदाबाद हें नांव होतें; पालनपूर हें अहमदाबाद—अजमीर रेल्वेवर एक स्टेशन असून तेथून डिसा येथें आगगाडीचा फांटा गेलेला आहे.

**२ माळवा**—दक्षिणहिंदुस्थान व उत्तरहिंदुस्थान यांना विभागणारी रेषा, ढोबळ मानानें पाहतां, नर्मदा नदी ही आहे व तिच्या पलीकडे माळवाप्रांत आहे. या प्रांताच्या पूर्वेस बुंदेलखंड, पश्चिमेस गुजराथ, दक्षिणेस नर्मदा नदी, आणि उत्तरेस चंबळा नदी असून पंचमहाल जिल्ह्यांतील दोहद ही गुजराथची पश्चिम व माळव्याची पूर्व सरहद्द आहे, आणि हा प्रदेश नर्मदा, चंबळा, बटवा, क्षिप्रा वगैरे नद्यांनीं व्याप्त असून त्यांतील बहुतेक जमीन सुपीक आहे. हा प्रदेश इ० सन १२२६ मध्यें मुसलमानांच्या ताब्यांत गेला; या वर्षी गुलाम वंशांतील राज्यकर्ता सुलतान शम्सुउद्दीन अल्तमश (कारकीर्द इ० सन १२१० ते १२३५ ) यानें माळवा प्रांतावर स्वारी करून मांडवगडचा प्रसिद्ध किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला; आणि पुढें इ० सन १२३१ मध्यें त्यानें ग्वालेर व उज्जयनी हीं दोन प्रसिद्ध ठिकाणें आपल्या ताब्यांत घेऊन उज्जयनी येथील सर्व देवालयांचा त्यानें विध्वंस उडविला; व याच काळापासून माळवा प्रांतांत मुसलमानांचें ठाणें बसून त्या प्रांताची व्यवस्था दिल्लीदरबारांतून होऊं लागून ती फिरोज तुघ्लकच्या कारकीर्दीच्या ( कारकीर्द इ० सन १३५१ ते इ० सन १३८८ ) अखेरीपर्यंत टिकली; परंतु त्यानंतर दिल्लीस सारखे घोटाळे माजले; ग्यासुद्दीन, नंतर अबूबकर, व त्यानंतर महंमदशहा, अशी राज्यकर्त्यांची उलटापालट झाली; आणि महंमदशाही राज्यावर आल्यावर चारच वर्षांत ( इ० सन १३९४ मध्यें मृत्यू पावून त्याचा मुलगा हुमायून ऊर्फ शिकंदर हा गादीवर आला, पण तोही एकाएकी मृत्यू पावला; व महंमदशहाचा दुसरा मुलगा महंमूद हा गादीवर आला, म्हणजे फिरोजच्या मृत्यूनंतर दिल्ली येथें सारखी अव्यवस्था माजत चालली होती; आणि मध्यवर्ती सत्ता पूर्णपणें कमजोर होऊन, धाडसी व शूर सरदार–मंडळी आपआपलीं स्वतंत्र राज्यें निर्माण

---

**टीप १:**—मांडवगड हें पुरातन ओसाड शहर हलीं धार संस्थानांत असून सर्व मध्यहिंदुस्थांत येथील किल्ल्या इतका पुरातन व मजबूत किल्ला दुसरा नाहीं; हें ठिकाण नर्मदा नदीच्या पूर्व कांठावर उत्तरेस १५ मैलांवर, महू पासून ३०, धार पासून २० व इंदूर पासून ३८ मैलांवर आहे. हें निर्जन शहर समुद्रसपाटी पासून १९४४ फूट उंचीवर असून त्याशहराची व्याप्ति आठ मैलांची आहे; हें ठिकाण विंध्यपर्वताच्या ओळीस लागलेलें असून माळवा प्रांताच्या मुसलमान राज्यकर्त्यांची याठिकाणीं राजधानी होती. माळव्याचा सुलतान हुशंगशहा घोरी यानें मांडवगडचा किल्ला उत्कृष्टरीतीनें बांधून मजबूत केला; शिवाय त्यानें बांधिलेली संगमरवरी दगडांची जुम्मामशीद, बाजबहादूर यानें बांधिलेला राजवाडा, वगैरे प्रेक्षणीय स्थळें, तेथें पूर्ववैभवाचे अवशेष म्हणून आज तागायत अस्तित्वांत आहेत.

करण्याच्या उद्योगास लागलीं होतीं. दिल्ली येथील बादशाही वजीर खाजाजहान यानें बंगालप्रांत हस्तगत करून घेऊन जोनपूर येथें, सारंगखान यानें पंजाबांत, मुजफरशाहा यानें गुजराथेंत, मलिकराजा फरुकी यानें खानदेशांत, आणि त्याप्रमाणेंच माळव्याचा सुभेदार दिलावरखान घोरी यानें माळव्यांत, आपआपलीं स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं होतीं; व स्वतंत्र राज्यकर्ते या नात्यानें ते सर्व आपला राज्यकारभार चालवूं लागले होते; इतक्यांतच दिल्ली येथील भानगडी तैमूरलंगाच्या कानावर जाऊन, तो दिल्लीवर चाल करून आला; तेव्हां सुलतान महंमूद हा गुजराथेंत व त्याठिकाणीं त्यास आश्रय न मिळाल्यानें, माळव्यांत पळून आला; त्यास दिलावरखानानें मोठ्या उदारपणानें आश्रय देऊन तीन वर्षे आपल्या राजधानींत मांडवगड येथें मोठ्या आदरानें व सत्कारानें ठेवून घेतलें; व तो दिल्ली येथें परत गेल्यावर, माळवा प्रांताचा पूर्ण स्वतंत्र राज्यकर्ता, ह्मणून तो राजरोसपणें कारभार करूं लागला; (इ० सन १४०१;) व त्यानंतर चारच वर्षांनीं, इ० सन १४०५ मध्यें तो मृत्यु पावून, त्याचा मुलगा आलफखान हा हुशंगशहा हें नांव धारण करून गादीवर बसला.

हुशंगशहा हा गादीवर आल्यावर दरबारांतील त्याच्या प्रतिस्पर्धी सरदार-मंडळींनीं त्यास पदभ्रष्ट करण्याची खटपट सुरू केली; व गुजराथचा सुलतान मुजफरशहा, यास माळवा प्रांतावर स्वारी करण्यास बोलाविलें; त्याप्रमाणें मुजफरनें माळवा प्रांतावर स्वारी करून व तो प्रांत जिंकून आपल्या ताब्यांत घेऊन हुशंगशहास पदभ्रष्ट केलें; व आपला भाऊ नुसरतखान याची तेथील कारभारावर नेमणूक केली; तथापि नुसरतखानानें तो प्रांत लवकरच सोडून दिला; त्यावेळीं हुशंगशहानें मुजफरशहास खुष करून पुन्हां माळव्याचें राज्यपद मिळविलें; पुढें इ० सन १४१७ मध्यें त्यानें खानदेशाचा सुलतान मलिक नासीरखान यास मदत करून त्याचा भाऊ रफतीखान याजकडून त्यास थाळनेर हें ठिकाण मिळवून दिलें व नंतर इ० सन १४१८ मध्यें, त्यानें गुजराथ प्रांतावर स्वारी केली; परंतु तींत त्यास अपयश येऊन, उलट गुजराथचा राज्यकर्ता अहंमदशहा यास खंडणी द्यावी लागली. हुशंगशहा यानें मांडवगडचा किल्ला उत्कृष्टरीतीनें बांधून मजबूत केला; व हुशंगाबाद [१] हें शहर वसविलें; त्याप्रमाणेंच त्यानें मांडवगड येथें एक संगमरवरी दगडाची "जुम्मामशीद" या नांवाची एक मोठी प्रेक्षणीय इमारत बांधण्यास सुरवात केली; ती पुढील काळांत पूर्ण झाली. ही इमारत अतिशय भव्य असून, तिला ३६०

---

**टीप १:**—हें जिल्ह्याचें व कमिशनरीचें ठिकाण मध्यप्रांतांत नर्मदा नदीच्या कांठीं भोपाळजवळ आहे; आणि नर्मदा नदीच्या पलीकडे भोपाळचें राज्य आहे; ह्मणजे नर्मदानदी ही मध्यप्रांत व भोपाळचें राज्य यांना विभागणारी जलरेषा आहे.

कमानी, व २०० घुमट आहेत. हुशंगशहा हा माळवा प्रांतांत अतिशय लौकिकवान् व लोकप्रिय होऊन गेला असून, त्यानें हिंदूलोकांस कधींही दुखविलें नाहीं, अथवा त्यांच्या देवालयांस अथवा धार्मिक बाबतींतील इतर कृत्यांस तिळमात्रही उपसर्ग केला नाहीं व सर्वांना ममतेनें व निःपक्षपातपणानें वागविलें, याबद्दल माळवप्रांत आजतागायत त्याची कीर्ति आहे. या प्रजावत्सल दुर्दैवी शहाचा इ० सन १४२८ मध्यें दक्षिणेंतील बहामनी राज्याचा सुलतान अहंमदशहा यानें पराभव केला व तेव्हांपासून तो विपन्नावस्थेंत व विपत्तींत येऊन अखेरीस इ० सन १४३२ मध्यें त्याचा अंत झाला!

हुशंगशहानंतर त्याचा मुलगा गज्नीखान हा माळवाप्रांताच्या गादीवर आला; परंतु त्याच्या बलिष्ट वजीर महंमदखान खिलजी यानें त्यास ठार मारून राज्यपद बळकाविलें; ( इ० सन १४३५ ) त्यामुळें माळवप्रांतील घोरी राजघराण्याचा शेवट होऊन खिलजी घराण्याचा त्या प्रांतावर अंमल चालू झाला.

सुलतान महंमद खिलजी हा मोठा शूर व मुत्सद्दी राज्यकर्ता होता. त्यानें इ० सन १४४० मध्यें गुजराथचा सुलतान अहंमदशहा याच्याशीं मसलत करून उभयतांनीं मिळून मेवाडचा प्रसिद्ध राणा कुंभ याच्यावर स्वारी केली; त्यावेळीं कुंभराणाही आपली एक लक्ष फौज व चौदाशें हत्ती घेऊन, मेवाडच्या राज्याच्या सरहद्दीवरील माळवाप्रांताच्या मैदानांत आला; आणि त्याठिकाणीं त्यानें या उभयतां राजकर्त्यांचा पराभव करून, माळव्याचा राज्यकर्ता महंमद यास कैद करून चितोड येथें नेलें; व पुढें खंडणी वगैरे न घेतां त्यास मोठ्या सन्मानानें बंधमुक्त करून आपल्या राजधानींत परत पाठविलें. या विजयाचें द्योतक ह्मणून राणा कुंभ यानें चितोड येथें एक विजय-स्तंभ उभारिला, तो आजतागायत अस्तित्वांत आहे. त्यानंतर राणा कुंभ यानें हिसार प्रांतावर आपली फौज नेऊन तेथें आपलें राज्य स्थापन केलें; त्यावेळीं माळव्याच्या सुलतानाचें सैन्य राण्याच्या मदतीस गेलें होतें; त्यावरून या उभयतां राज्यकर्त्यांमध्यें पुढें सख्य कायम राहिलें होतें, असें दिसतें,

त्यानंतर इ० सन १४५१ मध्यें, महंमदशहानें गुजराथचा सुलतान कुत्बूशहा ( कारकीर्द इ० सन १४५१ ते १४५८ ) याच्यावर स्वारी करून त्याचा पराजय केला;

---

टीप १:—चितोड हें इतिहासप्रसिद्ध ठिकाण राजपुताना माळवा रेलवेच्या खांडवा ते अजमीर या मार्गावर निमचच्या पुढें, राजपुतान्यांत, उदेपूर संस्थानांत एक रेलवे स्टेशन असून तेथून व आगगाडीनेंही शहराजवळ असलेला तेथील भव्य व प्रसिद्ध किल्ला दिसतो; गांव आणि किल्ला यांच्यामध्यें रेलवे स्टेशन असून तेथून पुढें उदेपूर येथें आगगाडीचा फांटा गेला आहे.

आणि उभयतांमध्यें तह होऊन दोघांनीं मिळून मुसलमानी धर्माची वृद्धि करावी, असें ठरलें; परंतु महंमदशहा व कुंभराणा यांचें सख्य असल्यामुळें हा तह पुढें अमलांत आला नाहीं; तथापि महंमदशहानें वर्चस्वप्राप्तीकरितां त्यानें आसपासच्या रजपूत राज्यकर्त्यांशीं अनेक युद्धप्रसंग करून अजमीर व रतनभोर येथील राज्यकर्त्यांस जिंकिलें; ( इ० सन १४५५ ) व त्यांच्याकडून खंडणी मिळवून तो राजधानींत परत आला.

पुढें सहाच वर्षांनीं, इ० सन १४६१ मध्यें बहामनी सुलतान हुमायूनशहा हा मृत्यू पावला; व त्याचा आठ वर्षांचा मुलगा निजामशहा हा गादीवर आला; व तो अज्ञान असल्यामुळें त्याची आई, बहामनी राज्याचा प्रसिद्ध वजीर खाजेखान महंमद-गवान याच्या मदतीनें राज्यकारभार चालवूं लागली; ही संधी साधून माळव्याचा सुलतान महंमदशहा यानें बहामनी राज्यावर स्वारी केली; व इलीचपूरचा परगणा आपल्या ताब्यांत घेतला; त्यावेळीं बहामनी सैन्यानें त्याच्याशीं युद्ध केलें; परंतु शिकंदरखान तुर्क या नांवाच्या एका सरदाराच्या मित्रेपणामुळें बहामनी सैन्याचा पराभव झाला; आणि निजामशहा आपली राजधानी बेदर येथें पळून गेला; तेव्हां महंमदशहानें त्याचा पाठलाग करून बेदर शहर आपल्या ताब्यांत घेतलें; इतक्यांत निजामशहास गुजराथचा सुलतान महंमूद बेगडा यानें मदत देऊन—माळवा प्रांतांत फौज पाठवून महंमदशहास शह देऊन—यास बेदरचा वेढा उठवून माळवा प्रांतीं परत जाण्यास भाग पाडिलें; आणि तो परत आल्यावर बहामनी सैन्यानें मार्गांत त्यास इतकें जेरीस आणिलें कीं, अत्यंत कष्टानेंच तो कसाबसा एकदांचा आपल्या राज्यांत सुरक्षीतपणें परत आला. तो इ० सन १४६९ यावर्षीं मृत्यू पावला; आणि त्याचा मुलगा ग्यासुद्दीन हा त्याच्या मागून गादीवर आला.

सुलतान महंमूदशहा यानें आपल्या कारकीर्दींत अनेक युद्धें केलीं; तरी पण राज्यकारभारांत कोणतेही घोटाळे न माजतां अंतर्व्यवस्थेची योग्य तजवीज रहावी म्हणून त्यानें अतीशय काळजी घेतली होती; शिवाय—जरी त्याच्या परराज्यांवरील स्वाऱ्यांमुळें रयतेस त्या त्या वेळीं त्रास भोगावा लागत असे तरी—तो धर्मवेडा अथवा हिंदुधर्मद्वेष्टा नसल्यानें त्याच्यापासून हिंदूप्रजेस त्रास झाला नाहीं. त्यानें आपलें राजधानीचें ठिकाण मांडवगड येथें अनेक इमारती बांधून त्या शहरास शोभा आणिली; आणि हुशंगशहाच्या वेळीं सुरू झालेली भव्य मशीद त्यानें पूर्णतेस नेली. थोडक्यांत म्हणजे महंमूदशहाही मोठा शूर, हुषार व कर्तव्यदक्ष राज्यकर्ता होऊन गेला, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सुलतान ग्यासुद्दीन हा आपल्या वडिलांबरोबर नेहमीं राहून राज्य व युद्ध कारभार, यांत तरबेज झालेला होता; त्यामुळें तो अतीशय दक्षतेनें राज्यकारभार चालवीत असे; तो छानछोकी, डामडौल व भपका यांचा अतीशय भोक्ता असून शांतताप्रीय होता; व त्याच्या कारकीर्दींत प्रजेस सौख्य व शांती यांचा अतीशय लाभ झाला होता. चितोडचा पराक्रमी राणा रायमल्ल याच्यावर गुजराथचा सुलतान मुज्फरशहा यानें व या शहानें मिळून स्वारी केली होती; परंतु त्यांत या उभयतांचा पराभव होऊन त्यांना माघार घेणें भाग पडलें. या युद्धांत मुज्फरशहाच्या मुलास रायमल्ल यानें कैद केलें होतें; परंतु खंडणी घेऊन रायमल्लने त्यास सोडून दिलें; हा शहा एकतीस वर्षे राज्य करून इ० सन १५०० मध्यें मृत्यू पावला व राज्यप्राप्तीकरितां त्याच्या मुलांत आपसांत युद्धकलह होऊन, अखेरीस नासीरुद्दीन हा गादीवर आला.

या सुलतानाची कारकीर्द त्याच्या बापाच्या मानानें पाहतां अल्प ह्मणजे बारा वर्षांची असून त्या काळांत फारशा महत्वाच्या गोष्टी घडल्या नाहींत; तथापि त्यानें एकदां चितोडवर स्वारी करून तेथील राज्यकर्त्यांचा पराभव केला होता, यावरून तो शूर होता असें दिसतें. हा सुलतान इ० सन १५१२ मध्यें मृत्यू पावला व त्याचा मुलगा महंमूदशहा हा गादीवर आला.

सुलतान महंमूदशहा यास हें राज्यपद अतीशय कष्टानें व मेदिनीराय या नांवाच्या एका शूर रजपूत सरदाराच्या मदतीनें मिळालें होतें; त्यामुळें मेदिनीराय हाच सर्व राज्यांत श्रेष्ठ सत्ताधारी बनला होता; त्यानें सर्व राज्यसूत्रें आपल्या हातांत घेतलीं; सर्व मुसलमान अधिकाऱ्यांना रजा देऊन त्यांच्या जागीं हिंदूलोकांच्या नेमणुका केल्या; राज्यकारभारांत हिंदूंचा अतीशय भरणा करून, त्यांचें महत्व वाढविलें; त्यामुळें मुसलमान मंडळी त्याच्या विरुद्ध झाली; आणि अखेरीस शहाचें व त्याचेंही वांकडें आलें; आणि मेदिनीरायाशीं त्यानें युद्धही केलें; परंतु अखेरीस त्याचा निभाव न लागल्यामुळें तो गुजराथचा सुलतान मुज्फरशहा याच्या आश्रयास पळून गेला; त्याची मदत मिळवून व परत येऊन, त्यानें आपलें राज्य पुन्हां मिळविलें; सर्व हिंदू अधिकाऱ्यांना काढून टाकून पुन्हां पूर्वीप्रमाणें आपल्या राज्यांत मुसलमानी वर्चस्व स्थापन केलें; आणि मेदिनीराय मांडवगड येथून पळून चितोड येथें जाऊन राणा संग याच्या आश्रयास राहिला; तेव्हां मुज्फरशहा व महंमूदशहा या उभयतांनीं चितोडवर स्वारी केली व युद्धसंग्राम होऊन त्यांत या उभयतांचा पराभव झाला व महंमूदशहा युद्धांत घायाळ होऊन राणा संग याच्या हातीं जिवंत सांपडला; तथापि राणा संग यानें क्षात्रधर्मास अनुसरून, मोठ्या उदारपणानें त्याच्या सर्व जखमा मोठ्या काळजीनें बऱ्या केल्या व त्यास मोठ्या सन्मानानें व इतमामानें आपल्या राजधानींत

मांडवगड येथें परत पाठवून दिलें. पुढें इ० सन १५२५ मध्यें, गुजराथचा सुलतान मुज्फूर-शहा हा मृत्यू पावल्यावर त्याचा मुलगा शिकंदरशहा ऊर्फ बहादूरशहा हा गादीवर आला; तेव्हां त्याच्या विरुद्ध ज्या खटपटी झाल्या; त्यांत महंमूदशहा याचें अंग होतें; ह्मणून बहादूरशहानें माळवा प्रांतावर स्वारी केली व त्याच्या राजधानीचें शहर मांडवगड, हें आपल्या ताब्यांत घेतलें; तेव्हां महंमूदशहा हा आपल्या सहाही मुलांसह त्यास शरण आला व बहादूर-शहानें त्या सर्वांना कैद करून आपल्या सरदारांबरोबर, योग्य बंदोबस्तानें, त्यांची अहंमदाबाद येथें रवानगी केली; परंतु मार्गांत महंमूदशहा तर्फे कांहीं भिल्ल लोकांनीं बंडावा करून, त्यांना सोडविण्याचा प्रयत्न केला; त्यामुळें बहादूरशहाच्या सरदारांनीं महंमूदशहास व त्याच्या सहाही मुलांस ठार मारिलें.—आणि अशारीतीनें माळव्यांतील खिलजी राज्याचा शेवट होऊन तो प्रांत गुजराथच्या राज्यांत—आणि पुढें हा सर्व प्रदेश मोंगलसाम्राज्यांत सामील झाला.

**३ खानदेश**—खानदेश, हा महाराष्ट्रांतील एक मोठा प्रदेश असून पूर्वी साधारणतः ढोबळ मानानें या प्रदेशाची हल्लींच्या खानदेशाहून पुष्कळच अधिक व्याप्ति होती; हल्लींच्या खानदेशचे पूर्व आणि पश्चिम असे दोन जिल्हे असून, त्याच्या जिल्ह्यांचीं मुख्य ठिकाणें अनुक्रमें जळगांव व धुळें हीं आहेत. या सर्व प्रदेशाची पश्चिम सरहद्द गुजराथ, पूर्व सरहद्द वऱ्हाड, दक्षिण सरहद्द महाराष्ट्राची डोंगरसपाटी व उत्तर सरहद्द माळवा ही असून, या प्रदेशांत तापी, गिरणा, पूर्णा, पांझरा, बोरी, वाघूर वगैरे नद्या वहात असून गुजराथच्या सरहद्दीवर धडगांव पलीकडे नर्मदानदी आहे; व खानदेशच्या प्रदेशांतून तापी नदी पूर्व पश्चिम वहात जाऊन गुजराथेंत सुरतजवळ आरबी समुद्रास मिळालेली आहे. हा प्रदेश पूर्वी यादव ऊर्फ जाधव घराण्याच्या ताब्यांत होता. पुढें सुलतान मुबारिक खिलजी यानें स्वतः दक्षिणेंत येऊन रामदेवराव यादवाचा जांवई हरपाळदेव याचा नाश केल्यावर हा प्रदेश सर्व महाराष्ट्रासह मुसलमानी अंमलाखालीं गेला; ( इ० सन १३१८ ) व ह्या प्रदेशाचा कारभार पाहण्याकरितां मुसलमान सुभेदारांच्या दिल्ली येथून नेमणुका होऊं लागल्या. पुढें महंमद तुघ्लखच्या कारकीर्दींत गुजराथेंत बंड झालें; तें त्यानें स्वतः तिकडे जाऊन मोडून टाकिलें; परंतु या बंडखोरांना दक्षिणच्या सुभेदारानें आश्रय दिला होता; ह्मणून त्याचें—इस्मईलखान ऊर्फ नासीरुद्दीन याचें, त्याचा मदतनीस व बहामनी राज्याचा संस्थापक जाफरखान याचें व त्याच्या इतर साह्यकारी सरदार मंडळींचें—पारिपत्य करण्याचा त्यानें विचार केला; तेव्हां या सरदार मंडळींनीं बादशहाविरुद्ध बंड केलें; व शेवटीं, जाफरखानानें " अल्लाउद्दीन हसन कांगो बहामनी " असा किताब धारण करून ( ता १२ आगष्ट इ० सन १३४७ ) दक्षिणेंत बहामनी राज्याची

स्थापना केली. या राज्याचा विस्तार सर्व महाराष्ट्रदेशभर असून उत्तरेस नर्मदानदी, दक्षिणेस कृष्णानदी, पश्चिमेस सह्याद्रिपर्वत व पूर्वेस तैलंगणचें राज्य व गोंडवनचें अरण्य, ह्या त्यांच्या चतुःसिमा होत्या. सुलतान महंमद याच्या कारकीर्दीत वऱ्हाड व खानदेश मिळून एक सुभेदार असून त्यांचें राहण्याचें मुख्य ठिकाण इलीचपूर हें होतें; व इमाद्-उल्मुल्क् या नांवाचा एक सुभेदार ह्या प्रदेशाचा कारभार पहात होता; परंतु दक्षिणेंतील उपरीनिर्दिष्ट सरदार मंडळींनीं बंड केल्यानंतर या सरदारानें आपलें राहण्याचें मुख्य ठाणें एलीचपूर—आणि आपला सर्व कारभार—सोडिला; आणि तिकडून निघून तो त्यावेळीं गुजराथेंत मोडत असलेल्या *नंदुरबार या गांवीं येऊन राहिला; आणि वऱ्हाडांतील इतर अधिकारी मंडळी, या दक्षिणेंतील बंडवाल्या सरदार मंडळीस मिळून हें बंड यशस्वी झालें; व सुलतान महंमद यानें बहामनी राज्याचें स्वातंत्र्य मान्य केलें. (इ० सन १३५१) आणि *नंदुरबार व +सुलतानपूर या दोन पश्चिमेकडील जिल्ह्यांचा प्रदेशच काय तो दिल्लीपतीच्या अमलाखालीं राहिला; आणि इ० सन १३७० पर्यंत हीच व्यवस्था चालू राहिली; यावर्षी दिल्लीचा सुलतान फिरोज तुघलक हा गुजराथेंत असतां एकदां शिकारीस गेला. त्यावेळीं त्याची व त्याच्या लोकांची चुकामूक होऊन सुलतान एकटाच एकीकडे गेला; तेव्हां मलिकराजा फरुकी या नांवाच्या, सुलतानाच्या खास पागेंत नौकरींत असलेल्या एका सुनी पंथी तरुण आरब मनुष्यानें त्याला वेळेवर

---

**टीपः-१** इलीचपूर हें तालुक्याचें व सबडिव्हिजनचें ठिकाण, वऱ्हाडांत उमरावती जिल्ह्यांत उमरावतीहून सडकेनें अजमासें ३२ मैल आहे व जी. आय. पी. रेलवेच्या नागपूर लाइनीवरील मूर्तिजापूर स्टेशनपासून इलीचपूरपर्यंत आगगाडीचा फांटा गेला आहे. इलीचपूर हें जुनें गांव असून तेथून अजमासें तीन मैलांवर परतवाडा हा नवा गांव वसलेला आहे; व तेथपर्यंत उत्तम सडक असून अजमासें मधोमध रेलवेस्टेशन आहे. इलीचपूर येथें पूर्ववैभवाचे अवशेष आजतागायत अस्तित्वांत आहेत.

* **टीपः-२** नंदुरबार हें पश्चिम खानदेशांतील तालुक्याचें ठिकाण धुळ्यापासून सडकेनें अजमासें ३२ मैलांवर वायव्येस असून, तें तापी व्हॅली रेलवेवर एक स्टेशन आहे. हें गांव नंदगवळी यानें वसविलें अशी आख्यायिका आहे.

+ **टीपः-३** सुलतानपूर हें गांव पश्चिम खानदेशांत, शहादें तालुक्यांत शहाद्यापासून अजमासें १३ मैलांवर आहे व हें गांव हल्लीं मोडकळीस आलेलें असून तेथील किल्ला व त्याच्या भिंती, यांचे अवशेष अद्यापि अस्तित्वांत आहेत; शहादें हा गांव धुळ्यापासून सडकेनें वायव्येस ४८ मैलांवर व तापी व्हॅली रेलवेच्या जळगांव ते सुरत या मार्गावरील दोंडाईचें या स्टेशनपासून अजमासें वीस मैल आहे.

योग्य मदत देऊन त्याची उत्तम काळजी घेतली; त्यामुळें बादशहानें खुष होऊन त्यास खानदेशच्या सरहद्दीवरील थाळनेर व करांडा हे दोन बादशाही अमलाखालील प्रदेशांपैकींचे परगणे त्यास बहाल केले; मलिक हा मुळचा उच्चकुलांतील असून तो खलीफा उमर याचे आपण बावीसावे वंशज आहों असें ह्मणत असे; व त्याचा बाप चंद्जेहान हा अल्लाउद्दीन खिलजीच्या कारकीर्दींत वजीरीपदावर असे. मलिक हा आपल्या या छोट्याशा जहागिरींत स्थानापन्न झाल्यावर, त्यानें ×बागलाणचा राजा भारजी याच्यावर स्वारी केली; आणि त्याचा पराभव करून, त्यास दिल्लीपतीला वार्षिक खंडणी पाठविण्यास भाग पाडिलें; व दिल्लीपतीकडे सोनेरी नक्षीकाम केलेल्या भरगच्ची मौल्यवान् झुलांसह कांहीं हत्ती व अनेक उंटांवर खानदेशमध्यें उत्पन्न होणारे उत्तम मलमल व इतर जिन्नस, नजराणे ह्मणून पाठविले. त्यामुळें बादशहानें खुष होऊन त्यास "सिपाई सलार"—ह्मणजे बहाद्दर शिपाई अथवा सेनापति—असा किताब दिला व त्याची मनसब तीन हजार घोडेस्वारांनीं वाढविली. त्यानंतर लवकरच त्याच्याजवळ बारा हजार घोडेस्वारांचें सैन्य जमलें; त्यानें आसपासच्या प्रदेशांवर आपला उत्तमप्रकारें दरारा बसविला; आसपासचे सत्ताधारी त्याच्या मैत्रीची अपेक्षा करूं लागले; आणि पुढें फिरोज तुघलख याच्या मृत्यूनंतर, मलिक राजीचा मुलगा मलिक नासीर याचें माळवा प्रांताचा स्वतंत्र राज्यकर्ता दिलावरखान घोरी याच्या मुलीशीं लग्न झाल्यामुळें (इ० सन १३९० मध्यें) तर मलिक राजाचा पक्ष पुष्कळच प्रबळ होऊन त्याचें अतीशय वर्चस्व वाढलें. त्यानंतर गुजराथप्रांत सर करण्याच्या इरायानें, त्यानें गुजराथचा नुकताच स्वतंत्र बनलेला राज्यकर्ता मुज्फूरशहा याच्या ताब्यांतील सुलतानपूर व नंदुरबारच्या प्रदेशावर स्वारी केली; परंतु मुज्फूरशहास ही बातमी समजल्याबरोबर—जरी त्यानेंही हे बादशाही जिल्हे बळकाविले होते तरी—तो झपाट्यानें कूच करून तिकडे आला; आणि त्याचा पराभव करून त्यास ×थाळनेर येथें परत पिटाळून लाविलें. त्यानंतर तो

× टीपः-१ बागलाण हा नाशिक जिल्ह्यांत एक तालुका असून त्याचें सटाणें हें मुख्य ठिकाण आहे. जी. आय. पी. च्या मनमाड स्टेशन पासून मालेगांव सडकेनें अजमासें २४ मैल व पुढें सटाणें २४ मैल आहे; व थेटपर्यंत पक्की सडक आहे.

× टीपः-२ थाळनेर हा गांव, पश्चिम खानदेशांत, शिरपूर तालुक्यांत तापी नदीच्या कांठीं, धुळ्यापासून ईशान्येस अजमासें २८ मैलांवर व शिरपूर पासून अजमासें सोळा मैलांवर आहे; व शिरपूर हें तापी व्हॅली रेलवेच्या नरडाणा या स्टेशनपासून अजमासें १२ मैलांवर मुंबई आग्रा रोडवर आहे; व या तालुक्यास होळकराच्या राज्यांतील शेंधवा तालुक्याची हद्द लागलेली आहे.

आपल्या राज्यांतच स्वस्थपणें राहून व शेती सुधारून त्यानें राज्याची भरभराट केली. ( इ० सन १३९४-१३९९ ) दौलताबाद येथील प्रसिद्ध साधुपुरुष झैनउद्दीन हा त्याचा शिक्षक व धर्मगुरू होता; व त्यानें मलिक यास एक " शुभदायक व कल्याण-कारक " झगा, गुरुप्रसाद ह्मणून दिला होता; व तो त्याच्या घराण्याचा नाश होईपर्यंत प्रत्येक राज्यकर्त्याकडून पुढील राज्यकर्त्यास मोठ्या काळजीनें सोपविण्यांत येत होता. मलिकराजा यानें आपल्या मृत्यूपूर्वी आपला वडील मुलगा मलिकनासीर याच्या स्वाधीन हा झगा केला. त्याच्या राज्यांत लळिंग व थाळनेर असे दोन किल्ले होते; त्यांपैकीं लळिंगचा किल्ला त्यानें आपला वडील मुलगा मलिक नासीर यास व थाळनेरचा किल्ला आपला धाकटा मुलगा इफ्तीखान यास दिला; मलिकराजा हा ता० २८ एप्रील इ० सन १३९९ रोजीं थाळनेर येथें मृत्यू पावला; त्याठिकाणीं त्याची सुंदर कबर अद्यापि अस्तित्वांत आहे.

मलिकराजा फरूकी याच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा मलिक नासीर हा गादीवर आल्याबरोबर त्यानें लागलींच बऱ्हाणपूरजवळील अशीरगडचा प्रसिद्ध किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन, तें आपल्या राजधानीचें ठिकाण केलें; आशा या नांवाचा एक अहीरजातीचा अति श्रीमंत राजा या काळांत अशीरगड येथें असून त्यानेंच तो किल्ला बांधिला होता व किल्ला विशेष बळकटही होता; आशा हा अतीशय श्रीमंत होता व अशीर-गडसारखा मजबूत किल्ला त्याच्या ताब्यांत होता; तरीसुद्धां तो आपण होऊन मलिकराजा याच्या वर्चस्वाच्या आधीन झाला होता व मलिक यास त्याची सत्ता स्थापन करण्याच्या कामीं त्यानें अनेकप्रकारें मदत केली होती व नासीरशींही तो सख्यत्वानें वागत होता. त्यास नासीर यानें असें कळविलें कीं, " बागलाण, अंतूर आणि केहरला येथील राज्यकर्ते माझ्याबरोबर युद्धास उभे रहात आहेत; आणि माझ्या ताब्यांत फक्त लळिंगचा एकटाच काय तो किल्ला असून तोही अशीरगडसारखा मजबूत नाहीं; त्यामुळें अशावेळीं लळिंग येथें बायकामुलें ठेवणें धोक्याचें आहे; ह्मणून माझ्या मंडळींना राहण्याकरितां आपल्या किल्ल्यांत जागा द्यावी. " आशा हा नासीर यास आपल्या सख्यत्वांतील समजत असल्यामुळें, त्यानें नासीरच्या ह्मणण्यास ताबडतोब मान्यता दिली; त्यानंतर नासीरनें हत्यारबंद शिपायांनीं भरलेल्या पडद्याच्या पालख्या अशीरगडावर पाठविल्या व आशाच्या मनांत कोणत्याही-

---

१ टीपः-१ लळिंग हें धुळें तालुक्यांत चाळीसगांव धुळें सडकेवर धुळ्या-पासून ६ व चाळीसगांव पासून ३० मैलांवर असून तेथील किल्ला पूर्वकाळीं विशेष महत्वाचा ह्मणून गणला गेला होता.

प्रकारें संशय नसल्यानें त्यानें त्या किल्ल्यांत येऊं दिल्या. नंतर त्या लोकांनीं एकदम प्रगट होऊन, आशाचा, त्याच्या मुलांचा व इतर सर्व मंडळींचा नाश करून किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. ( इ० सन १३९९ ) नासीर यास ही जयाची बातमी समजल्यावर तो स्वतः अशीरगड येथें आला; त्यानें तेथील किल्ला अधीक मजबूत केला व तें आपल्या राजधानीचें ठिकाण केलें. त्यानंतर लौकरच, त्या घराण्याचा धर्मगुरु झैनउद्दीन हा साधू-पुरुष या विजयाबद्दल नासीर याचें अभिनंदन करण्याकरितां तेथें आला व त्याच्या आज्ञे-वरून नासीर यानें, झैनउद्दीन याच्या नांवाचें स्मारक ह्मणून झैनाबाद व दौलताबाद येथील प्रसिद्ध साधपुरुष शेख बुऱ्हाणउद्दीन याच्या नांवाचें स्मारक ह्मणून बुऱ्हाणपूर ( बऱ्हाणपूर हा बुऱ्हाणपूर या नांवाचा अपभ्रंश आहे. ) हीं दोन शहरें तापीनदीच्या दोन कांठावर समोरासमोर वसविलीं व पुढें हेंच बुऱ्हाणपूर शहर खानदेशाची राजधानी होऊन अतीशय भरभराटीस आलें.

त्यानतर इ० सन १४१७ मध्यें मलिक नासीर यास, आपला भाऊ इफ्ती-खान याच्याविषयीं विकल्प मनांत येऊन त्यानें माळवा प्रांताचा सुलतान हुशंगशहा याची मदत मिळवून थाळनेर हें ठाणें आपल्या हस्तगत करून घेतलें; व इफ्तीखानास पकडून अशीरगड येथें आणून प्रतिबंधांत ठेविलें; नंतर हुशंगशहाच्याच मदतीनें त्यानें गुजराथचा सुलतान पहिला अहंमदशहा याच्या ताब्यांतील नंदुरबार–सुलतानपूरच्या प्रदेशावर चाल केली; परंतु त्यांत त्यास अपयश येऊन त्याची इतकी निकृष्टदशा झाली

---

टीपः—१ असाच प्रकार पुढील काळांत शीरशहानें केला आहे. ज्याप्रमाणें लळिंगचा किल्ला मलिक नासीर याच्या ताब्यांत होता, त्याचप्रमाणें चुनरगडचा किल्ला शीरशहाच्या ताब्यांत होता. ज्याप्रमाणें नासीर यानें अशीरगडचा किल्ला अधिक मजबूत असल्यानें, आपल्या बायकामुलांस तेथें ठेवण्याची आशा अहीर याजजवळ परवानगी मागितली होती, त्याप्रमाणेंच शीरशहा यानेंही रोहटसगडच्या बाबतींत तेथील किल्लेदार हरीकृष्ण याजजवळ मागितली होती; आणि त्याप्रमाणें उभयतांनाही ती मिळाल्यावर दोघांनीही सारखाच विश्वासघाताचा मार्ग पत्करून, सारखाच किल्ल्यांच्या मालकांचा नाश करून, अशीरगड व रोहटसगड हे किल्ले अनुक्रमें आपल्या ताब्यांत मिळविले होते. तथापि अखेरीस किल्ल्यांचे मालक त्यांनीं ठार मारिले, त्याबद्दल त्यांचा सूड उगविण्या-करितांच कीं काय, पण किल्ल्यांनींच त्या उभयतांचा नाश केला; फरक इतकाच कीं, शीरशहानें स्वतः कालिंजर येथील किल्ल्यास वेढा घातला असतां तो मृत्यू पावला; आणि मलिक नासीर हा शत्रुसैन्याकडून लळींगच्या किल्ल्यास वेढा पडून व त्यांत कोंडला जाऊन मृत्यू पावला.

कीं, तो कसा तरी मोठ्या कष्टानेंच थाळनेर येथें सुरक्षित येऊन पोहोंचला; व अहंमद्-शहाशीं तह करून, आपण होऊन आपणांवर ओढून आणिलेल्या या संकटांतून आपली मुक्तता करून घेतली. पुढें कांहीं वर्षांनीं मलिक नाशीरखान याची मुलगी मलिक-जहान हिचें अहंमदशहा बहामनी याचा मुलगा अल्लाउद्दीनशहा याच्याशीं लग्न झालें; व अहंमदशहाची मदत घेऊन नासीर यानें पुन्हां गुजराथच्या प्रदेशावर स्वारी केली; परंतु याहीवेळीं त्याचा पराभव होऊन त्यास माघार घ्यावी लागली. त्यानंतर अल्लाउ-द्दीन शहा हा सोनखेड येथील सौंदर्यसंपन्न राजकन्या परीचेहरा हिच्या प्रेमपाशांत पूर्णपणें बद्ध झाल्यामुळें मलिकजहान हीस वैषम्य उत्पन्न होऊन तिनें त्याबद्दल आपला बाप मलिक नासीर याजकडे गाऱ्हाणें केलें; तेव्हां गुजराथचा सुलतान अहंमदशहा याच्या मदतीनें नासीर यानें बहामनी राज्यावर स्वारी केली; आणि तींत त्यास पहिल्या पहिल्यानें यशही आलें; परंतु पुढें त्याच्या नशिबाचा फांसा फिरला; त्यानें बहामनी राज्यावर मारलेली मूठ त्याच्यावरच उलटली; बहामनी सरदार मलिक् उत्-तुजार यानें त्याचा पूर्ण पराभव केला; त्याची राजधानी बुऱ्हाणपूर ही शत्रूच्या हस्तगत झाली; शत्रुसैन्यानें त्याचा सारखा पिच्छा पुरविला, आणि शेवटीं लळिंग येथील किल्ल्यांत तो कोंडला जाऊन, त्याच कष्टप्रद स्थितींत आयास आणि आपत्तींत इ० सन १४३७ मध्यें त्याचा अंत झाला.

नासीरखानाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मिरान आदिलखान हा गादीवर आला; व त्यानें गुजराथचा सुलतान अहंमदशहा याच्या मदतीनें लळिंगचा किल्ला पुन्हां आपल्या हस्तगत करून घेऊन गुजराथच्या सैन्यास वेढा उठवून परत जाणें भाग पाडिलें; परंतु त्यानें अजमासें चार वर्षें राज्य केल्यानंतर इ० सन १४४१ मध्यें त्याचा खून झाला; व त्याचा मुलगा मिरान मुबारिकखान हा गादीवर आला.

सुलतान मुबारिकखान हा मोठा शांतताप्रिय सुलतान असून त्याच्या कारकी-र्दींत नमूद करण्यासारखी अशी विशेष महत्वाची गोष्ट घडली नाहीं; त्यानें शांततेनें सतरा वर्षें राज्याचा उपभोग घेऊन तो इ० सन १४५७ मध्यें मृत्यू पावला; व त्याचा वडील मुलगा अदीलखान हा गादीवर आला.

सुलतान अदिलखान याची कारकीर्द पुष्कळ वर्षांची व विशेष महत्वाची आहे. त्यानें एकंदर ४६ वर्षें राज्य केलें व त्या अवधींत, त्यानें आपल्या राज्याची मजबुती करून प्रजेचीही अतीशय भरभराट केली. त्यानें आसपासच्या राज्याकर्त्यांवर आपली

हुकमत बसविली; गोंडवण व गडमंडला[1] येथील राज्याकर्त्यांना आपलें वर्चस्व मान्य करण्यास भाग पाडिलें; आणि भिल्ल, कोळी, लुटारू लोकांचा पूर्णपणें बंदोबस्त करून प्रवासाचे मार्ग निर्भय केले. त्यानें आशीरगडच्या किल्ल्याची अधिक मजबुती केली; बऱ्हाणपूर शहर नानाप्रकारानें सुशोभित केलें; तापीनदीच्या कांठीं आपणांस राहण्या-करितां एक सुंदर राजवाडा बांधिला; शिवाय शहराला तट, भरवस्तींत बाजारांत जुम्मा-मशीद, मृगयामंदिरें व मृगविहारवनें, उपवनगृहें व विशेषतः नजीकच्या डोंगरांतून नळानें बांधून सर्व शहरभर खेळविलेलें पाणी यामुळें या सुलतानानें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. शिवाय याच सुलतानाच्या कारकीर्दींत कलाकौशल्याला अतीशय उत्तेजन मिळून सोन्याचांदीचें काम, निरनिराळ्या प्रकारचीं रेशमी वस्त्रें व मलमल वगैरे विणकाम बऱ्हाणपूर येथें अत्युत्कृष्ट होत असे; व त्यामुळें या शहराच्या व्यापाराला अतीशय भरभराट आली असून सर्व हिंदुस्थानांत या शहराची प्रसिद्धी व लौकिक असे. या सुलतानास, गुजराथच्या राज्यकर्ता महंमूदशहा बेगडा ( कारकीर्द इ० सन १४५८ –१५११ पर्यंत ) यानें आपणांस, इ० सन १४९९ मध्यें खंडणी देणें भाग पाडिलें. त्याप्रमाणें आपल्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत तो गुजराथच्या सुलतानास खंडणी पाठवीत असे. आदिलखान हा इ० सन १५०३ मध्यें बऱ्हाणपूर येथें मृत्यू पावला आणि त्याचा भाऊ दाऊदखान हा गादीवर आला.

हा सुलतान गादीवर आल्यावर त्यानें निजामशाही राज्यावर स्वारी करून तिकडील कांहीं प्रदेश मिळविण्याचा विचार केला होता; परंतु तो सिद्धीस जाण्यापूर्वीच निजामशाही सैन्य त्याच्यावर चाल करून आलें व त्या सैन्यानें त्याचा पराभव करून त्यास आशीरगड येथें परत जाणें भाग पाडिलें व शेवटीं माळव्याच्या सुलतानाचें अंकितत्व पतकरून व त्याची मदत घेऊन तो या संकटांतून मुक्त झाला. हा सुलतान आठ वर्षें राज्य करून इ० सन १५१० मध्यें मृत्यू पावला.

दाऊदखानाच्या मृत्यूनंतर त्याचा अज्ञान मुलगा गझनीखान हा गादीवर आला; परंतु लवकरच त्याचा खून झाला; व त्यामुळें फरुकी घराण्याचा शेवट झाला; तथापि इतर प्रतिस्पर्धी हक्कदार पुढें आले; व त्यांच्या आणि त्यांचा पक्ष घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या

---

टीप १:—मंडला हें शहर, हल्लीं मध्यप्रांतांत एक जिल्ह्याचें ठिकाण असून त्यास "गडमंडला" असें हल्लींही ह्मणतात. हें शहर नर्मदानदीच्या कांठीं असून, बी. एन. रेल्वेच्या गोंदिया जबलपूर मार्गावर नैनपूर ह्मणून एक स्टेशन आहे. तेथून गडमंडलापर्यंत आगगाडीचा फांटा नेलेला आहे. नैनपूर हें जबलपूरपासून ६९ व गोंदि-यापासून ७३ मैलांवर असून नैनपूरपासून मंडला २७ मैल आहे.

भांडणांमध्यें गुजराथचा सुलतान महंमूदशहा बेगडा हा विजयी झाला; आणि त्यानें नासीरखान फरूकीचा मुलीच्या वंशाकडील नातू-म्हणजे महंमूदशहा बेगडा याच्या मुलीचा मुलगा—आदिलखान (दुसरा) यास गादीवर बसविलें. त्याचें गुजराथचा सुलतान मुजफरशहा दुसरा, याच्या मुलीबरोबर लग्न झालें होतें; त्यामुळें त्यास सासऱ्याच्या मदतीनें गादीवर स्थीर होतां आलें; इतकेंच नाहीं तर त्यास अहंमदनगरकर निजामशाहीचा मांडलीक, हल्लीं नाशिक जिल्ह्यांत असलेल्या गाळणा येथील राज्यकर्त्याकडून खंडणीही मिळवितां आली. शिवाय, तो आपल्या सासऱ्याबरोबर माळवा प्रांतावरील मोहिमेंत हजर असून तींत त्यानें प्रमुखत्वानें भाग घेतला होता. आदिलखान हा इ० सन १५२० मध्यें मृत्यू पावला; व त्याचा मुलगा मिरान महंमदखान हा राज्यावर आला.

मिरान यानें गादीवर आल्यावर वऱ्हाडचा राज्यकर्ता अल्लाउद्दीन इमादशहा (कारकीर्द इ० सन १४८४–१५२७) याची मदत घेऊन बुऱ्हाणनिजामशहा (कारकीर्द इ० सन १५०८–१५५३) याच्यावर स्वारी केली; परंतु त्याचा तींत पराजय झाला; तेव्हां गुजराथचा सुलतान बहादूरशहा हा मिरानच्या मदतीस आला; व त्या उभयतांनीं मिळून बुऱ्हाणशहावर स्वारी करून त्यास बहादूरशहाचें वर्चस्व मान्य करणें भाग पाडिलें. (इ० सन १५२६) त्यानंतर लवकरच त्याचे हुमायूनबरोबर युद्धप्रसंग सुरू झाले; त्यावेळीं मिरान हा बहादूरशहाबरोबर होता; पुढें इ० सन १५३६ मध्यें बहादूरशहास पोर्तुगीज लोकांनीं समुद्रांत बुडवून ठार मारिलें; तेव्हां दरबारच्या मंडळींनीं मिरान महंमद यास गुजराथच्या गादीवर बसविलें; परंतु दोनच महिन्यांत तो मृत्यू पावला; व इकडे खानदेशाच्या गादीवर मिरानचा भाऊ मुबारिक व तिकडे गुजराथच्या गादीवर बहादूरशहाचा अज्ञान पुतण्या महंमूदशहा हे गादीवर आले; तथापि गुजराथच्या दरबारांतील कांहीं मंडळी मुबारिक याच्या पक्षाची असल्यामुळें त्यांनीं, मुबारिक यास तिकडील गादीवर स्थानापन्न करण्याचा विचार केला; आणि मुबारिकही स्वतः तिकडे जाऊन त्या सर्वांनीं मिळून तसा प्रयत्न केला; परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं; तथापि सुलतानपूर व नंदुरबार हे दोन प्रांत मुबारिक यास मिळून त्याचा फायदा झाला. पुढें इ० सन १५६१ मध्यें पीर महंमदखान या नांवाच्या एका मोंगल सरदारानें, माळवा प्रांताच्या मार्गानें खानदेशावर स्वारी केली; आणि बऱ्हाणपूर शहराची कत्तल उडवून व सर्व प्रदेश उध्वस्त करून तो परत फिरला; परंतु मुबारिक यानें त्याचा पाठलाग करून व त्यास नर्मदानदीवर गांठून त्याचा पराभव करून अतिशय नाश उडविला; या सुलतानानें अजमासें बत्तीस वर्षें राज्य केलें; तो इ० सन १५६६ मध्यें मृत्यू पावला; आणि त्याचा मुलगा मिरान महंमद (दुसरा) हा गादीवर आला.

मिरान गादीवर आल्यावर ( कारकीर्द इ० सन १५६६ ते इ० सन १५७६ ) लवकरच त्याच्यावर गुजराथच्या सैन्यानें स्वारी केली; परंतु मिरान यानें वऱ्हाडच्या राज्यकर्त्यांची मदत मिळवून त्या सैन्याचा पराभव केला व त्यास परत जाणें भाग पाडिलें. त्यानंतर त्यास अशी बातमी मिळाली कीं, गुजराथच्या दरबारांतील कांहीं मंडळींची इच्छा आपण तिकडील गादीवर बसावें, अशी आहे; त्यामुळें तो आपल्या सैन्यासह अहंमदाबादेकडे गेला; परंतु गुजराथच्या सैन्यानें मार्गांतच त्याचा पराभव करून त्याच्या सैन्यसामुग्रीची अतीशय धूळधाण उडविली; त्यामुळें तो तसाच आशीरगड येथें परत आला. त्यानंतर खानदेशवर मोंगलांची व मूर्तुजानिजामशहाची अशा दोन स्वाऱ्या झाल्या; त्यामुळें या देशाची पुष्कळ नासाडी झाली; आणि निजामशहानें तर बऱ्हाणपूर शहराची धूळधाण उडवून अशीरगडलाही वेढा दिला व मिराननें त्यास खंडणी दिली तेव्हां तो उठविपर्यंत आला. मिरान हा इ० सन १५७६ मध्यें मृत्यू पावला व त्याचा मुलगा हुसेनखान हा अज्ञान असल्यानें, मिरानचा धाकटा भाऊ व हुसेनखानचा काका राजा अलीखान हा गादीवर आला.

सुलतान राजा अलीखान हा मोठा बुद्धिवान्, न्यायी, शहाणा, दूरदर्शी आणि शूर राज्यकर्ता होता. बादशहा अकबर याची सत्ता श्रेष्ठ आहे, आणि त्याच्यापुढें आपला निभाव लागणार नाहीं, असा दूरदर्शीपणाचा विचार करून त्यानें अकबराचें श्रेष्ठत्व मान्य केलें व त्याच्याकडे मौल्यवान् नजराणे पाठवून त्याची कृपा संपादन केली; इकडे अहंमदनगर व वऱ्हाडच्या सुलतानांमध्यें आपसांत युद्धकलह सुरू झाले; व त्यांत मूर्तुजा निजामशहानें वऱ्हाडकर सलाबतखान याचा पूर्णपणें पराजय केला; तेव्हां त्यानें बऱ्हाणपूर येथें येऊन राजा अलीजवळ निजामशहाविरुद्ध मदत मागितली; परंतु राजा अली यानें त्यास मदत देण्याचें नक्की अभिवचन दिलें नाहीं; तेव्हां त्यानें रागानें बऱ्हाणपूर शहर जाळून टाकिलें व उत्तरेस आग्रा शहराकडे तो निघून गेला; मध्यंतरीं राजा अली यानें त्याचा पाठलाग करून व त्यास नर्मदानदीवर गांठून त्याचा पराभव केला; तथापि सलाबतखान तसाच पुढें आग्रा येथें गेला; अकबर बादशहास भेटला; त्यास दक्षिणेकडील राजकीय परिस्थिति निवेदन केली; आणि त्याची मर्जी संपादन करून व मदत मिळवून तो मूर्तुजा निजामशहाबरोबर युद्ध करण्यास दक्षिणेंत आला; यावेळीं मोंगल व मूर्तुजा या उभयतांनींही राजा अलीखान यास आपल्या पक्षास मिळण्याबद्दल निक्षून आग्रह केला; तथापि अखेरीस राजा अलीनें निजामशहाचा पक्ष घेतला; आणि मोंगली सैन्याचा पराभव होऊन त्यास माघार घ्यावी लागली. त्यानंतर लवकरच खानखानान या मोंगल सरदाराच्या खटपटीनें तो अकबर बादशहाच्या नियंत्रणाखालीं आला; आपल्या राज्यांत अकबराच्या नांवाचें नाणें

पाडविलें व त्याच्या नांवानें,—खानदेशभर—खुत्बा वाचविण्यास सुरुवात केली. उलट अकबरानेंही त्यास खानदेशप्रांत बक्षीस दिला व आपल्या दरबारांतील पांच हजारी मनसबदारांमध्यें त्याचें नांव दाखल केलें. त्यानंतर इ० सन १५९४ मध्यें मोंगली सैन्यानें शहाजादा मुराद याच्या सेनापतित्वाखालीं निजामशाही जिंकण्याकरितां दक्षिणेवर स्वारी केली; त्यावेळीं राजा अली यानें, मोंगली सैन्यातर्फे, मुरादच्या हाताखालीं युद्ध करण्यांत महत्वाचा भाग घेतला होता; आणि अखेरीस—हल्लीं नगर जिल्ह्यांत मोडत असलेल्या—सुपेसोनपत या गांवीं उभयतांच्या सैन्यामध्यें एक भयंकर जोराचें युद्ध होऊन, त्यांत मोंगली सेना विजयी झाली; परंतु राजा अली हा शत्रुसैन्यावर मोठ्या शौर्यानें हल्ला चढवीत होता, इतक्यांतच अकल्पितरीत्या दारूनें भरलेल्या एका गाड्यावर ठिणगी पडून दारूचा भयंकर स्फोट झाला व त्यामुळें तो तात्काळ जागच्याजागींच ठार झाला !. ( ता० १६ जानेवारी इ० सन १५९७ ) राजा अलीखान याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मिरान बहादूरखान हा गादीवर आला.

मिरान बहादूरखान यानें अल्पकाळ, म्हणजे फक्त दोनच वर्षे काय तें राज्य केलें. त्यानें गादीवर आल्यावर बऱ्हाणपूरच्या पूर्वेस अजमासें सात मैलांवर बहादरपूर या नांवाचें एक गांव वसविलें; यावेळीं शहाजादा दानियल यांला मोंगल बादशहा अकबर यानें दक्षिणेच्या कारभारावर व कामगिरीवर नेमिलें होतें; राजा अली याच्या काळापासूनच खानदेशचें राज्य मोंगल बादशहाचें मांडलिक झालेलें होतें; तथापि मिरान बहादूरखान यानें ही गोष्ट लक्षांत घेतली नाहीं; दानियलची मर्जी संपादन केली नाहीं; इतकेंच नाहीं तर उलट त्यानें आपली वागणूक संशयास्पद ठेविली व तो अशिरगड येथें राहूं लागून त्याठिकाणीं दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी सामुग्री जमवूं लागला; त्यामुळें अकबराची त्याच्यावर गैरमर्जी झाली; आणि त्यानें स्वतः बऱ्हाणपूर येथें येऊन, खानदेशप्रांत उजाड करून टाकिला व अशीरगडला वेढा देऊन; अखेरीस तो किल्लाही त्यानें आपल्या हस्तगत करून घेतला. यावेळीं मिरान बहादूरखान किल्ल्यांत होता, तो किल्ला हस्तगत झाल्यावर अकबराच्या हातीं सांपडला; त्यास अकबरानें कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत प्रतिबंधांत ठेविलें;—व त्याच ठिकाणीं तो पुढें मृत्यू पावला;—आणि खानदेशचें अल्पायुषी राज्य नष्ट होऊन, अकबरानें तें मोंगली साम्राज्यांत—इ० सन १५९९ मध्यें—सामील केल्यामुळें त्या राज्याचा स्वतंत्र इतिहास समाप्त झाला.

---

# परिच्छेद सहावा.

## जंजिरेकर सिद्दी, पोर्तुगीज, आणि इंग्रज, यांची हकीकत.

### ( छत्रपति शिवाजी याच्या काळापर्यंत. )

१ जंजिरेकर सिद्दी-" जंजिरा " हा शद्ब " जझीरा "-Jazirah ह्मणजे " बेट " या अरबी शद्बाचा अपभ्रंश असून जंजिरा ह्मणजे पाणकिल्ला, असाही त्याचा अर्थ करितात. किल्लयाचे तीन प्रकार आहेत. ते भुईकोट, डोंगरी व पाण्यांतील हे होत. त्यापैकीं सपाट प्रदेशांत अथवा मैदान जमीनीवर बांधितात त्यास " भुईकोट " डोंगरावर अवघड जागा पाहून, सुळक्याजवळ किंवा उंचावर किल्ला बांधितात तो " डोंगरी, आणि भरसमुद्रांत, बेटासारखा पाण्यांत, बेटांत, अथवा जमीनीचा कपारीसारखा जो चिंचोळा भाग समुद्रांत लांबवर घुसतो, त्या जागेंत जो किल्ला बांधितात त्यास " जंजिरा " अथवा " पाणकिल्ला असें ह्मणतात, जंजिरा या नांवाचें हल्लीं एक संस्थान असून त्यास " हबसाण " " Habsan " असेंही ह्मणतात. हबसाणप्रांत कुलाबा जिल्ह्यांत असून त्याची पूर्व व उत्तर सरहद्द कुलाबा जिल्ह्यास लागलेली आहे. हा प्रांत मुंबईच्या दक्षिणेस, कुलाबा व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांच्या दरम्यान पश्चिम किनाऱ्याला असून महाड-दासगांवावरून बाणकोटाजवळ समुद्रास येऊन मिळणारी सावित्री नदी, ही जंजिरा संस्थानची-हबसाण प्रांताची दक्षिण व रत्नागिरी जिल्ह्याची उत्तर सरहद्द आहे. सावित्री नदीच्या मुखाजवळ दक्षिण बाजूस बाणकोट व उत्तर बाजूस-जंजिऱ्यापासून अजमासें बारा मैलांवर-श्रीवर्धन हीं गांवें आहेत. बाणकोटच्या खाडीच्या मुखाशीं, अंजनवेलच्या उत्तरेस पंधरा मैलांवर सुवर्णदुर्ग आणि दाभोळच्या खाडीच्या मुखाशीं दक्षिणतीरावर अंजनवेल हा किल्ला आहे, आणि बाणकोटच्या खाडीच्या दक्षिणतीरावर वेळास हा गांव आहे. श्रीवर्धनहून पुढें किनाऱ्या-किनाऱ्यानें मुंबईच्या मार्गावर थोड्याच अंतरावर राजपूरची महत्वाची खाडी आहे. ही खाडी फार लांब नाहीं; पण पुष्कळ खोल व रुंद आहे. त्यामुळें आरमार ठेवण्याला ती विशेष सोयस्कर जागा असून एक मैल आंत दंडा व राजपुरी अशीं दोन, परंतु दंडा-राजपुरी, या एकाच जोड नांवानें उल्लेखलीं जाणारीं लहान गांवें आहेत. त्यांपैकीं राजपुरी हें इ० सन १६६१ पासून मराठ्यांचें एक आरमारी ठाणें होतें. याच राजपुरी खाडीच्या मुखाशीं समुद्रांत जंजिरा हें बेट असून त्यावर एक मजबूत किल्ला बांधिलेला आहे. तेथून पुढें उत्तरेस रेवदंड्याची खाडी आहे. तिच्या दक्षिणेस रेवदंडा व उत्तरेस चौल हीं गांवें आहेत. चौलच्या उत्तरेस जवळच कुलाबा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण, अलीबाग हें शहर आहे. अलीबागच्या ईशान्येस समुद्रकिनाऱ्याजवळ कान्होजी आंग्रे

यानें बांधिलेला प्रसिद्ध व प्रचंड हिराकोट हा किल्ला आहे व अलीबागच्या पूर्वेस सहा मैलांवर, आणि मुंबईपासून १९ मैलांवर—हल्लीं हवा खाण्याचें स्थळ ह्मणूनही प्रसिद्ध असलेला—सागरगड या नांवाचा तसाच दुसरा एक प्रसिद्ध किल्ला आहे. पुणें जिल्ह्यांत खंडाळ्यापासून आठ मैलांवर लोहगड या नांवाचा बहामनी राज्याच्या काळापासून इतिहासप्रसिद्ध असा भीषण स्वरूपाचा एक किल्ला आहे. त्याच्या टोंकावरून मराठी राज्यांत अपराध्यांचा कडेलोट करीत असत; त्याप्रमाणेंच सागरगड किल्ल्याच्या एका टोंकावरून—यास "वानरटोंक" असें नांव आहे.—अपराध्यांना समुद्रांत सोडून बुडवून ठार मारीत असत. हा किल्ला समुद्रसपाटीपासून १३५७ फूट उंचीवर आहे. अलीबाग व मुंबई यांच्या दरम्यान खांदेरी व उंदेरी हीं दोन प्रसिद्ध खडकाळ बेटें एकमेकांपासून पाऊण मैलाच्या अंतरावर आहेत; आणि खांदेरी हें बेट तर मुंबई बंदरानजीक एक नाक्याची व मान्याची जागा ह्मणून अतीशय महत्वाचें गणलें गेलेलें आहे. जंजिरा हें शहर मुंबईपासून दक्षिणेस ४४ मैलांवर आहे; या प्रांताचें क्षेत्रफळ औरसचौरस ३२५ मैल असून काठेवाडांतील जाफराबाद हें संस्थानही याच राज्याच्या राजघराण्याकडे चालत आहे. त्याप्रमाणेंच हल्लीं सुरत जिल्ह्यांत, सुरत शहरापासून दक्षिणेस ९ मैलांवर सचीन या नांवाचें बेचाळीस औरस चौरस मैलांचें एक लहानसें संस्थान आहे. तेथील राजघराणें जंजिरेकर सिदी राजघराण्यापैकींच आहे. जंजिरेकर सिदी सरदारांचा आपसांत अतीशय एकोपा असून ते मराठ्यांचे एक जबरदस्त प्रतिस्पर्धी होते; त्यामुळें त्यांच्यांत फूट पाडण्याकरितां बाळूमिया या नांवाच्या एका सरदारास पुढील काळांत, नानाफडणिसानें त्यांच्यांतून फोडून आपल्या पक्षास मिळवून घेतलें; आणि त्यास सचीनची जहागिरी दिली; तेंच हल्लींचें सचीन संस्थान असून, बाळूमियाचे वंशज त्या राज्याचा आजतागायत उपभोग घेत आहेत.

हबसाण प्रांत बाराव्या व तेराव्या शतकांत देवगिरीकर यादवांच्या ताब्यांत होता; त्यानंतर पहिल्यानें विजयानगर व नंतर बहामनी राज्याच्या अमलाखालीं तो गेला. त्यावेळीं दिल्ली येथील दळणवळण कमी होऊन अॅबिसीनियन लोक—आफ्रिकाखंडाच्या ईशान्यकोंपऱ्यांत हबशीस ऊर्फ अॅबीसीनिया या नांवाचा एक देश असून, तेथील

---

टीप १:—जाफराबाद हें ठिकाण अहमदाबादेपासून दक्षिणेस १७० आणि बडोद्यापासून वायव्येस १६५ मैलांवर आहे. या संस्थानचें क्षेत्रफळ औरसचौरस ४२ मैलांचें असून जाफराबाद हें जंजिऱ्यापासून १९२ मैलांवर अग्नेय दिशेस आहे. व तें रनाईनदीच्या मुखाजवळ, समुद्रकिनाऱ्यापासून फक्त एक मैलावर असून व्यापाराचें एक महत्वाचें ठिकाण ह्मणूनही काठेवाडांत प्रसिद्ध आहे.

लोकांस हबशी अथवा सिद्दी असें ह्मणतात, ते लोक—आफ्रिकाखंडांतून हिंदुस्थानच्या पश्चिमभागांत आले; आणि चौल, रेवदंडा व दाभोळ वगैरे बंदरांत उतरून बहामनी राज्यांत नोकरीस राहिले; व त्या राज्यांतील " परदेशी " पक्षांत या लोकांचा पुष्कळ भरणा झाला. हे लोक दर्यावर्दी कामांत व त्याप्रमाणेंच शिपाईगिरींत निष्णात असत. प्रसिद्ध मलिकंबर हाही यांच्यापैकींच असून तो तर अलौकिक योद्धा व असामान्य मुत्सद्दी ह्मणून प्रसिद्धीस आला. " हबशी " हें नांव, " आरब-एल-हॅबिश "-Arab-el-Habish " यावरून पडलेलें असून, त्यांना " सिद्दी " अथवा " सिद्दी " असें ह्मणतात; व तो " सय्यद् " या शब्दाचा अपभ्रंश आहे. बहामनी राज्यानंतर निजामशाही अमलाखालीं हा प्रदेश गेला; बहामनी राज्य जिवंत असतां गोवें येथील बहामनी अधिकाऱ्याजवळ सिद्दी याकूत या नांवाचा एक आरमारावरील सरदार होता; त्याच्याकडेस निजामशाहीचा संस्थापक अहंमद निजाम-उल्-मुल्क यानें दंडाराजपुरी व जंजिरा येथील कारभार सोंपविला होता; व यावेळेपासून निजामशाही आरमार जंजिरा येथें हबशी सरदारांच्या देखरेखीखालीं राहूं लागलें होतें. हें आरमार मक्का येथें जाणाऱ्या व तेथून परत येणाऱ्या यात्रिकरूंची नेआण करीत असे; आणि इराण, अरबस्थान, आफ्रिका वगैरे देशांबरोबर जलमार्गानें चालणाऱ्या महत्वाच्या व्यापारावर-तो बिनधोक चालावा ह्मणून-देखरेख ठेवीत असे. ह्या हबशी सरदारांनीं जंजिरा येथील खाडीच्या मुखाशीं खडकावर इ० सन १५७१ मध्यें एक मोठा मजबूत किल्ला बांधिला; याच बळकट व मान्याच्या किल्ल्याच्या जोरावर व हबशी सरदारांच्या जुटीच्या बळावर ( Confederacy ) त्यांनीं मराठेशाहीच्या अखेरीपर्यंत मराठ्यांचे, जंजिरा हस्तगत करून घेण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ करून टाकिले; मध्यंतरीं या प्रदेशापैकीं चौल-रेवदंडा हें प्रसिद्ध बंदर पोर्तुगीज लोकांनीं हस्तगत करून घेऊन तेथें आपलें आरमारी ठाणें बसविलें. पुढें इ० सन १६०० मध्यें, अकबरानें निजामशाहीवर स्वारी केली, तेव्हां तो प्रदेश—मलिकंबर पुन्हां लवकरच हस्तगत करून घेईपर्यंत—तात्पुरता मोंगली अंमलाखालीं गेला होता. पुढें शहाजहान यानें, निजामशाही राज्य बुडविल्यावर, तो प्रदेश कांहींकाल शहाजीकडे, कांहींकाल मोंगलांकडे व अखेरीस, इ० सन १६३६ च्या तहाअन्वयें विजापूरकराकडे आला. आदिलशहानें या प्रदेशाचे दोन

---

टीप १:-अलिबाग व आसपासच्या प्रदेशास " अष्टागर " ह्मणजे आठ गांवचा समुदाय असें ह्मणतात; त्यांत चौल हें गांव विशेष प्रसिद्ध असून तें " चौल-रेवदंडा " या नांवानेंही ओळखलें जातें; हीं दोन्हीं गांवें कुलाबा जिल्ह्यांत असून, दाभोळ हें रत्नागिरी जिल्ह्यांत आहे.

भाग केले होते; त्यांपैकीं पहिला ह्मणजे उत्तरेकडील भाग असून त्याची हद्द कल्याण भिवंडीपासून नागोठण्यापर्यंत होती; व त्यावर त्यानें मोलाना अहमद या नांवाच्या एका मुसलमान अधिकाऱ्याची नेमणूक केलेली असून त्याचें राहण्याचें मुख्य ठिकाण कल्याण हें होतें व त्यास " कल्याणप्रांत " किंवा " कल्याणी प्रांत अशी संज्ञा होती; व दुसरा ह्मणजे दक्षिणेकडील भाग असून त्याची हद्द नागोठण्यापासून सावित्री नदीच्या मुखापर्यंत होती; व त्यावर सिद्दी अंबर या नांवाच्या एका हबशी सरदाराची नेमणूक केलेली असून त्याच्या ताब्यांत आरमाराची सर्व व्यवस्था सोंपविलेली होती; व त्याचें राहण्याचें मुख्य ठिकाण जंजिरा हें होतें. कल्याणी प्रांताप्रमाणेंच ह्या प्रदेशांत ही, महाडपासून उत्तरेस सोळा मैलांवर असलेल्या रायरी ऊर्फ रायगडसारखे अनेक मजबूत किल्ले असून, त्यांच्या बंदोबस्ताकरितां अदिलशाही राज्यातर्फे मराठा शिबंदी त्याठिकाणीं ठेवण्यांत आली होती.

शिद्दी अंबर हा इ० सन १६२१ मध्यें,—हा प्रदेश निजामशाही अमलाखालीं आल्यावेळेपासून—जंजिराप्रांताचा अधिकारी होता; पुढें इ० सन १६३६ मध्यें हा प्रदेश विजापूरकरांच्या ताब्यांत आल्यावर, अदिलशहानेंही त्यासच तेथील अधिकारी ह्मणून कायम ठेविलें. तो इ० सन १६४२ मध्यें मृत्यू पावला; व सीदी यूसफखान यानें इ० सन १६४८ पर्यंत तेथील कारभार पाहिला; परंतु तो विशेष कर्तृत्ववान् नव्हता; त्यास त्याचा मुलगा फत्तेखान यानें इ० सन १६४८ मध्यें पदभ्रष्ट केलें; व तो जंजिरा येथील अधिकारी झाला; तो मोठा शूर व कर्तृत्ववान् होता; आणि इ० सन १६५९ मध्यें ह्मणजे ज्यावेळीं विजापूरकर सरदार अफजलखान हा एका मोठ्या जोरदार अदिलशाही सैन्यासह शिवाजीवर चाल करून जात होता, त्यावेळीं, त्या संधीचा फायदा घेऊन फत्तेखानानें तळें व घोसाळें येथील किल्ल्यांस वेढा दिला होता; परंतु अफझलखानाचा व व आदिलशाही सैन्याचा शिवाजीनें नाश केला, असें कळल्यावर तो आपला वेढा उठवून मोठ्या लगबगीनें जंजिरा येथें परत गेला; तथापि पुन्हां लौकरच, ह्मणजे इ० सन १६६० मध्यें, दुसऱ्या अली अदिलशहानें शिद्दी जोहर ऊर्फ सलाबतजंग, व अफझल-खानाचा मुलगा फाजल महंमद यांना शिवाजीवर पाठविलें; व त्यांनीं शिवाजी पन्हाळा किल्ल्यावर आहे असें, पाहून त्यास वेढा दिला त्यावेळीं फत्तेखानानें पुन्हां शिवाजीच्या

---

टीप १:—नागोठणें, हें कुलाबा जिल्ह्यांत-पेण तालुक्यांत, पेणपासून १५ मैलांवर दक्षिणेस, आणि मुंबई पासून ४० मैलांवर नैऋत्येस असून तेथून महाबळेश्वर पर्यंत ७० मैलांची उत्तम सडक आहे; आणि दुसरीही एक अशीच सडक असून ती बोरघाटाच्या पायथ्याशीं मुंबई—पुणें सडकेस मिळालेली आहे.

ताब्यांतील कोंकणांतील प्रदेशावर स्वारी केली; त्यावेळीं विजापूरकरांचा आश्रित लखमसावंत, हाही त्यास येऊन मिळाला; तेव्हां शिवाजीनें राघो बल्लाळ व बाजी फसलकर यांना त्यांच्यावर पाठविलें; आणि इतर सरदारांकडे निरनिराळी कामगिरी सोंपवून पन्हाळा किल्ला स्वाधीन करून देतों, असें मिष दाखवून, शत्रूच्या गराड्यांतून मोठ्या शिताफीनें निसटून–विशाळगडकडे निघून गेला; आणि त्यानंतर एकच वर्षांत, इ० सन १६६१ या वर्षीं, अथवा त्या सुमारास, शिवाजीनें स्वतंत्र, असें " मराठ्यांचें आरमार " तयार केलें; शिवाजीनें कोंकणपट्टी आपल्या हस्तगत करून घेतल्यानंतर–समुद्रकिनारा आपल्या ताब्यांत परिणामावहरीतीनें परशत्रूच्या अतिक्रमणापासून सुरक्षित ठेवावयाचा असल्यास व पाणकिल्ल्यावर मारा किंवा हल्ला करावयाचा असल्यास, तो पाण्यांतूनच करावा लागत असल्यानें व सपाट प्रदेशापेक्षां समुद्रकिनारा हल्ला होण्याला अधीक उघडा, संरक्षणाला अधीक कठीण व धोक्याचा असल्यानें परशत्रूपासून त्याचें संरक्षण करण्याला जोरदार आरमाराची अत्यावश्यकता आहे, ही गोष्ट त्याच्या ध्यानांत आल्यानें एक मोठें जोरदार आरमार तयार केलें; त्याच्या सोईकरितां त्यानें कुलाबा, उंदेरी, अंजनवेली, रत्नागिरी, पद्मदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी, सरजाकोट, विजयदुर्ग, गहनदुर्ग, खाकेरी, सिंधुदुर्ग, व राजकोट, असे तेरा पाणकोट किल्ले बांधिले–आणि याच आरमारांत तुकोजी संकपाळ व त्याचा मुलगा कान्होजी संकपाळ ऊर्फ आंगरे– रत्नागिरी जिल्ह्यांतील हर्णै या गांवाजवळ आंगरवाडी ह्मणून एक गांव आहे, तेथील हे उभयतां मूळचे राहणारे असल्यामुळें त्यांना आणि त्यांच्या वंशजांना " आंगरे " हें उपनांव प्राप्त झालें.—हे प्रसिद्धीस येऊन, पुढील काळांत आंगरे ही एक मोठी जोरदार व जबरदस्त सागरी सत्ता बनली; इ० सन १६६०–६१ पर्यंतची हकीकत वरप्रमाणें आहे, आणि यापुढील हकीकत शिवाजीच्या काळांतील हकीकतींत येणार असल्यामुळें, ती याठिकाणीं ग्रथित केलेली नाहीं;

पोर्तुगीज व इंग्रज यांची–विशेषतः मराठ्यांच्या काळापर्यंतची हकीकत ग्रथित करण्यापूर्वीं जगांतील पूर्वकालीन व्यापारी व राजकीय घडामोडीची त्रोटक माहिती पहिल्यानें देणें आवश्यक आहे; कारण त्यामुळें तत्कालीन व्यापाराची स्थिति, महत्व व त्याकरितां झालेल्या अनेक भानगडी यासंबंधीं उपयुक्त माहिती होऊन पुढील हकीकत वाचतांना तिचा अतीशय उपयोग होईल ह्मणून ती पहिल्यानें थोडक्यांत दिग्दर्शीत करून नंतर पोर्तुगीज व इंग्रज यांची हकीकत दिलेली आहे.

पौर्वात्य देशांबरोबर पश्चिमेकडील देशांचें पुष्कळच पूर्वकाळापासून व्यापारी दळणवळण सुरू होतें, आणि आशियाखंडाच्या अग्नेयभागांतील संपत्तिमान व समृद्ध

देशाशीं तें अधिक प्रमाणांत होतें, तरीसुद्धां त्यांतल्या त्यांत विशेषतः हिंदुस्थान व मलायाद्वीप-समुच्चयांतील बेटांशीं होत असलेला व्यापार, हा जगांतील चालणाऱ्या सर्व व्यापाराचा एक अत्यंत किफायतशीर भाग ह्मणून गणला जात होता; शिकंदर बादशहाच्या मृत्यूनंतर टालेमी यानें मिसरदेश काबीज करून अलेक्झांड्रिया ही आपली राजधानी केली. त्यावेळेपासून तो "केप ऑफ गुड्‌ होपचा" शोध लागेपर्यंत जवळ जवळ अठराशें वर्षें हेंच शहर व्यापाराचें मुख्य स्थान असून जलमार्गानें चालणाऱ्या व्यापाराचें मध्यस्थान होतें. इ० सन ४० मध्यें मिसर व सीरिया हे देश रोमन बादशहाच्या ताब्यांत गेले; तेव्हां पूर्वेकडील व्यापाराचा हा अत्यंत किफायतशीर भाग आपल्या ताब्यांत रहावा व इजिप्तची सारखी भरभराट व्हावी असें त्यांना वाटत असे; ह्मणून तांबड्यासमुद्रांतील व्यापारी दळणवळण सर्वस्वीं आपल्या एकट्याच्याच हातीं रहावें ह्मणून त्यांनीं अतिशय परिश्रम घेतले व हिंदुस्थानचा व्यापार अरबलोकांपासून हिसकावून घेण्याकरितां व एडन आपल्या ताब्यांत आणण्याकरितां त्यांनीं अरबस्थानच्या नैऋत्यकिनाऱ्यावर पुष्कळवेळां आरमार पाठवून स्वाऱ्या केल्या; परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं. रोमनलोकांनीं "प्युनिकवार्स"-रोम व कार्थेज यांच्यामधील युद्धांस "प्युनिकवार्स" हें नांव आहे.-करून कार्थेजचा नाश केला; व तेथें त्यांनीं आपला अंमल बसविला, कार्थेज हीं मूळची फिनीशियनलोकांची वसाहत होती. भूमध्यसमुद्रांतून चालणारा व्यापार ह्या लोकांच्या हातीं होता; आणि त्यामुळें हे लोक संपत्तिमान्‌ बनलेले होते. कार्थेज हें एक बंदर असून तें सिसीली बेटानजीक आफ्रिकेचें टोंक ज्या ठिकाणीं भूमध्यसमुद्रांत शिरतें, त्यावर आहे. यावेळीं माल्टा, कार्सीका, सार्डीनिया, स्पेनलगतचीं बेटें व त्यांचा दक्षिणभाग वगैरे प्रदेश कार्थेजच्या अमलाखालीं मोडत असे; कार्थेज हें पूर्वेकडील व्यापारावरच अत्यंत श्रीमान्‌ झालें ही गोष्ट रोमनलोकांच्या लक्षांत आल्यावर त्यांनीं व्यापारी गलबतें बांधून भूमध्यसमुद्रांतून मोठ्या धडाक्यानें आपला व्यापार सुरू केला; आणि कार्थेजवर आपला पुढें अंमल बसविल्यावर त्यांनींच या प्रांतास आफ्रिका हें नांव दिलें.

"इंग्लंडदेश पृथ्वीवरील भूप्रदेशाच्या मध्यावर व समशीतोष्ण कटिबंधांत आहे. ह्या दोन भूगोलिक कारणांचा फायदा त्या देशास मोठा होतो. तेथून दक्षिणेकडे व पूर्वेकडे किनाऱ्याकिनाऱ्यानें येऊं लागलें ह्मणजे थेट चिनीसमुद्रापर्यंत आठ दहा हजार मैलांचा समुद्रकिनारा एकसारखा लागतो. ह्या किनाऱ्यावर व्यापाराचीं मोठमोठीं अनेक बंदरें असून निरनिराळ्या हवेंत उत्पन्न होणाऱ्या अनेक उपयुक्त जिनसांची नेआण ह्या सर्व बंदरांतून चाललेली असते; हिंदुस्थान व पूर्वेकडील बेटें येथील अपार संपत्तीची वार्ता अगदीं प्राचीन.

काळापासून पाश्चिमात्य राष्ट्रांस होतीं; मात्र पौर्वात्य राष्ट्रांस पाश्चिमात्य राष्ट्रें प्रत्यक्ष माहीत नव्हतीं. व्यापाराची नेआण निरनिराळ्या राष्ट्रांच्या हातांत असल्यामुळें अमूक ठिकाणच्या अमूक एका जिनसावरूनच एक राष्ट्र दुसऱ्यास ओळखीत असे. सुवेजच्या संयोगभूमीचा मध्येंच अडथळा आल्यामुळें पूर्वसमुद्रावरील माल भूमध्य समुद्रावर उतरण्यास दोन मार्ग होते. एक इराणच्या आखातांतून वर जाऊन पुढें जमीनीवरून युफ्रेटीस नदीच्या कांठानें आशियामायनरमधून जाई; आणि दुसरा तांबडया समुद्राच्या उत्तरकिनाऱ्यावर उतरून जमीनीवरून मिसरदेशांतून भूमध्यसमुद्रांत उतरे; पण ह्याशिवाय अगदीं उत्तरेकडचा एक तिसरा मार्ग होता. हा हिंदुस्थानच्या उत्तरेकडून निघून मध्यआशियांतील ऑक्सस ऊर्फ अमुदार्या नदीच्या कांठानें कास्पियन समुद्रावरून काळ्या समुद्रावर उतरे. ह्याचे कास्पियन समुद्राच्या उत्तरेकडून व दक्षिणेकडून असे दोन फांटे होते. ते दोन्हीं काळ्या समुद्रावर एकत्र होत. ह्यांपैकीं आशियामायनरमधून जाणारा मधला रस्ता अगदीं प्राचीन होय. हिंदुस्थानचीं जहाजें किनाऱ्याकिनाऱ्यानें इराणच्या आखाताच्या उत्तरटोकाशीं जाऊन तेथील बंदरांत हिंदुस्थानांतला माल विकीत; युफ्रेटीस नदीच्या मुखाजवळच्या प्रदेशास प्राचीनकाळीं खाल्डिया हें नांव होते. खाल्डियाच्या बंदरांत तो माल भरून उंटाचे तांडे उत्तरेस जाऊन मग वाळवंटांतून पश्चिमेस वळून पालमीरा ऊर्फ ताडमूर येथें येत. तेथून ते पुढें नैऋत्येस डमास्कस येथें उतरत. डमास्कस येथें त्यास दोन फांटे फुटत. एक समोर पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर जाई. त्यावर टायर, सिडोन, एकर, अस्कालन वगैरे प्राचीन शहरें होतीं. दुसरा दक्षिणेकडे वळून पॅलेस्टाईनच्या किनाऱ्यानें इडोमप्रांतांतून मिसरदेशांत शिरे; आणि तेथें तांबडया समुद्रावरील रस्त्याची व ह्याची भेट होई. प्राचीनकाळच्या व्यापाराचा मुख्य रस्ता हा मधला होय. " ( ब्रि० रि० पान ४–५ पहा. ) रोमन लोकांचें आरमार अरब लोकांना हुसकावून लावण्यास समर्थ नव्हतें; आणि हिंदुस्थानच्या पश्चिमकिनाऱ्यावर व पूर्वेकडील देशाशीं चालणारा युरोपियन लोकांचा समुद्रावरील व्यापार इजिप्त, सुएझ, एडन या मार्गानें हिंदीमहासागरांतून जलमार्गानें होत होता. हा व्यापार पाल्मिरा येथील सधन व धाडशी व्यापारी खुष्कीच्या मार्गानें इराणी आखातांतून युफ्रेटीस नदीच्या मुखांतून वर सीरियापर्यंत नेण्याचा प्रयत्न करूं लागल्यामुळें त्यांचें व रोमन लोकांचें अतीशय वांकडें येऊन पाल्मिरा शहराचा नाश होण्यास तेंही एक प्रमुख कारण होऊन बसलें.

आरबलोकांसंबंधीं मागें माहिती दिलेली असल्यानें अगदीं थोडक्यांतच त्यांच्यासंबंधीं विषयानुरोधानें याठिकाणीं खुलासा करणें आवश्यक आहे. अरब मुसलमान हे प्राचीनकाळापासून अरबस्थानांतील रहिवासी आहेत. महंमद पैगंबरासारखा कर्तृत्ववान्, पुढारी मिळेपर्यंत त्यांची फारशी प्रसिद्धी झाली नाहीं व आपल्या देशाबाहेरही ते फारसे

कधींही गेले नाहींत; परंतु महंमदाच्या प्रमुखत्वाखालीं या लोकांनीं अनेक पराक्रमाचीं कृत्यें केलीं; आसपासचे देश आपल्या ताब्यांत आणिले; दर्यावर्दीपणांत पुढाकार मिळविला, आणि लवकरच सर्व व्यापारही त्यांनीं हळु हळू आपल्या हस्तगत करून घेतला. खलीफा उमर यानें इराणदेश जिंकिला, तेव्हां तेथील व्यापार सर्वस्वी आपल्याच ताब्यांत ठेवण्याकरितां त्यानें बसरा शहराची स्थापना केली; आणि आरब व्यापारी थेट चीन-देशापर्यंत जाऊन तिकडील माल घेऊन येऊं लागले. पुढें आरबलोकांनीं मिसरदेशही आपल्या ताब्यांत घेतला; त्यामुळें अलेक्झँड्रियाच्या बंदरांत युरोपियन लोकांचा शिरकाव होईनासा झाला व पूर्वेकडील कोणताही माल त्यांना मिळेनासा झाला. या काळांत ब्याझेंटाईन राष्ट्र सुधारलेलें असून त्यामुळें तांबडा समुद्र आणि इराणी आखात यांमधील व्यापाराचे मार्ग निर्भय होते; आणि त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या आरमारांपैकीं ग्रीक-लोकांचें आरमार सर्वांत मोठें होतें; परंतु अव्यवस्थित राज्यकारभार व कर वसूल करण्यांत जुलूम यामुळें तें मोडकळीस येण्याच्या पंथास लागलें होतें. इतक्यांतच महंमदाच्या मागून गादीवर बसलेल्या राज्यकर्त्यांच्या हातांखालील आरबलोकांच्या टोळ्यांनीं वारंवार केलेल्या स्वाऱ्यांमुळें त्या राष्ट्राचा नाश झाला. इजिप्त आणि सीरिया या देशांमध्यें जेव्हां महंमदी धर्म अत्यंत जोरांत आला तेव्हां कांहीं काळपर्यंत कान्स्टांटि-नोपल हें शहर भूमध्यसमुद्राच्या पूर्वेकडील भागांतील व्यापाराची मुख्य उतारपेठ बनलें, आणि हिंदुस्थान व चीन ह्या देशाशीं असलेल्या युरोपियन लोकांच्या व्यापाराचा मुख्य ओघ, मध्य आशियांतून काळ्या समुद्राच्या मार्गाकडे वळला. “ आठव्या आणि नवव्या शतकांत कान्स्टांटिनोपल हें शहर युरोपस्थ व्यापाराचें मुख्य ठिकाण झालें होतें; आणि त्यावेळीं युरोपांतील व्यापार ह्या शहराबरोबर जितका पूर्णपणें चालत असे, तितका आजपर्यंत पुढें एकाही शहरांत चालला नाहीं. ” आरब लोकांनीं आफ्रिकेचा उत्तर किनारा आणि पोर्तुगाल व स्पेनचा प्रदेश काबीज केला; आणि सिसीली बेटापर्यंत ते जाऊन धडकले. पुढें सर्व ख्रिस्ती राष्ट्रांनीं मिळून मुसलमान लोकांविरुद्ध सात मोठमोठालीं धर्मयुद्धें केलीं; ( इ० सन १०९५ ते १२७२ ) परंतु त्यांत त्यांना यश न येतां—जरी प्रारंभीं ख्रिस्तीलोकांना यश आलें होतें तरी-अखेरीस मुसलमानांनाच जय मिळाला; अकराव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत ॲमल्फी, पीसा, फ्लारेन्स, व्हेनीस आणि जिनोवा, हीं इतालींतील प्रजासत्ताक शहरें व्यापारी पेठा बनून त्यांचा अतिशय उत्कर्ष झाला. चवथ्या धर्मयुद्धामध्यें व्हेनीस व जिनोवा या शहरांचा अतिशय फायदा झाला. या उभयतां शहरांनीं मुसलमान लोकांबरोबर होणाऱ्या चवथ्या युद्धाकरितां सैन्य नेण्याचा करार केला होता; परंतु सर्व ख्रिस्ती राष्ट्रांनीं मिळून कान्स्टांटिनोपल शहरावर व्यापारी

स्पर्धेमुळें, अदूरदर्शीपणानें हल्ला केला; व ग्रीक बादशाही बुडवून लॅटिन घराण्याची स्थापना केली. ( इ० सन १२०४ ) परंतु सत्तावन वर्षांतच इ० सन १२६१ मध्यें तें घराणें नष्ट होऊन ग्रीक घराणें पुन्हां अधिकारारूढ झालें; तथापि ग्रीक लोकांची पूर्वेकडील सत्ता नामशेष होत जाऊन आशियाखंडांतील मौल्यवान् व महत्वाचे व्यापारी जिन्नस युरोपमध्यें नेण्याच्या बाबतींत इतालींतील व्हेनीस व जिनोवा हीं दोन शहरें महत्वाचीं व मुख्य स्थानें बनलीं, आणि त्यांनीं पूर्वेकडील सर्व महत्वाचा व्यापार बहुतेक आपल्याच हातांत राखून ठेविला. दक्षिण युरोपांत या दोन्ही शहरांची व्यापारामुळें अत्यंत भरभराट होत असतां उत्तरयुरोपांत " हन्सा-लीग " ऊर्फ " हंस संघ " या नांवाचा एक संघ निर्माण झाला. डेनमार्क, स्वीडन, नार्वे वगैरे देशांतील पुष्कळ दर्यावर्दी लोक जर्मन व बालटिक समुद्र ह्यांवर चांचेगिरी करून तिकडील व्यापाराला अतिशय उपद्रव देत असत; तो बंद करण्याकरितां या संघाची स्थापना करण्यांत आली होती. हा काळ बऱ्याच अंदाधुंदीचा असल्यामुळें इ० सन १२४१ मध्यें हंबर्ग आणि ल्यूबेक या दोन शहरांनीं एकत्र होऊन आपआपल्या प्रदेशासभोंवतीं बंदोबस्त ठेवण्याचें ठरविलें; त्यानंतर ब्रन्सविक व ब्रेमेन हीं शहरें त्यांना येऊन मिळालीं; या काळांत, मुसलमान व ख्रिस्ती लोकांमधील धर्मयुद्धामुळें, आशियांतील व्यापारी माल युरोपांत अधिक प्रमाणानें मोठ्या जोरानें जाऊं लागला; त्यामुळें स्वाभाविकरीत्या व्यापाराला अतिशय तेजी येऊन त्याचें महत्वही विशेषच वृद्धिंगत झालें. या व्यापारांतील कित्येक बाबतींचा कुलमक्ता या संघानें आपणाकडेसच राखून ठेविला होता; त्यामुळें तो अतिशय श्रीमान् होऊन इतका बलाढ्य बनला होता कीं, त्यानें फ्रान्सचा राजा चवथा फिलीप याला इंग्लिशांचा फ्रान्सच्या किनाऱ्यावरील व्यापार बंद करण्यास भाग पाडिलें होतें; व इ० सन १३६९ मध्यें कोपेन हेगेन हें शहर घेऊन डेनमार्कचें राज्यही विक्रीस काढिलें होतें. या संघाचीं मुख्य शहरें ल्यूबेक, कलोन, ब्रन्स्वीक, आणि डांझिक हीं होतीं.—या एकाच गोष्टीवरून सुद्धां, आरमार व व्यापार यांचें महत्व, व्यापार हातीं आणण्याला आरमारी सत्तेची असणारी अत्यावश्यकता, आरमाराचें मूर्तिमंत अस्तित्व भासविण्याकरितां व त्याचा प्रचंड खर्च भागविण्याकरितां-थोडक्यांत ह्मणजे सत्ता, संपत्ति व साधनें हीं मिळविण्याकरितां-व्यापारी दळणवळण बिनधोक सुरू ठेवण्याची किती आवश्यकता असते, आणि ह्या सर्वच बाबती किती महत्वाच्या व परस्परावलंबी आहेत, हें पूर्णपणें निदर्शनास येतें.

पंधराव्या शतकांत जगाच्या इतिहासांत तीन अत्यंत महत्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्यांपैकीं पहिली ह्मणजे तुर्क लोकांनीं युरोपखंडांत आपला प्रवेश करून घेऊन

तिकडे राज्य स्थापन केलें, ही असून दुसरी ह्मणजे कोलंबसानें अमेरिका खंड शोधून काढिलें, ही होय व तिसरी ह्मणजे आफ्रिकेच्या दक्षिणटोंकास-" केप ऑफ गुड् होप " ला-वळसा घालून जातां येतां येण्याच्या मार्गाचा वास्कोडिगामा यानें लाविलेला शोध, ही होय. या शेवटच्या महत्वाच्या शोधामुळें युरोपखंडाचा आशियाखंडाशीं जलमार्गानें चाललेला व्यापार अतीशय वृद्धि पावला; जलपर्यटणें अधिक अधिक होऊं लागलीं; आणि आशिया-खंडाच्या दक्षिणेकडील व अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील देशांत जलमार्गानें सरळ दळणवळण चालण्याच्या नव्या रस्त्याचा शोध लागल्यामुळें व्यापाराचा मुख्य ओघ तिकडे वळून पुढें युरोपियन लोकांत आपसांतच भयंकर स्पर्धा उत्पन्न झाली व त्याचा परिणाम जगाच्या व विशेषतः हिंदुस्थानदेशाच्या इतिहासावर तर कल्पनातीत असाच घडून आला.

मध्यंतरीं व्हेनीस व जिनोवा या उभयतां शहरांमध्यें व्यापारी स्पर्धा सुरू असून त्यांतच आणखी कान्स्टांटिनोपल येथील रोमन सत्तेबरोबरही स्पर्धा सुरू असल्यानें तिचा पाडाव करण्याकरितां जिनोवा शहरानें तुर्की मुसलमानांची मदत मागितली; आणि त्यांनीं ती मोठ्या आनंदानें देऊन रोमन बादशाही जिंकिली; पण ते स्वतःच ती बळकावून बसले व त्यांनीं इ० सन १४५३ मध्यें कान्स्टांटिनोपल सर केलें; तुर्क लोकांचा यशस्वी बादशहा सुलेमान याची सत्ता सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं तांबडा समुद्र व इराणी आखात यांमध्यें अबाधित असून भूमध्य समुद्रामध्यें त्यांचें आरमार निर्भयपणें संचार करीत होतें; काळ्या समुद्रावरील काफा, सोल्डेया वगैरे ठाणीं व आशियामायनर, मेसापोटेमिया व सीरिया हे प्रदेश त्यांच्या ताब्यांत होते; त्यामुळें पूर्वेकडील व्यापाराचे वरील दोन्हीही मार्ग युरोपियन राष्ट्रांना बंद झाले होते; आणि पुढें मिसरदेश त्यांच्या ताब्यांत गेला, ( इ० सन १५२१ ) तेव्हां तर पूर्वेकडील व्यापारी दळणवळणाचा व्हेनीशियन लोकांच्या ताब्यांत असलेला तिसरा मार्गही त्यांना बंद झाला; त्यामुळें इतालियन शहरांच्या भूमध्य समुद्रावरील व हॅसा संघाच्या ऱ्हाईन नदीवरील सर्व हालचाली बंद पडल्या. तथापि पुढें पोर्तुगीज लोकांना नवा मार्ग सांपडल्यानंतर व्हेनीशियन लोक त्यांच्याविरुद्ध तुर्कांना मिळाले व त्यांच्याशीं तह करून त्यांच्या राज्यांत व्यापार करण्याच्या कांहीं सवलती मिळविल्या व त्याबरोबरच पोर्तुगीज मालावर जबर जकात बसविण्यांत आली; परंतु त्यामुळेंही व्हेनीशियन लोकांचा फारसा फायदा झाला नाहीं; अथवा पोर्तुगीज लोकांचें व्यापारी वर्चस्वही विशेषसें कमी झालें नाहीं; पुढें व्हेनीशियन लोक पोर्तुगीज लोकांच्या आश्रयाची याचना करूं लागले; परंतु त्यांनींही त्यांना आश्रय दिला नाहीं व पुढें लवकरच व्हेनीस व जिनोवा या दोन्हींही श्रीमान शहरांचें व्यापारी महत्व नष्ट होऊन तीं नामशेष झालीं.

तथापि व्हेनीशियन लोकांनीं पूर्वेकडील व्यापार आपल्या हातांत ठेवण्याकरितां पुष्कळच धडपड केली; व तुर्क लोकांविरुद्ध ख्रिस्ती राष्ट्रास त्यांनीं मोठ्या नेटानें मदत केली; परंतु तीच गोष्ट व्हेनीस शहराचा अपकर्ष होण्यास कारणीभूत झाली; त्यांच्या हातांतून मौल्यवान् सायप्रस बेट नाहींसें झालें; त्यानंतर इ० सन १६४५ मध्यें तुर्क लोकांनीं क्रीट बेटावर हल्ला केला; परंतु यावेळीं व्हेनीशियन लोकांनीं, हें बेट आपल्या ताब्यांत ठेवण्याकरितां तुर्क लोकांबरोबर सतत चोवीस वर्षें मोठ्या निश्चयानें झगडा केला. या युद्धाचा बहुतेक भाग " कँडिया " शहराच्या वेढ्यामध्यें गेल्यानें त्याला " कँडियाचें युद्ध " असेंही ह्मणतात. या युद्धांत व्हेनीशियन लोकांना फ्रान्स, स्पेन, इंग्लंड व सेव्हॉय या देशांतील स्वयंसेवक मंडळीचीही मदत मिळाली होती; परंतु त्याचा कांहींही उपयोग न होतां तें शहर व सर्व बेट तुर्कलोकांच्या हस्तगत झालें. (इ० सन १६६९ ) पुढें इ० सन १६८४ मध्यें तुर्क लोकांचें, बादशहा लिओपोल्ड व पोल लोक यांचेबरोबर युद्ध सुरू झालें; त्या संधीचा फायदा घेऊन व्हेनीशियन लोक तुर्क लोकांविरुद्ध त्यांना मिळाले; आणि सेनापति फ्रान्सिस्को मॉरोसीनी यानें पिला पानीसस आपल्या हस्तगत करून घेतलें. अशा क्रमानें त्यांचा ऱ्हास होत गेला, आणि अखेरीस इ० सन १७१८ मध्यें पॉसारोवित्स येथें तह होऊन, इ० सन १२०४ पासून व्हेनीशियन लोकांचा चालू असलेला युद्धविषयक इतिहास समाप्त झाला.

**२ पोर्तुगीजः**—पोर्तुगाल हा देश युरोपखंडाच्या नैर्ऋत्य कोंपऱ्यांत असून तो इ० सन ११५८ मध्यें आल्फान्झो हेनरी या नांवाच्या एका शूर पुरुषानें मुसलमान लोकांपासून हस्तगत करून घेतला; तरी पुढें १२० वर्षें अनेक युद्धें होत राहून अखेरीस इ० सन १२७९ मध्यें पोर्तुगाल देश स्वतंत्र झाला; तथापि पोर्तुगाल देशाच्या महत्वाच्या राजकीय इतिहासास इ० सन १३८५ पासून सुरुवात होत असून पहिला जॉन अथवा जान धी ग्रेट हा पोर्तुगाल देशाचा पहिला राज्यकर्ता होय; आणि याच काळापासून इ० सन १५८० पर्यंत, ह्मणजे स्पेनच्या दुसऱ्या फिलीपनें तो देश स्पेन देशास जोडीपर्यंत, पोर्तुगाल देशाची अतीशय भरभराट झाली; युरोप आणि आशिया या दोन्हींही खंडांत रशियन साम्राज्य पसरून पश्चिम आणि पूर्व देशाची एक सळंग सांखळी जुळविल्याचें श्रेय जसें आजपर्यंत " रशिया " या देशास देण्यांत येत असे, त्याप्रमाणेंच अज्ञात प्रदेशाचा शोध लावण्यांत पूर्वकाळीं दाखविलेल्या अपूर्व साहसाबद्दल स्पेन-पोर्तुगालच्या राष्ट्रालाही श्रेय देणें आवश्यक आहे. कोलंबसाला आपल्या जन्मभूमींत आश्रय न मिळाल्यामुळें तो प्रथम पोर्तुगालच्या व नंतर स्पेनच्या राजदरबारीं गेला. तेथील राणी इसाबेला हिच्या मदतीनें नवीन देशाचा शोध लावण्याला त्यानें दुसरें जलपर्यटण केलें व हिस्पानिओलाचा शोध लाविला. सहावा पोप अलेक्झांडर

रॅड्रिग्स बोरजिया यानें अज्ञात व नवीन मिळालेल्या आणि मिळणाऱ्या देशांबद्दल आज्ञापत्र काढिलें. याच्या पूर्वी इ० सन १४५४ मध्यें पांचव्या निकोलस पोपनें "आफ्रिकेच्या दक्षिणेकडील प्रदेशांवर पोर्तुगालची मालकी आहे;" असें आज्ञापत्र काढिलें होतें; त्यामुळें यावेळीं स्पेनच्या राणीनें आपल्यातर्फे आज्ञापत्र काढण्याविषयीं पोपला विनंति केली. त्यावरून नवीन आज्ञापत्राअन्वयें "स्पेनला मागें झालेले व पुढें होणारे पश्चिमेकडील शोध लागलेल्या व लागणाऱ्या देशांची ओझर्स व केपव्हर्ड या बेटांच्या पश्चिमेस शंभर लीग–ह्मणजे अजमासें ३५० मैल–वर एक दक्षिणोत्तर रेषा आंखून त्याचे पश्चिमेकडील भाग स्पेनला व पूर्वेकडील पोर्तुगालला अशी वांटणी केली. (इ० सन १४९३) कोलंबसाप्रमाणेंच बार्थिलोमोडिआझ यानें इ० सन १४८६ च्या आगष्ट महिन्यामध्यें पोर्तुगालची राजधानी लिसबन येथून निघून "केप ऑफ गुड होप" ला वळसा घातला; व इ० सन १४८७ च्या डिसेंबर महिन्यामध्यें परत येऊन "केप ऑफ गुड होप" ला वळसा घालून हिंदीमहासागराकडे जाण्याला मार्ग आहे" असें सिद्ध केलें. पुढें इ० सन १४९२ मध्यें कोलंबसानें वेस्टइंडीज बेटांचा शोध लाविला; त्यामुळें स्पेन आणि पोर्तुगाल यांच्यामध्यें नवीन देशांचे शोध लावण्याकरितां पृथ्वीची विभागणी "टारडेसलाज" च्या तहान्वयें, ता० जून इ० सन १४९४ रोजीं करण्यांत आली; त्यामुळें ता० ४ मे इ० सन १४९३ रोजीं पोप आलेक्झांडर यानें काढिलेल्या आज्ञापत्राप्रमाणें झालेल्या विभागणींत थोडासा फरक झाला; व त्याअन्वयें केपव्हर्डच्या पश्चिमेस ३७० लीगवर उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत कल्पिलेल्या रेषेच्या पूर्वेकडील शोध लागलेले व पुढें लागणारे देश पोर्तुगालला मिळाले व पश्चिमेकडील स्पेनदेशास मिळाले.

त्यानंतर इ० सन १४९५ मध्यें पोर्तुगालचा राजा जॉन हा मृत्यू पावला व त्याचा मुलगा इमान्युअल हा गादीवर आला. याच्याच कारकीर्दींत वास्कोदिगामा आणि त्याचा भाऊ पोलो दि गामा हे दोघे बरोबर अजमासें दोनशें माणसें घेऊन तीन गलबतांसह ता० ८ जुलई इ० सन १४९७ रोजीं लिसबन येथून निघाले; आणि इ० सन १४९८ च्या आगष्ट महिन्याच्या २५ व्या तारखेस मलबार किनाऱ्यावरील कालीकोट बंदरांत येऊन उतरले; हीच पोर्तुगीज लोकांची–ह्मणजे युरोपियन लोकांची हिंदुस्थानांत मलबारच्या किनाऱ्यावर पहिली रुफर होय; तथापि याच्यापूर्वीही हिंदुस्थानावर युरोपियन लोकांच्या अनेक स्वाऱ्या इ० सनापूर्वी २०३४ या वर्षापासून झालेल्या आहेत; (भाग पहिला पान १६ पहा.) शिवाय अनेक युरोपियन प्रवासीही फार पूर्वकाळापासून हिंदुस्थानांत येऊन गेलेले आहेत. त्यांपैकीं शिकंदर बादशहाच्या स्वारीबरोबर

हिंदुस्थानांत आलेला आणि चंद्रगुप्ताकडे पाटलीपुत्र येथें सेल्यूकसनें पाठविलेला प्रसिद्ध वकील मेगास्तनीस याच पहिल्या युरोपियन मनुष्यानें भागीरथी नदी व तिच्या कांठचा सुपीक प्रदेश पाहून उत्तरहिंदुस्थानांतील सुसंपन्न व समृद्ध स्थितीची माहिती युरोपखंडांत पहिल्यानें नेऊन तिचा प्रसार केला; त्यानंतर साहव्या शतकांत कॉस्मास व त्यानंतर मार्कोपोलो यांनीं आशियाखंडाची माहिती मिळवून तिचा युरोपांत प्रसार केला; तसेंच मॉर सोपार या नांवाचा एक युरोपियन इ० सन ८२२ मध्यें बाबीलोन-हून हिंदुस्थानांत केरळ देशांतील कोलम येथें, आपल्या ख्रिस्ती बांधवांची व्यवस्था लावून घेण्याकरितां आला होता व त्याप्रमाणें तेथील पेरूमाळ घराण्यांतील राज्यकर्त्यांकडून त्यानें त्यांची व्यवस्था लावून घेतली; आणि त्याप्रमाणेंच इराण व मेसापोटेमिया येथील नेस्टोरियन व खाल्डियन धर्मोपदेशकांनीं तिबेट, तार्तरी इत्यादि देशांसुद्धां सर्व आशिया-खंडभर प्रवास करून धर्मप्रसार केल्यावर ते दक्षिणहिंदुस्थानांत येऊन तिकडेही त्यांनीं धर्मप्रसार केला, अशी पूर्ण माहिती मिळते; वास्कोदिगामा हा कालीकोट येथें आला त्यावेळीं तें बंदर अतिशय भरभराटींत असून हिंदुस्थानचा पश्चिम किनाऱ्यावरून युरोपखंडाशीं चालणारा व्यापार इजिप्तमधून चालत होता; व अजमासें सहाशें वर्षांपासून तो सर्वस्वीं आरबलोकांच्या ताब्यांत असून याच व्यापारावर ते अतीय श्रीमान् झाले होते; त्यामुळें भावी काळांत आपला व्यापार बळकावूं पाहणाऱ्या पोर्तुगीज लोकांच्या उद्योगांत त्यांनीं अनेक अडथळे आणिले; तथापि गामानें ते सर्व निष्फळ करून कालीकोट येथील झामोरीन राजाची भेट घेतली; व कानपूर येथील राजास भेटून, त्याचशीं व्यापारी तह करून व व्यापारी जिन्नस बरोबर घेऊन तो २० नोव्हेंबर १४९४ रोजीं परत युरोपांत जाण्यास निघून ता० १८ सप्तेंबर इ० सन १४९९ रोजीं तो पोर्तुगालची राजधानी लिस्बन येथें सुरक्षितपणें जाऊन पोहोंचला.

पोर्तुगाल देशानें अज्ञान प्रदेशाचे शोध लाविल्यामुळें युरोपियन राष्ट्रांच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें असेंच पंधराव्या शतकाच्या अखेरीस विलक्षण स्थित्यंतर घडून आलें. "या शतकाच्या अखेरीस जगांतील व्यापारी इतिहासांत अकल्पित आणि बहुतेक एकाच वेळीं दोन अत्यंत महत्वाच्या गोष्टी घडून आल्या. त्यांपैकीं पहिली अमेरिकाखंडाचा शोध व दुसरी केप ऑफ गुड होपला वळसा घालून जातां येतां येण्याच्या रस्त्याची माहिती ही होय. या दोन महत्वाच्या शोधांमुळें आशियाखंडाशीं—मुख्यत्वेंकरून आशियाखंडाच्या अग्नेय भागांतील संपत्तिमान् व समृद्ध देशाशीं व विशेषतः हिंदुस्थान व मलाया द्वीपसमुच्चयांतील बेटांशीं—जलमार्गानें चाललेला व्यापार अतीशय वाढला.—आशियाखंडाच्या दक्षिणे-कडील आणि आटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील देशांत जलमार्गानें सरळ दळणवळण

चालण्याचे नवे रस्ते शोधून काढल्यामुळें व्यापाराचा मुख्य ओघ तिकडे वळला; आणि आशियाखंडांत उत्पन्न झालेल्या जिनसांच्या ऐवजीं सोनें व रुपें देतां यावें ह्मणून त्यांचा अतीशय पुरवठा वाढत गेला. पृथ्वीचे पूर्वेकडील व पश्चिमेकडील देशाचे नवीन शोध लागल्यामुळें जलपर्यटणाचें काम मोठ्या प्रमाणावर वाढलें, आणि त्यावेळेपासून युरोपस्थ लोकांनीं आपलें श्रेष्ठ प्रकारचें कौशल्य, धाडशी स्वभाव व भांडवल, यांच्या योगानें मोठमोठ्या समुद्रावरील व्यापाराचा मक्ता आपल्या हातीं ठेविला आहे. या नवीन धाडसाच्या कामामध्यें वर्चस्व मिळविण्याकरितां युरोपियन राष्ट्रांची आपसांत लवकरच मोठी निकराची स्पर्धा सुरू झाली. पोप अलेक्झांडर बोरजिया यानें आज्ञापत्र काढून स्पेन व पोर्तुगाल या देशांमध्यें ख्रिस्तीधर्मेतर सर्व अज्ञातदेश वाटून दिले; त्यांत हिंदुस्थान देश पोर्तुगालला दिला. त्यामुळें आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर दक्षिणेकडेस आपला राज्यविस्तार सर्व पंधराव्या शतकभर रेटीत नेणाऱ्या पोर्तुगीज लोकांनीं तो झपाट्यानें वाढविण्याची सुरुवात केली. त्यांनीं हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर किल्ले बांधून वसाहत करण्याला, हिंदीमहासागरांतील महत्वाचीं ठाणीं आपल्या ताब्यांत घेण्याला, आणि आलेक्झांड्रिया व कान्स्टांटिनोपल येथील मुसलमान बादशाहांनीं हिंदीमहासागरांमधील युरोपियन लोकांचें वर्चस्व कमी करण्याचा केलेला प्रयत्न हाणून पाडण्याला आपल्या जिवाकडे न पाहतां मोठ्या आवेशानें सुरुवात केली. आपल्या वैभवाच्या शिखरावर असतांना युरोपांतील तुर्कस्थानचा सुलतान सुलेमान धी मॅग्नीफिशंट यानें हिंदीमहासागरामधून पोर्तुगीज लोकांना घालवून देण्याचे जे प्रयत्न केले तेही सर्व निष्फळ झाले, ही मोठ्या सुदैवाचीच गोष्ट समजली पाहिजे; आणि जर हा तुर्कस्थानचा वैभवशाली सुलतान यशस्वी झाला असता तर ख्रिस्तीराष्ट्रांना पूर्वेकडे राज्यविस्तार करण्याला मोठा धोका आला असता. कारण त्याची सत्ता सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं तांबडा समुद्र आणि इराणी आखात ह्यांमध्यें अबाधित होती; त्याचें आरमार भूमध्यसमुद्रामध्यें निर्भयपणें संचार करीत होतें; आणि इजिप्त व सीरिया या देशांमधून हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याचा जुना व सरळ मार्ग जर तुर्कस्थानला आपल्या हातीं ठेवितां आला असता, तर यावर मिळविलेल्या संपत्तीच्यायोगानें त्याचें सैन्यबळ व आरमारी सत्ता हीं प्रचंड वाढलीं असतीं. तुर्की राष्ट्रानेंच नव्हे, पण बास्फरसच्या सामुद्रधुनीवरील इतर कोणत्याही अवाढव्य लष्करी राष्ट्रानें आशियाखंडांतील व्यापाराचे मार्ग आपल्या ताब्यांत ठेवून हल्लींच्या या आमदानींत सुद्धां अर्ध्या युरोपखंडावर आपला दरारा बसविला असता, आणि तीनशें वर्षांपूर्वी तर तें अजिंक्यच झालें असतें; तथापि या सरळ समुद्रमार्गानें व्यापार चालू झाल्यास आपल्या व्यापाराला फार मोठा धक्का बसेल, हें भविष्य जेव्हां व्हेनीशियन लोकांस कळून चुकलें तेव्हां त्यांनीं तुर्कस्थानच्या सुलतानाला मोठ्या

नेटानें मदत केली; पण ती निष्फळ झाली. हिंदुस्थानांतील मालानें भरलेलीं जहाजें आशियाकडून लिसबन येथील बंदरांत परत आलेलीं पाहिल्याचें तेथील व्हेनीशियन वकिलानें जेव्हां आपल्या सरकारास कळविलें तेव्हां त्यांना समजून आलें कीं, आपल्या व्यापाराचा एक अतीशय मोठा महत्वाचा भाग आपल्या हातांतून समूळ नाहींसा होण्याची फार भीति आहे. त्यानंतर सोळाव्या शतकाच्या शेवटीं युरोपांतील समुद्रांत पूर्वेकडील व्यापारावरील मुख्य सत्ता ह्मणजे एक अतीशय अमोल्य हक्क इतालियन शहराच्या हातून कायमचा नाहींसा झाला, आणि त्यावेळेपासून त्यांच्या व्यापाराचा जो हळू हळू ऱ्हास होत गेला, त्यावरून त्यांच्या भरभराटीचें आणि राज्यविस्ताराचें उगमस्थान कोठें होतें हें स्पष्टपणें दिसून आलें. यावेळीं भूमध्यसमुद्र व काळासमुद्र यांवरील किनारा, अलेक्झांड्रिया, कान्स्टांटिनोपल, व्हेनिस, आणि जिनोवा, ह्या सर्व ठिकाणापासून हिंदुस्थानचा युरोपखंडाशीं असलेला फायदेशीर व्यापार त्या खंडाच्या पश्चिमभागांतील दर्यावर्दी राष्ट्राच्या हातीं गेला. पोर्तुगीज लोकांनीं हिंदी समुद्रांवरील इतरांचा व्यापार बंद पाडून बहुतेक सर्व व्यापारी सत्ता कांहीं-काळपर्यंत आपल्या हातांत ठेविली होती; कारण त्यांच्या राजांनीं इराणी आखातापासून सिलोनपर्यंत आशियाखंडाच्या सर्व दक्षिण किनाऱ्यावर पहारा करण्याकरितां आपल्या आरमाराची कुमक पाठवून ह्या आलेल्या संधीचा फायदा घेण्याला क्षणाचाही विलंब लाविला नाहीं. त्यांनीं इराणी आखातांतील आरमारी ठाणीं आपल्या ताब्यांत घेतलीं, आणि तांबड्या समुद्रांमध्यें आपलें आरमारी वर्चस्व स्थापन करण्याकरितां नेटाचा प्रयत्न केला; परंतु इ० सन १५१७ मध्यें सुलतान उस्मानअली यानें—उस्मानअली हें सर्वसाधारण नांव आहे. वास्तवीक सुलतान पहिला सलीम—इजिप्त देश आपल्या राज्यास जोडिल्यामुळें पोर्तुगीज लोकांना तुर्क लोकांचें आरमार फार भारी झालें. पुढें इ० सन १५८० मध्यें पोर्तुगाल देश स्पेन देशास जोडला गेला; त्यामुळें त्या देशांतील लोकांचीं मोठमोठीं साहसी कृत्यें करण्याची हिंमत आणि तडफ ही पार चिरडलीं गेलीं व अशारीतीनें पोर्तुगाल देशाची अतीशय भरभराटीची स्थिति अल्पावधींतच नष्ट झाली. " ( " ब्रिटिश डोमीनियन इन् इंडिया " हें पुस्तक पहा. )

वास्कोदिगामा परत गेल्यावर, त्याच्या सांगण्यावरून पोर्तुगालच्या दरबाराची अशी पूर्ण खात्री झाली कीं, आरब लोकांशीं झगडल्याशिवाय हिंदुस्थानचा व्यापार आपल्या हातीं येणार नाहीं. त्यावरून पेड्रो कॉब्राल या नांवाच्या मनुष्याबरोबर त्यांनीं तेरा गलबतें, तोफा, जय्यत युद्धसामुग्री, उत्तम खलाशी देऊन त्याची अजमासें एकंदर बाराशें माणसांसह ता० ९ मार्च इ० सन १५०० रोजीं हिंदुस्थानाकडे रवानगी केली; त्याप्रमाणें ता० ३१ आगष्ट रोजीं तो कालीकोटच्या बंदरांत येऊन दाखल झाला,

तेथील राज्यकर्त्यांची भेट घेतली, त्याच्याशीं दोस्तीचा तह केला व तेथें एक वखार स्थापन केली; परंतु आरबलोकांनीं त्याला पुष्कळ निरनिराळ्या प्रकारचे अडथळे केले आणि त्यामुळें उभयतांमध्यें आरमारी चकमकी झडून दोघांचेंही थोडेंफार नुकसान झालें. त्यानंतर तो कालीकोट येथून कोचीन येथें गेला; तेथील स्नेही राजानें त्याच्याशीं तह केला व काब्राल यानेंही या त्रिमंपारा राजास "आह्मी कालीकोट जिंकून तुह्मास देऊं" असें अभिवचन दिलें; राजा त्रिमंपारा याच्या परवानगीप्रमाणें काब्राल यानें त्याठिकाणीं वखार घातली; बोर्बोझा या नांवाच्या मनुष्यास त्यावर देखरेखीकरितां ठेविलें. तेथून काननूर येथें गेला; व नंतर ता० १६ जानेवारी १५०१ रोजीं युरोपांत जाण्यास निघून ता० २१ जुलई रोजीं तो लिसबन येथें पोहोंचला; त्यानंतर डी नोव्हा या नांवाच्या एका कप्तानाच्या प्रमुखत्वाखालीं पोर्तुगालच्या राजानें चार गलबतें कालीकोट येथें पाठविलीं; त्यांची व कालीकोटच्या आरमाराची एक जोराची चकमक झडून तींत कालीकोटकराचा पराभव झाला व एका गलबतावर १५०० उत्तम मोत्यें, कांहीं रत्नें व युरोपच्या लोकांस माहीत नसलेलीं खलाशी लोकांस उपयोगीं पडणारीं तीन चांदीचीं यंत्रें त्यांस मिळालीं; या सर्व सामानांसह व व्यापारी मालांसह तो लिसबन येथें परत गेला व कालीकोटच्या राजाशीं निकराचें आरमारी युद्ध करण्याकरितां, वास्कोडिगामा हा वीस गलबतें व आठशें लढाऊ लोक बरोबर घेऊन पोर्तुगालच्या राजाच्या हुकुमानें इ० सन १५०२ च्या मार्च महिन्यामध्यें लिसबन येथून निघाला; व मलिंद, दाभोळवरून विजयानगरकराच्या ताब्यांतील भटकळ बंदरांत येऊन व तेथील अधिकाऱ्याशीं सक्तीनें आपल्या फायद्याचा ठराव करून, काननुरास जातांना रस्त्यांत मुसलमानांचें एक मौल्यवान् जहाज जाळून तो तेथें गेला; तेथील स्नेही राजाची भेट व नजरनजराणें होऊन, तेथील व्यापाऱ्यांच्या संमतीनें खरेदी विक्रीचीं वजनें व दर कायम करून व मालाच्या खरेदी विक्रीची व्यवस्था लावून तो कालीकोटवर चाल करून गेला; तेव्हां कालीकोटचा राजा त्यास घाबरून शरण आला व पोर्तुगीज लोकांना विशेष त्रास देणारे दहा अरब व नुकसानीबद्दल वीस हजार रुपये गामास देण्याचें त्यानें कबूल केलें; व तें गामानें कबूल केल्यावर त्यानें त्याप्रमाणें व्यवस्था केली; तथापि गामानें शहरावर तोफांचा भडिमार केला; किल्ल्याजवळील मालांचीं गलबतें व त्यांवरील अजमासें आठशें माणसें पकडलीं; सर्व माल आपल्या ताब्यांत घेतला; त्यांचे हात, नाक व कान कापून त्यांचे पाय दोरानें बांधविले; दातानें दोर तोडितां येऊं नये ह्मणून त्यांचे दांत पाडविले; सर्वांना एका जाहाजावर कोंबून जहाजास आग लावून त्यांना जाळून टाकिलें; व या लोकांचे तोडलेले अवयव राजाकडे पाठविले; पोर्तुगीज

लोकांच्या या व अशाच पुढें त्यांनीं केलेल्या अनेक क्रूर कृत्यांमुळें व धार्मिक जोर-जुलुमामुळें त्यांच्यासंबंधी अत्यंत वैरभाव व अनादर उत्पन्न होऊन अखेरीस हिंदुस्थानांतील त्यांचें व्यापारी व राजकीय वर्चस्व कायमचें नष्ट झालें. पुढें गामा काननूर येथें गेला; तेथें वखार स्थापन केली; तांबड्या समुद्रांतून पश्चिमकिनाऱ्यावर येणाऱ्या आरब जहाजांच्या टेहळणीची व्यवस्था केली व ता० २८ डिसेंबर इ० सन १५०२ रोजीं काननूर येथून निघून ता० १ सप्टेंबर इ० सन १५०३ रोजीं तो लिसबन येथें परत गेला.

गामा परत गेल्यावर कालीकोटच्या झामोरीन राजानें कोचीनच्या राजाशीं आरमारी युद्ध करून त्यांत त्याचा मुलगा नारायण यास ठार मारिलें; कोचीन ताब्यांत घेतलें; राजा त्रिमंपारा यास पळून जाऊन लपून बसणें भाग पाडिलें व तात्पुरता तो विजयी झाला; परंतु लवकरच अल्फांझो व फ्रान्सिस्कोडी आल्बुकर्क व साल्डाणा या अधिकाऱ्यांच्या हुकमतीखालीं पोर्तुगालमधून आरमार येऊन त्यानें त्रिमंपारा यास पुन्हां गादीवर बसविलें त्यानंतर फ्रान्सिस्कोड आल्मिडा हा पोर्तुगीज लोकांचा पहिला "व्हाईसरॉय" ह्मणून हिंदुस्थानांत आला. त्यानें आरबी समुद्रांत व हिंदीमहासागरांत नटबंदी केली; आफ्रिकेच्या पूर्वकिनाऱ्यावर किल्ला बांधिला; मोंबासा येथील अधिकाऱ्याला आपला मांडलिक बनविलें; होनावर व कानपूर हीं राज्यें जिंकून घेतलीं; कोचीन हें आपलें राहण्याचें मुख्य ठिकाण केलें; आपल्या मुलामार्फत क्विलोन येथील माप्ला मुसलमानांचा पराभव करविला; सिलोन येथील अधिकाऱ्यास आपल्या नियंत्रणाखालीं आणविलें, आणि कालीकोटला शह देऊन तेथील झामोरीन राजाचाही पराभव करविला. सिलोन येथून आमिडाच्या मुलानें पोर्तुगाल देशांत एक हत्ती पाठविला; यावेळेपर्यंत युरोपांत "हत्ती ही काय वस्तू आहे" हें कोणासही फारसें माहीत नसून युरोपांत गेलेला हाच पहिला हत्ती होता.

अशारीतीनें आल्मीडा हिंदुस्थानांत आल्यावर पोर्तुगीज लोकांचें व्यापारी व राजकीय महत्व पुष्कळच वृद्धिंगत झालें ( Diu: City of Many Sieges" हा "टाईम्स ऑफ इंडिया" ता० ५ फेब्रुवारी इ० सन १९२१ शनिवार पान १४ कालम ४ वरील लेख पहा. ) तथापि पोर्तुगीज लोकांच्या ह्या वाढत्या सत्तेमुळें झामोरीन राजास अतिशय भीति उत्पन्न झाली; आणि त्यानें दीवचा नबाब मालिक अयाझ व अहंमदाबादेचा सुलतान महंमूद बेगडा यांची व इजिप्तच्या सुलतानाची पोर्तुगीज लोकांविरुद्ध मदत मिळविली; व हीं दोन्हीं आरमारें एक होऊन पोर्तुगीज लोकांशीं झगडण्याकरितां पुढें सरसावलीं; तेव्हां आल्मिडा यानें आपला मुलगा डीलोरेंको यास

त्याच्याबरोबर आठ जहाजांचें आरमार देऊन त्या जोड आरमाराचा प्रतिकार करण्यास पाठविलें. हीं दोन्हीं आरमारें इ० सन १५०७ मध्यें, चौल येथें भेटून उभयतांमध्यें मोठ्या निकराचा सामना झाला; यावेळीं मुसलमान लोकांचा पूर्ण पराजय होण्याची अगदीं वेळ आली होती; परंतु इतक्यांतच मलिक हा स्वतः आरमारी जहाजासह तेथें येऊन दाखल झाला; त्यामुळें लढाईचें पारडें एकदम फिरून गेलें; तिसऱ्या दिवशीं पोर्तुगीज आरमारी अधिकारी, "आतां यापुढें युद्ध सुरू ठेवूं नये" असें सांगत असतांही त्यांचें न ऐकतां लोरेंको यानें पुन्हां युद्ध सुरू केलें. त्यावेळीं शत्रुआरमारांतील एका तोफेचा गोळा त्याच्या मांडीस लागून तो भयंकर जखमी झाला. त्यावेळीं आपले लोक नाउमेद होऊं नयेत, ह्मणून त्यानें आपल्या जहाजाच्या मुख्य शिडास आपणाला बांधवून घेतलें व इतक्या भयंकर व शरीरांतील अतीशय रक्त गेल्यामुळें गळून गेलेल्या स्थितींतही तो आपल्या लोकांस निकरानें युद्ध करण्याविषयीं सारखें उत्तेजन देत होता. इतक्यांत तोफेचा दुसरा गोळा येऊन त्यानें लोरेंको याचा तात्काळ प्राण घेतला व अशारीतीनें या युद्धांत पोर्तुगीज लोकांचा पराभव होऊन मुसलमानांना विजय प्राप्त झाला.

तथापि आलिमडा हा आपल्या मुलाच्या मृत्यूचा सूड घेण्याकरितां मोठ्या जोरानें दीववर चाल करून आला; मलिक आयाझशीं मोठ्या निकराचा युद्धसंग्राम केला व त्याचा पूर्ण पराजय करून त्याचे तीन हजार लोक ठार मारिले. अशारीतीनें मुसलमानांचा नाश करून तो कोचीन येथें परत आला व इ० सन १५०९ च्या नोव्हेंबरच्या महिन्यांत लिस्बन येथें परत जात असतां आफ्रिकेच्या किनाऱ्यावर एका चकमकींत मारला गेला. अलिमडाच्या जागीं आल्फांसोंडी अलूबुकर्क याची नेमणूक झाली; व त्याप्रमाणें लीस्बन येथून तो हिंदुस्थानांत येऊन दाखल झाला; तथापि आलिमडा यानें मुसलमानांवर चढाई करून त्यांचा नाश करून परत आल्यावर आपल्या जागेचा हक्क सोडिला, तेव्हां तो "व्हॉईसरॉय" या हुद्यावर स्थानापन्न झाला.

अलूबुकर्क हा मोठा शूर व मुत्सद्दी पुरुष असून त्यानेंच हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांना स्थाईकत्व आणुन दिलें. त्यानें विजापूरकरांच्या ताब्यांतील गोवे या महत्वाच्या बंदरावर चढाई केली. बंदराच्या नाक्याशीं असलेला पणजीचा किल्ला हस्तगत करून घेतला. ( तारीख १ मार्च इ० सन १५१० ) आणि लागलींच दोनच दिवसांनीं गोवे हें शहर हस्तगत करून घेतलें. त्यानंतर यूसफ अदिलशहानें परत मिळविण्याकरितां मोठ्या जोराचा प्रयत्न केला; परंतु तो निष्फळ होऊन तें शहर पोर्तुगीज लोकांच्याच ताब्यांत राहिलें. त्यानंतर त्यानें मलाका आपल्या ताब्यांत घेऊन तेथें एक मजबूत

किल्ला बांधिला; आणि सुमात्रा, पेगू, सयाम, कोचीन, चीन वगैरे ठिकाणच्या अधिकाऱ्यांशीं सख्यत्व संपादन करून तो गोवे येथें परत आला. ( इ० सन १५०९ ) इतक्यांत अदिलशाही सरदार पोलादखान यानें गोवे हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न सुरू केला; परंतु तो यशस्वी होत नाहीं असें पाहून विजापूर दरबारांतून रसूलखान या नांवाचा दुसरा सरदार गोवे शहरावर चाल करून आला व त्यानें तें हस्तगतही करून घेतलें; परंतु याच संधीस पोर्तुगालमधून कुमक आल्यामुळें आलबुकर्क यानें त्याच्याशीं युद्ध करून गोवा शहर पुन्हां हस्तगत करून घेतलें. ( इ० सन १५१२ ) त्यानंतर इ० सन १५१५ मध्यें त्यानें इराणी आखातांतील प्रसिद्ध ओर्मझ हें बेट आपल्या हस्तगत करून घेतलें व तिकडून परत येत असतां मार्गांतच दिंसेंबर महिन्यांत तो मृत्यू पावला.

आलबुकर्क हा जिवंत असतांनाच त्याच्या जागीं अल्बर्गारिया या नांवाच्या एका मोठ्या घराण्यांतील मनुष्याची नेमणूक झाली होती. तो अलबुकर्कसारखा कर्तृत्ववान् नव्हता; तथापि त्यानें सिलोनवर स्वारी करून तेथील राजाजवळून खंडणी घेऊन तिकडे एक किल्ला बांधिला. त्याच्या नंतर इ० सन १५१८ च्या अखेरीस लोपेझ सीकेरा व नंतर ( इ० सन १५२१ ) मेनेझीस व त्यानंतर प्रसिद्ध वास्कोड गामा हे व्हॉईसराय ह्मणून हिंदुस्थानांत आले; गामा हा वृद्ध असून हिंदुस्थानांत आल्यावर ( इ० सन १५२४ ) लवकरच ह्मणजे दिसेंबर महिन्यांत मृत्यू पावला; नंतर इ० सन १५२६ पर्यंत डॉम हेन्री डी मेनेझीस व त्यानंतर इ० सन १५२९ पर्यंत लोपोव्हाज डी सांपेयो यांच्या नेमणुका झाल्या व त्यानंतर प्रसिद्ध न्यनोडा कून्हा हा हिंदुस्थानांत पोर्तुगीज व्हॉईसराय ह्मणून आला. ( इ० सन १५२९ ) हा पुरुष मोठा पराक्रमी व कर्तृत्ववान् असून पोर्तुगीज लोकांच्या दृष्टीनें याची कारकीर्द विशेष महत्वाची ह्मणून मानिली गेलेली आहे.

न्यनोड कून्हा हा प्रसिद्ध नौकानयनशास्त्रवेत्ता व दर्यासारंग ट्रिस्ट्रामड कून्हा याचा मुलगा असून तो विशेष हुषार व पुढें आलेला होता; अटलांटिक महासागरांत ट्रिस्ट्राम बेटें आहेत त्यांना याच दर्यासारंगाच्या सन्मानार्थ " ट्रिस्ट्राम " हें नांव दिलेलें आहे. न्यनोड कून्हा हा लिस्बन येथून निघाला त्याचवेळीं त्यास दीववर हल्ला करून तें हस्तगत करून घेण्याबद्दल बजाविण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें चारशें जहाजें व वीस हजारांवर सैन्य-त्यांपैकीं पांच हजार युरोपियन होते.-बरोबर घेऊन तो पहिल्यानें मुंबई बंदरांत आला; तेथें या आरमाराची सर्वसाधारण पाहणी करण्यांत आली; ( इ० सन १५३१ ) व नंतर कून्हा हा या सर्व आरमारासह दीव बंदरावर चाल करून गेला. जातांना मार्गांतील दमण हें बंदर त्यानें हस्तगत करून घेतलें; पुढें जाऊन दीवला

वेढा दिला व तें बंदर हस्तगत करून घेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु तेथील तटबंदी विशेष मजबूत असून त्या बंदराच्या संरक्षणाची व प्रतिकाराची उत्तम तजवीज करण्यांत आली होती; त्यामुळें त्यास दीवचा वेढा उठवून परत फिरणें भाग पडलें; परत येतांना या आरमारानें गोगो, महुवा, बलसाड, सुरत, आगाशी, तारापूर, वसई वगैरे शहरें हस्तगत करून त्यांचा नाश केला व तें गोवें येथें परत आलें.

तथापि कांहीं झालें तरी दीववर पुन्हां चढाई करून जाऊन तें हस्तगत करून घ्यावें, असा न्यनो डा कून्हा याचा निश्चय झालेला होता; इतक्यांतच राजकीय वातावरणांत पोर्तुगीज लोकांस अनुकूळ असें निराळेंच स्थित्यंतर अकल्पितरीत्या घडून आलें. गुजराथचा राज्यकर्ता दुसरा मुज्फरशहा ( इ० सन १५११ ते १५२६ ) याचा मुलगा बहादूरशहा ( इ० सन १५२६ ते इ० सन १५३६ ) हा यावेळीं गादीवर होता. त्यानें हुमायून विरुद्ध अनेक खटपटी केल्या; खुरासानच्या सुलतानाचा नातू महंमद जमान हा हुमायूनचा आश्रय सोडून बहादूरशहा याजकडेस गेला असतां त्यास त्यानें आश्रय दिला; हुमायूनचा मेहुणा महंमद जमान मिर्झा हा हुमायून विरुद्ध बंड करून गुजराथेंत पळाला; त्यासही बहादूरशहानें आश्रय देऊन मोठ्या सन्मानास चढविलें; हुमायूनचा शत्रू अल्लाउद्दीन लोदी यास हुमायूनबरोबर युद्ध करण्याकरितां मुबलक द्रव्य दिलें व चोहोंकडून हुमायूनला त्यानें त्रासवून सोडिलें; तेव्हां हुमायून हा बहादूरशहावर चाल करून गुजराथेंत आला. गुजराथप्रांत हस्तगत करून घेतला; त्याचा पिच्छा पुरवून मांडवगड व तेथून चांपानेरकडे त्यास पिटाळून लाविलें व तेथेंही निभाव न लागल्यामुळें अखेरीस तो दीव येथें पोर्तुगीज लोकांच्या आश्रयाखालीं गेला व पुन्हां राज्यपद परत मिळविण्याकरितां त्यांची मदत मागितली; त्या ऐवजीं त्यानें दीव येथें पोर्तुगीज लोकांना किल्ला बांधण्याची परवानगी दिली व कून्हा व बहादूरशहा यांच्यामध्यें तह होऊन ( इ० सन १५३५ ) त्यानें किल्ला बांधण्याची दिलेली परवानगी कायम केली व वसई हें ठिकाण, मुंबईसुद्धां त्याच्या ताब्यांतील प्रदेशासह पोर्तुगीज लोकांस दिलें. त्याप्रमाणें पोर्तुगीज लोकांनीं ताबडतोब दीव येथें किल्ला बांधिला; वसई व आसपासचा प्रदेश ताब्यांत घेतला व बहादूरशहास पुन्हां राज्यावर स्थानापन्न केलें.

तथापि त्यानंतर बहादूरशहास, " आपण पोर्तुगीज लोकांना दीव येथें किल्ला बांधण्याची परवानगी दिली " याबद्दल पश्चात्ताप वाटूं लागला व तेथून पोर्तुगीज लोकांना हांकलून देण्याचा निश्चय करून त्यानें न्यनो यास आपल्या भेटीस बोलाविलें; परंतु बहादूरशहाचें कपट अगाऊच जाणून त्यानें " आपण आजारी आहोंत " अशी सबब दाखवून शहाच्या भेटीस जाण्याचें टाळिलें; तेव्हां बहादूरशहा हा स्वतःच न्यनोच्या भेटीकरितां त्याच्या

जहाजावर गेला व तेथें गेल्यावर, न्यूनोचें हें अजारीपणाचें ढोंग आहे, अशी त्याची खात्री झाली; तेव्हां तो तसाच लगबगीनें आपल्या गलबतावर परत आला, त्यानंतर त्याच्या लोकांमध्यें व पोर्तुगीज लोकांमध्यें बोलाचाली होऊन पोर्तुगीज लोकांनीं त्यास व त्याच्या लोकांस समुद्रांत लोटून ठार मारिलें; ( इ० सन १५३६ ) व अशाप्रकारें बहादूरशहाचा अंत झाला.

बहादूरशहाच्या मृत्यूनंतर त्याचा पुतण्या दुसरा महंमदशहा यानेंही पोर्तुगीज लोकांना दीव घेथून हांकलून देण्याचा निश्चय केला; व आपणाबरोबर एक मोठें सैन्य घेऊन जमीनीच्या बाजूनें त्यानें दीव किल्ल्यास वेढा दिला. बहादूरशहाच्या मृत्यूपूर्वी त्यानें कान्स्टांटिनोपल येथील सुलतानाची पोर्तुगीज लोकांविरुद्ध मदत मागितली होती; त्याप्रमाणें त्याच्याकडून ७६ जहाजें व सात हजार सैन्य शहाच्या मदतीस येऊन दाखल झालें व या आरमारानें पाण्यांतून किल्ल्यास वेढा दिला. यावेळीं किल्ल्यांत फक्त सहाशें लोक होते; तथापि त्यांनीं पुष्कळ महिने शत्रूस दाद न देतां किल्ला लढविला, आणि किल्ल्यांत अखेर चाळीस माणसेंच कायतीं शिल्लक राहिलीं, तरीसुद्धां त्यांनीं हार न जातां मुसलमानी सैन्याचा प्रतिकार तसाच चालू ठेविला. अशाच स्थितींत, तुर्की आरमार आधींच थकून व त्रासून गेलेलें असतांनांच, " पोर्तुगीज लोकांना जोराची कुमक येत आहे. " अशी बातमी पसरली; ती तुर्की आरमाराधिपतीस खरी वाटून त्यानें ताबडतोब वेढा उठविला व तो आपल्या आरमारासह परत निघून गेला; तेव्हां त्याच दिवशीं लागलीच महंमदशहाच्या सैन्यानेंही वेढा उठविला व तेंही अहमदाबादेकडे परत निघून गेलें.

न्यूना डा कून्हा यानें दीव येथील किल्ल्यांत अडकलेल्या मंडळींना कुमक पाठविण्याकरितां एक मोठें आरमार तयार केलें होतें; परंतु त्याच्या जागीं आलेला नवा व्हाईसरॉय ( गार्शिया ड नोरोन्हा ) यानें, न्यूना यास त्या मंडळीच्या कुमकेस जाण्याची परवानगी दिली नाहीं व आपण स्वतःही त्यांना कुमक पाठविण्याची कांहीं तजवीज केली नाहीं. न्यूनो हा कर्तृत्ववान् असून व त्यानें पोर्तुगीज राष्ट्राची पुष्कळ महत्वाची कामगिरी बजाविली असून सुद्धां—त्याच्या कडक वागणुकीमुळें त्यास अनेक शत्रू उत्पन्न होऊन त्यांनीं राजाचें मन त्याच्याविषयीं अतीशय कलुषित केलें असल्यानें—त्यास अपमानास्पद-रीतीनें हिंदुस्थानांतून परत जावें लागलें. नोन्हेना यानेंसुद्धां त्यास वाईट रीतीनें वागविलें; त्यास परत जाण्यास नोन्हेना यानें गोवें येथून जहाज दिलें नाहीं; तेव्हां तो आपल्या कुटुंबासह कोचीन येथें गेला व तेथून एका व्यापारी जहाजानें तो लिस्बन येथें परत जाण्यास निघाला. ( इ० सन १५३९ ) परंतु आजारी होऊन मार्गांतच तो मृत्यू पावला.

तथापि न्यूना डा कून्हा याच्या ऐवजीं आलेला प्रतिनिधि नोन्होना हा लवकरच मृत्यू पावला; ( इ० सन १५४० ) व त्याच्या जागीं वास्कोडीगामाचा मुलगा स्टीफोड-गामा, ( इ० सन १५४२ पर्यंत ) व त्यानंतर अफॉन्झो ड सूझा हा हिंदुस्थानांत आला. त्यानें विजापूरकर इब्राहीम आदिलशहाशीं तह करून गोंव्याच्या आसपासचा प्रदेश मिळविला; पुढें इब्राहीमशहा क्रूर व लहरी बनल्यामुळें त्यास पदभ्रष्ट करून त्याच्या जागीं त्याचा भाऊ अब्दुल्ला यास स्थानापन्न करावें असा दरबारच्या मंडळीनें कट केला; परंतु तो उघडकीस येऊन अब्दुल्ला गोंव्यास पोर्तुगीज लोकांकडे पळाला; परंतु पोर्तुगीज लोकांनीं त्यास आश्रय न दिल्यामुळें तो गोवळकोंडें व अहमदनगर येथील राज्यकर्त्यांकडे आश्रयास गेला; पण तेथेंही त्यास आश्रय मिळाला नाहीं. या अब्दुल्लामुळें पोर्तुगीज लोकांना आदिलशाही राज्यांत हात घालण्यास मोठी योग्य सुसंधी प्राप्त झाली होती; पण आदिलशाही राज्याच्या सुदैवामुळेंच आपला फायदा करून घेण्याची पोर्तुगीज लोकांस बुद्धि झाली नाहीं असेंच ह्मणणें प्राप्त होतें.

अफॉन्झो ड सूझा याच्या जागीं इ० सन १५४५ मध्यें डॉमजान ड कॅस्ट्रो या प्रसिद्ध मनुष्याची व्हाईसरॉय ह्मणून नेमणूक झाली. हा मोठा प्रामाणिक व सभ्य असून पराक्रमीही होता. याच्या कारकीर्दीत दीव शहराला सर्वांत मोठा व शेवटचा वेढा पडला; ( इ० सन १५४६ ) हा वेढा फेब्रुवारीपासून नोव्हेंबरपर्यंत नऊ महिने पडलेला होता. अहमदाबाद व खंबायतचा सुलतान महंमद याचा सेनापति खोजा जाफर यानें आपणा-बरोबरील मोठ्या सैन्यासह दीवच्या किल्ल्यास वेढा दिला व जमिनीवर एक उंच तट बांधून किल्ल्यांत तोफांचा मोठ्या जोराचा मारा केला; त्यावेळीं किल्ल्यांत शिबंदी थोडी ह्मणजे फक्त चारशें लोकांची होती तरी आंतील लोक व बायकामुळें सुद्धां निर्वाणीच्या निकरानें लढत राहिलीं; मध्यंतरीं खोजा जाफर हा तोफेचा गोळा लागून मृत्यू पावला; तथापि त्याचा शूर मुलगा रुमीखान यानें वेढ्याचें काम तसेंच मोठ्या जोरानें पुढें चालविलें व किल्ल्यांतील लोकांनींही रुमीखानाच्या हल्ल्याचा मोठ्या निकरानें प्रतिकार चालू ठेविला; परंतु किल्ल्यांतील धान्यसामुग्री संपल्यामुळें लोकांचे भयंकर हाल होऊं लागले; इतक्यांत जॉन कॅस्ट्रो हा एका मोठ्या आरमारासह दीव येथें आला; आपल्या सैन्यासह किल्ल्यांत गेला; ताबडतोब युद्धविषयक मंत्रिमंडळ ( Council of Wor ) बोलाविलें; त्यांच्या सल्ल्यानें मुसलमानी सैन्यावर एकदम जोराचा हल्ला करावा, असें ठरविलें; स्वतः आपणाकडे सर्व सूत्रचालकत्व घेतलें; आणि ता० १० नोव्हेंबर रोजीं ( इ० सन १४५५ ) या लहान पोर्तुगीज सैन्यानें मुसलमानी सैन्यावर मोठ्या जोराचा व निकराचा हल्ला केला व त्या सैन्याचा पूर्णपणें पराजय करून टाकिला. या युद्धांत रुमीखान व इतर अनेक मुसलमान

सरदार मारले गेले व अखेरीस मुसलमानी सैन्यास दीव येथील वेढा उठवून परत निघून जाणें भाग पडलें. त्यानंतर जान कॅस्ट्रो यानें किल्ल्याची अतीशय पडझड झाली असल्यानें त्याची दुरुस्ती केली व सांपत्तिक मदतीची अत्यावश्यकता असल्यामुळें त्यानें गोवें येथून २० हजार पर्दावोंची ( पर्दाव हें त्याकाळीं रुप्याचें एक नाणें ह्मणून असून त्याची किंमत अजमासें सव्वा रुपया होती. ) मदत मागितली, ती गोवें येथील लोकांनींच आपसांत जमवून त्याच्याकडे पाठविली व गोवें येथें परत आल्यावर त्याचा अतीशय मानसन्मान करण्यांत आला. त्यानंतर कॅस्ट्रो यानें विजापूरकराशीं युद्ध करून दाभोळ हें प्रसिद्ध बंदर आपल्या हस्तगत करून घेतलें व त्यांच्याशीं तह केला. ( इ० सन १५४७ ) कॅस्ट्रो याच्या विजयाची बातमी पोर्तुगालमध्यें पोहोंचल्यावर राजानें त्यास शाबासकी व इनामें पाठविलीं व पुढें तीन वर्षेपर्यंत त्याची पुन्हां " व्हाईसरॉय " ह्मणून नेमणूक केली, हा खलिता जेव्हां गोवें येथें येऊन पोहोंचला त्यावेळीं कॅस्ट्रो हा मृत्युशय्येवर पडलेला होता; तो ह्मणालाः–" मी तर आतां या जगाचा घटका अर्ध घटकेचाच काय तो सोबती आहे; पण मला पुन्हां तीन वर्षे व्हॉईसरॉय नेमण्यांत आलें आहे, हा या मिथ्या जगांतील कसा विचित्र खेळ आहे पहा. " आणि त्यानंतर लवकरच त्याचें प्राणोत्क्रमण झालें. ( इ० सन १५४८ ) दीव काबीज केल्याबद्दल या पुरुषाची आजतागायत कीर्ति कायम आहे.

कॅस्ट्रो नंतर गार्शिया डसा या नांवाचा मनुष्य गव्हर्नर ह्मणून नेमण्यांत आला.– पोर्तुगीज अमदानींत गव्हर्नर व व्हाईसराय यांच्या नेमणुका परस्परांच्या जागांवर होत असत; परंतु उभयतांचें अधिकारक्षेत्र भिन्न असे.–त्यानें गुजराथचा सुलतान दुसरा महंमदशहा ( कारकीर्द इ० सन १५३६ ते इ० सन १५५४ ) याच्याबरोबर तह करून दीवचा किल्ला कायमचा पोर्तुगीज लोकांकडे घेतला, आणि त्याबरोबरच किल्ल्याच्या बाहेरील सर्व प्रदेश सुलतानाच्या ताब्यांतील आहे असें ठरलें. गार्शीयानंतर ( इ० सन १५४९ ) जार्ज काब्राल हा गव्हर्नर ह्मणून व त्याच्यानंतर अफान्सो ड नोरोन्हा हा व्हाईसराय ह्मणून हिंदुस्थानांत आला यानें सिलोन बेटांत पोर्तुगीज लोकांच्या सत्तेचा विस्तार केला; त्याच्यानंतर ( इ० सन १५५४ ) फ्रान्सिस्को बारेटो हा गव्हर्नर व त्याच्या मागून कान्स्टांटीनो ड ब्रागांझा हा व्हाईसराय आला; त्यानें दमण काबीज करून घेऊन तेथें एक मजबूत किल्ला बांधिला, आणि मलाका, ओर्मझ, सिलोन वगैरे ठिकाणीं आपलें आरमार पाठवून तिकडील प्रदेशाचा बंदोबस्त व मजबुती केली; व स्वतः सिलोन-मध्यें जाऊन तिकडील जाफनापट्टण हें महत्वाचें ठिकाण हस्तगत करून घेतलें. त्याच्यानंतर फ्रान्सिस्को कूटिन्हो हा ( इ० सन १५६१ पासून ) व त्यानें तीन वर्षे कारभार केल्यावर इ० सन १५६४ पासून ऍन्टोड नोरोन्हा हा व्हाईसराय ह्मणून हिंदुस्थानांत आला. याच्या कारकीर्दींत मुसलमान राजेरजवाड्यांनीं एकत्र होऊन

विजयानगरचें राज्य नामशेष केलें; परंतु मुसलमान राजेरजवाडे तिकडे गुंतले आहेत असें पाहून पोर्तुगीज लोकांनीं सिलोन बेट काबीज करून त्याशिवायही आपला पुष्कळच फायदा करून घेतला. पुढें इ० सन १५६८ मध्यें लुई अथाएड ऊर्फ आथेड हा व्हाईसराय होऊन गोवें येथें आला. याच्या कारकीर्दींत मूर्तुजा निजामशहा ( कारकीर्द इ० सन १५६५-१५८६ ) यानें पोर्तुगीज लोकांकडून रेवदंडा किल्ला हस्तगत करून घेण्यास तिकडे कूच करून त्यास मोठा कडेकोट वेढा दिला; परंतु पोर्तुगीज लोक समुद्रांतून धान्यसामुग्री आणूं लागले, आणि निजामशहाकडील सरदारांना दारूच्या बाटल्या नजर करून त्यांनीं अंतस्थरीत्या वश करून घेतलें[1]; त्यामुळें वेढ्याचें काम ढिलें पडलें

१ टीपः—मुसलमान लोकांनीं रेवदंड्यास वेढा दिल्यावर पोर्तुगीज लोकांवरील या संकटाच्या प्रसंगीं, जशा "दारूच्या बाटल्या" त्यांच्या मदतीस धांवून आल्या व त्यांनीं पोर्तुगीज लोकांना संकटमुक्त केलें, त्याप्रमाणेंच, मराठ्यांनीं कर्नाटक प्रांतावर इ० सन १७३९ मध्यें स्वारी केली तेव्हां अशाच "दारूच्या बाटल्या" फ्रेंचांच्या मदतीस धांवत आल्या; व त्यांनीं फ्रेंच व मराठे यांच्यामधील वैर दारूंत बुडवून, उभयतांचा स्नेहभाव जुळवून आणिला!

छत्रपति शाहू याच्या आज्ञेनें रघूजी भोंसले यानें इ० सन १७३९ मध्यें कर्नाटक प्रांतावर स्वारी केली; व रघूजी आणि फ्रेंचातर्फे डूमास यांच्यामध्यें पत्रव्यवहार होऊन ( इ० सन १७४० ) पुढें रघूजीनें चंदासाहेबास कैद करून सातारा येथें पाठविलें; ( ता० २१ मार्च इ० सन १७४१ ) व फ्रेंचाकडे खंडणीचा तगादा लाविला. परंतु याच संधीस रघूजीनें आपला वकील पांडेचरी येथें पाठविला होता; त्याचा डूमास यानें अतीशय आदरसत्कार केला; त्यास पांडेचरी येथील आपला उत्तम बंदोबस्त दाखविला; व तो परत जाण्यास निघाला तेव्हां त्यापाशीं रघूजी भोंसल्यास "नजर" ह्मणून, डूमास यानें, फ्रान्समधील उत्कृष्ट व उंची दारूच्या दहा बाटल्या पाठविल्या. त्या बाटल्यांतील दारू रघूजीच्या बायकोस इतकी आवडली कीं, तिच्या आग्रहावरून रघूजीनें "आणखी बाटल्या पाठविण्याविषयीं" डूमास यास कळविलें; तेव्हां डूमास यानें तशाच प्रकारच्या आणखी दारूच्या तीस बाटल्या व औपचारिक पत्रें रघूजीकडे लागलींच रवाना केलीं; अर्थात्, या दारूच्या बाटल्या मिळाल्याबरोबर रघूजी भोंसले पूर्णपणें खुष होऊन गेला; त्यामुळें रघूजी-डूमास यांचा स्नेह झाला. मराठे-फ्रेंच यांच्यांत सख्य झालें; खंडणी दारूंत बुडाली आणि "पांडेचरीस बिलकुल इजा देऊं नये;" अशी आपल्या सैन्यास ताकीद देऊन—आणि आपल्या पूर्वींच्या सर्व मागण्या सोडून देऊन—तो माहीमकडे निघून गेला व फ्रेंचांवरील हें मराठ्यांचें अरिष्ट अशारीतीनें आपोआप नाहींसें झालें, यावरून दारूच्या बाटलीचा केवढा प्रभाव आहे, हें सहज ध्यानीं येतें!

व कांहीं महिने लोटल्यावर, त्यास वेढा उठवून परत जाणें भाग पडलें; त्याप्रमाणेंच विजापूरकर अली आदिलशाहा ( कारकीर्द इ० सन १५५७-१५८० ) यानें गोवें शहरास वेढा देऊन तें हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचाही पोर्तुगीज लोकांनीं पराभव केला व त्यास वेढा उठवून परत जाणें भाग पाडिलें. ( इ० सन १५७० ) त्याप्रमाणें होनावर येथील राजानें आदिलशहास मदत केल्यामुळें आथेड यानें तिकडे स्वारी करून तें शहर जाळून टाकिलें; यावेळेपर्यंत पुष्कळच प्रदेश पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत आला होता ह्मणून आफ्रिकेच्या किनाऱ्यापासून मलाकापर्यंतच्या प्रदेशाचे तीन विभाग करण्यांत आले; त्यांपैकीं एडनपासून सिलोनपर्यंतचा मुख्य विभाग गोवें येथील अधिकाऱ्याच्या ताब्यांत देऊन त्यास व्हाईसराय ही पदवी देण्यांत आली; आणि गोवें हेंच त्याचें राहण्याचें मुख्य ठिकाण ठरविण्यांत आलें. सिलोनपासून मलाकापर्यंत दुसरा विभाग ठरविण्यांत येऊन त्याचें मलाका हें राहण्याचें मुख्य ठिकाण करण्यांत आलें; आणि आफ्रिकेचा पूर्वकिनारा हा तिसरा विभाग करून त्याचें मुख्य शहर मोझांबिक हें ठरविण्यांत आलें. पुढें लवकरच-ह्मणजे इ० सन १५८० मध्यें पोर्तुगाल देश स्पेन देशास जोडला गेल्यामुळें तेथील कारभारास स्पेनचा अरेरावी व बलाढ्य राजा दुसरा फिलीप याच्या लहरीप्रमाणें वळण लागत गेलें, आणि पोर्तुगीज लोकांची कर्तबगारी त्याच्या लोखंडी पंजाखालीं चिरडून पार नामशेष झाली.

अशारीतीनें हिंदुस्थानचा व्यापार अनायासेंच स्पेनदेशाच्या हातांत आला; परंतु त्या देशाचा व्यापार हा मुख्यत्वेंकरून तेथील सरकारच्या मालकीचा असे; आणि त्यांचा उद्देश प्राधान्येंकरून सोनें व रुपें यांच्या खाणी मिळविण्याचा असल्यानें त्यांची प्रवृत्ति व्यापारापेक्षां देश जिंकण्याकडेसच अधीक असे; त्यामुळें हिंदुस्थानांत व्यापाराकरितां लांबच्या सफरी करणें त्यांना पसंत नसून अमेरिकेंत मौल्यवान् धातू मिळविण्याकरितां खाणी खणणेंच त्यांना अधीक इष्ट वाटत असे. मध्यंतरीं इ० सन १५७९ मध्यें हालंड व बेलजम मिळूनच्या ज्या भागास पूर्वी नेदरलंड असें ह्मणत असत, त्याचे उत्तर व दक्षिण नेदरलंड हे दोन भाग झाले; आणि इंग्लंडनें डच लोकांच्या लोकसत्तात्मक राज्याचें स्वातंत्र्य कबूल केलें; त्यामुळें स्पेनच्या ताब्यांत असलेल्या आशियाखंडांतील पोर्तुगीज लोकांच्या वसाहतींवर इंग्लंड व हालंड या दोन्ही देशांचीं आरमारें पाठविण्यांत आलीं व त्यांनीं पोर्तुगीज लोकांचा अतीशय नाश केला. पुढें फिलीप यानें इ० सन १५८८ मध्यें इंग्लंडवर एक मोठें आरमार पाठविलें; परंतु त्यांत त्याचा पराजय होऊन इंग्लंडला निर्णयात्मक जय मिळाला; शिवाय पोर्तुगीज लोकांचीं व्यापारी जहाजें मधून मधून इंग्रजलोक पकडील व त्यांवरील माल इंग्लंडमध्यें नेऊन विकून त्यावर अतीशय नफा मिळवील. त्यामुळें पूर्वेकडील

व्यापार हीच "सोन्याची खाण" आहे, अशी त्यांची खात्री झाली व इंग्रज व्यापाऱ्यांनीं ईस्ट-इंडीज बेटांमध्यें व्यापार करण्याचा परवाना देण्याबद्दल इलिझाबेथ राणीला एक विनंतिपत्र पाठविलें; (इ० सन १५८९.) त्यांतही त्यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "अशा व्यापाराच्या योगानें पोर्तुगीज लोकांच्या आरमाराप्रमाणें आपल्या देशांतही जलपर्यटणाचीं साधनें वाढत जाऊन उत्तम खलाशी निर्माण होतील, आणि त्याचप्रमाणें आपलें आरमारी बळही वृद्धिंगत होईल." तथापि इंग्लंडचें प्रधानमंडळ स्पेनदेशाशीं तह करण्याच्या खटपटींत असल्यामुळें इंग्रजी कंपनीला यावेळीं सनद न मिळतां ती पुढें अठरा महिन्यांनीं इ० सन १६०० मध्यें मिळाली व तीही पंधरा वर्षे व्यापार करण्याच्या मुदतीचीच काय ती मिळाली. इ० सन १६०५ पर्यंत स्पेननें केलेल्या नुकसानीचा बदला वाळून घेण्याकरितां इ० सन १६०६ मध्यें डच लोकांनीं खुद्द लिसबन शहरावरही तोफांचा मारा केला; आणि इ० सन १६०७ मध्यें मलाकाची सामुद्रधुनी व चिनी समुद्र या दोन्हीं ठिकाणीं डच लोकांनीं पोर्तुगीज लोकांचा पूर्ण पराजय करून त्यांची भयंकर कत्तल उडविली. पुढें इंग्लंड व हॉलंड हीं दोन्हीं प्रॉटेस्टंट राष्ट्रें एक होऊन त्यांनीं पोर्तुगीज लोकांना हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरून हांकलून लावण्याच्या कामीं जिवापाड मेहनत घेतली; (इ० सन १६१३ ते इ० सन १६१५) याच वेळीं पोर्तुगीज लोकांनीं मोंगलबादशहाचें एक मक्केस जाणारें जहाज सुरतेच्या बंदरांत पकडलें; त्यामुळें बादशहानें दमण व वसई येथें वेढा घालून पोर्तुगीज लोकांचें पुष्कळ नुकसान केलें; त्याप्रमाणेंच सुरतजवळ इंग्रज व पोर्तुगीज यांच्यामध्यें लढाई झाली, त्यांतही चारशेंपासून पांचशेंपर्यंत पोर्तुगीज लोक ठार मारण्यांत, जाळण्यांत आणि बुडविण्यांत आले होते. (इ० सन १६१५) याच सुमारास पोर्तुगालच्या व्यापारास बेसुमार उतरतिकळा लागून पोर्तुगालदेशही झपाट्यानें दारिद्र्यावस्थेंत येऊं लागला होता; उलटपक्षीं डच लोक प्रबळ होत चालले असून त्यांनीं हळू हळू पोर्तुगीज लोकांच्या बहुतेक मुख्य वसाहती खालसा केल्या होत्या व पोर्तुगीज लोकांऐवजीं ते आतां इंग्रजांना प्रतिस्पर्धी झाले होते. पुढें इ० सन १६२२ मध्यें इंग्लंड व स्पेनच्या ताब्यांतील पोर्तुगाल यांच्यामध्यें तह झाला; तरी सुद्धां पोर्तुगीज लोकांनीं इंग्रज कंपनीच्या व्यापाराला अडथळा आणिला व त्यांच्या कांहीं जहाजांचा नाशही केला; तेव्हां पोर्तुगीज लोकांना आर्मझ बेटांतून हांकलून देऊन इराणी आखातांतील त्यांची सत्ता नष्ट करण्याला—कारण हें बेट एक शतकभर पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत असून त्यामुळेंच त्यांना सर्व इराणी आखातभर आपली अबाधित सत्ता ठेवितां आली होती.—इराणचा राजा शहा अब्बास याच्या मदतीस इंग्रजांनीं आरमार पाठविलें; या जोड आरमारांनीं किल्ल्यावर तोफांचा येलगार व आरमारी युद्ध करून तें बेट हस्तगत करून घेतलें व तेथील पोर्तुगीज लोकांना हद्दपार

करून गोवें येथें पाठविण्यांत आलें. आर्मझ हें बेट शहानें आपणाकडेसच ठेवून घेतलें; तथापि या उद्योगांत इंग्रजांचा पुष्कळच सांपत्तिक फायदा झाला, आणि गोंबरून येथें माल उतरण्याची परवानगी व जकातीची माफी मिळून शिवाय इराणांत पाहिजे तेथें रेशीम खरेदी करण्याचीही त्यांना परवानगी देण्यांत आली. ( इ० सन १६२२ ) तथापि या बाबतींत खुद्द लायल हाच "इंग्लिशांनीं केलेल्या ह्या वरील कृत्यांबद्दल पोर्तुगीज लोकांनीं जोराची तक्रार केल्याचें ऐकिवांत नाहीं, तरी त्यामुळें हल्लींचे राजनीतिकुशल मंत्रिजनही खात्रीनें भयचकित होतील, अशा स्वरूपाचीं तीं कृत्यें होतीं." असें ह्मणत असल्यानें ( ब्रिटिश डोमीनियन इन इंडिया हें पुस्तक पहा. ) त्यासंबंधी अधिक चर्चा करण्याचें कारणच रहात नाहीं. त्यानंतर इ० सन १६३० मध्यें सुरत बंदराजवळच इंग्रज व पोर्तुगीज यांच्यामध्यें एक जोराची आरमारी चकमक उडाली; त्यांत उभयतांची बरोबरी झाली तरी इंग्रजांचा वरचढपणा कायम राहून पोर्तुगीज लोकांना कमीपणाच आला; याचवेळीं डच लोक हेही हिंदुस्थान आणि सिलोन ह्यांमधील पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतील ठाण्यांवर निकराचे एकसारखे हल्ले करीत असल्यामुळें त्यांच्या सत्तेचा झपाट्यानें ऱ्हास होत चालला; आणि पुढें लवकरच ( इ० सन १६४० ) जरी पोर्तुगाल देश स्वतंत्र झाला, तरी इ० सन १६४८ मधील मन्स्टरच्या तहानें त्या देशाचीं हिंदुस्थानांतील ठाणीं मर्यादित होऊन तें राष्ट्र कायमचें मागें पडलें.

पोर्तुगीज लोकांच्या भरभराटीच्या काळांत त्यांच्या ताब्यांत खालील प्रदेश होता तो:—आफ्रिकेच्या किनाऱ्यावर सोफला, मोंबासा, मोझंबीक्यू हे किल्ले आणि सोकोत्राचीं बेटें, अरेबियांत मस्कत, इराणांत ओर्मझ, मकराणमध्यें ग्यूडेल येथें एक किल्ला अथवा वखार, हिंदुस्थानच्या पूर्वेकडील देशांत मलाका आणि म्याको हीं दोन तटबंदीचीं शहरें, शिवाय तिडोर, अंबोयना, मनीला आणि पूर्वेकडील बेटांपैकीं कांहीं इतर ठाणीं;—शिवाय इतर ठिकाणीं कांहीं वखारी; व हिंदुस्थानांत गोंवा आणि आसपासचा प्रदेश, वसई, मुंबई व दमण, गुजराथेंत दीवचा मजबूत किल्ला व बेट, शिवाय डहाणू, सेंटजान्स, वसईचा प्रदेश व गोंवा यांच्या दरम्यान चौल, गोव्याचे दक्षिणेस ओन्नार, बार्शीलोर, मंगळूर, कान्नोर, कोचीन व किलोन ( कोलम् ) येथील किल्ले; आणि कारोमांडल किनाऱ्यावर नागापट्टण, मेलियापूर ( सेंटथामे ) आणि पुढें उत्तरेकडे मच्छलीपट्टण; तथापि पोर्तुगीज सत्तेचा ऱ्हास होऊन आतां हिंदुस्थानांत फक्त दीव, दमण आणि गोवें, एवढींच काय तीं फक्त तीन ठाणीं त्यांच्या ताब्यांत राहिलीं आहेत.

तथापि पोर्तुगीज लोकांचा धार्मिक छळ, क्रूर वागणूक आणि राजकीय ढवळाढवळ यामुळें पुढील काळांत मराठ्यांशीं त्यांच्या चकमकी उडालेल्या आहेत; आणि

त्याची सुरवात छत्रपति शिवाजीमहाराजांच्या काळापासून झालेली आहे; अर्थात् पुढील माहिती त्या काळांत येणार असल्यानें ती याठिकाणीं ग्रथिक करण्याची आवश्यकता नाहीं.

३ इंग्रजः–" मराठे व इंग्रज यांची अगदीं पहिली भेट कोठें, केव्हां झाली असेल याचा नक्की दाखला तर मिळणें शक्य नाहींच; ( मराठे व इंग्रज; हें पुस्तक पहा ) पण कशाळू बारीक डोळ्याच्या इतिहाससंशोधकांसही या भेटीचा शोध लागणें कठीण; फार काय, उभयतांची गांठ प्रथम पडली असेल तेव्हां मराठ्याला हा इंग्रज किंवा इंग्रजाला हा मराठा असें ओळखतांही आलें नसेल. इंग्रज प्रथम हिंदुस्थानांत आले, तेव्हां मुसलमानांचें राज्य होतें; अर्थात त्यावेळीं इंग्रजांच्या डोळ्यांत मुसलमान तेवढा भरण्यासारखा होता; मराठ्यांकडे त्यांचें लक्ष कशाला जाईल ? सुरतेच्या किंवा दुसऱ्या एखाद्या कोंकणबंदराला लागलेले इंग्रज तडक दिल्लीकडची वाट धरीत; उलटपक्षीं मराठ्यानें जेव्हां पहिला इंग्रज पाहिला असेल तेव्हां त्याला इंग्रजांचें नांवही ऐकून माहीत नसेल; त्यावेळीं डच व पोर्तुगीज व्यापारीच इकडे हिंडत असत; त्यामुळें टोपीवाल्यांत टोपीवाला सहज मिसळला गेला असेल; मराठा पाहून इंग्रजाला वाटलें असेल कीं, " मांडचोळणा, पायघोळ आंगरखा व विचित्र पगडी घालणारा हा कोणी तरी अर्धवट रानटी मनुष्य असावा. " उलट इंग्रजांची ती शिपतरी टोपी, तो अवाढव्य गळपट्टा व गोरा रंग पाहून मराठा मनांत म्हणाला असेल, " कोण विचित्र ध्यान हें !" अद्यापि खेडेगांवांतून काबुली व्यापारी चाकू, कात्र्या विकावयाला गेला असतां गांवचीं मुलें जशीं त्याच्याभोंवतीं कौतुकानें गोळा होतात, तशींच पूर्वीं इंग्रज व्यापारी पाहून गोळा होत असतील. पहिल्या पहिल्या इंग्रज प्रवाशांनींही हिंदी लोकांचीं वर्णनें लिहून ठेविलीं आहेत, त्यांत खेडवळ मुलांची कुतूहलपूर्ण दृष्टीच दिसून येते. कोणाही दोघां विदेशी लोकांची प्रथम भेट अशीच आश्चर्यजनक असावयाची ! ".

" या पहिल्या भेटीच्या वेळीं इंग्रजाला " आपण मराठ्यांचें राज्य जिंकून घेऊन त्यांचे धनी होऊं, " असें, किंवा मराठ्याला " आपणासमोर नमणारे, अदबीनें बोलणारे, गिऱ्हाइकांना खुष करूं पाहणारे, हे सौदागर आपले राजे होतील " असें कशानें मनांत येणार ? पण ईश्वराची लीला विचित्र आहे. तिच्यायोगानें अनेक चमत्कार या जगांत घडून येतात; आणि सहा हजार मैलांवरच्या इंग्रजांनीं समुद्रमार्गानें हिंदुस्थानांत व्यापारी म्हणून यावें व अखेर येथील आधिराजे होऊन बसावें हा त्यांतलाच एक चमत्कार होय. इतक्या दूरच्या लोकांचा इतका निकट संबंध आल्याचें जगाच्या इतिहासांत हें प्रायः पहिलेंच उदाहरण असावें. आतां जगांत कोणतेही लोक अनंतकाळ-

पर्यंत एकाच देशाला चिकटून बसलेले आढळत नाहींत. मानववंशाचे उगम शोधण्याची दिव्यदृष्टि लाभल्यास मनुष्याचा स्थानिक देशाभिमान कदाचित् सर्वच नष्ट होऊन त्याची विश्वबंधुत्वाची दृष्टि प्रभावी होईल. लो. टिळकांच्या उपपत्तीप्रमाणें आर्यन् लोक उत्तरध्रुवापासून निघून हळूं हळूं खालीं येत येत भूमध्य रेषेपर्यंत आले असें मानिलें तरी, खुद्द हिंदुस्थानांतच त्यांची वस्ती इतक्या दीर्घकाळपर्यंत झालेली आहे कीं, त्यांना आपण परक्या देशांत आहों, असें वाटणें शक्य नाहीं. इंग्रजांचे आद्यपूर्वज व आमचे आद्यपूर्वज हे कदाचित् उत्तरध्रुवाजवळ कधींकाळीं एकत्र नांदत असतीलही; पण मनुष्याच्या आठवणीपलीकडच्या व वाङ्मयाच्या उगमापूर्वीच्या गोष्टी जमेस धरितां येत नाहींत; या दृष्टीनें आह्मीं हिंदू आर्य अनादिकालापासून हिंदुस्थानचे रहिवासी, आणि इंग्रज लोक अनादिकालापासून युरोपचे रहिवासी, असेंच मानिलें पाहिजे. इंग्रज व मराठे मूळचे भाऊबंद माना किंवा सर्वस्वी परके माना; त्यांचा असा निकट संबंध येणे, हें आश्चर्यांतील आश्चर्य होय. "

........" हिंदुस्थानामध्यें प्रथम इंग्रज लोक केव्हां आले, हें पाहूं जातां असें दिसतें कीं, नवव्या शतकांत आलफ्रेड राजानें पाठविलेले प्रतिनिधी हे प्रथम येथें आले. त्यानंतर चारपांचशें वर्षांनीं ह्मणजे चवदाव्या शतकांत सर जॉर्ज मंडेव्हिल हा इंग्रज हिंदुस्थानांत आला. ऐतिहासिकदृष्ट्या या दोघां इंग्रजांचें आगमन वादग्रस्त आहे. मात्र इतकें खरें कीं, मंडेव्हिल यानें हिंदुस्थानच्या प्रवासाविषयीं लिहिलेलें पुस्तक इ० सन १४९९ सालीं लंडन येथें छापलें गेलें व इंग्लंडच्या छापखान्यांत छापलेलें असें हेंच पहिलें पुस्तक असलेलें सांगतात. हें जर खरें असेल तर इंग्रजांनीं छापलेलें सर्वांत पहिलें पुस्तक हिंदुस्थानासंबंधीं असावें, हा योगायोग विलक्षण खरा. वरील दोघां इंग्रजांचें आगमन खरें मानलें तरी ते हिंदुस्थानांत उपरी होते. ते येऊन फार तर नुसता देश पाहून गेले असतील; पण आधुनिक काळांत हिंदुस्थानांत खरोखर आला व इकडे वस्ती करून राहिला असा पहिला इंग्रज ह्मटला ह्मणजे फादर टॉमस स्टीफन हा होय. इ० सन १५७९ च्या आक्टोबरमध्यें स्टीफन हा ख्रिस्तीधर्माचा प्रसार करून जमल्यास व्यापारही करावा, अशा हेतूनें गोव्यास आला व त्यापुढचें त्याचें सर्व आयुष्य हिंदुस्थानांतच गेलें, त्यानें विलायतेस हिंदुस्थानच्या लोकस्थितीची व व्यापाराची मनोरंजक हकीकत लिहून पाठविली. साष्टी ह्मणजे ठाणें याठिकाणीं राहून हिंदूलोकांस उपदेश करून बाटवून ख्रिस्तीधर्माचा प्रसार करण्याच्या खटपटींत त्याचीं पुष्कळ वर्षें गेलीं. याच स्टीफन साहेबानें " ख्रिस्तपुराण " नामक कोंकणी मराठी भाषेंत पण रोमनलिपीनें एक ख्रिस्त वर्णनपर उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. मराठी-कोंकणी भाषांचें व्याकरणही पोर्तुगीज भाषेंत त्यानें लिहिलें. इ० सन १५८३ सालीं

राल्फफिच नामक इंग्रज गृहस्थ तुरुकीच्या वाटेनें इराणच्या आखातापर्यंत आल्यावर पोर्तुगीज लोकांनीं त्यास कैद करून गोव्यास पाठविलें. हिंदुस्थानांतून विलायतेंत परत गेल्यावर त्यानें इकडच्या लोकांविषयीं व संपत्तिविषयीं ज्या चित्तवेधक हकीकती इंग्रज-लोकांस सांगितल्या त्यामुळें हिंदुस्थानासंबंधानें तिकडील लोकांच्या मनांत औत्सुक्यकारक कल्पना उत्पन्न झाल्या. पुढें तीन वर्षांनीं इ० सन १५८६ मध्यें टॉमस कॅव्हेंडिश नांवाचा इंग्रज पृथ्वीपर्यटण करीत करीत हिंदुस्थानांत आला होता. तो विलायतेस परत गेल्यावर त्याच्या मदतीनें लंडनच्या प्रमुख व्यापाऱ्यांनीं अर्ज लिहून त्यावेळची इंग्रजी राणी इलिझाबेथ इजकडे सादर केला व त्यामुळें पूर्वेकडील देशांत व्यापारासाठीं सफर करण्याची आपल्या प्रजाजनांस राणीनें परवानगी दिली. पुढें लवकरच ह्मणजे इ० सन १६०० सालीं ईस्ट-इंडिया कंपनीची स्थापना झाली. यापूर्वीं एक वर्ष लंडनच्या व्यापाऱ्यांनीं मिलनहॉल नांवाच्या हुषार व साहसी इंग्रजास राणीच्या मार्फत अकबर बादशहाशीं बोलणें करण्यास हिंदुस्थानांत पाठविलें होतें. तो इ० सन १६०२ सालीं विलायतेस परत गेला; तेव्हां त्याजकडून दिल्लीच्या बादशाहाचें वैभव आणि हिंदुस्थानांतील सुधारणा व संपत्ति यांची बरीच कल्पना इंग्रजांना आली."

ब्रिटिश राष्ट्राच्या इतिहासांत इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीचा काळ-कारकीर्द इ० सन १५५८ ते इ० सन १६०३–हा पुष्कळ दृष्टीनें अत्यंत महत्वाचा असून, त्या काळांत ब्रिटिश राष्ट्रीय व्यापाराची, आरमाराची व वाङ्मयाची संस्मरणीय अशी वाढ झालेली आहे. व्यापार, वसाहती व प्रदेशगमन यासंबंधीं धाडसी कृत्यें करण्याच्या इच्छेबरोबरच, कष्टमय जलपर्यटणें करून, लांबलांबच्या देशांत जाऊन आपलें नशीब काढण्याच्या प्रयत्नांनाही याचवेळीं जोराची चेतना मिळालेली आहे. याच राणीच्या कारकीर्दींत एका इंग्रज मनुष्यानें–ह्मणजे सर फ्रान्सिस ड्रेक यानें–अगदीं पहिल्यानें सर्व जगासभोंवतीं जलपर्यटण केलें आहे; आणि हिंदुस्थानदेशाकडे जाण्याच्या जवळच्या मार्गाचा शोध लावण्याकरितां इंग्लिश लोकांनींही पोर्तुगीज लोकांप्रमाणेंच प्रयत्न केला आहे; व राल्फफिच्छ हा हिंदुस्थानांतून परत गेल्यावर लंडन येथील टर्की कंपनीमधील साहसी व्यापाऱ्यांनीं कॅप्टन रेमंड या नांवाच्या एका मनुष्याच्या हाताखालीं तीन गलबतें देऊन त्यास ता० १० एप्रील, इ० सन १५९१ रोजीं प्लेमौथ येथून हिंदुस्थान देशाकडे रवाना केलेलें आहे; शिवाय, इ० सन १४९६ मध्यें सातव्या हेनरीनें जॉन कॉबेट यास हिंदुस्थानाकडे जाण्याच्या मार्गाचा शोध लावण्याकरितां दोन जहाजांनिशीं जलपर्यटण करण्याचा राजकीय परवाना दिला होता व त्याप्रमाणें त्यानें जलपर्यटणही केलें होतें; परंतु, हिंदुस्थान देशाकडे जाण्याच्या नव्या मार्गाचा शोध

लागण्याऐवजीं त्यास " न्यु फाऊंडलंड " या बेटाचा शोध लागला; पुढें इ० सन १५८८ मध्यें, इंग्रजांनीं, स्पेनच्या बलिष्ट आरमाराचा धुव्वा उडविल्यानंतर, " ईस्टइंडीजकडे व्यापार करणारी लंडनमधील व्यापाऱ्यांची कंपनी आणि गव्हर्नर, " या नांवाची एक मंडळी स्थापन होऊन तिनें राणीपासून परवाना मिळविला; व पूर्वेकडील देशांबरोबर व्यापार सुरू केला. या इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीचा प्रारंभींचा थोडक्यांत इतिहास असा आहे कीं, इ० सन १५७१ मध्यें आशियाकडील माल तुर्कस्थानाच्या किनाऱ्यावरून खुष्कीच्या मार्गानें भूमध्यसमुद्रांतून इंग्लंडमध्यें आणण्याकरितां " लीव्हंट कंपनी " स्थापन झाली, आणि तिनें इ० सन १५९९ च्या एप्रीलमध्यें मिल्डन् हॉल या नांवाच्या एका मनुष्यास हिंदुस्थानांत पाठविलें. इकडे आल्यावर तो आग्रा येथें जाऊन अकबर बादशहास भेटला, आणि त्यानें आपल्या कंपनीकरितां कांहीं विशिष्ट सवलती मिळविल्या. मध्यंतरीं ता० २२ व ता० २४ सप्टेंबर इ० सन १५९९ रोजीं लंडन येथें " फाऊंडर्स हॉल " मध्यें मेयर सर स्टीफन सोम याच्या अध्यक्षतेखालीं एक सभा भरली; तींत लंडनमधील अजमासें शंभर प्रमुख व्यापारी हजर असून हिंदुस्थानांत व्यापार करण्याकरितां एक व्यापारी कंपनी स्थापन करण्याचें ठरलें व जागच्याजागीं ३०,००० पौंड रक्कम गोळा झाली; आणि राणी व प्रीव्हीकौन्सील यांचेकडे व्यापाराची सनद मिळविण्याबद्दल खटपट करण्याचें काम सुरू झालें. त्यांनीं पाठविलेल्या विनंतीपत्रांत खालील मजकूर आहे:—" डच लोकांनीं ईस्टइंडीजमध्यें केलेल्या सफरींत त्यांना मिळालेल्या यशानें आपणही तिकडे सफरी कराव्या, असें आह्मास उत्तेजन मिळालें आहे. डच लोक हे हल्लींही पुन्हां ईस्टइंडीज बेटांमध्यें सफर करण्याच्या तयारींत असून ते हल्लीं इंग्लंडमध्यें आलेले आहेत. आह्मी सर्व एकत्र झालेल्या व्यापारी मंडळानेंही तसेंच धाडशी जलपर्यटण करण्याचा निश्चय केला असून राणीनें कृपावंत होऊन आह्मांस सनद देण्याची मेहेरबानगी करावी. " त्याप्रमाणें ता० ३१ दिजंबर इ० सन १६०० रोजीं इलिझाबेथ राणीनें सनदेवर सही केली; नंतर कंपनीनें पांच जहाजें विकत घेतलीं; चोवीस डयरेक्टर्स, व एक गव्हर्नर असे नेमण्यांत आले, आणि ता० १६ फेब्रुवारी इ० सन १६०१ रोजीं जहाजावरील मुख्य अधिकारी सर जेम्स ल्याकेस्टर, ४०० मनुष्यें व बत्तीस कारकून यांसह लंडन येथून जहाजें हांकारण्यांत आलीं. या कंपनीला कांहीं सवलती व हक्क देण्यांत आलेले होते; मागलेनची सामुद्रधुनी आणि केप ऑफ गुड होप यांचें दरम्यान आशियाखंडांतील सर्व भागांत व आफ्रिकेंत कोणत्याही बंदरांत व्यापार करण्याची परवानगी देण्यांत आली होती, आणि आपल्या कामाकाजाच्या बाबतींत व व्यवस्थेंत नियमन करण्याचाही पूर्ण अधिकार दिलेला होता. शिवाय खुद्द राणीनें इकडील

राज्यकर्त्यांना देण्यासाठीं पहिल्या सफरीच्या मुख्यापाशीं खालीलप्रमाणें एक विशेष महत्वाचें व मननीय पत्र दिलें होतें, तें:—

फेब्रुवारी इ० सन १६००

" परमेश्वरकृपेंकरून इंग्लंड, फ्रान्स व ऐर्लंडची राणी इलिझाबेथ, हिजकडून ......चे थोर व पराक्रमी राज्यकर्ते......यांस.

सर्वशक्तिमानू प्रभूनें आपल्या अपरिमित व अगाध शहाणपणानें व कृपादृष्टीनें या जगांत मनुष्याच्या उपभोगाकरितां अनेक उत्तम वस्तू उत्पन्न करून त्यांची सर्वत्र सुव्यवस्था करून ठेविली आहे. ते जिन्नस कोठेंही व कसेही मूळ पैदा झाले असले व व कांहीं ह्या देशांत व कांहीं त्या देशांत तयार झालेले असले तरी ते ह्या प्रभूच्या हुकुमानें पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांस पोंचले जावे व त्याचें अपरिमित औदार्य सर्व जनांस सारखें प्राप्त व्हावें, असा त्या प्रभूचा उद्देश दिसतो; ज्या प्रदेशांत जो जिन्नस पिकेल, तेथच्या लोकांनीं मात्र तो वापरावा, इतर देशांतील लोकांस तो मिळूं नये, असा त्याचा हेतु दिसत नाहीं. एका देशानें दुसऱ्या देशाच्या उपयोगीं पडावें व एका देशांत जो जिन्नस विपुल पिकतो, त्यानें दुसऱ्या देशाची गरज भागावी, असा ईश्वरी उद्देश असल्यामुळेंच दूरदूरच्या अनेक देशांमध्यें व्यापाराची घडामोड चालते व मालाची देवघेव चालल्यानें त्यांजमध्यें स्नेहभाव व प्रेम वाढत जातें."

" महाराज, ह्या वर सांगितलेल्या हेतुशिवाय आणखीं आह्मांस असें समजलें आहे कीं, कोणीही परराष्ट्राचे लोक व्यापाराचा उद्देश मनांत धरून स्नेहभावानें व सौम्यवृत्तीनें आपल्या देशांत गेले असतां आपण त्यांचा उत्तमप्रकारें आदर करितां; यावरून आमच्या कित्येक व्यापाऱ्यांस आपल्या देशांत जाण्याची परवानगी देण्यास आह्मास उमेद आली आहे. आपल्या देशांत व्यापारी मालाचा सौदा उत्तम होतो, असें इकडे खात्रीलायक कळल्यावरून जलमार्गाचीं अनेक दुर्धर संकटें सहन करूनही हे व्यापारी तिकडे जात आहेत. तेथें आपल्या लोकांशीं व्यापारी धोरणानें सौदा करावा, ह्मणजे इकडचे जिन्नस त्यांस विकून तिकडचे इकडे विकत आणावे, असा त्यांचा उद्देश आहे. एवढीं संकटें सोसून आपल्या देशांत प्रवेश करण्याची ज्याअर्थीं त्यांस स्फूर्ति झाली आहे, त्याअर्थीं आपणही त्यांचा योग्य परामर्ष घेतला असतां बोलण्याचालण्यांत व व्यवहारांत ते चोख व सभ्य आहेत, असें आपणास दिसून येईल व ते आपल्या देशांत आल्याबद्दल आपणास वाईट वाटण्याचें कारण राहणार नाहीं. तसेंच त्यांनीं आपल्या गलबतांतून नेलेला इकडचा माल आपणास देण्यांत व आपणाकडचा माल इकडे आणण्यांत एकमेकांचा निकट सहवास व व्यवहार घडल्यावर त्यांनीं पुनरपि असाच माल घेऊन आपल्या देशांत यावें, असें आपणास वाटेल. आजपर्यंत फक्त

स्पॅनिश व पोर्तुगीज व्यापारीच काय ते इकडचा माल आपल्या देशांत नेत आहेत; पण ते लोक व्यापाराच्या कामांत आमच्या व्यापाऱ्यांस व इतर लोकांस नाहक जाच करितात. वास्तवीक पाहिलें तर ते आपल्या देशांत व्यापाराच्या उद्देशानें गेले आहेत, असें नाहीं; तिकडच्या सर्व देशाचे मालक व बादशहा आपण आहों, असे ते लोक समजतात; व तिकडचे सर्व लोक आपल्या केवळ प्रजा आहेत असें ते इकडे लोकांस सांगत सुटले आहेत व लिहिण्यांतही ते तसा व्यवहार उघडपणें करीत आहेत."

"आमचे जे लोक केवळ व्यापाराच्या सौम्य उद्देशानें आपल्याकडे आज जात आहेत, त्यांस आपण मेहेरबानी करून आपल्या देशांत येऊं द्याल व आजच्या ह्या पहिल्या प्रसंगाची ओळख पुढें चालू ठेवून आपल्या व आमच्या प्रजेमध्यें हें व्यापाराचें व स्नेहाचें दळणवळण वृद्धिंगत कराल, अशी आह्मांस आशा आहे. आपली आज्ञा असेल, तर आमचे कांहीं व्यापारी इकडे परत येऊन पुन्हां इकडचा माल भरून तिकडे नेत तोंपर्यंत बाकीची मंडळी आपल्या कृपाछत्राखालीं तेथेंच राहून तेथची भाषा वगैरे शिकतील; कीं जेणेंकरून एकमेकांचे विचार व रीतरिवाज एकमेकांस कळल्यानें स्नेह वृद्धिंगत होऊन उभयताचा उद्देश पार पडेल."

"आपला आमचा स्नेह वृद्धिंगत होऊन दळणवळण वाढावें, यासाठीं उभयतांमध्यें कांहीं करार किंवा ठराव होण्याची जरूरी आहे. त्यासाठीं हें पत्र आपणाकडे घेऊन जाणारे इसमास आमच्या तर्फे बोलण्यास व ठराव करण्यास आह्मीं संपूर्ण अधिकार दिला आहे. ते गृहस्थ आपल्याशीं जे ठराव करितील, ते आह्मी इमानानें पाळूं; व आपण आमच्या ह्या लोकांवर जी मेहेरबानी किंवा उपकार कराल, त्यांची फेड आह्मी मोठ्या आनंदानें करूं. अखेरीस एवढेंच मागणें आहे कीं, आमचा हा उद्देश आपणास पसंत पडल्याचें निदर्शक ह्मणून आपला या पत्राचा जबाब गेलेल्या मंडळीजवळ द्यावा. आपण जबाब पाठविल्यानें आमच्यावर मोठी मेहेरबानी होईल व आह्मास अतीशय संतोष वाटेल."

याशिवाय, या कंपनीस कांहीं विशिष्ट हक्क व अधिकार देण्यांत आले होते, तेः—

१ कंपनीचे सर्व सभासद, त्यांचीं वयांत आलेलीं मुलें, त्यांचे नोकर व उमेदवार, या सर्वांना पंधरा वर्षांच्या करारानें पूर्वेकडे व्यापार करण्याची परवानगी देण्यांत येत आहे.

२ मागलेनची सामुद्रधुनी व केप ऑफ् गुड होप यांचे दरम्यान आशिया, आफ्रिका व अमेरिका या तिन्हींही खंडांतील सर्व आणि पाहिजे ते देश, बंदरें आणि बेटें यांच्याशीं कंपनीनें आपलें व्यापारी दळणवळण ठेवावें व आपला व्यापार चालवावा, असा तीस हक्क दिला आहे.

३ कलम दोन यांत दर्शविलेल्या सर्व प्रदेशांपैकीं पाहिजे त्यठिकाणीं कंपनीस जरूर त्याप्रमाणें पाहिजे तितकी जमीन विकत घेण्यास अधिकार देण्यांत येत आहे.

४ कंपनीस दुसऱ्यावर फिर्याद मांडण्याचा, आपणांवर फिर्याद मांडून घेण्याचा व मोतब करण्याचा अधिकार दिला आहे.

५ कंपनीस आपल्या कामांतील व्यवस्थेसाठीं आवश्यक असलेले कोणतेही नियम निर्बंध ठरविण्याचा हक्क दिला आहे.

६ इंग्रजी कायद्याप्रमाणें कोणत्याही गुन्हेगारास दंडाची अथवा कैदेची अथवा दोन्हींही शिक्षा देण्याचा अधिकार आहे.

७ या सनदेंत दिग्दर्शन करण्यांत आलेल्या कंपनीशिवाय दुसऱ्या कोणत्याही कंपनीस, अथवा त्यांपैकीं कोणत्याही ठिकाणीं व्यापार करण्याची मनाई असून तसा व्यापार कोणी केल्यास त्यास शिक्षा करण्यांत येईल, याशिवाय खालील विशिष्ट सवलती राणीनें कंपनीस दिल्या होत्या, त्याः—

१ पहिल्या चार सफरींत कंपनी जो माल विक्रीसाठीं बाहेर ठिकाणीं नेईल त्यावरील निर्यात जकातीची सूट देण्यांत आली.

२ कंपनीकडून आयात जकातीचा सरकारांत जो भरणा व्हावयाचा तो तिनें लागलींच न करितां सहा ते बारा महिन्यांत करावा, अशी मुदतीची सवलत कंपनीस देण्यांत आली.

३ कोणत्याही सफरींत तीन लक्ष रुपये किंमतीपर्यंत चांदी अथवा इतर नाणें बाहेर नेण्यास कंपनीस परवानगी देण्यांत आली.

परंतु कोणत्याही सफरीच्या पुढील सफरींत बाहेर नेण्यांत आलेलें नाणें सहा महिन्याच्या मुदतींत परत आणलेंच पाहिजे, असा निर्बंध ठेवण्यांत आला.

४ कंपनीस जरूर लागेल तेव्हां दरवर्षी पांचशें इंग्रज खलाशी व सहा जहाजें मिळत जातील असा हुकूम देण्यांत आला.

५ या कंपनीचा व्यापार व्यवस्थितरीतीनें चालत असल्याचें निदर्शनास आलें तरच कंपनीस दिलेली पंधरा वर्षांची मुदत पुढें वाढविण्यांत येईल; नाहीं तर ती रद्द करण्यांत येईल.

अशारीतीनें इंग्रज कंपनीनें पूर्वेकडील देशाशीं व्यापार करण्याची सनद व कांहीं विशिष्ट हक्क, अधिकार व सवलत हीं मिळविलीं; तथापि त्यामुळें स्पेनला इंग्लंडचा अतीशय राग आला; आणि पूर्वेकडील हा अतीशय मौल्यवान् व्यापार आपल्या हातून जाऊं नये ह्मणून त्यांनीं अतीशय खटपट केली; यावेळीं डच लोक हेही पूर्वेकडील

देशाशीं व्यापार करण्याकरितां पुढें आले होते; इ० सन १६०२ मध्यें त्यांची " युनिव्हर्सल ईस्टइंडिया कंपनी " स्थापन झाली होती; आणि तिनेंही आपल्या व्यापारास सुरवात केली होती; या कंपनींतही सर्व प्रांतांचें भांडवल असून तिलाही पुष्कळ विशिष्ट अधिकार व सवलती देण्यांत आल्या होत्या; व मसाल्याच्या बेटांतून व हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरून पोर्तुगीज लोकांना हांकलून देऊन तिकडे आपल्या वसाहती स्थापन कराव्या, आणि पूर्वेकडील व्यापार आपल्या एकट्याच्याच हातीं ठेवावा, असा डच सरकारानें तिला हुकूम दिला होता. त्यामुळें त्यांनीं इ० सन १६०२ मध्येंच बेटामजवळ पोर्तुगीज लोकांचा पराभव केला; मसाल्याच्या बेटांत जाण्यायेण्याला असलेली प्रतिबंधक आडकाठी नाहींशी करून तो मार्ग मोकळा केला; इ० सन १६०३ मध्यें गोंव्याला व इ० सन १६०६ मध्यें लिसबनला शह दिला; आणि जिब्राल्टरच्या आखातांत स्पॅनिश आरमाराचाही नाश केला; पूर्वसमुद्रांतील मोलक्का बेटें आपल्या हस्तगत करून घेतलीं. थेट जपान देशापर्यंत आपलें व्यापारी वर्चस्व प्रस्थापित करून आपल्या ताब्यांतील मसाल्यांच्या बेटांत इतर कोणाचाही प्रवेश न होऊं देण्याबद्दल त्यांनीं अतीशय खबरदारी घेतली; आणि पोर्तुगीज लोकांचें व्यापारी वर्चस्व–इंग्रजांची मदतही प्रसंगीं घेऊन–त्यांनीं नामशेष करून टाकिलें; परंतु त्यामुळें पोर्तुगीज लोकांऐवजीं डच लोक इंग्रजास प्रतिस्पर्धी झाले; आणि त्यांनीं इंग्रज कंपनीच्या मलाका सामुद्रधुनीच्या पलीकडे पूर्व आशियांतील समुद्रांतील व्यापारी वृळगवळणाला इतके अडथळे आणिले, आणि इतक्या भानगडी उपस्थित केल्या कीं, त्या देशांतील पुष्कळ ठाणीं इंग्रज कंपनीनें सोडून दिलीं, आणि दिवसानुदिवस हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर व लगतच्या प्रदेशामध्यें त्यांनीं आपल्या व्यापाराचा ओघ वळवीत आणिला; आणि पुढें मोल्यूकसमधील अंबोयना बेटामध्यें असलेल्या बहुतेक सर्व इंग्रज लोकांची, डच लोकांनीं, क्रूरपणानें कत्तल उडविल्यानंतर ( इ० सन १६२३ ) तर इंग्रज लोक निःसंशय पूर्णपणें हिंदुस्थानाकडे वळले; व याच देशांत त्यांनीं पहिल्यानें व्यापारी व नंतर राजकीय श्रेष्ठत्व मिळविलें.

हिंदुस्थानांत मोंगल बादशहाच्या फर्मानाअन्वयें, इंग्रज लोकांनीं इ० सन १६१२ मध्यें, सुरत येथें आपली पहिली वखार स्थापन केली; त्यानंतर इ० सन १६१५ मध्यें इंग्लंडचा राजा जेम्स याच्याकडून सर टॉमस रो या नांवाचा एक वकील जहांगीर बादशहाच्या दरबारीं जाण्याकरितां, हिंदुस्थानांतील पश्चिम किनाऱ्यावरील सुरत बंदरांत उतरला; तेथून बऱ्हाणपूर येथें जाऊन शहाजादा पर्वीझ याची भेट घेतली व तेथून एक महिन्यानें ता० २३ दिसेंबर इ० सन १६१५ रोजीं तो अजमीर येथें पोहोंचला; बादशहा जहांगीर याचा मुक्काम त्यावेळीं अजमीर येथेंच असून, रोची ता० १० जानेवारी

इ० सन १६१६ रोजीं बादशहाशीं प्रथम भेट झाली; एक वर्षभर हिंदुस्थानांत राहिल्यावर त्यानें विलायतेस असें कळविलें कीं, व्यापारासंबंधानें आपल्या इच्छा सफळ होण्यास अडचण नाहीं; तथापि बादशहाशीं बरोबरीच्या नात्यानें कायमचा तह होणें मात्र शक्य नाहीं; मोंगलास मदत करणें किंवा तटबंदी करून किनाऱ्याचें संरक्षण करणें असले बेत निरुपयोगी आहेत. व्यापार व युद्ध या दोन गोष्टी परस्पर विरुद्ध आहेत; समुद्रावर शांतपणें व्यापार करून मिळेल तोच नफा मिळविण्याचा आपण आपल्या मनांत हेतु ठेविला पाहिजे;" त्यानंतर इ० सन १६१८ च्या फेब्रुवारी महिन्यांत रो यानें विलायतेस आपला वार्षिक अहवाल लिहून पाठविला त्यांत तो ह्मणतो:—कायमचा तह होणें केव्हांही शक्य नाहीं, प्रसंग पडेल तसें आपण वागलें पाहिजे. जरूर तेवढीं फर्मानें मिळालीं आहेत; कांहीं मिळावयाचीं आहेत. बादशहाची मर्जी हाच केवळ कायदा असून सर्व दरबारी व्यवहार पैशावर चालत आहेत. एकंदरींत लोकांस न्याय बरा मिळतो; सरकारी अधिकाऱ्यांचा लोकांवर जुलूम नाहीं; परंतु त्यांना पाहिजे असेल तो जिन्नस मात्र ते हवें तें करून लुबाडून घेतील. आह्मांस त्रास पडतो तो आमच्याच अव्यवस्थेमुळें; ह्या लोकांशीं गरीबीनें वागून उपयोगी नाहीं; त्यांस आमचा कंटाळा आहे. त्यांचीं बंदरें सधन होतीं; तीं आह्मीं भिकेस लावून त्यांचा सर्व व्यापार बुडविला आहे; आमची जरब त्यांच्यावर जितकी बसेल, तितकें आपलें काम होत जाईल. या लोकांस तरवारीच्या धारेखालीं ठेविलें पाहिजे. जर आमच्या मागण्या अधिकाऱ्यांनीं कबूल केल्या नाहींत, तर बेलाशक एतद्देशीय व्यापाऱ्यांचीं गलबतें पकडून आह्मीं आपलें काम भागवावें." रो हा बादशाही दरबारांत कांहींकाळ राहिल्यानंतर त्याच्या मध्यस्थीनें इंग्लंडचा जेम्स राजा व जहांगीर बादशहा यांच्यामध्यें तह ठरला; परंतु दरबारी लोकांच्या धूर्तपणामुळें त्या तहावर बादशहाची सही झाली नाहीं; तथापि शहाजाद्याच्या मध्यस्थीनें, इंग्रजास सुरतेस राहण्याची, देशांत व्यापाराकरितां प्रवास करण्याची, हत्यारें वापरण्याची व मोंगल दरबाराबरोबर इंग्रज वकील ठेवण्याची वगैरे सवलती रो यानें बादशहाकडून मिळविल्या; शिवाय, "इंग्रज व्यापाऱ्यांचा आपण चांगला परामर्ष घेऊं" अशा अभिवचनाचें एक पत्र त्यानें जहांगीर बादशहा-जवळून जेम्स राजास घेतलें; व ता० १९ फेब्रुवारी इ० सन १६१९ रोजीं तो हिंदुस्थानांतून इंग्लंडमध्यें परत गेला, एकंदरींत सर टॉमस रो हा मोठा हुषार व विद्वान् मनुष्य असून, त्याच्या वकिलातीचा इंग्रजांना अतीशय फायदा झाला, असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

हिंदुस्थानांत इंग्रज, पोर्तुगीज व डच या युरोपियन लोकांची व्यापारीस्पर्धा, आपसांत नेहमीं सुरू असे; इ० सन १५९७ ते इ० सन १६०० यांचे दरम्यान डच

लोकांच्या जहाजांनीं प्रथमच केप ऑफ गुड होपला वळसा घालून, आशियाखंडांतील समुद्रांत प्रवेश केला; परंतु पोर्तुगीज लोकांनीं यावेळीं त्यांना अतीशय क्रूरपणानें वागविलें; इ० सन १६०२ यावर्षी हालंडमध्यें " युनिव्हर्सल ईस्ट इंडिया कंपनी " ह्या नांवाची एक व्यापारी मंडळी स्थापन झाली; तींत सर्व प्रांतांतील लोकांचें भांडवल होतें; व तिला एकटीलाच केप ऑफ गुड होपच्या पूर्वेकडे व म्यागलेन सामुद्रधुनीच्या पश्चिमेकडे व्यापार करण्याचा परवाना देण्यांत आला होता; शिवाय, हालंडच्या संयुक्त प्रांतांतर्फे लढाया व तह करण्याचा, सैन्य ठेवण्याचा आणि सैन्याधिकारी नेमण्याचा तिला अधिकार दिलेला होता; आणि पोर्तुगीज लोकांना मसाल्याच्या बेटांतून व हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरून हांकलून लावण्याची डच लोक, इंग्रज लोकांच्या मदतीनें, खटपट करीत होते; डच व इंग्रज यांचीही आपसांत व्यापारी स्पर्धा सुरूच होती; परंतु डच व इंग्रज हे प्रॉटेस्टंट धर्माचे असून; युरोपांत यावेळीं धार्मिक तट पडलेले होते; त्यामुळें हिंदुस्थानांत इंग्रज व डच हे सहकारितेनें वागत असून उभयतां मिळून पोर्तुगीज लोकांशीं दुष्मनगिरीनें वागत होते; इ० सन १७५८ मध्यें क्लाईव्ह यानें चिनसुरा येथें डच लोकांच्या वर्मीं घाव घातल्यानंतर हिंदुस्थानांतील त्यांचें सर्व महत्व पूर्ण नष्ट झालें; तथापि ही डच कंपनी एकेकाळीं मोठी बलाढ्य व सधन होती; इ० सन १६१५ च्या सुमारास डच लोकांचीं इकडील व्यापारांत ५१ जहाजें गुंतलेलीं होतीं; आणि त्यांचें स्वतःचें भांडवल नऊ लक्ष पौंडाचें असून शिवाय चार लाख पौंड त्यांनीं व्याजीं घेतले होते. त्याप्रमाणेंच, याच वर्षी ( इ० सन १६१५ मध्यें ) दोन जहाजांवरील मालाबद्दल चौदा हजार पौंड जकात भरली; आणि इ० सन १६१६ मध्यें फक्त एका जहाजावरील मालाची किंमत जवळ जवळ चौदा हजार पौंडांहून पुष्कळच अधिक होती; इंग्रज लोकांच्या पहिल्या सफरींत ६ लक्ष ८३ हजारांचें भांडवल असून तींत चार जहाजें व ४८० लोक होते; या सफरींत इंग्रजांना अतीशय फायदा झाला व तीस हजार रुपयांस खरेदी केलेल्या लवंगांची, इंग्लंडमध्यें ३ लक्ष ६० हजार रुपये किंमत आली; पहिल्या नऊ सफरींत इंग्रजांचें ४६ लक्ष भांडवल गुंतलेलें असून त्यावर त्यांना दामदुप्पट ह्मणजे शेंकडा दोनशें, याप्रमाणें नफा झाला; इ सन १६१२ मध्यें इंग्लंडांत व्यापाराकरितां १ कोटी ६२ लक्ष रुपयांचें सामाईक भांडवल उभारण्यांत आलें; तें फक्त ९३४ लोकांनींच मिळून उभारिलेलें होतें; इ० सन १६०१ ते इ० सन १६२१ या दरम्यान इंग्रज कंपनीची व्यापारांत अतीशय भरभराट झाली होती; हिंदुस्थानांत त्यांच्या व्यापाराचा उत्तम जम बसत चालला होता व मोंगली राज्यांतील अव्यवस्था व अंदाधुंदीचाही त्यांना फायदा मिळून त्यांचें व्यापारी वर्चस्व वाढत चाललें होतें. इंग्रज कंपनीनें,

इ० सन १६२१ मध्यें, आपल्या वीस वर्षांच्या कामगिरीची हकीकत पार्लमेंटमध्यें रुजू केली; त्यावरून असें दिसतें कीं, या वीस वर्षांत कंपनीनें एकंदर ८६ गलबतें बाहेर पाठविलीं; त्यांपैकीं ३६ सुरक्षित परत आलीं; ९ बुडालीं; ५ खराब झालीं; ११ शत्रूंच्या हातीं गेलीं; आणि २५ हिंदुस्थानांत माल भरीत आहेत; त्याप्रमाणेंच या अवधींत कंपनीनें इंग्लंडमध्यें ६१,३६,८१० रुपये रोख, व ३१,९२,११० रुपयांचा माल, मिळून ९३ लक्ष २८ हजार ९२० रुपये एकंदर पाठविले; यांपैकीं ३६ गलबतांनीं आणिलेल्या मालाच्या खरेदीची किंमत ३७,५२,८८० रुपये असून, ह्या मालाच्या विक्रीचें इंग्लंडांत २,००,४६,००० रुपये उत्पन्न झालें; म्हणजे ३७ लक्ष ५२ हजार ८८० रुपयांच्या मालावर १ कोटी ६२ लक्ष ९३ हजार १२० रुपये नफा झाला; यावरून, यावेळीं—म्हणजे शिवाजीच्या जन्माच्या आधीं फक्त सहाच वर्षांच्या काळापर्यंत, इंग्रज लोकांचें हिंदुस्थानांत किती व्यापारी वर्चस्व वाढलें होतें व त्यांना व्यापारावर किती विलक्षण नफा मिळत होता—व त्यामुळें इंग्रज कंपनीची सांपत्तिक स्थिति व साधनें कशीं वाढत चाललीं होतीं, याचें सहज अनुमान होईल.

मध्यंतरीं, आर्मागांव व मच्छलीपट्टण येथें इंग्रज लोकांना डच लोकांकडून अतीशय त्रास होऊं लागला; म्हणून त्या ठिकाणांहून दुसरीकडे जाऊन, आपलें व्यापारी बस्तान बसविण्याची इंग्रज लोक खटपट करूं लागले; त्यावेळीं विजयानगरकरांचा वंशज श्रीरंग रायलु—यास श्रीरंगराय अथवा सहावा रंगराय असेंही म्हणतात—हा मद्रासच्या नैर्ऋत्येस सुमारें ७० मैलांवर असलेल्या चंद्रगिरी या नांवाच्या गांवीं रहात असून तो तेथील जमीनदार व एक छोटासा संस्थानिक होता; ( इ० सन १५९४ ) व त्याच्याच ताब्यांत हल्लींच्या मद्रास शहराची जागा होती; ही जागा व्यापारास मोठी सोईस्कर व नाक्याची होती व तेथें व्यापार सुरू केल्यास डच लोकांचा त्रास चुकून, शिवाय आपणांस व्यापारी फायदाही होईल, अशी इंग्रजांची खात्री होती; ( भाग पहिला; पान १७५–१७६ पहा. ) त्यामुळें आर्मागांव येथील प्रमुख इंग्रज व्यापारी फ्रान्सिस डे हा श्रीरंगरायास भेटण्याकरितां चंद्रगिरी येथें गेला; आणि डे याच्या विनंतीवरून श्रीरंग रायलू यानें इ० सन १६३९ मध्यें पूर्वकिनाऱ्यावर मद्रास येथें वखार व किल्ला बांधण्यास इंग्रजांस जागा दिली; व डे यानें इ० सन १६४० मध्यें तेथें एक किल्ला बांधून त्यास "फोर्ट सेंट जार्ज" हें नांव दिलें. पूर्वी मद्रास हें शहर अस्तित्वांत नसून इगमोर, तोंडावाडू, आणि पुडुपाक या नांवाच्या तीन निरनिराळ्या जागा होत्या व त्याठिकाणीं कोळी-लोक रहात असून त्या ठिकाणास "मदार सम् खुषम" असें नांव होतें. ही जागा श्रीरंग रायलू याजकडून, आपला बाप चेनप्पा याचें नांव देण्याच्या अटीवर डे याला

मिळाली होती; ह्मणून त्या ठिकाणास "चेनाप्पा पट्टम्" असें नांव देण्यांत आलें, व त्यावरूनच मद्रास शहरास "चिनाप्पा पट्टम्, चेनाप्पा पट्टम्, चिन्नापट्टम्, चन्नापट्टम्" किंवा नुसतें "पट्टनम्" असें नांव अद्यापि चालूं आहे. मद्रासची वसाहत ही पूर्वी इंग्रज ईस्टइंडिया कंपनीचें मुख्य ठाणें जें बंटाम त्याच्या देखरेखीखालीं होती; परंतु इ० सन १६५३ पासून "मद्रास इलाखा" या नांवानें ती स्वतंत्र करण्यांत आली; इ० सन १६३८ मध्यें सुरत हें इंग्रज कंपनीचें मुख्य ठाणें बनलें; आणि इ० सन १६४३ च्या सुमारापर्यंत मद्रास व मच्छलीपट्टण येथें इंग्रजांच्या व्यापाराचा चांगल्यारीतीनें जम बसला.

याच सुमारास बंगालमधील व्यापाराकरितां हुगळी नदीच्या वरील भागावर इंग्रजांनीं आपली एक वखार स्थापन केली; आणि इ० सन १६५० मध्यें त्यांनीं बादशहाच्या कामगाराकडून हुगळी येथें व्यापार करण्याचा परवाना मिळविला; शिवाय बाऊटन या नांवाच्या इंग्रज कंपनीच्या नौकरींतील एका शस्त्रवैद्याला याच काळाच्या सुमारास मोंगल बादशहाच्या दरबारीं आग्रा येथें बादशहाला औषधोपचार करण्याकरितां पाठविण्यांत आलें होतें, त्याप्रमाणें त्यानें तिकडे जाऊन बादशहास बरें केलें; त्यामुळें मोंगल दरबारांत इंग्रजांचें वजन बऱ्याच प्रमाणांत वाढलें व त्यांना कांहीं अधिक व्यापारी सवलती मिळून शिवाय बाऊटन यालाच बादशहानें आपल्या दरबारीं राजवैद्य ह्मणून ठेवून घेतलें; व लवकरच इंग्रजांचा व्यापारी उत्कर्ष मोठ्या झपाट्यानें वृद्धि पावत जाण्यास प्रारंभ झाला.

बादशहा आलमगीर ऊर्फ अवरंगझेब याच्या कारकीर्दीच्या सुरवातीच्या वेळेसच इंग्लंडांत दुसऱ्या चार्लस राजाला पुन्हां गादीवर स्थापन करण्यांत आलें. त्यामुळें इंग्लंडच्या इतर देशाशीं असलेल्या राजकीय संबंधांत पुष्कळच स्थित्यंतर होऊन इंग्रजांच्या व्यापारी पद्धतीवरही त्याचा बराच महत्वाचा परिणाम झाला; कंपनीस, राजाकडून अधिक व्यापक हक्क मिळावे, असें वाटत होतें; उलटपक्षीं दुसऱ्या चार्लसला, कंपनी-जवळ असलेल्या सनदेमधून क्रामवेलचें नांव काढून टाकावयाचें होतें; ह्मणजे परस्परांना आपआपले हेतु एकमेकांपासून साध्य करून घ्यावयाचे होते; ह्मणून उभयतांमधील उद्दिष्ट व्यवहार सहजच पूर्णतेस गेला. चार्लसनें कंपनीस नवी सनद करून देऊन तिला ख्रिस्तीलोकांशिवाय इतरांबरोबर लढाई आणि तह करण्याला अधिकार दिला; तथापि इंग्रज कंपनीचे खरे प्रतिस्पर्धी युरोपियन लोकच—पहिल्यानें पोर्तुगीज व डच व नंतर फ्रेंच—होते; यावेळीं आशियाखंडांत आपलें व्यापारी व राजकीय वर्चस्व पुन्हां प्रस्थापित करावें, आणि डच लोकांविरुद्ध इंग्रजांची मदत मिळवून त्यांच्याकडून होणारा

उपसर्ग नाहींसा करावा, या इरायानें पोर्तुगीज लोकांनीं इंग्रजांबरोबर तह केला; व मुंबई हें मौल्यवान् व महत्वाचें बेट त्यांनीं इंग्रजांना दिलें; ( इ० सन १६६१ ) तथापि पोर्तुगीज लोकांना इंग्रज लोकांबद्दल मत्सर वाटत असल्यानें त्यांना पुढें कित्येक वर्षें-पर्यंत मुंबई बेटावर आपला ताबा शांतपणानें ठेवितां आला नाहीं; इतकेंच नव्हे तर इ० सन १६६९ पर्यंत त्यांना मुंबई बेटाची पुरी मालकीही देण्यांत आली नाहीं.

इ० सन १६६२ च्या सुमारास मुंबई बेट अगदीं हलक्याप्रतीचें असून त्यावेळीं सगळ्या बेटाचें उत्पन्न सालीना चोवीस हजार रुपये होतें; आणि इ० सन १५३४–३५ च्या सुमारास तर त्याचें उत्पन्न फक्त १७०० रुपये होतें. इ० सन १५३३ मध्यें ( मुंबई ग्याझिटियर ठाणा पहा. ) पोर्तुगीज गव्हर्नर न्यनो डा कुन्हा यानें वसई जिंकून घेतल्यावर त्यानें वसईचे आठ भाग केले होते; त्यांत मुंबईचा समावेश होत असे; इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत, ह्मणजे ज्यावेळीं पोर्तुगीज लोकांचें महत्व विशेष जोरांत होतें, त्यावेळीं व्यापाराकरितां इंग्रजलोक इकडे आल्यावर त्यांनाही मुंबई बेटाचें महत्व कळून आलें होतें व हें बेट आपल्या ताब्यांत यावें, अशी त्यांना इच्छा झाली होती. इ० सन १६२५ मध्यें इंग्रज कंपनीनें तें बेट आपल्या ताब्यांत आणण्या करितां डच लोकांची मदत मागितली होती; परंतु त्यांनीं इंग्रजांना तशी मदत देण्याचें नाकारिलें. पुढें इ० सन १६४० मध्यें सुरत येथील कौन्सिलनें " हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई हें बेट राहण्यास उत्तम स्थळ आहे. " असें इंग्लंडमध्यें कळविलें. त्यानंतर इ० सन १६५२ मध्यें इंग्रजांनीं मुंबई आणि वसई पोर्तुगीज लोकांपासून विकत घेण्याचा विचार चालविला; व पुढें दोनच वर्षांनीं कंपनीकडून क्रामवेल यांस जें मानपत्र देण्यांत आलें, त्यांत सुद्धां " मुंबई व वसई हीं दोन बेटें व्यापाराकरितां उत्तम स्थळें आहेत " असें सुचविलें होतें. इ० सन १६५९ मध्यें सुरत येथील कौन्सिलनें पोर्तुगाल देशाच्या राजापासून पश्चिम किनाऱ्यावरील कांहीं जागा दंडा, राजपुरी, मुंबई किंवा वरसोवा असे भाग इंग्रजांस मिळावे ह्मणून अर्ज करून मागणी केली होती; पुढें इ० सन १६६१ च्या दिजंबर महिन्यांत ता० ७ रोजीं सुरतेच्या कौन्सिलनें कंपनीच्या व्यवस्थापक मंडळीस लंडनमध्यें असें पत्र लिहिलें कीं, आह्मांस मुंबईखेरीज इतर ठिकाणीं राहण्यास फार त्रास पडतो; कारण दुसऱ्या ठिकाणीं राहणें ह्मणजे तेथें मोंगल व शिवाजी यांचे नेहमीं हल्ले चालूच असतात, त्यांत सांपडणें होय. एवढेंच नाहीं तर मुंबई खेरीज करून इतर ठिकाणीं राहिल्यानें डच लोकांपासूनही वारंवार त्रास पोहोंचल्यावांचून राहणार नाहीं, सबब मुंबई आह्मांस राहण्यास मिळेल असें करावें. " इंग्रजांना मुंबई बेट आपल्या ताब्यांत येणें

आवश्यक आहे, असें वाटण्याचें कारण मुख्यत्वेंकरून तेथील उत्तम बंदर, स्वराज्य व व्यापार यांचें संरक्षण व वृद्धि यांना त्याचा होणारा अत्यंत महत्वाचा उपयोग आणि जलमार्गाच्या प्रवासाची त्यामुळें होणारी सोयसगवड हें होय. याप्रमाणें इंग्रज कंपनीचे मुंबई बेट मिळविण्याचे प्रयत्न चालू असतां याच वर्षाच्या—इ० सन १६६१ च्या जून महिन्याच्या २३ व्या तारखेस पोर्तुगालच्या राजाची मुलगी कॅथरीना हिचें लग्न इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस याजबरोबर झालें, त्यावेळीं हें बेट त्यानें तिला आंदण दिलें. याप्रसंगीं पोर्तुगालच्या राजानें दुसऱ्या चार्लस राजास जो तहामध्येंच दानपट्टा करून दिला, त्याचा सारांश थोडक्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे, तो:—

"पोर्तुगाल देशाच्या राजानें आपल्या कौन्सिलच्या सल्ल्यानें ग्रेटब्रिटन येथील राजास त्याचा ईस्टइंडीजमधील व्यापार सुरळीत चालावा, आणि त्यास तिकडील पोर्तुगीज रयतेचें संरक्षण नीटरीतीनें करितां यावें व मुंबई बेटाचा वंशपरंपरेनें उपभोग घेतां यावा म्हणुन हें बेट व बंदर आणि त्यांतील जल, तरू, काष्ठ, पाषाण निधिनिक्षेपादि सर्व हक्कांसह आणि त्याच्या लगतचा प्रदेश, तेथील उत्पन्न व सर्व प्रकारचे हक्क यांसह, आणि ग्रेटब्रिटनचा राजा किंवा त्याजकडून नेमिलेले अधिकारी यांस हें बेट या दानपत्रानें दिलें आहे. याकरितां ग्रेटब्रिटनचा राजा किंवा त्याचे अधिकारी यांच्या स्वाधीन हें बेट बिनतक्रार संतोषानें व सुखानें उपभोग घेण्याकरितां स्वाधीन करून द्यावें व हल्लीं तेथें असलेल्या पोर्तुगीज रयतेनें ग्रेटब्रिटनच्या राजाची रयत समजून आपल्या क्याथलिक धर्मपंथाअन्वयें बिनदिक्कत चालावें; आणि ज्यावेळीं ग्रेटब्रिटनचा राजा आपलें आरमार मुंबई बेटाचा ताबा घेण्याकरितां मुंबईस पाठवील त्यावेळीं त्यांनीं ईस्टइंडीजमधील पोर्तुगीज रयतेस मोठ्या मित्रत्वानें वागवून त्यांच्या उद्दीम-व्यापारांत आणि जलमार्गाच्या सफरींत लागेल ती मदत करावी व हें बेट ग्रेटब्रिटनच्या राजाच्या स्वाधीन करून देण्याविषयीं मुंबई येथील अधिकाऱ्यास सूचना केली जाईल."

श्रीमंत सवाई माधवरावाच्या काळांत नाना फडणीस यानें इ० सन १७७७ मध्यें इंग्रजाच्या बादशहास पहिलें पत्र लिहिलें, त्यांतही "बंदर बंबई पूर्वी कोटी लहान होती" असेंच यथार्थ वाक्य पहिल्यानेंच ग्रंथित केलेलें आहे; "मुंबई बेटाचा ताबा" म्हणजे इंग्रजांना काय काय मिळालें त्याचें त्रोटक वर्णन खालीलप्रमाणें आहे, तें:—

१ मुंबईचा किल्ला ( २ ) किल्ल्याच्या सभोंवतीं असलेला बाग. ( ३ ) चार पितळी तोफा. ( ४ ) बेटांत माडांच्या झाडांत असलेलीं ताडामाडांच्या पानाच्या छपराचीं अथवा झांप्यांचीं हातांचोटांवर मोजतां येण्यासारखीं थोडीशीं झोपडीवजा घरें. ( ५ ) दहा हजार लोकसंख्या; त्यांपैकीं बहुतेक परागंदा असलेले अथवा पळपुटे व उडाणटप्पू अथवा

भटके लोक; ( ६ ) इंग्रजांविरुद्ध ज्यांनीं बंडाची फूस दिली होती व त्यांचे जीव धोक्यांत घातले होते, असे जेसूईट लोक; ( ७ ) मोडकळीस आलेले माहीम, रिवें, वरळी, शींव, शिवरी व माजगांव वगैरे ठिकाणचे किल्ले. ( ८ ) चाळीस हजार एकर त्यांपैकीं अंशतः समुद्रांत बुडालेली जमीन. ( ९ ) डोंगरीच्या टेंकडीवरील आणि परेळ, माहीम, वरळी व माजगांव वगैरे ठिकाणीं असलेलीं थोडीशीं कोळ्यांचीं झोंपडीं. ( १० ) परळी आणि शींव यांमधील मोडकळीस आलेला बांध. ( ११ ) जिवाला अपाय व जिवाचा नाश करणारी रोगट हवा. ( १२ ) मुबलक मच्छी व माशांचीं हाडें; यांशिवाय, मुंबईतील सर्व घरेंदारें, जवाहीर, पैसाटक्का आणि रोकड ४८७९ पौंड ७ शिलिंग ६ पेन्स; इतकें इंग्रजास आणखी जास्त मिळालें—यावरून मुंबईच्या तत्कालीन भिकार स्थितीची सहज कल्पना करितां येते.

हिंदुस्थानांत व्यापार करण्याला मोंगल बादशहाच्या परवानगीची आवश्यकता असल्यानें इंग्रजांनीं सुरत येथें वखार घालण्याची परवानगी मिळविण्याच्या पूर्वीही तसे प्रयत्न केले होते. इ० सन १५९९ मध्यें मिल्डन हॉल या नांवाच्या एका मनुष्यास इंग्लंड-मधून हिंदुस्थानांत अकबर बादशहाकडे व्यापारासंबंधीं बोलणें करण्याकरितां पाठविण्यांत आलें होतें व त्याजबरोबर एलीझाबेथ राणीनें अकबर बादशहास पत्रें दिलीं होतीं; त्या-प्रमाणें तो बादशहास भेटून तीन वर्षांनीं इंग्लंडमध्यें परत गेला; तथापि तो कारण नसतां अनेक भानगडींत पडल्यामुळें त्याच्या इकडे येण्याचा कांहींही उपयोग झाला नाहीं; पुढें इ० सन १६०८ मध्यें कॅप्टन हॉकिन्स या नांवाचा एक मनुष्य हेक्टर जहाजावर हिंदुस्थानांत येऊन तो आग्रा येथें जहांगीर बादशहास भेटण्यास गेला; (इ० सन १६०९) त्यानें इंग्लंडचा राजा पहिला जेम्स याच्याकडून मोंगलबादशहास पत्र आणिलें होतें; त्यानें जहांगीरची मर्जी संपादन करून, इंग्रज कंपनीनें सुरत येथें व्यापार करावा, अशी परवानगी मिळविली; जहांगीरनें त्याचें एका खिस्ती बाईशीं लग्न करून दिलें व त्यास चारशें स्वारांची, ह्मणजे अठ्ठेचाळीस हजार रुपये सालीना उत्पन्नाची मनसबी करून दिली. अशारीतीनें दोन वर्षें तो बादशहाजवळ राहिला; परंतु त्याचें व गुजराथचा सुभेदार मुकर्रबखान याचें वांकडें आलें; हॉकिन्सनें खानाविरुद्ध जहांगीरजवळ कागाळ्या केल्या; तेव्हां बादशहानें त्यास आग्रा येथें बोलावून घेऊन त्याच्यापासून सर्व संपत्ति हिसकावून घेतली व त्यास प्रतिबंधांत ठेविलें; तथापि त्यानें पैसे भरून लवकरच आपली सुटका करून घेतली; हॉकिन्सचा सूड घेण्याचा निश्चय केला; इंग्रजांना व्यापार करण्याची बंदी केल्यास आपण गोव्याहून हिरे-माणकें आणवून देतों, असें त्यानें बादशहास कळविलें; दुसरेही अमीरउमराव इंग्रजांविरुद्ध ओरड करूं लागले व त्यांपैकीं एकजण तर असें सुद्धां ह्मणाला कीं, “ इंग्रजांना हिंदु-स्थानांत पाऊल ठेवूं दिल्यास ते लवकरच सर्व देश बळकावून बसतील. ” हें ऐकून

जहांगीर मिऊन गेला. त्यानें आपलीं सर्व वचनें परत घेतलीं व इंग्रजांस हिंदुस्थानांत व्यापार करण्याची मनाई केली; तेव्हां हॉकीन्स आपल्या बायकोसह आग्रा येथून निघून येऊन त्याचे दोन वर्षांचे परिश्रम फुकट गेले.

त्याप्रमाणेंच इ० सन १६११ मध्यें क्याप्टन हिपन या नांवाच्या एका मनुष्यानें स्वतःच्या जबाबदारीवर पूर्वकिनाऱ्यावर–मच्छलीपट्टणाशिवाय दुसरी–पेटापोली येथें एक लहानशी वखार घातली होती; शिवाय इ० सन १६१३ मध्येंच, सुरतबरोबर संवायत, गोगो व अहंमदाबाद येथेंही वखारी घालण्याचा कंपनीनें मोंगल बादशहापासून परवाना मिळविला होता व इ. सन १६१६ मध्यें कालीकोटच्या झामोरीनपासून आपल्या राजधानींत एक वखार उघडण्यास इंग्रजांनीं परवानगी मिळविली होती. सतराव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांच्या काळांत इंग्रज कंपनीची चांगलीच भरभराट झाली होती व ईस्टइंडीज-मधील–ह्मणजे हिंदुस्थानासह बंगालच्या उपसागराच्या पूर्वबाजूचे देश, मलाकाची सामुद्र-धुनी, जावा, सयाम व पुढें पूर्वेकडील जावा व चिनी समुद्रांतील सेलबीज व मोलाक्कस वगैरे बेटें, यांमधील–इंग्रज कंपनीच्या वसाहतींत, बंटाम इलाखा, मकासर आणि हिंदु-स्थानच्या द्वीपकल्पांतील इतर कांहीं ठिकाणें, फोर्ट सेंटजार्ज व त्यावर अवलंबून असलेल्या कारोमांडल किनाऱ्यावरील व बंगालच्या उपसागरावरील वखारी, मुंबईच्या पश्चिम किनाऱ्या-वरील सुरत व हिंदुस्थानच्या त्या बाजूवरील इतर लहान लहान ठिकाणें, आणि याशिवाय इराणी आखातांमधील कांहीं ठिकाणें, या सर्वांचा समावेश होत होता. अशारीतीनें इंग्रज कंपनीची भरभराट सुरू झाल्यावर इ० सन १६८५ मध्यें, इंग्रजांच्या पश्चिम-भागांकडील व्यापाराचें मुख्य ठिकाण सुरत शहराऐवजीं मुंबई करण्यांत आलें; इ० सन १६८७ मध्यें बंगालमधील मुख्य ठाणें हुगळी येथून कलकत्ता येथें नेण्यांत आलें; व पूर्वकिनाऱ्यावर मद्रास हें–इ० सन १६५३ पासून बंटामच्या देखरेखी खालून स्वतंत्र झालेलें–त्यांचें केंद्रस्थान बनलें; इंग्रज कंपनीनें इ० १६८७ मध्यें आपल्या वसाहतींत स्वतंत्रपणें कारभार, तटबंदी व जकातवसूली करण्यास, नाणीं पाडण्यास व एतद्देशीय सैन्य नोकरीस ठेवण्यास सुरवात केली; इंग्रज "ईस्टइंडिया कंपनीचीं नाणीं ( मुसलमानी रियासत हें पुस्तक पहा. ) हिंदुस्थानांत राजरोसपणें इ० सन १८३५ त सुरू झालीं; तरी त्यापूर्वीं कंपनीचे व्यापारी निरनिराळ्या ठिकाणीं आपलीं नाणीं पाडीत असत. मुंबईबेट इंग्रजांच्या ताब्यांत आल्यावर त्यांनीं इ० सन १६७१ त दुसऱ्या चार्लस राजाच्या परवानगीनें आपलीं नाणीं पाडण्यास सुरुवात केली. ही गोष्ट अवरंगझेबास खपली नाहीं; परंतु हीं फक्त आपल्या मुंबईच्या टापूपुरतींच आहेत असें सांगून, इंग्रजांनीं त्याचें समाधान केलें. पुढें मोंगलांच्या नाण्यासारखीं नाणीं इंग्रज आपल्या टांकसाळींत

पाडूं लागले, त्याबद्दल पुष्कळ तक्रारी झाल्या. इंग्रजांनीं आपलें चांदीसोनें मोंगलांच्या टांकसाळींत पाठवून तेथें त्यांचीं नाणीं पाडून द्यावीं, अशाबद्दल मोंगल अधिकाऱ्यांनीं पुष्कळवेळां इंग्रजांस सांगितलें; पण इंग्रजांनीं आपल्या टांकसाळींत नाणीं पाडण्याचें काम बंद केलें नाहीं. इंग्रज लोक मोंगल नाण्याची हुबेहुब नक्कल करीत असल्यामुळें इंग्रजांनीं पाडिलेलीं नाणीं कोणतीं, व मोंगलांचीं कोणतीं हें कळण्यास आज मार्ग नाहीं. मात्र इंग्रजांची नक्कल वजनानें व किंमतीनें मोंगलनाण्याशीं तंतोतंत मिळती असल्यामुळें, इंग्रजांचीं नाणीं सर्व ठिकाणीं निर्बंध चालत. हा घोटाळा बंद करितां येईना; तेव्हां इ० सन १७१७ त फर्रुखसेयर बादशहानें इंग्रजांस मुंबईत मोंगलांचीं नाणीं पाडण्याचें उघड फर्मान दिलें[१]. हा नाण्यांचा इतिहास मोंगल बादशाहीच्या ऱ्हासाचा चांगला निदर्शक आहे. इ० सन १७५९ त इंग्रजांनीं कलकत्त्यास आपली टांकसाळ घातली; सन १७६५ त इंग्रजांस बंगालची दिवाणी मिळाल्यापासून त्यांचा हा नाण्यांचा उद्योग राजरोस सुरू झाला; तथापि पुढें कांहीं दिवस बंगालचा नबाब व इंग्रज अशा दोघांचीं नाणीं सुरू होतीं. सन १७९३ त इंग्रजांनीं नबाबाचीं व बादशहाचीं नाणीं बंद करून आपला रुपया चालू केला; पण ही व्यवस्था सन १८३५ त कायमची अमलांत आली. ( Lane Pool's Coins. ) "

---

टीप १:—फर्रुखसेयर ( कारकीर्द इ० सन १७१३ ते इ० सन १७१९ ) यास सय्यदबंधूंच्या मदतीनें राज्यप्राप्ति झाल्यानंतर दोनच वर्षांनीं, ह्मणजे इ० सन १७१५ मध्यें, आपल्या व्यापाराची नीट व्यवस्था लावून घेण्याकरितां जान सर मन व कोजी सर होद हे दोन वकील कलकत्तेकर इंग्रजांनीं दिल्लीस बादशहाकडे पाठविले. याचवेळीं बादशहास काळपुळी होऊन जबर दुखणें लागलें होतें; व सर्व वैद्यांचे उपाय थकले होते. अशावेळीं या वकिलाबरोबर हॅमिल्टन या नांवाचा एक वकील होता, त्यानें शस्त्रप्रयोग करून बादशहास बरें केलें; व या आजारीपणामुळें त्याचें अजीतसिंहाच्या मुलीशीं ठरलेलें लग्न खोळंबून राहिलें होतें, तेंही नंतर निर्विघ्नपणें पार पडलें.

फर्रुखसेयर बरा झाल्यावर, त्यानें हॅमिल्टन यास विचारिलें कीं, तुह्मीं मला या असाध्य दुखण्यांतून बरें केलें, याबद्दल तुह्मास काय बक्षीस द्यावें.? हा शस्त्रवैद्य मोठा स्वदेशाभिमानी असल्यामुळें त्यानें आत्महितापेक्षां स्वदेशहिताकडे विशेष लक्ष देऊन सांगितलें कीं, " मला स्वतःला ह्मणून कांहीं नको, परंतु आमच्या व्यापारी मंडळीचा व्यापार आपल्या सर्व राज्यांत अप्रतिबद्ध व करदस्तुरी वगैरे न घेतां चालण्या-बद्दल बादशाही फर्मान मिळावें, एवढाच अर्ज आहे; " त्यावरून बादशहानें मोंगल राज्यांत इंग्रजांना कांहीं ठरीव अटींवर जकातीची माफी कायमची करून देऊन,

अवरंगझेब इ० सन १७०७ मध्यें मृत्यू पावला; पण त्याच्या पूर्वींच मोंगल राष्ट्राचा अत्यंत झपाट्यानें ऱ्हास होत चालला आहे, ही गोष्ट इंग्रज कंपनीच्या ध्यानांत आली होती; आणि या संधीचा फायदा घेण्याविषयीं त्यांचे सारखे प्रयत्न सुरू होते; लंडन येथील व्यवस्थापक मंडळानें मद्रास–फोर्ट सेंट जार्ज येथें, आपल्या प्रतिनिधीला ता० १२ दिजंबर इ० सन १६८७ रोजीं एक पत्र पाठविलें; त्यांत त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, " डच लोकांप्रमाणेंच दिवाणी व लष्करी सत्ता आपणही स्थापन

---

त्याबद्दल खालीलप्रमाणें फर्मान–जकातीच्या माफीचें मोंगल बादशहाकडून हें पहिलेंच फर्मान आहे.–काढिलें; तें–सुरत येथें इंग्रज लोकांनीं वखारी घातल्या त्यावेळेपासून कधीं साडेतीन, कधीं तीन व कधीं अडीच टक्के, याप्रमाणें निरनिराळ्या बादशहांनीं निरनिराळी जकात त्यांच्यावर बसविली होती; स्थानिक अंमलदारांच्या जाचामुळें इंग्रजांनीं सुरत येथील वखारी, आज तीन वर्षे बंद केल्या आहेत. बहार आणि ओरिसा प्रांतांत त्यांना जकात द्यावी लागत नाहीं; बंगालमध्यें ते तीन हजारांची रक्कम दरसाल उकती देत असतात. भिन्न असला प्रकार बंद करून, आपणांपासून एक ठरीव रक्कम घेऊन, सर्व राज्यांत सरसकट एक कायदा ठरवावा, अशी इंग्रजांची मागणी आहे. सबब असें ठरविण्यांत येतें कीं, सुरत येथें इंग्रजांपासून दहाहजार रुपये पेषकष म्हणून घ्यावें, आणि त्यांस वाटेल तिकडे कांहीं एक जकात न भरितां व्यापार करण्याची पूर्ण मोकळीक असावी. नवीन वखारी घालण्यास व मालांची खरेदी विक्री करण्यास त्यांस आमच्या अधिकाऱ्यांनीं मदत करावी; चोरी झाल्यास चोरांस पकडून शिक्षा करावी; व चोरीस गेलेला माल त्यांस परत देववावा. देण्याघेण्याच्या व्यवहारांत त्यांस कोणी त्रास न देतां योग्य व्यवहार घडला असेल, तसा निकाल करावा; विनाकारण जाच करूं नये. ह्या फरमानाची एकच प्रत त्यांजवळ असल्यामुळें त्याच्या नकला निरनिराळ्या ठिकाणीं ते दाखवितील त्या आमच्या अधिकाऱ्यांनीं मान्य कराव्या. इंग्रजांपैकीं कोणी कांहीं आगळीक केल्यास त्यांजला परभारें शिक्षा न करितां, त्या ठिकाणच्या मुख्य इंग्रज अधिकाऱ्याकडे त्यास शिक्षेसाठीं पाठवून द्यावें. त्यांस नवीन वखार घालावयाची असेल तेव्हां चाळीस बिघे जागा मोफत द्यावी. " ( ता० ६ जानेवारी इ० सन १७१७ ) या बाबतींत लोकहितवादी कृत राजस्थानचा इतिहास पान २७०–२७१ मध्यें असें लिहिलें आहे कीं, " हा सर्व आनंदाचा दिवस ज्या इंग्रजी डाक्तराचे उपायानें व मेहनतीनें दिसला त्या डाक्तरानें–ह्यामिल्टन यानें–बादशहाची मर्जी खुष करून घेऊन, आपल्या व्यापारी मंडळीचें कल्याण करून घेतलें. असें कल्याण आजपर्यंत कधींच कोणीं करून घेतलें नव्हतें; व त्याकरितांच इंग्रजी व्यापारी कंपनी दिल्ली दरबारांत अर्जावर अर्ज देऊन

करावी व अशा तऱ्हेनें आपल्या उत्पन्नाच्या वसूलीची बाब वाढवावी कीं, त्यामुळें पुढें आपणास खात्रीनें एक मोठें व मजबूत पायावर उभारलेलें ब्रिटिश राष्ट्र हिंदुस्थानामध्यें स्थापन करितां येईल." त्याप्रमाणेंच इ० सन १६९० मध्यें त्यांनीं, आपल्या प्रतिनिधींना, वसूल वाढविण्याकरितां जितके श्रम घेववतील तितके घेण्याचा सक्त हुकूम सोडिला; आणि त्यांत असें लिहिलें कीं, "आह्माला आमच्या व्यापारासंबंधानें जितकी काळजी आहे, तितकीच आमच्या वसूलाच्या वाढीसंबंधानेंही आहे, कारण ह्याच वसुलामुळें आमच्या व्यापाराला जरी पन्नास धक्के बसले, तरी आह्माला आमचें

---

खेपा घालीत होती. परंतु चमत्काराची गोष्ट ही आहे कीं, जगामध्यें आपल्या उपकारकर्त्यांविषयीं कृतज्ञता बाळगण्यास एखादे वेळीं लोक कसे अगदीं विसरून जातात, याचें उदाहरण पहावयाचें असल्यास वरील डॉक्टर—हॅमिल्टन—चे संबंधानें दिसेल. ह्या डॉक्टरानें, आत्महित एकीकडे ठेवून, आपल्या देशाचें हित करण्याकरितां, जें निरंतरचें व शाश्वत असें बक्षीस बादशहापासून मिळविलें व बक्षिसानेंच पुढें इंग्रज लोकांचा ह्या देशांत उदयकाळ झाला, त्या बक्षीस मिळविणाऱ्या आणि उपकारकर्त्या डॉक्टर हॅमिल्टन साहेबाला सर्व इंग्रज लोक अगदींच विसरले. एका इतिहासकारानें असें ह्मटलें आहे कीं, "ज्या उपकारांची फेड द्रव्यादिकेंकरून कधींही होत नाहीं, ते उपकार कृतघ्नतेच्या नाण्यानें चांगले फेडले जातात." आणि ह्याप्रमाणेंच इंग्रज लोकांनीं डॉक्टर हॅमिल्टन साहेबांचे उपकार कृतघ्नतारूप द्रव्येंकरून फेडले असें ह्मणण्यास चिंता नाहीं! ह्मणजे डॉक्टर हॅमिल्टन हा पुढें कलकत्ता येथें वारला व तेथील एका प्रार्थनालयाचे आवारांत त्याचा प्रेतविधी झाला; परंतु वर लिहिल्याप्रमाणें चमत्काराची गोष्ट ही आहे कीं, त्याच्या ह्या प्रेतविधीच्या जागेवर त्याचे स्मरणार्थ त्याचे नांवाचा एक दगड देखील कोणी ठेविला नाहीं! इंग्रजांच्या कृतज्ञबुद्धीचा हा एक अपूर्व मासलाच समजला पाहिजे!" तथापि हें कसेंही असलें तरी, अगदीं थोडक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे, ज्या कित्येक थोर व स्वार्थत्यागी पुरुषांनीं आपल्या आंगच्या अनेक अमोल्य गुणांनीं हिंदुस्थानांत इंग्रजी राज्याची इमारत उभारिली व वृद्धिंगत केली त्यांपैकींच हॅमिल्टन हाही एक असून इंग्रजांच्या इतिहासांत त्यानें आपल्या स्वार्थत्यागानें, आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेविलें आहे, यांत कांहींही संशय नाहीं; त्याप्रमाणेंच देशाभिमान व स्वार्थत्याग ह्या अमोल्य सद्गुणांची हिंदुस्थानांत अतीशय अल्प प्रमाणांत पैदास होत असल्यामुळें, हॅमिल्टन साहेबाचें हें उदाहरण आपण हिंदुस्थानवासीयांनीं सदोदित आपल्या स्मरणांत ठेवून ते सद्गुण आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यापासून आपलें कल्याणच होईल, यांतही कांहीं सुद्धां संदेह नाहीं.

सैन्य सुरक्षित राखितां येईल. ह्याच वसुलामुळें आह्माला हिंदुस्थानामध्यें आमचें राष्ट्र बनवितां येईल, " यावरून इंग्रज व्यापारी कंपनी स्थापन झाल्यापासून शंभर वर्षांच्या आंतच, हिंदुस्थानांत आपलें राष्ट्र स्थापन करण्याच्या अनुरोधानें प्रयत्न करीत होती, हें कोणाच्याही लक्षांत येईल.

मराठ्यांचा, जंजिरेकर, पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशीं शिवाजीच्या काळांतच संबंध आलेला आहे; आणि इ० सन १७६५ पर्यंत कोल्हापूरकर छत्रपतींचा तर बहुतेक कोणत्याही युरोपियन राष्ट्राबरोबर संबंध आलेला नाहीं; कोल्हापूरकरांच्या ताब्यांतील मालवण येथील दर्यावर्दी लोक इंग्रजांच्या जहाजास त्रास देत असत; ह्मणून इ० सन १७६५ मध्यें मुंबई येथील आरमारापैकीं मेजर गॉर्डन व कॅप्टन वॅटसन यांनीं मालवणवर स्वारी करून तें ठिकाण हस्तगत केलें, हाच इंग्रज व कोल्हापूरकर यांच्यामध्यें घडलेला पहिला संबंध आहे; त्याप्रमाणेंच इ० सन १७८७ मध्यें कोल्हापूरकरांनीं सांवतवाडीकराबरोबर युद्ध सुरू केलें, त्यावेळीं खेमसांवत यानें पोर्तुगीज लोकांची मदत घेतली; हा पोर्तुगीज व कोल्हापूरकर यांच्यामधील घडलेला पहिला संबंध आहे; तरी पण त्याच्या कितीतरी पूर्वीं, शके १६३८ ह्मणजे इ० सन १७१६ यावर्षीं, रामचंद्रपंत अमात्य हुकमत पन्हा याच्या नांवचें, करवीरकर छत्रपती संभाजी-महाराजाचें, एक नऊ प्रकरणीं आज्ञापत्र काढण्यांत आलें होतें; ( विविधज्ञानविस्तार, पु. ५–६ सन १८७२–७३ पहा. ) त्यांत प्रधान कसे नेमावे, फौज, किल्ले व आरमार वगैरेंची कशी व्यवस्था ठेवावी वगैरे बाबतींचा उल्लेक केला असुन सावकारांच्या प्रकरणांत पाश्चात्यांविषयीं खालील महत्वाचा व लक्षांत ठेवण्यासारखा उल्लेक केला आहे; तो असा कीं:–फिरंगी, इंग्रज, वलंदेज, डिंगमारादि टोपीकर, हेही लोक साहुकारी करितात, परंतु ते वरकड साहुकारांसारखे नव्हत. त्यांचे प्रत्येक खावंद राज्यच करीत आहेत. त्यांचे हुकुमानें हे लोक साहुकारीस येतात. टोपीकरांस या प्रांतीं प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्ठावीं, हा पूर्णाभिमान, हे हट्टी जात, हातांस आलें स्थळ मेल्यानें सोडावयाचें नव्हत. त्यांस जागा कधींही देऊं नये. जंजिऱ्यासमीप तों या लोकांचें येणेंजाणें सहसा होऊं देऊं नये. आरमार, तोफा, दारूगोळा हेंच यांचें बळ. आरमार पाठीशीं देऊन त्याचेबळें त्या बंदरीं नूतन किल्लाच निर्माण करणार. त्यांस जागा देऊं नये. शहराचा उपद्रव चुकवून नेमून देऊन वखारा घालाव्या. इमारतीचें घर बांधूं देऊं नये. " यावरून पाश्चात्यांविषयीं करवीरकर छत्रपतींचें मत कसें होतें, हें कळून येतें.

त्याप्रमाणेंच मराठ्यांना भूगोलविषयक माहिती होती, याचें द्योतक असणारें एक गुंडाळें नाना फडणीसाच्या दफ्तरांत सांपडलें; तें इतिहास संग्रहांतील ऐतिहासिक स्फूटलेख,

या सदराखालीं छापलेलें आहे; तें संपूर्ण नसावें, असें त्याच्या स्वरूपावरून दिसतें; तथापि त्यावरून मराठ्यांनीं भुगोलविषयक ज्ञान मिळविण्याचा कसा प्रयत्न केला होता व तत्कालीन इतर राष्ट्रांसंबंधीं कशी माहिती मिळविली होती, याचें योग्य ज्ञान होतें.

या गुंडाळ्यांतील मजकूर थोडक्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें, मोठा मनोरंजक आहे तो:—

श्री

" इंग्रजलोक यांची उत्पत्तीचा वगैरे मजकूर:—यांची विलायत व यवनांचे रूमस्थान नजीक आहे. रूमाचे पश्चिमेस कहर दर्या. यांत विलायत मुख्य टापू, अवरस चवरस पाऊणशें कोस आहे. त्याचें नांव इंग्लिश लंधन. ( ह्मणजे, इंग्लंडची अथवा ग्रेट-ब्रिटनची राजधानी लंडन, हें शहर. ) वरकड आणखी समुद्रांत खुषकी बेटें व शहरें बहुत आहेत. कर्नाटकाच्या पश्चिम समुद्रांत हजार कोस टापू आहे, तेथें फरासीस राहतात. मुख्य टोपीगारांत शिपाई व पातशाहा फरासीस व आपले खुषकीवर मुख्य एकछत्री रूमचा पादशाह्. त्यापासून दिल्ली वगैरे शेंकडों सुभे सरसुभे ह्मणवितात. त्यांत इकडे, हिंदुस्थान सोळा सुभे व दक्षण साडेसहा सुभे, मिळून साडेबेवीस सुभ्यांचा सरसुभा दिल्ली. यास रूमाहून तुगरा शिक्का वगैरे येत असतात. दिल्लीस " हिंदुपतपातशाहा " असें ह्मणतात. असे रूमाखालीं सरसुभे बहुत. दिल्लीखालीं मुलूख रामेश्वरपासून काश्मीर, गंगोत्री, बद्रिनाथ-पर्यंत. याची उत्तरदक्षिण लांबी पंधराशें कोस, आणि रुंदी पूर्वसमुद्र; महोद्धीपासून पश्चिम समुद्र रत्नाकर याचे मध्यें. त्यांत रामेश्वराकडे अरुंद आहे, आणि उत्तरेकडे जसें जसें जावें, तसें रुंद अधिक आहे. दिल्लीपाशीं पूर्वेस २०० कोस. कलकत्ता पांचसहाशें कोस. पश्चिमेकडे द्वारका चारशें कोस. याप्रमाणें हिंदूंचा गुजारा अटक व काश्मीरपर्यंत. पुढें हिमालय शुद्ध उत्तरेस वायव्येचे कोनास. पृथ्वीचा अंत नाहीं. अटकपार झाडून यवन मुसलमान यांची वस्ती व बादशाही मोठ्या मोठ्या आहेत. तितके रूमवाले याचे ताबीन आहेत. दिल्लीप्रमाणें अटकेपासून पांचसहाशें कोस रूमाकडे जाण्यास पहाडी वगैरे मुलूख लागतो. नंतर रूमवाल्याचा मुलूख आठशें कोस साफ मैदान आहे. पुढें रूम व शाम शहरें लागतात. मुलख अस्तंबोल, तेथें वजीर व बादशाहा असतात. तीं शहरें मध्यें आहेत. त्यांच्या गीर्देनवाईकडे उत्तरवायव्येस व पूर्वपश्चिम आठशें आठशें कोस, कोणीकडे गेले तरी पहाड वगैरे खडा नाहीं. मुलूख साफ, भरवस्ती व संस्थानें व सरसुभे व पातशा-हाती बहुत आहेत. त्या मुलुखांत मोठ्या नद्या तीन आहेत. त्या हिमालयांतून येऊन पश्चिमेस कहर दर्यास मिळाल्या आहेत. त्यांची रुंदी बेवीस, चोवीस, अठ्ठावीस कोस याप्रमाणें आहेत. त्यास मिठा दर्याय ह्मणतात. त्यांतून मोठीं मोठीं जहाजें व नावा माल

भरून देशांदेशांत जिकडे पाहिजे तिकडे नेतात, आणितात व जिकडे पाहिजे तिकडे जावें. समुद्रांत येऊन मग इकडे वगैरे पश्चिम रत्नाकरांतून या खुषकीवर यावें. असे रस्ते जलमार्गें पाहिजे तिकडे जहाजांतून जावें, खुषकीवर पायमार्गें जावें, तर लांब बहुत, अडचणी फार व हजारो कोसांचे हेलपाटे पडतात, रूमचा मुलूख आठशें कोस, चहूंकडे गिर्द सफा मुलूख जाहल्यावर पहाडी वगैरे मुलूख लागतो. तो पूर्वेकडे पांचशें कोस. मग हिमालय पहाड पश्चिमेस साफच मुलूख; परंतु शेंपन्नास कोस खडतर लागून मग कहर दर्याव. इकडे यावयास आठशें कोस सफा झाल्यावर, पांच सहाशें कोस पहाडी वगैरे मुलखांतून येऊन ज्वालामुखीकडे यावें व उत्तरेस रूमापासून आठशें कोस सफा झाल्यावर मग पहाडी वगैरे ( मुलूख ) लागतो. मग पलीकडे अंत नाहीं व दिवसही कमती होत होत साठ घटिका रात्रच असा अंधःकार आहे. तिकडे मनुष्याचा संचार नाहीं. रूमास तख्तावर शिकंदर बादशाहा पराक्रमी जाहला. तो स्वारीस निघून जितकी खुषकी आणि मनुष्याचा संचार आहे, तेथपर्यंत फिरोन पुढें अंधकार आहे तिकडे गेला. लक्षावधी फौज बरोबर होती. पुढें जाण्याचा इलाज नाहीं; तेव्हां त्याठिकाणीं भिंत घालून मनुष्याचे जाण्याची हद्द करून ठेविली. ती पुतळी करून ठेविली. तिकडे जहाज जात नाहीं. याप्रमाणें पराक्रम करून मुलखाचा बंदोबस्त केला. रूमाचे शुद्ध दक्षिणेकडे खुषकी वाढत आली आहे, ती रामेश्वरचे पैलीकडे रत्नाकर समुद्राचे पलीकडे आली. रूमाचे मुलखापासून इकडे यावें, तर हिंगजेकडे येऊन द्वारकेकडे यावें, आणि त्याच खुषकीवर फिरणें तर, त्या मुलखापासून आठशें कोस मक्क्यास अर्बस्थानांत यावें. मसकत, बसराई वगैरे बातशाहानी व मुलूख आहे. मोतीं त्या बंदरास रास उत्पन्न होतें व पुतळी व रयाल होतात, ती खाण सोन्याची व चांदीची अर्बस्थानांत आहे. पिंवळी वाळू आहे. तिची भट्टी लावून त्यांत उत्पन्न करितात, आणि पुतळ्या करून त्यांजवर शिक्का पाडतात व पांढऱ्या वाळूची भट्टी लावून रुपें उत्पन्न करितात. त्यांत तांब्याचा खार टाकून रयाल शिक्का पडतो. चांदी निखालस ठेवणें तर शिक्का पाडीत नाहींत. तसेच गट इकडे आणितात. त्या मुलखांत खारीक, खजूर, बेदाणा, लवंगा व पोंवळीं वगैरे किराणा बहुत उत्पन्न होतो. तो इकडील बेपारी जहाजें घेऊन जाऊन, रत्नाकर समुद्रांतून पलीकडे पश्चिमेस अर्बस्थानांत जाऊन तेथील बंदरावरून घेऊन येतात. तो मुलूख रूमाच्या मुलखापासून दक्षिणेस शेवटपर्यंत चवदाशें कोस लांबी आहे व सातशें कोस रुंदी आहे. यांत अरब व हाबशी व मुसलमान वगैरे आहेत. याचे शेवटीं दक्षिणेकडे वगैरे टापू किरकोळ आहेत; त्यांवर इतर टोपीगार आहेत; आणि मोठा टापू आहे त्याजवर फरासीस आहेत

त्याचे पूर्वेकडे कहरदर्याय व पश्चिमेकडे महोदधी समुद्र. त्या मुलुखांत एक मोठें शहर आहे त्याचें नांव चीन. तेथें मुख्य बादशाहा राहतात. त्यामुळें त्या टापूचें नांव चीन पडलें. तें शहर बहुनच उत्तम आहे. हवेल्या वगैरे भूमी व भिंती चिनीचे पेल्याप्रमाणें व कांच चिलोरमय सारें. तें पाहिलें असतां स्वर्ग पाहण्याची इच्छा रहात नाहीं. याचें कारण, तें पूर्वी विश्वकर्म्याचें स्थान. तेथें पूर्वी पांडवांनीं मयसभा केली होती. त्यासमई कारागीर त्या बादशाहापासून मागून आणिला होता. त्याचें नांव मयासूर. त्या टापूंवर रयत गोरेंच लोक झाडून. त्यांस चिनवाले ह्मणतात. तेथें दुसरे जातीचें मनुष्य इंग्रज वगैरे कोणासच आपले बंदरांत घेत नाहींत. त्याचे राज्यांत कारागिरी व कसबी अतिकुशल लोक. त्यांनीं कसबावर पैसा उत्पन्न करीत असावा. त्या राज्यांत उत्पन्न जिन्नस होतोः-रेशीम, रेशमी सरंजाम व मातीचा जिन्नस, त्याजवर कवड्याचें रोगण व बिलोरी सरंजाम, झुंबर, झाडें, हंड्या, फाणूस वगैरे पितळी पानें व हरजिनसी पितळी सरंजाम व कांच व आयने मोठे, घड्याळे व दुरभिणी व छत्र्या व पंखे वगैरे कागदी, चंदनी व कापड चिटें वगैरे. त्यास चंदन रुई इकडून जाती, त्याची चीज करून विकतात व तसबिरा व पुतळया, मातीच्या व लोखंडी हत्यारें व शस्त्रें व पेट्या व चर्मी सरंजाम, तयार करितात व इकडून कथील जातें त्याची चांदी करून गट बांधून त्याजवर छापे करून देतात, ते इकडील बेपारी घेऊन येतात. याप्रमाणें हरतऱ्हेनें उत्पन्न करून इतर टापूंचा पैसा ओढतात. जिन्नस देऊन पैसा घ्यावा, परंतु तो जिन्नस जाया जाहला असतां त्याचें कांहीं उत्पन्न होऊं नये. चहूंकडील बेपारी जहाजें घेऊन जातात. त्यांनीं वीस कोसांपलीकडे रहावें. आपले बंदरास जहाज ठेवूं देत नाहींत. परस्परें दलाल यांनीं सवदा करून मचवे भरून नेऊन द्यावे, आणावे. इंग्रजांचा बेपारी कोणी आला, तर त्यानें पन्नास कोसांपलीकडे असावें. इंग्रज लोक कोणी त्या टापूंवर जाऊं पावत नाहीं. इकडून जहाजें महोदधींतून पूर्वेस चिनीच्या बंदरास तीस दिवसांत जातें. द्वारकेकडून कलकत्त्यास जाणें, तर इकडून रत्नाकर समुद्रांतून श्रीनगर, कोची बंदराकडून दक्षिणेस जाऊन, लंका व रामेश्वर डावा घालून, मंद्रास ह्मणजे चेनापट्टण व मच्छलीबंदर महोदधी समुद्रांत उत्तरेकडे शिरून, जगन्नाथ व बंगाले डावें टाकून कलकत्त्यास जावें. तसेंच इकडे येणें तर, महोदधींतून कलकत्त्याहून गंगासागर व जगन्नाथ व चिनापट्टण उजवें टाकून, कहर दर्या यांत जाऊन लंका व रामेश्वर उजवा टाकून, रत्नाकरांत शिरून, इकडे अगर अर्बस्थानांत अथवा मक्क्याकडे पाहिजे तिकडे जावें; आणि रूमाच्या राज्यांत जाणें तर मक्क्याकडे खुश्कीवर उतरून जावयास बहुत दिवस लागतात. सबब लंकेचे पलीकडून कहर दर्या यांत शिरून, फरासीसांचा टापू व अर्बस्थान उजवें टाकून, कहर दर्या यांतून शेंपन्नास कोसांवरून पाण्यांतून

कडेनेंच जावें. उत्तर वायव्य कोनास यावें. मग पाहिजे तर मीठे दर्या यांतून ह्मणजे गोड्या नद्या रूमच्या त्यांत शिरून, बेपारी यांनी रूमचे राज्यांत पाहिजे तिकडे जावें. इंग्रजांनीं परभारेंच कहर दर्या यांतून विलायत इंग्लीश मुलखांत आपले टापूंवर जावें. रूमाच्या राज्यांत व यवनी विलायत अर्बस्थान येथें इंग्रजाची पैरवी अद्यापि नाहीं. पुढें ईश्वरसत्ता. याप्रमाणें आहे. चीनवाले यांचे टापूचे उत्तरेकडे शेवटास ब्रह्मराज्याचा ( ब्रह्मदेशच्या राजाचा ) अंमल आला आहे. तो कलकत्त्याचे पूर्वेस; तेव्हां इतर राज्यांतील व इतर मुषकींतील फौज वगैरे चढून आपले टापूंत येईल सबब चीनवाल्यांनीं आपले राज्याचा शेवट उत्तरेस हिमालयाचे लगत, ब्रह्मराज्याचे राजाकडे लागला, तेथें हद्दीवर चाळीस हात उंच व चारशें हात रुंद, आणि महोदधीपासून त्यांचे पश्चिमेपासून ती पूर्वेस कहर दर्यापर्यंत, सातशें कोस लांबी दिवाल भिंत चिरेबंदी घालून, त्याचे आंतले बाजूनें चाळीस कोस रुंदी व सातशें कोस लांबी मुलूख आहे. त्यांतील गिराशे व सरदार यांस मुलूख दिला आहे, त्यांनीं तो मुलूख खाऊन त्या भिंतीचा जाबता व रखवाली करावी, याप्रमाणें बंदोबस्त आहे.

पृथ्वीवर जितका मनुष्याचा संचार सांप्रत आहे, तितके पृथ्वीवर साडेतीन बादशहा. मुख्य रूम प्रथम. दुसरा फराशीस, तिसरा चीनचा, आणि अर्धा इंग्लिश विलायतचा इंग्रज सवदागीर, एकुण साडेतीन बादशहा, याप्रमाणें आहेत व अठरा टोपीवाले यांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| १ फराशीस | १ ———— | १ ———— |
| १ फिरंगी | १ ———— | १ ———— |
| १ चिनीवाले | १ ———— | १ ———— |
| १ इंग्रज | १ ———— | १ ———— |
| १ रूस | १ ———— | १ ———— |
| १ पुरूष | १ ———— | १ ———— |
| ६ | ६ | ६ |

१८

१ विशेष खुलासाः—भारत इतिहास संशोधकमंडळ पुणें, वार्षिक इतिहास-वृत्त शके १८३५ मध्यें " अठरा टोपीकर " या सदराखालीं एक जुनें बाड सांपडलें, त्याचा उतारा दिला आहे; त्यावरून " अठरा टोपीकर " ह्मणजे कोणकोणते लोक असावे, या विषयीं बरीच कल्पना करितां येण्यासारखी असल्यानें, तो उतारा खालीं दिला आहे; तो येणेंप्रमाणेंः—

श्री

## पाश्चात् प्रभेद टोपिया १८

| | |
|---|---|
| १ फिरंगी ( Portugal ) | इंगरजे ( England ) |
| १ वलंदेज ( Holland ) | फरासिस ( France ) |
| १ सुवेत ( Swiss ) | कसतलयान ( Satlandian ? Celtie ? ) |
| १ निविशयान ( Novwajian? ) | विनेज ( Venetian ) |
| १ यमद्रोर | दिनमार्क ( Denmark ) |
| १ ग्रेग ( Greek ) | उरूस ( Irish ? Russian |
| १ रखतार | रुमियान ( Roman ) |
| १ लातियान ( Latin ) | तलियान ( Italian ) |
| १ यहुदीन ( Jew ) | प्रेमरयान ( Pomeranians ) |
| ९ | ९ |

संख्या १८

येणेंप्रमाणें अठरा टोपीवाले. ( य.पुढील कांहीं मजकूर धार्मिक बाबतींत असल्यानें तो याठिकाणीं दिला नाहीं. )........असे योग एकत्र होऊन दिवसेंदिवस इंग्रजीलोकांत ईश्वरी शक्ति जास्त होऊन हिंदू व मुसलमान यांचा गर्व परिहार होऊन इंग्रजांचा व्याप पृथ्वीवर होत चालला. इंग्रजांनीं कोसलगार ( Councillor ) चाळीस असामी करून त्यांचें नांव " कंपीण " ( Company ) असें ठेविलें. त्यांजवर बादशाहाचा हुकूम; आणि कंपिणीचा हुकूम चहूंकडे. याप्रमाणें दिवसेंदिवस त्यांची बुद्धी व कल्पना अधीक वाढून, जें करतील त्यास यश येत असावें. सवदागिरी पेशानें पैरवी करून, ताबेदार ह्मणोन राहून, राज्यें घेऊन, मुखत्यारीनें अंमल करावा. परंतु आपण मुखत्यार ह्मणवूं नये. इंग्रजी विलायतच्या टापूंवर बावन लाख मनुष्य हल्लीं आहे. जकातीचें उत्पन्न बहुत. सर्वांनीं " कंपिणी " च्या हुकुमानें चालावें. तेथील बादशाहा रयतेच्या स्वाधीन. बादशाहा गैरचाल करूं लागल्यास रयतेनें दोन चार वेळां जाहिरनामे करून बादशाहाचे दरवाजास लावावे. तितक्यावर समजून नीट वागल्यास उत्तम—नाहीं तर दुसरा बादशाहा तख्तावर बसवावा; आणि नव्या कल्पना सर्वांनीं काढून सर्वानुमतें राज्यकारभार चालवावा, अशी रीत आहे. " थोडक्यांत ह्मणजे, इंग्रजांच्या राज्यकारभाराची तत्कालिनपद्धती मराठ्यांना पुष्कळच प्रमाणांत अवगत होती, हें यावरून उघड होतें.

छत्रपति शिवाजी महाराजांच्या काळापर्यंत, हिंदुस्थानच्या राजकीय स्थितीची त्रोटक माहिती वरप्रमाणें आहे; आणि त्या काळापासूनचा इतिहास—मराठ्यांनीं स्थापन केलेल्या स्वराज्याचा इतिहास—ह्मणजे मराठ्यांच्या सत्तेचा उदय, उत्कर्ष व उच्छेद, यांचा इतिहास असून तो यापुढें ग्रथित केला आहे.

स्वराज्याचा नाश,—स्वराष्ट्राचा उच्छेद हा केव्हांही अत्यंत दुःखदायक असतोच; पण त्याची नुसती आठवणसुद्धां मनाची कालवाकालव करून सोडणारी असते; तथापि थोरामोठ्यांच्या उच्छेदांतही जें वैभव गर्भित असतें, तें क्षुद्र मनुष्याच्या उत्कर्षांतही असत नाहीं. अस्ताचलीं चाललेल्या भगवान सूर्यनारायणाच्या अंतिमकलेची—त्याच्या मावळत्या-स्थितींतील तेजाची—बरोबरी, आपल्या माध्यान्हीला—पूर्ण उत्कर्षाला—आलेला पहिल्या प्रतीचा तारा किंवा ग्रहही करूं शकत नाहीं; ह्मणून मराठ्यांच्या उच्छेदाचा दुःखपर्यवसायी इतिहासही, त्यांच्या उत्कर्षाच्या इतिहासाइतकाच महत्वाचा व वर्णनीय ठरतो. हा इतिहास पुढील पानांत ग्रथित केला आहे; तो अत्यंत बोधप्रद, मननीय व मनोरंजक आहे; आणि त्याचें मनन करून व त्यापासून योग्य तो बोध घेऊन त्याप्रमाणें वागल्यास, तो कल्याणप्रद होईल, अशी आशा आहे.

---

## तिसरा भाग समाप्त.

# व्यक्तिविषयक सूची.


अ

अकबर, ३—१२; १९; २७; ४६ ५९-६०, १०५, ११८-१२०, १२३, १२७, १२९, १५२, २०४-२०५; २२०, २२१;

अजीजकोका; ७;

अजीमखान; १६;

अफझलखान; १५६, १७५, २२५;

अबदुल्लाखान; १३०,

अबदुल्लाखान-युझबेग; १२;

अब्बास दुसरा; २३-२५;

अब्दुल्ला हुसेन कुत्बूशाहा; ९९-१०१, १०५;

अबुलफज्ल; ६-९; १९, ११९;

अबुलफैजी; ६-८;

अबू हसन कुत्बूशाहा; १०१—१०५;

अमरसिंह; १३, १४;

अल्लाउद्दीनशाहा; ३१, ३२, ८१;

अली अदिलशाहा; ८७, १५०; १५१ १६५

अलीखान फरुकी; खानदेशाचा सुलतान; ४७ २२०, २२१;

अली बेरीदशाहा; ८३, ८७, ८८;

अवरंगझेब; १, १९-२८; ५७; १००—१०४; १०५; १५६, १५८-१६०; १६३, १७४, १७६, १७९, १८३, २६०, २६४, २६६;

अहंमदखान ऊर्फ शाहा, १९१—१९४; २१७;

अहंमद निजामशाहा; १०६—१०८;

अहंमदशाहा अदीली; २७;

अहंमदशाहा सुलतान; ३१;

अंबिकाबाई; १८५—१८६;

आ

आलमगीर; १६;

आसदखान; ४१; १४९;

इ

इब्राहीम अदिलशाहा; ३९, ४१, ४७, ५२, ५७—५९; १०९, ११५, १३०, १५३, १६५, १७८,

इब्राहीम कुत्बूशाहा, ८६, ९२, ९८, १०५, १५०, १५१;

इब्राहीम निजामशाहा; ६१, १११;

इब्राहीमलोदी; १३;

इलिझाबेत राणी; १०, ११९, २४७; २५१;

इस्माईल अदिलशाहा; ४०, १४६—१५०; १६५;

इस्माईल निजामशाहा; ४४—४८; ११०;

इस्माईल सुफीशाहा; २, ३;

इंग्रज; २९, ६०, ६२, ६४; २४९-२७३,

एकनाथपंत ऊर्फ आकाण्णा; १०१;

क

कर्ण; १४;

कमालखान; ४०, ४१;

महंमद तुघ्लख; ६६;
महंमद शयबानीखान; २, ३,
महंमदशाहा; १९६-१९९;
महंमदशाहा बहामनी; २, ६६;
महंमूदशाहा बहामनी ६८, ६९;
मालकम, जनरल; ४७;
मालोजी भोंसले १२३, १७१, १७४;
मिआन अंजू; १११;
मिआन राजु; ११९-१२२;
मिर्झा अस्करी; ३;
मिर्झाखान; ५२-५६;
मिर्झामहंमद खुदाबंद; ४३, ४४;
मिर्झामुराद; ४;
मिरान महंमदखान; ( खानदेशचा सुलतान. ) ८७, २१९, २२०
मिरान हुसेन; ४९, ५१-५७; ११०;
मीरजुम्ला; २०, ४३, ९४, ९५, १००
मुज्फरशाहा; १८९-१९२;
मुंज्फरशाहा, दुसरा; १९९, २००, २११;
मूधोजी निंबाळकर; १७२, १७३;
मुराद; १७, १८; २०-२२, २७; ६० १११, ११४; ११५, ११६-११८ २२१;
मुरारराव; १३७, १३९, १४२, १५२, १५३;
मूर्तुजानिजामशाहा; १६, ४४; ४९, ५०, ५२; ५६, ११०; ११३, १२२, १३२, १३७—१३९; १४३, १५१; १५३, २३०

## य

यूसफअदिलशाहा; ३५, ७५; १४४, १४५, १६५, १७०, १७७;
येलूपंडित; ८९;
येसूबाई; १४३;

## र

रणदुल्लाखान; १४२, १५३;
रसेल; ले. क. ४७.
राजकुंवरबाई; १४१, १८५;
राजजी झुंझारराव; १७५, १७६;
राजाराम छत्रपति; १७७, १७९; १८३, १८५, १८६;
रामराजा; ( विजयानगरकर; ) ८७, ११०, १७७, २१२;
रिचेल्यू; ६२, ६३;
रुसो; ६३;
रो, सरटॉमस; २५६—२५७;

## ल

लखम सावत; १८२, १८३;
लायल; सरआलफ्रेड; ६३;
लाली; ६३;
लाव्हूर, जेसुईट; ६३;
लूथर; १०, ११;
लेके, इतिहासकार; ६४;

## व

वज्रपाळ शिर्के; ८१
वणगोजी निंबाळकर; १७१, १७२, १७४;
वाघोजी शिर्के; १४३;
विक्लिफ; १०;
विल्यम, चवथा; १६४;
वीरसिंहदेव; ८;
व्यंकोजीराजेभोंसलें; १७७;
व्हाल्टेयर; ६३;

## श

शहाअलम; १४१;

शहाजहान; १२—१६; २०, २२—२४, ९७, ९९, १००, १०५, १३०, १३१, १३७-१४०; १४२-१४३; १५४-१५६;
शहाजी; १५, ११९, १३५—१३७; १३९, १४३; १५४-१५६; १७१, १७५- १७७;
शाएस्तेखान; १४२;
शाहू छत्रपति; १७४, १८६;
शिकंदर आदिलशाहा; १०२, १५७-१६० १६६;
शिवाजी छत्रपति; १५, ११९, १३५, १३६, १४३; १४४, १५४-१५७; १६६; १७३, १७७; १८२; १८४, १८५, २२२, २२६, २६०, २७४;
शीरशाहा; ३९;
शेक्सपीयर; १०;
शेखखिजर; ६;
शेखमुबारिक; ६—१०;
शेखसलीमचिस्ती; ७;
शंकरराय; ३३, ७१;
श्रीनिवासराव; १३७;

स

सखूबाई; १७३, १७४, १८५;
सलाबतखान; ५१, ५२, ५५;
सलीम; ७, ६०, १२३;
साहेबखान; ५०;
सीझर बोर्जिया; १०;
सुजा, २०—२२; १७;
सुजा उद्दौला; औधचा वजीर; २९;
सुभान कुलीकुत्बशाहा; ८५;
सुराजमल्ल जाट; २९;
सुलेमान; १८, २०, २१;
सैफखान; ८५—८६;
संग, राणा; २७, १९९, २००, २१०;
संगराजीत; १३, १४;
संभाजी छत्रपति; ३३, १०१, १०४; १४३, १७२, १७४, १८४;
संभाजी चिटणवीस; १०९;

ह

हमीदाबानू; ३, ४;
हरजीराजे महाडीक; १८५, १८६;
हरनाकपोळ; ६६, ७९;
हसन गंगू बहामनी; २, ६५, ६६; ७९;
हाफीज कवी, ६९,
हाफीज रहिमतखान; २९;
हिमू; २७;
हुमायून; मोंगल बादशाहा; १, ३; ४, ३९ १०५, २०१, २०२; २१९;
हुशंगशाहा; माळवा प्रांताचा सुलतान; १९३, २०८; २०९, २१६;
हुसेन निजामशाहा; १११, १३८, १४०;
हेनरी आठवा; १०;


२८५८६

जाफरायाद, ६;
जालना; ११६, १२२;
जावळी; १८३. १८६;
जीवधन, १५३,
जुन्नर, ५२, ५५, ७३, १०६, १०७, १२२, १३७, १५३,
जुनागड, १९७, २०४,
जेजुरी, १७३,
जोनपूर, ६,
जंजिरा, २२२–२२४,

झ

झालावाड, १९०,

ठ

ठट्टा, १२९, १८८,

ड

डफळपूर, १७८,

त

तळेगांव दाभाडे, ४६,
तालीकोट, ६५, १३३, १८०,
तासगांव, १७६,
तुळजापूर, १७६,
तेलंगण, ७३, ८३, ८४,
तंजावर, १७७,
त्रिंबक, १४३,

थ

थाळनेर. २०८, २१४, २१६, २१७,

द

दमण, १९८,
दाभोळ, ६८, ७०, ७२, १४३, १४४, १६५, १८५, २२४,
द्वारका, १९८,
दिल्ली, १४, १६, २२, २३, ४६, ६५, १२५, १४१, १७७, १८९, १९०, २०२, २०३, २०७, २१२,
दींव, १९८, २०२,
दौलतमंगळ, १३७,
दौलताबाद, ३१, ५४, ५५, ६८, ७३, १०५, १०७, ११३, ११४, १२०, १२१, १३१, १३५, १३९, १४०, १५३, २१६,

ध

धरमतपूर, २१,
धार, ४७,
धुळें, २१२,
धोलका, २०४,
धंधुका, २०४,

न

नर्मदा नदी, ४७, ६६, १३१, २०७, २०८, २१३, २२०,
नागरगांव, १५३,
नागोर, ६,
नाशीक, १४२, १४३, २१९
निरा नदी, १४२, १७७,
नंदुरबार, २१३, २१४, २१६,
नांदेड, १२१,

प

पन्हाळा, ७२, १८४,
पर्वती नदी, १३,
परिंडा, १२१, १३६, १४२, १४७, १६३, १६५, १८३,
पाटण, १९०, ११३, १९८, २०२, २०६,
पारीस, ६३,

पावागड; १९८;
पुणें; १३६;
पेशावर; २६;
पैठण; ६७;

फ

फलटण; १६९, १७३;
फत्तेपूर; २२;
फत्तेपूर शिक्री; ९;
फत्त्याबाद; २१;
फोंडा; १८२;

ब

बनारस; ६, २०;
बऱ्हाणपूर; ५९, ६०, १०८, १०९, १२१, १२२, १३०, २१५, २२१;
बहादूरपूर; २०, २१;
बागलाण; ६६, १३०, २१४;
बिहार; १२५;
बीड; ११७, १२०;
बुध; १७६;
बेदर; ३६, ४१, ५०, ६५, ६८; ८०, ८२, ११०, १२०, १४५; १४७, १६५, २१०;
बंकापूर; १५०;
बंगाल प्रांत; १२, २०, १०१, १२५, १२७;
बुंदेलखंड; १६,

भ

भडोच; १९२, २०२, २०४;
भवानगड; ८५;
भातवाडी; १३३;
भीमगड; १५४;
भुलेश्वर; १३७;
भोपाळ; ४७, २०८;

म

मक्का; २३, १६७, २२४;
मच्छलीपट्टण; ८८, २५९, २६०;
मनमाड; १२१;
मलवडी; ८१-१७६;
महाड; १३७, २२५;
माण; ८०;
मालवण; १८२;
माहीम; ३१, १९८;
माहूर; ७४, १३४;
माळवा; १०८, १२५, १९०, १९३, १९५, २०६–२१०; २१४, २१८;
मिरज; १५०, १६५;
मुलतान; १२५;
मेवाड; १३;
मांडवगड ऊर्फ मांडू; २१, १३०; १३१, २०२, २०७, २०८; २११, २१२;
मुंबई; २६१, २६२;

य

यमुना नदी; ७; १८;
युफ्रेतीस नदी; २२८;
युरोप; १०, २२९;

र

रणथंबोर; १३;
राजपुताना; ६, १३;
राजमहेंद्री; ७३, ९७;
राजापूर; ३३;
राठगड; ६;
राणूरी; ५४;
रामगड; ७२;
रायगड ऊर्फ रायरी; ३१, १४३, २२५;
रोम; १०, १६०;
रोहटक; १२६;

रोहणखेडा; ४८, ५८;
रोहिलखंड; २९;

ल

ललगूण ऊर्फ ललगून; ८१;
लहरपूर; २२६;
लासलगांव; १४२;
लाहोर; १९, २२, ६०, १२५, १२८, १४१;
लाळिंग; २१५, २१७;
लंडन; ६३, १६०, १६४; २५०, २५१, २५२, २६९;

व

वऱ्हाड; ३१, ३६, ४१, ६५, ६६; ७४, १२३, १२५, १३०, २१९, २२१;
वाई; १७६;
वारणा नदी; १७७;
वारंगळ; ३५, ३६, ७४;
वाशीम; १२१, १३४;
विजयानगर; ३२, ६५, ७२; ८२, ८६, ८७, १०५, ११०; १७७, १८०, १८३;
विजापूर; १, १५, १६, ३५, ३९; ४०, ४२, ५७, ५९, ६०, ६१; ६५, ७३, ८७, ९९, १०९; ११०, ११२, ११३, १३१, १३७; १४२, १४८, १५०, १५१, १५३; १५४, १५६-१५८, १६०; १६३-१६५; १७८;
विशाळगड; ३२, १८२;
विंचूर; १४२;

श

शहादुर्ग; ५८;
शहापूर; ११६;
शामगड; १३७;
शिरकावली; ८१;
शिवनेरी; १०७, १३७, १४३;
शितापूर; १२६;
शिक्री; ७;
शिंगणापूर; १६९;
शिंदखेड; १३३, १३४;
शेवगांव; ६७;
शृंगारपूर; १८६;

स

सचीन; २२३;
समर्कंद; २, ३;
सह्याद्रीपर्वत; ८१;
सातारा; ८१, ११२, १५३; १७२, १७८;
साबरमती; १९३, २०४;
सामूगड; २१;
सावंतवाडी; १८०;
सिंधप्रांत; ६;
सुर्पे सोनपत; ११६;
सुरत; ६०, १८८, १९८, २०४; २५७, २६१; २६३, २६४; २६६;
सेंट बार्थोलोमो; ६;
सोनखेड; ३१;
सोंडूर; १८४, १८५;
सोलापूर; ४२, ११२, १४२; १६३, १६५;
स्पेन; १०;
संगमनेर; १३६, १३७, १४२, १४३;
संगमेश्वर; ३२, ३३;

ह

हरदा; ४७;
हरिद्वार; १२८;
हालंड; ६२;
हिमालयपर्वत; २९;
हुशंगाबाद; ४७, २०१; २०८;
हैद्राबाद दक्षिण; ४२, १२१; १७५;
हंडिया; ४७;
हिंगोली; १२१;

# शुद्धिपत्र.

| पान; | ओळ; | अशुद्ध; | शुद्ध; |
|---|---|---|---|
| १६ | २६ | स्थाईक | स्थानीक |
| २२ | ९ | हा | ...... |
| ७३ | २७ | राजमहेंद्र | राजमहेंद्री |
| १०७ | १० | बहिरा | बहिरी |
| १२५ | २० | बहार | बिहार |
| १३३ | १ | वजार | वजीर |
| १३६ | ८ | तीही | ती |
| १७४ | ३ | पलटण | फलटण |
| २५६ | २१ | डचलोकांची | डचलोकांनीं |

**टीपः**—उपरीनिर्दिष्ट अशुद्ध पत्राशिवाय आणखीही कांहीं ठिकाणीं काना, मात्रा, अनुस्वार, वेलांटी, वगैरेंचीं अशुद्धें राहिलेलीं आहेत; परंतु तीं सहज लक्षांत येण्यासारखीं असल्यानें त्यांचा वरील यादींत समावेश केला नाहीं.

# धनंजय छापखान्यांत मिळणारीं पुस्तकें.

| पुस्तकांचीं नांवें. | रु० आ० |
|---|---|
| १ सुनीति-भागवत. ... | ०-१२-० |
| २ भजनसाम्राज्य किंवा भाविकांचा विश्रांतिकुंज. ... ... | ०-१२-० |
| ३ देवी कुमुदिनी ... ... | २-०-० |
| ४ कर्मगति. ... ... ... | ०-१२-० |
| ५ विनोदिनी. ... ... ... | ०-८-० |
| ६ वीरांगना पद्मिनी. ... | ०-४-० |
| ७ शांताराम. ... ... ... | ०-१०-० |
| ८ लोकमित्र कादंबरी. ... | ०-१२-० |
| ९ राजनैतिक कारस्थान ... | ०-१२-० |
| १० आर्योत्सवप्रकाश. ... | ०-१२-० |
| ११ सर्वसंग्रह ... ... | १-४-० |
| १२ वनिताबोध ... ... | ०-६-० |
| १३ महिला-क्लेश-निवारण ... | ०-१०-० |
| १४ स्वामीचारित्रसारामृत ... | ०-८-० |
| १५ अष्टादश स्मृतिसार ... | २-५-० |
| १६ दंतमंजन ... ... | ०-८-० |
| १७ चरितार्थसाधन. ... | ०-१२-० |
| १८ नव-पत्र-माला ... ... | ०-४-० |
| १९ हिंदी-मराठी भाषाशिक्षक | ०-६-० |
| २० वाजीकरण. ... ... | १-०-० |
| २१ सं० कवींचीं चरित्रें ... | ०-८-० |
| २२ विचारशिरोमणी. ... | ०-५-० |
| २३ सार्थ शृंगार तिलक ... | ०-३-० |
| २४ शनी उपासना ... ... | ०-२-० |
| २५ अमेरिकेचा इतिहास ... | ०-१०-० |
| २६ जीवजागृति. ... ... | ०-८-० |
| २७ चीनचें संक्षिप्त वर्णन. ... | ०-४-० |
| २८ श्रीमद्भगवद्गीता ... ... | १-८-० |
| २९ राष्ट्रीयत्वाची उत्क्रांति | ०-८-० |
| ३० उद्भ्रांतप्रेम ... ... | ०-१०-० |
| ३१ खर्लीफाच्या गोष्टी ... | ०-८-० |
| ३२ द्वंद्वसमास. ... ... | ०-२-० |
| ३३ विवेकानंद उक्ति ... | ०-४-० |
| ३४ घड्याचा पंखा ... ... | ०-४-० |
| ३५ शिवणकला परिज्ञान ... | ०-८-० |
| ३६ सुशीला कादंबरी ... | ०-८-० |
| ३७ मधुर बोल. ... ... | ०-२-० |
| ३८ नेपोलीयनच्या गोष्टी ... | ०-४-० |
| ३९ जादू विद्येचा ग्रंथ. ... | ०-५-० |
| ४० मोहनेची अंगठी. ... | ०-६-० |
| ४१ कर्पूरमंजरी. ... ... | ०-६-० |
| ४२ नीतिशतक. ... ... | ०-१-० |
| ४३ हास्यमंजुषा ... ... | ०-४-० |
| ४४ सिद्धारूढस्वामींचें चरित्र | ०-१-० |
| ४५ बिनजोडाक्षरी मुलींचें पुस्तक | ०-१-० |
| ४६ शिसपेनी करण्याचें पुस्तक | ०-४-० |
| ४७ शेतीकरितां खतें ... ... | ०-४-० |
| ४८ रबरस्टांप व शाई करण्यांचें पु | ०-३-० |
| ४९ फोटो कसा काढावा ... | ०-३-० |
| ५० गुलबकावली ... ... | ० ६ ० |
| ५१ हातीमताई ... ... | ०-६-० |
| ५२ स्त्रीपुरुषांग लक्षण विद्या ... | ०-४-० |
| ५३ वेताळ पंचविशी ... ... | ०-६-० |
| ५४ सिंहासन बत्तीशी ... ... | ०-३-० |
| ५५ विदुरनीति व नारदनीति | ०-४-० |
| ५६ संसारचोपडी ... ... ... | १-४-० |
| ५७ ज्योतिषसार व रत्न ... | १-४-० |
| ५८ इंद्रजाल ... ... ... | ०-४-० |
| ५९ आधुनिक शास्त्रीय जगत् | ०-८-० |

पत्ता:—लोकमित्रकर्ते, पो० खानापूर जि० बेळगांव.

# प्रस्तावना.

मराठ्यांच्या उत्कर्षाचें पूर्वस्वरूप लक्षांत येण्यास दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांच्या इतिहासाचें मनन केलें पाहिजे. या मुसलमानी राज्यांच्या इतिहासांतच मराठ्यांच्या उत्कर्षाच्या पूर्वस्वरूपाचा इतिहास आहे. दक्षिणेंत छत्रपति **शिवाजीनें** मराठा साम्राज्याची स्थापना करीपर्यंतच्या काळांत मराठ्यांचा मुसलमानी राज्यांत सारखा उत्कर्षच होत चाललेला होता. हा उत्कर्ष दुय्यम दर्जाचा होता; तरी सुद्धां भावी राज्य-संस्थापनेस तो पोषकच होणारा असा होता व त्याबरोबरच मराठ्यांचें वर्चस्वही सारखें वाढत चाललें होतें. गोवळकोंडें, विजापूर, अहंमदनगर व बेदर या चार मुसलमानी राज्यांतील बहुतेक सत्ता प्राय: मराठे मुत्सद्दी व मराठे योद्धे यांच्याच हातांत होती व मुसलमानांतील आपसांतील धार्मिक मतभेद, वैमनस्यें व युद्धकलह हीं सारखीं जोरांत असल्यामुळें, वेळेला मराठ्यांचा उपयोग आपणांस करून घेतां यावा ह्मणून त्यांनींच मराठ्यांना बलिष्ठ बनविलें होतें. दक्षिणप्रांतांतील सर्व शाहा शियापंथी व उत्तरेकडील मोंगल सुनीपंथी त्यामुळें उभयतांमध्यें धार्मिक मतभेद उत्पन्न होऊन मोंगलांनीं दक्षिणेंतील मुसलमानी राज्यांचा उच्छेद करण्याचा पैगाम बांधिला; दक्षिणेंतील मुसलमानी राज्यकर्ते अथवा दिल्ली येथील मोंगल बादशाहा यांना हिंदुधर्मी मराठा लढवय्याला मनसबदारी अथवा सरदारी देऊन प्रबळ करावें अशी केव्हांही इच्छा नव्हती. परंतु हें राजकीय धोरण कायम ठेवून त्याप्रमाणें वागणेंहि त्यांना शक्य नव्हतें; उलट दक्षिणी व परदेशी लोकांच्या भांडणांत निजामशाहाला तर स्वसंरक्षणाकरितां मराठ्यांचा तिसरा पक्ष निर्माण करणें भाग पडलें होतें. हा पक्ष ह्मणजे निजामशहानें छत्रपति शिवाजीचा आजा मालोजी भोंसले यास मनसबदारी देऊन स्वसंरक्षणार्थ विश्वासुक असा, निर्माण केलेला तिसरा पक्ष होय. मूर्तुजा निजामशाहा आपल्या वजिरावर राज्यकारभार सोंपवून आवश्याच्या किल्ल्यावर ईश्वरचिंतन करीत राहिला होता, त्यावेळीं मालोजी भोंसले यास त्याच्या तैनातींत ठेवण्यांत आलें होतें. शहाजीच्या काळांत मराठ्यांच्या ह्या राजकीय महत्वास जोराचें चालन मिळालें; मूर्तुजा निजामशाहा मृत्यु पावला, त्यावेळीं त्यानें दक्षिणी किंवा परदेशी मुसलमानांवर विश्वास न ठेवितां, शहाजी त्यावेळीं निजामशाहींत नसून सुद्धां, त्याच्यावरच आपल्या बायकामुलांना सांभाळण्याचें काम निरोपानें सोंपविलें होतें; सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं वाघोजी जाधवराव नाईक या नांवाचा एक मराठा सरदार वऱ्हाड, विजापूर व विजयानगर या दरबारांचा कांहीं काळ सूत्रचालक बनला होता व कर्नाटकांतील सर्व नाईकवाडी हिंदुफौज त्याच्या ताब्यांत असून त्यानें कितीएकांस पदच्युत केलें होतें व कितीएकांस राज्यपद प्राप्त करून

तथापि न्यूनो डा कुन्हा याच्या ऐवजीं आलेला प्रतिनिधि नोन्होना हा लवकरच मृत्यू पावला; ( इ० सन १५४० ) व त्याच्या जागीं वास्कोडीगामाचा मुलगा स्टीफोड-गामा, ( इ० सन १५४२ पर्यंत ) व त्यानंतर अफॉन्झो ड सूझा हा हिंदुस्थानांत आला. त्यानें विजापूरकर इब्राहीम आदिलशहाशीं तह करून गोंव्याच्या आसपासचा प्रदेश मिळविला; पुढें इब्राहीमशहा क्रूर व लहरी बनल्यामुळें त्यास पदभ्रष्ट करून त्याच्या जागीं त्याचा भाऊ अब्दुल्ला यास स्थानापन्न करावें असा दरबारच्या मंडळीनें कट केला; परंतु तो उघडकीस येऊन अब्दुल्ला गोंव्यास पोर्तुगीज लोकांकडे पळाला; परंतु पोर्तुगीज लोकांनीं त्यास आश्रय न दिल्यामुळें तो गोवळकोंडें व अहमदनगर येथील राज्यकर्त्यांकडे आश्रयास गेला; पण तेथेंही त्यास आश्रय मिळाला नाहीं. या अब्दुल्लामुळें पोर्तुगीज लोकांना आदिलशाही राज्यांत हात घालण्यास मोठी योग्य सुसंधी प्राप्त झाली होती; पण आदिलशाही राज्याच्या सुदैवामुळेंच आपला फायदा करून घेण्याची पोर्तुगीज लोकांस बुद्धि झाली नाहीं असेंच ह्मणणें प्राप्त होतें.

अफॉन्झो ड सूझा याच्या जागीं इ० सन १५४५ मध्यें डॉमजान ड कॅस्ट्रो या प्रसिद्ध मनुष्याची व्हाईसरॉय ह्मणून नेमणूक झाली. हा मोठा प्रामाणिक व सभ्य असून पराक्रमीही होता. याच्या कारकीर्दींत दीव शहराला सर्वांत मोठा व शेवटचा वेढा पडला; ( इ० सन १५४६ ) हा वेढा फेब्रुवारीपासून नोव्हेंबरपर्यंत नऊ महिने पडलेला होता. अहमदाबाद व खंबायतचा सुलतान महंमद याचा सेनापति खोजा जाफर यानें आपणा-बरोबरील मोठ्या सैन्यासह दीवच्या किल्ल्यास वेढा दिला व जमिनीवर एक उंच तट बांधून किल्ल्यांत तोफांचा मोठ्या जोराचा मारा केला; त्यावेळीं किल्ल्यांत शिबंदी थोडी ह्मणजे फक्त चारशें लोकांची होती तरी आंतील लोक व बायकामुळें सुद्धां निर्वाणीच्या निकरानें लढत राहिलीं; मध्यंतरीं खोजा जाफर हा तोफेचा गोळा लागून मृत्यू पावला; तथापि त्याचा शूर मुलगा रुमीखान यानें वेढ्याचें काम तसेंच मोठ्या जोरानें पुढें चालविलें व किल्ल्यांतील लोकांनींही रुमीखानाच्या हल्ल्याचा मोठ्या निकरानें प्रतिकार चालू ठेविला; परंतु किल्ल्यांतील धान्यसामुग्री संपल्यामुळें लोकांचे भयंकर हाल होऊं लागले; इतक्यांत जॉन कॅस्ट्रो हा एका मोठ्या आरमारासह दीव येथें आला; आपल्या सैन्यासह किल्ल्यांत गेला; ताबडतोब युद्धविषयक मंत्रिमंडळ ( Council of Wor ) बोलाविलें; त्यांच्या सल्ल्यानें मुसलमानी सैन्यावर एकदम जोराचा हल्ला करावा, असें ठरविलें; स्वतः आपणाकडे सर्व सूत्रचालकत्व घेतलें; आणि ता० १० नोव्हेंबर रोजीं ( इ० सन १४५५ ) या लहान पोर्तुगीज सैन्यानें मुसलमानी सैन्यावर मोठ्या जोराचा व निकराचा हल्ला केला व त्या सैन्याचा पूर्णपणें पराजय करून टाकिला. या युद्धांत रुमीखान व इतर अनेक मुसलमान